

# खड्गहस्त की सन्यस्त

(आरक्त की कृष्ण)

[आँरि बेल (‘स्ताँदाल’) यांच्या “स्कार्लेट ऑण्ड ब्लॅक” या कादंबरीचा मराठी अनुवाद]

साहित्य आणि संस्कृति मंडळ
महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ती : १९७६ (शके १८९८)

प्रकाशक :
© सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ,
सचिवालय, मुंबई—३२

मुद्रक :
श. म. देव
व्यवस्थापक,
सुलभ मुद्रणालय,
२९१, शनिवार पेठ, पुणे ३०

मूल्य रु. १७=००

## अनुक्रमणिका

आँरि बेल यांना स्ताँदाल असे म्हटले जात असे. त्यांचा जन्म २३ जानेवारी १७८३ रोजी ग्रनोबल येथे झाला. घोडदळाच्या एका तुकडीत त्यांनी १८०० मध्ये कमिशन मिळविले. १८०२ मध्ये त्यांनी ते सोडून दिले; पण १८०६ मध्ये पुरवठा खात्याचे अधिकारी म्हणून ते पुन्हा लष्करी सेवेत दाखल झाले आणि नेपोलिअनच्या सैन्यातील एक अधिकारी म्हणून त्यांनी ऑस्ट्रिया व रशिया येथील मोहिमांत भाग घेतला. १८१४ पासून पुढे त्यांच्या मृत्यूपर्यंत त्यांनी आपल्या आयुष्याचा बहुतेक काळ इटलीत घालविला. १८३० च्या क्रांतीनंतर ते सिविटा वेक्किआ येथे फ्रेंच कॉन्सल झाले. २२ मार्च १८४२ रोजी ते वारले.

# स्ताँदाल
# स्कार्लेट ॲण्ड ब्लॅक

**एकोणिसाव्या शतकातील एक वृत्तान्त**

**दोन खंडांत : खंड पहिला**

★ मूळ भाषांतरकार ★
**जी. के. स्कॉट मॉनक्रीए**

**प्रस्तावना : प्रो. एफ्. सी. ग्रीन**
(एडिंब्रा विद्यापीठातील फ्रेंच वाङ्मयाचे प्राध्यापक)

★ मराठी अनुवाद ★
**गो. वि. वैद्य**

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

निवेदन ........ ८
प्रस्तावना ........ १०
एक छोटासा गाव ........ १४
महापौर ........ १८
गरिबांची भाकर ........ २१
पितापुत्र ........ २६
सौदा पटविण्याची करामत ........ ३०
निरुत्साह ........ ३८
राजीखुषीचे स्नेहसंबंध ........ ४६
बारीकसारीक घडामोडी ........ ५६
खेड्याच्या परिसरातील एक सायंकाळ ........ ६४
मोठे अंतःकरण व छोटा लाभ ........ ७२
रात्रीचे विचार ........ ७६
प्रवास ........ ८१
जाळीदार पायमोजे ........ ८८
इंग्लिश कात्री ........ ९३
कोंबडा आरवण्याच्या समयी ........ ९७
दुसऱ्या दिवशी ........ १०१
प्रमुख दुय्यम अधिकारी ........ १०६
व्हेरिएर येथे राजेसाहेब ........ ११०
विचार हेच दुःखकारण ........ १२२
निनावी पत्रे ........ १३१
पतिदेवांशी संवाद ........ १३५
१८३० मधील चालीरीती ........ १४८
एका अधिकाऱ्याची दुःखे ........ १६०

राजधानी ........ १७३
धर्मशास्त्राची पाठशाळा........ १८०
हे जग किंवा श्रीमंतांमधील उणिवा........ १८८
जीवनाचा पहिला अनुभव ........ १९८
मिरवणूक ........ २०२
पहिले पाऊल ........ २०९
महत्त्वाकांक्षा ........ २२४

# निवेदन

आधुनिक शास्त्रे, ज्ञानविज्ञाने, तंत्र आणि अभियांत्रिकी इत्यादी क्षेत्रांत त्याचप्रमाणे भारतीय प्राचीन संस्कृती, इतिहास, कला इत्यादी विषयांत मराठी भाषेला विद्यापीठाच्या स्तरावर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य यावे हा उद्देश लक्षात घेऊन साहित्य—संस्कृती मंडळाने वाङ्मयनिर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. मराठी विश्वकोश, मराठी भाषेचा शब्दकोश, मराठी वाङ्मयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला, आंतरभारती-विश्वभारती, महाराष्ट्रेतिहास इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत केल्या आहेत.

२. मराठी भाषेला विद्यापीठीय भाषेचे प्रगल्भ स्वरूप व दर्जा देण्याकरिता मराठीत विज्ञान आणि तंत्रविज्ञान, तत्त्वविज्ञान व सामाजिक शास्त्रे या विषयांवरील संशोधनात्मक व अद्ययावत माहितीने युक्त अशा ग्रंथांची रचना मोठ्या प्रमाणावर होण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या प्रसाराने मराठी भाषेचा विकास होईल ही गोष्ट तर निर्विवादच आहे. पण मराठी भाषेचा विकास होण्यास आणखीही एक साधन आहे आणि ते साधन म्हणजे मराठी भाषेत निर्माण होणारे उत्कृष्ट वाङ्मय हे होय. जीवनाच्या भाषेतच ज्ञान व संस्कृती यांचे अधिष्ठान तयार व्हावे लागते. जोपर्यंत माणसे परकीय भाषेच्या आश्रयाने शिक्षण घेतात, कामे करतात व विचार व्यक्त करतात, तोपर्यंत शिक्षण सकस बनत नाही, संशोधनाला परावलंबित्व राहते व विचाराला अस्सलपणा येत नाही; एवढेच नव्हे तर वेगाने वाढणाऱ्या ज्ञानविज्ञानापासून सर्वसामान्य माणसे वंचित राहतात.

३. संस्कृत व अन्य भारतीय भाषांतील आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटिन इत्यादी पश्चिमी भाषांतील अभिजात ग्रंथांचे व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश, अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा आवश्यक तेवढा परिचय करून देणे हा मंडळाच्या वाङ्मयीन कार्यक्रमातील भाषांतरमालेचा उद्देश आहे.

४. भाषांतर-योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून, ज्यांना अग्रक्रम दिला पाहिजे अशी पाश्चात्त्य व भारतीय भाषांतील सुमारे ३०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हर्जिल, एस्किलस्, ऑरेस्टोफेनीस, युरिपिडिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, थॉमस ॲक्वाइनस्, न्यूटन, डार्विन, रूसो, कान्ट, हेगल, जॉन स्टुअर्ट मिल, गटे, शेक्सपीअर, टॉलस्टॉय, दोस्तएव्क्सी, कॉसिरेर, गॉर्डन व्ही. चाईल्ड इत्यादिकांचा या भाषांतरमालेत समोवश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण, भरताचे नाट्यशास्त्र, संगीतरत्नाकर, ध्वन्यालोक, प्राकृतातील गाथासप्तशती, त्रिपिटकातील निवडक भाग इत्यादिकांचाही भाषांतरमालेत समावेश केला आहे.

५. भाषांतरयोजनेखाली मंडळाने आतापर्यंत ५० अभिजात ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित केली आहेत. जॉन स्टुअर्ट मिलचे 'On Liberty', रूसोचे 'Social Contract', एम्. एन्. रॉयची 'Reason, Romanticism & Revolution' व 'Letters from Jail', स्तानिस्लाव्स्कीची 'An Actor Prepares' व 'Building a Character', तुर्गेनिव्हचे 'Fathers & Sons', रायशेनबाखचे 'Rise of Scientific Philosophy', गन्नर मिर्दालचे 'Economic Theory and Underdeveloped Regions', भारतरत्न कै. पां. वा. काणे यांचे 'History of Dharmashastra', कोपलँडचे 'Music & Imagination', बर्ट्रान्ड रसेलचे 'Religion & Science,' तेर्झागीचे 'Theoretical Soil Mechanics', विशाखादत्तचे 'मुद्राराक्षसम्', भरतमुनींचे 'भरतनाट्यशास्त्र' (अध्याय ६ व ७ आणि अध्याय १८ व १९), निकोलाय मनुचीचे 'Storia Do Mogor', ऑ.

से. पिगु लिखित ‘Socialism Vs. Capitalism’, इझाडोरा डंकनचे ‘My Life’, स्ट्रॅविन्स्कीचे ‘Poetics of Music’ इत्यादी पुस्तकांची भाषांतरे व सारानुवाद प्रकाशित झाले आहेत.

६. स्तांदाल लिखित “Scarlet and Black” या पुस्तकाचा श्री. गो. वि. वैद्य, पणजी (गोवा), यांनी केलेला मराठी अनुवाद “खङ्गहस्त की सन्यस्त” या शीर्षकाने मंडळाच्या भाषांतर मालेत प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

**लक्ष्मणशास्त्री जोशी**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ

मुंबई :

अग्रहायन १९, १८९८

१० डिसेंबर, १९७६.

## अनुक्रमणिका

# प्रस्तावना

आँरि बेल यांचा जन्म २३ जानेवारी १७८३ रोजी ग्रनोबल येथे झाला. स्ताँदाल हे टोपणनाव त्यांनी बहुधा त्या नावाच्या, ब्रन्स्विकमधील एका छोट्या गावावरून घेतले असावे. आपल्या आईच्या नात्याकडून आपण एका इटॅलिअनचे वंशज आहोत अशी त्यांची एक आवडती कल्पना होती. त्या इटॅलिअनाला एका क्षुल्लक खुनाच्या कारणावरून सरहद्दीपलीकडे हुसकून लावण्यात आले होते. आँरीचे आईवडील अब्रूदार, सुखवस्तू व उच्च मध्यम वर्गीय होते. तो सात वर्षांचा असताना त्याची आई वारली. आईवर त्याचे अतोनात प्रेम होते. पण तो त्याच्या बापाचा, केरूबँबेलचा तितकाच तिरस्कार करीत असे. मुलाकडून बापाचा उल्लेख बहुधा "Mon Batard de pere" ("माझा कमअस्सल बाप") असा केला जात असे. घरगुती भांडणामुळे आँरीचे बालपण दुःखी झाले होते. परचक्राच्या भयामुळे ("Terror") निर्माण झालेल्या चिंतेच्या त्या काळात ह्या मुलाला रिपब्लिकनांच्या अत्याचारांमुळे, व त्यातही सोळाव्या लुईच्या वधामुळे सुप्त आनंद झाला होता; आणि ते कुटुंब केवळ राजनिष्ठच होते असे नव्हे तर धर्मनिष्ठ कॅथॉलिकही असल्यामुळे त्याच्या मनात धर्माबद्दल द्वेष निर्माण झाला. त्याची ही प्रवृत्ती त्याला वाटणाऱ्या त्याच्या शिक्षकाबद्दलच्या तिटकाऱ्यामुळे वाढत गेली. जेझुइट अबे रेयॉन हे आँरीचे शिक्षक होते. त्याला ते दांभिकपणाचे एक मूर्तिमंत अवतार वाटत. उलटपक्षी त्याला त्याची चुलत आजी इलीजाबेथ आणि त्याचे मातामह डॉ. गान्याँ यांच्याबद्दल फार प्रेमादर वाटत असे; व ह्याचे कारण म्हणजे आजीची स्पॅनिश किंवा कॉर्नेलिअन प्रतिष्ठेची जाणीव व आजोबांचा अठराव्या शतकातला तत्त्वज्ञानी दृष्टिकोण.

ग्रनोबलमध्ये नव्यानेच स्थापन झालेल्या 'एकॉल साँयाल' ह्या मध्यवर्ती शाळेत तरुण आँरीने गणित, चित्रकला व लॅटिन या विषयांचा पाया पक्का केला. शेक्सपिअरच्या साहित्याशी त्याचा परिचय झाला. त्याच्या मनात पुढे आयुष्यभर शेक्सपिअरबद्दल फार आदराचे स्थान राहिले. पण स्ताँदाल जरी एक होतकरू गणिती होता तरी त्या किंवा इतरही विषयांतील यशाबद्दल तो त्याच्या शाळाशिक्षकांचा मुळीच ऋणी नव्हता. उदाहरणार्थ, त्याचे फ्रेंच वाङ्मयाचे ज्ञान. त्याने ते केवळ स्वतःच्या वाचनाच्या जोरावर मिळविलेले होते. त्याचे त्या वाङ्मयाचे वाचन विविध व व्यापक होते. रूसो, एलवेट्यूस, त्रासी, मोलिअॅर, ला फाँतेन, आँरिओस्टो हे त्याचे प्रारंभिक काळातील आवडते लेखक होते.

१७९९ मध्ये स्ताँदालला पॅरिस येथे पाठविण्यात आले. त्याने 'एकॉल पॉलिटेक्निक'साठी तयारी करावी हा त्यामागील बाह्यात्कारी उद्देश होता. तथापि स्ताँदाल प्रवेशपरीक्षेस बसलाच नाही. काही आठवड्यांच्या एकटेपणाच्या भावनेने व घरी परत जाण्याच्या तीव्र ओढीमुळे तो आजारी पडला. तेव्हा दाऱ्यु कुटुंब स्नेहभावाने त्याच्या मदतीस पुढे आले. त्या कुटुंबाशी त्याचे दूरचे नाते लागत होते. नेपोलिअनकडून सरदारी लाभलेला, त्या कुटुंबातला थोरला मुलगा पिअेअर दाऱ्यु त्या वेळी वॉर ऑफिसमध्ये एका मोठ्या प्रशासकीय हुद्द्यावर काम करीत होता. तेथे आँरीसाठी एक छोटीशी जागा मिळाली. नेपोलिअन तेव्हा इटलीच्या मोहिमेची तयारी करीत होता. आणि हा तरुण उमेदवार दाऱ्यु व स्वारी करणारे सैन्य यांच्या पाठोपाठ आल्प्स पर्वत उल्लंघून पार झाला. त्याबद्दल त्याला फार आनंद वाटला. इटलीचे पहिले दर्शन आँरीला घडले तेव्हा तीच आपली स्वप्नभूमी असा मनोमन साक्षात्कार त्याला झाला. दाऱ्यूचे उपकार पुन्हा झाले. त्याच्यामुळे आँरीला सहाव्या ड्रॅगून पलटणीमध्ये कमिशन मिळाले. पण १८०० च्या शरद ऋतूत मिलान सोडून त्याच्या पलटणीत ब्रेश्या येथे दाखल होण्याचा हुकूम त्याला मिळाला. ते त्याला आवडले नाही. त्याला ते जास्तच नापसंत वाटण्याचे कारण म्हणजे त्या वेळी जीना पिएत्राग्रुआ नावाच्या मिलान येथील एका स्त्रीच्या प्रेमात तो पडला होता. आँरीच्या जीवनात पुष्कळच उत्कट प्रेमप्रकरणे झाली. जीनाचा संबंध हे त्यातील

अनुक्रमणिका

पहिले प्रकरण. आपल्याबद्दलच्या प्रेमाने ऑंरीच्या अंतःकरणात केवढा उत्पात मांडला आहे याची काहीच कल्पना त्या वेळी तिला नव्हती. लष्करी जीवनक्रमाचा तिटकारा येऊन स्तॉंदालने त्याच्या कमिशनचा राजीनामा दिला आणि तो पॅरिसला परत गेला. तेथे त्याचे वास्तव्य चार वर्षे झाले. त्या अवधीत त्याने सातत्याने खूप वाचन केले, प्रेम व प्रसिद्धी यांची स्वप्ने रंगविली, नाटके लिहिण्याचा अयशस्वी प्रयत्न केला आणि श्रृंगारिक विलास उपभोगले. पण प्रणय व कीर्ती यांच्यामध्ये तो फारसा नशिबवान ठरला नाही. खिशात नाण्याची चणचण भासू लागल्यामुळे त्याने मार्से येथे एका व्यापारी संस्थेत नोकरी धरली. हे त्याने त्याच्या कुटुंबियांना मनस्ताप देण्यासाठी केले होते. स्वतःच्या चैनीखातर मेलानी गिलबेअर नावाच्या एका नटीशी त्याने संबंध ठेविला. ऑंरीसारख्या कृतघ्न नातेवाईकाशी दाऱ्यु फार उदार मनाने वागत असे. त्याने १८०६ मध्ये ऑंरीला कॉमीसारएमध्ये एका कनिष्ठ जागेवर लावून घेतले. पुढे जर्मनीचा कबजा घेतलेल्या विजयी फ्रेंच सैन्यात त्याची बदली झाली. काही काळ स्तॉंदाल ब्रन्स्विक येथे एक प्रकारे विशिष्ट टापूचा अधिकारी म्हणून राहिला. सैनिकांच्या राहण्याची नागरिकांकडे सोय करणे, पैसा वसूल व पुरवठा करणे ह्या कामांची जबाबदारी त्याच्यावर सोपविण्यात आली होती. मास्कोच्या १८१२ च्या भयंकर मोहिमेत त्याने भाग घेतला होता; आणि त्याबद्दलचे पारितोषिक म्हणून नेपोलिअनच्या स्टेट कौन्सिलमध्ये ऑडिटर म्हणून त्याला नेमणूक मिळाली. पुढे तो एके ठिकाणी व्यवस्थापकही झाला. ही नोकरी किफायतशीर होती व काम फारसे कष्टदायक नव्हते. १८१३ मध्ये तो सैन्याबरोबर ऑस्ट्रियात गेला व दोस्तांची सेना फ्रान्सवर चढाई करण्यासाठी येऊन ठेपली तोपर्यंत त्याने सागॉ येथे व्यवस्थापक म्हणून काम केले. १८१४ मध्ये त्याला ग्रनोबलला जाण्याचा हुकूम मिळाला. तेथे त्याने दोफीन्यीच्या संरक्षणाच्या सिद्धतेची महत्त्वाची कामगिरी बजाविली. खालावलेली प्रकृती आणि थकवा यामुळे त्याला पॅरिसला परत जावे लागले. आणि नेपोलिअन एल्बाला गेल्यावर तो इटलीत गेला. त्यामुळे सार्वभौम कारकीर्दीशी त्याचे संबंध संपुष्टात आले. नंतर तो मिलान येथे मुख्यत्वेकरून राहू लागला. इटलीत त्याचे वास्तव्य एकूण सात वर्षे झाले. या अवधीत त्याने तेथील लेखकांशी घनिष्ठ संबंध ठेविले होते. जीना पिएत्राग्रुआ आता त्याची प्रेयसी झाली होती. तथापि मध्यंतरीच्या काळात नैतिक दृष्ट्या तो तिच्या स्मृतीशी एकनिष्ठ राहिला होता असे मुळीच नव्हे.

आता तो ग्रंथकार झाला होता. हायडन व मोझार्ट यांच्यावरील त्याचे पुस्तक १८१४ मध्ये प्रकाशित झाले. इटॅलिअन रीतीभातीबद्दल त्याला जिज्ञासा होती; तसेच ललित कलांचीही त्याला अतिशय आवड होती. ह्या दोहोंच्या तृप्तीसाठी शोधक वृत्तीने त्याने इटलीत सर्वत्र संचार केला. ह्या संचारात त्याने जे पाहिले व पाहून त्याचे जे मत बनले त्याने त्याला दोन पुस्तकांचे विषय पुरविले. ही पुस्तके १८१७ मध्ये प्रसिद्ध झाली. स्तॉंदालची राजकीय मते बंडखोरीची होती. त्यामुळे ऑस्ट्रियन गुप्तचरांचे लक्ष त्याच्याकडे वेधले गेले होते. परिणामी इटलीतील त्यांचे वास्तव्य १८२१ मध्ये संपुष्टात आले. तो पॅरिसला परतला. त्या वर्षी शरद ऋतूत त्याने इंग्लंडला धावती भेट दिली. त्या भेटीत 'कोलबर्न'च्या संपादकाशी त्याचा परिचय झाला. त्या नियतकालिकासाठी स्तॉंदाल पॅरिसमधील जीवन व साहित्य ह्या विषयांवर लेख लिहू लागला. निरनिराळ्या फ्रेंच नियतकालिकांतही तो लिहीत असे. वृत्तपत्रीय लेखन हेच त्याचे कमाईचे प्रमुख साधन १८३० पर्यंत होते. मृत्यूसमयी त्याच्या वडिलांची गरिबीच होती. वडिलांच्या मृत्यूबरोबर त्याचे खाजगी स्वतंत्र उत्पन्न, इटलीतील प्रवास आणि मर्जीप्रमाणे लेखनासाठी फुरसत याबद्दलची त्याची स्वप्ने संपली. उलट, आता व्यवसायिक गरज म्हणून त्याला साहित्यिक, राजकीय व वैचारिक वर्तुळांना वरचेवर भेटी देणे आवश्यक झाले. त्याच्या साहित्यिक कर्तृत्वाचा हाच सर्वात चढतीचा काळ होता. या कालावधीत (१८३० पर्यंत) त्याने सहा पुस्तके लिहिली. त्यांच्यांत जशी त्याची पहिली कादंबरी होती त्याचप्रमाणे शेक्सपिअरवरील त्याचा एक ग्रंथही होता. ह्यूगो, सेंट बव्ह, मेरीमे, बेरॉंज, त्रासी, क्युविए, तिए, लाफायेतप्रभृति साहित्य, विज्ञान व राजकारण ह्या क्षेत्रांतील महाभागांशी स्तॉंदालच्या गाठीभेटी व परिचय ह्याच काही काळात झाला.

जुलैमधील "वैभवशाली दिवसांनी" त्याच्या भाग्यरेषेत मोठा बदल घडवून आणला. ट्रिएस्ट येथे स्तॉँदालची नेमणूक "कॉन्सल" म्हणून झाली. पण मेटरनिचकडून त्याला विहित मान्यता नाकारण्यात आली. म्हणून त्याची बदली सिविटा वेक्किआ येथे करण्यात आली. ते जरी रोमनजीकचे एक बंदर होते तरी स्तॉँदालच्या दृष्टीने ती हद्दपारीच होती. तेथला कंटाळवाणेपणा घालविण्यासाठी त्याने त्याचे नियुक्त काम नेटाने सुरू केले. पुराणवस्तू संशोधनात तो वेळ घालवू लागला. इटलीतील जुनी, हस्तलिखित कागदपत्रे त्याने गोळा केली आणि शक्य तेव्हा तो सिविटा वेक्किआहून बाहेर जाऊ लागला. मोले नावाचा त्याचा एक मित्र कॅबिनेटमध्ये काम करीत असे. त्याच्या अनुग्रहाने स्तॉँदालला आजारीपणाची रजा मिळू शकली. त्यामुळे १८३६ मध्ये तो पॅरिसला गेला. १८३९ च्या शरद ऋतूपर्यंत फ्रान्समध्येच राहता येण्याची तजवीज त्याने केली. ह्या कालावधीत त्याचे बरेच लिखाण लिहून झाले. ते आपल्याला उपलब्ध आहे. स्तॉँदालने आठवणी, प्रवासवर्णन असे विविध लेखन केले. काही लघुकथाही लिहिल्या. ह्यापैकी काही लिखाण त्याच्या मृत्यूनंतर काही दिवसांनी एक नियतकालिकातून प्रसिद्ध झाले. सिविटा वेक्किआ येथे त्याने एक अपूर्ण कादंबरी आणि आत्मचरित्राचा काही भाग लिहिला. तो कामावर रुजू झाला. तथापि त्यानंतर त्याला लवकरच अर्धांगवायूचा झटका आला. पण स्वतःचे काम तो मोठ्या धैर्याने करीत राहिला. १८४१ च्या ऑक्टोबरमध्ये त्याला पॅरिसला परत बोलाविण्यात आले. पुढील वर्षी मार्चमध्ये त्याला अर्धांगाचा दुसरा झटका रस्त्यातच आला. त्याला घरी नेण्यात आले.

"Le Rouge et le Noir" हे एव्हरीमॅन्स लायब्ररीतर्फे प्रकाशित झालेले स्तॉँदालचे पहिले पुस्तक. कित्येकांना असे वाटणे साहजिक आहे की हा मान त्याच्या "La Chartreuse de Parme" ह्या ग्रंथाला मिळावयास पाहिजे होता. ही दोन्ही पुस्तके अत्युत्कृष्ट कलाकृती आहेत. पण दोन्हींत स्तॉँदालच्या विशिष्ट प्रतिभेचे दर्शन वेगवेगळ्या भाषाशैलींनी घडते. तथापि मला वाटते की, "स्कार्लेट ॲण्ड ब्लॅक" ह्या कादंबरीत तिच्या लेखकाच्या गुंतागुंतीच्या स्वभावधर्माचे चित्र आपणांस अधिक बारकाईने पाहावयास मिळते. कदाचित याचे कारण असे असू शकेल की, Le Rouge et le Noir हे पुस्तक दोन्हींपैकी आधीचे असून त्यात स्तॉँदालच्या क्रियाशक्तीचा पंथ अधिक ताठपणे व्यक्त झाला आहे. La Chartreuse पेक्षा ह्या कादंबरीत त्याने मानवतेचा परामर्ष कमी संयतपणे, अधिक निष्ठुरतेने व उपरोधिकपणे घेतला आहे. कदाचित नंतरच्या त्याच्या कादंबरीपेक्षा ह्या कादंबरीतील उपरोध कमी गंभीर व सखोल असावा; कारण तो कमी सार्वत्रिक स्वरूपाचा आहे. उलटपक्षी तो अधिक व्यापक वर्तुळात फिरतो आणि मनुष्यस्वभावाच्या विविध प्रकारांना व जास्त विविध उद्योगक्षेत्रांना स्पर्श करतो. La Chartreuse de Parme मध्ये वाचकाला लेखकाची प्रसन्नचित्तता व समर्पण यांची प्रभा फाकलेली दिसते. त्यांचा मागमूस त्याच्या आधीच्या कादंबरीत आढळत नाही. अर्थात Le Rouge et le Noir मध्ये स्तॉँदालच्या विशिष्ट एकतानतेचे व नितांत शांतीचे क्षण अर्थातच आढळतात. तरी प्रारंभापासून अखेरीपर्यंत ती कादंबरी म्हणजे एक संघर्षकथाच आहे. गतिमान ताण-तणाव व नाट्यात्मकता हे तिचे स्थायीभाव आहेत. ज्युलिआँ हा काही स्तॉँदाल नव्हे. पण स्तॉँदालच्या आचारातील अनेक तत्त्वे व त्याची ध्येये ज्युलिआँमध्ये आढळतात. लेखकाने त्याच्या नायकाला कल्पनेने ज्या प्रसंगपरिस्थितीत टाकले आहे ती खुद्द त्याच्यावर आली असता त्याने त्या नायकाच्याच जाणीवा संवेदना व्यक्त केल्या असत्या. कादंबरीतील अनेक प्रसंगांचे साम्य प्रत्यक्षात घडलेल्या प्रसंगांशी असले तरी सदर कादंबरी म्हणजे काही स्तॉँदालच्या अनुभूतीची निव्वळ लेखी नक्कल नव्हे; उलट त्याच्यातील कलाकाराने त्याच्या अनुभूतीचे चिकित्सक व काही वेळी आदर्शभूत स्वरूप दाखविले आहे. कादंबरीत जे काय शाश्वत मोलाचे आणि खास स्तॉँदालचे असे आहे ते म्हणजे ज्युलिआँची प्रज्वलित क्रियाशीलता आणि त्याची प्रखर कर्तव्यनिष्ठेची भावना. त्याची ही कर्तव्यनिष्ठा भोवतालच्या जगावर केंद्रित झाली नसून त्याने स्वतःचे असे जे ध्येय मनाशी निश्चित केले आहे

त्या ध्येयाशी निगडित आहे. ह्या आदर्शाच्या कसोटीतून स्ताँदाल व ज्युलिआँ दोघेही ज्या एका सनातनी ख्रिश्चन सत्यवचनाचा अर्थ लावतात त्याचा आशय असा आहे : मनुष्याला जर साऱ्या जगाची प्राप्ती झाली, पण त्याचा आत्मा मात्र त्याच्या हातून निसटला तर त्यात मनुष्याच्या पदरी कोणता फायदा पडला?

स्कॉट मॉनक्रीए यांनी केलेल्या भाषांतराचा उपयोग येथे करण्यात आला आहे. याचा अगदी सरळ अर्थ असा की, ती एक कलाकृती आहे; कारण मॉनक्रीए स्वतःच एक दर्जेदार, वैशिष्ट्यपूर्ण लेखक होता. त्याच्या मोठेपणाला तोडच नाही.

स्ताँदालने लिहिलेल्या अत्यंत महत्त्वाच्या अशा ग्रंथांची यादी पुढे दिली आहे. प्रत्येक पुस्तकाच्या नावानंतरचा आकडा हा त्या पुस्तकाच्या प्रथम प्रकाशनाच्या वर्षाचा आहे. स्ताँदालचे सर्व लिखाण समाविष्ट असलेली आवृत्ती ७९ खंडांची असून ते Le Divan यांनी १९२७ ते १९३८ पर्यंत प्रकाशित केले :—

La Vie de Haydu, १९१४; Histoire de la peinture en Italie, १८१७; Rome, Naples et Florence, १८१७; De l' Amour, १८२२; Racine et Shakespeare I, १८२३; Racine et Shakespeare II, १८२५; Vie de Rossini, १८२४; Armance, १८२७; Promenades dans Rome, १८२९; Le Rouge et le Noir, १८३१; Me'moires d'un Towriste, १८३८; La Chartreuse de Prame, १८३९; L' Abbesse de Castro, १८३९; Chroniques italiennes, १८५५; Romans et Nowelles, १८५४; Correspondance, १८५५; M'elauges d'art et de litterature, १८६७; Vie de Nopoleon, १८७६; Journal, १८८८; Vie de Henri Brulard, १८९०; Souvenirs d' Egotisme, १८९२; Lucien Leuwen, १९०१.

M. Josephson लिखित Stendhal or the Pursuit & Happiness, १९४६ हेही पुस्तक पाहावे.

**एफ. सी. ग्रीन**

अनुक्रमणिका

## प्रकरण पहिले

# एक छोटासा गाव

व्हेरिएर हा फ्रॉंश कॉंतेमधील छोटासा गाव सर्वांत मोठा टुमदार आहे. एका टेकडीच्या उतरणीवर तो वसलेला आहे. सफेत रंग दिलेल्या उंच घरांची लाल कौलारू छपरे सगळी उतरण व्यापून टाकतात. चेस्टनटच्या झाडांच्या ठिकठिकाणच्या समूहांनी टेकडीची उंच-सखलता चांगलीच निदर्शनास येते. पूर्वी स्पॅनिश लोकांनी बांधलेली तटबंदी तिच्या भोवती आहे. पण आता ती भग्नावस्थेत आहे. तटबंदीच्या खाली शेकडो फुटांवर दू नदी वाहते.

व्हेरिएरच्या उत्तरेला जुरा हा उंच डोंगर लागूनच आहे. पुढे झुकलेल्या त्याच्या कड्याने गावावर जणू सावली धरली आहे. ऑक्टोबर आला की वेराची सुळ्यासारखी शिखरे बर्फाच्छादित होतात. तेथून वेगाने खाली वाहात येऊन दू नदीला मिळणारा एक जलप्रवाह व्हेरिएर गावातून जातो. लाकूड-कापणीचे काम करणाऱ्या पुष्कळशा गिरण्या-कारखाने त्या जलप्रपाताच्या जोरावरच चालतात. साहजिकच हा व्यवसाय करणाऱ्यांची संख्या ह्या गावात बरीच आहे. व्यवसाय तसा अगदी साधा असला तरी तेथील बहुसंख्य रहिवाशांना त्याने जीवनस्वास्थ्य दिले आहे. मात्र हे रहिवासी पांढरपेशे नसून शेतकरी आहेत.

असे असले तरी व्हेरिएर गावाला प्राप्त झालेली संपन्नता ह्या व्यवसायापासून मिळालेली नाही. छापील नक्षी असलेले चिटाचे कापड तयार करण्याच्या धंद्याकडे ते श्रेय जाते. मलहाउसचे कापड म्हणून ते प्रसिद्ध आहे. नेपोलिअनचा पाडाव झाला त्या काळापासून ह्या कापडधंद्याने व्हेरिएरची भरभराट इतकी केली आहे की, तिने गावातल्या घराघराचा चेहेरा-मोहरा सुधारला आहे.

एखादा माणूस व्हेरिएर गावात प्रवेश करू लागताच प्रथम त्याच्या कानांत घुसतो तो भयानक स्वरूपाच्या कर्कश यंत्रांचा गोंगाट. पाठोपाठ वीसएक हातोड्यांचे घणाघाती आवाजही त्याला ऐकू येतात. क्षणभर तो बिचकून जातो. हातोड्यांच्या कर्णकटू आघातांमुळे तिथली जमीन हादरते. गावातून वाहणाऱ्या त्या जोरदार जलप्रवाहाने एक चाक फिरते ठेविले आहे. त्याच्याच सहाय्याने ते मोठे थोरले हातोडे उचलले जातात आणि आपल्या आघातांनी दिवसाकाठी हजारो लोखंडी छोट्या चुका, खिळे त्या कारखान्यांतून निर्माण करतात. त्या आवाजाच्या लयीतच जणू काम चालत असते. प्रचंड हातोड्यांच्या आघातांखाली सापडलेले ते लोखंडाचे छोटे तुकडे— जणू कोवळ्या सुंदर छोकऱ्यांच्या ओळीच— त्यांचे रूपांतर हातोहात खिळ्यांत होत असते. ही क्रिया बाह्यतः ओबडधोबड दिसत असली तरी व्हेरिएरमध्ये मुख्य रस्त्याने जाणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला ती सकृद्दर्शनी आश्चर्यचकित करते. कानठळ्या बसविणारा चुका-खिळ्यांचा छानदार कारखाना कोणाचा आहे अशी पृच्छा, स्वित्झर्लंडपासून फ्रान्सला वेगळे करणाऱ्या पर्वतावर प्रथमच पाय ठेवणाऱ्या जिज्ञासू प्रवाशाने केल्यास तिथला कोणीही रहिवासी विशिष्ट हेल काढून म्हणेल, “ओहो! माहीत नाही? हा कारखाना आहे महापौरांच्या मालकीचा.”

व्हेरिएरच्या बाजारपेठेतील हमरस्ता दू नदीच्या किनाऱ्यापासून निघून थेट टेकडीच्या माथ्यापर्यंत जातो. ह्या प्रमुख रस्त्यावर कोणीही प्रवासी थोडा वेळ थांबल्यास शंभर हिश्शांनी त्याला एक उंच व्यक्ती दिसेल. आढ्यतेची झाक तोंडावर असलेली ही वैशिष्ट्यपूर्ण व्यक्ती म्हणजे व्हेरिएरचे महापौर. त्यांना पाहताच प्रत्येक जाणारा-येणारा आपली टोपी वर उचलतो.

आता त्यांचे केस करडे होत आहेत. त्यांचा पोषाखही त्याच रंगाचा असतो. 'कम्पॅनिअन ऑफ ऑर्डर्स'सारख्या सन्मानाच्या अनेक उपाधी त्यांच्या नावाशी संलग्न झालेल्या आहेत. त्यांचे कपाळ उंच अन् नाक पोपटाच्या चोचीसारखे आहे. त्यांच्या सबंध चेहेऱ्यात एक प्रकारचा नीटसपणा आहे. गावाच्या महापौराच्य प्रतिष्ठेला साजेसे असे गांभीर्य त्यांच्या चेहेऱ्यावर असते. पण त्याचबरोबर अठ्ठेचाळीस वर्षांच्या वयात कोणाकोणांत आढळणारी देखणी मोहकताही त्यांच्या चेहेऱ्यावर विलसते.

परंतु प्रथम दर्शनी निर्माण होणारी ही प्रतिक्रिया अधिक वेळ तशीच टिकून राहू शकत नाही. पॅरिसहून आलेल्या माणसाला नंतर लगेच कळून येते की, त्या व्यक्तित्वात आत्मसंतुष्टता व स्वयंपूर्णता यांच्याबरोबरच बुद्धीचा तोकडेपणा व चमकदार मौलिकतेचा अभाव आहे. त्यामुळे पाहणाराचा हिरमोड होतो. आणि शेवटी त्याला असेही वाटते की, दुसऱ्याकडून जे घ्यावयाचे असेल त्याजबद्दल सावकारी पक्केपणा; पण दुसऱ्याचे काही देणे असेल तेव्हा अखेरपर्यंत चालढकल एवढ्यापुरतीच ह्या माणसाच्या बुद्धीची कुवत आहे.

एवंगुणविशिष्ट महापौरांचे नाव आहे— मन्स्यूर द रेनॉल. रस्ता ओलांडून नगरपालिकेच्या सार्वजनिक सभागृहाकडे जाताना महापौरांच्या पावले टाकण्याच्या पद्धतीतसुद्धा दबदबा व गांभीर्य जाणवते. सभागृहात प्रवेश करून ते आमच्या प्रवाशाच्या दृष्टीआड होतात. प्रवासी तसाच हिंडत हिंडत पुढे गेला तर सभागृहापासून सुमारे तीनशे फूट अंतरावर, थोड्याशा उंच जागी, त्याला एक भव्य इमारत दिसेल. तिच्यापुढे सुंदर बगीचा असून त्याच्या भोवतीच्या गजांच्या कुंपणातून तो दिसतो. पलीकडे बर्गंडीच्या टेकड्या क्षितिजाला टेकल्या आहेत. नेत्रांना आनंद देण्यासाठीच जणू त्या निर्मिल्या आहेत असे वाटते. या देखाव्याने प्रवाशाला, त्याने नुकत्याच अनुभवलेल्या, क्षुल्लक आर्थिक व्यवहारांच्या गुदमरून टाकणाऱ्या दूषित वातावरणाचा विसर पडू लागतो.

हेच महापौर रेनॉल यांचे निवासस्थान. ती सुंदर चिरेबंदी इमारत त्यांनी अलीकडेच बांधली आहे. लहानमोठ्या चुका बनविण्याच्या प्रचंड कारखान्यातून झालेल्या किफायतीच्या पायावर ती उभारलेली आहे. असे म्हणतात की, त्यांचे घराणे मूळचे स्पॅनिश व खूप पिढ्यांचे पुरातन होते. चौदाव्या लुईने देश जिंकण्यापूर्वी किती तरी वर्षे त्यांचा वंश या देशात नांदू लागला होता. निदान तशी प्रौढी घराण्याचे वंशज मिरवतात.

रेनॉल १८१५ मध्ये व्हेरिएरचे महापौर झाले. तेव्हापासून व्यापारधंद्याशी असलेला आपला संबंध सांगताना त्यांना संकोच वाटू लागला. त्यांच्या शानदार बगीच्याचे निरनिराळे विभाग क्रमशः उतरत्या सौधांवरून दू नदीच्या काठापर्यंत पोचले आहेत. या भिन्न विभागांना आधार देणाऱ्या भिंती या त्यांच्या लोखंडाच्या व्यापारातील कर्तृत्वाची बक्षिसी आहे.

लाइपजिक, फ्रॅन्कफुर्ट, न्युरेंबर्ग आणि जर्मनीची आणखी काही कारखानदारीची शहरे यांच्या अवतीभवती असलेल्या सुंदर बागबगीच्यांसारखे फ्रान्समध्ये तुम्हांला आढळणार नाहीत. इथे फ्रॉंश कॉंतेमध्ये माणूस जितक्या जास्त भिंती बांधतो आणि आपल्या स्थावरावर जिकडे तिकडेजितके जास्त दगडांवर दगड उभारून ठेवतो तितका तो आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून जास्त आदरपात्र ठरतो. महापौरांनी आपल्या बागेत जागजागी मधमाश्यांच्या पोळ्यांसारख्या चौकटी-चौकटीत भिंती उभारलेल्या आहेत. त्यांच्या मालकीच्या ह्या बागांची खूप प्रशंसा केली जाते. कारण ज्या छोट्या जागांवर ह्या बागा उभ्या आहेत त्या रेनॉल यांनी सोन्याच्या मोलाने पैसे मोजून खरेदी केल्या आहेत. याचे एक उदाहरण म्हणजे दू नदीच्या काठी

असलेल्या लाकूड-गिरणीची जागा. व्हेरिएरला येणाऱ्या कोणाचेही लक्ष, भलत्याच ठिकाणी उभारलेल्या या गिरणीकडे वेधते.

गिरणीच्या छपरापेक्षाही उंच ठिकाणी एका पाटीवर मोठ्या अक्षरांत कोरलेले 'सोरेल' हे नाव मग तुमचे लक्ष वेधून घेते. ही गिरणी सहा वर्षांपूर्वी, आता जेथे म. द. रेनॉल यांच्या चौथ्या सौधाची भिंत बांधली जात आहे त्या ठिकाणी उभी होती.

सोरेल हा म्हातारा शेतकरी तसा पुरा हटवादी अन् दुराग्रही. त्याने त्या जागेवरची आपली गिरणी दुसरीकडे हालवावी म्हणून रेनॉलना कितीदा त्याच्याशी बोलणी करावी लागली, किती फ्रेंच सुवर्णमुद्रा त्याला मोजाव्या लागल्या अन् तेवढ्यासाठी त्यांना स्वतःची प्रतिष्ठा पणास लावावी लागली. गिरणीसाठी वीजपुरवठा आवश्यकच होता. पण विजेच्या तारा थोड्या दुरून जात होत्या. पॅरिसमध्ये आपल्या वजनाचा उपयोग करून रेनॉल यांनी तारांचा मार्ग, परवाना मिळवून वळवून घेतला. केवळ त्यांच्यासाठीच हे करण्यात आले. ही अनुग्रहाची गोष्ट १८२ – च्या निवडणुकीनंतरची.

सोरेलच्या त्या एका एकर जागेसाठी, दू नदीच्या किनाऱ्यालगत, पाचशे यार्ड अंतरावर, खालच्या बाजूस असलेली आपली चार एकर जागा त्याला देणे रेनॉलना भाग पडले होते. वास्तविक लाकडाच्या फळ्या कापणीचे काम करणाऱ्या आपल्या गिरणीसाठी सोरेलला ती जागा बरीच जास्त सोयीची होती. पण जमीनखरेदीची रेनॉल यांची अतिरिक्त तृष्णा आणि अधीरता यांचा फायदा उठविल्याशिवाय सोरेल राहिला नाही. त्याने रेनॉलकडून सहा हजार फ्रँक काढले. आता तो गर्भश्रीमंत झाला आहे. लोक त्याला 'पिअेअर' सोरेल असे संबोधू लागले आहेत.

स्वतःला जादा शहाणे समजणाऱ्या स्थानिक रहिवाशांनी ह्या व्यवहारावर बरीच उलटसुलट टीका केली होती. त्यानंतर काळ चार वर्षांनी पुढे गेला. नंतरच्या एका रविवारची गोष्ट. रेनॉल चर्चमधून आपल्या घरी परत चालले होते. महापौरांचाच पोषाख त्यांच्या अंगावर होता. दुरूनच त्यांनी म्हाताऱ्या सोरेलला पाहिले. त्याची तीन मुले त्याच्याबरोबर होती. त्यांचे साहाय्य घेऊन तो चालत होता. पण अशा स्थितीतही त्याने आपली नजर रोखली होती रेनॉलकडेच. अन् त्यांना पाहून तो हसलाही. त्याच्या त्या हसण्याने महापौरांच्या हृदयात प्रकाशाचा, जाळून-पोळून टाकणारा एक तीव्र किरण घुसला आणि त्यांच्या डोक्यात लखकन उजेड पडला. आपण चकलो, कमी रकमेत आपण तो सौदा तेव्हा पटवायला पाहिजे होता हा विचार तेव्हापासून रेनॉल यांच्या मनात घर करून राहिला आहे.

दरसाल वसंत ऋतूत इटलीहून पॅरिसला जाणारे कुशल गवंडी जुरा डोंगराच्या खिंडीतूनच जातात. पण आपल्या बांधकामासाठी आणि 'भिंतींची' अनेक बांधकामे चालू असली तरीही त्या गवंड्यांकडून कोणताही आराखडा वा योजना न घेणे हे व्हेरिएरमध्ये लोकप्रिय ठरण्यासाठी व तेथील जनतेचा आदर संपादन करण्यासाठी आवश्यक मानले गेले आहे. त्या गवंड्यांच्या सल्ल्याने आपली बांधकामे पूर्ण करणाऱ्या अविचारी घरमालकांची, तेथे अशा अनुचित वर्तनाबद्दल, नवीनच खूळ काढणारा, 'उलट्या कवटी'चा म्हणून कायमची अपकीर्ती होते आणि फ्राँश काँतेमधील शांत गंभीर विचाराच्या ज्येष्ठ नेमस्तांकडून त्यांचे नावसुद्धा पुन्हा कधी उच्चारले जात नाही. त्याला कीर्तीला कायमचे मुकावे लागते. कारण फ्राँचे काँतेमध्ये एखाद्याला नाव मिळवून देणे किंवा त्याला कायमचे बदनाम करणे हे याच मंडळींच्या हातात असते.

अनुक्रमणिका

खरे म्हणजे त्या शिष्ट बुझुर्गांनी अत्यंत चीड आणणारा एक अरेरावी जुलमीपणा तेथे प्रस्थापित केला आहे. जो एकदा पॅरिसच्या महान प्रजासत्ताकात राहिलेला आहे अशा कोणालाही त्यामुळे त्या छोट्या गावातील वास्तव्य अगदी असह्य झाले आहे. सार्वजनिक मताचा असा जुलूम (आणि कसले ते सार्वजनिक मत!) फ्रान्समधील अशा छोट्या गावात अमेरिकेतल्याप्रमाणे अगदी खुळेपणाचा, मूर्खपणाचा झालेला आहे.

★ ★ ★

## प्रकरण दुसरे

# महापौर

प्रशासक म्हणून रेनॉल यांचा लौकिक टिकून राहण्याच्या दृष्टीने, सुदैवाने एक चांगली संधी त्यांना प्राप्त झाली. दू नदीच्या पात्रापासून सुमारे शंभर फूट उंचीवरून टेकडीला वळसा घालणारा मोठा सार्वजनिक रस्ता सुस्थितीत राहण्यासाठी एक मोठी भिंत त्याच्या बाजूला बांधणे आवश्यक होते. फ्रान्समधील अनेक रमणीय निसर्गदृश्यांपैकी एक गणले जावे असे एक दृश्य या रस्त्यावरून पाहता येते; याचे कारण म्हणजे त्याला लाभलेले टेकडीभोवतालचे हे स्थान. पण दरसाल वसंत ऋतूत वरच्या बाजूने पावसाचे पाणलोट जोराने वाहत येऊन ते रस्त्याला खोल खाचरे, घळी पाडून पार जात आणि त्यामुळे तो छानदार रस्ता इतका नादुरुस्त होऊन जाई की, त्याचा नीट उपयोगदेखील करता येत नसे. आसपासच्या सर्वच नागरिकांना त्यामुळे मोठी गैरसोय सहन करावी लागे. पण ह्याच घटनेने रेनॉल यांना आपले प्रशासन संस्मरणीय करण्यासाठी एका आवश्यक कामगिरीची सुसंधी प्राप्त करून दिली. रस्ता सुस्थितीत राहून त्याचा उपयोग करता यावा म्हणून टेकडीच्या उंचवट्याच्या बाजूने रस्त्याच्या कडेस अडीचशे फूट लांबीची व वीस फूट उंचीची एक भिंत त्याच्या रक्षणासाठी उभारणे आवश्यक झाले.

पण व्हेरिएरच्या त्या रस्त्याचे काम होऊ द्यावयाचेच नाही; त्यात अडथळे, विघ्ने आणावयाची असा चंग, शत्रुत्वाच्या पोटी, अंतर्गत कामकाज खात्याच्या एका माजी मंत्र्याने बांधला होता. त्यामुळे रेनॉलना पॅरिसच्या तीन खेपा कराव्या लागल्या. भिंतीचे बांधकाम जमिनीपासून चार फूट उंचीपर्यंत होऊन थांबले होते. पण तशा सर्व आजी, माजी मंत्र्यांना धाब्यावर बसवून काम तडीस नेण्याचा निश्चय रेनॉलनी केला होता. त्यामुळे ते चालू होऊन आता भिंतीवर शेवटचे चिरे बसविले जात होते.

निळी झाक मारणाऱ्या, करड्या रंगाच्या पत्थरांच्या त्या मोठमोठ्या चौथऱ्यांवर कोपर टेकवून किती वेळा तरी दू नदीचे ते खोरे मी दृष्टिक्षेपाने आकळून घेतले आहे. पाहता पाहता आधल्या रात्रीच सोडलेल्या पॅरिसमधल्या नृत्यगृहांचे विचार माझ्या मनात मध्येच तरळून जात आहेत. नदीच्या डाव्या किनाऱ्याकडील भागात पाच-सहा नागमोडी दऱ्या आहेत. त्यांच्या खोलगट भागातून वाहात आलेले पाण्याचे अनेक छोटे ओहोळ एकेका खडकावरून उड्या मारीत दू च्या पात्राला अखेर मिळतात. त्या डोंगराळ भागात ऊन्ह फार कडक असते. आणि सूर्य ऐन माथ्यावर येतो तेव्हा वाटसरूला छायेसाठी निवारा मिळतो तो केवळ उतरणीवर असलेल्या मोठमोठ्या छायावृक्षांमुळेच. त्यांची वाढ तेथे फार झपाट्याने झाली आहे. आणि निळसर झाक असलेला सुंदर पर्णविस्तार त्यांना लाभलेला आहे. ह्याचे एक खास कारण म्हणजे तेथील ती कृत्रिम माती. भरभक्कम भिंतीच्या पाठीशी तिचाच भराव महापौरांनी टाकून घेतला. आणि स्थानिक नगरपित्यांचा विरोध न जुमानता त्यांनी त्या रस्त्याची रुंदीही सहा फुटांनी वाढविली. (रेनॉल उमराव पक्षाचे व मी स्वतः उदारमतवादी— पण तरीसुद्धा या कामगिरीबद्दल मी त्यांची भलावण करतो.) आता त्यांना व व्हेरिएर येथील गरीबखात्याचे प्रशासक, नशीबवान म. वालनो यांना तो उताराचा रस्ता सँ जरमँ ऑलेच्या तोलाचा वाटतो.

तथापि माझ्या दृष्टीने तेथे मला फक्त एक दोष आढळतो. या रस्त्याचे 'कूर द ला फिदेलीते' हे अधिकृत नाव पंधरा-वीस ठिकाणी स्फटिकशिलांवर लिहिण्यात आलेले आहे. ही गोष्ट म्हणजे महापौर रेनॉल यांचे आणखी एक मानाचे पदक होय. पण ज्या रानटी पद्धतीने तिथल्या मजबूत छायातरूंची संबंधित अधिकाऱ्यांकडून काटछाट केली जाते ती मला फार दोषार्ह, चुकीची वाटते. त्या वृक्षांचा विस्तृत पर्णभार

छाटून त्यांना शिस्तबद्ध आकारात ठेवण्यासाठी नगरपालिकेकडून, त्या ठेंगण्या व गोल विस्ताराच्या सार्वजनिक झाडांची अशी छाटणी वर्षाकाठी दोनदा केली जाते. छाटल्यामुळे ठेंगणे, सपाट व वाटोळे दिसणारे झाडांचे पुंजके सामान्य भाजीपाल्याच्या झुडुपांची आठवण करून देतात. इंग्लंडमधील वृक्षांसारखे हे वृक्ष भव्य आकारात वाढू–विस्तारू दिले असते तर ते दृश्य किती छान दिसले असते. पण या बाबतीत महापौरांची इच्छा ही हुकुमाची एक जबरदस्तीच असते व तिच्या तालावर नगरपालिकेच्या मालकीच्या वृक्षांची छाटणी निर्दयपणे केली जाते. साहंजिक स्थानिक उदारमतवादी लोकांची ह्या गोष्टीविरुद्ध तक्रार आहे. काहीशा अतिशयोक्तीने ते असेही म्हणत असतात की रेव्ह. मासलाँ ह्या पाद्र्याने त्या झाडांच्या छाटलेल्या फांद्या वगैरेंचा उपयोग स्वतःसाठी करणे सुरू केल्यापासून नगरपालिकेच्या बागवानांचे हात जास्त कडक झाले आहेत.

मासलाँ हा तरुण पाद्री काही वर्षांपूर्वी बेझाँसाहून पाठविण्यात आला होता. अबे शेलाँ व त्या जिल्ह्यातील काही पाद्री यांच्यांवर नजर ठेवणे ही कामगिरी त्याच्यावर सोपविण्यात आली होती. इटॅलिअन सैन्यातून निवृत्त झालेला एक सर्जन-मेजर व्हेरिएरला वास्तव्य करून राहिला होता. वेळोवेळी केल्या जाणाऱ्या त्या छानदार वृक्षांची छाटाछाट आणि नासधूस यांच्या विरुद्ध त्याने महापौरांकडे आपली तक्रार नोंदविली होती. हा गृहस्थ एकाच वेळी जॅकोबिन व बोनापार्टिस्ट होता असे महापौर सांगतात. तेव्हा त्याच्या तक्रारीच्या संदर्भात एका आणि तेही लीजन ऑफ ऑनरची उपाधी धारण करणाऱ्या सर्जन मेजरशी ज्या सुरात बोलणे वाजवी ठरेल अशा गुर्मीच्या शब्दांत त्यांनी त्याला सुनावले. ते म्हणाले,

"मला छाया, सावली आवडते. माझ्या मालकीच्या झाडांची छाटणी अशीच करण्यात येत असते की, जेणेकरून सावलीचा फायदा चांगला मिळत राहील. आणि झाडांचा दुसरा उपयोग तरी कोणता? छाया देणे एवढाच की नाही? आता अक्रोडाची झाडे सोडा– ती मात्र खरीखुरी उपयुक्त; त्यांच्यापासून काही तरी लाभ होतो."

पण प्रथम तुम्हांला छान वाटलेल्या ह्या छोट्या व्हेरिएर गावात प्रत्येक गोष्टीबाबत तीच, अगदी तीच विचारसरणी एक व्यवच्छेदक लक्षण ठरली आहे. "मोबदला मिळाला पाहिजे" ही प्रवृत्ती तेथे शेकडा पंचाहत्तरपेक्षा जास्त लोकांच्या हाडीमांसी खिळून राहिली आहे. त्या टुमदार गावातील हरेक छोट्यामोठ्या व्यवहारामागील भूमिका मोबदल्याचीच असते. एखादा नवखा माणूस व्हेरिएरला आला की प्रथम तो तेथील नैसर्गिक सौंदर्याने भारला जातो. तेथल्या रहिवाशांच्या जीवनावरही त्या सुंदर निसर्गाने तसाच सुखद परिणाम केलेला असेल अशी त्याची कल्पना साहजिक होते. आपल्या सुंदर गावाचा व आसपासच्या रमणीय निसर्गाचा उल्लेख नेहमी ते आल्यागेल्याजवळ अभिमानाने करीत असतील असेही त्याला वाटते. आणि ते खरेही आहे. पण त्याच्यामागे कारण मात्र निराळेच आहे. त्या नैसर्गिक सौंदर्याने आकर्षित झालेले प्रवासी, पर्यटक यांच्यापासून पैसा मिळवून गावातील खानावळवाले गबर होतात, स्थानिक कर गोळा करणाऱ्यांच्या द्वारा नगरपालिकेला जादा उत्पन्न मिळते हे त्याचे खरेखुरे कारण आहे. म्हणजे स्थानिक नागरिकाची काकदृष्टी खिळलेली असते ती पर्यटकांमुळे मिळणाऱ्या कररूपी लभ्यांशावर.

तो शरद ऋतूतील एक छानदार दिवस होता. महापौर रेनॉल आपल्या अर्धांगीच्या हातात हात घालून त्या रस्त्याने फिरायला बाहेर पडले होते. अत्यंत गंभीर अशा स्वरात ते पत्नीशी बोलत होते. पण तिचे कान त्यांच्याकडे होते तरी डोळे आणि लक्ष मात्र मुलांच्या हालचालींकडे होते. त्या तीन मुलांपैकी, अकरा वर्षांचा थोरला मुलगा पुन्हा पुन्हा धावत जाऊन लगतच्या भिंतीच्या माथ्यावर चढण्याचा, स्वतःला न झेपणारा

उपद्व्याप करीत होता. पण 'आदोल्फ' अशी मृदू आवाजातील हाक ऐकताच तो माघारी फिरला. मादाम रेनॉल तिशीच्या घरात होत्या. पण अजून त्या एखाद्या नवयुवतीप्रमाणे अत्यंत सुंदर दिसत होत्या.

रेनॉल पत्नीशी बोलत होते. ते म्हणाले,

"पॅरिसच्या त्या अक्कडबाज गृहस्थाला त्याच्या कृत्याबद्दल पश्चात्ताप करण्याची पाळी येईल." त्रासिक स्वरात ते बोलले तेव्हा त्यांची नेहमीची फिकट दिसणारी मुद्रा जास्तच फिकट पडली होती. ते पुढे म्हणाले,

"पण म्हणावं, राजदरबारी माझेही दोस्त आहेत."

तथापि दोनएकशे पानांच्या ह्या पुस्तकात तेथील प्रादेशिक जीवन वाचकांपुढे ठेवण्याचे जरी मी ठरवले असले तरी तिथल्या लोकांच्या प्रादेशिक बोलीचा व त्यांच्या संभाषणातील त्या चतुर खुब्या-श्लेष यांचा वापर करून वाचकांना कंटाळा आणण्याइतका अडाणीपणा मी करणार नाही.

महापौर रेनॉल यांना ज्याचा एवढा राग व तिटकारा वाटत होता तो पॅरिसचा सद्गृहस्थ म्हणजे दुसरा-तिसरा कोणी नव्हे तर दोन दिवसांपूर्वी व्हेरिएरला आलेला मंन्स्यूर आपेअर होता. त्या भूतदयाप्रेरित माणसाकडे, तुरुंगांना भेटी देऊन पाहणी करण्याचे काम होते. आल्या आल्या त्याने व्हेरिएरचा तुरुंग आणि त्याशिवाय तेथील इस्पितळ व गरिबांचा आश्रम आदींना भेटी दिल्या. ह्या संस्थांची व्यवस्था महापौर रेनॉल आणि आसपासचे काही प्रमुख जमीनदार परोपकार, समाजसेवा ह्या भावनेने पाहात होते.

मादाम रेनॉल जरा भीतभीत पतीला म्हणाल्या,

"गरिबांच्या कल्याणासाठी तुम्ही किती काटेकोर इमानानं झटता, अन् त्यांच्या सोयी-गैरसोयी, अडीअडचणी यांच्याकडे लक्ष पुरवता. तेव्हा तो पॅरिसचा गृहस्थ तुम्हांला असा कोणता त्रास देऊ शकणार आहे?"

"वाटेल ते करून दोष हुडकायचे अन् त्यांचं खापर माझ्या माथी फोडायचं एवढ्यासाठी तर तो इथं आलाय. अन् परत गेल्यावर तो उदारमतवादी वर्तमानपत्रात त्याबद्दल लेख लिहिल."

"पण गडे, तुम्ही कुठं वाचता ते लेख?"

"अग, पण लोक वाचतीलच ना? अन् ते बोलतील की मग माझ्याजवळ, त्याच्या त्या जॅकोबिन लेखांबद्दल. अशा गोष्टींमुळे लोकसेवेच्या कार्यात व्यत्यय येतो अन् मग माणसाचं लक्ष कार्याकडे नीट लागत नाही. पण माझ्याबद्दल सांगायचं तर लक्षात ठेवा म्हणावं, मी त्या पाद्र्याला कधीही क्षमा करणार नाही."

★ ★ ★

## प्रकरण तिसरे

# गरिबांची भाकर

व्हेरिएरचे पाद्री म्हणून पॅरिसहून नियुक्त झालेले (क्युरे) पाद्री यांचे वय आहे ऐशी वर्षे. पण त्या डोंगरी भागातील छानदार हवापाण्यामुळे त्यांची शरीरयष्टी अजून बळकट आणि स्वभाव करारी राहिलेला आहे. व्हेरिएरचे इस्पितळ, तुरुंग आणि गरीब आश्रम ह्या संस्थांना दिवसाच्या कोणत्याही प्रहरी भेट देण्याचा, तपासणीसाठी तेथे आत जाण्याचा अधिकार त्यांना होता. पॅरिसहून आणलेले ओळखपत्र जवळ असलेले आपेअर, त्याच्या भक्कम आधारावर, मोठ्या चाणाक्षपणे एके दिवशी सकाळी सहाच्या ठोक्याला, त्या छोट्या, चौकस गावात दाखल झाले. आणि आल्याबरोबर ताबडतोब शेलाँ यांच्या वसतिस्थानाकडे वळले.

फ्रान्सचे एक उमराव व त्या प्रांतातील सर्वांत श्रीमंत जमीनदार मन्स्यूर ल मार्कि द ला मोल यांनी त्यांना लिहिलेले पत्र स्थानिक पाद्री अबे शेलाँ यांनी वाचले तेव्हा गंभीर होऊन ते विचारात पडले आणि अखेर स्वतःशी पुटपटले, “मी वृद्ध, ज्येष्ठ आहे. इथं सगळे मला चाहतात. ती वरची धेंडे माझे वाईट करायला कदापि धजावणार नाहीत.” आणि मग लगेच पॅरिसच्या त्या सभ्य गृहस्थाकडे वळून ते म्हणाले,

“साहेब, आपण माझ्याबरोबर चला; आणि एक पथ्य मात्र सांभाळा. आपल्या नजरेला ज्या ज्या गोष्टी दिसतील त्यांच्याबाबतचं आपलं कोणतंही मत कृपा करून त्या तुरुंगाधिकाऱ्यांसमोर, विशेषतः गरीब आश्रमाच्या अधीक्षकांसमोर व्यक्त करू नका.” एखादी खूपशी चांगली, पण किंचितशी धोकादायक गोष्ट करताना माणसाच्या डोळ्यांत चमकणारे सुखभावनेचे पवित्र तेज, त्यांच्या नजरेत, वार्धक्य असूनही चमकत होते.

एका भावनाशील माणसाशी आता आपली गाठ पडली आहे ही गोष्ट आपेअर यांना तत्काळ कळून चुकली. त्या आदरणीय पाद्र्यासमवेत मग त्यांनी तुरुंग, इस्पितळ आणि गरीब आश्रम या संस्था पाहिल्या. अनेक प्रश्नही विचारले. आणि काही प्रश्नांना चमत्कारिक उत्तरे मिळाली तरीही त्यांनी दोष देणारा एकही उद्गार काढला नाही.

भेट-तपासणीचे ते काम काही तास चालले होते. त्या स्थानिक पाद्र्याने आपेअरना रात्रीच्या भोजनाचे निमंत्रण दिले. पण काही महत्त्वाची पत्रे लिहावयाची असल्यामुळे आपणांस येता येणार नाही असे आपेअरनी त्यांना कळविले; आपल्या मेहेरबान मित्राला आणखी तसदी देण्याची त्यांची इच्छा नव्हती. तपासणीचे काम पूर्ण करण्यासाठी मंडळी दुपारी तीन वाजता पुन्हा गरीब आश्रमात गेली. नंतर त्यांनी तुरुंगालाही भेट दिली. तेव्हा तुरुंगाधिकारी दरवाजातच उभा होता. सहा फूट उंचीच्या व फेंगड्या पायांच्या त्या माणसाचा, हलकटपणाची छटा असलेला चेहेरा धास्तीमुळे हिडीस दिसत होता. दृष्टभेट होताच त्याने पाद्र्याला विचारले,

“साहेब, तुमच्याबरोबर दिसत असलेले गृहस्थ मन्स्यूर आपेअर आहेत काय?”

“असतील; त्याचं काय?” पाद्री उत्तरला.

अनुक्रमणिका

“कारण आपेअरना तुरुंगाच्या आत मुळीच प्रवेश देऊ नये असा स्पष्ट आदेश मला वरिष्ठांकडून काल आला आहे. रात्रभर घोडदौड करून एका खास दूतानं तो आणला आहे.”

“मन्सूर नुआरो, माझ्याबरोबरचे हे गृहस्थ म. आपेअरच आहेत हे मी तुम्हांला स्पष्ट करतो. पण दिवसा अथवा रात्रीच्या कोणत्याही वेळी तुरुंगाला भेट देण्याचा आणि माझ्याबरोबर कोणालाही आणण्याचा अधिकार मला आहे हे तुम्हांला माहीत आहे ना?” ह्या सवालाबरोबर तुरुंगाधिकाऱ्याचा आवाज खाली आला आणि त्याची मान खाली लवली. काठीच्या धमकावणीने पाळीव कुत्रे निमूटपणे वागावे त्याप्रमाणे नमून तो म्हणाला, “होय साहेब, पण मी बायकोपोरांचा धनी आहे. माझ्याविरुद्ध वर कळविले गेल्यास मला नोकरीला मुकावे लागेल. ह्या नोकरीशिवाय माझ्या जीवनाला अन्य कसलाही आधार नाही.”

“पण मलाही माझी नोकरी गमवावी लागली तर मला फार दुःख होईल.” असे तो सन्माननीय पाद्री म्हणाला. तेव्हा त्याचा स्वर वाढत्या भावनाकुलतेने कंपित झाला होता.

“पण दोहोंत खूपच फरक आहे ना! आपल्याला आठशे लिरांचं उत्पन्न आहे आणि स्वतःची चांगली छानदार, आरामशीर जागा आहे हे आम्हांला माहीत आहे.” म. नुआरोने लगेच प्रत्युत्तर दिले.

ह्या घटनांचे पडसाद व्हेरिएरमध्ये गेले दोन दिवस उमटत होते. त्याबाबत टीका, प्रतिटीका होत होती; अतिशयोक्तीही केली जात होती; आणि त्यांचे वेगवेगळे अर्थ लावले जात होते. दुष्ट प्रवृत्ती उफाळून येण्यास त्या छोट्या शहरात वेळ लागला नाही.

महापौर रेनॉल आपल्या पत्नीशी त्याच हकीगतीबद्दल चर्चा करीत होते. त्या दिवशी सकाळी गरीब आश्रमाचे गव्हर्नर मन्स्यूर वालनो यांच्याबरोबर ते पाद्री शेलाँच्या घरी गेले होते. आपले तीव्र असमाधान त्यांच्या कानांवर त्या दोघांना घालावयाचे होते. शेलाँना कोणाचाच आधार असा नव्हता. त्यामुळे रेनॉल–वालनो यांची ती प्रतिक्रिया त्यांना फार जाणवली. ते म्हणाले, “सभ्य गृहस्थहो, माझं वय ऐंशी आहे. माझ्या विभागातले भाविक लोक आज तिसऱ्यांदा आपल्या जिल्ह्यातल्या पाद्र्याला बडतर्फ झालेला पाहणार आहे. इथं गेली छपन्न वर्षे माझं वास्तव्य आहे. ह्या गावातील बहुतेक सर्वांना बाप्तिस्मा मीच दिलेला आहे. प्रथम मी इथं आलो तेव्हा हे एक लहान खेडं होतं. हल्ली रोज मी ज्या अनेक तरुण जोडप्यांची लग्ने लावतो त्यांच्या आजाआजींचीही लग्नं फार पूर्वी मीच लाविली होती. व्हेरिएर गाव हे मी माझं कुटुंबच मानतो. पण आता ते सोडावं लागणार असं दिसतंय. तरी त्या भीतीने मी माझ्या सद्विवेक बुद्धीचा बाजार मांडणार नाही; अथवा कोणाच्याही दडपणाखाली वाकणार नाही. ते परके गृहस्थ पॅरिसहून आले तेव्हा मी मनाशी म्हटलं की, ‘ते खरोखरी उदारमतवादी असतीलही. हल्ली असे लोक खूपच झालेत. पण आपले गरीब नागरिक व तेथल्या तुरुंगातले कैदी यांचं ते काय वाईट असं करू शकतील?’

रेनॉल आणि विशेषतः वालनो यांचे दोषारोप जास्तच कडक व तीव्र होऊ लागले. तेव्हा शेलाँ सकंप व चढ्या आवाजात म्हणाले, “बरंय, सभ्य गृहस्थहो, तुम्ही करा मला नोकरीवरून दूर. पण तरीही मी याच गावात राहीन. तुम्हा सर्वांना माहीत असेलच की, अठ्ठेचाळीस वर्षांपूर्वी वारसा हक्काने माझ्या वाट्याला आलेली एक जमीन इथं असून तिच्यापासून मला आठशे लिव्हर्सचं उत्पन्न येतं. त्यावर मी माझी उपजीविका करीन. मला पाद्री म्हणून मिळत असलेल्या मोबदल्यातून माझी काहीच बचत होत नाही; आणि म्हणूनच

माझ्याकडून तो हिरावून घेतला जाण्याची भाषा लोक जेव्हा बोलतात तेव्हा मला त्याचं विशेषसं भय वाटत नाही."

X X X

रेनॉल यांचे आपल्या पत्नीशी वागणे मनमोकळे असे. परस्पर संबंधाचा त्या उभयतांमध्ये आदर्श दुवा होता. तथापि तिने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर काय द्यायचे ते त्यांना कळत नव्हते. म्हणून "पॅरिसचा तो सद्‌गृहस्थ— कैद्यांचं असं काय वाकडं करू शकेल?" हा प्रश्न तिने पुन्हा भीत भीत विचारला. तेव्हा ते संतापून काही बोलणार तोच ती एकदम ओरडली. त्यांचा दुसरा मुलगा रस्त्याच्या कडेच्या त्या उंच भिंतीवर चढून तिच्या वरवंडीवरून पळत होता. ती भिंत द्राक्षांच्या मळ्यापासून वीस फूट उंच होती. त्यामुळे मादाम रेनॉल घाबरल्या होत्या. पण तिच्यावरून तो एखादे वेळी बावरून खाली पडण्याचा धोका होता. म्हणून मा. रेनॉल यांनी त्याला मोठ्याने हाका मारल्या नाहीत. पोरगा मात्र स्वतःच्या शूर कर्तृत्वाच्या अभिमानाने हसत होता. पण त्याने आपल्या आईकडे पाहिले तेव्हा तिचा चेहेरा खूपच चिंताग्रस्त व भयाकुल झालेला दिसला. तेव्हा त्याने खाली रस्त्यावर उडी मारली अन् धावतच तो आईजवळ आला. त्यावर ती त्याला फार रागावली.

ह्या छोट्या प्रसंगाने त्या पतिपत्नींमधील संभाषणाला एक वेगळेच वळण दिले. रेनॉल बोलू लागले,

"लाकूड-गिरणीवाला तो सोरेल आहे ना? त्याच्या मुलाला नोकरीसाठी नेमायचं मी ठरवलं आहे. मुलांना प्रगतिपथावर, पुढे नेण्याचं काम तो करील. नाही तरी पोरं आताशा भारीच पुंड झाली आहेत. आपल्याला ती आवरतही नाहीत. तो तरुण सोरेल लॅटिनमध्ये फार हुषार आहे. धर्मोपदेशकासारखं त्याचं कायसंसं धार्मिक शिक्षणही झालेलं आहे स्वभावाने तो निग्रही आहे असं पाद्री सांगतो. त्याला मी जेवणखाण अन् तीनशे फ्रँक देत जाईन. त्याची नियत तेवढीशी चांगली नाही अशी शंका मला येत होती. कारण लीजन ऑफ ऑनरच्या पदवीवाल्या म्हाताऱ्या सर्जनचा तो आहे लाडका मुलगा. दूरचे चुलत नाते सांगून तो म्हातारा, सोरेल कुटुंबात राहायला आला. कदाचित तो लिबरलांचा गुप्त दूतही असावा. त्याच्या दमेकरी तब्येतीला इथली डोंगरी हवा फार चांगली असं तो म्हणे. पण तसा पडताळा कुणाला आल्याचं आपल्या तरी ऐकिवात नाही. त्यानं बोनापार्टच्या इटलीतील सर्व स्वाऱ्यांत भाग घेतला होता. आणि असंही ऐकिवात आहे की, त्या दिवसांत त्यानं साम्राज्याच्या विरुद्ध आपलं मत दिलं होतं.

"अशा ह्या लिबरल पक्षाच्या माणसानं त्या तरुण सोरेलला लॅटिन भाषा शिकविली आणि स्वतःबरोबर इथं आणलेला आपला ग्रंथसंग्रहही त्याला दिला. आपल्या मुलांसाठी एका सुताराच्या पोराची नेमणूक करावी लागेल असं मला स्वप्नातही कधी वाटलं नव्हतं. हा तरुण सोरेल गेली तीन वर्षे धर्मशास्त्राचा अभ्यास करीत आहे. पाद्र्याचं प्रशिक्षण देणाऱ्या पाठशाळेत जाण्याचा त्याचा इरादा आहे. म्हणजे तो लिबरल नाही, लॅटिनचा पंडित आहे असं मला त्या म्हाताऱ्या पाद्र्यानं, त्याच्या माझ्या कायम वितुष्टाला कारणीभूत झालेल्या प्रसंगाच्या आदल्याच दिवशी सांगितलं होतं."

थोडे थांबून, आपल्या पत्नीकडे मुत्सद्दीपणाचा कटाक्ष टाकीत ते पुढे बोलू लागले, "स्वतःच्या गाडीसाठी अलीकडेच विकत घेतलेल्या दोन चांगल्या नॉर्मन घोड्यांबद्दल वालनो गर्व दाखवीत आहे. पण स्वतःच्या मुलांसाठी मात्र त्यानं एखादा चांगला शिक्षक ठेवलेला नाही!"

अनुक्रमणिका

"पण आपला हा शिक्षक फितवून स्वतःकडे घेण्याइतका तो हिकमती आहे म्हटलं." मादाम म्हणाल्या.

"अनेक दृष्टींनी माझी ही योजना मला सोयीस्कर वाटते. चला, ठरलं तर मग सारं. तुला पण ती पसंत आहे असं मानायचं ना?" आणि या प्रकारे पत्नीची संमती घेताना त्यांनी तिच्या मनात उद्भवलेल्या त्या सुंदर विचाराबद्दल स्मितपूर्वक तिचे आभार मानले. त्यावर मादाम रेनॉल म्हणाल्या,

"अगदी छान, गडे. बाई बाई, तुम्ही किती चटकन एखाद्या गोष्टीबद्दल निर्णय घेऊ शकता हो!"

"त्याचं कारण म्हणजे माझा खंबीर स्वभाव. पाद्र्याला त्याचा अनुभव आलाच आहे. हे पाहा, आपल्या अवतीभवती इथं लिबरलांचा गराडा पडलेला आहे हे आपल्याला मुळीच विसरून चालणार नाही. उगीच लपवाछपव हवी कशाला? माझी खात्री आहे की इथले सगळे कापडव्यापारी माझा मत्सर करतात. त्यांच्यांतले दोघेतिघे खूप मोठे श्रीमंत होऊ घातले आहेत. व्हा म्हणावं. रेनॉल यांची मुलं शिक्षकाच्या देखरेखीखाली बाहेर जात-येत आहेत; त्यांच्याकडे लक्ष द्यायला त्यांचा खास शिक्षक त्यांच्याबरोबर असतो हे दृश्य त्यांनी पाहावं अशी माझी इच्छा आहे. वा! काय जबरदस्त भाव मारून जाईल असं दृश्य! माझ्या आजोबांनाही त्यांच्या तरुणपणी एक शिक्षक ठेवण्यात आलेला होता असं ते आम्हांला नेहमी सांगत. आता आपण आपल्या मुलांसाठी हा शिक्षक ठेवण्याने मला शंभर क्राउन्सचा जादा खर्च येईल. पण आपली प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी असा खर्च आवश्यकच मानायचा असतो."

पतीने एकदम घेतलेल्या या निर्णयामुळे मा. रेनॉल फार विचारात पडल्या. उंच, सुडौल बांध्याच्या त्या महिलेला डोंगरी जिल्ह्यातील लोक 'सौंदर्यसम्राज्ञी' म्हणून ओळखीत असत. त्यांच्या वृत्तीतला साधेपणा त्यांच्या व्यक्तित्वाला अधिक शोभा देई. वयाच्या मानाने त्या तरुण, कोवळ्या दिसत. पॅरिसच्या रहिवाशांच्या दृष्टिकोणातून बाईंच्या अंगची निरागसता व चापल्य यांनी युक्त अशी अकृत्रिम मोहकता, विकारवशतेला एक नाजूक आव्हानच ठरले असते. पण आपल्या रूपाचा, पाहणाऱ्याच्या मनावर असा परिणाम होतो याची अंधुकशी कल्पना जरी बाईंना आली असती तरी शरमेने मनात त्या चूर होऊन गेल्या असत्या. चवचालपणा किंवा नखरा यांचा थोडासासुद्धा अंश त्यांच्या वृत्तीत कधी दिसून आला नव्हता.

गरीब आश्रमाचे श्रीमंत गव्हर्नर, एम्. वालनो यांनी त्यांचे प्रणयाराधन केले होते असे म्हणतात. पण त्यात त्यांना संपूर्ण अपयश आल्यामुळे मादाम रेनॉल यांच्या अंगचे सद्‌गुण अधिकच उठून दिसले होते. कारण वालनो उणेपुरे उंच, बळकट बांध्याचे आणि डोळ्यांत भरतील अशा रंगारूपाचे तरुण होते. त्यांना काळे, झुपकेदार कल्ले होते. पण त्याचबरोबर ते ओबडधोबड, बडबडे व कोडग्या वृत्तीचे प्राणी होते. पण अशाच व्यक्ती तिथल्या प्रांतात मोठ्या रुबाबदार म्हणून समजल्या जात.

उलट मा. रेनॉल फार लाजाळू होत्या. तशाच त्या चंचल मनोवृत्तीच्या व लहरीही होत्या. मोठा आवाज आणि चंचल हालचाली यांच्यापायी वालनो त्यांच्या मनातून अगदी उतरला होता. छानछोकी, विलासी वृत्ती यांच्या नावाखली व्हेरिएर गावात ज्या गोष्टी खपून जात असत त्यांचा मा. रेनॉलना तीव्र तिटकारा होता व त्यामुळे स्वतःचा घरंदाजपणा, कुलीनता यांचा फार अभिमान बाळगणारी महिला असा लौकिक त्यांना प्राप्त झाला होता. त्यांनी त्या मताची कधीच काही पर्वा केली नाही. उलट व्हेरिएरचे रहिवासी आपल्या घरी जितके कमी येतील तितके बरे असेच त्यांना वाटे. काही विशिष्ट स्थानिक महिलांच्या दृष्टीने

मा. रेनॉल ह्या एक पढतमूर्ख बाई होत्या ही गोष्ट लपवून ठेवण्याचा प्रयत्न आम्ही करीत नाही. आपल्या नवऱ्याचे हितसंबंध लक्षात न घेता पॅरिसच्या किंवा बेझांसाच्या सुंदर टोप्या मागविण्याच्या सुसंधी त्या खुशाल वाया जाऊ देत. आपल्या सुंदरशा बगीच्यात आपल्याला निवांतपणे फिरावयास मिळावे एवढीच रेनॉलबाईंची इच्छा होती. बाकी कुठल्याही गोष्टीबद्दल त्यांची काही तक्रार नव्हती.

खरोखरी मा. रेनॉल ह्या अगदीच साध्यासुध्या बाई होत्या. आपल्या यजमानांवर टीका करण्यापर्यंत त्यांचा सहवास आपल्याला कंटाळवाणा वाटतो असे उघड उघड म्हणण्यापर्यंत त्यांची मजल गेलेली नव्हती. पतिपत्नींमधील संबंध हे असे एवढेच, प्रेमळपणाची मर्यादा एवढीच अशी त्यांची समजूत होती. अर्थात याचा उच्चार मनातल्या मनातसुद्धा त्या करीत नसत. रेनॉल जेव्हा आपल्या मुलांच्या भवितव्याच्या योजनेबद्दल त्यांच्याशी बोलत तेव्हा त्यांना ते विशेषेकरून अधिक प्रिय वाटत. तिघा मुलांपैकी आपण एकाला लष्करी अधिकारी, दुसऱ्याला न्यायाधीश व तिसऱ्याला धर्मोपदेशक करणार असल्याचे रेनॉल यांनी त्यांना सांगितले होते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे त्यांच्या परिचयाच्या इतर पुरुषांपेक्षा आपले यजमान पुष्कळच कमी कंटाळवाणे आहेत असे त्यांना आढळून आले होते.

आणि पत्नीचे हे पतीविषयक मत तसे बरोबर व न्याय्य असेच होते. महापौर यांना लाभलेला संभाषणकुशलबेतद्दलचा व विशेषतः उच्च अभिरुचीबद्दलचा लौकिक त्यांनी आपल्या चुलत्याकडून जणू वारसाहक्काने मिळालेल्या सहाएक गमतीदार चुटक्यांवर आधारलेला होता. त्यांचे ते वृद्ध काका, कॅप्टन रेनॉल ऑर्लीन्सच्या ड्यूकच्या पायदळाच्या पलटणीत राज्यक्रांतीपूर्वी नोकरीला होते. पॅरिसला ते गेले म्हणजे राजवाड्याच्या दिवाणखान्यात कोठेही जाण्याचा, फिरण्याचा परवाना त्यांना होता. तेथे मा. द मॉन्टेसॉन, सुप्रसिद्ध मा. द झॉंली, पॅरिस-रॉयलचे संशोधक म. द्यूक्रे वगैरेसारख्या मोठ्यामोठ्यांच्या गाठीभेटी कॅ. रेनॉल यांच्याशी झालेल्या होत्या. ती महनीय नावे महापौर रेनॉल यांच्या बोलण्यात नेहमीच जरा जास्तच वेळा येत असत. तथापि अशा आठवणी सांगताना अपेक्षित असलेले नाजुक औचित्य याचे हळूहळू महापौरांना अलीकडे एक ओझेच वाटू लागले होते. हाउस ऑफ ऑर्लीन्सशी संबंधित असलेल्या आठवणींचा उल्लेख तर ते अलीकडे फक्त तशा काही गंभीर महत्त्वाच्या प्रसंगीच करीत. एकंदरीने बोलण्यात, चाल-चलणुकीत ते एक फार सुसंस्कृत, सभ्य व शालीन सद्‌गृहस्थ होते. त्याला अपवाद असे तो फक्त एकाच गोष्टीचा; प्रश्न जेव्हा पैशाबाबतचा असे तेव्हाचा. बाकी एकंदरीने व्हेरिएरच्या परिसरात ते एक खानदानी उमराव म्हणून गणले जात व ती गोष्ट योग्य अशीच होती.

★ ★ ★

## प्रकरण चौथे

# पितापुत्र

महापौर रेनॉल दुसऱ्या दिवशी सकाळीच सहा वाजता पिएरर सोरेलच्या लाकुडकामाच्या गिरणीकडे निघाले. जाताना त्यांचे स्वगत चालू होते :

“बाकी माझ्या बायकोला डोकं आहे बरं का. माझा मोठेपणा सांभाळण्यासाठी मी तिला तसं म्हटलं खरं. पण एखाद्या देवदूताप्रमाणं ज्याला लॅटिन अवगत आहे असं सांगतात त्या छोट्या सोरेल पाद्र्याला माझ्यापासून गरीब आश्रमाचा, निराश्रिताश्रमाचा तो उपद्‌व्यापी गव्हर्नर हिरावून नेऊ शकेल ही कल्पना मला आलीच नव्हती! आणि त्या छोट्या सोरेलला मी नोकरीवर ठेवून घेतलं नाही तर त्या गव्हर्नराच्या डोक्यात तीच कल्पना येऊन तो ठेवील की त्याला! आपल्या मुलांच्या शिक्षकाबद्दल तो कसा दिमाखानं बोलेल हे मी कल्पनेनं जाणतो... बाकी त्या छोट्या सोरेलला मी एकदा नोकरीवर ठेवलं म्हणजे तो पाद्र्याचा पायघोळ झगा वापरील की काय?...” अशा विचारात रेनॉल यांचे मन गुरफटून गेले होते. तेवढ्यात दूर अंतरावरच्या एका माणसाकडे त्यांचे लक्ष गेले. तो कदाचित शेतकरी असावा. चांगला उणापुरा, सहा फूट उंच दिसत होता तो. अगदी सकाळीच, झुंजुरक्या प्रकाशात तो आपल्या कामाला लागला असला पाहिजे. दू नदीच्या काठच्या पायवाटेशी पडलेल्या लाकडाच्या ओंडक्यांची लांबीरुंदी मोजण्यात तो गढून गेला होता. महापौर आपल्याकडेच येत आहेत हे पाहून त्या शेतकऱ्याला विशेषसे बरे वाटलेले दिसत नव्हते. कारण त्याने बेकायदेशीरपणे लाकडाच्या ओंडक्यांनी रस्ता अडविला होता.

तो पेअर सोरेलच होता. आपला मुलगा जुलिआँ याला महापौरांनी देऊ केलेल्या आगळ्या संधीबद्दल त्याला आश्चर्य व विशेष म्हणजे समाधान वाटले. रेनॉल यांचे म्हणणे त्याने ऐकून घेतले. तथापि त्याबाबत आपल्याला विशेष स्वारस्य नसल्याचा आविर्भाव त्याने स्वतःच्या चेहेऱ्यावर दाखविला; इतकेच नव्हे तर नाखुषीची तक्रारयुक्त छटाही त्याने चेहेऱ्यावर व्यक्त केली होती. या डोंगराळ प्रदेशातल्या धूर्त रहिवाशांना हा असला आविर्भाव मुद्रेवर उमटविण्याची कला चांगलीच अवगत होती. स्पॅनिश राजवटीच्या कालात गुलाम असलेल्या ह्या लोकांच्या अंगी, इजिप्शिअन शेतकऱ्यांसारखी विशिष्ट भावना चेहेऱ्यावर व्यक्त करण्याची सवय अद्याप तशीच टिकून राहिली होती.

उत्तरादाखल, तोंडपाठ झालेली दिखाऊ, आदरार्थी संबोधने सोरेलने लांबलचकपणे भराभर उच्चारून टाकली. आणि ओशाळवाणे स्मित करीत तो तेच तेच निर्जीव शब्द गिरवीत राहिला. त्या स्मिताने त्याच्या मुद्रेतला लबाडीचा, जवळजवळ बदमाषगिरीचा सहजभाव अधिकच स्पष्टपणे दिसत होता. बोलता बोलताच, महापौर रेनॉल यांच्यासारखी महत्त्वाची असामी, आपल्या त्या बेगडी अकलेच्या पोराला, स्वतःच्या घरी नोकरीवर ठेवून घेण्यासाठी कोणत्या कारणाने तयार झाली असावी ह्याचा खोलवर विचार त्या म्हाताऱ्या पिअेरर सोरेल शेतकऱ्याचे कामसू मन करू लागले. ज्यूलिआँ त्याच्या मनातून उतरलेला होता. त्याच्यापासून कोणत्याही अपेक्षा बाळगण्यास जागा नाही याबद्दल त्याची खात्री होऊन चुकली होती. आणि अशा ज्युलिआँला दरसाल तीनशे फ्रँक एवढी भली मोठी रक्कम, जेवणखाण व कपड्यालत्त्यासह महापौरांनी कशासाठी देऊ करावी? बोलता बोलता कपड्यालत्त्याची अट आयत्या वेळीच पुढे करण्याची अक्कल सोरेरला सुचली होती. पण रेनॉल यांनी तीही तत्काळ खुषीने मान्य केली!

अनुक्रमणिका

सोरेलच्या त्या मागणीने रेनॉल यांचे मन विशेष वेधून घेतले. ते स्वतःशी विचार करू लागले,...

"माझ्या प्रस्तावामुळे सोरेरला वास्तविक आनंद वाटायला हवा होता. तो अगदी भारावून जायला हवा होता. पण ज्या अर्थी असे झाले नाही त्या अर्थी हे स्पष्ट आहे की दुसरीकडून कुठून तरी त्याच्यापुढे हे असले प्रस्ताव ठेवण्यात आले असले पाहिजेत आणि वालनोपेक्षा तसा दुसरा माणूस कोण असणार?

आपल्या प्रस्तावाला सोरेलने तत्काळ मान्यता द्यावी म्हणून रेनॉलनी केलेले प्रयत्न व्यर्थ ठरले. त्या धूर्त, वृद्ध शेतकऱ्याने महापौरांना हेकटपणे नकार दिला. आपल्याला आपल्या मुलाचा सल्ला ह्या बाबतीत घेतला पाहिजे असे कारण सोरेलने त्यासाठी सांगितले. जसा काही तिथे कोणताही श्रीमंत बाप आपल्या कफल्लक मुलाशी अशा बाबतीत कधी विचारविनिमय करीत असे! कधी मत घेतलेच तर ते केवळ औपचारिक रीत्या.

सोरेलची लाकुडकामाची गिरणी एका जलप्रवाहाच्या बाजूला, एका छपराखाली होती. आणि छपराला चारी कोपऱ्यांतून भक्कम लाकडी खांबांचे आधार दिलेले होते. मधोमध नऊदहा फूट उंचीवर एक मोठी करवत होती. ती वर जाई, खाली येई. एका अगदी साध्या यंत्राचा उपयोग करून, एका चाकाला गती देण्यात आलेली होती व त्याच्या सहाय्याने कापावयाचे लाकूड पुढे ढकलले जाई. मग ते कापले जाऊन करवतीने त्याच्या चपट्या फळ्या तयार होत. त्या दोन्ही क्रिया– करवत वर-खाली होण्याची व लाकूड पुढे ढकलण्याची– ज्या चाकाच्या साहाय्याने होत, ते चक्र जलप्रपाताच्या जोराने सारखे फिरत राही.

सोरेल गिरणीकडे आल्याबरोबर त्याने आपल्या मोठ्या, भसाड्या आवाजात ज्युलिआँला हाक मारली. पण हाकेला ओ आली नाही. फक्त त्याचे थोरले दोघे मुलगेच त्याला तेथे आढळले. देवदाराच्या झाडाची खोडे, यंत्राने कापण्याच्या सोयीच्या आकाराची बनविण्यासाठी मोठ्या-थोरल्या कुऱ्हाडींनी ते दोघेजण ताशीत होते. खोडाच्या कडेला काढलेल्या काळ्या रेघेवर ते नेमके घाव घालीत आणि त्याबरोबर लाकडाच्या मोठाल्या ढलप्या उडून बाजूला पडत. ते दोघेही आपल्या कामात एवढे व्यग्र झाले होते की, बापाची हाक त्यांना ऐकूच आली नाही. सोरेल मग थेट आत गेला. करवतीजवळ ज्या ठिकाणी ज्युलिआँला कामाची जागा नेमून दिलेली होती तेथे तो दिसला नाही. म्हणून त्याची नजर पोराला धुंडीत भरभर फिरली. तेव्हा आणखी पाच-सहा फूट उंचीच्या जागी, आढ्याच्या तुळईवर दोन्हींकडे पाय टाकून बसलेला ज्युलिआँ सोरेलला दिसला. यंत्राकडे नजर ठेवून आपले काम काळजीपूर्वक करायचे सोडून तो तेथे पुस्तक वाचीत बसला होता. सोरेलने ज्युलिआँला एक वेळ त्याच्या कृश, अशक्त प्रकृतीबद्दल दोष दिला नसता, क्षमा केली असती. नाही तरी त्याच्या कमकुवत प्रकृतीमुळे आपल्या दोघां भावांच्या बरोबरीने त्याच्याकडून कष्टाची कामे होत नसतच. पण काम सोडून चुकारपणे पुस्तक वाचीत बसायचे म्हणजे काय? हे कसले मुलखावेगळे वाचनचे वेड! सोरेलला ज्युलिआँचा फार राग आला, तिरस्कारही वाटला. त्याला स्वतःला वाचायला येत नव्हते.

ज्युलिआँला त्याने दोन-तीनदा हाका मारल्या. पण तो वाचनात इतका गढून गेला होता की, तिथल्या यंत्राच्या गजबजाटापेक्षा वाचनातील एकाग्रतेमुळेच बापाच्या भयानक हाका त्याला ऐकूच आल्या नाहीत. करवतीने कापल्या जात असलेल्या त्या खोडावर सोरेल अखेर, वयस्कर असूनही चपळाईने चढला. तेथून छपराला आधार देत असलेल्या दोन तुळयांच्या सांध्याजवळ तो गेला आणि त्याने ज्युलिआँला एक जोराचा तडाखा लगावला. त्याबरोबर त्याच्या हातचे पुस्तक एकदम उडून खाली पडले. तितक्याच जोराचा आणखी

अनुक्रमणिका

एक तडाखा बसला. तेव्हा ज्युलिआँचा तोल गेला. सुमारे बारा-पंधरा फूट उंचीवरून तो खाली यंत्रावर पडणार अन् त्याचा चेंदामेंदा होणार इतक्यात सोरेलने त्याला आपल्या डाव्या हाताने पडता पडता घट्ट पकडून आवरले.

"आळशा, लेका, करवतीकडे लक्ष ठेवण्याचे काम सोडून तू इथं रद्दी पुस्तक वाचीत बसतोस होय? त्या पाद्र्याकडे जाऊन संध्याकाळचा वेळ तू फुकट दवडीत असतोस, तेव्हा पाहिजे तर वाचीत जा, समजलास?"

बापाच्या हातचे जोरकस तडाखे ज्युलिआँला चांगलेच लागले होते. त्याचे मस्तक बधिर झाले होते व बरेच रक्तही आले होते. तरी तो निमूटपणे आपल्या कामाच्या जागेकडे निघाला. मार लागल्यापेक्षा आपले आवडते पुस्तक गेल्याबद्दल त्याला जास्त वाईट वाटून त्याचे डोळे आसवांनी डबडबले होते. बापाचे ओरडणे चालूच होते :

"चल, खाली ये गधड्या, मी काय सांगतो ते ऐक." सोरेल खालून पुन्हा ओरडला. अक्रोड पाडण्याची लांब काठी त्याने मग घेतली आणि तिच्या टोकाने त्याने ज्युलिआँला खांद्यावर डिवचले. तुळईवरून खाली उतरल्यावर पुन्हा करवतीच्या यंत्राजवळ चढण्याची तसदी सोरेलला घ्यायची नव्हती. तो खाली येताच सोरेलने त्याला एक जोराची गचांडी देऊन क्रूरपणे मागून ढकलले व आपल्याबरोबर घरी चलण्यास फर्माविले.

'परमेश्वरालाच ठाऊक, बाबा आता माझं काय कांडात काढणार आहेत ते!' असा केविलवाणा विचार ज्युलिआँच्या मनात आला. जाता जाता त्याने मागे गिरणीतल्या यंत्रांकडे स्नेहाने पाहिले. त्याची नजर खाली होती व गाल भावनाकुलतेने लाल झाले होते. 'मेमूआरिअल द सँत एलॅएन' हे जे त्याचे अतिशय आवडते पुस्तक तो वाचीत होता, ते तेथेच कोठे तरी पडले होते.

अठरा, एकोणीस वर्षे वयाचा, सडपातळ ठेवणीचा हा तरुण अशक्त दिसे. त्याचे नाक पोपटाच्या चोचीसारखे बाकदार होते. त्याचे चेहेरेपट्टी नाजूक दिसे; पण ती रेखीव नव्हती. त्याचे डोळे मोठे व काळे होते. तो शांत असला म्हणजे त्याच्या डोळ्यांत चिंतनशील पण प्रखर व्यक्तिमत्त्वाचे तेज दिसे. पण चालू क्षणी मात्र त्याचे डोळे भयंकर त्वेषयुक्त द्वेषाने तरल झाले होते. त्याचे केस काळसर, चेस्टनट रंगाचे व खालून वळण घेतलेले होते. त्यामुळे त्याची कपाळपट्टी चिंचोळी भासे. त्याचा राग जेव्हा जेव्हा उफाळून येई तेव्हा तेव्हा त्याची मुद्रा खुनशी दिसे.

मानवी तोंडवळ्यांच्या असंख्य, विविध प्रकारांमध्ये ज्युलिआँच्या चेहेरेपट्टीपेक्षा खास वैशिष्ट्यपूर्ण अशी अन्य एखादी क्वचितच असेल. त्याचे शरीर कृश, सडपातळ, तरी बांधेसूद होते आणि ते अंगातील जोम—बळकटीपेक्षा लवचिकपणा दाखवी. लहानपणी त्याची वृत्ती थंड, थोडी उदास अशी असे. तो बराच फिकट, निस्तेज दिसे. हे पोर जगेल—वाचेल की नाही, अशी शंका सोरेलच्या मनाला चाटून जाई; आणि जगले तरी बहुधा ते कुटुंबाला एक भार ठरेल असेही त्याला वाटले होते. घरातल्या मंडळींना त्या पोराबद्दल एक प्रकारचा तिरस्कार होता. उलटपक्षी ज्युलिआँच्या मनातही बाप, भाऊ यांच्याबद्दल आदरभावना नव्हती. त्यांचा त्याला तिरस्कारच वाटे. गावातील सार्वजनिक चौकातल्या खेळात रविवारी ज्युलिआँ हमखास पराभूत होत असे.

एक दुबळा प्राणी असेच त्याच्याबद्दलचे मत अवतीभवतीच्या लोकांत तयार झाले होते. तथापि गेल्या वर्षापासूनच त्याच्या देखणेपणामुळे काही मुली त्याच्याकडे आकृष्ट होऊ लागल्या होत्या.

व्हेरिएरच्या निसर्गसुंदर परिसरातील छायातरूंची जी छाटाछाट वेळी—अवेळी नगरपालिकेकडून केली जात असे तिच्या विरुद्ध महापौरांकडे एकदा तक्रार करण्याचे धारिष्ट दाखविणाऱ्या वृद्ध सर्जन—मेजरबद्दल ज्युलिआँच्या मनात आदराची भावना होती. कारण तो केव्हा केव्हा सोरेलला ज्युलिआँसाठी दिवसभराचा रोजमुरा देऊन त्याला लॅटिन भाषा व इतिहास म्हणजे त्याला अवगत असलेला इटलीतील १७६६ च्या स्वारीचा सगळा इतिहास शिकवी. मरताना त्याने मृत्युपत्र करून स्वतःच्या लीजन ऑफ ऑनरचा क्रॉस, आपल्या पेन्शनची बाकी, आणि आपली तीस-चाळीस पुस्तके ज्युलिआँला दिली होती. त्यांतलेच एक अत्यंत मूल्यवान पुस्तक ज्युलिआँ वाचीत होता आणि महापौरांच्या त्या प्रस्तावामुळे विचारात पडलेल्या बापाच्या रागापायी त्याच्या त्या पुस्तकाला उडी मारून सार्वजनिक जलप्रवाहात आत्माहुती द्यावी लागली होती.

ज्युलिआँ घरी पोहोचतो न पोहोचतो तोच त्याचा दंड जोराने धरला गेला. आता आपल्या बापाकडून आपल्याला आणखी मार खावा लागणार या भीतीने त्याचा थरकाप उडाला. “बोल, अगदी खरं खरं ते सांग.” असा सवाल करड्या आवाजात सोरेलने त्याला केला. लहान मुलाने आपल्या हातातला शिशाचा शिपाई गर्रकन फिरवावा त्याप्रमाणे सोरेलने आपल्या हाताने त्याला झटका देऊन फिरवले व समोर घेतले. तेव्हा त्याचे काळेशार डोळे पाणावले. आपला म्हातारा बाप स्वतःच्या बारीक करड्या डोळ्यांनी आपल्या अंतःकरणाचा ठाव घेत आहे असे ज्युलिआँला तेव्हा वाटले.

★ ★ ★

## प्रकरण पाचवे

# सौदा पटविण्याची करामत

"अरे दळभद्र्या, नुसता पुस्तकातला किडा आहेस तू. बोल मादाम रेनॉलची माहिती तुला कशी? त्यांच्याशी कधी बोलला आहेस काय तू? ह्या प्रश्नांना आहेत उत्तरं तुझ्याजवळ? खोटं न बोलता सांग, तुला जमलं तर!"

"मी कधीच बोललेलो नाही त्यांच्याशी आणि चर्चशिवाय इतर कोठे मी त्यांना कधी पाहिलेलंही नाही." ज्युलिआँने उत्तर दिले.

"पण निर्लज्ज हरामखोरा, तू त्यांच्याकडे पाहिलं असशील?"

"कधीच नाही. तुम्हाला माहीत आहे, चर्चमध्ये एका परमेश्वराशिवाय दुसऱ्या कोणाकडेच मी पाहात नाही." बापाच्या हातचे आणखी तडाखे खावे लागू नयेत म्हणून ज्युलिआँने विचारपूर्वक उत्तर दिले. त्याच्या उत्तरात बतावणीचा आविर्भाव होता.

"काहीही असो, ह्याच्यामागे नक्कीच काही तरी दिसतंय." तो संशयी शेतकरी म्हणाला आणि क्षणभर थांबून पुन्हा बोलला,

"नीचा, महा लबाड आहेस तू. तुझ्याकडून मला काहीच थांगपत्ता लागणार नाही! खरं म्हणजे मी स्वतःला तुझ्यापासून मुक्त करून घेणार आहे. माझ्या गिरणीचं काम तुझ्याशिवाय जास्त चांगलं चालेल. तू पाद्र्याशी का आणखी कोणाशी तरी मैत्री जुळवली आहेस अन् त्यानं तुझ्यासाठी चांगली नोकरी आणली आहे. जा, नीघ अन् आवर आपला बाडबिस्तरा. मी घेऊन जातो तुला महापौर रेनॉलकडे. तिथं त्यांच्या मुलांना शिकवायचं काम करायचं आहे तुला."

"त्याबद्दल मला काय मिळणार आहे?"

"जेवणखाण, कपडालत्ता, अन् पगार म्हणून तीनशे फ्रँक."

"पण कोणाचं चाकर बनण्याची इच्छा नाही माझी."

"मूर्ख प्राण्या, तुला तिथं चाकर म्हणून जायचं आहे असं बोललं का कुणी तरी? माझ्या मुलाला मी कोणाचं चाकर करीन का?"

"पण मला माझं जेवणखाण तिथं कोणाबरोबर करावं लागेल?"

ह्या प्रश्नाला म्हाताऱ्या सोरेलजवळ उत्तर नव्हते. तो विचारात पडला. त्याबद्दल काही बोललो तर काही घोटाळा करून बसू कदाचित असे त्याला वाटले. म्हणून तो रागाने ज्युलिआँवर एकदम तुटून पडला.

त्याला त्याने खूपशा शिव्या हासडल्या, आधाशी, हावरट, म्हणून त्याच्या अंगी दोष लावला आणि आपल्या इतर मुलांशी विचारविनियम करण्यासाठी सांगून त्याने तेथून पाय काढला.

ज्युलिआँने आपल्या भावांना पाहिले तेव्हा ते दोघेही आपापल्या करवतींवर वाकून उभे असलेले त्याला दिसले. त्यांच्यात कसली तरी चर्चा चालली होती. ज्युलिआँ तेथे काही क्षण तसाच उभा राहिला. पण त्यांच्या बोलण्याचा त्याला काहीच बोध होईना. अखेर तो करवतीच्या पलीकडच्या बाजूस उगीच कोणी एकदम येऊन आपल्याला गाठू नये म्हणून दूर जाऊन बसला. बापाने ज्या नोकरीचा विषय त्याच्याजवळ एकदम काढला होता त्याबद्दल थोडा वेळ विचार करणे त्याला आवश्यक वाटले. कारण त्यामुळे त्याचे भावी जीवन बदलणार होते. पण आपण त्या समस्येचा विचार दूरदृष्टीने, शहाणपणाने करण्यास असमर्थ असल्याची जाणीव त्याला झाली. रेनॉल यांच्या छानदार घरात आपल्याला काय काय पाहायला मिळेल याची चित्रे रंगविण्यात त्याची कल्पनाशक्ती पूर्णपणे गुंगून गेली.

तो स्वतःशी बोलला, “पण ते सारं मला सोडून द्यावं लागेल. नोकर-चाकरांच्या बरोबर जेवणखाण घ्यायला लावण्याइतक्या खालच्या पातळीवर नेणारी नोकरी पतकरण्यापेक्षा ती न पतकरलेलीच बरी. पण बाबा मला ती पतकरायला भाग पाडतील. अन् तसं झालं तर माझं मरण आधीच ओढवेल. मी पंधरा-सोळा फ्रँक साचवले आहेत. आठ सू पण आहेत मजजवळ. ते घेऊन आज रात्री पळून जाऊ या. लपत छपत बाजूच्या रस्त्याने गेलो म्हणजे मग पोलिसांचं भय नको. दोन दिवसांत मी बेझाँसाला पोहोचू शकेन. तिथं शिपाई म्हणून सैन्यात भरती होईन. जरूर पडल्यास सरहद्द ओलांडून स्वित्सर्लंडमध्ये जाईन. पण मग प्रत्येक गोष्टीला, त्या छानदार धर्मोपदेशकाच्या पेशालाही रामराम ठोकावा लागेल; आणि तो तर सर्वांगीण प्रगतीचा सोपान आहे.”

नोकर-चाकरांबरोबर जेवायचे ज्युलिआँला जे मोठे भय वाटत होते ते नैसर्गिक नव्हते. त्यापेक्षा किती तरी मोठ्या प्रमाणावरच्या व स्वतःला न आवडणाऱ्या गोष्टी नशीब काढण्यासाठी त्याने केल्या असत्या. तथापि रूसोच्या ‘कन्फेशन’ पासून त्याला त्याबद्दल अरुची उत्पन्न झाली होती. जगाविषयी कोणतीही भलीबुरी कल्पना बनविण्यास त्याला सहाय्य झाले होते ते त्या ग्रंथाचे. ग्रॅण्ड आर्मीच्या अहवालांचा संग्रह आणि ‘मेमुआरिअल द सॅन्त एलॅएन’ हे आणखी दोन ग्रंथ असे होते की ज्यांनी त्याच्या विचार-मतांवर पूर्ण पगडा बसविला होता. हे तीन ग्रंथ म्हणजे त्याचे वेदवाक्य होते, संपूर्ण धर्मशास्त्र होते. त्या तीन पुस्तकांसाठी त्याने स्वतःचे प्राणसुद्धा बळी दिले असते. दुसऱ्या कोणत्याच पुस्तकावर त्याचा विश्वास नव्हता. म्हाताऱ्या सर्जन जनरलच्या तोंडचे एक विधान प्रमाण मानून जगातले इतर सारे ग्रंथ त्याला खोटारडे वाटत होते. ते बदमाष लोकांनी स्वतःची पोळी पिकविण्यासाठी लिहिले होते असे त्याचे मत झाले होते.

मूर्ख माणसांमध्ये बरेच वेळा आढळणाऱ्या तापट स्वभावाबरोबरच ज्युलिआँला आश्चर्यकारक स्मरणशक्ती लाभलेली होती. आपले भवितव्य त्या म्हाताऱ्या शॅलाँ पाद्र्यावर अवलंबून आहे हे त्याला स्पष्टपणे कळत होते. म्हणून शॅलाँचे मन जिंकायचे असे त्याने ठरविले होते. त्यासाठी त्याने लॅटिनमधील सबंध “नवा करार” मुखोद्गत केला होता. एम. द. मेत्र यांचे “Du Pape” हे पुस्तकही त्याला माहीत होते. आणि त्या दोन्ही पुस्तकांतील मजकूर त्याला सारखाच बेभरवशाचा वाटत होता.

जणू काही एकमेकांनी ठरविल्याप्रमाणे सोरेल व ज्युलिआँ या पितापुत्रांनी नंतर सबंध दिवसभर एकमेकांशी बोलायचे टाळले. तिन्हीसांजा झाल्या तेव्हा ज्युलिआँ त्याच्या धार्मिक पाठासाठी पाद्र्याकडे गेला. पण वडिलांनी त्याला त्या चमत्कारिक नोकरीबाबत जे सांगितले होते त्याचा उल्लेख पाद्र्याजवळ करणे

त्याला शहाणपणाचे वाटले नाही. तो स्वतःशी पुटपुटला, "तो एक सापळा असावा. आपण त्याबाबत सगळं विसरून गेलो असल्याची बतावणी केली पाहिजे."

दुसऱ्या दिवशी सकाळीच रेनॉल यांनी म्हाताऱ्या सोरेलला बोलाविणे पाठविले. तास दोन तास वाट पाहावयास लावून मग तो हजर झाला; आणि गेल्याबरोबर शेकडो सबबी सांगायला त्याने सुरुवात केली. मात्र बोलताना अधूनमधून आदरार्थी शब्दांची पेरणी त्याने अनेकदा केली. आपल्या प्रत्येक हरकतीचे जोरदार निवेदन करून त्याच्या बळावर सोरेलने रेनॉलकडून एक गोष्ट काढून घेतली. ज्युलिअनने आपले जेवण घरमालक आणि मालकीण यांच्याबरोबर घेत जावे असे ठरले आणि ज्या दिवशी ते उभयता कोणा पाहुण्याबरोबर जेवणार असतील त्या दिवशी त्याने मुलांबरोबर जेवायचे होते. जसजशी महापौरांची शिक्षक मिळविण्याबद्दलची खरीखुरी उत्सुकता वाढताना दिसत होती तसतशी सोरेलची हरकती उत्पन्न करण्याची इच्छा वाढत होती. शिवाय स्वतःच्या मनातील संशय व गोंधळ वाढू लागल्यामुळे आपल्या मुलास झोपण्यासाठी देण्यात यावयाची खोली दाखवा म्हणून त्याने महापौरांना विनंती केली, तेव्हा ते एक मोठे दालन असून त्यात चांगले सामानसुमानही व्यवस्थितपणे ठेवले असल्याचे त्याला दिसले. तिन्ही मुलांचे पलंग तेथे नेण्याचे काम मालकाच्या हुकुमानुसार नोकरांनी आधीच सुरू केलेले होते.

आता त्या म्हाताऱ्या शेतकऱ्याच्या डोक्यात प्रकाश पडू लागला. त्याच्या मनातला संशय व गोंधळ दूर झाला. आपल्या मुलाला घालायला देण्यात येणारा कोट कुठला? अशीही पृच्छा त्याने धीटपणे एकदम केली. रेनॉल यांनी त्याबरोबर आपल्या मेजाचा खण व त्यातून शंभर फ्रँक काढून ते म्हणाले,

"हे पैसे घेऊन तुमचा मुलगा म. द्यूराँ ह्या कापडवाल्याकडे जाऊ शकेल आणि त्याच्या कोट-विजारीसाठी काळं कापड घेऊ शकेल."

"आणि समजा, तुमची ही नोकरी सोडून मी त्याला घेऊन गेलो, तर तो त्याचा काळा कोट स्वतःबरोबर घेऊन जाऊ शकेल काय?" मात्र हे विचारताना सोरेल नेहमीचे आदरार्थी शब्द पूर्णपणे विसरून गेला होता.

"अलबत!" रेनॉल उत्तरले.

"अस्सं? बरं तर." संथ हेल काढीत सोरेल म्हणाला, "आता फक्त एकच गोष्ट ठरवायची राहिली. तुम्ही त्याला पगार काय देणार?" यावर रेनॉल रागाने उद्गारले,

"काय? ते आपण कालच नाही का ठरवलं? तीनशे फ्रँक देईन मी. मला वाटतं एवढी रक्कम फार मोठी नसली तरी भरपूर आहे."

"ती तुम्ही देऊ केलेली रक्कम होती. मी ते नाकारीत नाही." जास्त सावकाशपणे म्हातारा सोरेल बोलला. फ्राँश काँतेच्या शेतकऱ्याची ज्यांना माहिती नाही अशांनाच आश्चर्य वाटेल अशी प्रतिभाशाली क्लृप्ती सुचून आणि एम. द. रेनॉल यांच्या चेहेऱ्याकडे स्थिर नजर रोखून तो पुढे म्हणाला,

"अहो, दुसरीकडे यापेक्षा जास्त छान जमविता येईल की आम्हांला!"

हे शब्द ऐकून महापौर फार घोटाळ्यात पडले. तथापि त्यांनी स्वतःला सावरले. नंतर तब्बल दोन तास त्या दोघांचे संभाषण खुबीखुबीने झाले. उभयपक्षी झालेल्या त्या संभाषणात, मतलबाशिवाय एकही शब्द उच्चारला गेला नाही. शेवटी त्या म्हाताऱ्या शेतकऱ्याची चतुराई, सावधपणा विजयी ठरला. स्वतःच्या उपजीविकेसाठी त्या श्रीमान गृहस्थाला काही असल्या चतुराईवर अवलंबून राहावे लागत नव्हते. त्यामुळे त्याची चतुराई कमी पडली. ज्युलिआँच्या नवजीवनाचे स्वरूप निश्चित करणाऱ्या त्या नोकरीच्या असंख्य अटी अखेर एकदाच्या ठरविण्यात आल्या. ज्युलिआँचा वार्षिक पगार चारशे फ्रँक निश्चित करण्यात आला, एवढेच नव्हे तर तो आगाऊ व प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेला दिला जावा असेही ठरले.

"ठीक आहे, मी त्याला दरमहा पस्तीस फ्रँक देत जाईन." रेनॉल म्हणाले.

"आमच्या महापौरांसारखे श्रीमान व उदार सद्‌गृहस्थ, एक ठोक आकडा ठरविण्यासाठी ही रक्कम खचित छत्तीस करतील." लाडीगोडीच्या भाषेत तो शेतकरी लाघवीपणे म्हणाला.

"बरंय! पण आता हे इतकंच पुरे; यापेक्षा पुढं जायचं नाही." रेनॉल निश्चयी स्वरात म्हणाले. निदान त्या वेळी तरी रागाने त्यांच्या स्वरात निश्चयीपणा आला होता. आता अधिक ताणण्यात अर्थ नाही ही गोष्ट तो शेतकरी उमजला आणि तेव्हा आक्रमक पवित्रा आपणास घेता येईल हे ओळखून रेनॉल यांनी पहिल्या महिन्याचे छत्तीस फ्रँक त्याच्या हाती देण्यास साफ नकार दिला. आपल्या मुलाच्या वतीने ते पैसे घेण्यासाठी म्हातारा सोरेल फारच उत्सुक होता. ह्या एकंदर व्यवहारात आपण घेतलेली भूमिका आणि पार पाडलेली कामगिरी वगैरेंची माहिती आपल्या सौभाग्यवतीला नंतर सांगावी लागेल याची जाणीव रेनॉलना झाली तेव्हा ते सोरेलला रागाने म्हणाले,

"तुला दिलेले ते शंभर फ्रँक परत दे मला. म. द्यूराँ माझं देणं लागतो. तुझ्या मुलाला बरोबर घेऊन काळं कापड पसंत करायला मीच जाईन त्याच्याकडे."

रेनॉल यांचा तो छातीठोक प्रहार लक्षात घेऊन सोरेल शहाणपणाने आपल्या पूर्वभूमिकेवर मागे आला. महापौरांशी बोलताना वापरावयाची आदरार्थी भाषा त्याने पुन्हा सुरू केली आणि जवळजवळ दहा-पंधरा मिनिटे तो तशी स्तुतिसुमने उधळीत राहिला. आता यापेक्षा जास्त हाती लागण्यासारखे नाही अशी त्याची खात्री झाली तेव्हा त्याने तेथून पाय काढला. निघताना तो शेवटी आदरपूर्वक म्हणाला,

"बरंय, माझ्या मुलाला इथं वरती आपल्या 'महालावर' पाठवून देईन मी." महापौरांना जेव्हा खूष करावयाचे असेल तेव्हा त्यांच्या हाताखालचे लोक त्यांच्या राहत्या घराचा उल्लेख याप्रमाणे करीत असत.

आपल्या गिरणीत परत आल्यावर सोरेलने ज्यूलिआँला शोधले. पण त्याला तो कोठेच आढळला नाही. आपल्या भवितव्यात काय वाढून ठेवले आहे याबद्दल मनात शंका-कुशंका निर्माण झाल्यामुळे, मध्यरात्रीच ज्युलिआँ घरातून बाहेर पडला होता. आपली पुस्तके व लीजन ऑफ ऑनरचा क्रॉस लपवून ठेवण्यासाठी एखादी सुरक्षित जागा शोधली पाहिजे याची चिंता त्याला लागली होती. फूके नावाचा एक तरुण लाकूड-व्यापारी त्याचा मित्र होता. व्हेरिएरवर झुकलेल्या उंच डोंगराच्या बाजूला तो राहात असे. आपला तो मौल्यवान ठेवा ज्युलिआँने त्या मित्राच्या घरी नेऊन ठेवला.

अनुक्रमणिका

तो परत आला तेव्हा सोरेल त्याला म्हणाला,

"अरे आळशा, दळभद्र्या, गेली कैक वर्षं मी तुझं पालनपोषण करीत आलो. त्या माझ्या कर्जाची फेड करण्याइतका तरी प्रामाणिकपणा व स्वाभिमान तुझ्या अंगी कधी काळी येणार आहे की नाही ते परमेश्वरालाच ठाऊक! आवर तुझं ते कळकट मळकट चंबूगबाळं अन् चालू लाग महापौरांकडे."

बापाने आपल्याला नेहमीप्रमाणे या वेळी तडाखे लगावले नाहीत याचे ज्युलिआँला आश्चर्य वाटले. आपला बाडबिस्तरा घाईने आवरून त्याने निघण्याची तयारी केली. पण आपल्या भयंकर बापाच्या नजरेआड होताच त्याने चालण्याचा वेग कमी केला. आपल्या ढोंगाची बतावणी यशस्वी ठरण्याच्या दृष्टीने आपण चर्चला भेट दिल्यास ते योग्य होईल असे वाटून त्याने चर्चमध्ये जायचे ठरविले.

त्याच्या ह्या विचाराचे तुम्हांला आश्चर्य वाटले ना? त्या भयंकर विचाराप्रत पोहोचण्यापूर्वी त्या तरुणाच्या आत्म्याला एक खूप दीर्घ वैचारिक प्रवास करावा लागला होता.

ज्यूलिआँ लहान होता तेव्हाची गोष्ट. सहाव्या पलटणीतले काही घोडेस्वार इटलीहून परतताना त्याच्या वडिलांच्या घरी येत. त्यांच्या अंगात लांब, लष्करी पांढरे अंगरखे असत. त्यांच्या शिरस्त्राणांना काळ्या घोड्यांच्या शेपट्यांच्या केसांचे लांब तुरे लावून शोभा आणलेली असे. आपल्या घोड्यांचे लगाम तिथल्या खिडक्यांच्या गजांना ते बांधीत. त्या दृश्याने ज्युलिआँला तेव्हा इतके वेडे केले होते की, आपण लष्करी पेशा पतकरावा अशी प्रबळ इच्छा त्याच्या मनात उत्पन्न झाली होती. पुढे त्याला ब्रिज ऑफ लोदी, अर्कोल व रिव्होलीच्या लढायांच्या हकीगती वृद्ध सर्जन मेजरच्या तोंडून ऐकायला मिळाल्या. त्या त्याने हर्षभराने व तन्मयतेने ऐकल्या. त्या वेळी त्या वृद्धाने आपल्या क्रॉसकडे धगधगत्या नजरेने पाहिले; ते त्याच्या लक्षात आले होते.

ज्युलिआँ चौदा वर्षांचा असताना व्हेरिएरला चर्च बांधण्याचे काम सुरू झाले. त्या लहानशा गावाच्या मानाने ते खूपच मोठे व भव्य म्हणता येण्यासारखे होते. त्या चर्चच्या चार संगमरवरी खांबांनी विशेषतः ज्युलिआँच्या मनावर छाप पाडली होती. आसपासच्या सगळ्या प्रदेशात त्यांना प्रसिद्धी लाभलेली होती. पण तिचे कारण होते ते जस्टिस ऑफ दी पीस आणि बेझाँसाहून पाठविण्यात आलेला तरुण पाद्री यांच्यामध्ये त्यांच्यावरून उद्‌भवलेले भयंकर शत्रुत्व. तो पाद्री कॉन्ग्रेगेशनचा हेर असावा अशी लोकांची समजूत झाली होती. त्यामुळे जस्टिस ऑफ पीसवर स्वतःची नोकरी गमाविण्याची वेळ येऊन ठेपली होती. निदान तसा सर्वसाधारण समज झालेला होता. पंधरवड्यातून एकदा पाद्री बहुधा बेझाँसाला जात असे आणि तेथे तो राइट रेव्हरंड लॉर्ड बिशपला भेटे, असे लोक म्हणत. तेव्हा अशा पाद्र्याशी जे. पी. ने वैर उकरून काढण्याची धिटाई केली होती— मग का नाही त्याच्या नोकरीवर गदा येणार?

हे सगळे चालू असताना आणखी एक गोष्ट घडली. जे. पी. ला बरीच मुलेबाळे होती. त्याचे कुटुंबही मोठे होते. त्याने अनेकांना शिक्षा फर्माविल्या होत्या व त्या अन्याय्य वाटण्यासारख्या होत्या. आणि विशेष म्हणजे त्या सगळ्या शिक्षा ठोठावल्या गेल्या होत्या कॉन्स्टिट्यूशनेल वाचणाऱ्या रहिवाशांना. खरे म्हणजे जी बाजू बरोबर होती तीच जिंकली होती. खटल्यातील रकमा चार किंवा पाच फ्रँकपेक्षा जास्त नव्हत्या हे खरे. पण लहान दंड केल्या गेलेल्या त्या व्यक्तींमध्ये, चुका-खिळ्यांचे काम करणारा एक कारागीर होता, व तो

ज्युलिआँचा धर्मपिता होता. रागाच्या भरात तो उद्गारला होता, "आणि असा हा न्यायाधीश, वीस वर्षांपेक्षा जास्त वर्षे एक सच्चा अन् प्रामाणिक माणूस मानला गेला ही केवढी विपरीत गोष्ट!"

ज्युलिआँचा सर्जन मेजर मित्र तेव्हा हयात नव्हता.

नेपोलिअनबद्दल बोलणे ज्युलिआँने एकदम बंद केले होते. पाद्री, धर्मोपदेशक बनण्याची स्वतःची इच्छा त्याने जाहीर केली होती. मग आपल्या वडिलांच्या लाकूडगिरणीत, तो लॅटिन बायबल नित्य पाठ करताना आढळू लागला. ते पुस्तक त्याला क्युरेने वाचायला दिले होते. ज्युलिआँची प्रगती पाहून म्हाताऱ्या क्युरेला खूपच आश्चर्य वाटले. तो मग संध्याकाळचा आपला सगळा वेळ ज्युलिआँला धर्मशास्त्राचे पाठ शिकविण्यात खर्च करू लागला. त्याच्या सहवासात असताना ज्युलिआँच्या मुखातून धार्मिक भावनांशिवाय अन्य काहीच उच्चारले जात नव्हते. एखाद्या मुलीच्या चेहेऱ्यासारख्या नाजूक पण फिकट, सौम्य चेहेऱ्याच्या मागे एवढा दृढ निर्धार ज्युलिआँच्या अंगी असेल आणि तो निर्धार कसला तर आपले भावी आयुष्य यशस्वी करण्यात अपयशी होण्यापेक्षा हजार माणसांचा धोका पतकरण्यास तयार होणे– असे कोणाला तरी वाटले असते का?

आपले नशीब उज्ज्वल करावयाचे असल्यास त्यासाठी व्हेरिएर सोडणे ही पहिली आवश्यक गोष्ट होय अशी ज्युलिआँची धारणा होती. आपल्या घराचा, गावाचा त्याला फार वीट आला होता. तेथे त्याला जी जी गोष्ट दिसत होती ती त्याची कल्पनाशक्ती गोठवून टाकीत होती.

अगदी बालपणापासूनच ज्युलिआँ स्वतःच्या भावी उज्ज्वल प्रतिष्ठेची स्वप्ने अधूनमधून पाहात आला होता. अशा वेळी तो अत्यानंदात मग्न होऊन जाई. एक दिवस असा येईल की, तेव्हा पॅरिसच्या सौंदर्यवती ललनांशी आपला परिचय करून दिला जाईल; काही तरी भव्य दिव्य करून दाखवून आपण त्या ललनांचे लक्ष वेधून घेऊ; आणि अशा रमणींपैकी एखादीचे प्रेम आपल्यावर कशावरून बसणार नाही? नेपोलिअनही आधी निर्धन होता. तेव्हा त्याच्यावर नव्हते का त्या तेजस्वी मादाम द बोआरनेचे प्रेम बसले? अलीकडे गेल्या काही वर्षांत ज्युलिआँच्या आयुष्यातील असा एखादाही तास गेलेला नव्हता की जेव्हा त्याला नेपोलिअन बोनापार्टची आठवण झाली नाही. तो स्वतःला सांगे, कोणताच आगापिछा नसलेला सैन्यातील एक साधासीधा, गरीब सबऑल्टर्न बोनापार्ट केवळ स्वतःच्या तलवारीच्या जोरावर जगाचा स्वामी नाही का बनला? या विचारामुळे, त्याच्या दृष्टीने मोठी वाटणारी संकटे त्याच्यावर आली असता त्याला दिलासा मिळे व जेव्हा आनंद वाट्याला येई तेव्हा त्या आनंदाची गोडी वाढे.

चर्चची बांधण्यात आलेली इमारत आणि न्यायाधीशाने खटल्यात दिलेल्या शिक्षा ह्या दोन गोष्टींनी ज्युलिआँच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला. त्याला एक कल्पना सुचली. तिने त्याला काही आठवडे जवळजवळ वेडावून सोडले. उत्कट वृत्तीच्या माणसाला एखादी अत्यंत प्रभावी कल्पना प्रथम आपल्यालाच सुचली असे वाटू लागले म्हणजे ती जशी त्याचा संपूर्ण कबजा घेते तसेच ज्युलिआँचे झाले.

"बोनापार्ट जेव्हा नाव कमावून प्रसिद्धीस आला त्या वेळी फ्रान्सवर स्वारी होण्याचे भय होते आणि म्हणून लष्करी प्रावीण्य तेव्हा आवश्यक व शिष्टमान्यही होते. आज आपण चाळिशीतले पाद्री वेतन म्हणून लाखांवरी फ्रँक मिळविताना पाहतो. म्हणजे ते नेपोलिअनच्या हाताखालच्या प्रसिद्ध, विभागीय सेनाधिकाऱ्यांपेक्षा तिपटीने जास्त पगार मिळवितात. मात्र त्यांना कोणाचे तरी भरभक्कम पाठबळ असलं

पाहिजे. इथला न्यायाधीश पाहा, केवढा शहाणा माणूस आहे! अगदी अलीकडेपर्यंत नेहमी प्रामाणिक असे. पण या वयातही त्याला, तिशीतल्या एखाद्या तरुण पाद्र्याची आगळीक आपल्या हातून होऊ नये म्हणून स्वाभिमानाला तिलांजली द्यावी लागते! मला पाद्रीच झालं पाहिजे."

ज्युलिआँचा देवधर्मविषयक अभ्यास सुमारे दोन वर्षे झालेला होता. त्यामुळे त्याच्या मनात एक नवीनच धार्मिकता उद्भूत झाली होती. पण त्या भावनेने त्याचे मन भारलेले असताना, एका प्रसंगी, त्याच्या अंतःकरणातील त्या भावनांना अचानक भस्मीभूत करून टाकणाऱ्या अग्नीच्या एकदम उफाळलेल्या ज्वाळेने प्रचंड धक्का दिला. ती घटना घडली म. शॅलाँ यांच्याकडे. तेथे एका रात्री पाद्र्यांची मेजवानी होती. शैक्षणिक क्षेत्रातील एक लोकविलक्षण बुद्धीची व्यक्ती म्हणून तेथे ज्युलिआँचा परिचय भल्या क्युरेने करून दिला होता. आणि नंतर एखादा झटका आल्याप्रमाणे आपल्या तोंडातून नेपोलिअनच्या स्तुतीचे शब्द त्वेषाने बाहेर पडल्याचे त्याला आढळून आले! त्याने त्याचा उजवा हात स्वतःच्या छातीशी आडवा बांधून टाकला व तशा अवघडलेल्या स्थितीत तो दोन महिने ठेवला. देवदाराच्या झाडाचे खोड उचलून नेत असता हाताचा सांधा निखळला असे त्याने सर्वांना भासविले. एवढी कडक तपस्या केल्यानंतरच त्याने त्या कृत्याबद्दल स्वतःला क्षमा केली. अठरा वर्षे वयाचा हा तरुण आहे असा. पण तो दिसतो मात्र अशक्त. त्यामुळे तुम्ही त्याला जास्तीत जास्त सतरा वर्षांचा समजाल. असा हा ज्युलिआँ आपल्या बगलेत एक छोटे बोचके घेऊन व्हेरिएरच्या भव्य चर्चमध्ये शिरत होता.

चर्चमध्ये अंधार होता. तेथे कोणीच नव्हते. कोणत्या तरी सणसमारंभाच्या निमित्ताने इमारतीच्या सगळ्या खिडक्यांवर लालभडक रंगाचे कापड टाकलेले होते. त्याचा परिणाम असा होई की, बाहेर सूर्य प्रकाशत असताना त्या पडद्यातून, प्रकाशाचा दिपवून टाकणारा लाल झोत येई. त्या प्रकाशाचे स्वरूप अतिपवित्र, धार्मिक व मनावर मोठी छाप टाकणारे असे. चर्चमध्ये जाताच ज्युलिआँचे अंग थरारले. तेथे तो एकटाच होता. तेथील एका सर्वांत छानदार आसनावर तो बसला. त्या आसनावर म. द रेनॉल यांच्या घराण्याची प्रतीक चिन्हे कोरलेली होती.

आसनासमोरच्या मेजावर ज्युलिआँला छापील कागदाचा एक कपटा दिसला. तेथे तो अशा रीतीने पसरलेला होता की जणू काही वाचण्यासाठीच. ज्युलिआँने तो बारकाईने निरखून पाहिला तेव्हा त्याला दिसले—

"बेझाँसा येथे दिनांक... रोजी लुई जनरेल याला फाशी देण्यात आले त्याचा व लुईच्या शेवटच्या काही क्षणांचा तपशील." कागद फाटका होता. त्याच्या दुसऱ्या बाजूला लिहिलेले काही शब्द ज्युलिआँला दिसले. एका ओळीच्या सुरुवातीचे शब्द "पहिली पायरी" असे होते.

"हा कागद इथं कोणी टाकला असेल?" ज्युलिआँने स्वतःलाच प्रश्न केला. आणि एक सुस्कारा टाकीत तो पुढे म्हणाला, "गरीब बिचारा, हतभागी, त्याच्या नावाचा शेवट माझ्या नावासारखाच दिसत आहे!" आणि त्याने त्या कागदाचा चोळामोळा करून टाकला.

तेथून बाहेर पडताना ज्युलिआँला वाटले की चर्चमधील पवित्र तीर्थपात्राजवळ रक्त सांडले आहे. आतलेच काही पाणी तेथे शिंपडताना पडले होते. खिडक्यांना लावण्यात आलेल्या तांबड्या पडद्यांमुळे आत पडलेल्या प्रकाशात ते पाणी त्याला रक्तासारखे दिसले.

अखेरीस ज्युलिआँला आपल्या अंतस्थ, गूढ भयाची लज्जा वाटली.

“मी भित्रा, नामर्द ठरेन की काय?” त्याने स्वतःला विचारले आणि लगेच सावरून तो म्हणाला, “छे, हुश्शार, हाती शस्त्र घे, अन् परिस्थितीशी मुकाबला कर.”

म्हाताऱ्या सर्जन जनरलने लढायांच्या ज्या हकीगती त्याला सांगितल्या होत्या त्यांतून, “हाती शस्त्र घे, हुश्शार” हेच शब्द त्याने अनेकदा ऐकले होते. त्या शब्दांनी त्याच्या कानात शौर्यवीरत्वाचा नाद घुमत असे. आताही तसेच झाले. तो उठला आणि रेनॉल यांच्या घराकडे झपाझप वाटचाल करू लागला.

असा धडाडीचा निर्धार त्याने उमेदीने केला तरी पन्नास-साठ फूट अंतरावरून रेनॉल यांचे घर दिसू लागताच अनिवार्य लज्जेने त्याच्यावर पगडा बसविला. रेनॉल यांच्या घराचे लोखंडी फाटक उघडेच होते. ते त्याला भव्य वाटले. आता त्याला त्याच्यातून आत जावयाचे होते.

त्या घरी झालेल्या ज्युलिआँच्या आगमनाने केवळ त्याच्याच मनाला अस्वस्थ वाटू लागले होते असे नव्हे, तर मादाम रेनॉल यांचीही मनःस्थिती तशीच झाली होती. आता हा परका माणूस, त्याला नेमून दिलेले काम करताना, आपण आणि आपली मुले यांच्यामध्ये सतत येत राहणार या विचाराने त्या अतिबुजऱ्या बाईच्या मनाचा गोंधळ उडाला. आपल्या मुलांना स्वतःच्या खोलीतच झोपविण्याची सवय मा. रेनॉलना होती. मुलांचे छोटे पलंग त्या सकाळी जेव्हा त्यांच्या शिक्षकाच्या खोलीत नेण्यात येत होते तेव्हा त्या मातेला खूप रडू कोसळले. सगळ्यात धाकटा मुलगा स्टॅनिस्लास झेविअर याचा पलंग तरी आपल्या खोलीत परत आणावा म्हणून त्यांनी आपल्या यजमानांकडे याचना केली. पण व्यर्थ.

स्त्रीसुलभ मार्दव, नाजुकसाजुकपणा ही मा. रेनॉल यांच्यात जरा फाजील प्रमाणातच होती. त्यामुळे भावी शिक्षकाचे त्यांनी आपल्या मनासमोर चित्र उभे केले होते ते असे— एक गबाळ्या पोशाखाचा, भारदस्त चालण्याबोलण्याचा गंध नसलेला प्राणी— तिच्या मुलांच्या अंगांवर ओरडण्यासाठी ठेवलेला— का, तर लॅटिन येत होते एवढ्याच कारणामुळे! कसली ती रानटी भाषा! पण तिच्यासाठी मुलांना मार खावा लागणार होता.

### प्रकरण सहावे

# निरुत्साह

मादाम रेनॉल पुरुषी दृष्टीच्या आवाक्याच्या पलीकडे असत तेव्हा त्यांच्यात नैसर्गिकरीत्या उत्साह संचारे व त्यांच्या वागणुकीत लालित्य येई. अशाच वृत्तीने त्या आपल्या घराच्या काचेच्या दरवाजातून बाहेर येत होत्या. बैठकीच्या खोलीतून बाहेर बागेत जाण्याची वाट ह्याच दरवाजातून होती. बाहेर येत असता, पुढच्या दाराजवळ उभा असलेला एक तरुण शेतकरी त्यांना दिसला. तरुण कसला? पौगंडावस्थेतील तो एक किशोरच होता. त्याचा चेहरा अगदी फिकट होता. नुकत्याच ओघळलेल्या अश्रूंच्या खुणा त्याच्या गालांवर दिसत होत्या. त्याच्या अंगात स्वच्छ, पांढरा सदरा होता आणि जांभळ्या रंगाचा नीटनेटका कोट त्याने काखेत धरला होता.

त्या तरुण शेतकऱ्याची त्वचा इतकी गोरी होती आणि त्याचे डोळेही एवढे वेधक होते की, वेष बदलून, महापौरांकडे काही मदत मागण्यासाठी आलेली ही एखादी मुलगीच असावी असे सकृद्दर्शनी मा. रेनॉल यांच्या अद्‌भुतरम्य, कल्पक मनाला वाटले. पुढच्या दारापर्यंत येऊन तेथे स्तब्ध उभ्या राहिलेल्या त्या व्यक्तीला दारावरची घंटी वाजविण्याचेही धैर्य झाले नव्हते, हे उघड होते. म्हणून त्या गरीब जीवाबद्दल त्यांना वाईट वाटले. आपल्या मुलांसाठी नेमलेल्या शिक्षकाच्या आगमनामुळे त्यांना वाटलेले कडवट दुःख क्षणभर विसरून त्या पुढे गेल्या. तथापि दाराकडे तोंड करून उभ्या असलेल्या ज्युलिआँला त्या येताना दिसल्या नाहीत; आणि म्हणून त्याच्या कानांजवळ उच्चारल्या गेलेल्या त्या गोड शब्दांनी तो एकदम चमकला.

“काय रे मुला, कशासाठी आला आहेस तू?” त्यांनी विचारले.

ज्युलिआँ एकदम वळला. समोर आलेल्या बाईंच्या मुद्रेवरील माधुर्याने भांबावून जाऊन तो स्वतःचा बुजरेपणा अंशतः विसरला आणि त्यांचे रूपसौंदर्य पाहून दुसऱ्या क्षणी तो एवढा चकित झाला की, सगळे काही तो पूर्णपणे विसरून गेला. आपण तेथे कशासाठी आलो आहोत याचे भानच त्याला राहिले नाही. मा. रेनॉल यांनी तोच प्रश्न त्याला पुन्हा विचारला होता.

“बाईसाहेब, मी शिक्षक म्हणून आलो आहे.” एवढे त्याने अखेर सांगितले. आपल्या अश्रूंमुळे तो फार लज्जित झाला होता. त्याने ते शक्य तितके पुसून टाकले.

मा. रेनॉल निःस्तब्ध राहिल्या. ते दोघे एकमेकांच्या अगदी जवळ उभे होते आणि एकमेकांकडे पाहात होते. त्याच्याशी इतक्या नाजुक आवाजात बोलणारी, एवढ्या उत्तम पोषाखातील स्त्री ज्युलिआँने आजवर कधीच पाहिली नव्हती. मग अशा असाधारण, सुंदर स्त्रीचा तर प्रश्नच नव्हता. त्या तरुण शेतकऱ्याच्या गालांवर रेंगाळणारे मोठे अश्रू मा. रेनॉल यांनी पाहिले. आधीच फिकट असलेले त्याचे गाल आता गुलाबी झाले होते. एखाद्या मुलीला बेफाम आनंद होऊन तिने अगदी मोकळेपणे हसावे तशा त्या लगेच खूप मोठ्याने हसत सुटल्या. त्यांना स्वतःचेच हसू येत होते व आपल्या सुखाची संपूर्ण व्याप्ती अजमावण्याचा अयशस्वी प्रयत्न त्या करीत होत्या. आपल्या मुलांसाठी नेमावयाच्या शिक्षकाबद्दल त्यांनी एक वेगळे कल्पनाचित्र मनात तयार केले होते. अस्वच्छ, बावळट वेषातला तो एखादा पाद्री असेल आणि आपल्या मुलांवर रागावणारा, त्यांची खरडपट्टी काढणारा, त्यांना मारपीट करणारा शिक्षक असेल असे त्यांना वाटले होते. म्हणून

ज्युलिआँला समोर पाहून, "अस्सं; तेव्हा असा हा शिक्षक आहे तर." असे त्या स्वतःशी उद्‌गारल्या. अखेर त्यांनी त्याला विचारले,

"सर, तुम्हांला लॅटिन येतं का?" त्यांच्या प्रश्नातील 'सर' हा शब्द ज्युलिआँला इतका आश्चर्यजनक वाटला की त्यांना उत्तर देण्यापूर्वी त्याने क्षणभर विचार केला आणि जरा बुजरेपणानेच तो "होय बाईसाहेब." एवढेच म्हणाला. ते ऐकून मा. रेनॉलना एवढा आनंद झाला की, धैर्य एकवटून त्यांनी ज्युलिआँला विचारले,

"त्या बिचाऱ्या मुलांना तुम्ही रागाने, कडकपणे वागविणार नाही ना?"

"कडकपणे, रागाने?... अन् मी वागविणार? पण ते का म्हणून?" ज्युलिआँने विस्मयाने विचारले. थोडे थांबून मा. रेनॉल म्हणाल्या,

"होय सर, तुम्ही रागवाल त्यांना." प्रत्येक शब्दाबरोबर त्यांचा आवाज भावविवश होत गेला. सद्‌गदित होऊन त्या पुढे बोलल्या,

"तुम्ही त्यांच्याशी ममताळूपणे वागाल असे मला त्याबद्दल वचन द्याल?" अद्ययावत पोषाखातील त्या महिलेने त्याला उद्देशून अगदी मनापासून वापरलेला 'सर' हा शब्द ऐकणे ही गोष्ट ज्युलिआँला स्वप्नातसुद्धा खरी वाटली नसती. बाल्यावस्थेतील त्याच्या कल्पनाविश्वात त्याने स्वतःला सांगितले होते की, अगदी आकर्षक असा पोषाख केल्याशिवाय कोणतीही फॅशनेबल तरुणी एखादाही शब्द बोलण्याचा अनुग्रह त्याच्यावर करणार नाही. पण त्याचे ते मोठे काळेशार डोळे, छानदार कुरळे केस– आणि येताना त्याने एका सार्वजनिक कारंज्याच्या पाण्यात आपले डोके बुचकळल्यामुळे जे नेहमीपेक्षा अधिकच कुरळे दिसू लागले होते– अशी त्याची सुंदर चेहेरेपट्टी पाहून मा. रेनॉल एकदम भारावून गेल्या होत्या. ह्या गोष्टीचा इतका मोठा आनंद त्यांना वाटला की, ज्या शिक्षकाला त्या स्वतःच्या मनात एक खूप मारकुटा माणूस असे समजत आल्या होत्या, ज्याच्या कडकपणाचा आणि अरेरावी, हुकमी करडेपणाचा मोठा धसका, स्वतःच्या मुलांच्या काळजीपोटी त्यांनी घेतला होता त्याच्यात उलटपक्षी त्यांना मुलींना शोभणाऱ्या लाजाळूपणाचा शोध लागला होता! मनात वाटलेले भय आणि समोर उभे असलेले सत्य यांच्यातील तफावत मा. रेनॉलसारख्या शांत वृत्तीच्या स्त्रीच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण गोष्ट होती. अखेर त्या आश्चर्यातून त्यांनी स्वतःला सावरले तेव्हा आपण आपल्या घरच्या दारातच एका, नुसता सदरा घातलेल्या तरुण माणसाच्या अगदी जवळ उभ्या असल्याचे लक्षात येऊन त्यांना अचंबा वाटला व ज्युलिआँला त्या म्हणाल्या,

"सर, आपण आत जाऊ या." त्यांच्या बोलण्यातून त्यांच्या मनातील संकोच स्पष्टपणे कळून येत होता.

आजवर त्यांच्या जीवनांत अशा निव्वळ सुखदायक संवेदनेने त्यांचे मग इतके खोलवर कधीच ढवळून टाकले नव्हते. आतापर्यंत अत्यंत अस्वस्थ करून टाकणाऱ्या भीतीनंतर पाठोपाठ इतके रमणीय दृश्य कधीच समोर उभे ठाकले नव्हते. म्हणजे आता, त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक वाढविलेली त्यांची गोड, गोजिरवाणी मुले एखाद्या कळकट-मळकट अन् गुरकावणाऱ्या पाद्र्याच्या हाती जाणार नव्हती एवढे खरे.

दिवाणखान्यात गेल्याबरोबर मा. रेनॉलनी ज्युलिआँकडे वळून बघितले. तो त्यांच्या मागोमाग बुजतबुजत येत होता. एवढे छानदार घर पाहून त्याला आश्चर्य वाटत होते. त्याची ती आश्चर्याची प्रतिक्रिया मा. रेनॉल यांच्या दृष्टीने एक जादा मोहक गोष्ट होती. स्वतःच्या डोळ्यांवर त्यांचा विश्वास बसेना. शिक्षकाच्या अंगात काळा कोट असायलाच हवा असे त्यांना फार उत्कटतेने वाटले.

"पण सर, हे खरं ना?" ज्युलिआँला विचारण्यासाठी त्यांनी एवढेच शब्द उच्चारले आणि त्या पुन्हा थांबल्या. त्यांच्या मनात रुजली गेलेली समजूत इतकी सुखद होती की, आपल्याकडून काही चुकणार तर नाही ना याचे त्यांना पराकाष्ठेचे भय वाटले व त्या पुढे म्हणाल्या,

"खरंच तुम्हांला लॅटिन येतं का?" ह्या शब्दांनी ज्युलिआँच्या अस्मितेला धक्का दिला आणि गेली सुमारे पंधरा मिनिटे तो ज्या विलक्षण मोहमय भावविश्वात विहरत होता ते उद्ध्वस्त झाले. तो शक्य तेवढ्या थंडपणे उत्तरला,

"होय बाईसाहेब, मला लॅटिन येतं. म. ल क्युरे यांच्याइतकं चांगलं येतं. खरोखर कधीकधी ते सहृदयपणे म्हणतात की त्यांच्यापेक्षा मी लॅटिन जास्त चांगलं जाणतो."

ज्युलिआँने फार आढ्यतेचा, अप्रिय सूर लावला असे मा. रेनॉल यांना वाटले; तो अगदी हाताच्या अंतरावर येऊन त्यांच्याजवळ उभा होता. त्या पुढे होऊन गुणगुणल्या,

"निदान पहिले काही दिवस तरी तुम्ही माझ्या मुलांवर छडी चालवणार नाही ना? त्यांना त्यांचे पाठ आले नाहीत तरीही?"

अशा रुबाबदार बाईच्या तोंडून निघालेले ते एवढे सौम्य व जवळजवळ विनवणीच्या स्वरातील शब्द ऐकून ज्युलिआँ आपली लॅटिन पंडिताची प्रतिष्ठा एकदम विसरून गेला. मा. रेनॉल यांचा चेहेरा, त्याच्या चेहेऱ्याच्या इतका जवळ होता की स्त्रीच्या उन्हाळी तलम पोषाखाचा सुगंध त्याला जाणवत होता आणि त्याच्यासारख्या एखाद्या गरीब शेतकऱ्याच्या दृष्टीने ती गोष्ट फारच आश्चर्यकारी होती. ज्युलिआँ लज्जेने लालबुंद झाल. सुस्कारा टाकीत तो खालच्या आवाजात म्हणाला, "बाईसाहेब, आपण कशाचीही काळजी करू नका. प्रत्येक बाबतीत मी आपली आज्ञा मानीत जाईन."

ज्युलिआँचे हे शब्द मा. रेनॉल यांच्या कानी पडले व त्यांची स्वतःच्या मुलांबद्दलची चिंता पूर्णपणे नाहीशी झाली तेव्हा कोठे ज्युलिआँच्या अतिशय देखण्या रूपाने त्या मुग्ध होऊन गेल्या. त्याच्या चेहेऱ्याची ठेवण स्त्रीमुखासारखी नाजूक होती. त्याची वृत्ती अवघडल्यासारखी दिसत होती. पण स्वतःच अतिशय भित्र्या व लाजऱ्याबुजऱ्या असलेल्या मा. रेनॉलना त्यात चुकीचे अथवा विसंगत असे मुळीच काही वाटले नाही. उलट पुरुषाच्या देखणेपणासाठी सर्वसाधारणपणे आवश्यक समजले जात असलेल्या पौरुषयुक्त भरदारपणामुळे तर त्यांना कदाचित घाबरवून टाकले असते.

"तुमचं वय काय, सर?" त्यांनी ज्युलिआँला विचारले.

"लवकरच मी एकोणीस वर्षांचा होईन." हे ऐकून मा.रेनॉलना धीर आला, त्यांच्या मनातील भीती पूर्णपणे नाहीशी झाली. त्या म्हणाल्या,

"माझा सर्वांत थोरला मुलगा अकरा वर्षांचा आहे. तो तुमचा जणू एखादा सवंगडीच होऊ शकेल. तुम्ही त्याच्याशी गंभीरपणे बोलू शकाल. एकदा त्याच्या वडिलांनी त्याला थोडं मारलं होतं तेव्हा पोरगा आठवडाभर आजारी पडला होता. अन् मारलं म्हणजे तरी काय? तर अगदी सौम्यशी एक चापट." ते ऐकून ज्युलिआँ स्वतःशी म्हणाला, "केवढा हा फरक! अगदी कालच माझ्या बापाने मला यथेच्छ चोप दिला. ही श्रीमंत माणसं खरोखरी किती सुदैवी म्हटली पाहिजेत?"

ह्या वेळेपर्यंत मा. रेनॉल यांची मजल सदर शिक्षकाच्या मनोव्यापारात होत असलेला अगदी बारीकसारीक बदल लक्षात येण्यापर्यंत पोहोचली होती. असूयेच्या या भावनेला चुकून लाजाळूपणा समजून ज्युलिआँला धीर देण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

"सर, तुमचं नाव काय?" शब्दांवर एक विशिष्ट आघात देऊन त्यांनी मोहकपणे विचारले. ज्युलिआँला ते जाणवले; पण ती मोहकता व सौंदर्य यांचे उगमस्थान काय होते ते मात्र त्याला उमगले नाही.

"मला सगळे ज्युलिआँ सोरेल म्हणतात, बाईसाहेब. माझ्या आयुष्यात मी प्रथमच अशा अपरिचित घरात प्रवेश करीत असल्यामुळे मला कापरं भरलं आहे. तुमच्या संरक्षणाची मला गरज आहे; आणि प्रथम प्रथम आपणांस मला अनेक गोष्टींबद्दल क्षमा करावी लागेल. मी फार गरीब असल्यामुळे कॉलेजात कधी गेलो नाही. लीजन ऑफ ऑनरचा सभासद असलेला माझा चुलत भाऊ, सर्जन मेजर आणि रेव्ह. फादर शॅलाँ यांच्याशिवाय अन्य माणसांशी मी कधीच बोललेलो नाही. शॅलाँ तुम्हांला माझ्या चांगुलपणाचा निर्वाळा देतील. माझे भाऊ मला नेहमीच मारीत आले आहेत. ते माझ्याबद्दल काही वाईट सांगू लागल्यास त्यांचं काही ऐकू नका. बाईसाहेब, माझ्या दोषाबद्दल मला क्षमा करा. मी कधीच दुष्ट हेतू बाळगणार नाही."

हे लांबलचक भाषण चालू असताना ज्युलिआँने स्वतःच्या अंगी पुन्हा धैर्य आणले. तो मा. रेनॉल यांचे निरक्षिण करीत होता. निर्दोष सौंदर्य जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत अगदी नैसर्गिक व तिच्या वृत्तीला साजेसे असते; आणि त्यातही ते बहाल केल्या गेलेल्या व्यक्तीला त्याची जाणीव नसते तेव्हा त्या सौंदर्याचा प्रभाव हा असा असतो. स्त्रीसौंदर्याची जेवढी सगळी माहिती असावयास हवी तेवढी ज्युलिआँला होती. त्या आधाराने, मा. रेनॉल यांचे वय वीसपेक्षा जास्त नाही असे त्या क्षणी ज्युलिआँने शपथेवर सांगितले असते. त्यांचे हस्तचुंबन घ्यावे असा एक धीट विचार त्याच्या मनात एकदम आला. पण दुसऱ्याच क्षणी त्या विचाराने तो भयभीत झाला. आणखी एका क्षणानंतर तो स्वतःशी बोलला,

'हा विचार कृतीत न उतरविणे हे माझ्या बाबतीत भ्याडपणाचे ठरेल. उलट तसे करणे हे बहुधा मला उपयोगी ठरेल. कारण कालपर्यंत लाकूड-कापणीच्या कारखान्यात काम करणारा एक गरीब कामगार अशा दृष्टिकोणातून माझ्याकडे पाहणाऱ्या या रुबाबदार स्त्रीला माझ्याबद्दल कदाचित वाटणारा तिरस्कार त्यामुळे कमी होईल.' वेगवेगळ्या मुलींच्या तोंडचे 'देखणा छोकरा' हे शब्द दर रविवारी ऐकण्याचा सराव ज्युलिआँला गेले सहा महिने झाला होता. कदाचित त्या शब्दांमुळे ज्यूलिआँला उत्तेजन आले असावे. त्याच्या मनात असे उलटसुलट विचार चालू होते तेवढ्यात मा. रेनॉलनी, त्याने मुलांना कसे वागविण्यास सुरुवात करावी याबद्दल त्याला काही सूचना केल्या. स्वतःला आवरण्याचे जे जोरदार प्रयत्न ज्युलिआँ करीत होता त्यामुळे तो पुन्हा अगदी फिका पडला. मग काहीसा दबकत तो म्हणाला,

"बाईसाहेब, तुमच्या मुलांना मी कधीही मारणार नाही. त्याबद्दल मी देवाची शपथ घेतो." आणि हे बोलत असता मा. रेनॉल यांचा हात आपल्या हाती घेऊन तो स्वतःच्या ओठांजवळ नेण्याचे धाष्टर्य ज्युलिआँने केले. त्याच्या या कृतीचे मा. रेनॉलना आश्चर्य वाटले; आणि तिच्याबद्दल आणखी विचार केल्यावर त्यांच्या मनाला तिने धक्का बसला. हवा बरीच गरम होती. त्यामुळे त्याचे बाहू पूर्णपणे अनावृत होते. त्यांनी वरून फक्त शाल लपेटली होती. ज्युलिआँने त्यांचा हात वर उचलून आपल्या ओठाजवळ नेला; त्याबरोबर त्यांचा बाहू खांद्यापर्यंत उघडा पडला. एका मिनिटानंतर त्यांनी स्वतःची निर्भर्त्सना केली. तथापि यायला हवा होता तितका राग चटकन आपल्याला आला नाही असे त्यांना वाटून गेले.

मा. रेनॉल आणि ज्युलिआँ यांच्या बोलण्याचे आवाज एम्. द. रेनॉल यांना ऐकू आले होते. टाऊन हॉलमध्ये लग्ने लावताना ज्या भारदस्त व वडीलकीच्या डौलात ते वागत त्याच पद्धतीने ते आपल्या अभ्यासिकेतून बाहेर आले आणि ज्युलिआँला म्हणाले,

"मुलांची आणि तुमची भेट होण्यापूर्वी मी तुमच्याशी बोलणं मला आवश्यक वाटतं."

ज्युलिआँशी बोलण्यासाठी ते त्याला एका खोलीत घेऊन गेले. मा. रेनॉलनाही त्यांनी तेथे बसवून घेतले. त्या दोघांना बोलण्यासाठी येथे सोडून जाण्याचा मा. रेनॉल यांचा विचार होता. रेनॉल यांनी दार लावून घेतले आणि भारदस्तपणे आसनस्थ होऊन ते ज्युलिआँला म्हणाले,

"तुम्ही प्रामाणिक असल्याचं मला पाद्र्यानं सांगितलं आहे. ह्या घरातली प्रत्येक व्यक्ती तुम्हांला आदराने वागवील; आणि तुमचं काम माझ्या मनास आल्यास, भावी जीवनात स्थिर होण्यासाठी मी तुम्हांला मदत करीन. तुमच्या घरची मंडळी किंवा तुमचे मित्र यांच्या गाठीभेटी घेणे किंवा बोलणे-सवरणे तुम्ही बंद करावे अशी माझी इच्छा आहे; कारण त्यांची रीतभात माझ्या मुलांना शोभेल, साजेल अशी नाही. हे घ्या पहिल्या महिन्याचे छत्तीस फ्रँक, पण यातली एक पेनीही तुम्ही तुमच्या वडिलांना देणार नाही असा शब्द तुम्ही मला दिला पाहिजे."

रेनॉलना म्हाताऱ्या सोरेलचा फार राग आलेला होता. कारण त्याने ह्या व्यवहारात त्यांच्यावर कुरघोडी केली होती. मतलब साध्य करण्यात तो त्यांना भारी ठरला होता. रेनॉल पुढे म्हणाले,

"आणि हे बघा, सर– माझ्या हुकुमानुसार या घरातला प्रत्येकजण तुम्हांला सर असंच म्हणेल– एका सुव्यवस्थित कुटुंबात तुम्हाला प्रवेश मिळालेला असल्यामुळे पुढे प्राप्त होणाऱ्या फायद्यांची जाणीव तुम्ही ठेवाल. सर, आता तुम्हांला मुलांनी असा कोट घातलेल्या पेहेरावात पाहणं इष्ट नाही... नोकरांनी यांना पाहिलं आहे काय?" आश्चर्यचकित झालेल्या पत्नीला त्यांनी विचारले.

"नाही डियर." खोल विचार केल्यासारखे दाखवीत मा. रेनॉल उत्तरल्या.

"छान, हे घाला अंगात." असे म्हणून स्वतःचा एक फ्रॉककोट त्यांनी ज्युलिआँला दिला आणि "आता आपण त्या कपडेवाल्या म. द्यूरांकडे जाऊ या." असे ते बोलले.

अनुक्रमणिका

सुमारे तासाभराने रेनॉल घरी परत आले तेव्हा, ते बाहेर जाताना मा. रेनॉल ज्या खुर्चीत बसल्या होत्या तेथेच त्या तशाच बसलेल्या त्यांना दिसल्या. आता नव्या शिक्षकाच्या अंगावर संपूर्ण काळा पोषाख होता. ज्युलिआँला त्या पोषाखात पाहून मा. रेनॉलना समाधान वाटले. नवीन पोषाखातील त्याचे रूप निरखून पाहताना स्वतःच्या मनातली भीती त्या विसरून गेल्या. ज्युलिआँ मात्र आता त्यांच्याबद्दल काडीमात्र विचार करीत नव्हता. दैवावर आणि मनुष्यजातीवर त्याचा पूर्ण अविश्वास होता. पण चालू क्षणी त्याचे अंतःकरण एखाद्या बालकाच्या मनासारखे झाले होते. तीन तासांपूर्वी चर्चमध्ये तो थरकापत उभा होता. त्यानंतरच्या त्या छोट्या अवधीत आपण कित्येक वर्षे जगल्यासारखे त्याला वाटले. मा. रेनॉल यांच्या वृत्तीतला थंडपणा त्याच्या लक्षात आला. त्यांचे हस्तचुंबन घेण्याचे आपण जे धाष्ट्य केले त्याबद्दल त्या रागावल्या असाव्यात असे त्याला वाटले. पण त्याच्या एरवीच्या पोषाखापेक्षा जे वेगळे कपडे आता त्याच्या अंगावर चढले होते त्यांच्या स्पर्शाने त्याला एक प्रकारचा अभिमान वाटू लागला होता व त्याने त्याच्या मनात बरीच खळबळ माजविली होती. स्वतःला झालेला आनंद छपविण्याची धडपड तो करीत होता. याचा परिणाम असा झाला की, त्याची सगळी हालचाल व हावभाव काहीसे विसंगत, विस्कळित व खुळ्यासारखे होऊ लागले. साहजिक मा. रेनॉल यांनी त्याच्याकडे विस्मयाने नजर टाकली.

एम्. द रेनॉल त्याला म्हणाले, "सर, तुम्हांला माझ्या मुलांकडून आणि नोकरांकडून आदर दाखविला जावा अशी तुमची इच्छा असेल, तर मग तुम्ही जरा गांभीर्याने, भारदस्तपणे वागलं पाहिजे."

"साहेब, ह्या नव्या कपड्यांमुळे मी बुजल्यासारखा झालो आहे. मी एक साधा, गरीब शेतकरी; आखूड कोटाशिवाय दुसरा कोणताच कपडा मी अंगावर वापरलेला नाही. माझ्या झोपण्याच्या खोलीत जाण्याची मी आपली परवानगी घेतो."

नंतर रेनॉलनी पत्नीला विचारले, "मी मिळवलेल्या ह्या नव्या चिजेबद्दल तुला काय वाटतं?"

स्वतःला न कळतच, जवळजवळ एका स्वाभाविक प्रेरणेनेच, नवऱ्यापासून स्वतःचे अंतरस्थ, खरे विचार लपवीत मा. रेनॉल म्हणाल्या, "ह्या छोट्या शेतकऱ्यामुळे तुम्ही जसे भारले गेले आहात तसं माझं मुळीच झालेलं नाही. तुमच्या कनवाळूपणामुळे तो एक मगरूर, भामटा बनेल आणि त्यामुळे महिन्याभरातच तुम्हांला त्याची उचलबांगडी करणे भाग पडेल."

"काही हरकत नाही. आपण त्याला परत पाठवून देऊन मग. त्याच्यापायी मला सुमारे शंभरएक फ्रँकचा खर्च आला असे फार तर होईल आणि रेनॉल यांनी आपल्या मुलांसाठी शिक्षक ठेवला आहे हे पाहण्याची सवय व्हेरिएरच्या लोकांना होईल. मी जर त्याला एखाद्या कामगाराच्याच कपड्यात राहू दिला असता तर प्रतिष्ठेचा असा लाभ मला मिळवता आला नसता. मी जेव्हा त्याला कामावरून काढून टाकीन तेव्हा त्याच्यासाठी नुकताच बनवायला टाकलेला काळा सूट अर्थातच ठेवून घेईन. जाताना त्याला इतर काही नाही, पण फक्त त्याच्या अंगावर आत्ता असलेला कोटच तेवढा त्याला घेऊन जाता येईल. तो मला शिंप्याकडे आयताच तयार मिळाला."

ज्युलिआँने त्याच्या खोलीत घालविलेला तास मा. रेनॉलना क्षणासारखा वाटला. मुलांना त्यांच्यासाठी नवा शिक्षक आला असल्याचे कळले तेव्हा त्यांनी प्रश्नावर प्रश्न विचारून आईला भंडावून सोडले. अखेर ज्युलिआँचे दर्शन त्यांना घडले तेव्हा तो एक अगदीच वेगळा माणूस दिसत होता. तो गंभीर,

भारदस्त दिसत होता असे म्हणणे म्हणजे त्या शब्दांतून वाजवीपेक्षा जास्त अर्थ ओढून काढल्यासारखे होईल. त्या वेळी मूर्तिमंत गांभीर्याचा, भारदस्तपणाचा अवतारच तो दिसत होता. त्याचा परिचय मुलांशी करून देण्यात आला तेव्हा तो अशा थाटात बोलला की ते पाहून खुद्द रेनॉल यांना आश्चर्य वाटले.

मुलांना उद्देशून केलेल्या आपल्या भाषणाच्या शेवटी ज्युलिआँ म्हणाला, “छोट्या सद्‌गृहस्थांनो, तुम्हांला लॅटिन शिकविण्यासाठी मी इथं आलो आहे. पाठ मुखोद्‌गत करणे म्हणजे काय ते तुम्ही जाणताच. हे पाहा पवित्र बायबल.” असे म्हणून त्याने काळ्या, मोरोक्कोच्या कातड्याची बांधणी असलेली बायबलची एक छोटी प्रत त्यांना दाखविली व तो पुढे म्हणाला, “हे बायबल म्हणजे विशेषेकरून आपल्या लॉर्ड जीझस ख्राइस्टची कथा आहे. त्याच्या त्या भागाला ‘न्यू टेस्टॅमेंट’ म्हणजे ‘नवा करार’ म्हणतात. त्याच्यातले अनेक पाठ मी नेहमी तुमच्याकडून म्हणून घेत जाईन. आता तुम्ही माझ्याकडून माझा पाठ म्हणवून घेतला पाहिजे.”

सर्वांत थोरला मुलगा आदोल्फ याने पुस्तक घेतले. ज्युलिआँ त्याला म्हणाला, “तुला वाटेल ते त्यातले पान काढ आणि एखाद्या परिच्छेदाचे पहिले तीन शब्द मला सांग. त्यातला पवित्र मजकूर मी पाठ म्हणून दाखवितो. आपण सर्वांनी कसं वागावं याचे नियम त्यात देण्यात आलेले आहेत. तू मला थांबा म्हणशील तेव्हाच मी थांबेन.”

आदोल्फने पुस्तक उघडले, एका पानावरचे फक्त दोन शब्द वाचून दाखविले आणि त्याबरोबर ज्युलिआँने लगेच ते सबंध पान इतक्या सहजपणे पाठ म्हणून दाखविले की, जणू तो फ्रेंचमध्ये, आपल्या मातृभाषेत बोलत होता. त्यावर रेनॉल यांनी आपल्या पत्नीकडे विजयी भावनेने पाहिले. आपल्या आईवडिलांचे आश्चर्य पाहून मुलांचे डोळे मोठे झाले आणि ती एकटक पाहातच राहिली! ज्युलिआँ तसाच लॅटिन बोलत राहिला. एक नोकर दिवाणखान्याच्या दारात आला, प्रथम तो निश्चेष्ट उभा राहिला आणि मग लगेच तेथून नाहीसा झाला. लवकरच बाईसाहेबांची नोकराणी आणि स्वयंपाकीणही दारात हजर झाली. हा वेळपर्यंत आदोल्फने पुस्तकातली निरनिराळी आठ पाने उघडली होती आणि ज्युलिआँचे त्या त्या ठिकाणचा मजकूर अगदी सहजतेने म्हणून दाखविणे चालूच होते.

“ओहो! किती गोंडस, छोटासा पाद्री आहे, नाही?” स्वयंपाकीण मोठ्याने म्हणाली. ती एक चांगली व खरीखुरी धार्मिक वृत्तीची मुलगी होती.

रेनॉल यांची आत्मप्रतिष्ठा आता विचलित झाली. कारण ह्या शिक्षकाची पारख करावी, चाचणी घ्यावी असे विचार त्यांच्या मनात येणे बाजूलाच राहिले; उलट आता त्यांची स्मरणशक्ती लॅटिनचे काही शब्द धुंडाळण्यात त्यांना गुंतवावी लागली. अखेर होरेसची एक ओळ त्यांनी कशी तरी उद्‌धृत केली. ज्युलिआँचा लॅटिनशी परिचय होता तो केवळ बायबलपुरताच. त्यापलीकडे त्याला लॅटिन वाङ्‌मयाचा परिचय नव्हता. कपाळावर आठ्या चढवीत तो तुच्छतेने म्हणाला,

“पाद्र्यांच्या ज्या पवित्र उपाध्याय शाखेकडे सेवेसाठी स्वतःला वाहून घेण्याची माझी इच्छा आहे तिने अशा धर्माव्यतिरिक्त विषयावर काव्य रचणाऱ्या कवीची कविता वाचण्याची मला मनाई केलेली आहे.”

होरेसच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या अनेक काव्यपंक्ती रेनॉल यांनी म्हटल्या. होरेस कोण होता ते त्यांनी मुलांना समजावून सांगितले. पण ज्युलिआँबद्दल साश्चर्य कौतुक वाटलेल्या मुलांनी वडील काय सांगत होते याकडे फारसे लक्ष दिले नाही. ते ज्युलिआँचेच निरीक्षण करीत होते.

नोकर अद्यापीही दारातच उभे असल्याचे पाहून आपण पाठांतराची ती चाचणी-परीक्षा थोडा वेळ लांबविली पाहिजे असे ज्युलिआँला वाटले. मग सगळ्यांत धाकट्या मुलाला तो म्हणाला,

“मास्टर स्टॅनिस्लास झेविअर, आता तूही मला ह्या पवित्र ग्रंथातून एखादा परिच्छेद पाठ म्हणून दाखवायला सांगितलं पाहिजेस.”

छोट्या स्टॅनिस्लासची छाती त्याबरोबर अभिमानाने फुगली. स्वतःच्या कुवतीनुसार त्याने एका परिच्छेदाच्या सुरुवातीचे शब्द वाचले. मग ज्युलिआँने ते सबंध पानच म्हणून दाखविले.

आपल्या मुलांसाठी आपण असा हा शिक्षक नेमला असल्याच्या रेनॉल यांच्या अभिमानात व विजयात कोणतेही न्यून राहिले जाऊ नये म्हणूनच की काय ज्युलिआँचे ते पाठांतर चालू असतानाच तेथे म. वालनो आणि म. शारको द मोजिरॉं यांनी प्रवेश केला. वालनो उत्तम नॉर्मन घोड्यांचे मालक होते, तर शारको त्या जिल्ह्याचे ‘सबप्रिफेक्ट’ (प्रशासक अधिकारी) होते. त्या प्रसंगाने ज्युलिआँला ‘सर’ ही मानाची उपाधी मिळवून दिली. साहजिकच ज्युलिआँच्या बाबतीत तिचा उपयोग टाळण्याचे धाडस नोकर करू शकत नव्हते.

त्या दिवशी संध्याकाळी सगळा व्हेरिएर गावच त्या आश्चर्यकारक व्यक्तीला पाहण्यासाठी रेनॉल यांच्या घरी जमा झाला. ज्युलिआँने त्या साऱ्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. पण त्यांत विमनस्कतेची, उदासीनतेची छटा होती, आणि त्यामुळे ती मंडळी हातभर दूरच राहिली. ज्युलिआँचा लौकिक गावात इतक्या झपाट्याने पसराला की हा शिक्षक आपल्या हातून गमाविला जाईल की काय या भयाने, रेनॉल यांनी लगेच थोड्या दिवसांनंतर, दोन वर्षांच्या करारावर सही करण्याची सूचना ज्युलिआँला केली.

पण ज्युलिआँ त्यांना थंडपणे म्हणाला, “सर, तसं नको. मला नोकरीवरून काढून टाकावं असं तुम्हांला वाटल्यास मला निघून जाणे भाग पडेल. तुमच्यावर कोणतीही जबाबदारी न टाकता जो करार मला बांधून घेईल तो गैरवाजवी, अयोग्य होय, म्हणून मी त्याला नकारच देणे इष्ट आहे.”

ज्युलिआँने सर्व गोष्टी एवढ्या चतुराईने सांभाळल्या की, सुमारे महिन्याच्या आतच स्वतः रेनॉल त्याला आदर दाखवू लागले. रेनॉल आणि वालनो यांच्याशी क्युरेचा भांडणतंटा झालेला असल्यामुळे, ज्युलिआँला नेपोलिअनबद्दल वाटणाऱ्या पूर्वीच्या अभिमान—आकर्षणाचा गौप्यस्फोट करणारे कोणी नव्हते. तो आता नेपोलिअनबद्दल घृणेने बोलण्याची खबरदारी घेत असे.

★ ★ ★

अनुक्रमणिका

## प्रकरण सातवे

# राजीखुषीचे स्नेहसंबंध

रेनॉल यांच्या मुलांना ज्युलिआँबद्दल प्रेम व पूज्यभाव वाटत असे. पण त्याला मात्र त्यांच्याबद्दल काहीच वाटत नसे. त्याचे विचार दुसरीकडेच असत. त्याच्या सहनशीलतेची कसोटी घेतली जाईल असे ती वात्रट पोरटी काहीच करू शकत नव्हती. त्या घरी तो एक चांगला शिक्षक ठरला होता. तो थंड, न्यायी व निर्विकार होता; पण तो सर्वांना आवडला होता. कारण त्याच्या आगमनाने त्या घरातील उदासीनता काही अंशी नाहीशी झाली होती. उच्चभ्रू समाजातल्या त्या कुटुंबात त्याला अगदी तळाचे, अगदी शेवटच्या पायरीचे स्थान देण्यात आले होते. व त्यामुळेच त्याला त्या समाजाबद्दल द्वेष, तिरस्कार व शिसारी वाटत होती. तेथील त्याचे हे स्थानच कदाचित त्याच्या अशा मनःस्थितीचे कारण असावे. त्या घरी रात्रीच्या भोजनाचे काही औपचारिक प्रसंग येत. अशा वेळी त्याच्या भोवतीच्या प्रत्येक वस्तूबद्दल त्याला किळस, तिटकारा वाटे; आणि मग कसाबसा निग्रह करणे त्याला भाग पडे, विशेषतः सेंट लुईच्या दिनाच्या प्रसंगी रेनॉल यांच्या घरी जेव्हा वालनो धर्म, न्याय आदींबद्दल प्रतिपादन करीत होता तेव्हा ज्युलिआँचा संयम जवळजवळ सुटला होता. तो बागेत सटकला; मुलांच्याकडे बघावयास हवे, हे कारण त्याने त्यासाठी सांगितले. तो आश्चर्याने स्वतःशी बोलला, "प्रामाणिकपणाचे काय हे स्तुतिपाठ! कोणीही म्हणावं की हा एवढाच खरा अन् एकमेव सद्‌गुण; आणि तरीही गरिबांना मदत करण्याचे काम सोपविण्यात आल्यापासून ज्याने आपली संपत्ती दुपटी-तिपटीने वाढविली हे स्पष्ट आहे त्याला केवढी मान्यता अन् केवढा लाचारीचा आदर! मी पैज मारून सांगतो की, परित्यक्त बालकांसाठी अलग ठेविलेल्या निधीतूनसुद्धा तो नक्कीच काही अपहार करतो; त्या दुर्दैवी बालकांची गरज भागविणे तर इतर भिकाऱ्यांच्या गरजेपेक्षा अधिक पवित्र मानले गेले पाहिजे... अरे, हे राक्षस आहेत, नुसते राक्षस!... आणि मी? मी पण? माझा बाप, माझे भाऊ व सबंध कुटुंब यांच्याकडून द्वेष केला जाणारा मीही एक प्रकारे तसाच परित्यक्त आहे."

त्या आधीच्या काही दिवसांपूर्वीची गोष्ट. ज्युलिआँ एकदा एकटाच फिरत होता. बेल्व्हेडेर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या छोट्या राईत तो स्वतःशी पठण करीत होता. ही राई कूर द ला फायडेलायटेच्या वरच्या बाजूला आहे. तेव्हा त्याचे दोघे भाऊ, एका बाजूच्या वाटेने त्याच्याचकडे येताना त्याने पाहिले. त्यांना टाळण्याचा प्रयत्न ज्युलिआँने केला. पण ते जमले नाही. ज्युलिआँच्या अंगावर छानदार काळा कोट पाहून, त्याचा तो सभ्यतेचा नोकझोक बघून आणि त्या दोघांविषयी त्याला खराखुरा तिरस्कार वाटतो हे त्यांना माहीत होते म्हणून, कसले तरी ओबडधोबड काम करणाऱ्या त्या दोघा भावांच्या मनात ज्युलिआँबद्दल एकदम इतका मत्सर निर्माण झाला की ते त्याला चोप देण्यासाठी तडक धावले आणि ज्युलिआँच्या अंगातून बराच रक्तस्राव होईपर्यंत त्यांनी त्याला बेदम मार दिला. त्याला तसाच बेशुद्धावस्थेत तेथे सोडून ते निघून गेले. प्रसंगवशात मादाम रेनॉल, म. वालनो व सब–प्रिफेक्ट यांच्यासह त्या राईत सहजच वळल्या होत्या. जमिनीवर निपचित पडलेल्या ज्युलिआँला त्यांनी पाहिले तेव्हा त्यांना तो मृत झाला आहे असेच वाटले! आणि त्याबरोबर भावनावेगानें त्यांना एकदम एवढे भडभडून आले की, वालनोला त्यामुळे ज्युलिआँचा फार मत्सर वाटू लागला.

पण वालनोला वाटलेली भीती अनाठायी होती. ज्युलिआँला मा. रेनॉल यांच्या रूपाचे कौतुक वाटे, पण त्यांच्या सौंदर्याबद्दल तो त्यांचा द्वेष करी. ह्याच पहिल्या खडकावर त्याच्या नशिबाचे तारू आपटून

जवळजवळ फुटले होते. त्यांच्या पहिल्या भेटीत ज्या विकारवशतेच्या पोटी त्याने मा. रेनॉल यांचे हस्तचुंबन घेतले होते. ती भावना त्यांनी विसरावी या आशेने तो त्यांच्याशी शक्य तेवढ्या क्वचित प्रसंगीच बोलत असे.

मा. रेनॉल यांची नोकराणी एलिसा, ह्या तरुण शिक्षकाच्या प्रेमात पडल्याशिवाय राहिली नव्हती. आपल्या मालकिणीशी ती त्याच्याबद्दल नेहमी बोलत असे. एलिसाच्या प्रेमामुळे त्या घरातील एका नोकराने ज्युलिआँशी वैरभाव धरला होता. एक दिवस तो एलिसाशी बोलताना ज्युलिआँने ऐकले. तो म्हणत होता,

“तो तेलकट शिक्षक या घरात आल्यापासून तू माझ्याशी बोलत नाहीशी झाली आहेस.”

ज्युलिआँला ते विशेषण लागू पडत नव्हते. पण चांगली रूपसंपदा असलेला तरुण ज्युलिआँ नैसर्गिक प्रवृत्तीने तेव्हापासून स्वतःच्या रूपाकडे दुप्पट लक्ष देऊ लागला; आणि त्या प्रमाणात वालनोचा द्वेष वाढू लागला. वालनो चार लोकांत उघडउघड बोलत असे की,

“छानछोकीचे असे बायकी प्रकार तरुण पाद्र्याला शोभत नाहीत.”

लांब, पायघोळ झग्याव्यतिरिक्त ज्युलिआँ आता बाकीचा पाद्र्याचा पोषाख घालू लागला होता.

आता पूर्वीपेक्षा जास्त वेळा ज्युलिआँ एलिसाशी बोलत असतो ही गोष्ट मा. रेनॉल यांच्या नजरेस आली होती. त्यांना असे कळून आले की तो तिच्याशी वरचेवर बोलतो याचे कारण त्याला अगदी थोडे कपडे आहेत हे होते. आतून घालावे लागणारे कपडेही त्याच्याजवळ पुरेसे नव्हते. अशा थोड्या, तुटपुंज्या कपड्यांमुळे, त्याला ते वरचेवर धुऊन घेण्यासाठी द्यावे लागत आणि एलिसा त्याची ही छोटी कामे स्वतः करून देऊन त्याच्या उपयोगी पडत असे.

ज्युलिआँच्या अतीव दारिद्र्याची मा. रेनॉलना पूर्वी कधी शंका आली नव्हती. त्यामुळे हे कळल्यावर त्यांच्या मनात त्याच्याबद्दल कळवळा निर्माण झाला. त्याला भेटी, वेणग्या देत जाव्यात असे त्यांना वाटू लागले. पण त्याप्रमाणे करण्याचे धारिष्ट त्यांना झाले नाही. त्यामुळे त्यांच्या मनात अंतर्द्वंद्व सुरू झाले. ज्युलिआँमुळे खेद वाटण्याची ही मा. रेनॉलची पहिलीच वेळ होती. नाही तर आतापर्यंत ज्युलिआँचे नाव आणि त्याची शुद्ध व सर्वस्वी बौद्धिक आनंदाची भावना ह्या दोन्ही गोष्टी मा. रेनॉलना समानार्थी वाटत. ज्युलिआँच्या त्या अतीव दारिद्र्याच्या विचाराने संत्रस्त झाल्यामुळे चांगल्या कपड्यांची भेट त्याला देण्याची कल्पना मा. रेनॉल यांनी आपल्या पतीजवळ बोलून दाखविली. त्यावर एम्. द रेनॉल त्यांना म्हणाले,

“हे काय खूळ आहे? भेटी द्यायच्या? अन् त्या कोणाला तर ज्याच्याबद्दल आपल्याला पूर्ण समाधान वाटत आहे आणि जो आपल्याला चांगली सेवा देत आहे त्याला? नोकर जेव्हा आपल्या कर्तव्याची हेळसांड, हयगय करतो, त्याकडे दुर्लक्ष करतो तेव्हा आपण भेटीच्या सहाय्याने त्याची कर्तव्यभावना उत्तेजित करावयाची असते.”

एकंदर घटनांकडे अशा प्रकारच्या दृष्टिकोणातून पाहणे मा. रेनॉलना लज्जास्पद वाटले. ज्युलिआँच्या आगमनापूर्वी अशी गोष्ट त्यांच्या लक्षातही आली नसती. त्या तरुण पाद्र्याचा पूर्ण स्वच्छ पण अगदी साधाच

पोषाख जेव्हा त्या पाहात त्या प्रत्येक वेळी, “गरीब बिचारा हा मुलगा, कसं काय भागवीत असेल?” असा प्रश्न त्या स्वतःला केल्याशिवाय राहिल्या नाहीत.

दिवस जसजसे गेले तसतसे ज्युलिआँच्या अनेक उणिवांबद्दल धक्का बसण्याऐवजी त्यांना उलट वाईट मात्र वाटू लागले.

मा. रेनॉल ह्या त्या प्रांतात आढळणाऱ्या अशा स्त्रियांपैकी एक होत्या की, एखाद्याला त्यांचा परिचय होऊन सुमारे पंधरवडा होईपर्यंत तो त्यांना मूर्खच समजत असे. त्यांना जीवनाचा कसलाही अनुभव नव्हता. संभाषणकौशल्य संपादण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला नव्हता. निसर्गाने त्यांना हळवे मन आणि गर्वयुक्त ताठर स्वभाव दिलेला होता. सर्वांच्या ठिकाणी नैसर्गिकपणे आढळणारी सुखाची तृष्णा त्यांच्या ठिकाणीही होती. यामुळे चरबट माणसांच्या कृत्याकडे त्या सर्वसाधारणपणे लक्ष देत नसत. पण अशाच असंस्कृत मानवी प्राण्यांच्या सहवासात नियतीने त्यांना फेकले होते.

त्यांना जर मनोव्यापारांचे कमीत कमी शिक्षण मिळाले असते तर मनोव्यापारांचे चापल्य व नैसर्गिकपणा ह्या बाबतीत त्या असामान्य ठरल्या असत्या; पण मोठ्या मालमत्तेची वारसदार या त्यांच्या भूमिकेवरून त्यांचे संगोपन जोगिणींकडून केले गेले होते. ह्या जोगिणी ‘सेक्रेड हार्ट ऑफ जीझसची’ भक्ती अतिशय उत्कट निष्ठेने करीत असत. जेझुइटांचे शत्रू म्हणून फ्रेंचांबद्दल तीव्र द्वेष त्यांच्या मनात जागृत असे; कॉन्व्हेंटमध्ये शिकलेली प्रत्येक गोष्ट असमंजसपणाची, मूर्खपणाची असते म्हणून ती लगेच विसरली पाहिजे हे कळण्यासाठी लागणारी पुरेशी जाण मा. रेनॉल यांच्या ठिकाणी होती. पण जे विसरावे त्याच्या जागी त्यांनी दुसरे काहीच स्थानापन्न केले नव्हते. परिणामी त्यांना कशाचेच ज्ञान झाले नव्हते. एका मोठा संपत्तीच्या, अकालीच प्रौढ झालेल्या वारसदार म्हणून त्यांची खुषामत केली जाई. उत्कट निष्ठेची त्यांची प्रवृत्ती प्रथमपासूनच स्पष्ट लक्षात येई. या दोहोंमुळे त्यांच्यामध्ये, संपूर्णपणे अंतर्मुख असा एक जीवनविषयक दृष्टिकोण निर्माण झालेला होता. मा. रेनॉल प्रत्येक गोष्टीत आपली संपूर्णपणे नमते घेण्याची प्रवृत्ती बाह्यतः दाखवीत असत. स्वतःचे विचार त्या आतच दाबून ठेवीत. (आदर्श वागणुकीचे उदाहरण म्हणून व्हेरिएरमधील नवरे त्यांच्या अशा वागणुकीचा उल्लेख आपल्या बायकांजवळ करीत आणि एम्. द रेनॉलना त्याबद्दल अभिमान वाटे.) पण खरे म्हणजे मा. रेनॉल यांच्या अंतर्जीवनाची प्रेरणा, अत्यंत उच्च कोटीची तुच्छता ही होती. अभिमानाचे प्रतीक म्हणून जिचा उल्लेख केला जावा अशी कोणतीही राजकन्या, आपल्या परिचयाचे सभ्य गृहस्थ तिच्या अवतीभवती जे काय करीत असतील त्याकडे खात्रीने खूपच जास्त लक्ष पुरवीत असेल. पण अतिशय गरीबपणे वागणाऱ्या, विनयशील चेहेऱ्याच्या मा. रेनॉल, त्यांचे पतिराज जे बोलत वा करीत त्याकडे त्या मानाने फारच कमी लक्ष देत. त्यांच्या घरी ज्युलिआँचे आगमन होईपर्यंत त्यांनी खरोखरी आपल्या मुलांशिवाय अन्य कोणांकडे कधीच लक्ष दिले नव्हते. मुलांचे बारीकसारीक आजार, त्यांची सुखदुःखे, आनंद—अडचणी अशाच गोष्टी त्या मानवी जीवाच्या साऱ्या संवेदना व्याप्त करून टाकीत. बेझाँसामधील सेक्रेड हार्ट येथे असताना, आपल्या सबंध जीवनात त्यांनी एका परमेश्वराशिवाय अन्य कोणालाच कधीही पूजनीय स्थान दिले नव्हते.

आपला दर्जा सांभाळण्यासाठी आपल्या भावना, कुणा कनिष्ठ दर्जाच्या व्यक्तीशी त्या बोलून दाखवीत नसत. पण त्यांच्या एका मुलाला ताप आला तेव्हा त्या अशा व्याकुळ मनःस्थितीप्रत पोहोचल्या की जणू काही त्यांचे मूल मृतच झाले आहे! अशा स्वरूपाचे दुःख होऊन ते पतीकडे व्यक्त करण्याची गरज त्यांना भासली की त्यांच्या यजमानांकडून त्याबद्दल नेहमीच जी प्रतिक्रिया दाखविली जात असे ती म्हणजे एक मोठे थोरले

कुचेष्टेचे हास्य, खांदे उडविणे आणि त्याचबरोबर बायकांच्या मूर्खपणाला उद्देशून एखादा हलकासलका शेरा मारणे असा अनुभव लग्नानंतरच्या पहिल्या काही वर्षांत त्यांना सतत आला होता. अशा तऱ्हेचे कुचेष्टेचे, कुटाळ विनोद, विशेषतः मुलांच्या आजाराच्या प्रसंगी नवऱ्याने केले की ते मा. रेनॉल यांचे अंतःकरण एखाद्या सुरीप्रमाणे कापीत जात. त्यांची किशोरावस्था जेझुइट कॉन्व्हेन्टमध्ये गेलेली होती. तेथे त्यांच्या वाट्याला, लाचारीची गोड अशी खुशामत आलेली होती. आता तिच्याऐवजी त्यांना हे असे सगळे बोलणे-वागणे पत्करावे लागत होते. कष्ट, आपत्ती, मानसिक यातना सहन कराव्या लागणाऱ्या शाळेत त्यांचे शिक्षण झाले होते; मन घडले होते; अशा स्वरूपाची आपली दुःखे मा. डेरविलसारख्या आपल्या मैत्रिणीजवळसुद्धा पोटउकला म्हणून बोलणे त्यांना स्वतःच्या मानी, बाणेदार वृत्तीमुळे आवडत नसे. आपले यजमान रेनॉल, म. वालनो आणि सब-प्रिफेक्ट शारको द मोजिरॉं यांच्यासारखेच सगळे पुरुष असतात असे त्यांचे मत त्यामुळे झाले होते. पुरुषवर्ग बूट आणि गरम हॅट जशी एक क्रमप्राप्त नैसर्गिक बाब म्हणून वापरतो त्याचप्रमाणे स्वतःच्या विरुद्ध जाणाऱ्या प्रत्येक मताचा, विधानाचा तो अगदी अंधपणे द्वेष करतो असे त्यांना वाटे. पाचकळ विनोद आणि ज्यापासून पैसा, बढती अथवा सन्मानाचा क्रॉस प्राप्त होण्याची आशा नसते अशा प्रत्येक गोष्टीबद्दल अगदी कठोर भावनाहीनता हीच पुरुषलक्षणे होत अशी त्यांची समजूत अनुभवाने झाली होती.

पैशासाठी धडपडणाऱ्या ह्या क्षुद्र प्राण्यांच्या संगतीत काळ कंठणे मा. रेनॉल यांच्या नशिबी आलेले होते. तथापि इतकी वर्षे गेली तरी अशांशी जुळवून घेण्याची सवय त्यांना स्वतःला लावता आली नव्हती.

आणि म्हणून छोटा शेतकरी ज्युलिॲं त्यांचे मन जिंकण्यात यशस्वी झाला. त्याच्यासारख्या उमद्या व स्वाभिमानी जीवाची सहानुभूती, तिच्यातील नाविन्याच्या उत्फुल्ल मोहकतेमुळे, त्यांना एक गोड सुख देत होती. मा. रेनॉलनी थोड्याच काळात ज्युलिॲंचे आत्यंतिक अज्ञान क्षम्य मानले होते याला कारण म्हणजे ते त्याच्या व्यक्तित्वाचे एक जादा मोहक असे अंग आहे असे त्यांना वाटले होते. त्याच्या वागणुकीतील असंस्कृतता त्यांनी माफ केली होती. त्याचे उठणे-बसणे, बोलणे-चालणे, शिष्टाचार सुधारण्यास त्यांनी त्याला सहाय्य केले होते. ते उभयता अगदी सामान्य गोष्टींबद्दल बोलत असले तरी त्याचे बोलणे ऐकणे त्यांना फार मोलाचे वाटे. एखादे कुत्रे रस्त्यातून जाताना, एखाद्या शेतकऱ्याच्या भराभर चालणाऱ्या गाडीखाली चेंगरले गेले ह्यासारख्या अगदी साधासुध्या विषयावर तो बोलत असला तरीही त्याचे बोलणे ऐकत राहणे त्यांना बरे वाटे. तसे एखादे करुण दृश्य पाहिल्यावर त्यांचे यजमान तर स्वतःचे ठराविक कुचाळखोर हास्य करीत. उलट अशा वेळी ज्युलिॲंच्या कोरीव छानदार, धनुष्याकृती काळ्या भुवया दचकल्यासारख्या होऊन हलकेच वर सरकत. काही दिवसांनंतर मा. रेनॉल यांचे मत असे झाले की, उदारपणा, मानवता आणि मनाचा दिलदारपणा हे गुण फक्त त्या तरुण पाद्र्यामध्येच वसत आहेत; आणि म्हणून त्यांना फक्त त्याच्याबद्दल खूप सहानुभूती व कौतुक वाटू लागले. असे सद्‌गुण सुसंस्कृत व कुलीन व्यक्तींमध्ये जी प्रतिक्रिया निर्माण करतात ती मा. रेनॉल यांच्या मनात ज्युलिॲंबद्दल निर्माण झाली.

ह्या कथेचे स्थळ पॅरिस असते तर मा. रेनॉल व ज्युलिॲं यांच्या संबंधातील ज्युलिॲंचे स्थान अगदी झटकन सोपे होऊन गेले असते. पण पॅरिसमध्ये प्रेमाचा जन्म कथा-कादंबऱ्यांतून होतो. हा तरुण शिक्षक आणि त्याची भीरू मालकीण त्यांना तीन-चार कादंबऱ्यांत आणि जिम्नाजच्या भावगीतातही त्या दोघांतील संबंधाचे शाब्दिक चित्र अगदी स्पष्टपणे आढळले असते. त्यांनी कोणती भूमिका स्वीकारावी, कोणता आदर्श अनुसरावा याचेही दिग्दर्शन त्यांना त्यात उपलब्ध झाले असते; आणि कधी ना कधी तरी त्यातील त्या आदर्शाने, ज्युलिॲंला, त्यायोगे थोडेही सुख लाभणार नसते व कदाचित त्याची नाखुषी असती तरीही त्याला त्याच्या स्वतःबद्दलच्या पोकळ अभिमानामुळे त्याचा अवलंब करण्यास भाग पाडले असते.

आव्हेराँ किंवा पिरेनेमधल्या एखाद्या छोट्या गावी अगदी लहानसा प्रसंगसुद्धा, तेथील हवापाण्यातील उत्साहजनक जोमामुळे निर्णायक बनला असता. पण आमच्या उदासीन, अनुत्साही आभाळाखाली काही तसे घडत नाही. एक निष्कांचन तरुण, तीस वर्षे वयाच्या एका महिलेच्या दैनंदिन सहवासात आलेला आहे; तो महत्त्वाकांक्षी आहे व त्याचे एकमेव कारण असे की, स्वतःच्या स्वभावधर्माच्या सुसंस्कृतपणामुळे त्याला अशा काही सुखांची गरज आहे की, जी पैशांमुळे प्राप्त होतात. ती स्त्री खरोखरी सद्‌गुणी आहे. आपल्या मुलांबाबतच्या कर्तव्यात ती सदा गढलेली असते. कसे वागावे याचे धडे घेण्यासाठी ती कादंबऱ्या कधीच वाचीत नाही. इथे प्रत्येक गोष्ट संथ लयीत चालू असते; बाजूला पडलेल्या या प्रांतातून कोणतीही घटना पायरीपायरीने घडत जाते आणि जीवन अधिक नैसर्गिक असते.

ज्या ज्या वेळी मा. रेनॉल यांच्या मनात त्या तरुण शिक्षकाच्या गरिबीबद्दलचे विचार येत तेव्हा वाईट वाटून त्यांना रडू येई. ज्युलिआँने एक दिवस त्यांना प्रत्यक्ष रडतानाच पाहिले. तो म्हणाला,

“बाईसाहेब, तुम्हांला एखादी वाईट बातमी कळलेली दिसते!”

“नाही, काही नाही, माझ्या मित्रा.” असे उत्तर त्यावर त्यांनी दिले व ज्युलिआँला त्या म्हणाल्या, “मुलांना बोलवा. चला, आपण फिरायला जाऊ या.” त्यांनी त्याचा दंड धरला आणि त्याच्या बाहूवर त्या अशा रीतीने टेकल्या की ज्युलिआँला ते चमत्कारिक वाटले. “माझ्या मित्रा,” म्हणून त्यांनी त्याला संबोधण्याची ती पहिलीच वेळ होती.

काही तरी भावनेने त्यांच्या गालांवर दाट लाली चढत आहे ही गोष्ट फिरण्याच्या अखेरीस ज्युलिआँच्या लक्षात आली. त्यांनी आपल्या चालण्याची गती मंद केली होती. त्याच्याकडे न पाहता त्या म्हणाल्या, “तुम्ही ऐकलंच असेल की बेझाँसाला राहात असलेल्या एका फार श्रीमंत मावशीची मी एकटी वारस आहे. भेटी पाठवून ती मला बेजार करीत असते... माझी मुलं अशी आश्चर्यकारक प्रगती करीत आहेत की... माझ्या कृतज्ञ भावनेचं निदर्शक म्हणून तुम्ही एखादी छोटी भेट स्वीकाराल का, असं तुम्हांला विचारावंसं वाटतं. तुम्हाला कपडे करण्याकरिता काय थोडीच रक्कम लागेल. पण...” मघापेक्षा त्या आता अधिकच लाल झाल्या आणि गप्प बसल्या.

“काय बाईसाहेब?” ज्युलिआँ म्हणाला. स्वतःचे मस्तक लववीत त्यावर मा. रेनॉल म्हणाल्या, “पण याबद्दल माझ्या यजमानांकडे बोलणे अनावश्यक आहे.”

“मी गरीब असेन बाईसाहेब, पण मी हलक्या दर्जाचा नाही.” चालणे थांबवीत ज्युलिआँ म्हणाला. रागाने त्याचे डोळे लाल झाले होते. अभिमानाने तो अगदी पूर्ण ताठ उभा राहिला व म्हणाला,

“हा एक असा मुद्दा आहे की, ज्याचा पुरेसा विचार तुम्ही केलेला नाही. ‘माझ्या पैशा’ संबंधीची कोणतीही गोष्ट मी जर मंस्यूर द रेनॉल यांच्यापासून लपवून ठेवायची म्हटलं तर एखाद्या चपराशापेक्षाही मी हलक्या दर्जाचा ठरेन.”

मा. रेनॉल हे ऐकून चपापल्या. अगदी हबकून गेल्या. ज्युलिआँ पुढे बोलत राहिला,

"तुमच्या घरी राहायला आल्यापासून महापौरांनी मला पाच वेळा छत्तीस फ्रँक दिले आहेत. मी माझं खातेपुस्तक त्यांना किंवा इतर कोणालाही दाखवायला तयार आहे. माझा द्वेष करणाऱ्या म. वालनोलासुद्धा ते दाखवायची माझी तयारी आहे."

ज्युलिआँच्या भावनेचा हा असा स्फोट पाहून मा. रेनॉल थरथरल्या, फिक्या पडल्या. उभयतांपैकी कोणालाही संभाषण पुन्हा सुरू करण्यासाठी काही सबब सापडण्यापूर्वीच त्यांचे फिरणे संपुष्टात आले. ज्युलिआँच्या स्वाभिमानी अंतःकरणात मा. रेनॉलविषयी प्रेमभावना उद्भवणे ही गोष्ट अधिकाधिक अशक्य झाली. त्यांच्या परीने त्या त्याला आदर दाखवीत होत्या, चाहत होत्या. त्याच्याकडून त्यांचा पाणउतारा झाला होता. त्याच्याकडून अभावितपणे झालेल्या त्याच्या मानखंडणेची चूक सुधारण्याच्या मिषाने त्यांनी त्याच्याकडे खूप हळुवारपणे अधिक लक्ष पुरविण्याची सूट स्वतःला दिली. या नवीन उपक्रमामुळे एक आठवडाभर त्यांना बरे वाटले. ज्युलिआँचा राग शमविण्याचा त्यांचा हा अनुनय काही अंशी सफल झाला. मात्र, या वागणुकीत वैयक्तिक प्रेमासारखे काही असेल अशी जाणीव त्याला तिळमात्र झाली नाही.

तो स्वतःशी बोलला, "श्रीमंत लोक हे असेच असतात. आधी ते एखाद्याचा अवमान करून त्याला खाली पाहायला लावतात आणि मग काही माकडचेष्टा करून सगळे ठीक करता येईल असे त्यांना वाटते."

मा. रेनॉल यांचे अंतःकरण भावनाशीलतेने ओतप्रोत भरले होते. पण अजूनही ती भावना त्यांच्या दृष्टीने निर्मळच होती. त्यामुळे नवऱ्याला यातले काहीच सांगायचे नाही असा निश्चय त्यांनी केलेला असूनसुद्धा, त्यांनी आपण ज्युलिआँला देऊ केलेली भेट व त्याने दिलेला झणझणीत नकार नवऱ्यापाशी सांगितला. त्यावर अत्यंत चिडून महापौरांनी उद्गार काढले,

"काय? तुझ्या 'नोकराने' दिलेला नकार तू सहन करू शकलीस?" त्यांनी वापरलेल्या त्या 'नोकर' शब्दाबद्दल मा. रेनॉलनी निषेध व्यक्त करताच ते पुन्हा म्हणाले, "ख्रिस्तवासी प्रिन्स द कॉन्दे बोलला तेच मी सांगत आहे, बाईसाहेब. आपल्या नववधूला घरातील कारभाऱ्यांची ओळख करून देताना तो म्हणाला होता, "हे सगळे लोक आपले नोकर आहेत." बेझांवालच्या मेग्वारमधून मी तुम्हांला एक उतारा वाचून दाखवितो. नोकरांचा लहानमोठा दर्जा ठरविण्याच्या बाबतीत तो फार आवश्यक आहे. जो 'सभ्यगृहस्थ' नसतो, जो तुमच्या घरात राहतो आणि ज्याला पगार दिला जातो असा प्रत्येक माणूस तुमचा नोकर असतो. मी आता ह्या मास्टर ज्युलिआँशी थोडं बोलतो आणि त्याला शंभर फ्रँक देतो."

मा. रेनॉल थरथर कापत बोलल्या, "पण गडे, कृपा करून नोकरांच्या समक्ष त्यांच्याशी असं काही बोलू नका ना."

"होय, त्यांना त्याचा साहजिकच मत्सर वाटेल." आणि किती मोठी रक्कम द्यावी याबद्दल विचार करीत ते खोलीतून बाहेर पडले.

मा. रेनॉल खचल्या आणि मटकन खुर्चीत बसल्या. दुःखाच्या आवेगाने त्यांना जवळजवळ मूर्च्छा येत होती. "हे आता ज्युलिआँचा अपमान करणार आहेत आणि तो दोष माझा आहे." आपल्या नवऱ्याची त्यांना घृणा वाटली. त्यांनी स्वतःचे तोंड आपल्या हातांनी झाकून घेतले. विश्वासात घेऊन येथून पुढे नवऱ्याला काही एक सांगावयाचे नाही असा निश्चय त्यांनी स्वतःच्या मनाशी केला.

त्यानंतर जेव्हा ज्युलिआँशी त्यांची भेट झाली तेव्हा त्यांचे सबंध शरीर थरथरत होते. त्यांची छाती एवढी दडपून गेली होती की, त्यांच्या तोंडावाटे धड एखादा शब्दसुद्धा बाहेर पडेना. अशा कातर अवस्थेत त्यांनी ज्युलिआँचे हात आपल्या हाती घेतले आणि ते आवेगाने दाबले. काही क्षणांनी त्यांनी त्याला विचारले,

"हे बघा मित्र, माझ्या यजमानांचे वर्तन तुम्हांला आवडले का?" कडवटपणे स्मित करीत ज्युलिआँ म्हणाला, "का नाही आवडणार? त्यांनी मला शंभर फ्रँक दिले आहेत ना." मा. रेनॉलनी त्याच्याकडे पाहिले; पण काय करावे हेच त्यांना समजेनासे झाले.

"तुमच्या बाहूचा आधार जरा मला द्या बरं." आतापर्यंत मा. रेनॉल यांच्या ठिकाणी ज्युलिआँला एवढा धीटपणा कधीच आढळला नव्हता.

मा. रेनॉल पुस्तकांच्या एका दुकानात शिरल्या. लिबरल म्हणून व्हेरिएरमध्ये त्या दुकानदाराचा भयंकर बदलौकिक होता. तरी त्यांनी तेथे जाण्याचे साहस केले. तेथे त्यांनी दहा लुई किंमतीची पुस्तके निवडली, ती त्यांनी आपल्या मुलांना दिली. पण ती पुस्तके ज्युलिआँला त्याच्या उपयोगासाठी पाहिजे होती हे त्यांना ठाऊक होते. आपल्या प्रत्येक मुलाने त्याला देण्यात आलेल्या पुस्तकावर स्वतःचे नाव लिहावे असा आग्रह त्यांनी तेथे दुकानातच धरला. अंगी धैर्य आणून, आपण ज्युलिआँला अंशतः भरपाई करून दिली याबद्दलचा आनंद एकीकडे त्या उपभोगीत होत्या. त्याच वेळी ज्युलिआँ त्या दुकानातल्या फळ्यांवरील भरपूर पुस्तके पाहून विस्मयाने चकित झाला होता. इतक्या अधार्मिक स्थळी पाऊल टाकण्याचे धाडस त्याने कधी केले नसते. त्यामुळे आता त्याच्या छातीचे ठोके जोराने पडू लागले होते. मा. रेनॉल यांच्या अंतःकरणात कोणत्या विचारांचे मंथन चालू असावे याची अटकळ करण्याचे त्याच्या डोक्यात अजिबात आले नाही. त्याच्या मनाने दुसऱ्याच एका वेगळ्या चिंतनात बुडी मारली होती. धर्मविषयक अभ्यास करणाऱ्या त्याच्यासारख्या तरुण विद्यार्थ्याला तेथे असलेल्या पुस्तकांपैकी काही पुस्तके मिळविणे कसे शक्य होईल याचा विचार तो करू लागला होता. अखेर त्याला एक कल्पना सुचली. एम्. द रेनॉल यांचे मन चातुर्याने वळविल्यास ती गोष्ट जमण्यासारखी आहे असे त्याला वाटले. त्या प्रांताचे जे रहिवासी, सुप्रसिद्ध म्हणून गाजले होते त्यांच्या जीवनावर निबंध लिहिण्याचा अभ्यास मुलांना देणे आवश्यक आहे असे त्यांना सांगण्याचे त्याने ठरविले. सुमारे महिनाभर काळजीपूर्वक तयारी करून घेतल्यावर स्वतःची ती कल्पना इतकी यशस्वी ठरत आल्याचे त्याला आढळून आले की, त्यानंतर थोड्याच दिवसांनी एम्. द रेनॉल यांच्यापुढे दुसऱ्या एका गोष्टीचे सूतोवाच करण्यास तो धजावला. ती गोष्ट त्या उच्च घराण्यातल्या महापौराला जास्त वावगी वाटण्यासारखी होती. कारण ग्रंथालयाची वर्गणी भरून एका उदारमतवाद्याच्या चलतीला हातभार लावण्याची ती बाब होती. रेनॉल यांचा सर्वांत थोरला मुलगा पुढे लष्करी शाळेत दाखल होईल तेव्हा संभाषणाद्वारा ज्या विविध ग्रंथांचे उल्लेख त्याच्या कानांवरून जातील त्या ग्रंथांची तोंडओळख त्याला आधी करून दिली जाणे हे शहाणपणाचे असल्याचे रेनॉलना सर्वस्वी मान्य होते. पण त्या मर्यादेपलीकडे जाण्याचे महापौरांनी साफ नाकारले. या हट्टामागे कदाचित एखादे गुप्त कारण असावे अशी शंका ज्युलिआँला आली. पण त्याबद्दल त्याला निश्चित अंदाज करता येईना. एक दिवस तो महापौरांना म्हणाला, "साहेब, रेनॉल कुटुंबातील सन्माननीय सद्‌गृहस्थांच्या नावांची नोंद ग्रंथपालाच्या घाणेरड्या नोंदपुस्तकात केली जावी ही गोष्ट फार अनुचित होय असा विचार माझ्या मनात येत होता." यावर एम्. द रेनॉल यांचा चेहेरा उजळला. ज्युलिआँ अधिक नम्रतेने पुढे बोलू लागला.

“ईश्वरविषयक आध्यात्मिक अभ्यास करणाऱ्या एका गरीब विद्यार्थ्याचे नाव, ग्रंथालय चालविणाऱ्या पुस्तकविक्रेत्याच्या नोंदपुस्तकात समाविष्ट असल्याचे एखाद्या दिवशी निदर्शनास यावे हे त्याच्या बदनामीस कारण होईल. पुस्तके तेथून वाचायला घेतल्याचा आरोप लिबरल मंडळी कदाचित माझ्यावर करतील. काय नेम सांगावा? तसला घाणेरडा मजकूर असलेली, विपर्यस्त पुस्तकांची नावे माझ्या नावापुढे, तेथल्या नोंदपुस्तकात लिहिण्याइतपतही त्यांची मजल पुढे जाईल.”

पण ज्युलिआँची गाडी रुळापासून बाजूला जाऊ लागली होती. महापौरांच्या चेहेऱ्यावर अवघडलेपणा व अप्रसन्नतेची छटा त्याला पुन्हा दिसून आली. तो गप्प बसला आणि स्वतःशी मनात म्हणाला, “मासा गळाला लागला बरं का.”

काही दिवसांनंतरची गोष्ट. सर्वांत थोरला मास्टर आदोल्फ याने एका पुस्तकाची जाहिरात एका नियतकालिकात वाचल्यावर त्या पुस्तकाबद्दल ज्युलिआँला प्रश्न विचारला. त्या वेळी महापौर तेथेच होते. त्यांना उद्देशून ज्युलिआँने उत्तर दिले,

“जॅकोबिन पक्षाला विजय मिळाल्याचा डौल मिरविण्याची संधी देण्याचे टाळण्यासाठी आणि त्याच वेळी मास्टर आदोल्फच्या प्रश्नांना मला उत्तरे देता येण्यासाठी, आपल्या नोकरांपैकी एका अगदी कनिष्ठ नोकराच्या नावाने ग्रंथालयाची वर्गणी भरणे सुरू करावे असे मला वाटते.”

“ही काही अगदीच वाईट कल्पना नाही.” एम्. द रेनॉल उघडउघड आनंदून म्हणाले.

आपल्या मनात दीर्घकाळ असलेल्या योजनांना यश लाभत आहे असे जेव्हा दिसते तेव्हा काही लोकांच्या बोलण्यात एक वैशिष्ट्यपूर्ण गंभीर व जवळजवळ उदास भाव निर्माण होतो व तो त्यांना शोभतोही. ज्युलिआँचे तसेच झाले. तो म्हणाला,

“फक्त एवढंच स्पष्ट करून ठेवावं लागेल की तेथून नोकराने कुठल्याही कादंबऱ्या घ्यायच्या नाहीत. एकदा का तशी धोकेबाज पुस्तके घरात आली की कदाचित मा. रेनॉल यांच्या दासींना ती बिघडवतील; मग खुद्द नोकरांबद्दल काय बोलावे?”

त्यावर एम्. द रेनॉल कुर्रेबाज आवाजात म्हणाले, “राजकीय स्वरूपाच्या चोपड्यांचा उल्लेख करायला तुम्ही विसरलात.” आपल्या मुलांच्या शिक्षकाने ग्रंथालयाच्या बाबतीत चतुरपणे काढलेला तडजोडीचा मार्ग पाहून त्याच्याबद्दल वाटलेले कौतुक छपविण्याची त्यांची इच्छा होती.

ज्युलिआँचा तेथील जीवनक्रम अशा अनेक लहान-सहान वाटाघाटींच्या घटनांनी भरला होता. त्यांच्यातील यश त्याला फार महत्त्वाचे वाटत होते. मा. रेनॉल यांच्या अंतःकरणात त्याच्याबद्दल जी विशेषच आवड उत्पन्न झाली होती ती त्याने नीट लक्ष दिले असते, तर त्याला ताबडतोब कळली असती. पण त्या गोष्टीचे त्याला काहीच महत्त्व वाटत नव्हते.

ज्या नैतिक परिस्थितीत त्याला आपले आजवरचे आयुष्य काढावे लागले होते. तिची पुनरावृत्ती व्हेरिएरच्या माननीय महापौरांच्या घरच्या वातावरणात झाली होती. त्याच्या वडिलांच्या लाकूड-कापणीच्या

गिरणीत त्याला ज्यांच्याबरोबर राहावे लागत होते त्यांचा त्याला फार तिरस्कार वाटे व ते लोक त्याचा तिरस्कार करीत. येथेही अगदी तीच स्थिती होती. म. वालनो, सब-प्रिफेक्ट आणि त्या कुटुंबाचे इतर मित्र यांच्या कल्पना वास्तवाच्या स्वरूपापासून किती दूरस्थ असत, हे त्यांच्या डोळ्यांसमोर अलीकडेच घडलेल्या गोष्टींच्या संदर्भात ते जी विधाने करीत त्यावरून रोज त्याला कळून येत होते. ज्युलिआँला एखादी कृती प्रशंसनीय, आकर्षक वाटली की, तिला हे आजूबाजूचे लोक नेमका दोष देत. तो उघडपणे प्रतिवाद करीत नसे. पण मनातून त्यांना तो 'राक्षस, मूर्ख' म्हणत असे आणि गमतीची गोष्ट अशी की स्वतःच्या शहाणपणाबद्दल त्याला खूप अभिमान असूनही, त्यांच्या ज्या चर्चा चालत त्यांच्यातील काही त्याला कधी कळतच नसे.

नेपोलिअनच्या इटलीवरील स्वाऱ्या किंवा शल्यचिकित्सा या विषयाबद्दलचे त्याचे काही विचार ज्युलिआँ आजवरच्या त्याच्या आयुष्यात एका म्हाताऱ्या सर्जन-जनरलशिवाय इतर कोणाजवळही कधीच प्रांजलपणे बोलला नव्हता. अतिशय क्लेशदायक शस्त्रक्रियांच्या (अथवा त्या स्वाऱ्यांच्या) बारीकसारीक तपशिलात त्याच्या तारुण्यसुलभ धैर्यप्रवृत्तीला मौज वाटत असे. "मी तेव्हा मुळीसुद्धा कच खाल्ली नसती" असे तो स्वतःला सांगत असे.

जेव्हा प्रथम मा. रेनॉल यांनी, आपल्या मुलांच्या शिक्षणाशिवाय अन्य विषयावर त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याने शस्त्रक्रियांबद्दल बोलणे सुरू केले. परिणाम असा झाला की, मा. रेनॉल यांचा चेहरा फिका पडला आणि कृपा करून तो विषय थांबविण्याची याचना त्यांनी ज्युलिआँकडे केली.

एवढ्या गोष्टीशिवाय ज्युलिआँला आणखी कोणत्याच विषयाची माहिती नव्हती; आणि म्हणून जेव्हा तो व मा. रेनॉल असे फक्त दोघेजणच एकत्र येत तेव्हा एक अतिशय चमत्कारिक स्तब्धता निर्माण होऊ लागली. त्याची चालचलणूक नम्रतेची असली तरी ज्युलिआँच्या डोळ्यांत, त्या घरी येणाऱ्या प्रत्येकापेक्षा अधिक बौद्धिक श्रेष्ठतेची झाक, तो मा. रेनॉल यांच्या बैठकीच्या खोलीत इतरांबरोबर असे तेव्हा त्यांना आढळून येई. त्याच्या सहवासात त्या क्षणभरही एकट्या असल्या की मात्र त्याला उघड उघड अवघडल्यासारखे होऊ लागे, असे त्यांना कळून येई. या गोष्टीचा त्यांना उलगडा होत नसे. कारण त्याला वाटणारा तो अवघडलेपणा किंचितसुद्धा शृंगारिक वा प्रणयविषयक नसे हे त्यांना स्त्रीसुलभ अंतःप्रेरणेने जाणवे.

ज्युलिआँ जेव्हा जेव्हा एखाद्या ठिकाणी स्त्रीच्या सहवासात येई तेव्हा, म्हाताऱ्या सर्जन मेजरने केलेल्या चांगल्या समाजाच्या वर्णनाच्या आठवणीने त्याच्या मनात काही विचार उद्‌भवत; आणि जेव्हा त्याचे त्या स्त्रीशी चालणारे संभाषण थांबे तेव्हा त्या स्तब्धतेचा दोष जणू काही आपल्याकडेच आहे असे वाटून तो ओशाळा होई. ते दोघे एकटेच असले म्हणजे ही भावना त्याला शंभर पटींनी जास्त क्लेशदायक होई. पुरुष स्त्रीच्या सहवासात एकटाच असला म्हणजे त्याने तिच्याशी काय बोलले पाहिजे याबाबत ज्युलिआँची कल्पनाशक्ती अतिशय बेताल अशा स्पॅनिश विचारांनी भरलेली असे. त्याच्या चित्तक्षोभात ती त्याला दुसरे-तिसरे काही नव्हे तर फक्त अग्राह्य विचारच सुचवीत असे. त्याचा आत्मा ढगात भ्रमंती करी आणि असे असूनही त्याला ती ओशाळवाणी स्तब्धता नष्ट करता येत नव्हती. यामुळे मा. रेनॉल व त्यांची मुले यांच्याबरोबर तो लांब दूरपर्यंत फिरायला जाई तेव्हा त्याची मुद्रा उग्र, त्याच्या असह्य मनस्तापाने जास्तच कठोर वाटे. तो हिडीसपणे स्वतःचा तिरस्कार करी आणि अशा वेळी त्याने चुकून बोलण्याचा प्रयत्न केलाच तर त्याच्या तोंडातून अगदी हास्यास्पद अशा गोष्टी बाहेर पडत. स्वतःची हास्यास्पद वागणूक त्याला समजे; कधी तो वाजवीपेक्षा तिचे जास्त अवडंबर करी व मग जास्तच कष्टी होई. पण स्वतःच्या डोळ्यांतले भाव मात्र

अनुक्रमणिका

अर्थातच त्याला कळत नसत; दिसतही नसत. त्याचे डोळे इतके सुंदर होते आणि त्याच्या अंतरात्म्याचे तेज ते इतक्या योग्य रीतीने व्यक्त करीत की, एखाद्या कसबी नटाप्रमाणे ते कधीकधी अर्थहीन गोष्टींना छानदार अर्थपूर्णता असल्याचे दाखवीत.

मा. रेनॉल यांच्या लक्षात आले होते की, तो जेव्हा एकटाच त्यांच्याबरोबर असतो तेव्हा अकस्मात काही तरी, अनपेक्षित घडून तो विचलित झाल्याशिवाय इतर कोणत्याही वेळी, स्वतःच्या व्यक्तित्वाचे असे सुंदर दर्शन तो घडवीत नसे. त्यांची प्रशंसा युक्तीने करावी असा विचार त्याच्या मनात कधीच डोकावत नसे. रेनॉल कुटुंबाच्या मित्रांनी मा. रेनॉल यांच्या मनात नव्या व चमकदार कल्पना भरवून देऊन ते बिघडविले नव्हते आणि त्यामुळे ज्युलिआँच्या बुद्धीच्या तेजाची जी अनुभूती त्यांना येत असे तिच्यामुळे त्या आनंदून जात.

नेपोलिअनचा पाडाव झाल्यापासून तेथील लोकांच्या शिष्टसंमत, प्रादेशिक आचारसंहितेतून प्रशंसात्मक भासणारी सारी चाटुवचने संभाषणातून करडेपणाने घालवून देण्यात आली आहेत. आपल्या नोकऱ्या गमाविल्या जातील की काय अशी भीती लोकांना वाटत आहे. भल्याबुऱ्याचा विधिनिषेध न बाळगणारे काँग्रेगेशनचा आधार घेत आहेत. आणि उदारमतवादी वर्गातही सर्वांत जास्त ढोंगीपणा उजळ माथ्याने मिरवत आहे. सुस्तपणा व औदासीन्य वाढले आहे. वाचन व शेतीखेरीज करून कशातच कसले स्वारस्य, रुची उरलेली नाही.

मा. रेनॉल ह्या त्यांच्या एका धार्मिक वृत्तीच्या मावशीच्या श्रीमंत वारस होत्या. वयाच्या सोळाव्या वर्षी एका भल्या लायक गृहस्थाशी त्यांचे लग्न झाले. आपल्या आयुष्यात त्यांनी आतापर्यंत प्रणयाशी थोडेही साधर्म्य असलेली कोणतीच गोष्ट पाहिली, अनुभवलेली नाही. ज्यांच्याजवळ त्या स्वतःच्या पापपुण्याचा आढावा देत ते भले पाद्री शॅलाँ हे जवळजवळ एकच गृहस्थ असे होते की, जे त्यांच्याजवळ कधीकाळी प्रेमाबद्दल बोलले होते; व तेही म. वालनो करीत असलेल्या प्रेमविषयक लागटपणाच्या संदर्भात; आणि शॅलाँ यांनी नंतर त्यांच्यासमोर प्रेमाचे असे एक घृणास्पद चित्र काढले होते की 'प्रेम' म्हणजे एक अगदी हीनतम अशी अनैतिकता होय, यापेक्षा अन्य कोणतीही कल्पना त्यांना प्रतीत झाली नव्हती. प्रसंगवशात त्यांच्या पाहण्यात आलेल्या काही अगदी थोड्या कादंबऱ्यांत त्यांना प्रेम आढळून आले होते; त्यावरून त्यांनी अशी कल्पना केली होती की प्रेम हे अगदी अपवादात्मक असते अथवा ते निसर्गापासून अगदी दूर वेगळे असे असते. या अज्ञानामुळे मा. रेनॉल ज्युलिआँबद्दलच्या विचारांनी त्यांचे मन सतत व्यापृत झालेले होते तरी त्यासाठी स्वतःची यत्किंचितही निर्भर्त्सना करावी असे त्यांना वाटले नाही; उलट त्या विचाराने त्यांना अत्यंत सुख होत होते.

★ ★ ★

अनुक्रमणिका

## प्रकरण आठवे

# बारीकसारीक घडामोडी

मा. रेनॉल यांना स्वतःच्या स्वभावगुणांमुळे व त्याचप्रमाणे त्यांच्या वर्तमान सुखामुळे स्वर्गसुखाची जी प्रसन्नता प्राप्त झालेली होती तिच्यात खंड पडेतो त्यांची नोकराणी एलिसा हिच्याबद्दलचे विचार त्या करीत तेव्हा तरुण एलिसाला संपत्तीचा वडिलोपार्जित वारसा मिळाला होता. नेहमीप्रमाणे पापांचा कबुलीजबाब देण्यासाठी ती पाद्री शॅलाँकडे गेली. तेव्हा ज्युलिआँशी विवाह करण्याचा तिचा विचार तिने शेलाँजवळ प्रकट केला. आपला मित्र ज्युलिआँ याचे भाग्य या प्रकारे उजळत आहे याबद्दल शॅलाँना खरोखरीच आनंद झाला; पण त्याहीपेक्षा त्यांना जास्त आश्चर्य वाटले ते ज्युलिआँच्या निश्चयी नकाराचे! एलिसाची ती विनंती मुळीच स्वीकारता येत नसल्याने ज्युलिआँने शॅलाँना कळविले होते.

तेव्हा त्यावर नाराज होऊन ते ज्युलिआँना म्हणाले, “माझ्या मुला, तुझ्या अंतःकरणात जे चालले आहे त्याकडे नीट लक्ष दे. तू स्वीकारणार असलेल्या धर्मोपदेशकाच्या पवित्र व्यवसायामुळेच जर तुझा, या वाजवीपेक्षा पुष्कळच फायदेशीर असलेल्या प्रस्तावाला नकार असेल तर मग मी तुझे अभिनंदनच करतो. छप्पन्न किंवा त्यापेक्षा जास्त वर्षे व्हेरिएरचा पाद्री म्हणून मी काम करीत आलो आहे; आणि तरीही त्या पदाला मला आंचवावे लागणार आहे असे दिसत आहे. मला आठशे लिरांचे उत्पन्न असले तरी ही गोष्ट माझ्या मनाला क्लेश देते. मी तुला ही विशिष्ट माहिती सांगत आहे याचा उद्देश असा की, ह्या पाद्र्याच्या व्यवसायात भविष्यकाळी तुझ्या नशिबात काय येईल ह्याबद्दल तू कोणत्याही भ्रामक कल्पना बाळगू नयेस. अधिकार हाती असलेल्या लोकांची मर्जी सांभाळून राहण्याचा विचार तू करशील तर तुझा कायमचा नाश झाला हे पक्के समजून राहा; नशीब काढून तू कदाचित श्रीमंत होशीलही पण त्यासाठी तुला गोरगरीब अन् गरजवंत यांचे नुकसान करावे लागेल; सब-प्रिफेक्ट महापौर यांची खुशामत करावी लागेल. प्रत्येक महत्त्वाच्या माणसाची हांजी हांजी करून त्याच्या वासनालोभाला खाद्य पुरवावे लागेल. जगात अशाच वागणुकीला जगण्याची कला म्हटले जाते. धर्माव्यतिरिक्त व्यवसाय करणाऱ्या माणसाच्या बाबतीत ती मुक्तिमार्गाशी पूर्णतः विसंगत नसेल; पण आपल्या ह्या व्यवसायात आपल्याला निवडानिवड करावी लागत असते. आपल्याला आपले नशीब एक तर ह्या जगात, नाही तर वरच्या जगात काढावे लागते. त्यात अन्य एखादा मधला मार्ग नसतो. माझ्या प्रिय मित्रा, जा, नीट विचार कर आणि तीन दिवसांत निश्चित उत्तरासह ये. धर्मोपदेशकाला आवश्यक असलेला ऐहिक लाभांचा संपूर्ण त्याग व संयम तुझ्या अंगी असल्याचे माझे मन मला सांगत नाही. कारण तुझ्या स्वभावात सुप्त असा एक धुमसता भावनावेग आहे हे पाहून मला वाईट वाटते. तुझी बुद्धी लक्षात घेऊन तुझ्या भविष्याबद्दल मला मोठा विश्वास वाटतो. पण मला मोकळेपणाने सांगायचं आहे की...” आणि हे बोलत असता त्या भल्या पाद्र्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. तो पुढे म्हणाला, “ह्या पाद्राच्या व्यवसायात तुला मोक्ष प्राप्त होईल की नाही याबद्दल मला भयापोटी तीव्र चिंता वाटेल.”

ज्युलिआँला भरून आले. त्याला स्वतःच्या भावविवशतेची लाज वाटली. आपल्यावर कुणी तरी प्रेम करीत आहे, ही गोष्ट त्याच्या जीवनात त्याला प्रथमच आढळली. त्या आनंदाने त्याला रडू आले. आपले अश्रू लपविण्यासाठी तो व्हेरिएरच्या वरच्या बाजूच्या दाट रानात गेला.

शेवटी त्याने स्वतःला विचारले, “मी ह्या स्थितिप्रत का येऊन पोहोचलो आहे? मला असं वाटतं की, त्या भल्या पाद्री शॅलाँसाठी शंभरदा आपलं आयुष्य वेचावं; आणि तरीही मी केवळ एक पढतमूर्ख आहे हे

अनुक्रमणिका

नुकतेच त्याने मला सिद्ध करून दाखवलं आहे! पण सगळ्यांत आधी मला कुणाला चकवायचं असेल तर ते त्यालाच आणि तो तर माझ्या अंतरंगातल्यासुद्धा सगळ्याच गोष्टी जाणतो. तो सुप्त उत्कट उत्साह माझ्यामधे आहे म्हणून तो म्हणालां त्याच्याच आधाराने मी माझ्या भावी जीवनात ऊर्जितावस्था साधणार आहे. पाद्री होण्यास मी लायक नाही असं त्याला वाटतं आणि त्याच क्षणी मी कल्पना करीत होतो की पन्नास लुई मिळकतीचा त्याग मी केल्यास माझी धर्मनिष्ठा व माझ्या पवित्र व्यवसायाबद्दलचे माझे प्रेम यांच्याबद्दल त्याचे फार उत्कृष्ट मत होईल!"

ज्युलिआँ स्वतःशी असाच आणखी विचार करीत राहिला. "माझ्या स्वभावातील ज्या गोष्टींची मी खात्री करून घेतली आहे त्यांच्यावरच फक्त येथून पुढे मी अवलंबून राहणार आहे. अश्रू ढाळीत बसण्यात मी सुख मानीन असं कोणी कधी तरी म्हटलं असतं का? तसंच मी एक मूर्ख आहे, असं जो मला सिद्ध करून दाखवू पाहतो त्याच्यावर प्रेम करीन असंही कोणाला कधी वाटलं असेल का?"

तीन दिवसांनंतर ज्युलिआँला एक निमित्त सापडले. स्वसंरक्षणास्तव त्याने त्याचा आधार यापूर्वीच घ्यायला हवा होता. हे निमित्त एक मिथ्यादूषण होते. पण त्याचे काय एवढे? बरीच कांकू केल्यावर त्याने शॅलाँजवळ कबूल केले की एलिसाच्या विवाहाबद्दलच्या विनंतीला पहिल्यापासून नकार देण्यामागे एक कारण होते व ते तो स्पष्ट सांगू शकत नव्हता. कारण त्यामुळे उघड होणाऱ्या गोष्टी एका तिसऱ्या व्यक्तीला अपायकारक ठरण्यासारख्या होत्या. ज्युलिआँचा हा कबुलीजबाब एलिसाच्या वर्तनावर जवळजवळ दोषारोप करणारा होता. त्याच्या ह्या निवेदनपद्धतीत शॅलाँने एक प्रकारचा आवेश हेरला. तथापि तो पूर्णतः ऐहिक स्वरूपाचा होता; आणि एखाद्या तरुण लेव्हाइटला (ज्यू पाद्र्याला) ज्यामुळे प्रेरणा दिली जावी त्यापेक्षा अगदी भिन्न होता.

पाद्री शॅलाँने ज्युलिआँला पुन्हा आवाहन केले, "माझ्या मित्रा, आपल्या व्यवसायाच्या पवित्रतेची कदर नसलेल्या पाद्र्यापेक्षा तू एक सुशिक्षित, आदरणीय आणि प्रामाणिक असा सुखवस्तू शेतकरी राहा."

शॅलाँच्या ह्या ताज्या कानउघाडणीसारख्या वक्तव्यांना ज्युलिआँने अगदी योग्य शब्दांत चपखळ जबाब दिले. अभ्यासवर्गातील एखादा तरुण, उत्साही प्रशिक्षार्थी जे शब्दप्रयोग करील, अथवा वाक्प्रचार वापरील तशी वाक्ये ज्युलिआँने तडातड फेकली. पण ज्या आवाजात व विशिष्ट सूर काढून तो बोलला त्यामुळे आणि स्वतःच्या नजरेतील धुमसता अंगार तो योग्य तऱ्हेने छपवू न शकल्यामुळे म. शॅलाँ भयचकित झाले.

ज्युलिआँच्या भविष्याबद्दल आपण अशुभ भाकित करण्याचे कारण नाही. धूर्त व शहाण्या ढोंगीपणाची बिनचूक शब्दफेक त्याने केली. ती त्याच्या वयाच्या मानाने वाईट म्हणता येणार नाही. त्याचा त्या वेळचा सूर आणि हावभाव यांच्याबद्दल असे सांगता येईल की, तो खेडवळ लोकांत राहिलेला होता, उच्च आणि आदर्श अवलोकन करण्याची संधी त्याला मिळाली नव्हती. परिणामी त्याला सभ्य गृहस्थांच्या संगतीत मिसळण्याची मोकळीक मिळताच हावभाव व बोलणे या दोहोंत तो कौतुक वाटावे इतका तरबेज झाला.

आपली नोकराणी एलिसा हिला अलीकडेच संपत्तीचा वारसा लाभला होता तरी त्यामुळे ती अधिक सुखी झाली नाही याचे मा. रेनॉलना आश्चर्य वाटले. एलिसा शॅलाँ पाद्र्याकडे एकसारखी जात असते आणि परतताना तिच्या डोळ्यांत अश्रू असतात असे त्यांना आढळून आले. शेवटी एलिसा आपल्या लग्नाबद्दल त्यांच्याशी बोलली.

त्यावर आपण स्वतःच आजारी पडलो आहोत असे मा. रेनॉलना वाटले. एक प्रकारचा ताप चढून त्यामुळे निद्रासुखच घेता येत नाही असे त्यांना झाले. एलिसा अथवा ज्युलिआँ त्यांच्या नजरेसमोर असतील तेव्हाच त्यांच्यात थोडे तरी चैतन्य संचरे. ते दोघे आणि त्यांना त्यांच्या भावी वैवाहिक जीवनात लाभणारे सुख याशिवाय इतर कशाचाच विचार मा. रेनॉलना करता येईना. केवळ पन्नास लुई उत्पन्नामुळे, लहान घरात नाईलाजाने राहावे लागणाऱ्या लोकांची गरिबी, आपली चित्रे मोहक रंगात त्यांच्या मनश्चक्षूंपुढे उभी करू लागली. व्हेरिएरपासून सुमारे सहा मैल अंतरावर ब्रे ह्या जिल्ह्याच्या गावी ज्युलिआँ कदाचित वकीलही होईल आणि तसे झाल्यास तो आपल्याला कधीकधी भेटू शकेल असेही त्यांना वाटले.

आपण भ्रमिष्ट बनत आहोत असे मा. रेनॉल यांना मनापासून वाटू लागले. त्याबद्दल त्या आपल्या पतीजवळ बोलल्या आणि अखेर आजारी पडल्याच. त्या दिवशी एलिसा त्यांची सेवाशुश्रूषा करीत होती, तेव्हा ती रडत असल्याचे त्यांना आढळले. त्या क्षणी त्यांना एलिसाचा तिटकारा वाटला होता आणि तीव्र शब्दांत त्यांनी तिची निर्भर्त्सना केली होती. पण मग त्यांनी तिची क्षमा मागितली. त्याबरोबर एलिसाचे अश्रू वाढले. मालकिणीने परवानगी दिल्यास आपल्या दुःखाची सारी कथा आपण सांगू असे ती म्हणाली.

"बोल, काय असेल ते सांग मला." मा. रेनॉल त्यावर उत्तरल्या. "त्याचं असं आहे बाईसाहेब, की तो मला स्वीकारत नाही. दुष्ट माणसं माझ्याबद्दल त्याच्याजवळ काही वेडंवाकडं बोलली असली पाहिजेत, अन् त्यावर त्याने भरवसा ठेवलेला दिसतो."

"पण कोण तुला स्वीकारीत नाही?" मा. रेनॉल यांनी विचारले. हे बोलताना त्यांना श्वासोच्छ्वासही नीट करता येईना.

"मंस्यूर ज्युलिआँशिवाय दुसरा कोण असणार तो, बाईसाहेब?" हुंदके देत एलिसा म्हणाली. ती पुढे सांगू लागली, "त्याचा विरोध जिंकण्यात आदरणीय धर्मगुरूंना अपयश आलं आहे. मी बाईसाहेबांची एक नोकराणी आहे, केवळ ह्याच कारणास्तव त्याने माझ्यासारख्या चांगल्या मुलीला नकार देऊ नये असं धर्मगुरूंना वाटतं. आणि तसाच विचार केल्यास ज्युलिआँचा बाप तरी असा कोणता मोठा माणूस आहे? तो एक सुतार तर आहे! अन् स्वतः ज्युलिआँ? बाईसाहेबांच्या आश्रयाला येण्यापूर्वी तो आपली उपजीविका कशी करीत होता?" पण एलिसाचे बोलणे आता मा. रेनॉल यांना ऐकूच येत नव्हते. अतिसुखाच्या भावनेने त्यांना विवेकबुद्धीचा उपयोग करणे जवळजवळ अवघड केले होते. ज्युलिआँने एलिसाला निश्चित स्वरूपात नकार दिला होता आणि आपला निर्णय अधिक विचारांती बदलणे त्याच्या बाबतीत अशक्य होते अशी एलिसाची खात्री झाली होती. ही गोष्ट मा. रेनॉल यांनी तिच्याकडून पुनःपुन्हा वदवून घेतली. त्या एलिसाला म्हणाल्या, "एकदा शेवटचा प्रयत्न करून पाहण्याची माझी इच्छा आहे. मी ज्युलिआँशी बोलेन." दुसऱ्या दिवशी दुपारी भोजनानंतर मा. रेनॉल यांनी सुमारे तासभर आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या उद्दिष्टाची तरफदारी करण्याची आणि एलिसाचे पाणिग्रहण व संपत्ती या दोन्हींना एकसारखा नकार दिला जात आहे हे पाहण्याची नामी, सुखदायक संवेदना अनुभवून घेतली.

ज्युलिआँने विचारपूर्वक स्वीकारलेले स्वतःचे स्तब्धतेचे धोरण पायरीपायरीने सोडून दिले आणि अखेर मा. रेनॉल यांच्या तर्कशुद्ध विधानांना दमदार उत्तरे दिली. त्यामुळे त्यांच्या अंतःकरणात निराशामय अशा सुखाचा एवढा पूर अनेक दिवसांनंतर वाहू लागला की त्यांना तो सहन होईना. त्या आता खरोखरीच्याच

आजारी झाल्या. ह्या आघातातून त्या जेव्हा पूर्वावस्थेप्रत आल्या आणि स्वतःच्या खोलीत आरामाने बसल्या तेव्हा आपल्याला तेथे एकटेच काही वेळ राहू देण्यास त्यांनी घरच्यांना सांगितले. त्यांचे मन विस्मयाच्या महासागरात डुंबत होते. शेवटी त्यांनी स्वतःला प्रश्न केला, “मी ज्युलिआँच्या प्रेमात पडले असेन काय?” हा शोध त्यांच्या अंतःकरणाला इतर कोणत्याही वेळी लागला असता तर त्यांना खेदपूर्वक पश्चात्ताप झाला असता; त्याने फार मोठी खळबळ त्यांच्या अंतःकरणात उडवून दिली असती. पण आता, एक असाधारण घटना यापलीकडे त्यांना त्याबद्दल जास्त असे काही वाटले नाही. त्या बेफिकीरच राहिल्या. घडलेल्या सगळ्या घटनांच्या परिणामाने त्यांच्या हृदयाला थकवा आला होता; आणि स्वतःच्या मनोविकारांच्या दिमतीला देण्यासाठी त्यांच्याजवळ संवेदनक्षमता उरली नव्हती.

त्यांनी काही तरी कामात गुंतण्याचा प्रयत्न केला. त्यातच त्यांना गाढ झोप लागून गेली. जाग आली तेव्हा त्या, व्हायला हव्या होत्या तेवढ्या धास्तावलेल्या नव्हत्या. त्या इतक्या सुखात होत्या की, कुठल्याही गोष्टीकडे दोषदृष्टीने पाहणे त्यांना जमतच नसे.

मा. रेनॉल जात्याच निष्पाप, भोळ्या व निष्कपट होत्या. त्यामुळे, एखाद्या भावनेची एखादी अभिनव छटा मनात उद्भवली किंवा त्याला त्रासदायक अशी काही गोष्ट घडली तर त्याबद्दलची थोडीफार लागणी आपल्या हृदयाकडून बळजबरीने प्रकट करवून त्याला छळण्याचे या लहान गावात राहणाऱ्या प्रामाणिक जीवाला कधी सुचले नव्हते. आदर्श गृहिणी व माता म्हणून पॅरिसबाहेरच्या परिसरात महिलेला जे भरपूर गृहकृत्य उरकावे लागते त्यात त्या ज्युलिआँच्या आगमनापूर्वी पूर्णपणे व्यग्र असत. आपण सोडतीबद्दल जसा विचार करतो तसा त्या मनोविकारांबद्दल करीत. थोडीफार निराशा आणि काही सुखभावना मिळविण्यासाठी त्यांचा आश्रय फक्त मूर्खच करीत असतात.

रात्रीच्या जेवणाची घंटा वाजली, ज्युलिआँने मुलांना भोजनगृहात आणले. त्याचा आवाज मा. रेनॉलनी ऐकला तेव्हा त्या लज्जेने लालीलाल झाल्या. प्रेमात पडल्यापासून त्यांनी सराइतपणाची काही हुषारी पैदा केली होती. आपले डोके फार दुखत असल्याची तक्रार त्यांनी केली आणि स्वतःच्या चेहेऱ्यावरील लालीचे समर्थन केले.

“तुम्ही बायका ह्या अशाच. तुमच्या देहयंत्रातील काही ना काही तरी बिघडलेलं असतं.” एम्. द रेनॉल यांनी शेरा मारला व पाचकळपणे ते हसले.

पतीचे अशा प्रकारचे, तथाकथित बुद्धिचातुर्याचे बोलणे ऐकण्याची सवय आता मा. रेनॉल यांना झाली होती. तथापि या वेळच्या बोलण्यातील रेनॉल यांचा विशिष्ट सूर त्यांना बोचला. स्वतःचे मन ज्युलिआँचे रेखीव रूप न्याहाळण्यात गुंतवून त्यांनी ती बोचणी विसरण्याचा प्रयत्न केला. ज्युलिआँ जगातील एक अत्यंत कुरूप माणूस असता तरी त्यांनी त्या क्षणी त्याने दिलासा दिला असता.

राजदरबारी प्रघातांचे अनुकरण करण्याचा उत्साह एम्. द रेनॉल यांच्यामध्ये नेहमीच असे. वसंत ऋतूच्या पहिल्या आल्हादकारी दिवसांत त्यांनी आपल्या कुटुंबाचे स्थालांतर वेर्जी येथे केले. एका मध्ययुगीन प्रणयकथेची नायिका गॅब्रिअल हिच्या धाडसाच्या शोकपर्यवसायी इतिहासामुळे वेर्जी ह्या खेड्याला प्रसिद्धी लाभलेली आहे. अद्यापी मनोहर दिसणाऱ्या, गॉथिक पद्धतीच्या बांधणीच्या, तेथील जुन्या चर्चच्या अवशेषांपासून चार-पाचशे यार्ड अंतरावर रेनॉल यांच्या मालकीचा एक जुना किल्ला होता. त्याला चार बुरूज

होते, एक बागही होती. बागेची आखणी ट्युलेरिजसारखी केलेली होती. बागेत ठिकठिकाणी बॉक्स झुडुपांच्या हिरव्यागार रांगा होत्या. दोन्ही बाजूंनी लावलेली चेस्टनटची काही झाडेही तेथे होती. कापून ती वर्षांकाठी दोनदा सारखी केली जात. लागूनच असलेल्या शेतात सफरचंदांच्या झाडांची लागवड केलेली होती. त्या शेतातून रेनॉल यांच्या कुटुंबियांना हवा खाण्यासाठी फिरण्याची सोय होती. बगीच्याच्या टोकाला अक्रोडाची नऊ-दहा छानदार झाडे वाढली होती. त्यांचा विस्तीर्ण पर्णसंभार सुमारे ऐंशी फूट उंचीपर्यंत वर गेलेला होता.

ह्या झाडांचे कौतुक मादाम रेनॉल यांनी आपल्या पतीजवळ केले की, ते म्हणत, “त्या प्रत्येक खतरूड झाडाने माझी अर्धा एकर शेतजमीन नासून टाकली आहे. त्यांच्या सावल्यांखाली धान्य उगवत नाही.”

आपल्या त्या नव्या घराभोवतालचा वनश्रीयुक्त देखावा मा. रेनॉल यांच्या मनाला अभिनव वाटला. त्यांचे त्याबद्दलचे नवल व कौतुक अमर्याद होते. नवचैतन्य निर्माण करणाऱ्या त्या भावनेने त्यांना नवा उत्साह वाटून त्या नवे नवे निश्चय करू लागल्या. वेर्जी येथे स्थलांतर केल्यावर दुसऱ्याच दिवशी महापौर रेनॉल यांना काही सरकारी कामासाठी व्हेरिएरला परत जावे लागले. तेव्हा मा. रेनॉल यांनी स्वखर्चाने काही मजूर कामाला लावले. ज्युलिआँने एक नवी कल्पना त्यांच्या मनात भरविली. त्या बगीच्याभोवती व अक्रोडाच्या मोठ्या झाडांखाली वाळू टाकून एक छोटी पायवाट तयार केल्यास मुलांना तेथे सकाळीच फिरता येईल व त्यांचे बूट दवाने ओले होणार नाहीत. ही कल्पना सुचल्यापासून चोवीस तासांच्या आत अमलात आणण्यात आली. ज्युलिआँबरोबर मजुरांवर देखरेख करण्यात मा. रेनॉल यांनी तो संपूर्ण दिवस सुखाने व्यतीत केला.

महापौर व्हेरिएरहून परत आले तेव्हा बागेतील त्या वाटांचे काम पूर्ण झाले होते. ते पाहून त्यांना फार आश्चर्य वाटले! आणि त्यांच्या आगमनाचे आश्चर्य मा. रेनॉलना वाटले. पतीचे अस्तित्वच त्या विसरून गेल्या होत्या. एवढ्या महत्त्वाच्या दुरुस्तीचे काम आपल्याशी विचारविनिमय न करताच पूर्ण करण्याचे औद्धत्य मा. रेनॉलने दाखविले याबद्दल नंतर दोन महिने महापौर पत्नीशी रोषाने बोलत असत. तथापि मा. रेनॉल यांनी ते काम स्वतःच्या खर्चाने करून घेतले होते आणि ह्याच गोष्टीचे महापौरांना अंशतः समाधान होते.

आपल्या मुलांच्या बरोबर फुलपाखरे पकडण्यासाठी बागेत धावपळ करण्यात मा. रेनॉल यांनी आपले दिवस खर्च केले. अगदी विरविरीत व सौम्य रंगाच्या कापडाची अनेक मोठी जाळी त्यांनी तयार केली. त्यांच्या सहाय्याने ते दुर्दैवी ‘लेपिडोप्टेरा’ पकडीत. हे विचित्र, अपरिचित नाव ज्युलिआँने मा. रेनॉलना शिकविले होते. मंस्यूर गोडार या लेखकाने फुलपाखरांच्या विषयावर एक छानदार पुस्तक लिहिलेले होते. बेझाँसाहून ते आणण्यासाठी त्यांनी माणूस पाठविला होता. त्या पुस्तकात अशा कृमिकीटकांच्या चमत्कारिक सवयींची माहिती दिलेली होती. ज्युलिआँ ती मा. रेनॉलना वाचून दाखवीत असे. फुलपाखरांचे ते अपरिचित नाव त्याच पुस्तकातले होते.

ज्युलिआँने एक मोठा जाड पुठ्ठा बनविला होता. टाचण्या टोचून त्याच्यावर ते फुलपाखरांना जखडून ठेवीत. त्याबद्दल त्यांना खेद वा पश्चात्ताप वाटत नसे.

मा. रेनॉल आणि ज्युलिआँ यांना संभाषणाच्या शेवटी एकदाचा एक विषय मिळाला. त्यांच्यामध्ये अधूनमधून जी स्तब्धता पूर्वी निर्माण होत असे ती आता थांबल्यामुळे ज्युलिआँला पूर्वीप्रमाणे भयंकर मानसिक वेदना होत नसत.

ते दोघे एकसारखे बोलत, गप्पा मारीत बसत. गप्पांचे विषय नेहमी साधे, निरुपद्रवी असत; तरी त्यांना त्यांत खूप रस, मजा वाटे. तेथील हा उत्साहपूर्ण उद्योगी व गुंतवून ठेवणारा आनंदी जीवनक्रम प्रत्येकाला सोयीस्कर होता. त्याला अपवाद होता तो फक्त एलिसाचा. तिच्यामागे जीवघेणे काम लागून राहिलेले असे. त्यामुळे ती एकदा उद्गारली, "कार्निव्हल उत्सवाच्या प्रसंगी व्हेरिएरला नृत्याचा कार्यक्रम असतो तेव्हासुद्धा बाईसाहेबांनी आपल्या पोषाखाबद्दल एवढी तसदी कधीच घेतली नव्हती; आणि आता त्या दिवसाकाठी दोन-तीनदा पोषाख बदलतात!"

जादा प्रशंसेने कोणाची खुशामत करण्याचा आमचा इरादा नसल्याने आम्ही जे एक सत्य छपवून ठेवणार नाही ते म्हणजे मा. रेनॉल यांची त्वचा मोठी मुलायम होती. आणि त्यांनी स्वतःसाठी तयार करून घेतलेले पोषाख असे असत की तेणेकरून त्यांचे बाहू व वक्ष बरेचसे अनावृत राहात. त्यांची अंगकाठी मुळात रेखीव, बांधेसूद होती आणि खास बनवून घेतलेले ते पोषाख त्यांनी अंगावर चढविले की जणू त्यांच्या आकर्षक सौंदर्याला पूर्णता प्राप्त होई.

त्यांचे व्हेरिएरचे मित्र वेर्जीला त्यांच्याकडे भोजनासाठी आले की म्हणत, "बाईसाहेब, आपण पूर्वी कधीच इतक्या तरुण नव्हता." (स्थानिक जनतेत असे बोलण्याचा तो एक प्रघात होता.)

आमच्या वाचकांना ज्यावर क्वचितच विश्वास बसेल असा एक गंमतशीर विशेष मुद्दा म्हणजे स्वतःची रूपसंपदा खुलून दिसण्यासाठी जे कष्ट त्या घेत त्यापाठीमागे त्यांचा खास असा काही उद्देश नसे. ते करण्यात त्यांना मजा वाटे, सुख होई. त्याबाबत विशेष विचार न करता, मुले आणि ज्युलिआँ यांच्याबरोबर त्या जेव्हा फुलपाखरे पकडीत नसत तेव्हा एलिसासह पोषाख बनविण्यात गुंतलेल्या असत. व्हेरिएरच्या बाजारपेठेत मलहौसहून नुकतेच आलेले, उन्हाळ्यात वापरावयाचे नवीन कपडे खरेदी करण्याच्या इच्छेनेच त्यांनी स्वतः व्हेरिएरला एक चक्कर एकदाच टाकली होती.

तेथून परत येताना स्वतःबरोबर त्या एक तरुण बाई वेर्जीला घेऊन आल्या. ती त्यांची एक चुलत बहीण होती. लग्न झाल्यानंतरच्या काळात मा. रेनॉल यांनी मा. डेरविल यांच्याशी दाट स्नेह संपादन केला होता. दोघी किशोरवयाच्या असताना सॅक्रे कूर येथे एकाच शाळेत जात होत्या.

मा. रेनॉल यांचे आपल्या चुलत बहिणीचे, काही विचार व कल्पना मा. डेरविलना गमतीच्या वाटत. त्या खूप हसून म्हणत, "मी जर एकटी असते तर अशा कल्पना मला कधीच सुचल्या नसत्या." एकदम डोक्यात येणाऱ्या त्या कल्पनांना पॅरिसमध्ये "विनोदी कोटीबाजपणा" असे संबोधले गेले असते. तथापि मा. रेनॉल त्यांच्या पतिसमवेत असल्या म्हणजे तसे वक्तव्य हे काही तरी मूर्खपणाचे वाटून त्यांना लाज वाटे. मात्र मा. डेरविल असल्या म्हणजे त्यांना धीर येई. आपल्याला काय काय वाटते ते मा. रेनॉल भित्र्या आवाजात मा. डेरविलना सांगू लागत. केवळ त्या दोघी बायकाच काही वेळ एकत्र असल्या म्हणजे उल्हसित होत. एक मोठी, निर्वेध सकाळ क्षणात संपून जाई व दोघी मैत्रिणींना आनंदित करून सोडी. या भेटीत मात्र बिचारी मा. डरविलना आपली चुलत बहीण बरीच कमी खेळकर वृत्तीची, पण बरीच सुखी वाटली.

त्या रम्य ग्रामीण भागात आल्यापासून ज्युलिआँ एखाद्या बालकाप्रमाणे जीवन व्यतीत करीत होता. आपल्या विद्यार्थ्यांप्रमाणेच फुलपाखरांच्या मागे धावण्यात त्याला मजा वाटत होती. जगातील अत्यंत सुंदर

अशा पर्वतपरिसरांत त्याचे वास्तव्य होते. त्याच्या वयाच्या तरुणांत जीवनोत्साहाची जी तीव्र लालसा वसत असते तिच्या स्वाधीन तो सहजपणे व पूर्णपणे झाला होता. मा. रेनॉल यांची भीती त्याला आता मुळीच वाटत नव्हती, आणि बऱ्याच निग्रहानंतर व कुशल धोरणीपणानंतर सर्व मानवी प्राण्यांच्या नजरेआड त्याने ती गोष्ट साध्य केली होती.

मा. डेरविल आल्याबरोबर लगेच ज्युलिआँला असे वाटले की, त्या आपल्या मित्र आहेत. नवी वाट जेथे संपे तेथून पाहण्यासारखा एक देखावा होता तो त्याने मा. डेरविलना उत्सुकतेने दाखविला. खरे म्हणजे इटलीतील सरोवरे व स्वित्झर्लंड येथील प्रशंसनीय देखावे यांच्यापेक्षा तो कदाचित जास्त सुंदर नसला तरी त्यांच्याइतका सुंदर खात्रीने होता. पुढे काही यार्डांच्या अंतरावरून एक तिरपी चढण सुरू होत होती, ती चढून गेले की माणूस लवकरच उंच कड्याशी पोहोचे. या कड्याच्या भोवती दाट ओक वृक्षांची राई शोभून दिसत होती. हे वृक्ष जवळजवळ नदीच्या पात्रावर डोकावण्याइतके पुढे आलेले होते. त्या उभ्या कड्यांच्या शिखरांजवळ ज्युलिआँ त्या दोघी मैत्रिणींना घेऊन गेला. तो या वेळी सुखी, मुक्त आणि त्यापेक्षाही खरोखरी आणखी जास्त काही तरी, जणू गृहस्वामीच होता. त्या मैत्रिणींनी तेथील रमणीय निसर्गसौंदर्याची केलेली प्रशंसा त्याला आवडली, गोड वाटली.

"मला तर हे दृश्य म्हणजे मोझार्टचे संगीतच वाटते." मा. डेरविल म्हणाल्या.

व्हेरिएरच्या अवतीभवतीचा ग्रामीण परिसर ज्युलिआँच्या दृष्टिकोणातून, त्याच्या भावांचा मत्सरीपणा आणि जुलमी व रागीट-तिरसट बापाचे अस्तित्व यांनी बिघडवून टाकला होता. वेर्जी येथे आल्यापासून त्या अप्रिय स्मृतींचा मागमूस आता राहिला नव्हता. येथे त्याला शत्रू असे कोणीही दिसत नव्हते. त्याच्या जीवनात अशी स्थिती तो प्रथमच अनुभवीत होता. एम. द रेनॉल वरचेवर व्हेरिएरला जात. ते गेले की तो लगेच आपले वाचन चालू करण्यास धजावत असे. लवकरच तो रात्रीऐवजी दिवसा वाचू लागला. नाही तर रात्री वाचताना तो दिव्यावर उलटे पुष्पपात्र घालून दिव्याचा प्रकाश छपविण्याची खबरदारी घेत असे. पण आता रात्रीची त्याला भरपूर झोप मिळू लागली. मुलांना दिवसा शिकविण्यामधून जेव्हा थोडा वेळ त्याला उरत असे तेव्हा पुस्तक घेऊन, खडक-कपारीतून तो चढून वर जात असे. हे वाचन म्हणजे त्याची एकमेव आचारसंहिता होती, त्याच्या अत्यानंदाचा एकमेव विजय होता. उदासीनतेच्या क्षणी त्यातून त्याला दिलासा, सुख व परमहर्ष तात्काळ अनुभवास येत.

स्त्रियांबद्दलची नेपोलिअनची काही वक्तव्ये व विचार, त्याच्या राजवटीत लोकप्रिय झालेल्या कादंबऱ्यांच्या गुणवत्तेवरील विविध चर्चा अशा गोष्टींनी ज्युलिआँच्या मनात आता प्रथमच कित्येक नव्या कल्पना, विचार निर्माण केले. त्याच्या वयाच्या इतर कोणाही तरुणाचा अशा कल्पनांशी परिचय किती तरी आधीच झालेला असे.

आता उन्हाळा सुरू झालेला होता. त्यामुळे घरापासून काही यार्ड अंतरावर असलेल्या विस्तीर्ण लिंबाच्या झाडाखाली संध्याकाळचा वेळ घालविण्याचा परिपाठ त्यांनी सुरू केला. तेथे गडद छाया असे. एका संध्याकाळी ज्युलिआँ कशावर तरी जोराजोराने बोलत होता. तेव्हा आपण चांगले बोलत आहोत याचा व तोही तरुण विवाहित स्त्रियांशी बोलत आहोत याचा आनंद तो लुटीत होता. बोलताना तो जे हावभाव करीत होता त्यामुळे त्याचा हात मा. रेनॉल यांच्या हाताला लागला. बागांतून असणाऱ्या रंगीत, लाकडी खुर्च्यांपैकी एकीमध्ये तेव्हा त्या मागे रेलून बसल्या होत्या.

हात घाईने मागे घेतला गेला. तथापि आपला स्पर्श झाला असता हात त्याप्रमाणे मागे घेतला जाऊ नये याची खबरदारी घेणे हे आपले कर्तव्य आहे असा निर्णय ज्युलिआँने स्वतःशी घेतला. पण हे कर्तव्य पार पाडण्याची कल्पना आणि त्यायोगे स्वतःला हास्यास्पद करून घेणे अथवा ती कल्पना कृतिरूपात यशस्वी न ठरल्यास स्वतःच्या पदरी येणारा न्यूनगंड यांनी त्याच्या हृदयातून त्याच्या भाषणकौशल्याचे ते सारे सुख हिसकावून घेतले.

★ ★ ★

## प्रकरण नववे

# खेड्याच्या परिसरातील एक सायंकाळ

दुसऱ्या दिवशी सकाळी मा. रेनॉल जेव्हा पुन्हा ज्युलिआँच्या दृष्टीस पडल्या तेव्हा त्याच्या नजरेत एक चमत्कारिक भाव होता. ज्याच्याशी लवकरच आपला झगडा होणार आहे. अशा शत्रूप्रमाणे तो त्यांच्याकडे पाहात राहिला. त्याची ही अशी मुद्रा आदल्या रात्रीच्या मुद्रेपेक्षा किती तरी भिन्न होती. परिणामी मा. रेनॉल यांचे डोके ठिकाणावर राहू शकले नाही. त्याच्याशी त्या प्रेमळपणे वागल्या होत्या. पण तो त्रस्त झालेला आहे असे त्यांना दिसत होते. त्याच्या नजरेपासून त्या स्वतःची नजर काढून घेऊ शकल्या नाहीत.

मादाम डेरविल यांच्या उपस्थितीमुळे संभाषणात भाग न घेण्यासाठी ज्युलिआँला निमित्त मिळाले. त्याच्या मनात जे विचारचक्र चालू होते त्याकडे तो त्यामुळे एकाग्रतेने ध्यान देऊ शकला. स्वतःच्या आत्म्याला ताजेतवाने करणाऱ्या पेरक पुस्तकाच्या वाचनाने स्वतःच्या भूमिकेला बळकटी आणण्याचा उद्योगच तो दिवसभर करीत राहिला.

त्याने मुलांच्या पाठांचे काम पुष्कळच कमी केले. नंतर जेव्हा मा. रेनॉल यांच्या उपस्थितीने त्याला आपल्या अहंकाराला पुष्टी देण्याची आठवण करून दिली गेली तेव्हा आपल्या हातात मा. रेनॉलनी त्या संध्याकाळी त्यांचा हात राहू देणे अगदी आवश्यक आहे असे त्याने स्वतःशी ठरविले.

सूर्य मावळला; आणि तो निर्णायक क्षण सूर्याने जवळ आणला. त्याबरोबर ज्युलिआँच्या हृदयात चमत्कारिक धडधड व खळबळ होत राहिली. रात्र पडली. नंतर गडद अंधार पडल्याचे दिसले. तेव्हा आपल्या छातीवरचे एक फार मोठे दडपण उचलून बाजूला टाकले गेल्याचा आनंद ज्युलिआँला झाला. आभाळ मोठाल्या ढगांनी गच्च भरले होते. उष्ण वाऱ्यामुळे ढग गतीने धावत होते. ते वादळाचे पूर्वचिन्ह होते. त्या दोघी मैत्रिणी अस्तमानानंतर बराच वेळ रमतगमत फिरत राहिल्या. त्या संध्याकाळी त्या दोघी करीत असलेली प्रत्येक गोष्ट ज्युलिआँला चमत्कारिक वाटत होती. तेव्हा पडलेल्या हवेची मजा त्या उपभोगीत होत्या. काही विशिष्ट नाजूक वृत्तींना, तशी हवा पडली म्हणजे प्रेमाची रुचिरता जास्त प्रमाणात अनुभवास येते असे दिसते.

अखेर मंडळी एके ठिकाणी बसली. मा. रेनॉल ज्युलिआँच्या शेजारी आणि मा. डेरविल पलीकडे, दुसऱ्या बाजूस आपल्या मैत्रिणीच्या शेजारी बसल्या. आपल्याला ज्या गोष्टीचा प्रयत्न आता थोड्याच वेळात करायचा आहे तिच्याबद्दलचेच विचार ज्युलिआँच्या मनात चालू होते. त्यामुळे आपणास काही बोलले पाहिजे एवढा विचारही त्याच्या डोक्यात आला नाही. साहजिकच त्यांच्यातील संभाषणाला ओहोटी लागली.

“द्वंद्व खेळण्याचा प्रसंग प्रथमच आल्यावर मी असा इतका अस्वस्थ होईन काय? मला आतासारखाच कंप सुटेल काय?” ज्युलिआँ स्वतःशीच अंदाज घेऊ लागला. कारण तो या वेळी ज्या स्थितीत होता ती इतरांच्या लक्षात येणार नाही याविषयी त्याला खात्री वाटत नव्हती; स्वतःवरही त्याचा दृढ विश्वास नव्हता.

मनाला वेदना देणाऱ्या अशा ह्या अनिश्चित अस्वस्थतेपेक्षा त्या वेळी त्याच्यावर एखादे संकट ओढवले असते तरी ते त्याला परवडले असते. त्याला कितीदा तरी तीव्रतेने वाटले की, कोणत्या ना कोणत्या कामासाठी मा. रेनॉलना घरी परत जावे लागावे आणि मग त्यामुळे त्यांनी बागेतून पाय काढावा. स्वतःवर

ताबा ठेवण्यासाठी कराव्या लागत असलेल्या त्याच्या प्रयत्नांचा जोर एवढा होता की, त्याचा आवाज त्यामुळे पूर्णपणे बदलून गेला. लवकरच मा. रेनॉल यांचाही आवाज कापरा झाला, पण ते ज्युलिआँच्या लक्षात मुळीच आले नाही. त्याची कर्तव्याची जाणीव त्याच्या नैसर्गिक भित्रेपणाशी एकसारखी निष्ठुरपणे झगडत होती; या झगड्याने तो इतका थकून गेला होता की स्वतःशिवाय इतर कशाचीही जाणीव राखणे त्याला अवघड झाले होते. मनोऱ्यावरील घड्याळात पावणे दहाचा ठोका पडला; आणि मनातील हेतू आचरणात आणण्यासाठी अजून प्रारंभ करण्यासही तो धजावला नव्हता! स्वतःच्या भित्रेपणाची त्याला लाज वाटली. तो स्वतःला म्हणाला, 'आता त्या घड्याळाचे दहाचे ठोके पडतील; अगदी त्याच नेमक्या क्षणी, जो हेतू आज संध्याकाळी सफल करीन म्हणून मी स्वतःला दिवसभर आश्वासीत आलो आहे तो एक तर कृतीत उतरवीन; नाही तर माझ्या खोलीत चालता होईन अन् तिथं गोळीने माझ्या मेंदूच्या चिंधड्या उडवीन.'

अशा अस्वस्थ आणि ताण पडलेल्या मनःस्थितीत त्याचा अखेरचा काही काळ गेला. त्या अवधीत भावनातिरेकाने त्याला जवळजवळ भ्रमिष्ट करून टाकले होते. आणि याच सुमारास मनोऱ्यावरील त्या घडाळ्यात दहाचे ठोके पडले. त्या घातक घंटेच्या प्रत्येक ठोक्याने त्याच्या छातीत प्रतिध्वनी उमटवून त्याला चेतविले आणि त्याच्या सबंध अंगातच एक हलकल्लोळ माजविला.

अखेर दहांपैकी शेवटचा ठोका हवेत घुमत होता तेव्हाच ज्युलिआँने स्वतःचा हात पुढे करून मा. रेनॉल यांचा हात पकडला. पण त्यांनी तो लगेच सोडवून घेतला. आपण काय करीत आहोत याची निश्चित जाणीव नसतानाच त्याने मा. रेनॉल यांचा हात पुन्हा घट्ट धरला. त्यांची स्वतःचीच जरी खूप चलबिचल झाली होती, तरी घट्ट पकडलेल्या त्या हाताचा बर्फासारखा थंड स्पर्श त्याला चांगलाच जाणवला. थरथरत्या जोराने तो त्यांचा हात स्वतःच्या हातात तसाच दाबीत राहिला. आपला हात सोडवून घेण्याचा अखेरचा प्रयत्न मा. रेनॉल यांनी केला; पण अखेर त्यांचा हात ज्युलिआँच्या हातात त्यांनी राहू दिला.

ज्युलिआँचे अंतःकरण आनंदाने उचंबळून आले. पण मा. रेनॉल यांच्यावर तो प्रेम करीत होता हे त्याचे कारण नव्हते; तर एक भयंकर यातना अखेर संपली होती हे त्याचे खरे कारण होते. मा. डेरविल यांच्या लक्षात काही येऊ नये म्हणून बोलणे सुरू करणे त्याला भाग पडले. आता त्याचा आवाज मोठा व खणखणीत येत होता. त्याच्या उलट स्थिती मा. रेनॉल यांची झाली होती. त्यांचा आवाज भावनावेगाने एवढा मंद येत होता की, त्यामुळे त्यांना बरे वाटत नसावे असे त्यांच्या मैत्रिणीला वाटले. म्हणून तेथून घरात जावे अशी सूचना मा. डेरविल यांनी केली. त्यावर ज्युलिआँला एक धोका जाणवला. तो स्वतःला म्हणाला, "मा. रेनॉल दिवाणखान्यात परत गेल्या तर दिवसभर मी ज्या भयंकर मनःस्थितीत होतो ती पुन्हा मला ग्रासून टाकील. त्यांचा हात धरण्याची क्रिया निश्चितपणे यशस्वी झाली असं मानण्याइतपत पुरेसा वेळ मी तो धरू शकलेलो नाही."

मा. डेरविल यांनी दिवाणखान्यात परतण्याची सूचना पुन्हा केली. ज्युलिआँने त्याच्या हातात असलेला मा. रेनॉल यांचा हात दाबला. उठण्याच्या बेतात असलेल्या मा. रेनॉल पुन्हा बसल्या आणि क्षीण आवाजात म्हणाल्या, "वास्तविक मला नक्कीच जरा बरं नाही. पण इथल्या ह्या मोकळ्या, ताज्या हवेमुळे मला जरा बरं वाटतंय." त्यांच्या ह्या बोलण्याने ज्युलिआँच्या सुखाला पुष्टी मिळाली. त्या क्षणी खरोखरी तो अतीव सुखी होता. तो बोलत होता आणि लपवाछपवी करण्याचे विसरून गेला होता. त्याच्या दोन्हीही श्रोत्यांना तो एक अतिशय मोहक पुरुष भासत होता. त्याला प्राप्त झालेल्या या आकस्मिक वक्तृत्वशक्तीत तरीही एक छोटीशी उणीव होती. व ती म्हणजे धैर्याची. त्याला प्राणांतिक भय वाटत होते की वादळ सूचित करणाऱ्या

वाढत्या वाऱ्याने मा. डेरविल शिणतील, व कदाचित एकट्याच आत निघून जाण्याचे ठरवतील. मग तो मा. रेनॉल यांच्याबरोबर एकटाच राहील. जवळजवळ अपघातानेच त्याला थोड्या वेळेपूर्वी अविचारी धैर्य आले होते. ते त्या कृतीसाठी पुरेसे होते. पण मा. रेनॉल यांच्याशी आता एखादा अगदी साधा शब्द देखील बोलणे स्वतःच्या शक्तीपलीकडचे आहे असे त्याला आढळून आले. दोषारोप करणारे त्यांचे बोलणे कितीही सौम्य असले तरी बोलण्यात आपलाच पराभव होणार आणि तेथल्या सुसंधीचा प्राप्त झालेला फायदा वाया जाणार असे त्याला वाटले.

मा. डेरविलना ज्युलिआँची वर्तणूक साधारणपणे एखाद्या धांदरट, शाळकरी मुलासारखी वाटत असे. मनाची करमणूक होईल असे त्याच्यात त्यांना काहीच आढळले नव्हते. पण ज्युलिआँच्या सुदैवाने त्या संध्याकाळी त्याची जोरदार व छाप पाडणारी हृदयस्पर्शी भाषणे मादामना आवडली होती. मा. रेनॉल यांच्या बाबतीतील गोष्ट तर काय सांगावी? त्यांचा हात अजूनही ज्युलिआँच्या हातात होता. त्याशिवाय दुसरा कोणताही विचार त्यांच्या मनात नव्हता. त्या क्षणाची पुरेपूर गोडी चाखण्यात त्या मग्न झाल्या होत्या. विस्तीर्ण लिंबाच्या त्या झाडाखाली त्या दोघांनी घालविलेले काही तास हा त्यांच्या दृष्टीने सुखाचा काळ होता. (तो वृक्ष चार्लस् दी बोल्ड याने लावलेला होता अशी तेथे परंपरागत समजूत रूढ होती.) त्या लिंबाच्या दाट पर्णभारातील वाऱ्याचा मंद आवाज आणि वृक्षाच्या अगदी खालच्या पानांवर पडू लागलेले पहिले काही थेंब त्यांनी अत्यानंदाने ऐकले. ज्युलिआँला मात्र आशंका जाऊन विश्वास उत्पन्न व्हावा अशी एकही गोष्ट लक्षात आली नाही.

तेथे एक पुष्पपात्र ठेवलेले होते. वाऱ्यामुळे ते उपडे होऊन मा. रेनॉल व ज्युलिआँ यांच्या पायांशी येऊन पडले. ते उचलण्यासाठी त्यांची चुलत बहीण पुढे झाली. तिला मदत करण्यासाठी मा. रेनॉल उभ्या राहिल्या तेव्हा त्यांना स्वतःचा हात ज्युलिआँच्या हातातून काढून घ्यावा लागला. पण नंतर त्या स्वतःच्या जागी परत बसल्यावर त्यांनी आपला हात पुन्हा अगदी सहजपणे ज्युलिआँच्या हातात दिला; जणू काही त्या उभयंतामध्ये तसे ठरलेलेच होते.

मध्यरात्र केव्हाच होऊन गेली होती. अखेर बागेतून जाण्याची वेळ झाल्याने मंडळी उठली. तेव्हा मा. रेनॉलना प्रेमात असल्याच्या आनंदाचे अगदी भरते आले होते. तथापि त्या इतक्या अनभिज्ञ होत्या की त्यांनी त्याबद्दल स्वतःला मुळीच बोल लावला नाही. सुखाच्या त्या मानसिक अवस्थेमध्ये त्यांना झोप आली नाही. ज्युलिआँच्या अंतःकरणात भित्रेपणा आणि अभिमान यांचा झगडा सबंध दिवसभर चालू होता. त्यामुळे तो फार थकून गेला होता. म्हणून त्याला अगदी गाढ झोप लगेच लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी पाच वाजता नोकराने त्याला उठविले. मा. रेनॉल यांचा विचार त्याच्या मनात पुसटतासुद्धा आला असेल नसेल! (ही गोष्ट त्यांना समजली असती तर केवढा भयंकर धक्का बसला असता त्यांना!) ज्युलिआँने "आपले कर्तव्य व शूरमर्दाचे कर्तव्य" केले होते. ह्या समाधानाच्या आनंदाने त्याचे मन भरून आले असता त्याने आपल्या झोपण्याच्या खोलीच्या दाराचे कुलूप बंद केले आणि आपल्या शूर नायकाच्या पराक्रमाच्या कथा वाचण्यात त्याने स्वतःला संपूर्णपणे एला नव्याच सुखभावनेने गुंतवून टाकले.

दुपारच्या जेवणाची घंटा झाली. 'ग्रॅण्ड आर्मी' च्या वृत्तान्ताच्या वाचनाने आदल्या रात्री प्राप्त झालेले सर्व फायदे तो तेव्हा विसरून गेला होता. दिवाणखान्याकडे जाताना बेफिकीरीच्या स्वरात तो म्हणाला, "मी तिच्यावर प्रेम करतो हे ह्या स्त्रीला सांगितलं पाहिजे."

विकारवश भावनेने भरलेली नजर आपल्याकडे टाकली गेलेली आता आपणास पाहावयास मिळेल अशी ज्युलिआँची अपेक्षा होती. पण तिच्याऐवजी त्याला एम. द रेनॉल यांचा करारी चेहरा पाहावा लागला. सुमारे दोन तासांपूर्वी ते व्हेरिएरहून परतले होते. मुलांची शिकवणी न करता सकाळचा सगळा वेळ ज्युलिआँने गमावला होता असे त्यांना आढळून आले. त्याबद्दलची स्वतःची नाखुषी त्यांनी लपवून ठेविली नाही. स्वतःला भलताच मोठा समजणाऱ्या आणि आपल्याला अत्यंत नाराज करणारी गोष्ट घडली आहे व ती नाराजी दुसऱ्याच्या लक्षात आणून देण्याचा हक्क आपल्याला आहे अशी खात्री बाळगणाऱ्या त्या माणसाच्या मुद्रेइतके अप्रिय दृश्य दुसरे कोणतेच नसेल!

पतीच्या बोलण्यातील प्रत्येक कठोर शब्द मा. रेनॉल यांच्या अंतःकरणाला एखाद्या तीक्ष्ण बाणाप्रमाणे भेदून गेला. ज्युलिआँच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे तो परम हर्षाच्या तंद्रीत इतका विलीन झाला होता, गेल्या काही तासांत त्याच्या डोळ्यांसमोर घडत आलेल्या महत्त्वपूर्ण घटनांमध्ये तो इतका गुंगून गेला होता की, एम. द रेनॉल यांचा कठोर आवाज ऐकून घेण्यासाठी आपले लक्ष खालच्या पातळीवर नेणेच प्रथम त्याला जमले नाही. अखेर त्याने झटकन तुटक उत्तर दिले, "मला बरं नव्हतं." ज्युलिआँच्या ह्या उत्तराचा सूर व्हेरिएरच्या महापौरांपेक्षा अत्यंत कमी संवेदनाशील माणसालाही दंश करणारा वाटला असता. त्याला नोकरीवरून ताबडतोब बडतर्फ केले असल्याचे प्रत्युत्तर त्यावर द्यावे असे त्यांना वाटले. तथापि त्यांनी एक आचारनियम पाळला होता व केवळ त्यामुळे त्यांनी आत्मसंयमन केले. 'व्यावहारिक गोष्टीत कधीही वाजवीपेक्षा जास्त घाई करावयाची नाही' असा तो नियम होता.

थोड्या वेळाने त्यांनी स्वतःला आठवण दिली, "ह्या मूर्ख तरुणाने माझ्या घरात स्वतःसाठी एक प्रकारची प्रतिष्ठा संपादन केली आहे. वालनो त्याला घेऊन जाईल, नाही तर तो एलिसाशी लग्न करील, आणि यांपैकी कोणतीही एक गोष्ट घडून आल्यास तो मनातल्या मनात माझा उपहास करील."

एम. द. रेनॉल यांनी शहाणपणाने असा विचार केला तरी त्यांची नाखुषी त्यांच्या तोंडच्या अनेक चरबट उद्‌गारांवरून बाहेर पडलीच. परिणामी ज्युलिआँला चिडायला ते कारण ठरले. आणि मा. रेनॉल अगदी रडू कोसळण्याच्या बेतात आल्या. जेवण संपल्याबरोबर बाहेर फिरायला जाताना त्यांनी ज्युलिआँच्या बाहूचा आधार मागितला. मग स्नेहशीलपणे त्या त्याच्या बाहूरव रेलल्या. त्या जे सर्व काही त्याच्याशी बोलत होत्या त्याला खालच्या आवाजात उत्तरादाखल तो म्हणत होता, "श्रीमंत माणसे ही अशीच असतात."

एम. द रेनॉल त्या दोघांच्या मागे, अगदी जवळूनच चालले होते. त्यांच्या उपस्थितीमुळे ज्युलिआँचा राग वाढला. कोणाच्याही नजरेत येईल अशा तऱ्हेने मा. रेनॉल आपल्या बाहूवर जास्तच रेलल्या आहेत हे एकदम त्याच्या लक्षात आले आणि त्यामुळे तो घाबरून गेला. त्याने मा. रेनॉलना जोराने बाजूला केले व स्वतःचा बाहू त्यांच्या बाहूतून सोडवून घेतला.

ज्युलिआँचे हे आणखी एक औद्धत्यपूर्ण वर्तन सुदैवाने एम. द रेनॉल यांनी पाहिले नव्हते. फक्त मा. डेरविल यांच्या ते लक्षात आले होते. त्यांच्या मैत्रिणीच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या होत्या. या वेळी बागेच्या कोपऱ्यातून, जवळची वाट म्हणून, जात असलेल्या एका छोट्या शेतकरी मुलीच्या अंगावर ती अतिक्रमण करीत असल्यामुळे एम. द. रेनॉल दगड फेकीत होते.

मा. डेरविल घाईघाईने ज्युलिआँला म्हणाल्या,

“मंस्यूर ज्युलिआँ, कृपा करून तुम्ही संयम राखा. आपण सर्वच जण काही प्रसंगी क्रोधाच्या आहारी जातो हे लक्षात ठेवा.” ज्युलिआँने थंडपणे त्यांच्याकडे पाहिले. त्यांच्या डोळ्यांतून फार मोठा तिरस्कार व्यक्त होत होता.

मा. डेरविलना त्याच्या अशा ह्या दृष्टीने आश्चर्य वाटले. त्या दृष्टीत सामावलेला सगळा अर्थ त्यांना कळू शकला असता तर त्याहून फार मोठे आश्चर्य त्यांना वाटले असते. भयंकर सूडाची एक पुसटशी आशा त्यात असल्याचे त्यांना उमगले असते. अशा मानखंडणेच्या क्षणातच रॉबेसपिअरसारखी माणसे निर्माण होतात यात मुळीच शंका नाही.

मा. डेरविल आपल्या मैत्रिणीजवळ पुटपुटल्या, “तुझा ज्युलिआँ फार दांडगा आहे, बाई. मला तर त्याची भीतीच वाटते.” त्यावर मा. रेनॉल म्हणाल्या, “त्याचा राग तसा अगदी सकारण आहे. त्याच्यामुळेच माझी मुले आश्चर्यकारक प्रगती करू शकली आहेत. तेव्हा एखादी सकाळ त्याने त्यांच्या अभ्यासाशिवाय घालविली तर त्यात काय बिघडलं? सद्‌गृहस्थ म्हणवणारे पुरुष फारच कडक असतात हे तुला कबूल केलं पाहिजे.”

आपल्या पतीवर सूड उगवून घेण्याची एक प्रकारची इच्छा मा. रेनॉल यांना प्रथमच आयुष्यात झाली. श्रीमंत माणसाविषयीच्या ज्या तीव्र द्वेषभावनेने ज्युलिआँला चेतविले होते तिचा स्फोट होऊ पाहात होता. सुदैवाने एम. द रेनॉल यांनी स्वतःला एका कामात गुंतवून घेतले होते. त्यांनी बागवानाला बोलविले. बागेतून जी जवळची पायवाट करण्यात आली होती ती काटेरी काठ्या, काटक्या लावून बदं करण्याच्या कामात त्यांचा बाकीचा वेळ त्यांनी खर्च केला. त्यानंतरच्या त्या त्रिवर्गाच्या उरलेल्या सगळ्या फिरण्यात ज्युलिआँवर जे लक्ष केंद्रित केले जात होते त्याला प्रतिसाद म्हणून त्याने तोंडावाटे एक चकार शब्दही काढला नाही. म. द रेनॉल त्यांच्यापासून निघून गेल्यावर त्या दोन्ही महिलांनी आपण थकलो आहोत या सबबीवर ज्युलिआँकडे त्याचा बाहू आधारासाठी मागितला होता.

चालताना ज्युलिआँ त्या दोघींच्यामध्ये होता. एका कमालीच्या अस्वस्थतेच्या त्रस्ततेची लाली त्यांच्या गालांवर चढली होती; तर त्यांच्या अगदी उलट ज्युलिआँच्या चेहेऱ्यावर गंभीर व ठाम निश्चयाचा भाव दिसून येत होता. ह्या स्त्रियांचा आणि सगळ्या नाजूक भावनांचा त्याला तिरस्कार वाटत होता.

तो स्वतःशी उद्‌गारला, ‘काय? माझा अभ्यास पूर्ण करण्यासाठी पाचशे फ्रँक्सचादेखील पत्ता नाही म्हणजे काय? हं ऽऽ संबंधच तोडून टाकला पाहिजे या बाईशी!’

ज्युलिआँ अशा जहाल विचारात मग्न झाला होता. त्या दोन महिलांच्या शिष्टाचारयुक्त बोलण्यातून जे काय थोडेफार ऐकण्याचा अनुग्रह त्याने केला होता त्यामुळे तो नाखुष झाला होता. कारण त्यांच्या त्या निःसत्व बोलण्यात काही अर्थच नव्हता. ती बेकार, मूर्खपणाची बडबड होती. एका शब्दात सांगावयाचे तर ती शुद्ध बायकी चर्पटपंजरी होती.

केवळ बोलण्यासाठी बोलायचे आणि संभाषण चालू ठेवायचे म्हणून मा. रेनॉल सांगू लागल्या की, त्यांचे यजमान व्हेरिएनहून परत आले होते. कारण त्यांनी त्यांच्या एका शेतकऱ्याशी, मक्याचा पेंढा खरेदी करण्याचा एक सौदा केला होता. (ह्या जिल्ह्यात गाद्यागिरद्यांत भरण्यासाठी तो वापरला जातो.)

मा. रेनॉल पुढे म्हणाल्या, “माझे पती आता पुन्हा आपल्यात सामील होऊ शकणार नाहीत; कारण आता ते बागवान व त्यांचा हुजऱ्या यांच्याकडून घरातल्या सगळ्या गाद्यागिरद्यांतील पेंढा बदलण्याच्या कामात गुंतले आहेत. आज सकाळी त्यांनी पहिल्या माळ्यावरच्या सगळ्या गाद्यागिरद्यांत नवा पेंढा भरून घेतला आणि आता त्यांचे काम दुसऱ्या मजल्यावर चालू आहे.”

ज्युलिआँचे तोंड एकदम उतरले. त्याने मा. रेनॉल यांच्याकडे चमत्कारिक रीतीने पाहिले आणि लगेच आपला चालण्याचा वेग वाढवून त्याने त्यांना बाजूला घेतले. आपल्यापासून दूर जाण्यास त्या दोघांना मा. डेरविल यांनी मोकळीक दिली.

मग ज्युलिआँ मा. रेनॉलना म्हणाला, “माझा जीव वाचवा आता! फक्त तुम्हीच ते करू शकाल. कारण तुम्हांला माहीत आहे की तुमचा हुजऱ्या विषाप्रमाणे माझा द्वेष करतो. बाईसाहेब, तुमच्याजवळ मला कबूल केलं पाहिजे की, माझ्याजवळ एक तसबीर आहे आणि माझ्या पलंगावरच्या गादीत मी ती लपवून ठेविली आहे.” हे ऐकून मा. रेनॉल यांचा पण चेहेरा फिका पडला. ज्युलिआँ पुढे म्हणाला, “बाईसाहेब, फक्त तुम्हीच माझ्या खोलीत या क्षणी जाऊ शकता. कोणी तुम्हांला पाहणार नाही अशा रीतीने जा. अगदी खिडकीलगत असलेल्या गादीच्या कोपऱ्यात तुम्हाला एक चमकदार काळी अशी जाड पुठ्ठ्याची पेटी दिसेल...”

“तिच्यात आहे ती तसबीर?” हे विचारताना मा. रेनॉलना नीट उभे राहण्याचेसुद्धा सामर्थ्य उरले नाही. त्यांची नैराश्ययुक्त मुद्रा ज्युलिआँच्या लक्षात आली; आणि त्याने तिचा फायदा तत्काळ घेतला. तो म्हणाला, “बाईसाहेब, मला तुमच्याकडून आणखी एका गोष्टीची मेहेरबानी हवी आहे. तुम्ही त्या तसबिरीकडे पाहू नये अशी माझी नम्र विनंती आहे. ते माझे गुप्त रहस्य आहे.”

“गुप्त रहस्य आहे.” क्षीण स्वरात मा. रेनॉलनी त्या शब्दांचा पुनरुच्चार केला. तथापि श्रीमंतीचा अभिमान असलेल्या लोकांत जरी त्या वाढल्या होत्या आणि त्यांना फक्त आर्थिक हितसंबंधांची जाणीव होती तरी प्रेमाने त्यांच्या हृदयात आतापर्यंत काही थोडे औदार्य रुजविले होते. त्या कमालीच्या व्यथित केल्या गेल्या होत्या; तरी ज्युलिआँने त्यांच्यावर सोपविलेली कामगिरी योग्य रीतीने पार पाडता यावी म्हणून आवश्यक तेवढे प्रश्न त्यांनी अगदी साध्या भोळ्या एकनिष्ठेच्या भावाने त्याला विचारले होते.

“असं काय? एकूण ती एक छोटी गोल अन् खूप चमकदार अशी जाड पुठ्ठ्याची काळी पेटी आहे तर!” तेथून जाताना त्यांनी विचारले.

“होय, बाईसाहेब.” संकटाची चाहूल लागलेल्या माणसाचा आवाज एकदम खरखरीत होतो तशा आवाजात ज्युलिआँने होकार दिला.

अनुक्रमणिका

घराच्या दुसऱ्या मजल्यावर मा. रेनॉल गेल्या. जणू काही मृत्यूच्या समीपच आपण जात आहेत इतक्या त्या निस्तेज झाल्या होत्या. आपल्याला आता चक्कर येणार असे वाटून त्यांची अवस्था फार शोचनीय होऊन गेली. पण ज्युलिआँने नियुक्त केलेले काम करण्याच्या निकडीने त्यांना बळ दिले.

आपला चालण्याचा वेग वाढवीत त्या ज्युलिआँच्या खोलीकडे जाताना स्वतःशी म्हणाल्या, "मला ती पेटी मिळवलीच पाहिजे."

पण आपले पती खुद्द ज्युलिआँच्याच खोलीत हुजऱ्याशी बोलत असल्याचे त्यांना ऐकू आले. सुदैवाने ते नंतर मुलांच्या झोपण्याच्या खोलीत निघून गले. मा. रेनॉलनी मग ज्युलिआँच्या पलंगावरची गादी उचलून वर केली आणि तिच्या पेंढ्यात इतक्या जोराने आपला हात खुपसला की त्यांच्या बोटांना खरचटले. पण अशा स्वरूपाच्या किरकोळ दुखापतींच्या बाबतीत अतिशय हळव्या असलेल्या मा. रेनॉलना त्या क्षणी वेदनांची जाणीव मुळीच झाली नाही; कारण तितक्यातच त्यांच्या हाताला त्या जाड पुठ्ठ्याच्या पेटीच्या गुळगुळीत पृष्ठभागाचा स्पर्श जाणवला. त्यांनी पेटी खसकन उचलली अन् तेथून धूम ठोकली.

आपल्या नवऱ्याकडून आपण अनपेक्षितपणे पकडले जाऊ ह्या भयापासून कोठे त्या मुक्त होतात न होतात तोच, त्या पेटीने त्यांच्या मनात निर्माण केलेल्या मोठ्या दहशतीमुळे पुढच्याच क्षणी आपल्याला मूर्च्छा नक्की येणार असे त्यांना खात्रीपूर्वक वाटले.

"एकूण ज्युलिआँचे काही प्रेम-प्रकरण आहे तर! आणि तो प्रेम करतो त्या स्त्रीची तसबीर आता या इथे माझ्याजवळ आहे."

बैठकीच्या खोलीत मा. रेनॉल एका खुर्चीत बसल्या होत्या. मत्सराच्या सर्व भयप्रद यातनांना त्या बळी पडल्या होत्या. त्यांचे अतीव अज्ञान पुन्हा त्या क्षणी त्यांच्या मदतीला धावले. विस्मयाने त्यांच्या दुःखाची तीव्रता कमी केली. तेवढ्यात ज्युलिआँ तेथे हजर झाला, त्याने त्यांच्या हातून ती पेटी हिसकावून घेतली; एक शब्दही तो बोलला नाही की त्याने त्यांचे आभारही मानले नाहीत आणि स्वतःच्या झोपण्याच्या खोलीत तो धावत गेला! तिथे त्याने काडी पेटविली आणि तत्काळ ती तसबीर नष्ट करून टाकली. तो म्लान झाला होता, त्याच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. स्वतःवर ओढवू पाहणाऱ्या आगामी धोक्याचे एक अतिशयोक्तीपूर्ण चित्र त्याने आपल्या मनश्चक्षूंसमोर उभे केले. पेटी जळत असताना डोके हलवीत तो स्वतःला म्हणाला, "नेपोलिअनची तसबीर... ज्याने इतरांचे सारे गिळंकृत केले त्या नेपोलिअनचा द्वेष करतो असा टेंभा मिरवणाऱ्या माणसाच्या खोलीत ती छपवलेली सापडली! एवढे जहाल, इतके रागीट एम्. द रेनॉल यांना ती सापडली! आणि अविवेकी वर्तनाचा कळस म्हणजे तसबिरीच्या मागच्या बाजूच्या सफेद पुठ्ठ्यावर माझ्या हस्ताक्षरातील काही ओळी लिहिलेल्या आहेत! त्या व्यक्तीबद्दल मला वाटणाऱ्या उत्साहपूर्ण कौतुकाची, आदराची साक्ष त्या देतील याबद्दल यत्किंचितही शंका नको. शिवाय त्या प्रत्येक प्रेमनिदर्शक हर्षभरारीखाली दिनांक घातलेला! त्यापैकी शेवटचा मजकूर तर मी फक्त दोन दिवसांपूर्वीच लिहिलेला आहे!... "माझी सगळी प्रतिष्ठा, खलास झाली, एका क्षणात नष्ट झाली. आणि ही माझी प्रतिष्ठा, माझा लौकिक हेच तर माझं सर्वस्व आहे. त्याशिवाय मजजवळ जगण्यासारखं दुसरं काय आहे? केवळ त्यावरच तर मी जगतो. आणि परमेश्वरा, ते जीवन तरी कसलं म्हणून सांगू!"

अनुक्रमणिका

त्याचा थकवा आणि त्याला वाटणारी स्वतःची कीव यांमुळे एक तासाभराने त्याला प्रेम करण्याची लहर आली. तो मा. रेनॉलना भेटला. त्याने त्यांचा हात हातात घेतला आणि पूर्वी कधी नव्हे एवढे अगदी मनापासून त्याने त्यांच्या हाताचे चुंबन घेतले. आनंदाने त्याच्या मुखावर गुलाबी प्रभा पसरली. पण मत्सरी स्त्रीच्या रोषाने त्यांनी दुसऱ्याच क्षणी ज्युलिआँचा प्रतिकार केला. त्याचा स्वाभिमान नुकताच डिवचला गेला होता, आणि आताच्या या मा. रेनॉल यांच्या कृतीने तर त्याला अगदी पाण्यात पडल्यासारखे झाले. मा. रेनॉल यांच्या ठिकाणी त्याला फक्त एक श्रीमंत स्त्री दिसली. तिरस्काराने त्याने त्यांचा हात सोडून दिला आणि लांब टांगा टाकीत तो तेथून निघून गेला. बागेत जाऊन तो सचिंतपणे येरझारा घालू लागला. लवकरच त्याच्या ओठांवर एक कडवट स्मित तरळून गेले. "इथं मी चालत आहे तो जसा काही स्वतःचा मालक असलेल्या माणसाच्या शांतपणाने! मी आता मुलांची देखभाल करीत नाहीय... एम्. द रेनॉल यांच्या उपमर्दकारक शेऱ्यांना माझ्या वागण्यामुळे मी कारण देतोय. ते आता जर मला बोलले तर ते न्याय्यच ठरेल." आणि तो घाईघाईने मुलांच्या खोलीकडे गेला.

तिघा भावांपैकी सर्वांत लहानाबद्दल त्याला जास्त माया वाटत असे. तो छोटा त्याला बिलगला. त्याच्या लाडीगोडीने ज्युलिआँच्या दुःखाच्या वेदना थोड्याफार सुसह्य, हलक्या केल्या. त्याला वाटले, "हे पोर तरी अजून माझा तिरस्कार करीत नाही." पण दुःखापासूनची या प्रकारची ही सुटका म्हणजे एक नवा कमीपणा होय म्हणून त्याने लगेच स्वतःला दोष दिला,

"काल विकत आणलेल्या छोट्या कुत्र्याला ही मुलं जसं गोंजारतील, प्रेमाने त्याचे लाड करतील तशीच ती माझ्याशी वागताहेत, मला गोंजारताहेत!"

★ ★ ★

अनुक्रमणिका

## प्रकरण दहावे

# मोठे अंतःकरण व छोटा लाभ

घरातील प्रत्येक खोलीची पाहणी एम्. द रेनॉल करीत होते. मुलांच्या खोलीत नोकरांसह ते पुन्हा आले. त्या खोलीतील पंलगांवरील गाद्यांत नवा पेंढा भरून नोकरांनी त्या परत आणल्या होत्या. त्या खोलीत झालेला रेनॉल यांचा आकस्मिक प्रवेश म्हणजे ज्युलिआँच्या सहनशक्तीची अखेरची कसोटीच होती.

ज्युलिआँ एरव्हीच्या मानाने अधिकच गंभीर झाला होता, जास्त फिका पडला होता. रेनॉल स्तब्धपणे उभे होते. त्यांनी नोकरांकडे एक नजर टाकली. त्यांच्याजवळ जाऊन ज्युलिआँ बोलू लागला,

“साहेब, माझ्या शिकवणुकीमुळे तुमच्या मुलांनी जेवढी प्रगती केली आहे तेवढी दुसऱ्या एखाद्या शिक्षकाच्या हाताखाली झाली असती असं तुम्हांला वाटतं काय? आणि याला तुमचं नकारार्थी उत्तर असेल तर—” रेनॉलना बोलायला मुळीच अवसर न देता ज्युलिआँ स्वतःच पुढे बोलत राहिला, “...तर मग मुलांच्याकडे मी दुर्लक्ष करतो असा शेरा मारून तुम्ही मला दोष देण्यास कसे धजावलात?”

ह्या आकस्मिक हल्ल्यातून स्वतःला कसेबसे सावरून रेनॉल यांनी ज्युलिआँचा तो विचित्र सूर व नूर पाहून असा कयास बांधला की ह्या तरुण शेतकऱ्याच्या हाताशी दुसऱ्या एखाद्या जास्त आकर्षक नोकरीची संधी आलेली असावी व त्यामुळे सध्याची त्यांच्याकडील नोकरी सोडून जाण्याचा घाट त्याने घातला असावा.

ज्युलिआँचा राग बोलता बोलता वाढत होता. शेवटी तो उद्‌गारला, “साहेब, मी तुमच्या सहाय्याशिवाय जगू शकेन एवढे समजून असा.” त्यावर एम्. द रेनॉल जरा अडखळत म्हणाले, “तुम्ही एवढे संतप्त झालेले पाहून मला वाईट वाटते.” नोकरलोक तेथून जरा बाजूला होते व बिछाने घालण्याच्या कामात ते गुंतलेले होते.

ज्युलिआँला क्रोध आवरेना. तो पुन्हा म्हणाला, “एवढ्या खेदप्रदर्शनाने माझे समाधान होणार नाही; साहेब, तुम्ही तिरस्करणीय अशा वाईट गोष्टी सुनावल्यात हे लक्षात घ्या; आणि तेही बायकामंडळींच्या देखत!”

ज्युलिआँ काय विचारीत होता, बोलत होता ते एम्. द रेनॉल यांना खूपच नीट कळत होते. त्यामुळे त्यांच्या मनात उलटसुलट विचारांची धुमश्चक्री सुरू झाली आणि अनावर संतापामुळे ज्युलिआँ जवळजवळ वेडा होऊन ओरडून म्हणाला, “तुमचं घर सोडलं म्हणजे कुठं जायचं ते मला चांगलं माहीत आहे, साहेब.”

ज्युलिआँचे हे शब्द ऐकून तो म. वालनो यांच्या घरी राहू लागल्याचे एक कल्पनाचित्र रेनॉल यांच्या मनश्चक्षूंसमोर उभे राहिले.

एक उसासा टाकून शेवटी रेनॉल बोलले,

“बरंय सर, तुमची विनंती मी मान्य करतो. परवापासून, म्हणजेच येत्या पहिल्या तारखेपासून मी तुम्हाला दरमहा पन्नास फ्रँक देत जाईन.” हे सांगताना त्यांची चर्या अत्यंत क्लेशदायक अशी शस्त्रक्रिया करण्यासाठी डॉक्टरला बोलावण्याची पाळी एखाद्यावर यावी तशी झाली होती.

यावर हसावे असे ज्युलिआँला वाटले. तो काहीही न बोलता स्तब्ध राहिला. त्याचा राग पूर्णपणे मावळला होता. तो स्वतःशी म्हणाला,

‘मला वाटलं होतं त्यापेक्षाही हा प्राणी जास्त तिरस्करणीय आहे. इतक्या नीच वृत्तीच्या माणसाला जेवढी माफी मागणे शक्य होईल तेवढी आता याने मागितली आहे.’

ज्युलिआँ आणि रेनॉल यांच्यामधील हे प्रकरण मुले आ वासून पाहात होती. ज्युलिआँच्या रागाचा पारा चढला आहे, पण आता त्याला दर महिन्याला पन्नास फ्रँक दिले जाणार आहेत हे आपल्या आईला सांगण्यासाठी ती तेथून पसार झाली. नित्याच्या सवयीनुसार ज्युलिआँ त्यांच्यामागे गेला. जाताना रेनॉल यांच्याकडे त्याने दृष्टिक्षेपही टाकला नाही. त्यांना तेथे खूपच त्रस्त मनोवृत्तीत सोडून तो निघून गेला.

महापौर स्वतःशी पुटपुटले, ‘म्हणजे म. वालनोपायी मला एकशे अडुसष्ट फ्रँकचा भूर्दंड पडला आहे. अनाथ मुलांना सामान पुरविण्याच्या त्याच्या कंत्राटाबद्दल काही स्पष्ट शब्दांत त्याला सुनावणे आता खरोखरी मला भाग आहे.’

क्षणभराने ज्युलिआँ पुन्हा त्यांच्यासमोर येऊन उभा राहिला, व म्हणाला, “मला म. शॅलाँ यांच्याशी माझ्या सदसद्विवेकबुद्धीबद्दल काही चर्चा करावयाची आहे, तेव्हा मी काही तास गैरहजर असेन हे आपणांस कळविण्याची मी परवानगी घेतो.” त्यावर अतिशय कपटी व कृत्रिम हास्य करीत रेनॉल त्याला म्हणाले,

“ओहो, अरे सद्‌गृहस्था, माझ्या सत्पात्र मित्रा! तुमची इच्छा असेल, ज्युलिआँसाहेब, तर संबंध दिवस घ्या की, किंवा उद्याचाही दिवस घ्या हवा तर. व्हेरिएरला जाण्यासाठी बागवानाचा घोडाही न्यायला हरकत नाही.” आणि मग रेनॉल आपल्याशीच म्हणाले, ‘हा बघा, वालनोला स्वतःचा मनसुबा सांगायला चालला आहे. मी देऊ केलेल्या गोष्टीबद्दल त्याने स्वतःची अनुमती अजून मला दिलेली नाही. पण या तरुण माथेफिरूचा पाय खाली येऊ दिला पाहिजे.’

ज्युलिआँ तेथून लगेच सटकला. व्रेर्जीहून व्हेरिएरला जाण्यासाठी मधल्या दाट जंगलातून एक रस्ता आहे. त्याला सुरुवातीस एक चढण लागते. ती चढून ज्युलिआँ मार्गस्थ झाल. म. शॅलाँ यांच्याकडे पोहोचण्याची तशी त्याला घाई नव्हती. एखादी नवी बतावणी करून तिच्यात स्वतःला गुंतवून घेण्याची इच्छाही त्याला नव्हती. म्हणून तत्पूर्वी स्वतःचे अंतःकरण एकवार अंतर्बाह्य तपासून पाहण्याची गरज त्याला वाटली. त्यासाठी त्याला वेळ हवा होता. अंतःकरणाला त्रस्त करणाऱ्या, भंडावणाऱ्या व परस्परविरोधी भावनांची कैफियत त्याला शांतपणे ऐकून घ्यावयाची होती.

वाटेतील रानात, निवाऱ्याच्या जागी तो पोहोचला आणि आपण आता कोणाच्याही दृष्टिपथात नाही हे त्याने पाहिले तेव्हा तो स्वतःला म्हणाला, ‘मी लढाई जिंकली आहे, खरोखर मी एक लढाई जिंकली आहे.’

अनुक्रमणिका

लढाई या शब्दाने त्याची संपूर्ण अस्वस्थ चमकदार रंगात चितारून त्याच्या पुढे उभी केली. त्यावर त्याच्या अंतःकरणाला काही प्रमाणात शांतता लाभली.

“आता मला दरमहा पन्नास फ्रँक पगार झालेला आहे. एम्. द. रेनॉल यांना चांगलेच भय वाटले असले पाहिजे; पण कशाचे?”

एका तासापूर्वी तो ज्या संपन्न व प्रबळ माणसावर रागाने उसळला होता त्याला खरोखरी कशाचे भय वाटले असेल याबद्दलच्या त्याच्या चिंतनाने ज्युलिआँला संपूर्ण चित्तप्रसन्नता पुन्हा प्राप्त झाली. जेथून तो चालला होता तेथील वृक्षराजीच्या विलक्षण निसर्गसौंदर्याची जाणीवही त्याला क्षणभर झाली. पर्वताच्या बाजूने उघड्या-बोडक्या खडकांचे अनेक मोठमोठे खंड भूतकाळापासून त्या वनाच्या मध्यभागी पडले होते. उंच बीच वृक्ष त्या खडकांच्या वरपर्यंत वाढले होते. सूर्यकिरणांच्या उष्णतेमुळे जेथे विसावा घेणे अशक्य होते अशा ठिकाणांच्या जवळपासच त्या शिलाखंडांनी शीतल, सुखद सावली पुरविली होती.

त्या मोठ्या खडकांच्या सावलीखाली ज्युलिआँ श्वास घेण्यापुरता थांबला आणि नंतर चढण चढू लागला. एका अरुंद पायवाटेने तो जाऊ लागला. ती पुरेशी स्पष्ट दिसतही नव्हती. फक्त मेंढपाळच तेथून जात असले पाहिजेत, आणि तेवढ्यात आपण एका खूप मोठ्या खडकाच्या माथ्यावर उभे असल्याचे त्याला एकदम आढळून आले. आता आपण आपल्या आवतीभोवतीच्या सगळ्या माणसांपासून पूर्णपणे वेगळे, एकटे आहोत याबद्दल त्याची खात्री होऊ शकत होती. ही निसर्गाच्या क्षेत्रातील स्थिती लक्षात येऊन त्याच्या मुखावर स्मित झळकले. नैतिक क्षेत्रात जे स्थान मिळविण्यासाठी तो आत्यंतिकतेने तळमळत होता त्याची आठवण त्याला त्या वर्तमान स्थितीने करून दिली. त्या उत्तुंग पर्वतावरील शुद्ध हवेच्या श्वसनाने त्याच्या आत्म्याला प्रसन्नता, आनंदसुद्धा दिला. त्याच्या दृष्टीने व्हेरिएरचे महापौर हे अजूनही ह्या पृथ्वीवरील तमाम श्रीमंत व मगरूर रहिवाशाचा एक विशिष्ट नमुना असले तरी त्या दिवशी तिसऱ्या प्रहरी ज्या द्वेषभावनेने त्यांचा क्षोभ झाल होता, त्याचे शरीर हबकून गेले होते व भावना कितीही हिंसक वृत्तीची झाली असली तरी तीत वैयक्तिक कुभावनेचा लवलेशही नव्हता असे त्याला वाटले. एम्. द रेनॉल यांची गाठभेट त्याला आठवडाभरात न झाल्यास, त्यांना व्यक्तिशः आणि त्यांचे घर, मुले, कुत्रे इ. त्यांच्या मालकीच्या सर्वच गोष्टींना तो विसरणे अगदी सहज शक्य होते.

“कसे ते मला ठाऊक नांही, पण मी त्यांना फार मोठा त्याग करावयास भाग पाडले आहे. पन्नासपेक्षा दरसाल जास्त क्राऊन्स म्हणजे काय? एका क्षणापूर्वीच मी एका अतिशय मोठ्या संकटातून बचावलो. म्हणजे मला एका दिवसात दोन विजय मिळाले. दुसऱ्या विजयात मला भूषणास्पद असं काही नाही. त्याचं कारण शोधण्याचा प्रयत्न मी केला पाहिजे. पण हे दुर्घट संशोधन आपण आता उद्या करू या.”

एका भक्कम, अवाढव्य खडकावर ज्युलिआँ ताठ उभा होता. त्याने आकाशाकडे नजर टाकली. ऑगस्टमधील सूर्याच्या प्रभेने तेथे जणू ज्वाला पेटल्या होत्या. खडकाच्या खालच्या बाजूच्या कुरणाच्या पट्ट्यात टोळ-नाकतोड्यांची किरकिर चालू झाली होती; ती थांबे तेव्हा ज्युलिआँच्या भोवतालच्या परिसरात संपूर्ण शांततेचे साम्राज्य प्रस्थापित होई. त्याच्या पायाशी या वेळी देशाचा वीस लीग (साठ मैल) प्रदेश पसरला होता. त्याच्या डोक्यावरच्या बाजूस काही उघडे कडे होते. तेथून वर उडालेला एक बहिरीससाणा मोठ्या चक्राकार भराऱ्या शांतपणे एकसारख्या मारीत होता. त्याने ज्युलिआँचे लक्ष वेधून घेतले. इतर पक्ष्यांचा

स्वाहाकार करणाऱ्या त्या ससाण्यामागे त्याची नजर सहज फिरू लागली. त्याच्या शांत, जोरदार गतीने ज्युलिआँवर छाप टाकली. त्याचे ते बळ आणि ते वेगळेपण यांची त्याला असूया वाटली.

नेपोलिअनची दैवगती अशीच होती. एखाद्या दिवशी ती त्याच्या स्वतःच्याच वाट्याला येणार होती काय?

★ ★ ★

अनुक्रमणिका

**प्रकरण अकरावे**

## रात्रीचे विचार

तथापि आपण व्हेरिएरला आलो असल्याचे ज्युलिआँने तेथे दिसू द्यावयास हवे होते. तेथील प्रेस्बिटरीतून (चर्चमधून) निघाल्यावर एका चांगल्या योगायोगाने त्याला जो पहिला माणूस भेटला तो म. वालनो. स्वतःच्या पगारवाढीची बातमी ज्युलिआँने त्याला तत्काळ दिली.

वेर्जीला परत आल्यावर रात्र होईपर्यंत तो बंगल्यातून खाली बागेकडे गेला नाही, दिवसभर अनेक प्रभावी भावनांनी त्याच्या अंतःकरणावर आक्रमण केल्यामुळे ते शिणून गेले होते. त्या स्त्रियांचा विचार मनात आला तेव्हा त्याने सचिंत होऊन स्वतःला विचारले,

'त्यांच्याशी मी काय बरे बोलू?' ज्या बारीकसारीक, क्षुल्लक घटना स्त्रियांचे संपूर्ण अवधान साधारणपणे व्यापून टाकीत असतात तशा घटनांच्या पातळीवरच नेमकी त्याची मनोवृत्ती येऊन ठेपली आहे हे त्याच्या लक्षात आलेच नव्हते. मा. डेरविलना अनेकदा तो अगम्य वाटे. त्याचे बोलणे त्यांच्या डोक्यावरून जाई. त्यांच्या मैत्रिणीची स्थितीही ह्याबाबत त्यांच्यासारखीच होती. याच्या उलट, ह्या महिला ज्युलिआँशी जे सर्व काही बोलत त्यांपैकी त्याला फक्त अर्धेच समजत असे.

ह्या महत्त्वाकांक्षी तरुणाचे अंतःकरण मनोविकारांच्या ज्या लहरींवर हेलावत असे त्यांच्या जोरकसपणाचा, अथवा दुसऱ्या शब्दांत मी म्हणेन की त्यांच्या विस्तृततेचा तो परिणाम होता. ह्या विचित्र प्राण्याचा बहुधा प्रत्येक दिवस हा चित्ताकाशातील वादळाचा दिवस असे.

त्या संध्याकाळी तो बागेत गेला तेव्हा त्या सुंदर चुलत बहिणींचे विचार मन लावून स्वारस्याने ऐकण्याची त्याची तयारी होती. त्याच्या आगमनाची प्रतीक्षा त्या अधीरतेने करीत होत्या. मा. रेनॉल यांच्याशेजारी, आपल्या नेहमीच्या बसण्याच्या जागी तो बसला. थोड्याच वेळात दाट काळोख पडला. मा. रेनॉल यांचा गोरा हात खुर्चीच्या पाठीवर, त्यांच्या अगदी जवळ असलेला, काही वेळ त्याने पाहिला होता. तो धरण्याचा प्रयत्न त्याने केला. पण थोडा असहकार व्यक्त करण्यात आला आणि अखेर हात अशा पद्धतीने बाजूला काढण्यात आला की त्यातून नाखुषी सूचित केली गेली. एम्. द. रेनॉल तिकडे येत असल्याची चाहूल लागल्यामुळे ती सूचना अखेरची मानण्यास आणि संभाषण हलक्या फुलक्या विषयांवर चालू ठेवण्यास तो तयार झाला.

सकाळचे ते उर्मट शब्द अजून त्यांच्या कानात घुमसत होते. तो स्वतःशी बोलला, 'सर्व ऐहिक सुखसाधने इतक्या विपुलतेने प्राप्त झालेल्या ह्या प्राण्याच्या बायकोचा हात, टिच्चून त्यांच्या अगदी डोळ्यांसमोर आपल्या हाती धरणे हा त्याच्यावर कुरघोडी करण्याचा चांगला मार्ग नव्हे का? हो, मी तसे जरूर करीन, कारण त्याने माझ्याबद्दल तसाच तिरस्कार दाखवला आहे.'

त्या क्षणापासून ज्युलिआँची मनःशांती झपाट्याने ढळू लागली. मानसिक शांती हा त्याच्या स्वभावाचा स्थायीभाव पूर्वीपासूनच नव्हता म्हणा. स्वतःचा हात धरू देण्यास मा. रेनॉलनी त्याला संमती द्यावी असे त्याला फार उत्कटतेने वाटत होते. त्याचे मन त्याशिवाय कशावरच स्थिर होत नव्हते.

अनुक्रमणिका

एम्. द. रेनॉल रागाच्या सुरात राजकारणावर बोलत होते. व्हेरिएरचे दोन-तीन कारखानदार निश्चितपणे त्याच्यापेक्षा जास्त श्रीमंत होऊ लागले होते. निवडणुकीत रेनॉलना विरोध करण्याचा त्यांचा मनसुबा होता. रेनॉल यांचे बोलणे मा. डेरविल ऐकत होत्या. ज्युलिआँला मात्र त्यांच्या बोलण्याची चीड येत होती. त्याने आपली खुर्ची मा. रेनॉल यांच्या अधिक जवळ सरकविली. अंधार प्रत्येक हालचाल छपवीत होता. मा. रेनॉल यांचा सुंदर बाहू झग्यातून उघडा पडला होता. त्याला चिकटून स्वतःचा हात ठेवण्याचा धीर त्याने केला. विचलित चित्तामुळे आपण काय करीत आहोत याचे भान त्याला उरले नव्हते. त्या सुंदर, अनावृत बाहूच्या दिशेने त्याने आपला गाल नेला आणि धिटाईने स्वतःचे ओठ त्याच्यावर दाबले.

त्याबरोबर घाबरून मा. रेनॉल यांचा थरकाप उडाला. त्यांचे पती त्यांच्यापासून काही फूट अंतरावर होते. मादामनी घाईघाईने स्वतःचा हात ज्युलिआँला दिला आणि त्याच क्षणी त्याला स्वतःपासून थोडे दूर ढकलले. एकीकडे एम. द. रेनॉल त्या कुचकामी, कवडीमोल विरोधकांना आणि गब्बर होणाऱ्या जॅकोबिन्सना लाखोली वाहात असताना दुसरीकडे ज्युलिआँने त्याच्या हाती असलेल्या मा. रेनॉल यांच्या हाताची चुंबने आवेगाने घेतली, किंवा निदान मा. रेनॉलना ती चुंबने प्रेमावेगाची आहेत असे जाणवले; आणि तरीही त्या बिचाऱ्या स्त्रीला नुकतेच, याच घातवारी पुराव्यानिशी कळून आले होते की ज्याच्याकडे त्यांचे मन आकृष्ट झाले होते – अर्थात त्यांनी त्याला तसे कधी दर्शविले नव्हते – त्याचे मन मात्र दुसरीकडेच कोठे तरी गुंतले होते. ज्यूलिआँच्या सबंध गैरहजेरीत त्या अतिशय कष्टदायक व्यथेची शिकार झाल्या होत्या आणि त्यामुळे त्यांच्या विचारांना चालना दिली गेली होती.

त्या स्वतःला म्हणाल्या, ‘काय? मी प्रेम करायचं का? दुसऱ्याने माझ्यावर प्रेम केलं तर ते मी चालवून घ्यावं का? माझ्यासारख्या विवाहीत महिलेने प्रेमात पडावे का? पण मला माझ्या नवऱ्याबद्दल तशी उत्कट आवेगाची प्रीती कधीच वाटली नाही. आणि म्हणून मी माझं मन ज्युलिआँपासून तोडू शकत नाही. तसं म्हणजे मनाने तो एक केवळ छोकरा आहे. त्याच्या अंतःकरणात माझ्याबद्दल आदर भरलेला आहे.’ एक नवीन मुद्दा आठवून त्या म्हणाल्या, ‘माझं हे वेडगळपणाचं वागणं, मला वाटतं, क्षणिकच आहे; कायम टिकणारं नाही. ह्या तरुण माणसाबद्दल मी कोणत्या स्वरूपाच्या भावना बाळगाव्यात याच्याशी माझ्या नवऱ्याचा संबंध कसा पोहोचतो? ज्युलिआँशी माझं जे संभाषण चालतं – ज्यात नुसता कल्पनेचा खेळ असतो. त्याने एम्. द. रेनॉल कंटाळून जातील. कारण ते स्वतः कशाबद्दल विचार करीत असतील तर ते त्यांच्या उद्योगधंद्याबद्दल. ज्युलिआँला मी जे काही देते ते काही त्याच्यापासून हिरावलेले नसते.”

अशा प्रकारची बेभान करणारी उत्कट आवेगाची प्रीती मा. रेनॉलनी पूर्वी कधी अनुभवली नव्हती. पण त्या साध्याभोळ्या निष्पाप जिवाला ढोंगीपणाचा कलंक कधी चिकटला नव्हता. त्यांची फसवणूक होत होती; पण ती त्यांना स्वतःला अगदी नकळत. आणि त्याच क्षणी एक सत्प्रेरणा संभावित धोक्याच्या चाहुलीने बावरली होती. ज्युलिआँ बागेत आला तेव्हा असे वैचारिक द्वंद्व त्याच्या मनाचा क्षोभ करीत होते. त्यांनी ज्युलिआँचा आवाज ऐकला; जवळजवळ त्याच क्षणी तो त्यांच्या शेजारी येऊन बसत असलेला त्यांनी पाहिला. तसं सांगायचं तर ह्या मोहक सुखाने त्या पंधरवड्यात त्यांच्या अंतःकरणाचा कबजा घेतला होता. त्यामुळे त्या जितक्या भारल्या गेल्या होत्या त्यापेक्षा जास्त त्याने त्यांना आश्चर्यचकित केले होते. घडत आलेली प्रत्येक घटना त्यांना अनपेक्षित होती. आणि तरीही काही क्षणांनंतर त्या स्वतःला म्हणाल्या,

‘तर मग ज्युलिआँच्या गैरवर्तणुकीच्या सर्व स्मृती मनातून काढून टाकण्यास त्याची उपस्थिती पुरेशी आहे?’ एकदम त्या भयभीत झाल्या आणि मग त्यांनी आपला हात त्याच्या हातातून काढून घेतला.

ज्युलिआँने घेतलेली चुंबने, प्रीतीच्या उत्कट आवेगाने पुरेपूर भरलेली असत. तशा चुंबनांची अनुभूती त्यांना पूर्वी कधीच आलेली नव्हती आणि म्हणून त्या चुंबनांनंतर, तो दुसऱ्या एखाद्या स्त्रीवर प्रेम करीत असेल याची शक्यता मा. रेनॉल तत्काळ विसरून गेल्या. लवकरच त्यांच्या दृष्टीने तो अपराधीही उरला नव्हता. संशयातून निर्माण झालेले त्यांचे तीव्र दुःख संपले होते; जे सुख त्यांच्या स्वप्नातदेखील आले नव्हते ते त्यांच्या पुढ्यात हजर झाले होते. यामुळे प्रेम आणि धुंद आनंद यांनी त्यांचे देहभान हरविले. ती संध्याकाळ त्या सर्वांना मोठी उल्हासदायक होती. अपवाद होता तो फक्त महापौर रेनॉल यांचा. ते त्यांच्या स्पर्धकांच्या वाढत्या संपत्तीचे विचार विसरू शकत नव्हते.

अमलात आणण्यास अवघड असलेल्या आपल्या योजना व आपली घोर महत्त्वाकांक्षा यांचा विचार करणे ज्युलिआँने आता थांबविले होते. सौंदर्याच्या प्रभावाने तो त्याच्या आयुष्यात प्रथमच एवढा दिपून गेला होता. एका संदिग्ध पण गोड अशा स्वप्नात तो बुडून गेला होता. ही स्थिती त्याच्या स्वभावाला नवीन, अपरिचित होती. मा. रेनॉल यांचा हात तो हळुवारपणे दाबीत राहिला. संपूर्ण सौंदर्याचे एक जातिवंत उदाहरण असा तो हात त्याला सुखवीत होता. साहजिकच रात्रीच्या मंद वाऱ्यामुळे होत असलेली लिंबाच्या पानांची सळसळ आणि दू नदीच्या परिसरातील गिरणीजवळच्या कुत्र्यांचे दूर कुठे तरी भुंकणे याकडे त्याचे लक्ष अर्धवटच होते.

पण ज्युलिआँची त्या स्थितीबद्दलची भावनात्मक प्रतिक्रिया एकंदरीने संतोषाची होती; आसक्तीची किंवा विकारवशतेची नव्हती. स्वतःच्या खोलीत परतल्यावर त्याने ज्या फक्त सुखाचा विचार केला ते म्हणजे आपल्या आवडत्या पुस्तकाचे सतत वाचन. विसाव्या वर्षी जगाचा व त्या जगावर आपण पाडणार असलेल्या प्रभावाचा विचार इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा मनात जास्त मुक्काम करतो.

पण ज्युलिआँने पुस्तक लगेच खाली ठेवून दिले. नेपोलिअनच्या विजयांचा सतत विचार करीत राहिल्यामुळे स्वतःच्या विजयाचे एक नवीनच अंग त्याच्या लक्षात आले. त्याने स्वतःला सांगितले,

‘होय, मी लढाई जिंकली आहे. पण मी तिचा पाठपुरावा करीत राहिले पाहिजे. हा गर्विष्ठ माणूस अजून माघार घेत आहे तोवरच त्याची मगरूरी मला नेस्तनाबूत केली पाहिजे. तेच सही सही नेपोलिअनसारखं वागणं ठरेल. मुलांच्याकडे मी दुर्लक्ष करतो असा ठपका त्याने मला दिला आहे. त्याच्याकडे आता मी तीन दिवसांची सुटी मागतो. माझा मित्र फूके याला भेटायला मला जायचं आहे. रेनॉल नाही म्हणाल्यास आमच्यातील करार मोडला म्हणून मी पुन्हा सरळ सांगेन. पण ते माघार घेतीलच.’

मा. रेनॉल यांचा डोळ्याला डोळा लागेना. तो क्षण येण्यापूर्वीच्या काळात आपण खरे जीवन जगलोच नाही असे त्यांना वाटले. ज्युलिआँ अत्यंत उत्साहभराने आपल्या हाताची उत्कट चुंबने घेत आहे ह्या विचाराच्या सुखापासून त्या स्वतःचे मन दूर सारू शकल्या नाहीत.

आणि एकदम ‘व्यभिचार’ ह्या भयंकर शब्दाने त्यांच्या मनात प्रवेश केला. वैषयिक प्रेमाच्या कल्पनेला अत्यंत हीन असा बदफैलीपणा ज्या संभाव्य निष्कर्षांची जोड देऊ शकतो त्या अत्यंत किळसवाण्या

परिणामांनी त्यांच्या मनात कोलाहल माजविला. ज्युलिआँची आणि त्याच्यावर प्रेम करण्याच्या सुखाची जी नाजूक दैवी प्रतिमा त्यांनी स्वतःच्या मनात कल्पिली होती. ती अशा विचारांमुळे कलंकित होऊ पाहात होती. भयानक भविष्यकाळाचे अत्यंत भडक रंगातील चित्र त्यांच्या मनश्चक्षूंपुढे उभे राहिले. त्यामुळे भविष्यात आपण उपहासाचा एक विषय बनत आहोत, तिरस्करणीय ठरत आहोत असे त्यांना दिसू लागले.

तो क्षण भयप्रद होता. त्यांचा आत्मा विचित्र विश्वात भ्रमंती करून आला. त्या संध्याकाळी त्यांनी एका अज्ञान सुखाची चव घेतली होती. आणि आता आपण एका, घाबरवून टाकणाऱ्या आपत्तीत एकदम फेकले गेलो आहोत असे त्यांना आढळले. अशा दुःखद यातनांची पूर्वकल्पना त्यांना नव्हती. पण त्या यातनांनी आता त्यांच्या विवेकशक्तीवर परिणाम करायला सुरुवात केली होती. ज्युलिआँच्या प्रेमात आपण पडू अशी आपल्याला भीती वाटते असे आपल्या नवऱ्याला सांगून टाकावे असा विचार क्षणभर त्यांच्या मनात आला. ते सगळे सांगताना ज्युलिआँबद्दल त्यांना काही बोलता तरी आले असते. कित्येक वर्षांपूर्वी, त्यांच्या लग्नाच्या पूर्वदिवशी त्यांच्या एका आत्याबाईंनी केलेला उपदेश सुदैवाने त्या वेळी त्यांना आठवला. स्वतःच्या नवऱ्याला विश्वासाने सगळे काही सांगण्याने निर्माण होणाऱ्या धोक्याची सूचना आत्याने त्यांना दिली होती. कारण काही झाले तरी नवरा हा अखेर मालक असतो. असं त्या म्हणाल्या होत्या. स्वतःच्या दुःखाच्या तीव्रतेमुळे मा. रेनॉलनी आपले दोन्ही हात एकत्र पिळवटले.

अशा दुःखपूर्ण व उलटसुलट काल्पनिक विचारांच्या प्रवाहात, तारतम्य न राहता, त्या बऱ्याच वाहवत गेल्या. आपण ज्युलिआँवर प्रेम करतो; पण तो मात्र उलट आपल्यावर प्रेम करीत नाही याचे भय त्यांना एक क्षण वाटे; तर लगेच दुसऱ्या क्षणी स्वतःच्या अपराधीपणाचा भयदायक विचार त्यांच्या मनाला क्लेश देई. जणू काही दुसऱ्याच दिवशी व्हेरिएरच्या सार्वजनिक चौकात त्यांना हातखोडा घालून उभे करण्यात येणार आहे व लोकांपुढे त्यांचा व्यभिचार जाहीर करणारी पाटी तिथे लावण्यात येणार आहे! असे एक भेसूर चित्र त्यांच्यापुढे उभे राहिले.

मा. रेनॉलना जीवनाचा कसलाच अनुभव नव्हता. त्या संपूर्णपणे जाग्या असल्या आणि त्यांची बुद्धी त्यांच्या पूर्ण कह्यात असली तरीसुद्धा परमेश्वराच्या दृष्टीने गुन्हेगार असणे आणि जननिंदेच्या अत्यंत उघड्या-नागड्या आविष्काराने स्वतःची पाद्यपूजा उघडपणे केली जाणे ह्या दोहोंत कोणताही फरक त्यांना दिसत नसे.

व्यभिचाराच्या व त्यातही सर्वांत जास्त म्हणजे दुर्लौकिकाच्या भयंकर कल्पनेपासून (गुन्ह्याच्या पोटी तो येतोच असे त्या मानीत होत्या) त्यांची जेव्हा अखेर थोडीशी सोडवणूक झाली आणि ज्युलिआँच्या बरोबर सात्त्विकपणे राहण्याचे सुखस्वप्न त्या पूर्वीप्रमाणे पाहू लागल्या तेव्हा उलट दिशेने आलेल्या एका वैचारिक वावटळीत पुन्हा सापडल्याचे त्यांना आढळून आले व ती वावटळ म्हणजे दुसऱ्या एखाद्या स्त्रीशी ज्युलिआँचा प्रेमसंबंध असावा ही भयानक शंका. त्या स्त्रीची प्रतिमा आपल्या हातून जाईल की काय किंवा ती कोणाच्या नजरेस पडून त्या बाईला अडचणीच्या प्रसंगात सापडायची वेळ येईल की काय ह्या भीतीने ज्युलिआँ फिका पडल्याचे मनश्चक्षूंनी त्यांनी पुन्हा एकदा पाहिले. त्याच्या शांत व उमद्या चेहेऱ्यावर भयाची चिन्हे उमटलेली आकस्मिकपणे नजरेस येण्याची त्यांची ही पहिलीच वेळ होती. त्यांच्याशी अथवा त्यांच्या मुलांशी वागताना अशा मनःस्थितीत तो असल्याचे त्यापूर्वी कधीच आढळले नव्हते. ह्या जादा दुःखाने त्यांना, मानवी जीव सहन करू शकेल तितक्या मर्यादेपर्यंत अतितीव्र मानसिक यातना दिल्या. भान न राहून या वेळी मा. रेनॉल यांच्या

तोंडून काही आर्त उद्गार बाहेर पडले. त्यामुळे त्यांची नोकराणी जागी झाली. लगेच त्यांच्या बिछान्याशी दिवा आणला गेला व त्याच्या प्रकाशात त्यांनी एलिसाला ओळखले.

"तो जिच्यावर प्रेम करतो ती तूच की काय?" असे उन्मादाच्या चित्तभ्रमात त्या ओरडल्या.

आपली मालकीण कसल्या तरी भयप्रद व कष्टदायक मनःस्थितीत असल्याचे पाहून नोकराणी आश्चर्यचकित झाली होती. सुदैवाने, मालकीणबाई काही तरी चमत्कारिक असे बरळल्या याकडे तिचे लक्ष गेले नव्हते. स्वतःचे अविवेकी वर्तन मा. रेनॉल यांच्या लक्षात आल्यावर त्या एलिसाला म्हणाल्या,

"मला ताप आल्यासारखं वाटतंय. माझं डोकंही अगदी हलकं झालंय, तू माझ्या बिछान्याजवळच राहा."

स्वतःवर नियंत्रण ठेवण्याच्या गरजेमुळे मा. रेनॉलना आता संपूर्ण जागृती आली होती. त्यांचा मनस्तापही जरा कमी झाला होता. सुस्तीमुळे मंदावलेल्या विवेकशक्तीने स्वतःचा अंमल त्यांच्यावर पुन्हा सुरू केला. आपल्यावर रोखल्या गेलेल्या नोकराणीच्या स्थिर नजरेपासून मुक्तता व्हावी म्हणून त्यांनी तिला वर्तमानपत्र मोठ्याने वाचून दाखविण्याची आज्ञा केली. त्यातील एक मोठा लेख ती वाचू लागली; आणि मग ज्युलिआँ त्यानंतर आपल्याला पुन्हा भेटेल तेव्हा त्याच्याशी अत्यंत थंडपणे वागावयाचे असा पवित्र निश्चय त्यांनी केला तो एलिसाच्या वाचण्याचा एकसुरी आवाज व वर्तमानपत्रातला तो लांबलचक लेख ऐकता ऐकता.

★ ★ ★

## प्रकरण बारावे

# प्रवास

दुसऱ्या दिवशी सकाळीच पाच वाजता, मा. रेनॉल दृष्टीस पडण्यापूर्वीच त्यांच्या पतीकडून ज्युलिआँने तीन दिवसांची रजा मिळविली. मा. रेनॉलना पुन्हा एकदा भेटावे अशी तीव्र इच्छा त्याच्या मनात, त्याच्या अपेक्षेविरुद्ध, उत्पन्न झाली होती. त्यांच्या सुरेख, बांधेसूद हाताशिवाय दुसरा कशाचाच विचार त्याला सुचत नव्हता. तो खाली बागेत गेला. बराच वेळ झाला तरी मा. रेनॉल आल्याच नाहीत. ज्युलिआँ जर खरोखरीच त्यांच्या प्रेमात पडलेला असता तर पहिल्या मजल्यावरील त्यांच्या खोलीच्या अर्धवट बंद केलेल्या खिडकीच्या तावदानामागे, काचेला आपला चेहेरा चिकटवून उभ्या असलेल्या मादामना त्याने पाहिले असते. तेथून त्या ज्युलिआँच्या हालचाली न्याहाळीत होत्या. अखेर आपले आधीचे निश्चय बाजूला ठेवून, आपण बागेत ज्युलिआँच्या नजरेस पडावयाचे असे त्यांनी ठरविले. त्यांच्या एरवीच्या मुद्रेवरील फिकट रंगाची जागा आता अतिशय चमकदार गुलाबी रंगाने घेतली होती. साध्या-सरळ मनाची ही महिला विचलितचित्त झाली होती हे उघड होत. निग्रहाच्या व नाराजीच्याही भावनेने त्यांची अतीव प्रसन्न मुद्रा गढुळली होती. नाही तर या ऐहिक सामान्य गोष्टींपासून सर्वस्व अलिप्त असल्यासारखा एक स्वर्गीय मोहकपणा त्या प्रसन्न चेहेऱ्यावर नेहमीच विलसत असे.

वेळ मुळीच न दवडता ज्युलिआँ मा. रेनॉल यांच्याजवळ गेला. त्याला त्यांच्या सुंदर हातांचे कौतुक वाटले. मा. रेनॉलनी घाईतच खांद्यावर शाल घेतलेली होती. तिच्यातून त्यांच्या बाहूचा काही भाग उघडा पडला होता. त्यांच्या चेहेऱ्याचा तजेला, प्रातःकालीन शीतल हवेने खुलला होता. पण गेल्या रात्रीच्या प्रक्षोभाने तोच चेहेरा प्रत्येक भावनेच्या बाबतीत अतिशय संवेदनशील झाला होता. त्यांच्या सौंदर्यात मर्यादशीलता व दुसऱ्याच्या हृदयात लागणी निर्माण करण्याचे गुण होते. त्याशिवाय अन्यत्र कोठेही संस्कृतीच्या कनिष्ठ पातळ्यांवर न आढळणारे विचार त्यांच्या ठिकाणी विपुलतेने वसत होते. ज्युलिआँच्या दृष्टोत्पत्तीस आताच आलेल्या त्यांच्या स्वभावाच्या ह्या स्वरूपाची जाणीव त्याला हा वेळपर्यंत झालीच नव्हती. त्याच्या क्षुधित डोळ्यांनी अकस्मात हेरलेल्या मा. रेनॉल यांच्या ह्या मोहक गुणवैशिष्ट्याच्या कौतुकात ज्युलिआँ आता पूर्णपणे मग्न झाला होता. त्यामुळे आपले स्वागत स्नेहपूर्वक केले जाईल अशा अपेक्षेबद्दलच्या विचारालाही त्याच्या मनात जागाच नव्हती. मा. रेनॉल यांनी दाखविलेल्या कमालीच्या थंडपणाचे त्यामुळे त्याला जास्तीच आश्चर्य वाटले. त्याला असेही वाटले की तो थंडपणा हेतुपूर्वक असावा व त्याने आपला दर्जा ओळखून त्याप्रमाणे वागण्याबद्दलची सूचना त्यात गर्भित असावी.

त्याच्या ओठांवरून सुखाचे स्मित मावळले. समाजात आणि विशेषतः त्या उच्चकुलीन व वारसाहक्काने गडगंज संपत्ती प्राप्त झालेल्या महिलेच्या दृष्टीत आपले स्थान कोणत्या पातळीवरचे आहे याची जाणीव त्याला झाली. परिणामी, क्षणात त्याच्या मुद्रेवर केवळ अभिमान व स्वतःबद्दलाचा राग यांचे भाव प्रकटले. आपले जाणे आपण दीडएक तासाने पुढे ढकलले ते अशी मानखंडणा करणारे स्वागत (!) अनुभवण्यासाठी? स्वतःच्या अशा मूर्खपणाबद्दल त्याला जबरदस्त घृणा वाटली.

तो स्वतःशी बोलला, ‘दुसऱ्यांशी वागताना फक्त मूर्खाचाच तोल ढळत असतो. दगड खाली पडतो तो त्याच्या वजनामुळे, जडपणामुळे मी असा पोरकटपणाच नेहमी करीत राहणार आहे की काय? ह्या लोकांना फक्त त्यांच्या पैशाच्या किमतीइतकाच नेमका मोबदला द्यायची, अन् त्याला जोड म्हणून माझं

अंतःकरण व आत्मा न देण्याची चांगली सवय मी स्वतःला केव्हा लावणार आहे? त्यांनी मला मान द्यावा, सन्मानाने वागवावं व माझाही आत्मसन्मान जागृत राहावा अशी इच्छा मला बाळगायची असल्यास त्यांना मी हे दाखवलं पाहिजे की मी दरिद्री म्हणून माझा संबंध त्यांच्या संपत्तीशी येत असला तरी माझं हृदय त्यांच्या उद्दाम मगरूरपणा पासून एक हजार लीग्ज (तीन हजार मैल) दूर आहे. आणि ते अशा उच्च पदी अधिष्ठित आहे की, तेथे ह्या श्रीमंतांच्या तिरस्काराच्या किंवा मेहेरबानीच्या क्षुल्लक खुणा मुळीच पोहोचू शकणार नाहीत.'

ह्या स्वरूपाच्या भावना त्या तरुण शिक्षकाच्या अंतःकरणात गर्दी करीत असताना त्याच्या चेहेऱ्यावर स्वाभिमान दुखावला गेल्याची जाणीव तज्ञन्य उग्र क्रूर भाव व्यक्त झाला होता. ते पाहून मा. रेनॉल फार कष्टी झाल्या. सकाळच्या भेटीच्या वेळी सामान्यतः जे स्वागत केले जाते त्यातून प्रशंसनीय थंडपणा व्यक्त करण्याचा मा. रेनॉल यांचा मानस होता, पण ज्युलिआँमध्ये घडून आलेला बदल पाहून वाटलेल्या आश्चर्याची भावना व त्या आश्चर्यातून उत्पन्न झालेले औत्सुक्य त्या स्वागतातून व्यक्त केले गेले. सकाळी प्रथम भेट झाल्यावर लोक एकमेकांच्या आरोग्याची पृच्छा करतात. किंवा प्रातःकालीन सृष्टिसौंदर्याबद्दल चार शब्द बोलतात; किंवा दुसऱ्या काही फालतू गोष्टींबद्दल निरर्थकपणे बोलत राहतात. पण हे असले कृत्रिम शिष्टाचाराचे औपचारिक शब्द ज्युलिआँ व मा. रेनॉल ह्या दोघांच्याही मुखांतून या वेळी निघेचनात. परिस्थितीचा अंदाज घेण्याची ज्युलिआँची शक्ती कोणत्याही उत्कट मनोविकाराने विचलित झाली नव्हती. आपण व मा. रेनॉल यांच्यामध्ये असलेल्या स्नेहसंबंधाला आपण किती अल्प महत्त्व देतो हे त्याच्या लक्षात आणून देण्याचा एक मार्ग त्याला तितक्यात सुचला. तो ज्या छोट्याशा सफरीवर निघाला होता त्याबद्दल चकार शब्दही तो त्यांच्याशी बोलला नाही. मान लववून त्याने मा. रेनॉलना अभिवादन केले आणि तेथून लगेच पाय काढला.

तो निघून गेला हे मा. रेनॉल केवळ पाहातच राहिल्या. आदल्या संध्याकाळच्या त्याच्या अगदी स्नेहार्द्र नजरेत या वेळी त्यांना जो एक उदास स्वाभिमान दिसला त्याने त्या अगदी दडपून गेल्या. त्याच क्षणी बागेच्या दुसऱ्या बाजूने त्यांचा थोरला मुलगा धावत आला व आपल्या आईला बिलगत म्हणाला,

"आम्हांला सु ऽ ऽ ट्टी! मंस्यूर ज्युलिआँ चाललेत गावाला." हे शब्द कानी येताच त्या वृत्ताने, मा. रेनॉलचे हृदय जणू प्राणघातक गारठ्याने शहारले व त्या जागच्या जागी थिजल्यासारख्या झाल्या. सद्वर्तनाच्या निश्चयाने त्या दुःखी झाल्या होत्या व आपल्या दुबळेपणाने तर आणखी अधिकच कष्टी झाल्या.

आता ह्या नव्या, ताज्या घटनेने त्यांचे मन आणि विचारशक्ती संपूर्णपणे व्यापून टाकली. त्यांनी व्यतीत केलेल्या त्या भयंकर रात्री घेतलेल्या शहाणपणाच्या निश्चयापासून त्या आता फार दूरवर, पलीकडे गेल्या होत्या. आणि आता त्यांच्यापुढे समस्या उभी राहिली होती ती ह्या मोहक प्रियकराला प्रतिकार करण्याची नव्हे, तर त्याला कायमचा गमाविण्याची.

त्यांना भोजनासाठी मेजाशी येऊन बसावेच लागले. आणि जखमेवर मीठ म्हणजे एम्. द रेनॉल व मा. डेरविल यांचे बोलणे चालू होते ते केवळ ज्यूलिआँच्या जाण्याबद्दलचेच. ज्या निर्धाराच्या सुरात ज्युलिआँने सुटीची मागणी केली होती त्यात महापौरांना नेहमीपेक्षा वेगळेच असे काही दिसून आले होते. ते स्वतःशी विचार करीत म्हणाले,

“ह्या तरुण शेतकऱ्याला कोणी तरी नोकरी देऊ केली आहे यात शंकाच नाही. पण तो कोणी, म. वालनो असला तरी, खचित थोडा नाऊमेद होईल. कारण वर्षाकाठी सहाशे फ्रँक्स एवढी रक्कम खर्चायची तयारी त्याला आता करावी लागेल ना? व्हेरिएरला काल ज्युलिआँने तीन दिवसांची मुदत मागून घेतली असेल, तेवढ्या अवधीत त्याला ह्या गोष्टीचा पूर्ण विचार करून निर्णय घ्यायचा असेल, अन् आज सकाळी हा लगेच डोंगराकडे जायला निघतो! मला जबाब देणं टाळण्यासाठी हे सारं, दुसरं काय? दिमाखानं भाव खाणाऱ्या अशा नादान कर्मचाऱ्यांशी जुळवून घेण्याची आमच्यावर आता पाळी येऊन ठेपली आहे!”

मा. रेनॉल स्वतःला विचारू लागल्या, ‘माझ्या पतीने ज्युलिआँच्या भावना दुखावल्या आहेत. त्याच्या अंतःकरणाला त्यांनी केवढी जखम केली आहे याची त्यांना कल्पना नाही. पण ज्युलिआँ ही नोकरी सोडून जाणार असं त्यांना तर वाटतंय. ह्यातून मी काय समजावं? हं; सगळं अगदी ठरून गेलेलंच दिसतंय.’

आपल्याला निदान मोकळेपणाने रडता तरी यावे आणि मा. डेरविल यांच्या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागणे टळावे म्हणून, आपले डोके फार ठणकत आहे असे मा. रेनॉल यांनी सांगितले आणि त्या आपल्या झोपण्याच्या खोलीत गेल्या.

एम्. द. रेनॉल यांनी आपला नेहमीचा शेरा मारून टाकला, “बायकांचं हे असंच नेहमी चाललेलं असतं. नेहमी त्यांचं काही ना काही बिघडलेलं असतं; गुंतागुंतीची यंत्रंच म्हणाना ही!” आणि आपल्या पत्नीचा उपहास असाच ठराविक पद्धतीने ते करीत राहिले.

मा. रेनॉल आकस्मिकपणे या भयंकर मनोविकाराच्या प्रभावाखाली सापडल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या मनाचा क्रूर छळ होत होता. त्यांचे अंतःकरण विद्ध, विदीर्ण झाले होते; आणि त्याच वेळी ज्युलिआँ डोंगराळ प्रदेशातील वनश्रीत आढळणाऱ्या अतिशय निसर्गरमणीय देखाव्यांमधून उल्हसित वृत्तीने आपला मार्ग आक्रमीत होता. पर्वतांची एक उंच रांग ओलांडून त्याला वेर्जीच्या उत्तरेकडे जाणे भाग होते. त्याची पुढील वाट चढणीची होती. ती मोठमोठ्या बीच वृक्षांच्या रायांमधून जात होती. चढण संपेपर्यंत पर्वताच्या कुशीत तिला असंख्य नागमोडी वळणे होती आणि पुढे उत्तरेस दू नदीचे खोरे लागत होते. समोरच्या, कमी उंचीच्या पर्वतरांगांनी दूच्या प्रवाहाला अडवून दक्षिणेकडे वळविले होते. तेथून नजर फेकणाऱ्या प्रवाशाला दिसणारा समोरचा टापू म्हणजे बर्गंडी व बोझोलेचा सुपीक सखल भूभाग होय. दू नदी त्याच्यातून वाहात जात होती.

ह्या महत्त्वाकांक्षी तरुणाचे अंतःकरण अशा स्वरूपाच्या निसर्गसौंदर्याला कदाचित साद न देणारे असावे. तरीही त्या अतिशय विस्तीर्ण व भव्य देखाव्याकडे टक लावून पाहण्यासाठी मधूनमधून थांबल्याशिवाय त्याला राहवले नाही.

अखेर त्या उत्तुंग पर्वताच्या शिखराशी तो पोहोचला. इमारती लाकडांचा तरुण व्यापारी व त्याचा मित्र फूके हा ज्या एकाकी दरीत राहात होता तेथे पोहोचण्यासाठी एक तिरपा मार्ग त्या शिखराच्या खालच्या बाजूने जात होता; व म्हणून तेथेच जाणे ज्युलिआँला भाग होते. तसे पाहिल्यास फूकेला किंवा इतर कोणा मनुष्याला भेटण्याची घाई ज्युलिआँला नव्हती. त्या उंच पर्वताच्या शिरोभागी असलेल्या उघड्या खडकांच्या आड तो पक्ष्यांची, पाखरांची पारध करणाऱ्या प्राण्याप्रमाणे छपला गेला होता. तेथून दूरवरपर्यंत व त्याच्या दिशेने येणारे कोणीही त्याला दिसू शकत होते. त्याला तेथे एक लहानशी गुहा आढळली. तेथील एका उभ्या

खडकाच्या तोंडाशी ती जवळजवळ सरळ काटकोनात होती. तो त्या गुहेकडे गेला; आणि लवकरच त्या एकीकडच्या आश्रयस्थानी स्थानापन्न झाला. त्याचे डोळे आनंदाने चमकले. तो स्वतःशी उद्‌गारला, "इथं माणसं मला कसलाही त्रास देऊ शकणार नाहीत." त्याला असे वाटले की, आता आपण आपले विचार इथे अगदी आरामात लिहून काढायला हरकत नाही. त्यांच्या शब्दांकनाचे ते सुख अनुभवणे इतर कोणत्याही ठिकाणी त्याच्या दृष्टीने धोक्याचे होते. एक मोठा, मऊ चौकोनी दगड तेथे होता. तो त्याला मेजासारखा उपयोगी पडला. ज्युलिआँ लगेच भरभर लिहू लागला. त्याच्या अवतीभवतीच्या देखाव्याकडे त्याने पाहिलेही नाही. अखेरीस दूरच्या बोझोले पर्वतामागे सूर्य मावळू लागला असल्याचे त्याला दिसून आले.

त्याने स्वतःला विचारले, 'रात्र इथेच घालवायला काय हरकत आहे? मजजवळ पाव आहे अन् मी स्वतंत्र आहे." पण 'स्वतंत्र' या महान शब्दाबरोबर त्याच्या हृदयाचे ठोके वाढले. तो बतावणी करीत होता. म्हणजे खुद्द फूकेच्या सहवासातसुद्धा तो स्वतंत्र नव्हता. डोक्याला दोन्ही हात लावून तो बसला. स्वतःच्या जीवनात पूर्वी कधी नव्हता इतका तो त्या गुहेत अगदी सुखी होता; आणि तो आपल्या दिवास्वप्नात गढून गेला, स्वतःच्या स्वातंत्र्याच्या आनंदात रंगून गेला. मावळतीचे अखेरचे किरण एकामागून एक निस्तेज होऊन विलयास जात होते. ते त्याला दिसत होते. पण त्यांच्याकडे त्याचे लक्षच नव्हते. पॅरिसमध्ये आपल्याला कधी तरी एक दिवस जे काही प्राप्त होईल त्याची कल्पना करीत आणि त्याच्या चिंतनात त्याचा आत्मा त्या अथांग अंधःकारात भ्रमंती करू लागला.

त्याच्या त्या कल्पना व विचार-विश्वात प्रथम आणि प्रामुख्याने अवतरली ती एक स्त्री. त्या प्रदेशात ज्या स्त्रिया पाहण्याचे त्याच्या वाट्याला आले होते त्यांच्यापेक्षा ही स्त्री खूपच जास्त सुंदर व अधिक बुद्धिमान होती. त्याने तिच्यावर उत्कट आवेगाने प्रेम केले आणि उलट तिनेही त्याच्यावर तसेच प्रेम केले. स्वतःभोवती प्रतिष्ठेचे वलय निर्माण करण्यासाठी व अधिक उत्कट प्रेम स्वतःवर केले जाण्याचा हक्क मिळविण्यासाठी तो तिच्यापासून प्रयत्नाने काही क्षण अलग झाला.

पॅरिसच्या दुःखमय वास्तव सृष्टीत वाढलेल्या एखाद्या तरुणाला ज्युलिआँची कल्पनाशक्ती जरी आपण बहाल केली तरी त्याला त्याच्या प्रणयतंद्रीच्या या क्षणाला उपरोधाच्या थंडगार स्पर्शाने एकदम जाग आली असती, मोठी पराक्रमाची कृत्ये ती साकार करण्याच्या आशेबरोबरच नाहीशी झाली असती आणि तो सुप्रसिद्ध व नित्यसत्य वाक्प्रचार त्यांच्याबद्दल वापरावा लागला असता. "पुरुष जेव्हा आपल्या प्रियकरणीपासून दूर जात असतो तेव्हा त्याचा विश्वासघात होण्याचा धोका रोज दोनदा किंवा तीनदा असतो." पण तो स्वतः आणि ती महान शौर्य कर्मे यांच्यामध्ये ह्या तरुण शेतकऱ्याला मात्र कोणतीच अडचण दिसली नाही, वांधा होता तो फक्त संधी मिळण्याचा.

पण दिवस संपून आता रात्रीचा काळाकुट्ट अंधार पडला होता व फूके राहात होता त्या खेड्यात पोहोचण्यासाठी ज्युलिआँला अजून सहा मैलांचे (दोन लीग्ज) अंतर काटून जायचे होते. ती छोटी गुहा सोडण्यापूर्वी ज्युलिआँने काडी ओढली आणि त्याने जे काही लिहिलेले होते ते सगळे तेथे काळजीपूर्वक जाळून टाकले.

उत्तररात्रीचा एक वाजण्याचा सुमार होता. ज्युलिआँने आपल्या मित्राच्या दारावर टकटक करून त्याला आश्चर्याचा धक्का दिला. त्या वेळी फूके स्वतःचे हिशेब लिहीत असलेला ज्युलिआँला दिसला. तरुण

फूके उंच बांध्याचा होता. त्याचे नाक मोठे होते. चेहेरेपट्टी फताडी व राकट होती. त्याचा बांधा व रूप एकंदरीने फारसे चांगले नव्हते. पण अप्रिय वाटणाऱ्या त्याच्या दर्शनाच्या मागे सुस्वभाव भरपूर प्रमाणात दडलेला होता.

"तू तुझ्या मन्स्यूर रेनॉलशी भांडून इकडे असा अचानक आला आहेस ना?" आदल्या सायंकाळी घडलेल्या घटनांपैकी सोईस्कर तेवढ्या वगळून बाकीच्या ज्युलिआँने आपल्या मित्राला कथन केल्या. त्यावर फूके त्याला म्हणाला,

"आता तू माझ्याकडे राहा. एम्. द. रेनॉल, म. वालनो, सब-प्रिफेक्ट मोजिराँ, पाद्री शॅलाँ यांना तू ओळखतोस हे मला ठाऊक आहे. त्यांच्या स्वभावातल्या सगळ्या खुब्या तू उमगला आहेस. अरे, आता तू एवढा तयार झाला आहेस की, तुला आपल्याकडे नोकरीला ठेवण्यासाठी लोकांत लिलावासारखी चढाओढ लागेल. तुला माझ्यापेक्षा अंकगणित चांगले येते. तू माझे हिशेब लिही. माझ्या धंद्यात आता मला छानदार कमाई होते. आता प्रत्येक गोष्टी मी स्वतः करणे मला अशक्य आहे; आणि माझा भागीदार म्हणून मी एखाद्याला घ्यावं अन् तो बदमाश निघावा याची मला भीती वाटते. ह्या दोन गोष्टींमुळे मोठ्या फायद्याचे व्यवहार अंगावर घेण्यात मला रोज अडचण येते. अजून महिनाही झाला नाही, सेंट ॲमॉच्या मिशोला मी सहा हजार फ्रँक्सची कमाई करून देऊन त्याचा खिसा भरला. त्यापूर्वी सहा वर्षे त्याची माझी भेट झालेली नव्हती; आणि योगायोगाने तो मला पाँतारलिएच्या लिलावात भेटला. मग ते सहा हजार फ्रँक्स, निदान त्यातले तीन हजार तरी तुला मिळायला कोणती अडचण होती? तू जर त्या दिवशी माझ्याबरोबर असतास तर मी त्या इमारती लाकडाच्या लिलावात आणखी बोलत गेलो असतो अन् मग त्या दुसऱ्याने भाव चढविणे सोडून दिले असते. म्हणजेच तो लिलाव माझ्या पदरात पडला असता तेव्हा तू माझा भागीदार हो."

फूकेने देऊ केलेली ही भागीदारी ज्युलिआँला त्रासदायक वाटली. तिने त्याचे अनिश्चित मन अस्थिर, अशान्त केले. फूके एकटाच राहात असे. होमरच्या लढवय्या- त्या दोघांनी रात्री स्वयंपाक करून जेवण बनविले. जेवण चालू असता फूके त्याच्या व्यापारात कमाईला केवढा वाव होता हेही फूके सिद्ध करून दाखवीत होता. ज्युलिआँची बुद्धिमत्ता आणि चारित्र्य यांच्याबद्दल फूकेचे फार चांगले मत होते.

चहू बाजूंनी फर वृक्षांच्या लाकडाच्या फळ्या लावून तयार केलेल्या तिथल्या त्या छोट्या खोलीत अखेर ज्युलिआँ एकटा होता तेव्हा तो स्वतःशी बोलू लागला, 'इथं राहून मी काही हजार फ्रँक्स कमावू शकेन हे खरं आहे आणि मग, फ्रान्समधील सध्याच्या रिवाजानुसार लष्करी नोकरीत अथवा पाद्र्यांच्या व्यवसायाकडे मी जास्त अनुकूल परिस्थितीत परत जाऊ शकेन. माझ्याजवळ जी काय पुंजी साचेल तिच्या सहाय्याने मी माझ्यापुढील सगळ्या बारीकसारीक अडचणी निवारू शकेन. ह्या पर्वत-परिसरात मी एकटा असलो म्हणजे अनेक गोष्टींबद्दल माझं सध्याचं जे भयंकरच अज्ञान आहे ते नाहीसं करण्यासाठी मी काही तरी करू शकेन. ह्या सगळ्या फॅशनेबल सदगृहस्थांची मने ह्या अशाच गोष्टींनी व्यापलेली असतात; पण फूके लग्नाचा विचार करीत नाही; आणि एकटेपणा तर त्याला उदास करीत असतो असं त्याने मला पुन्हा पुन्हा सांगितलं आहे. तेव्हा हे उघड आहे की ज्याच्याजवळ धंद्यात घालायला भांडवल नाही अशा माणसाला तो आपला भागीदार म्हणून घेत आहे यामागे तो अशी आशा बाळगून असावा की, स्वतःला कधीही सोडून न जाणारा जोडीदार त्याला मिळावा.'

मधेच रागाने ज्युलिआँने उद्गार काढले, "मी माझ्या मित्राचा विश्वासघात करावा काय?" ढोंग आणि सहानुभूतीचा संपूर्ण अभाव ह्या गोष्टी ज्या प्राण्याच्या बाबतीत वागणुकीची सामान्य पद्धती होती त्याला,

अनुक्रमणिका

या ज्युलिआँला, त्याच्यावर प्रेम करणाऱ्या माणसाशी वागताना एवढेसुद्धा गैरवाजवी वर्तन करण्याची कल्पना या वेळी सहन होत नव्हती.

पण फूकेला नकार देण्यासाठी स्वतःजवळ एक कारण आहे या विचाराने ज्युलिआँला एकदम आनंद झाला. "मी सात-आठ वर्षे विनाकारण आळशीपणे दवडायची काय? म्हणजे तेव्हा मी अट्ठावीस वर्षांचा असेन. पण त्या वयापूर्वीच नेपोलिअनने त्याच्या जीवनातील सर्वांत महान असे पराक्रम गाजवून दाखविले होते. समजा, ह्या सगळ्या इमारती लाकडांच्या विक्री-व्यापारातून मी थोडाफार पैसा कष्टाने जमा केला (—अर्थात कीर्ती मिळविण्याचे नावच नको या कामात) आणि ह्या निरनिराळ्या लहानसहान पाजी माणसांची मर्जी संपादन केली तर नंतर माणसाला नावलौकिक मिळविण्यासाठी आवश्यक असलेली ती प्रेरणेची उत्साहपूर्ण पवित्र ज्वाला माझ्या अंतःकरणात त्यानंतरही तेवत राहील याची खात्री कोणी सांगावी?"

दुसऱ्या दिवशी सकाळी ज्युलिआँने अतिशय थंडपणे आपल्या सन्मान्य मित्राला, फूकेला उत्तर दिले. त्या दोघांच्या भागीदारीचा प्रश्न सुटलाच आहे असे फूके गृहीत धरून चालला होता. धर्मोपदेशकाच्या पवित्र व्रताने आपण चर्चमधल्या वेदीशी बांधले गेल्यामुळे एखाद्या व्यवहारात आपल्याला अशी भागीदारी पत्करता येत नाही असे ज्युलिआँने फूकेला सांगितले. तेव्हा स्वतःच्या कानावर फूकेचा विश्वासच बसला नाही. तो ज्युलिआँला सांगू लागला, "पण ह्या धंद्यात मी तुला माझा भागीदार करीत आहे याचा अर्थ तू नीट लक्षात घेतला आहेस ना? अथवा तुला पसंत असल्यास मी वर्षाकाठी चार हजार फ्रँक्स तुला देत जाईन. आणि ते सोडून तुझ्या मन्स्यूर रेनॉलकडे परत जायचं म्हणतोस? अरे, पायताणावरच्या चिखलाप्रमाणे ते तुझा तिरस्कार करतात की रे! तुझ्या हातात दोनशे लुइ असले म्हणजे सेमिनरीत जाण्यापासून तुला कोण अडवणार आहे? मी तर पुढे जाऊन आणखी असेही म्हणेन की, ह्या जिल्ह्यातील चर्च व तेथील धर्मोपदेशकाची सर्वोत्कृष्ट जागा तुला मिळवून देण्याची जबाबदारी मी स्वीकारतो." आणि आपला आवाज खाली आणून फूके पुढे म्हणाला, "कारण मीच त्या... त्या मंन्स्यूर... ल... आणि ... ल... वगैरेंना जळण पुरवीत असतो. मी त्यांना ओक झाडांचे उत्तम लाकूड पुरवितो व ते मला सफेद लाकडाचे पैसे त्याबद्दल देतात. पण पैशाची यापेक्षा अधिक चांगली गुंतवणूक कधी केली गेली असेल असं मला वाटत नाही."

ज्युलिआँने स्वतःसाठी निश्चित केलेल्या व्यवसायाविरुद्ध कशाचीही मात्रा चालू शकली नाही. तो थोडा वेडपट, चक्रम असला पाहिजे असे शेवटी फूकेने ठरविले. तिसऱ्या दिवशी पहाटे ज्युलिआँ फूकेचा निरोप घेऊन निघाला. त्या मोठ्या पर्वतावरील खडकामधल्या गुहेत एक दिवस घालविण्याची त्याची इच्छा होती. त्याप्रमाणे ती छोटी गुहा त्याला सापडलीही; पण मागच्या खेपेप्रमाणे त्याला तेथे मनस्वास्थ्य मात्र लाभले नाही. कारण त्याच्या मित्राने त्याला देऊ केलेल्या त्या व्यवसायाच्या संधीने ते हरपून गेले होते— हर्क्युलसप्रमाणे त्याच्यावर पाळी येऊन ठेपली होती ती दुर्गुण व सद्‌गुण यांच्यामध्ये निवड करण्याची नव्हे, तर निश्चित आरामात जिचे पर्यवसान होते अशी, चारचौघांसारखी मध्यम प्रतीची जीवनमात्रा आणि त्याच्या तारुण्यातील सर्व मर्दुमकीची स्वप्ने यांच्यामध्ये निवड करण्याची. तो स्वतःशी म्हणाला,

"म्हणजे माझ्या वृत्तीत खराखुरा निग्रह, खंबीरपणा नाही." आणि याच शंकेने तो अतिशय दुःखी झाला. "मोठ्या माणसांचे अंगभूत गुण माझ्यात नाहीत असे दिसते. कारण मोठ्या माणसांच्या हातून अचाट कृत्ये घडून येण्यासाठी जी उदात्त क्रियाशक्ती असावी लागते ती, स्वतःच्या पोटाची तरतूद करण्यात खर्चावी लागणारी आठ वर्षे, माझ्यातून नष्ट करतील अशी भीती मला वाटते."

★ ★ ★

अनुक्रमणिका

## प्रकरण तेरावे

# जाळीदार पायमोजे

वेर्जीच्या जुन्या चर्चचे सुंदर अवशेष ज्युलिआँच्या दृष्टिपथात आले तेव्हा त्याच्या लक्षात आले की, दोन सबंध दिवसांत त्याला मादाम रेनॉल यांची आठवण एकदासुद्धा झाली नव्हती. "त्या दिवशी मी त्यांच्याकडून निघालो तेव्हा त्या स्त्रीने तिच्या व माझ्यामध्ये असलेल्या विस्तीर्ण दरीची आठवण मला करून दिली. तिने मला कामगाराच्या मुलासारखे वागविले. आदल्या रात्री तिने मला तिचा हात धरू दिला याबद्दल तिला झालेला पश्चात्ताप मला दाखविण्याची तिची इच्छा होती यात शंकाच नाही.... तथापि तिचा हात कमनीय आहे एवढं खरं. त्या स्त्रीच्या नेत्रकटाक्षात केवढी मोहकता, केवढा खानदानी उमदेपणा आहे!"

फूकेच्या सहकार्याने नशीब काढण्याच्या शक्यतेने ज्युलिआँच्या विचारसरणीला एका विशिष्ट दिशेने सोइस्कर चालना दिली होती. स्वतःच्या दारिद्र्याची तीव्र जाणीव, चित्तक्षोभ आणि जगाच्या नजरेतील त्याचा खालचा दर्जा यांचा अडथळा त्याच्या विचारांना त्या मानाने कमी वेळा झाला होता. जणू काही एखाद्या उंच स्थानी स्वतःला बसवून तो स्वतःच्या बाबतीत न्यायनिवाडा करू शकत होता, आणि जसा काही एका बाजूला अतिदारिद्र्याकडे आणि दुसऱ्या बाजूला सुखासीन जीवनाकडे (— यालाच तो अजूनही अफाट संपत्ती-मद समजे) उंचावरून पाहात होता. तथापि एखाद्या तत्त्ववेत्त्याप्रमाणे स्वतःची वैचारिक भूमिका तपासण्याचे सामर्थ्य त्याच्यात नव्हते. पण पर्वत-परिसरात तो छोटा प्रवास केल्यापासून आपणात काही बदल झाला आहे एवढे समजण्यापुरती सूक्ष्मदृष्टी त्याच्यात होती.

मा. रेनॉल यांनी त्याला त्याच्या प्रवासाबद्दल विचारले तेव्हा त्याने त्याबद्दलची हकीगत थोडक्यात त्यांना सांगितली. पण ती ऐकताना मादामना अतिशय अस्वस्थता वाटत होती हे लक्षात घेऊन त्याला अचंबा वाटला.

फूकेची प्रेमप्रकरणे शोकान्त ठरली होती. त्याच्या डोक्यात विवाहाचे विचार येत असत. त्या दोघा मित्रांमध्ये जी संभाषणे होत त्यांत अशाच प्रकारची लांब लांब गुप्त हितगुजे असत. प्रेम सफल होऊन सुखाची अनुभूती फारच लवकर आल्यानंतर, घरात प्रियकरीण म्हणून आणलेल्या स्त्रीच्या हृदयाचा तो एकमेव स्वामी नसल्याचा शोध फूकेला लागला होता. असल्या गोष्टींचा गौप्यस्फोट तो ज्युलिआँजवळ करी तेव्हा त्याला फार आश्चर्य वाटे. अनेक नव्या गोष्टींचे ज्ञान ज्युलिआँला त्यातून मिळाले होते. त्याचे एकाकी जीवन, कल्पनेच्या भराऱ्या आणि संशय यांनी भरलेले होते. जिची माहिती मिळून त्याला काही बोध होऊ शकला असता अशा प्रत्येक गोष्टींपासून त्या एकाकीपणाने त्याला अलग ठेविले होते.

ज्युलिआँच्या गैरहजेरीत मा. रेनॉल यांचे दैनंदिन जीवन म्हणजे यातनांची एक मालिकाच होऊन बसले होते. ज्या प्रत्येक यातनेचे दुःख वेगवेगळे होते. तथापि परिणामाच्या दृष्टीने त्या सगळ्याच यातना त्यांना असह्य होत्या. मा. रेनॉल खरोखरीच आजारी होत्या.

ज्युलिआँ परत आलेला पाहिल्यावर मा. डेरविल मा. रेनॉलना म्हणाल्या, "तुला हे असे बरे वाटत नसताना, काही झाले तरी आज संध्याकाळी तू बागेत बसता कामा नये. त्या दमट हवेचा तुला जास्तच त्रास होईल."

अनुक्रमणिका

मा. रेनॉल नेहमी फार साधाच पोषाख वापरीत असत. त्या विशोभित साधेपणावरून एम. रेनॉल त्यांच्यावर नेहमी रागवत. पण मा. रेनॉलनी, पॅरिसहून आणण्यात आलेले छानदार जाळीदार पायमोजे आणि छोटेसे आकर्षक बूट आज घातलेले पाहून मा. डेरविलना आपल्या मैत्रिणीबद्दल आश्चर्य वाटले. गेल्या तीन दिवसांत मा. रेनॉलनी आपले मन जर कोणत्या एका गोष्टीत गुंतवले असेल तर ते तेव्हा फॅशन म्हणून खूपच लोकप्रिय असलेल्या आकर्षक कापडाचा उन्हाळी झगा बेतण्यात आणि एलिसाकडून तो घाईने शिवून घेण्यात. अशा ह्या झग्याचे शिवणकाम, ज्युलिआँच्या आगमनानंतर काही क्षणांतच पूर्ण करणे शक्य झाले होते. आणि त्यामुळे मा. रेनॉलनी तो झगा लगेचच अंगावर चढविला होता. साहजिकच मा. डेरविलना आता कसलीच शंका उरली नव्हती.

"बिचारी रेनॉल प्रेमात पडली आहे" त्या स्वतःशी पुटपुटल्या. मा. रेनॉल यांच्या आजाराच्या चमत्कारिक लक्षणांचा अर्थ त्या उमजल्या.

मा. रेनॉल ज्युलिआँशी बोलत असता मा. डेरविलनी त्यांना पाहिले. लज्जेच्या आत्यंतिक रक्तिम्याची जागा निस्तेज फिकेपणाने घेतली होती. त्या तरुण शिक्षकाच्या डोळ्यांवर खिळलेल्या, मा. रेनॉल यांच्या नजरेत चिंता स्पष्ट दिसत होती. प्रवासाला एकदम निघून गेल्याबद्दलचे स्पष्टीकरण ज्युलिआँ करील आणि ह्या घरी आपण राहणार आहोत की ते सोडून जाणार आहोत हे तो सांगेल अशी अपेक्षा मा. रेनॉल हरक्षणी करीत होत्या. पण ज्युलिआँच्या विचारांत तो विषयच उद्‌भवला नव्हता आणि म्हणून त्याबद्दल आपण काही सांगितले पाहिजे हे त्याच्या लक्षात अजिबात आले नाही.

"दुसरीकडे एखादी नोकरी पतकरण्यासाठी तुम्ही तुमच्या विद्यार्थ्यांना सोडून जाणार आहात काय?" मनातील भयंकर झगड्यानंतर मा. रेनॉल यांनी अखेर धीर धरून ज्युलिआँला कापऱ्या आवाजात विचारले आणि त्यांतून त्यांचे मनोविकार पूर्णपणे स्पष्ट व्यक्त केले गेले.

मा. रेनॉल यांच्या आवाजातील तो कंप आणि त्यांच्या नजरेतील विशिष्ट भाव यांनी ज्युलिआँ स्तिमित झाला. तो स्वतःला म्हणाला, "ही स्त्री माझ्यावर प्रेम करीत आहे. तिच्या या क्षणिक कमकुवतपणाबद्दल तिचे अभिमानी तिला दोष देत आहेत. पण तिची ही अवस्था क्षणांतराने संपल्यावर आणि माझ्या जाण्याबद्दलचे तिचे भय नाहीसे झाल्यावर ती पुन्हा तिच्या पूर्वीच्या ताठ्याने व आढ्यतेने माझ्याशी वागू लागेल." त्यांच्या दोघांच्या भूमिकांतील हा उच्चनीचतेचा भेद ज्युलिआँच्या डोक्यात विजेसारखा चमकून गेला. ज्युलिआँने घुटमळत उत्तर दिले, "अशा मोहक अन् कुलीन मुलांना सोडून जायचं म्हणजे मला फार खेद होईल. पण कदाचित ते अपरिहार्य म्हणावं लागले. माणसाला स्वतःविषयीचीही कर्तव्ये असतातच की."

बोलताना ज्युलिआँने "कुलीन" हा शब्द वापरला. (त्याने अलीकडे, उच्चकुलीन बडे लोक वापरीत असलेले जे विशिष्ट शब्दप्रयोग आत्मसात केले होते त्यापैकी तो एक होता.) तेव्हा तो शब्द उच्चारताना त्याच्या मनात तीव्र, जळजळीत द्वेषभावना उसळली. "ह्या स्त्रीच्या दृष्टीने मी उच्च कुलीन नाही!" तो स्वतःशी उद्‌गारला.

ज्युलिआँचे बोलणे ऐकत असताना मा. रेनॉल त्याच्या बुद्धिमत्तेची व सौंदर्याची तारीफ आपल्या मनात करीत होत्या त्याने त्याच्या जाण्याची शक्यता त्यांच्यापुढे टांगती ठेवल्याचे त्यांचे अंतःकरण विद्ध झाले होते.

अनुक्रमणिका

ज्युलिआँ बाहेरगावी गेला होता त्या अवधीत मा. रेनॉल यांच्याकडे व्हेरिएरहून त्याच्या ज्या मैत्रिणी भोजनासाठी वेर्जीला आल्या होत्या त्या सगळ्यांमध्ये, मा. रेनॉल यांच्या यजमानांनी शोध करून सुदैवाने मिळावलेल्या ह्या विस्मयजनक तरुणाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्याची एकमेकीत जवळजवळ स्पर्धाच लागली होती. तथापि त्याचा अर्थ असा नव्हता की, ज्युलिआँच्या मार्गदर्शनाखाली, रेनॉल यांच्या मुलांनी केलेल्या प्रगतीबद्दलची काही माहिती त्या मैत्रिणींना झालेली होती. ज्युलिआँला बायबल मुखोद्गत होते व तेसुद्धा लॅटिनमध्ये, ह्या विलक्षण गोष्टीने व्हेरिएरच्या रहिवाशांमध्ये त्याच्याविषयी असे काही कौतुक निर्माण केले होते की जे पुढे शतकभर टिकले असते.

ज्युलिआँ कोणाशीही बोलत नसे. त्यामुळे त्याला ह्या सगळ्या गोष्टींपैकी काहीच माहीत नव्हते. मा. रेनॉलनी जर या वेळी स्वतःच्या भावनांवर थोडासा जरी ताबा ठेवला असता तर त्यांनी ज्युलिआँचे, त्याने मिळविलेल्या या कीर्तीबद्दल अभिनंदन केले असते. आणि मग ज्युलिआँचा डिवचलेला स्वाभिमान शांत झाला असता व तो त्यांच्याशी गोडीने, प्रेमाने वागला असता. शिवाय मा. रेनॉलचा नवा झगा त्याला फारच सुंदर वाटला होता व त्यामुळे त्याच्या वागण्यातली गोडी अधिकच वाढली असती. मा. रेनॉल स्वतःही आपल्या त्या छानदार झग्यावर खूपच खूष होत्या; आणि ज्युलिआँ त्याबद्दल त्यांच्यापाशी जे बोलला होता त्यामुळे तर त्यांची खुषी वाढली होती. त्या खुषीच्या भरात त्यांनी बागेत फेरफटका मारण्याची सूचना केली, पण तेथे चालण्याइतकी त्यांची प्रकृती ठीक नसल्याचे त्यांनी लगेच सांगितले. प्रवासातून परतलेल्या ज्युलिआँच्या बाहूचा आधार त्यांनी घेतला तेव्हा थोडे जास्त बळ प्राप्त होण्याऐवजी त्याच्या बाहूच्या स्पर्शाने आपले थोडे होते नव्हते तेही बळ गमाविल्यासारखे त्यांना वाटले.

आता अंधार पडला होता. बागेत ते बसल्याबरोबर ज्युलिआँने, पूर्वीच प्राप्त करून घेतलेल्या अधिकारानुसार, मा. रेनॉल यांच्या बाहूवर आपले ओठ, धीर करून दाबले; आपल्या शेजारी बसलेल्या त्या छबकड्या युवतीचा हातही त्याने स्वतःच्या हाती घेतला. पण त्या क्षणी त्याच्या डोक्यात विचार चालला होता मा. रेनॉल यांच्याबद्दलचा नव्हे; तर फूकेचा; व तो आपल्या प्रिय प्रेमपात्रांशी ज्या धिटाईने वागत असे त्याबद्दलचा. 'कुलिन' हा शब्द त्याच्या अंतकरणाला अजून बोचत होता. नंतर त्याचा स्वतःचा हात दाबला गेला; पण त्यापासून त्याला संतोष प्राप्त झाला नाही. संध्याकाळी मा. रेनॉलनी आपले प्रेम स्पष्ट संकेतांनी दाखविले होते. पण त्याबद्दल त्याला कृतज्ञता अथवा अभिमान तर मुळीच वाटला नाही. वागण्यातील रुबाब, देहसौंदर्य आणि कांतीचा टवटवीतपणा यांचा त्याच्यावर जवळजवळ काहीच परिणाम होत नसे. अंतःकरणाची शुचिता व द्वेषभावनेपासून अलिप्तता हे गुण तारुण्यकाळ टिकवितात यात शंकाच नाही. बहुतेक सुंदर स्त्रियांच्या बाबतीत त्यांचा चेहरा वार्धक्य प्रथम व्यक्त करीत असतो.

सबंध संध्याकाळभर ज्युलिआँ तिरसटल्यासारखाच होता. आतापर्यंत तो फक्त आपल्या नशिबावर रागावत असे, समाजावर चिडत असे. पण आता फूकेने सुखासीन जीवनासाठी एक हीन मार्ग सुचविला होता आणि त्यामुळे आता तो स्वतःवरही रागावला होता. याप्रमाणे तो स्वतःच्या विचारात गुंग होता; अधूनमधून त्या महिलांशी तो थोडेसे काही बोलत होता. पण शेवटी विचारांच्या तंद्रीत त्याने मा. रेनॉल यांचा हात स्वतःला न कळत सोडून दिला. त्याच्या ह्या कृतीने बिचाऱ्या मा. रेनॉल पूर्णपणे बुचकळ्यात पडल्या. त्याचे तसे वागणे हे आपल्या भावी नशिबाचे सूचक आहे असे त्यांना वाटले.

ज्युलिआँच्या प्रेमाची त्यांना खात्री असती तर त्याचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य त्यांना स्वतःच्या सद्गुणांमुळे कदाचित आले असते. आपण ज्युलिआँला कायमचे गमावून बसू या विचाराने त्यांचा थरकाप

उडाला. विमनस्क वृत्तीत ज्युलिआँने तेव्हा आपला हात मागे, खुर्चीच्या पाठीवर ठेवला होता. पण मा. रेनॉल यांना त्यांच्या उत्कट मनोविकारांनी येथवर ओढून नेले की, त्यांनी तो हात आवेगाने पकडला. त्यांच्या ह्या कृतीने त्या महत्त्वाकांक्षी तरुणाला चेतविले. रेनॉलच्या मित्रपरिवारातील सर्व गर्विष्ठ उमरावांनी ती कृती पाहायला हवी होती असे ज्युलिआँला वाटले. कारण भोजनाच्या वेळी मुलांना घेऊन तो मेजाच्या खालच्या बाजूला बसे तेव्हा एखाद्या आश्रिताकडे मेहेरबानीदाखल हसून पाहावे तसे ते त्याच्याकडे पाहात. ज्युलिआँ स्वतःशी म्हणाला, "आता ही स्त्री यापुढे मला हलका समजू शकणारच नाही. आणि तसे झाले म्हणजे तिच्या सौंदर्याने मी विचलित झाले पाहिजे. आता तिचा प्रियकर होणे हे माझ्या दृष्टीने फायद्याचेच आहे." —त्याच्या मित्राने आपल्या प्रेमप्रकरणांच्या गुप्त गोष्टी साधेभोळेपणाने त्याला ऐकविण्यापूर्वी अशी काहीही कल्पना त्याच्या मनात आली नसती.

ज्युलिआँच्या ह्या झटपट झालेल्या निश्चयाने त्याच्या विचारांना मनोरंजक वळण दिले. तो स्वतःशी उद्‌गारला, "ह्या दोघांपैकी एकजण मला मिळविली पाहिजे." त्याच्या हे लक्षात आले की, प्रणयाराधनाच्या दृष्टीने त्या दोघींत मा. डेरविल त्याला जास्त पसंत पडल्या असत्या. पण त्यांची अधिक आकर्षता हे काही त्याचे कारण नव्हते; तर या त्याच्याकडे नेहमी, विद्वत्तेमुळे मान्यता पावलेला एक शिक्षक या नात्याने पाहात आल्या होत्या. उलट, मा. रेनॉल यांच्याकडे तो प्रथम आला तेव्हा, काम करणारा एक सुतार—जाड्याभरड्या कपड्याचा कोट गुंडाळून खाकेत मारलेला, असा त्यांच्या नजरेस पडला होता. मा. रेनॉल यांच्याप्रमाणे मा. डेरविल त्याच्याकडे ह्या दृष्टिकोणातून पाहात नव्हत्या.

मा. रेनॉल यांच्या डोळ्यांसमोर ज्युलिआँचे जे चित्र निश्चित स्वरूपात उभे राही ते लाजाळू नजरेच्या, घराच्या दरवाज्यापुढे घोटाळणाऱ्या, घंटी वाजविण्यास न धजावणाऱ्या एका तरुण कामगाराचे होते; आणि त्याचे हेच स्वरूप पाहण्यात त्यांना मजा वाटे. गावातील रहिवासी त्यांना एक खूप ताठर, गार्विष्ठ स्त्री म्हणून समजत. पण त्यांनी दर्जाचा विचार क्वचितच केला असेल. एखादा माणूस उच्च कुलात जन्मला म्हणून त्याचे चरित्र उज्ज्वल असले पाहिजे या अपेक्षेपेक्षा त्याच्या मनावर एखादे क्षुल्लक, छोटेसे कर्तृत्व अधिक परिणाम करून जाई. तोंडात चिलीम व ओठावर भपकेबाज मिश्या असलेल्या एखाद्या उग्र अशा हत्यारबंद घोडेस्वार कॅप्टनपेक्षा, ज्याने मर्दुमकी गाजविली आहे असा एखादा गाडीवान त्याच्या दृष्टीने अधिक शूर ठरे! त्यांच्या कोणत्याही नातेवाईक चुलत-मामेभावापेक्षा ज्युलिआँचे अंतःकरण अधिक उदार आहे असा त्यांचा विश्वास होता; आणि तरी ती सगळी चुलत आते-मामे भावंडे उच्च कुलोत्पन्न होती व काहींना तर सन्मानाच्या पदव्याही होत्या.

आपल्या एकंदर परिस्थितीचा आढावा घेता घेता मा. डेरविल यांना जिंकण्याच्या प्रयत्नांचा पाठपुरावा आपण करता कामा नये असे ज्युलिआँच्या लक्षात आले. कारण मा. रेनॉल यांजकडून त्याच्या बाबतीत दाखविली जाणारी आसक्ती बहुधा मा. डेरविल यांच्या लक्षात आलेली असावी. यामुळे ज्युलिआँचे मन मा. रेनॉल यांच्याकडे सक्तीने परत वळले. मग त्याने स्वतःला विचारले, "ह्या स्त्रीच्या चारित्र्याविषयी मला काय माहीत आहे? केवळ एवढेच की परगावी जाण्यापूर्वी मी तिचा हात माझ्या हाती घेतला असता तिने तो काढून घेतला आणि आज मी माझा हात काढून घेतला तर तिने तो बळे पकडला अन् दाबला. तिने माझ्याबद्दल जेवढा तिरस्कार दाखविला त्याची परतफेड करण्यास ही चांगली संधी आहे. तिचे किती प्रियकर होऊन गेले ते त्या परमेश्वरालाच ठाऊक! माझ्यावर मेहेरबानी दाखवायचे तिने ठरविले आहे ते कदाचित आमच्या भेटीच्या सुलभतेमुळे असावे."

अरेरे! अतिरिक्त सुधारणेमध्ये हा एक मोठा तोटा असतो! वयाच्या विसाव्या वर्षी तरुण माणसाचे हृदय, त्याला काही शिक्षण मिळालेले असल्यास बेदरकारीच्या ("पाहून घेवो तो सैतान" अशा) मनोवृत्तीपासून तीन हजार मैल (हजार लीग्ज) दूर असते; आणि त्या स्वरूपाच्या मनोवृत्तीशिवाय तर प्रेम हे पुष्कळदा अत्यंत कंटाळवाणे कर्तव्य ठरते.

क्षुद्र, पोकळ डौलाने ज्युलिआँ पुढे आणखी विचार करू लागला. "आता ह्या स्त्रीवर जय मिळविणे हे माझ्या हिताच्या दृष्टीने जास्तच श्रेयस्कर आहे. म्हणजे मी जर माझ्या आयुष्यात यदाकदाचित नशीब काढलेच आणि शिक्षकाच्या एका अत्यंत हलक्या स्थानावर मी काम करीत राहिल्याबद्दल जर मला कोणी दोष दिला तर मी त्याला लगेच सांगेन की त्या जागेवर मी राहिलो याचे कारण म्हणजे प्रेम."

ज्युलिआँने आपला हात मा. रेनॉल यांच्या हातातून पुन्हा एकवार काढून घेतला. मग पुन्हा त्यांचा हात स्वतःच्या हाती घेतला आणि दाबला. मध्यरात्रीच्या सुमारास ते दिवाणखान्यात परतले तेव्हा मा. रेनॉल त्याच्या कानात पुटपुटल्या,

"तुम्ही आम्हांला सोडणार आहात? तुम्ही दूर निघून जाणार आहात काय?"

उसासा टाकीत ज्युलिआँ म्हणाला, "मला खरोखरी गेलंच पाहिजे. कारण मी तुमच्यावर अतोनात प्रेम करीत आहे व ते पाप आहे; आणि एका तरुण पाद्र्याच्या दृष्टीने तर केवढं पाप ते!"

मा. रेनॉल ज्युलिआँच्या बाहूवर कलल्या आणि त्याच्या गालाचा उबदार स्पर्श स्वतःच्या गालाला जाणवण्याइतके त्या त्याच्याकडे वाकल्या.

त्या दोन्ही व्याक्तींना ती रात्र अगदी वेगवेगळ्या प्रकारे गेली. मा. रेनॉलच्या अंतःकरणात नैतिक सुखाचा आनंद उचंबळून आला होता. जी चवचाल मुलगी अल्प वयात प्रेमात पडते तिला प्रेमाची दुःखे सहन करणे अंगवळणी पडते. खऱ्या, उत्कट प्रेमाची जाण येण्याच्या वयात जेव्हा ती येते तेव्हा तिला नाविन्याच्या मोहिनीची उणीव भासते. मा. रेनॉल यांनी पूर्वी कधीच कादंबऱ्या वाचल्या नव्हत्या. त्यामुळे स्वतःच्या सुखाच्या त्या सर्व रुचिर, सुसंस्कृत अवस्था त्यांना नवख्या होत्या. कोणतेही विषादमय सत्य त्यांचे हृदय थिजविण्यास आले नाही. भविष्याचे भूतही आडवे आले नाही. चालू क्षणी त्या जितक्या सुखी होत्या तितक्याच त्या दहा वर्षांनंतरही राहतील असे चित्र त्यांच्या डोळ्यांपुढे होते. सदाचाराचा व एम्. द रेनॉल यांच्याशी एकनिष्ठेच्या शपथेने आपण बद्ध असल्याचा विचार त्यांच्या मनात फार वेळ टिकू शकला नाही. काही दिवसांपूर्वी त्यांना या विचाराने त्रस्त केले होते. पण आज, एखाद्या सतावणाऱ्या तिऱ्हाइताला घालवून द्यावे त्याप्रमाणे त्यांनी तो विचार झटकून टाकला. त्या स्वतःशी म्हणाल्या, "ज्युलिआँला मी माझ्या बाबतीत कोणतेही भलतेसलते स्वातंत्र्य कधीच घेऊ देणार नाही. गेल्या महिन्यात आम्ही जसे राहिलो तसेच पुढेही राहू; तो माझा मित्र या नात्याने राहू!"

अनुक्रमणिका

## प्रकरण चौदावे

# इंग्लिश कात्री

ज्युलिआँच्या दृष्टीने, त्याचे सारे सुख फूकेने देऊ केलेल्या व्यवसायाच्या भागीदारीमुळे खरोखरी नाहीसे केले होते. त्याबाबत कोणता निर्णय घ्यावा हे तो ठरवू शकत नव्हता. तो स्वतःला म्हणाला, 'अरेरे! कदाचित निर्णय खंबीर व्यक्तिमत्त्वाच्या बाबतीत मी उणा पडत आहे. नेपोलिअनच्या अनुयायांत एक नालायक पाईक म्हणून माझी गणना झाली असती. कसंही असलं तरी ह्या घराच्या मालकिणीशी माझी जी छोटीशी भानगड आहे ती या क्षणी माझे चित्त विचलित करणार आहे.'

त्याच्या सुदैवाने ह्या दुय्यम महत्त्वाच्या प्रसंगातही त्याच्या आंतरिक भावनांचा संबंध त्यांच्या तुच्छतादर्शक भाषेशी नव्हता. त्याला मा. रेनॉल यांची भीती वाटत होती ती त्यांच्या सुंदर झग्यामुळे. त्याच्या दृष्टीने तो झगा पॅरिसची आघाडीची तुकडी होती. कोणतीही गोष्ट योगायोगावर सोडायची नाही, अथवा क्षणिक प्रेरणेवर सोपवावयाची नाही असा निश्चय त्याच्या स्वाभिमानी मनाने केला होता. फूकेने स्वानुभवाच्या ज्या खाजगी गोष्टी त्याला सांगितल्या होत्या आणि त्याने स्वतः बायबलमध्ये प्रेमाबद्दल जे काय थोडेफार वाचले होते त्यांच्या आधारे त्याने आपल्या या मोहिमेची एक संपूर्ण तपशीलवार योजना आखली; आणि त्याला फार चिंता वाटत होती (हे त्याने स्वतःशी कबूल केले नव्हते) म्हणून त्याने ती योजना कागदावर लिहून काढली.

दुसऱ्या दिवशी सकाळी मा. रेनॉल दिवाणखान्यात क्षणभर त्याच्याबरोबर एकट्याच होत्या तेव्हा त्यांनी त्याला विचारले,

"तुम्हांला ज्युलिआँ ह्या नावाशिवाय आणखी एखादे नाव नाही काय?" इतक्या लाघवी प्रश्नाला काय उत्तर द्यावे हेच आमच्या नायकाला कळले नाही. अशा गोष्टीसाठी त्याच्या त्या योजनेत कोणतीच तरतूद करण्यात आलेली नव्हती. तशी योजना तयार करण्याची मूर्खपणाची चूक त्याने केली नसती तर त्याची समयसूचकता त्याच्या मदतीस चटकन पुढे धावली असती आणि आश्चर्यामुळे त्याच्या कुशाग्र बुद्धीला अधिकच धार चढली असती.

तो गोंधळला व आपल्या गोंधळाच्या जाणिवेने जास्तच गोंधळल्यासारखा झाला. मा. रेनॉल यांनी त्याला त्याबद्दल क्षमा करून टाकली. कारण तो गोंधळ त्याच्या आकर्षक मनमोकळेपणाचा परिणाम असल्याचे त्याला दिसून आले; आणि बुद्धिमान मानल्या गेलेल्या ह्या माणसाच्या अंगी मनमोकळेपणाचा आव आणण्याची कला नव्हती असे त्यांच्या मनाला पूर्वी वाटून गेले होते.

कित्येक प्रसंगी मा. डेरविल त्यांना म्हणाल्या होत्या, "तुझ्या या छोट्या शिक्षकाचा मला मुळीच विश्वास येत नाही. तो नेहमीच विचार करीत असलेला मी पाहते. फक्त स्वतःच्या धोरणाच्या उद्दिष्टांनुसार तो वागत असतो. तो धूर्त, कावेबाज आहे."

यावर काय उत्तर द्यावे हे मा. रेनॉल यांना न समजल्यामुळे ज्युलिआँची जी गाळण उडाली ती त्याला स्वतःची फार मानहानी करणारी वाटली. त्याने स्वतःला सांगितले, "मी हा असा अडलो याची भरपाई करणे

अनुक्रमणिका

हे माझ्यासारख्या माणसाचे स्वतःबद्दलचे कर्तव्य आहे." आणि मा. रेनॉल, एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जात असताना, नेमका तो क्षण साधून, त्याने त्यांना चुंबन देऊन स्वतःच्या समजुतीप्रमाणे आपले कर्तव्य बजावले.

दुसरी कोणतीही गोष्ट त्याला स्वतःला अथवा मा. रेनॉलना इतकी योग्य किंवा इतकी अप्रिय वाटली नसती; अथवा त्यापेक्षा अन्य कोणतीही गोष्ट अधिक अविचारी ठरली नसती. कोणाकडून पाहिले जाण्याच्या धोक्यापासून ते दोघे अगदी थोडक्यात निसटले. मा. रेनॉलना हा ज्युलिआँचा वेडपटपणा वाटला. त्या भयभीत झाल्या; त्याहीपेक्षा जास्त म्हणजे त्यांना मोठा धक्का बसला. ज्युलिआँच्या ह्या मूर्खपणामुळे त्यांना म. वालनोची आठवण आली. त्यांनी स्वतःला विचारले, "मी त्याच्याबरोबर एखाद्या ठिकाणी एकटी असल्यास माझं काय होईल?" त्यांची नीतिमत्ता जागृत झाली. कारण त्यांच्या प्रेमभावनेला आता ग्रहण लागले होते.

त्यांनी घरातील सर्व व्यवहारांची घडी अशी बसविली की त्यांच्या मुलांपैकी एकजण तरी नेहमी त्यांच्याबरोबर असेल.

तो दिवस फार संथपणे जात आहे असे ज्युलिआँला वाटले. मा. रेनॉलना मोहवश करण्याची त्याची योजना आडमुठेपणे अमलात आणण्यात त्याने तो सबंध दिवस घालविला. मा. रेनॉलकडे टाकलेल्या त्याच्या प्रत्येक दृष्टिक्षेपात प्रश्नार्थक, सूचक भाव व्यक्त होत होता. तथापि आपण मोह पाडू शकू इतपत तर सोडाच, पण नुसते संतोष वाटण्याइतके वागण्यातसुद्धा पूर्णपणे अयशस्वी झालो आहोत हे न कळण्याइतका ज्युलिआँ मूर्ख नव्हता.

तो वेंधळा असून इतका धीटही होऊ शकतो हे पाहून मा. रेनॉल यांच्या आश्चर्याला पार राहिला नाही. शब्दांकित होऊ न शकणाऱ्या आनंदापोटी शेवटी त्या उद्‌गारल्या, "अष्टपैलू बुद्धिमत्तेच्या पुरुषातील प्रीतिभावनेमुळे उद्‌भवलेली ही भीरुता आहे. माझ्या प्रतिस्पर्धी स्त्रीकडून त्याच्यावर कधीच प्रेम केले गेले नाही. हे शक्य असू शकेल काय?"

दुपारच्या भोजनानंतर मा. रेनॉल दिवाणखान्यात परतल्या. तेथील ब्रे येथील सब्-प्रिफेक्ट, मन्स्यूर शारको द मोजिरॉं यांचे मनोरंजन त्यांना तेथे करावयाचे होते. एका उंच घडवंचीवर छोट्या चौकटीत कापडावर वेलबुट्टी काढण्याचे त्यांचे काम चालू होते. मा. डेरविल त्यांच्या बाजूलाच बसल्या होत्या. मा. रेनॉल अशा परिस्थितीत असता, एवढ्या दिवसाढवळ्या, आपल्या बुटाचा पाय एकदम पुढे सारून मा. रेनॉल यांचा नाजुक पाय दाबणे आमच्या नायकाला योग्य वाटले! आणि त्याच वेळी मा. रेनॉल यांचे जाळीदार पायमोजे व पॅरिसचे उठावदार बूट रंगेल सब-प्रिफेक्टची एकाग्र दृष्टी आकृष्ट करीत होते.

मा. रेनॉल एकदम अतिशय घाबरल्या, इतक्या की, त्यामुळे त्यांच्या हातून कात्री, लोकरीचा गुंडा व सुया खाली पडल्या. यामुळे ज्युलिआँच्या पायाच्या हालचालीला एक चांगले स्पष्टीकरण मिळाले. कात्री खाली पडते आहे हे ज्युलिआँला दिसल्यामुळे ती मध्येच अडविण्यासाठी त्याने जसा काही तो बेढब प्रयत्न केला होता. ती इंग्लिश, पोलादी, छोटी कात्री अखेर खाली पडून तुटली. ते सुदैवच म्हणायचे. कारण त्यामुळे मादामना झालेल्या प्रकाराची सारवासारव करण्याची संधी मिळाली. ज्युलिआँ अगदी हाताशी आणखी जवळ नव्हता याबद्दल मा. रेनॉलना खेद व्यक्त करता करता पुरेवाट झाली.

“कात्री पडत आहे हे तुम्ही माझ्या आधी पाहिलंत. तुम्ही ती पकडू शकला असता. तुमच्या ह्या धडपडीमुळे काय झालं असेल, तर मला मात्र एक जोरदार लत्ताप्रहार बसला!”

ह्या सगळ्या नाटकी अभिनयाने सब-प्रिफेक्ट फसले; पण मा. डेरविल मात्र फसल्या नाहीत. “ह्या सुंदर तरुणाच्या वागणुकीच्या चालीरीती मोठ्या वाईट आहेत.” असे त्यांना वाटले. प्रांताच्या मुख्य शहरातील व्यवहारी शहाणपण अशा प्रकारच्या चुकांना कधीही क्षमा करू शकणार नाही; मा. रेनॉल यांनी ज्युलिआँशी बोलण्याची संधी साधून त्याला म्हटले, “जरा काळजीपूर्वक वागत चला; माझा हुकूम आहे तुम्हाला.”

स्वतःचा आडमुठेपणा ज्युलिआँच्या लक्षात आला. त्याला त्याबद्दल चीड आली. ‘माझा हुकूम आहे’ हे शब्द आपली मानहानी करणारे आहेत व म्हणून आपण त्यांना हरकत घेतली पाहिजे की काय याबद्दल त्याने आपल्या अंतर्मनाशी बराच वेळ चर्चा केली. मुलांच्या शिक्षणासंबंधीची काही गोष्ट असेल तर त्या मला, ‘माझा हुकूम आहे’ असं म्हणू शकतील; पण माझ्या प्रेमाला प्रतिसाद देताना, त्या व मी—आम्ही दोघे समान भूमिकेवर येतो आणि अशी समानता मानल्याखेरीज कोणी प्रेमच करू शकत नाही’ असे विचार मनात घोळवण्याइतका ज्युलिआँ खुळा होता. प्रेमातील समानतेच्या त्या विषयावर काही सामान्य वाक्यरचना करण्यात तो गुंग होऊन गेला. काही दिवसांपूर्वी मा. डेरविल यांनी त्याला शिकविलेल्या कॉर्नेईच्या एका कवितेची ओळ तो रागाने स्वतःशी गुणगुणला.

‘प्रेम आपणहून समानता निर्माण करते; प्रेमाला ती धुंडीत बसावी लागत नाही’ अशा अर्थाची ती काव्यपंक्ती होती.

डॉ. ज्युलिआँची भूमिका वठविण्याचा हट्ट त्याने स्वतःशी धरला होता. पण खरे म्हणजे त्याच्या जीवनात आजवर त्याला प्रेमपात्र लाभलेलेच नव्हते. नंतर दिवसभर त्याचा वेळ फार कंटाळवाणा गेला, तो उदासच राहिला. त्याच्या डोक्यात शहाणपणाचा फक्त एकच विचार घोळत होता. त्याला स्वतःचा व मा. रेनॉल यांचाही कंटाळा त्या वेळी आलेला असल्याने जवळ येऊ लागलेली संध्याकाळ त्याला धोक्याची वाटू लागली. त्या वेळी त्याला बागेत बसणे भाग पडले असते! त्यांच्याजवळ बसायचे आणि तेही अंधारात! बापरे! टाळलेच पाहिजे हे. क्युरेला भेटण्यासाठी आपण व्हेरिएरला जात आहोत असे त्याने एम्. द रेनॉल यांना सांगितले. संध्याकाळच्या भोजनानंतर लगेच तो निघाला आणि मध्यरात्रीपर्यंत परतला नाही.

म. शेलाँ हे आपल्या सामानाची बांधाबांध करण्यात गुंतले असल्याचे, व्हेरिएरला पोहोचल्यावर त्याला आढळून आले. पाद्र्याची नियुक्त वृत्ती अखेर त्यांच्याकडून घेण्यात येऊन त्यांच्या जागी पाद्री म्हणून (‘विकार’) मासलाँ यांची नेमणूक करण्यात आली होती. ज्युलिआँच्या त्या भल्या पाद्र्याला त्याच्या कामात मदत केली. त्याच्या मनात विचार आला— धर्मोपदेशकाच्या पवित्र, व्रतसदृश व्यवसायाबद्दल आपल्याला असलेली अनिर्वाय ओढ मित्राने मेहेबानीने देऊ केलेल्या संधीचा स्वीकार करण्याच्या आड आली होती. पण त्याने अन्यायाचे असे एक उदाहरण नुकतेच पाहिले होते की, त्यामुळे धार्मिक व्यवसाय न पतकरणे हे स्वतःच्या हिताच्या दृष्टीने कदाचित जास्त फायद्याचे होईल असे त्याला वाटू लागले. आपले हे मतपरिवर्तन फुकेला पत्रद्वारे कळवावे असाही विचार त्याच्या मनात आला.

व्हेरिएरच्या पाद्र्याची याप्रमाणे नागवणूक करण्यात आल्याचा प्रकार. स्वतःसाठी व्यापारक्षेत्राची निवड करण्याचा मार्ग मोकळा ठेवण्याकरिता वापरण्याच्या स्वतःच्या ह्या चतुरपणावर तो खूष होऊन गेला. व्यवहारी शहाणपणाचा उदास आवाज जर त्याच्या मनावर जर जास्त ताबा गाजवू लागला तर व्यापाराकडे परतण्यास तो आता मोकळा होता.

★ ★ ★

अनुक्रमणिका

## प्रकरण पंधरावे

# कोंबडा आरवण्याच्या समयी

आपल्याला सूक्ष्म दृष्टीची देणगी लाभलेली आहे असे ज्युलिआँला उगीचच वाटत असे. पण हा गुण खरोखरी थोडा जरी त्याच्या अंगी असता तरी व्हेरिएरच्या त्याच्या भेटीने घडून आलेल्या परिणामाबद्दल त्याने दुसऱ्याच दिवशी स्वतःचे अभिनंदन केले असते. त्याच्या गैरहजेरीत रेनॉल यांच्या घरी त्याने केलेला त्याचा आडमुठेपणा विसरला गेला होता. त्या दिवशीही तो सबंध दिवसभर तिरसटपणाच्याच लहरीत होता. रात्र पडली तशी त्याच्या डोक्यात एक चक्रम कल्पना आली आणि त्याने ती मा. रेनॉलना असाधारण निर्भयतेने सांगितली.

ते बागेत जाऊन बसल्यावर लगेच, आणि पुरेशा अंधाराच्या अडोशाची वाट न पाहता ज्युलिआँने आपले ओठ मा. रेनॉल यांच्या कानाजवळ नेले आणि त्यांना अडचणीच्या परिस्थितीत टाकण्याचा धोका अघोरीपणे पतकरून तो म्हणाला, “मादाम, आज दोन वाजता मी तुमच्या खोलीत येणार आहे. मला तुमच्याशी काही बोलायचं आहे.”

आपली विनंती कदाचित मानली जाईल या भीतीने ज्युलिआँ थरथर कापत होता. स्त्रीला फूस लावून शीलभ्रष्ट करू पाहणाऱ्याच्या कामगिरीचे ओझे त्याच्या दृष्टीने एवढे भयंकर होते की, जर स्वतःच्या मनाच्या कलाप्रमाणे वागण्यास ज्युलिआँ स्वतंत्र असता तर तो बाहेर न पडता, स्वतःच्या खोलीतच काही दिवस राहिला असता आणि त्या स्त्रियांच्याकडे त्याने पुन्हा नजर फिरविली नसती. आदल्या दिवशीच्या त्याच्या हुषार डावपेचांमुळे, त्यापूर्वीच्या दिवसाच्या अपेक्षा उधळल्या गेल्याने त्याला कळून आले आणि आता चालू घटनांना वळण कसे द्यावे हे त्याला कळेनासे झाले.

ज्युलिआँने ज्या अशिष्ट धिटाईने मा. रेनॉल यांच्याजवळ त्या उद्धट गोष्टीची वाच्यता केली होती तिला मादामनी संतापाने चोख उत्तर दिले; त्यांचा तो संपात मुळीच अतिशयोक्त नव्हता. त्यांच्या त्या संक्षिप्त उत्तरातील तिरस्कार ज्युलिआँला जाणवला. त्यांनी अगदी खालच्या आवाजात उच्चारलेल्या त्या उत्तरात “छीः!” हा उद्‌गार नक्कीच होता. आपल्याला मुलांशी काही बोलावयाचे आहे असे निमित्त सांगून ज्युलिआँ वरती मुलांच्या खोलीकडे गेला; आणि परतल्यानंतर तो मा. डेरविल यांच्या शेजारी व मा. रेनॉल यांच्यापासून काही अंतरावर बसला. मा. रेनॉल यांचा हात स्वतःच्या हाती घेण्याची शक्यता आता त्याने याप्रमाणे उरू दिली नाही. त्यांच्या संभाषणाला गंभीर स्वरूप प्राप्त झाले होते. ज्युलिआँ स्वतः संभाषणपटुत्वाने बोलत होता. मात्र त्यांच्या संभाषणाला मधूनच थोडा वेळ खळ पडे तेव्हा तो स्वतःचे डोके खाजवीत स्वतःला विचारी, “मी अशी एखादी छानदार योजना का आखू शकत नाही की जेणेकरून मा. रेनॉलना प्रेमाच्या अचूक खुणा मला दाखविणे भाग पडेल; त्या तसल्या प्रेमाच्या खुणांमुळेच तीन दिवसांपूर्वी त्या ‘माझ्या’ आहेत असे मला वाटले!”

ज्युलिआँ ज्या हताश परिस्थितीत ओढला गेला होता तिच्यामुळे तो अतिशय बेचैन झाला; आणि तरीही त्याला जर यश आले असते तर त्या यशाइतका अन्य कशानेच तो कमालीचाच गोंधळून गेला नसता.

मंडळी बागेतून मध्यरात्री उठली. त्या वेळी ज्युलिआँच्या मनात नैराश्य इतके दाटले होते की मा. डेरविल त्याच्याकडे तिरस्काराने पाहात असाव्यात आणि मा. रेनॉल यांचीही त्याच्याबद्दलची दृष्टी त्यापेक्षा अधिक अनुकूल नसावी असे त्याला वाटले.

ज्युलिआँ स्वतःशी सारखा धुसफुसत होता. त्याचा फार मोठा अपमान झाला होता. त्यामुळे त्याला झोप येईना. सर्व बहाणे, सगळ्या योजना सोडून द्याव्या आणि आला दिवस मा. रेनॉलच्या संगतीत साजरा करावा, लहान बालकाप्रमाणे प्रत्येक दिवस घेऊन येईल त्या सौख्यात समाधानी असावे– हे असे विचार त्यांच्यापासून तीन हजार मैल दूर होते.

काही चतुर युक्त्या, प्रयुक्त्या योजण्यात त्याने आपला मेंदू बराच शिणविला. पण पुढच्याच क्षणी त्याला प्रत्येक युक्ती-क्लृप्ती हास्यास्पद वाटू लागली. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे मनोऱ्यावरील घड्याळात दोनचे ठोके पडले तेव्हा तो अतिशय दुःखीकष्टी होता.

कोंबड्याच्या आरवण्याने सेंट पीटरला जागे केले त्याप्रमाणे त्या ठोक्यांनी ज्युलिआँला जागृती आणली. एका अतिशय क्लेशदायक घटनेच्या क्षणासमीप आपण आलो आहोत असे त्याला वाटले. ती अप्रस्तुत सूचना केल्याच्या क्षणापासून त्याचे एकदासुद्धा तिचा विचार पुन्हा केला नव्हता; मा. रेनॉल यांच्याकडून तिचे स्वागत तर फारच प्रतिकूलतेने केले गेले होते!

उठताना तो स्वतःशी पुटपुटला, 'त्यांच्याकडे दोन वाजता येईन असे मी मादामना सांगितले आहे. मी कदाचित अननुभवी व गावंढळ असेन; आणि शेतकऱ्याच्या मुलाच्या बाबतीत ते साहजिकही आहे; मा. डेरविल यांनी ती गोष्ट उघडपणे माझ्या नजरेसही आणली आहे. पण कसेही असले तरी मी दुबळा मात्र नाही.'

ज्युलिआँने स्वतःच्या धैर्याची तारीफ करणे अगदी रास्तच होते. कारण त्यापेक्षा जास्त कष्टप्रद अशी अन्य कोणतीही कामगिरी पार पाडण्यासाठी तो यापूर्वी कधीच सिद्ध झाला नव्हता. त्याने त्यांच्या खोलीचे दार उघडले तेव्हा त्याचा एवढा थरकाप उडाला की त्याचे गुडघे लटके पडले आणि त्याला भिंतीचा आधार घ्यावा लागला.

त्याने पायांत मोठे, लांब पायमोजे घातले होते. एम्. द रेनॉल यांच्या खोलीकडे कानोसा घेण्यासाठी तो गेला. दारातून त्याला त्यांचे घोरणे ऐकू आले. त्यामुळे त्याची हिंमत खचली. मा. रेनॉल यांच्याकडे न जाण्यासाठी आता त्याच्याजवळ कोणतीच सबब उरली नव्हती. पण परमेश्वरा, हे प्रभो! ज्युलिआँ तेथे गेल्यावर त्याने काय करायचे? त्याने कसलीच योजना आखलेली नव्हती; आणि समजा, तशी एखादी योजना त्याने निश्चित केलेली असती तरी तो अशा व्यग्र मानसिक अवस्थेत होता की, ती अमलात आणण्याच्या स्थितीत तो राहिलाच नसता.

तो वधःस्तंभाकडे जात असता तर जेवढी मनोवेदना त्याला झाली असती तिच्यापेक्षा हजार पटींनी तीव्र वेदना त्याला आता होत होत्या. अखेर तो त्या छोट्या व्हरांड्यात शिरला. येथून मा. रेनॉल यांच्या खोलीकडे जाण्याचा मार्ग होता. थरथर कापणाऱ्या हाताने त्याने त्यांच्या खोलीचा दरवाजा उघडला तेव्हा त्याचा केवढा तरी मोठा आवाज झाला.

खोलीत उजेड होता. खोलीतील धुनीजवळ रात्रीचा छोटा, मंद दिवा जळत होता. ह्या नव्या व जादा संकटाची कल्पना त्याला आलेली नव्हती. तो खोलीत येत आहे हे पाहून मा. रेनॉल आपल्या बिछान्यातून ताडकन उडी मरून उठल्या आणि 'मेल्या ऽ' असे ओरडल्या. त्याबरोबर ज्युलिआँची फार गाळण उडाली. आपल्या साऱ्या, निरर्थक पूर्वयोजना तो विसरला आणि त्याच्या नैसर्गिक स्वभावधर्माच्या वळणावर गेला. एवढ्या मोहक स्त्रीला खूष करायचे नाही हा एक फार मोठा अनर्थ होय, असे त्याला वाटले. मा. रेनॉल यांच्या निर्भर्त्सनेला त्याचे जे एकमेव उत्तर होते ते म्हणजे त्याने स्वतःला त्यांच्या पायांशी झोकून दिले आणि त्यांच्या गुडघ्यांभोवती हातांचा विळखा घातला. त्या त्याला अत्यंत कठोरपणे बोलत होत्या तेव्हा त्याला एकदम रडू कोसळले.

काही तासांनंतर ज्युलिआँ जेव्हा मा. रेनॉल यांच्या खोलीतून बाहेर पडला तेव्हा प्रणयगाथांच्या भाषेत एखाद्याने म्हटले असते की, जे प्राप्त होण्याची इच्छा उरावी असे ज्युलिआँच्या बाबतीत काहीच शिल्लक राहिलेले नव्हते. त्याने मा. रेनॉल यांच्या ठिकाणी जी प्रेमभावना उत्पन्न केली होती तिचा, व त्यांच्या मोहक सौंदर्याने त्याच्यावर पाडलेल्या अनिर्बंध प्रभावाचा तो खरोखरी ऋणाईत होता; कारण त्याला जे यश प्राप्त झाले ते अस्थानी वापरलेल्या त्याच्या अंगच्या सगळ्या चातुर्यामुळेही त्याला मिळू शकले नसते.

तथापि तो लहरी अहंकाराला बळी पडला असल्यामुळे काही अत्यंत मधुर क्षणी त्याने, स्त्रियांवर मोहिनी टाकण्याची सवय असलेल्या पुरुषाची भूमिका वठविण्याचा प्रयत्न केला. त्याचा स्वाभाविक गोडवा नष्ट करण्याचे, सहसा विश्वास न बसण्याइतके प्रयत्न तेव्हा त्याने केले. त्या प्रसंगी त्याने जो अत्यानंद उद्दीपित केला होता आणि मध्येच जो अनुतापाचा झटका येऊन त्या अत्यानंदाची उत्कटता वाढली होती, त्याकडे लक्ष न देता, त्या वेळी त्याच्या नजरेपुढे जर कोणती कल्पना एकसारखी उभी असेल तर ती त्याच्या "त्या कर्तव्याची." त्याने स्वतःपुढे ठेविलेली त्याची ती आदर्श योजना पार पाडण्याच्या सिद्धतेपासून तो परावृत्त झाला असता तर त्याला भयंकर मनस्ताप व कायमचा उपहास यांची भीती होती. एका शब्दात सांगायचे तर, ज्या गुणामुळे ज्युलिआँ, सर्वसाधारण माणसापेक्षा उच्च पातळीवर पोहोचला होता त्याच गुणामुळे त्याच्या अगदी पायाशी चालत आलेल्या सौख्याबद्दल त्याला रुची वाटत नव्हती. मोहक कांतीच्या एखाद्या षोडशवर्षा बालिकेने नृत्याला निघण्यापूर्वी आपल्या गालांवर रक्तिमा चढविणारे लाल चूर्ण लावण्याचा मूर्खपणा करावा तशी त्या वेळी ज्युलिआँची वागणूक झाली होती.

तो एखाद्या भुताप्रमाणे आकस्मिकपणे मा. रेनॉल यांच्या खोलीत प्रकट झाल्यामुळे त्यांना जीवघेणे भय वाटले. अत्यंत घोर अशा धोक्याच्या कल्पनांना मा. रेनॉल थोड्याच वेळात बळी पडल्या. ज्युलिआँचे अश्रू व त्याच्या आशाभंग यांनी त्यांना फार मानसिक क्लेश दिले.

ज्युलिआँला नाकारण्यासारखे त्यांच्याजवळ वस्तुतः जेव्हा काहीच राहिलेले नव्हते तेव्हा त्यांनी स्वतःपासून त्याला प्रामाणिक संतापाने दूर ढकलले आणि नंतर स्वतःला त्याच्या बाहूंत झोकून दिले! ह्या सगळ्या वागण्यातून कोणताच हेतू स्पष्टपणे कळून येत नव्हता. आपण नरकाचे धनी झालो आहो— यातून आता आपल्याला क्षमा नाही, सुटका नाही अशी त्यांची खत्री झाली. ज्युलिआँवर प्रीतीच्या उत्कट आवेगाने आलिंगन-चुंबनांची बरसात करून त्यांनी स्वतःच्या नजरेपुढील नरक बाजूस हटविण्याचा प्रयत्न केला. थोडक्यात, आमच्या नायकाच्या सुखाच्या पूर्णतेत कोणतेही न्यून राहिले नसते; त्याने नुकत्याच जिंकलेल्या स्त्रीच्या उत्कट संवेदनक्षमतेचीही त्याला साथ होती; फक्त त्यासाठी गरज होती ती त्याने ते सुख भोगण्याच्या समर्थतेची. ज्युलिआँ निघून गेला तरी त्याच्या जाण्यामुळे मा. रेनॉल यांच्या आनंदोर्मीत खंड पडला नाही.

प्रयत्न करूनही त्यांना तो आवेग थांबवता येत नव्हता. तसेच त्यांच्या मनातील पश्चात्तापाचा झगडाही संपला नव्हता; तो त्यांना फाडीत, कुरतडीत राहिला.

स्वतःच्या खोलीत परत आल्यावर ज्युलिआँच्या मनात पहिला विचार आला, “हात्तिच्या! सुखी होणं, प्रीतिविषय बनणं – म्हणजे हे एवढंच का?” एखाद्या गोष्टीसाठी दीर्घकाळ बाळगलेली इच्छा पूर्ण झाली म्हणजे माणसाच्या मनाला जो विस्मय वाटतो व त्याला अस्वस्थ करणारे जे संदेहात्मक विचार त्याच्या हृदयात उद्‌भवतात तशा मनःस्थितीत ज्युलिआँ होता. इच्छा करीत राहण्याची सवय त्या हृदयाला पूर्वी लागलेली असते. आता आणखी इच्छा धरण्यासारखे काही उरलेले नाही असे त्याला दिसून येते आणि तोवर त्याने स्मृतीही गोळा केलेल्या नसतात. कवायत करून परतलेल्या शिपायाप्रमाणे ज्युलिआँ त्याच्या सर्व वागणुकीच्या बारीकसारीक तपशिलाचा आढावा घेण्यात पूर्णपणे गढून गेला. त्याने स्वतःला विचारले,

“स्वतःबद्दलच्या एखाद्या आवश्यक कर्तव्याला मी चुकलो आहे काय? मी माझी भूमिका खरोखरी नीट पार पाडली का? आणि ती भूमिका कसली तर, स्त्रियांच्यापुढे चमकण्यास सरावलेल्या माणसाची भूमिका.

★ ★ ★

## प्रकरण सोळावे

# दुसऱ्या दिवशी

मा. रेनॉल यांच्या मनात फार खळबळ माजली होती व आश्चर्याने त्या थक्क झाल्या होत्या. त्यामुळे जो एक पुरुष क्षणात त्यांचे जगातील सर्वस्व झाला होता त्याचा वेडगळपणा त्यांच्या लक्षात आला नाही. ज्युलिआँच्या अभिमानाच्या दृष्टीने हे अनुकूल असेच होते.

पहाट व्हायला येत आहे हे पाहून त्यांनी ज्युलिआँला त्यांच्या खोलीतून परत जाण्याची विनवणी केली. त्या म्हणाल्या,

"अरे देवा! माझ्या नवऱ्याने जर काही आवाज ऐकला असला तर मग मुळीच धडगत नाही."

ज्युलिआँला वाक्प्रयोग करायला सवड होती! प्रसंगाला योग्य अशी एक रचना आठवून तो म्हणाला,

"तुम्हाला तुमच्या जीवनाबद्दल खेद वाटत आहे काय?" त्यावर मा. रेनॉल उत्तरल्या, "हो; या क्षणी तर खूपच. तथापि तुमचा परिचय झाला याबद्दल मात्र मला खेद वाटण्याचं काहीच कारण नाही." सावधानतेची जाणीव मुद्दाम न बाळगता दिवस उजाडल्यानंतरच त्या खोलीतून परतण्यात आपली प्रतिष्ठा आहे असे ज्युलिआँला वाटले.

आपण एक अनुभवी व्यक्ती आहोत असे मानले जाते ह्या वेड्या कल्पनेने ज्युलिआँ स्वतःच्या वागणुकीतील बारीकसारीक गोष्टींकडे एकसारखा लक्ष देत असे व त्याचा एक फायदा असा झाला होता की मा. रेनॉल यांची भेट जेव्हा दुपारच्या भोजनाच्या वेळी झाली तेव्हा त्यांची वागणूक म्हणजे शहाणपणाचा एक अद्भुत चमत्कारच होता.

पण त्या वेळी भोजनाच्या मेजाशी मा. रेनॉल यांची स्थिती वेगळीच झालेली होती. डोळ्यांच्या मध्यापर्यंत लालीलाल झाल्याशिवाय त्या ज्युलिआँकडे पाहूच शकत नव्हत्या आणि त्याच्याकडे पाहिल्याशिवाय त्यांना क्षणभरही राहवत नव्हते. स्वतःची ही धांदल त्यांच्या लक्षात आली. आणि ती लपविण्याचा जास्त प्रयत्न त्या करू लागल्या. आपले डोळे वर करून ज्युलिआँने फक्त एकदाच त्यांच्याकडे बघितले होते. प्रथम मा. रेनॉलना त्याच्या धोरणी वर्तनाचे कौतुक वाटले. पण त्याची ती एकमेव नजर पुन्हा त्यांच्याकडे वळलीच नाही हे त्यांच्या ध्यानात आले तेव्हा ती त्यांना एका धोक्याची सुचना वाटली. त्यांनी स्वतःला मनात विचारले, 'म्हणजे याचा अर्थ असा समजावयाचा काय की, ज्युलिआँ माझ्यावर येथून पुढे प्रेम करणार नाही? अरेरे! त्याच्या दृष्टीने मी फारच वयस्कर आहे. त्याच्यापेक्षा मी दहा वर्षांनी मोठी आहे ना?"

भोजनगृहातून बागेत जाताना वाटेत मा. रेनॉलनी त्याचा हात दाबला. प्रेमाची ती अनपेक्षित खूण लक्षात येऊन ज्युलिआँला आश्चर्य वाटले. तो मादामकडे अत्युत्कट प्रीतीच्या आवेगाने टक लावून पाहू लागला. कारण दुपारी जेवणाच्या वेळी त्याला त्या फारच सुंदर विलोभनीय वाटल्या होत्या; व वर न पाहता; त्याने त्यांच्या सौंदर्यलक्षणांची तपशीलवार यादी मनाशी करण्यात वेळ खर्च केला होता. त्याच्या आताच्या नेत्रकटाक्षाने मा. रेनॉलना दिलासा दिला. तथापि त्यांच्या मनातील अस्वस्थता मात्र पूर्णपणे नष्ट झाली नाही.

पण त्यांच्या मनात त्यांच्या पतीच्या विचाराने वाटणारा पश्चात्ताप मात्र त्या अस्वस्थतेने जवळजवळ पूर्णपणे घालवून टाकला.

दुपारच्या भोजनाच्या वेळी त्यांच्या पतीच्या, एम्. द रेनॉल यांच्या लक्षात उपर्युल्लेखित काहीच आले नव्हते. पण मा. डेरविल यांचे मात्र तसे नव्हते .मा. रेनॉल धोक्याला बळी पडण्याच्या अगदी बेतात आहेत अशी भीती मा. डेरविलना वाटली. सबंध दिवसभरात त्यांनी आपल्या धीट, भेदक मैत्रीच्या पायी मा. रेनॉलना उद्देशून काही सूचक शेरे मारल्याशिवाय सोडले नाही. मा. रेनॉल ज्या धोक्याकडे वाटचाल करीत होत्या त्याचे चित्र भेसूर रंगात दाखविण्याचा उद्देश त्यांच्या त्या सूचक शेजाऱ्यांच्या मागे होता.

ज्युलिआँच्या बरोबर आपणास एकटे, एकत्र बसावयास मिळावे अशी तीव्र आंच मा. रेनॉलना लागली होती. तो अजून त्यांच्यावर प्रेम करीत आहे काय हे त्यांना ज्युलिआँला विचारावयाचे होते. मा. डेरविल यांची तेथील उपस्थिती आपणास किती अडचणीची वाटत आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न एकापेक्षा अधिक वेळा, स्वतःच्या स्वभावातील अपरिवर्तनीय सौम्यपणा बाजूस ठेवूनही करण्याच्या बेतात मा. रेनॉल होत्या.

त्या संध्याकाळी मा. डेरविल यांनी बागेत चतुराईने अशी व्यवस्था केली की मा. रेनॉल व ज्युलिआँ या दोघांमध्ये त्यांचे आसन असावे. ज्युलिआँचा हात दाबण्याच्या व तो आपल्या ओठांपर्यंत नेण्याच्या सौख्याचे एक मधुर चित्र मा. रेनॉल यांनी तयार केले होते. पण प्रत्यक्षात त्या त्याच्याशी एखादा शब्दही नीटपणे बोलू शकल्या नाहीत.

ह्या आकस्मिक आपत्तीने मा. रेनॉल यांच्या मनाचा प्रक्षोभ वाढविला एका गोष्टीबद्दलचा पश्चात्ताप त्यांचे मन कुरतडीत होता. आदल्या रात्री त्यांच्या खोलीत येण्यात ज्युलिआँने दाखविलेल्या अविचाराबद्दल त्यांनी त्याची एवढी निर्भर्त्सना केली होती की, तो कदाचित त्या रात्री येणार नाही. या विचाराने त्यांचा थरकाप झाला. बागेतून त्या लवकर परतल्या आणि त्याची वाट पाहण्यासाठी वरती स्वतःच्या खोलीत गेल्या. पण अधीरतेने त्या इतक्या अस्वस्थ झाल्या होत्या की त्या उठल्या आणि ज्युलिआँच्या खोलीच्या दरवाजाला आपला कान लावायला निघाल्या. अनिश्चितता आणि आसक्ती यांचे त्या भक्ष्य झाल्या होत्या. तरी पण ज्युलिआँच्या खोलीत शिरण्यास त्या धजावल्या नाहीत. कारण अशी कृती म्हणजे हीन दर्जाच्या वर्तनाची शेवटची पायरी असे त्यांना वाटले. अशा वर्तनानेच खेडवळ म्हणींना विषय मिळतो.

शिवाय सगळेच नोकर अजून झोपले नव्हते. शहाणपणाच्या विचाराने अखेर त्यांना स्वतःच्या खोलीकडे परतविले. दोन तासांची ती प्रतीक्षा त्यांना दोन शतकांच्या छळासारखी वाटली.

पण ज्युलिआँ, ज्याला तो स्वतःचे 'कर्तव्य' असे म्हणत होता, त्याच्याशी पूर्णपणे प्रामणिक राहणार होता. स्वतःसाठी जे काम त्याने आखून घेतले होते, त्याची तपशीलवार बजावणी करण्यास तो चुकणार नव्हता.

घड्याळात एक वाजल्याचा ठोका पडला तेव्हा तो त्याच्या खोलीतून हळूच बाहेर सटकला. घराचा मालक गाढ झोपलेला आहे याची खात्री त्याने करून घेतली आणि मा. रेनॉल यांच्यापुढे येऊन तो उभा राहिला. या वेळी त्याला त्याच्या प्रियकरणीच्या सहवासात अधिक सुख अनुभवास आले, कारण त्याला जी

'भूमिका' वठवावयाची होती तिचा विचार तो पूर्वीइतका आता एकसारखा करीत नव्हता. त्यामुळे आता त्याची नजर अधिक डोळस झाली होती व कानांनी ऐकलेले तो नीट उमजत होता. त्याच्या वयाबद्दल मादाम रेनॉल त्याला जे म्हणाल्या त्यामुळे त्याला काही अंशी आत्मविश्वास लाभला.

"अरेरे! मी तुमच्यापेक्षा दहा वर्षांनी मोठी आहे; तेव्हा तुम्ही माझ्यावर प्रेम कसे करू शकाल?" मा. रेनॉलनी या वाक्यांचा पुनरुच्चार केला होता. त्यात त्यांचा कोणताही विशिष्ट उद्देश नव्हता, तर तो विचार त्यांना सारखा सतावून सोडीत होता इतकेच.

ज्युलिआँच्या मनाला असला काही विचार शिवलाच नव्हता. पण मा. रेनॉल यांचा मनस्ताप खराखुरा आहे एवढे मात्र त्याला कळत होते, आणि आपण हास्यास्पद ठरू याचे भय तो जवळजवळ विसरून गेला.

ज्युलिआँचा जन्म गरीब कुटुंबात झालेला होता. त्यामुळे प्रियकरणीच्या इशाऱ्यावर नाचणारा, लाळघोट्या प्रियकर म्हणून आपण ओळखले जाऊ हा मूर्खपणाचा विचारही त्याचप्रमाणे त्याच्या डोक्यातून नाहीसा झाला. ज्युलिआँच्या आत्यानंदाने त्याच्या लाजऱ्या प्रियकरणीला जेवढ्या प्रमाणात दिलासा दिला तेवढे अधिक प्रमाणात सुख व आपल्या प्रियकरावर टीका करण्याची शक्ती तिने मिळविली. आदल्या रात्रीची त्यांची भेट ज्या उसन्या झोकनोकाने त्याने सुखाची नसली तरी यशस्वी केली होती तो त्याने आता सुदैवाने या वेळी जवळजवळ मुळीच दाखविला नाही. 'ती भूमिका' वठविण्याचा त्याचा सातत्याचा प्रयत्न जर त्यांच्या ध्यानात आला असता तर त्या दुःख कष्टमय जाणिवेने त्यांचे सुख कायमचे हिरावून नेले असते. त्या उभयतांतील वयाच्या विषमतेच्या दुःखद परिणामांव्यतिरिक्त त्यांना त्यात अन्य काहीच आढळले नसते.

प्रेमाच्या सिद्धान्तांचा मा. रेनॉल यांनी कधीच विचार केला नव्हता तरी प्रेमाबद्दल केव्हाही बोलणे निघाले की दोन व्यक्तींच्या सांपत्तिक व सामाजिक दर्जाच्या तफावतीनंतर, त्यांच्या वयातील विषमता हा त्या भागातील लोकांच्या तोंडी एक अगदी सर्वसाधारण असा विनोदाचा विषय झालेला असे.

काही दिवसांतच ज्युलिआँला आपला तारुण्य-सहज उत्साह पुन्हा प्राप्त होऊन तो मा. रेनॉल यांच्या प्रेमाने पागल झाला. तो स्वतःशी बोलला, "मा. रेनॉल यांच्या अंतःकरणाचा कनवाळूपणा केवळ दैवी आहे हे कोणालाही कबूल केलं पाहिजे व अन्य कोणी त्यांच्यापेक्षा जास्त सुरेख असणे शक्यच नाही."

आपल्याला एक 'भूमिका' वठवावयाची आहे हा विचार त्याच्या डोक्यातून जवळजवळ पूर्णपणे नष्ट झाला होता. एकदा एका बेबंद प्रेरणेच्या क्षणात त्याने आपल्या चिंता मा. रेनॉल यांना सांगून टाकल्या. त्याने मादामच्या ठिकाणी हा जो विश्वास दाखविला त्यामुळे त्यांची ज्युलिआँविषयीची अत्युत्कट प्रीतिभावना पराकोटीला पोहोचली. अत्यानंदाने त्या स्वतःला म्हणाल्या, "म्हणजे मला या प्रेमात कोणी दैववान प्रतिस्पर्धी नाही तर." मग ज्या एका तसबिरीला ज्युलिआँने मागे फार महत्त्व दिले होते तिच्याबद्दल, त्यांनी धारिष्ट करून त्याच्याकडे विचारणा केली. तेव्हा ती तसबीर एका पुरुषाची होती असे ज्युलिआँने त्यांना शपथेवर सांगितले.

चिंतन करण्याइतकी शांतता मा. रेनॉल यांच्या मनाला लाभली तेव्हा असे सुख प्रत्यक्षात असू शकते, आणि आपल्याला आतापावेतो त्याची यत्किंचितही कल्पना आलेली नव्हती याचे त्यांना फार आश्चर्य वाटले. त्या स्वतःशी पुटपूटल्या, 'ओहो! दहा वर्षांपूर्वी जेव्हा मला खूपच सुंदर समजण्यात येत होते तेव्हा ज्युलिआँ मला भेटला असता तर!'

पण ज्युलिआँचे विचार मा. रेनॉल यांच्या विचारांपासून जगाच्या दुसऱ्या टोकाला होते! त्याचे प्रेम अजूनही महत्त्वाकांक्षेवर आधारलेले होते. त्याचा आनंद होता तो जिंकण्याचा, स्वतःचे स्वामित्व प्रस्थापित करण्याचा. तो स्वतः एक अतिशय दुर्दैवी आणि सदा तिरस्कृत असा प्राणी होता; आणि मा. रेनॉल सुंदर, उच्च कुलीन व उमरावी घराण्यात जन्मलेल्या होत्या. ते त्यांच्या सौंदर्याची नाना तऱ्हेने जणू पूजा बांधीत होता. त्यांच्या लावण्याच्या दर्शनाने, त्याच्या आनंदाला उधाण येत होते. सरते शेवटी त्याने त्यांची जराशी समजूत घातली की वयाच्या तफावतीमुळे प्रीतीच्या भावनेत काहीसुद्धा उणेपणा येत नाही. जास्त सुधारलेल्या देशांत वर्षे वयाच्या स्त्रीच्या अंगी, किती तरी आधीपासून वसत असलेल्या व्यवहारी शहाणपणाचा थोडा भाग जरी मादामनी आत्मसात केला असता तरी आश्चर्य व आत्मतुष्टतेच्या गुदगुल्या यांच्यावरच केवळ आधारित असलेले प्रेम कितपत टिकेल याबद्दलच्या आशंकेने त्यांचा थरकाप झाला असता.

ज्युलिआँला त्याच्या महत्त्वाकांक्षेचा जेव्हा विसर पडे त्या क्षणी त्याला मा. रेनॉल यांच्या अंगच्या व मालकीच्या प्रत्येक गोष्टीविषयी फार आनंद वाटे. अशा गोष्टींत मा. रेनॉल यांच्या टोप्या व झगे यांचाही समावेश होई. त्या वस्तूंचा सुगंध हुंगण्याच्या आनंदाचा कंटाळा त्याला कधी येत नसे. त्यांच्या कपड्यांचे कपाट तो उघडी आणि त्याच्यापुढे तो किती तरी तास उभा राही. कपाटातील प्रत्येक वस्तूचे सौंदर्य व त्या ठेवण्यातील नीटनेटका व्यवस्थितपणा पाहून त्याला खूप अचंबा वाटे. त्याची हृदयस्वामिनी त्याच्या खांद्यावर रेलून त्याच्याकडे टक लावून पाही. विवाहाच्या वेळी भेट म्हणून मिळालेल्या वस्तू मांडून ज्यांचे प्रदर्शन केले जाते असे आपले दागदागिने व काही केवळ भपक्याचे दिखाऊ अलंकार मा. रेनॉलनी कपाटात ठेविलेले होते. ते ज्युलिआँ एकाग्र नजरेने पाहून घेई.

मा. रेनॉल यांच्या मनात कधी कधी असा एक विचार येई, 'मी अशा माणसाशी लग्न केले असते तर! केवढे हे आवेशयुक्त चैतन्य! त्याच्या संगतीतले सहजीवन किती हर्षोत्कट झाले असते!'

स्त्रीसौंदर्याच्या भयंकर सामर्थ्यशाली अस्त्रांच्या सान्निध्यात ज्युलिआँ त्याच्या सबंध आयुष्यात त्यापूर्वी एवढ्या जवळ कधीच आलेला नव्हता. तो स्वतःला म्हणाला, 'पॅरिसमध्ये यापेक्षा उच्चतर असे सुख व आनंद असणे अशक्य आहे.' त्यानंतर आपल्या सुखाला कोणताही विरोध दर्शविण्याचे कारण त्याला दिसून आले नाही. मा. रेनॉल व ज्युलिआँ यांच्या सलगीच्या सुरुवातीच्या दिवसांत ज्या वेडगळ सिद्धान्ताने त्याला एवढे दडपणाखाली ठेवले होते व जवळजवळ हास्यास्पदही केले होते ती तत्त्वे, त्याच्या हृदयस्वामिनीचे त्याच्याविषयीचे मनःपूर्वक सादर कौतुक व तिची प्रणयाची उत्कटता यामुळे तो पुष्कळदा विसरून जाई. असेही काही क्षण येत की जेव्हा त्याच्या अंगी काही ढोंगीपणाच्या सवयी असूनही, लहानसहान रीतींभातींबद्दलचे त्याचे अज्ञान त्याला चाहणाऱ्या त्या महान महिलेजवळ कबूल करण्यात त्याला अत्यानंद वाटला होता. त्याच्या प्रियकरणीचा दर्जा त्याला स्वतःलाही मोठेपणा प्राप्त करून देतो असे त्याला वाटे. बुद्धीचे वरदान लाभलेल्या आणि जो निश्चितपणे एक दिवस खूप पुढे जाईल असे प्रत्येकाला वाटत होते त्या ज्युलिआँला अनेक लहानसहान गोष्टींची याप्रमाणे माहिती करून देण्यात मा. रेनॉल यांनाही त्यांच्या परीने अत्युत्तम नैतिक समाधान वाटे. सब-प्रिफेक्ट आणि म. वालनो यांनासुद्धा त्याची तारीफ केल्यावाचून राहवत नसे. ते दोघे ज्युलिआँची अशी तारीफ करीत म्हणून मा. रेनॉल यांचे त्या दोघांबद्दलचे मत सुधारले होते. मा. डेरविल यांच्या भावना अर्थातच कोणत्याही प्रकारे अशा नव्हत्या. एकंदर काय प्रकार चालला आहे याची कल्पना त्यांना होती व त्याने त्या कातावून गेल्या होत्या. जिने आपली विचारशक्ती गमाविली आहे अशी स्त्री आपल्या शहाणपणाच्या सल्ल्याचा तिटकारा करते असे पाहून त्या वेर्जीहून निघून गेल्या. जाताना त्यांनी

आपल्या जाण्याचे कारण सांगितले नाही; व त्यांना ते कोणी विचारलेही नाही. मा. डेरविल यांच्या जाण्यामुळे मा. रेनॉल यांनी थोडे अश्रू गाळले आणि स्वतःचे सुख दुणावले असल्याचे त्यांना लवकरच समजून आले. त्यांची पाहूणी निघून गेल्यामुळे त्यांना त्यांच्या प्रियकराबरोबर जवळजवळ सबंध दिवसभर एकटे राहता येऊ लागले.

ज्युलिआँ आपल्या हृदयस्वामिनीच्या सुखद सहवासात पूर्वीपेक्षा जास्त खुषीने राहू लागला. कारण तो जास्त वेळ एकटा असला की फूकेने देऊ केलेल्या घातकी भागीदारीची आठवण पुन्हा पुन्हा त्याला येई व मनस्ताप देऊ लागे. ज्याने कधी प्रेम केले नव्हते आणि ज्याच्यावर कोणाकडूनही प्रेम केले गेले नव्हते अशा ज्युलिआँला ह्या नव्या जीवनक्रमाच्या सुरुवातीच्या दिवसांत मा. रेनॉल यांच्याशी मनमोकळेपणे वागण्यात इतके छानदार समाधान लाभे की, तोवर त्याच्या अस्तित्वाची, अगदी जीव की प्राण होऊन बसलेली त्याची महत्त्वाकांक्षा मा. रेनॉलना विश्वासाने निवेदन करण्याच्या बेतात तो होता. फूकेने देऊ केलेल्या त्या संधीबद्दल त्याला एवढा चमत्कारिक मोह का वाटावा याबाबत मा. रेनॉल यांच्याशी सल्लामसलत करणे जमले असते तर त्याला आवडले असते. पण एका क्षुल्लक घटनेने त्याच्या त्या मनमोकळ्या सरधोपटपणाला पायबंद घातला.

★ ★ ★

अनुक्रमणिका

## प्रकरण सतरावे

# प्रमुख दुय्यम अधिकारी

एका संध्याकाळी, सूर्यास्ताच्या सुमारास, बगीच्यात अगदी टोकाला, जेथे कसलाही उपद्रव होण्याची शक्यता नव्हती अशा ठिकाणी आपल्या प्रियकरणीसह ज्युलिआँ बसलेला असता, स्वतःच्याच विचारात खोलवर गढून गेला होता; स्वतःशीच तर्क करीत, तो स्वतःला म्हणाला, 'हे असे मधुर क्षण कायम टिकून राहतील का?' एखादा व्यवसाय स्वीकारण्याची आवश्यकता व तो स्वीकारण्यातील अडचणी ह्याबद्दलच्या विचारात तो गुंग होता. ज्यांच्याजवळ पैसा नसतो अशांची पौगंडावस्था संपविणाऱ्या व त्यांच्या तारुण्याचा प्रारंभिक काळ बिघडविणाऱ्या त्या महत्त्वाच्या, पण मनस्ताप देणाऱ्या समस्येमुळे त्याला खेद वाटत होता. विचारांच्या आवेगात तो स्वतःशी मोठ्याने बोलला, "हां, नेपोलिअन हा खरोखरीच फ्रेंच तरुणांच्या सहाय्यासाठी परमेश्वराने पाठविलेला थोर पुरुष होता! आता त्याची जागा कोण घेणार आहे? त्याच्याशिवाय आता गरीब, दुर्दैवी माणसे कोणाकडे पाहतील? माझ्यापेक्षा थोडे जास्त श्रीमंत असलेलेही, किंवा चांगले शिक्षण घेण्याइतके पैसे ज्यांच्याकडे असतील आणि नंतर वयाच्या विसाव्या वर्षी, स्वतःचा जीवनक्रम सुरू करण्यासाठी अन्य एखाद्याचे सहाय्य मिळविण्याइतके ज्यांच्याकडे धन नसेल असे तरुण तरी आता त्याच्याशिवाय काय करतील?" आणि मग एक दीर्घ सुस्कार टाकून तो पुढे म्हणाला, "काहीही घडो; ती प्राणघातक स्मृती आम्हांला सौख्यापासून कायमचे वंचित करील."

मा. रेनॉलनी कपाळाला आठ्या घालून एकदम नापसंती व्यक्त केलेली त्याने पाहिली. मादामनी स्वतःच्या चेहेऱ्यावर तेव्हा प्रतिकूलतेचा व तुच्छतेचा भाव प्रकट केला. अशा प्रकारे एखाद्या चाकराने, सेवकानेच विचार करणे योग्य होय असे त्यांना वाटले. आपण खूप श्रीमंत आहोत, या भावनेतच लहानाच्या मोठ्या झालेल्या मा. रेनॉलना, ज्युलिआँही श्रीमंत असावा ही गृहीत धरण्यासारखीच गोष्ट आहे असे वाटले. स्वतःच्या जीविताच्या हजारपट प्रेम त्या ज्युलिआँवर करीत होत्या. तो त्यांच्याशी कृतघ्न आणि बेईमान झाला असता तरीही त्याच्यावर त्यांनी प्रेम केले असते; त्यांच्या दृष्टीने त्यात पैशाचा प्रश्न नगण्य होता.

मा. रेनॉल यांच्या मनात कोणत्या स्वरूपाचे विचार चालू आहेत याची कल्पना ज्युलिआँला मुळीच करता आली नाही. त्याच्या त्या वक्र भृकुटीने त्याला त्याच्या विचारविश्वातून खाली पृथ्वीवर परत आणले. बागेतील हिरवळीच्या बिछायतीवर, त्याला अगदी चिकटून बसलेल्या त्या खानदानी महिलेसाठी आपल्या वाक्याची सोइस्कर पुनर्रचना करण्याइतपत ज्युलिआँजवळ प्रसंगावधान होते. इमारती लाकडांचा व्यापारी असलेल्या त्याच्या मित्राकडे तो गेला होता तेव्हा त्या प्रवासात हे विचार ऐकले होते असे स्पष्टीकरण त्याने त्याच्या त्या वक्तव्याबद्दल मा. रेनॉल यांच्याजवळ केले. ती विचारसरणी कोणा धर्मलंड माणसाची होती, त्याची स्वतःची नव्हे, असे त्याने भासविले.

"बरंय. असू द्या ते तसं. तुम्ही मात्र इथून पुढे अशा लोकांच्या संगतीत राहात जाऊ नका म्हणजे झालं." त्यावर मा. रेनॉल त्याला म्हणाल्या. त्यांच्या बोलण्यात अजूनही कमालीच्या थंडपणाचा थोडाफार भाव उरला होताच. पहिला अत्यंत मृदू व अतिशय जवळिकीच्या प्रेमाचा भाव एकदम मावळून गेला होता.

मा. रेनॉल यांची ती भृकुटी, किंवा त्यापेक्षाही ज्युलिआँचा त्याच्या अविचाराबद्दलचा पश्चात्ताप हा ज्युलिआँवर पगडा बसवणाऱ्या भ्रामक कल्पनेला गेलेला पहिला तडा होता. तो स्वतःशी म्हणाला, 'मादाम

रेनॉल चांगल्या व सहृदयी आहेत. त्यांची माझ्याविषयीची भावना उत्कट आहे. पण त्या लहानाच्या मोठ्या झाल्या आहेत शत्रूच्या गोटात. ज्या बुद्धिमान व ईर्ष्येच्या तरुणवर्गाला चांगले शिक्षण घेतल्यानंतर जीवनव्यवसाय सुरू करण्यासाठी पुरेसा पैसा उपलब्ध नसतो अशांचे भय ह्या बुर्जुगांना विशेषच वाटणार हे नक्कीच. समजा, आपल्या हाती, त्यांच्या बरोबरीने शस्त्रे आली अन् आम्हांला त्यांच्याशी सामना द्यायची संधी मिळाली तर ह्या अमीर-उमरावांची स्थिती काय होईल? आता हेच पाहा; एम्. द. रेनॉल अंतःकरणाने प्रामाणिक व सद्‌हेतू बाळगणारे आहेत. त्यांच्यासारखाच स्वभाव घेऊन मी जर व्हेरिएरचा महापैर झालो तर पाद्री वालनो यांच्या लुच्चेगिरीचा समाचार असा घेईन! व्हेरिएरमध्ये न्यायाची पताका कशी फडकत राहील? त्यांची बुद्धिमत्ता काही त्या कार्यात आडकाठी ठरणार नाही. ते जीवनात नेहमी चाचपडतच काळ कंठीत असतात.'

ज्युलिआँचे सुख त्या दिवशी कायम होण्याच्या बेतात होते. आमच्या नायकाच्या अंगी कमतरता होती ती स्वतःशी प्रामाणिक राहण्यासाठी आवश्यक असलेल्या धैर्याची. लढा देण्यासाठी त्याला धैर्याची गरज होती, पण ती "तेथेच, त्याच ठिकाणी." मा. रेनॉल त्याच्या भाषणाने चकित झाल्या होत्या, कारण ज्या माणसांशी भेटण्या बोलण्याचा त्यांचा संबंध येई ती नेहमी म्हणत असत की रोबास्पिरे परत पदावर येणे शक्य झाले ते खास करून खालच्या वर्गातील जादा सुशिक्षित तरुणांमुळे. मा. रेनॉल यांची थंड, रूक्ष वृत्ती तशीच काही वेळ चालू राहिली. ज्युलिआँला ती ठळकपणे जाणवली. याचे कारण असे की, त्याला अप्रत्यक्षपणे आपण काही अप्रिय बोलून गेलो की काय याबद्दलचे मा. रेनॉल यांचे भय व नंतर त्याच्या त्या गैरवक्तव्याबद्दल त्यांना वाटलेली घृणा. त्यांच्या निर्मल चेहेऱ्यावर त्यांची ही मनोव्यथा स्पष्टपणे दिसून येत होती. त्या सुखी असल्या व कंटाळवाण्या संगतीपासून दूर असल्या म्हणजे त्यांचा चेहेरा मोठा सात्त्विक, निरागस दिसत असे.

त्यानंतर ज्युलिआँ आपल्या त्या स्वप्नात स्वतःला मुक्तपणे रंगवू धजला नाही. आता जरा अधिक शांत व कमी आसक्त झाल्यावर मा. रेनॉल यांच्या खोलीत त्याने जाणे शहाणपणाचे नाही असा निर्णय त्याने स्वतःशी घेतला. त्यापेक्षा त्याच जर त्याच्या खोलीत आल्या तर ते अधिक बरे असे त्याला वाटले. घरात इकडे तिकडे हिंडताना एखाद्या नोकराने त्यांना पहिले तरी त्यांच्या त्या जाण्या-येण्यामागे दहा-वीस वाजवी, सयुक्तिक कारणे दिली जाऊ शकतील हे त्याच्या लक्षात आले.

पण या व्यवस्थेतही काही अडचणी होत्याच. फूकेकडून ज्यलिआँला काही पुस्तके मिळाली होती, आणि ती अशी होती की, धर्मशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या त्याच्यासारख्याला एखाद्या पुस्तकविक्रेत्याच्या दुकानात जाऊन ती कधीही मागता आली नसती. तो ती पुस्तके उघडू शकत असे ती फक्त रात्रीच. त्याच्या व मा. रेनॉल यांच्या संकेत भेटीने त्याच्या वाचनात व्यत्यय न आला तर बरे असेसुद्धा त्याला कधी वाटून जात असे. अशा भेटीच्या प्रतीक्षेपायी मनावर पडणाऱ्या ताणामुळे मग ती बगीच्यातील छोटीशी भेट का असेना, त्याला त्याचे वाचन एकाग्रतेने करणे अशक्य होऊन जाई.

तो जी पुस्तके वाचीत असे त्यांच्याबद्दल मा. रेनॉल यांनी जी अगदी वेगळी व नवी जाणीव त्याला करून दिली होती तिच्याबद्दल तो मादामचा उपकृत होता. त्यांना लहानसहान गोष्टींबद्दल विविध प्रकारचे प्रश्न विचारण्याचे धारिष्ट त्याने केले होते. कारण तद्विषयक अज्ञान, उच्च समाजापेक्षा अन्यत्र जन्मलेल्या तरुण माणसाच्या बुद्धीला चांगलेच अडचणीत टाकीत असते, मग त्याच्या अंगी तुम्ही कितीही नैसर्गिक बुद्धिमत्ता असल्याचे माना.

एका अगदी अशिक्षित स्त्रीने दिलेले हे प्रेमाचे शिक्षण ज्युलिआँला एक वरदान वाटले. त्यामुळे त्याला विद्यमान समाजाकडे तो जसा आहे तसा पाहण्याची दृष्टी आली. दोन हजार वर्षांपूर्वीच्या किंवा व्हॉल्टेअर व पंधरावा लुई यांच्या केवळ साठ वर्षांपूर्वीच्या काळात समाज कसा होता ह्याच्या हकीगतींनी त्याचे मन आता गोंधळून जाऊ शकत नव्हते. आपल्या दृष्टीपुढून अज्ञानाचा एक पडदा निघून गेल्याचा अनिर्वचनीय आनंद त्याला झाला. व्हेरिएर येथे घडत असलेल्या घटनांचा अन्वयार्थ त्याला अखेर समजून आला.

गेली दोन वर्षे बेझांसाच्या प्रिफेक्टभोवती विणण्यात आलेली अतिशय गुंतागुंतीची कारस्थाने ज्युलिआँला मग पुरोभागी दिसून आली. पॅरिसहून आलेल्या पत्रांचा आधार त्यांना होता. त्या पत्रांवर खूप मोठमोठ्यांच्या सह्या होत्या. स्वतःच्या अधिकारपदावर अतिशय हटवादीपणे वागणाऱ्या एम्. द. मुऑरो यांना व्हेरिएरच्या महापौरांचा दुय्यम साहाय्यक अधिकारी करण्याऐवजी प्रमुख साहाय्यक अधिकारी करण्याचे कारस्थान शिजत होते.

प्रिफेक्टचा प्रतिस्पर्धी एक अतिशय श्रीमंत कारखानदार होता. त्याला दुय्यम, साहाय्यक अधिकाऱ्याच्या पदावर ठेवणे अत्यावश्यक होते.

एम्. द रेनॉल यांच्याकडे रात्री भोजनासाठी आलेल्या निवडक व महत्त्वाच्या स्थानिक मंडळींच्या बोलण्यातून ज्युलिआँने जे सूचक शेरे आडून ऐकले होते त्यांचा अर्थ अखेरीस त्याच्या ध्यानात आला. समाजात विशेषाधिकार प्राप्त झालेल्या ह्या खास वर्गाला मुख्य डेप्युटीच्या ह्या नेमणुकीच्या प्रश्नात अत्यंत रस होता; तर गावातील इतरांना व विशेषतः उदारमातवाद्यांना या नेमणुकीच्या शक्यतेविषयी गंधही नव्हता. प्रत्येकाला माहीत होते की, त्या नेमणुकीला जे महत्त्व प्राप्त झाले होते ते व्हेरिएरच्या हमरस्त्याची पूर्व बाजू, आता तो राजमार्ग झाल्याने नऊ फूट मागे घेणे प्राप्त झाले होते यामुळे ठीक! त्या मार्गावरून मागे सरकवावी लागतील अशी तीन घरे एम्. द मुआरो यांच्या मालकीची होती. मुआरो जर मुख्य डेप्युटी होण्यात आणि तदनंतर (एम्. द रेनॉल पार्लमेंटमध्ये निवडून आल्यास) महापौरही होण्यात यशस्वी झाले तर ते ह्या प्रश्नाकडे डोळेझाक करतील आणि मग सार्वजनिक हमरस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्या सगळ्याच घरांना थोड्या व लक्षात न येण्यासारख्या अशा दुरुस्त्या करणे शक्य होईल की जेणेकरून ती घरे पुढील शंभर वर्षे सुस्थितीत राहतील. मुआरो यांची मोठी धर्मनिष्ठा आणि मान्यता पावलेली सचोटी लक्षात घेऊनसुद्धा त्यांच्या शिरावर मोठ्या कुटुंबाची जबाबदारी असल्यामुळे त्यांना हवे तसे वळवणे शक्य होईल हे निश्चित होते. रस्त्यापासून मागे घ्यावयास लागणाऱ्या घरांपैकी नऊ घरे व्हेरिएरच्या अगदी प्रमुख गणलेल्या नागरिकांच्या मालकीची होती.

ज्युलिआँच्या दृष्टिकोणातून हे रहस्यपूर्ण कारस्थान फॉन्तनुआच्या लढाईच्या इतिहासापेक्षा किती तरी जास्त महत्त्वाचे होते. फॉन्तनुआचे नाव त्याला प्रथमच आढळले ते फूकेने पाठविलेल्या एका पुस्तकात. ज्युलिआँने त्याची रोजची संध्याकाळ पाद्र्याच्या संगतीत घालविण्यास सुरुवात केल्यापासून गेल्या पाच वर्षांत अनेक गोष्टींनी त्याला विस्मयचकित केले होते. पण योग्यायोग्य गोष्टींची समाज व विनयशील वृत्ती हे, धर्मशास्त्राचा अभ्यास करणाराच्या अंगी आवश्यक असलेले प्रमुख गुणधर्म असल्यामुळे कोणतेही प्रश्न विचारणे हे ज्युलिआँला नेहमीच अशक्य होत असे.

एके दिवशी मा. रेनॉल यांनी त्यांच्या पतीच्या हुजऱ्याला— जो ज्युलिआँचा शत्रू होता— एक हुकूम केला असता, त्यावर तो नोकर चमत्कारिक चेहेरा करून म्हणाला,

अनुक्रमणिका

“पण बाईसाहेब, आज महिन्यातला शेवटचा शुक्रवार आहे.”

“जा, सांगितलेले काम कर.” असे मा. रेनॉलनी त्याला सांगितले तेव्हा ज्युलिआँ त्यांना म्हणाला, “असं बघा, तो त्या गवताच्या दुकानात जात आहे. तेथे पूर्वी चर्च असे; आणि अलीकडेच पुन्हा ते एका धर्मश्रद्धेचे पीठ झाले आहे. पण हे का? सदर गोष्ट अशा गूढ विषयांपैकी एक आहे की. जिच्या आत शिरून उलगडा करून घेणे मला कधीच शक्य झालेले नाही.” यावर मा. रेनॉल उत्तरादाखल बोलल्या, “अतिशय उपयुक्त, पण फार चमत्कारिक अशी ती संस्था आहे. तिथे स्त्रियांना प्रवेश दिला जात नाही. मला तिच्याबद्दल जे काय थोडे बहुत माहीत आहे ते असे की, तेथे सर्वजण एकमेकांना ‘तू’ असे एकेरी नावाने संबोधतात; उदाहरणेच सांगते; आता ह्या नोकराला तिथं म. वालनो दिसतील. सँ जाँ यांनी त्यांना ‘तू’ अशी हाक मारली तरी त्या अहंमन्य मूर्खाला त्याबद्दल मुळीच वाईट वाटणार नाही. उलट तो त्याला त्याच स्वरात उत्तर देईल. ते तिथं काय करीत असतात हे तुम्हांला खरोखरी जाणून घ्यायचं असल्यास मी जास्त तपशील मोजिराँ किंवा वालनो यांना विचारू शकेन. आम्ही प्रत्येक नोकरामागे वीस फ्रँक्स देतो; म्हणजे पुन्हा जर ९३ ची पुनरावृत्ती झालीच तर ते आमच्या माना कापणार नाहीत.”

कालप्रवाह वेगाने चालू होता. प्रियकरणीच्या मोहक सौंदर्याच्या स्मृतीने ज्युलिआँला त्याच्या घोर महत्त्वाकांक्षेपासून परावृत्त केले होते. तो व मा. रेनॉल एकमेकांच्या विरुद्ध राजकीय पक्षात असल्यामुळे मादामशी गंभीर व तर्कशुद्ध विषयांवर बोलण्यापासून स्वतःला आवरण्याची आवश्यकता ज्युलिआँला वाटली होती; व तिच्यामुळे मादामपासून त्याला प्राप्त होणारे सौख्य व त्या त्याच्यावर मिळवीत होत्या तो अधिकार या दोन्हींत वाढ झाली होती; ज्युलिआँला मात्र या परिणामाची काहीच कल्पना नव्हती.

चलाख कानांची रेनॉलांची मुले हजर असत तेव्हा त्या दोघांना तर्कशुद्ध, रूक्ष शब्दांचाच वापर करावा लागे. अशा वेळी, प्रेमाचा अंगार पेटलेल्या नजरेने ज्युलिआँ टक लावून मादामकडे पाही व जग खरेखुरे कसे आहे याबद्दल त्या जे सांगत ते आदर्श सालसपणे ऐकत राही. एखादा नवा रस्ता तयार करणे किंवा एखादे आश्चर्यकारक कंत्राट वगैरेसंबंधीच्या धूर्त लुच्चेगिरीच्या हकीगती त्या अनेकदा सांगत, पण सांगताना मधूनच त्यांचे लक्ष एकदम पूर्णपणे भरकटून जाई. अशा वेळी ज्युलिआँला त्यांना रागे भरावे लागे व मग त्या त्यांच्या मुलांशी वागत त्याप्रमाणे ज्युलिआँला लडिबाळपणे कुरवाळीत. कारण आपण त्याच्यावर स्वतःच्या मुलाप्रमाणेच प्रेम करीत आहोत असे कित्येकदा त्यांना वाटे. त्याचे असे होई की चांगल्या कुटुंबातील पंधरा वर्षांचे मूल ज्या बाबतीत अज्ञानी नसते अशा हजारो साध्या गोष्टींबद्दल ज्युलिआँ त्यांना निष्कपटी मनाने प्रश्न विचारी आणि मग त्यांची उत्तरे त्यांना द्यावी लागत. पण नंतर दुसऱ्याच क्षणी आपल्यापेक्षा किती तरी श्रेष्ठ म्हणून ज्युलिआँचे त्या कौतुक करीत. त्याच्या बुद्धिमत्तेने त्या अगदी खरोखरी भयचकित होत असत. त्या तरुण धर्मोपदेशकातील महान भावी व्यक्ती त्यांना प्रतिदिनी अधिकाधिक अस्पष्टपणे जाणवत असल्याचा भास होई. ज्युलिआँ त्यांना भावी पोप वाटे; रिशल्यप्रमाणे पहिला मंत्रीही भासे.

ज्युलिआँला त्या म्हणाल्या, “तुम्हांला गौरवास्पद मोठेपणा प्राप्त झाला आहे हे पाहण्याइतकी दीर्घायुषी मी असेन का? थोर गुणवत्तेच्या व्यक्तीला प्राप्त असे स्थान आज फ्रान्समध्ये नक्कीच आहे. राजसत्तेला, धर्मसत्तेला अशा एका थोर व्यक्तीची गरज आहे असे इथले सद्‌गृहस्थ रोज बोलत असतात. जर एखाद्या रिशल्यने खासगी निर्णयशक्तीचा हा पाणलोट अडविला नाही तर सगळंच नष्ट झालं असं समजा.”

★ ★ ★

अनुक्रमणिका

## प्रकरण अठरावे

# व्हेरिएर येथे राजेसाहेब

तीन सप्टेंबर रोजी दहा वाजता व्हेरिएरच्या हमरस्त्यातून एक हवालदार घोड्यावरून दौडत गेला आणि त्याने सारे व्हेरिएर जागे केले. पुढील रविवारी (आणि आता तर मंगळवार होता) 'हिज हायनेस, दि किंग ऑफ—' राजेसाहेब व्हेरिएरला येत असल्याची बातमी त्याने आणली. शक्य तेवढ्या थाटाने राजेसाहेबांचे स्वागत करण्यासाठी त्यांना 'गार्ड ऑफ ऑनर' देण्याची व्यवस्था करण्याचा हुकूम दी प्रिफेक्ट यांनी काढला. वेर्जीला एक जासूद पाठविण्यात आला. एम्. द रेनॉल रात्री वेर्जीहून व्हेरिएरला आले. तेव्हा सबंध गावात एकच गडबड उडून गेल्याचे त्यांना आढळले. प्रत्येकजण आगामी समारंभात अमूक एक करण्याचा आपला हक्क आहे असे प्रतिपादीत होता. ज्यांना इतर काही काम नेमून दिले नव्हते असे लोक राजेसाहेबांच्या नगरप्रवेशाचा सोहोळा पाहण्यासाठी घरांचे सज्जे रोखून ठेवू लागले होते.

त्या गार्ड ऑफ ऑनरच्या संचालनासाठी मुख्याधिकारी म्हणून कोणाची नियुक्ती करावी ह्याचा विचार करीत असता, हमरस्त्यापासून घरे मागे हटविण्यातील हितसंबंधाचे महत्त्व एम्. द रेनॉल यांच्या ध्यानात एकदम आले व संचालनाच्या प्रमुखाच्या जागी एम्. मुआरो यांचीच नियुक्ती केली पाहिजे असे त्यांना वाटले. प्रमुख डेप्युटीच्या पदाचा हक्क त्या नियुक्तीमुळे आयताच प्रस्थापित होऊ शकेल असेही त्यांना वाटले. मुआरो यांच्या कर्तव्यतत्परतेविरुद्ध काहीच बोलण्यासारखे नव्हते. त्यांच्या कर्तव्यतत्परतेची इतर कोणाशीही तुलनाच होऊ शकत नव्हती. पण अडचण ही होती की, मुझारो आपल्या उभ्या आयुष्यात घोड्यावर बसले नव्हते. छत्तीस वर्षे वयाचा हा माणूस प्रत्येक बाबतीत भित्रा होता. आपण घोड्यावरून पडू व लोक आपल्याला हसतील ही भीती त्याच्या मनात सारख्याच प्रमाणात दडून बसली होती.

सकाळीच पाच वाजता महापौरांनी मुआरोना बोलावून घेतले आणि ते त्याला म्हणाले, "हे बघा साहेब, ज्या पदावर तुम्हांला अधिष्ठित झालेले पाहण्यात सर्व योग्य विचारी माणसांना आनंद वाटेल त्यावर तुम्ही आधीच रुजू झाला आहात असं समजून मी तुमचा सल्ला विचारीत आहे. ह्या दुर्दैवी गावात कारखानदारांची भरभारट होते, लिबरल पक्षाचे लोक कोट्यधीश बनतात, त्यांना सत्तेची तहान लागलेली असते व प्रत्येक प्राप्त संधीचा उपयोग ते सत्तालाभाचे एक हत्यार म्हणूनही करतील. पण आपण राजेसाहेबांच्या, राजपदाच्या हितसंबंधाचा विचार केला पाहिजे; सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्या पवित्र धर्माला जे उपकारक आहे त्याचेही चिंतन केले पाहिजे. तेव्हा साहेब, गार्ड ऑफ ऑनरच्या संचालनाची जबाबदारी आपण कोणाकडे सोपविली पाहिजे असं तुम्हाला वाटतं?"

मुआरो यांच्या मनात घोड्याबद्दल भयंकर भय निर्माण झालेले होते; तरीही एखाद्या हुतात्म्याप्रमाणे त्यांनी गार्ड ऑफ ऑनरच्या मुख्याधिकाऱ्याचे सन्मानाचे पद स्वीकारल्याचे शेवटी सांगून टाकले. "योग्य त्या रीतीने व्यवस्था सांभाळीन" असं ते महारपौरांना म्हणाले. सात वर्षांपूर्वी प्रिन्स ऑफ दी ब्लड (एक अस्सल राजवंशीय राजा) या शहरातून गेले होते तेव्हा मानवंदनेतील स्वारांनी आपले गणवेश वापरले होते. आता त्यांची धुलाई-शिलाई करण्याइतकाही वेळ उरलेला नव्हता.

मा. रेनॉल त्यांची मुले व ज्युलिआँ यांच्यासह वेर्जीहून सात वाजता व्हेरिएरला येऊन पोहोचल्या. त्यांच्या बैठकीची खोली लिबरल पक्षाच्या महिलांनी भरून गेलेली त्यांना दिसली. वेगवेगळ्या पक्षांनी एकत्र

यावे असा कळकळीचा प्रचार ह्या महिला करीत होत्या. आपल्या यजमानांना गार्ड ऑफ ऑनरमध्ये, मा. रेनॉल यांच्या पतीने सामील करून घ्यावे अशी विनवणी करण्यासाठी त्या जमल्या होत्या. त्यांच्यापैकी एकीने तर खात्रीपूर्वक सांगितले की, तिच्या पतीला जर त्यात सामील केले गेले नाही तर त्या दुःखापायी तो कर्जबाजारी होईल. मा. रेनॉलनी त्या सर्व महिलांची बोळवणी ताबडतोब केली. एकंदरीने मादाम कशाने तरी व्यग्र झाल्यासारख्या दिसत होत्या.

ज्या गोष्टी मा. रेनॉल यांचे मनःस्वास्थ्य बिघडवीत होत्या त्यांच्याबाबत ज्युलिआँशी त्यांनी गुप्तता राखली होती व त्यामुळे त्याला जेवढे आश्चर्य वाटले त्यापेक्षा जास्त रोष वाटला. त्याने स्वतःला कटुतेने सांगितले, "मला वाटलंच होतं असं होईल म्हणून. स्वतःच्या घरी राजेसाहेबांचे स्वागत करण्याच्या आनंदाने त्यांचे माझ्यावरील प्रेम फिके पाडले आहे. ही सगळी धांदल—गडबड पाहून त्या दिपून गेल्या आहेत. जेव्हा त्यांच्या मेंदूला जातिविषक व वर्गविषयक विचारांचा उपद्रव होणे बंद पडेल तेव्हा त्या माझ्यावर पूर्ववत प्रेम करू लागतील."

आश्चर्याची गोष्ट अशी होती की यामुळे तो मा. रेनॉल यांच्यावर जास्त प्रेम करू लागला.

पडदे, गाद्यागिरद्या इ. सामान पुरविणारांनी त्या सबंध घरावर जणू स्वारीच सुरू केली. मा. रेनॉल यांच्याशी एखादा शब्द बोलण्याच्या संधीची वाट ज्युलिआँने खूप वेळ व्यर्थच पाहिली. अखेर त्या त्याला त्याच्याच खोलीतून बाहेर पडताना दिसल्या. त्यांच्या हातात त्याचा एक कोट होता. तेव्हा तेथे ते फक्त दोघेच होते. त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला. पण त्याचे बोलणे ऐकण्याचे नाकारून त्या निघून गेल्या. त्यावर तो स्वतःला म्हणाला, "अशा स्त्रीवर प्रेम करणारा मी केवढा मूर्ख म्हटला पाहिजे? महत्त्वाकांक्षेने तिला तिच्या नवऱ्याप्रमाणेच नुसतं वेडं करून टाकलं आहे."

पण ज्युलिआँला वाटले त्यापेक्षाही मा. रेनॉल जास्त वेड्या होत्या. त्यांची एक मोठी इच्छा अशी होती की एका दिवसासाठी का होईना ज्युलिआँने त्यांचा तो उदासवाणा काळा कोट टाकून द्यावा. पण त्यामुळे त्याला धक्का बसेल या भीतीने त्यांनी त्यांची ती इच्छा कधीच बोलून दाखविली नाही. नेहमी सहजप्रवृत्तीप्रमाणे सरळ, साधे वागणाऱ्या या बाईने इतके बुद्धीचे कसब दाखवावे ही खरोखरी वाखाणण्याजोगी गोष्टच म्हणायची! मोठ्या हुशारीने त्या महिलेने प्रथम मुआराँकडून आणि मग सब-प्रिफेक्ट मोजिराँकडून, गॉर्ड ऑफ ऑनरमध्ये ज्युलिआँच्या नेमणुकीसाठी संमती मिळविली, आणि तीही पाच-सहा सुखवस्तू कारखानदारांच्या तरुण मुलांना डावलून. त्यांच्यापैकी निदान दोघांनी तरी धर्मनिष्ठा आदर्श अशी होती.

आपली घोडागाडी गावातील सर्वांत सुंदर स्त्रियांना तात्पुरती वापरावयास देण्याचा वालनोचा मनसुबा होता, म्हणजे त्यांच्याकडून आपल्या नामी नॉर्मन घोड्यांची प्रशंसा केली जाईल असे त्याला वाटत होते. खरे म्हणजे तो ज्युलिआँचा अतिद्वेष्टा होता; पण ज्युलिआँला एक घोडा देण्याचे त्याने कबूल केले. परंतु गार्ड ऑफ ऑनरमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्वाराजवळ, सात वर्षांपूर्वी, त्या सार्वजनिक समारंभात चमकलेला, चांदीच्या स्कंधभूषणांची जोडी असलेला, आकाशी रंगाचा कर्नलचा कोट होता, तो त्याच्या स्वतःच्या मालकीचा होता अथवा त्याने तो उसनवारीने मिळविलेला होता. मा. रेनॉलना ज्युलिआँसाठी तसा नवा कोट मिळवावयाचा होता; आणि उरले होते अवघे चार दिवस. तेवढ्या अवधीत कोणाला तरी बेझाँसाला पाठवून तेथून गणवेष, शस्त्रे, टोपी आणि गार्ड ऑफ ऑनरसाठी आवश्यक असलेल्या इतर सगळ्या वस्तू आणायला हव्या होत्या. यातली विशेष मजेची गोष्ट म्हणजे ज्युलिआँसाठी तसा कोट व्हेरिएर येथे तयार

करवून घेणे हे मा. रेनॉलना शहाणपणाचे वाटेना. स्वतः ज्युलिआँ आणि गावकरी मंडळी ह्या दोघांनाही आश्चर्यचकित करावे अशी त्यांची इच्छा होती.

गार्ड ऑफ ऑनरच्या तयारी-व्यवस्थेचे व जनमानस संघटित करण्याचे काम आटोपले होते. त्यानंतर महापौरांना लगेच हाती घ्यावयाची होती ती एका मोठ्या धार्मिक समारंभाची व्यवस्था. गावापासून थोड्या अंतरावरील ब्रे-ले-हौत तेथील सेंट क्लेमेंटचे सुप्रसिद्ध अवशेष संरक्षित स्वरूपात ठेवलेल्या स्थळाला भेट दिल्याशिवाय व्हेरिएरमधून जाण्याचे राजेसाहेबांनी नाकारले होते. तेथे पाद्री आपल्या सर्व संख्येसह हजर राहावयास पाहिजे होते. आणि ही गोष्ट घडवून आणणे महाकठीण होते. वाटेल ते झाले तरी म. शॅलाँला बाहेर ठेवावयाचे असा निश्चय नवा पाद्री म. मासलाँ याने केला होता. ह्या कृतीतील त्याचा अविचारीपणा एम्. द रेनॉल यांनी मासलाँला दाखवून दिला होता. पण त्याचा उपयोग झाला नाही. मार्क्विस द ला मोल यांचे पूर्वज दीर्घकाळपर्यंत त्या प्रांताचे गव्हर्नर होते; म्हणून राजेसाहेबांच्या बरोबर राहण्यासाठी त्यांची निवड करण्यात आली होती. अबे शॅलाँशी त्यांची ओळख गेल्या तीस वर्षांपासून होती. व्हेरिएरला पोहोचल्यावर ते त्याची चौकशी करतील हे निश्चित होते; आणि तो वरिष्ठांच्या मर्जीतून उतरला आहे असे त्यांना समजल्यास, आता ज्या छोट्याशा घरात तो राहात आहे तेथे त्याचा शोध घेण्यासाठी मिरवणुकीतील त्यांच्या हुकमतीखालील लोकांना घेऊन जाण्यास ते कमी करणार नाहीत हेही उघड होते. तसे झाल्यास तो एक प्रतिटोलाच ठरणार होता.

अबे मासलाँने त्यावर उत्तर दिले, “माझ्या पाद्र्यांमध्ये तो सामील झाल्यास इथे आणि बेझाँसालाही तसा तो आढळल्यास माझा तो अपमान ठरेल. नैसर्गिक मानवी सदिच्छेला न मानणाऱ्या जॅन सेनचा तो अनुयायी; अन् माझ्यासमवेत! हाय रे परमेश्वरा!”

पण एम्. द रेनॉल त्यांना खात्रीपूर्वक बजावीत म्हणाले, “प्रिय अबे, मंस्यूर द ला मोल यांच्याकडून अपमान केला जाण्याच्या धोक्याला मी व्हेरिएरच्या नगरपालिका सरकारला तोंड द्यायला लावणार नाही. तुम्हाला तो मनुष्य माहीत नाही; राजदरबारी तो धडपणे वागतो; पण इथे ग्रामीण भागात त्याची वृत्ती निंदाखोर, उपहासात्मक अशी असते आणि लोकांना अडचणीत आणण्याइतकी दुसरी कोणतीही गोष्ट त्याला प्रिय नाही. केवळ स्वतःच्या मनोरंजनासाठी, लिबरलांच्या नजरेत आपल्याला हास्यास्पद ठरवायला तो मागेपुढे पाहणार नाही.”

तीन दिवस चर्चा होऊन शनिवारी रात्री, म्हणजे रविवार उजाडण्यापूर्वी सरतेशेवटी अबे मासलाँ यांनी स्वतःचा ताठा महापौरांनी व्यक्त केलेल्या भयामुळे सोडला. कारण महापौरांच्या भयाने धैर्याचे, चिकाटीचे स्वरूप धारण केले होते. यानंतर करावयाची दुसरी गोष्ट होती ती अबे शॅलाँला शर्करावगुंठित शब्दांत एक पत्र लिहून, अर्थात वार्धक्य व दौर्बल्य यांनी शक्य केले तरच, त्यांना ब्रे–ले–हौत येथील त्या अवशेषांच्या वंदनसमारंभास उपस्थित राहण्यासाठी निमंत्रण पाठविण्याची. ज्युलिआँ म. शॅलाँ यांच्याबरोबर धार्मिक कृत्यांसाठी उप-पुरोहीत म्हणून राहणार असल्यामुळे शॅलाँनी त्याच्यासाठी निमंत्रणपत्राची मागणी करून ते मिळविले.

रविवारी प्रातःकालीच शेजारच्या पहाडी भागातून हजारो शेतकरी येऊ लागले आणि त्यांनी व्हेरिएरच्या रस्त्यांत एकच गर्दी केली. त्या दिवशी छान, स्वच्छ ऊन पडले होते; अखेर दुपारी तीनच्या सुमारास त्या गर्दीत जोरदार हालचालीची एक लाट उसळली. कारण व्हेरिएरपासून सुमारे दोन लीग (सहा मैल) दूर असलेल्या एका खडकावर लोकांना खुणेच्या मशालींचा जाळ दिसला. त्याचा संकेतार्थ असा होता

की, राजेसाहेबांनी त्या विभागाच्या मुलुखात नुकताच प्रवेश केला होता. लगेच सर्व घंटांच्या निनादांनी व गावाच्या मालकीच्या एका जुन्या स्पॅनिश तोफेतून एकसारखे गोळे उडवून त्या महान घटनेचा आनंद घोषित करण्यात आला. अर्धे लोक घरांच्या छपरांवर चढून बसले होते. महिला मंडळी सज्ञात बसल्या होत्या. गार्ड ऑफ ऑनरची ती भव्य मिरवणूक पुढे सरकू लागली.

तिच्यात सामील झालेल्यांच्या भपकेबाज गणवेषांची खूप प्रशंसा लोकांनी केली. प्रत्येक प्रेक्षकाचा एखादा मित्र किंवा नातेवाईक त्या मिरवणुकीत होता. तो त्याने ओळखला. एम्. द मुआरो यांची जी गाळण उडत होती ती पाहून साऱ्या गर्दीत हशा पिकत होता. त्यांचा सावध हात कोणत्याही क्षणी त्यांच्या घोड्याचे खोगीर पकडण्यास दक्ष होता. पण जी एक गोष्ट प्रेक्षकांना इतर साऱ्या गोष्टी विसरायला लावीत होती ती म्हणजे नवव्या तुकडीतील डाव्या बाजूचा माणूस. तो एक देखणा व अगदी सडपातळ मुलगा होता. तो कोण आहे हे लोकांना आधी ओळखता आले नाही. तितक्यात काही जणांच्या संतापाच्या आरोळ्यांनी, तसेच इतर काहींच्या आश्चर्ययुक्त स्तब्धतेने एक सर्वसाधारण सनसनाटी प्रतिक्रिया जाहीरपणे प्रकट केली गेली. वालनोच्या नॉर्मन घोड्यांपैकी एकावर स्वार झालेला हा तरुण माणूस म्हणजे सुताराचा मुलगा, तरुण सोरेल आहे हे प्रेक्षकांनी ओळखले. त्याबरोबर महापौरांच्या विरुद्ध सर्वांनी व विशेषतः उदारमतवाद्यांनी एकमताने आरडाओरडा केला. पाद्र्याच्या वेषातील हा तरुण मजूर महापौरांच्या कारट्यांचा शिक्षक होता म्हणून अमक्या मन्स्यूर किंवा तमक्या मन्स्यूर श्रीमंत कारखानदारांना वगळून त्यांच्याऐवजी गार्ड ऑफ ऑनरमध्ये त्याची नेमणूक करण्याइतके उद्धट धारिष्ट महापौर रेनॉल यांनी केले काय? एका बँकवाल्याची बायको तर चक्क म्हणाली, “गटारासारख्या हीन स्थळी जन्म घेऊन एकदम मोठेपणाप्रत जाऊ पाहणाऱ्या त्या उपटसुंभाचा खरे म्हणजे त्या डावललेल्या सभ्यगृहस्थांनी त्याच्या तोंडावर उघड अपमान केला पाहिजे.” त्यावर त्यांची जोडीदारीन म्हणाली,

“दुष्ट दिसतोय स्वभावाने तोंडावरून! अन् त्याच्याजवळ बांकदार तलवार आहे. त्या गृहस्थांच्या चेहेऱ्यांवर वाटेल तसा वार करण्याइतका तो धोकेबाज आहे.”

अमीर-उमराव मंडळींनी केलेली टीका तर जास्त भयंकर होती. अशा ह्या शिष्टाचाराच्या भंगाला महापौरच जबाबदार होते काय अशी विचारणा त्या महिलांनी आपापसांत केली. तरी एकंदरीने, हीन कुलोत्पन्नांबद्दल त्यांना वाटणाऱ्या तिरस्काराला न्याय देण्यात आला.

त्या टीकेला ज्युलिआँ कारणीभूत ठरला होता तरी त्या वेळी तो सर्वांत जास्त सुखी होता. निसर्गतःच धीट असल्यामुळे, त्या डोंगराळ गावातील इतर तरुणांच्या तुलनेने तो त्याच्या घोड्यावर जास्त व्यवस्थितपणे व आत्मविश्वासाने बसलेला होता. भोवतालच्या स्त्रिया त्याच्याबद्दल बोलत होत्या हे त्याला त्यांच्या नजरांवरून कळूव आले.

ज्युलिआँच्या गणवेषातील स्कंधभूषणे विशेष चमकत होती, कारण ती नवी होती. क्षणाक्षणाला त्याचा घोडा धोकेबाजपणे मागील पायांवर उभा राहू पाहात होता. ज्युलिआँ आनंदाच्या सप्तस्वर्गात विहरत होता.

गार्ड ऑफ ऑनरची ती मिरवणूक जुन्या किल्ल्याच्या तटाजवळून जाऊ लागली असता त्या लहान तोफेच्या अवाजामुळे ज्युलिआँचा घोडा चमकून रांगेबाहेर पडला तेव्हा तर त्याला अमर्याद आनंद झाला. अत्यंत प्रभावी योगायोगामुळेच केवळ ज्युलिआँ खाली पडला नाही; किंवा बाजूला फेकला गेला नाही. आपण

एक वीरपुरुष आहोत असे त्या क्षणापासून त्याला वाटू लागले. तो नेपोलिअनच्या हाताखालील एक शिपाई अधिकारी होता आणि तोफखाना चालविण्याचे काम त्याच्याकडे होते.

पण ज्युलिआँपेक्षा अधिक सुखी अशीही एक व्यक्ती होती. प्रथम तिने (मा. रेनॉल यांनी) टाऊन हॉलच्या एका खिडकीतून त्याला मिरवणुकीबरोबर चाललेला पाहिले होते. नंतर आपल्या गाडीत बसल्यावर त्वरेने एक खूप मोठा वळसा घेऊन, ज्युलिआँचा घोडा जेव्हा इतरांबरोबरच्या मार्गातून बाहेर पडू लागला तेव्हा त्या तेथे वेळेवर पोहोचल्या होत्या; व ते पाहून त्यांचा थरकाप उडाला होता. अखेर त्यांची गाडी, गावाच्या दुसऱ्या एका वेशीतून दौडत निघून, राजेसाहेब जेथून जावयाचे त्या मार्गावर परत आली. तेथून त्यांना गार्ड ऑफ ऑनरच्या मिरवणुकीच्या मागून, वीस पावले अंतरावरून व धुळीच्या मोठ्या ढगातून जाता आले.

राजेसाहेबांच्या सन्मानार्थ सत्काराचे भाषण करण्याचा बहुमान महापौरांना मिळाला होता. ते बोलू लागले तेव्हा दहा हजार शेतकऱ्यांनी "राजेसाहेब दीर्घायू होवोत!" असा जयजयकार केला. सर्व भाषणे होण्यास एक तास लागला. ती ऐकल्यानंतर राजेसाहेब गावात प्रवेश करू लागले तेव्हा लहान तोफेचे गोळे एका पाठोपाठ एक असे भराभरा घाईगर्दीने उडविण्यात आले. पण तेव्हा एक अपघात घडून आला; आणि तो गोळीबार करण्याचे तांत्रिक शिक्षण लाइपजिक किंवा मॉटमिरेल येथे घेतलेल्या गोलंदाजांना नव्हे तर भावी प्रमुख डेप्युटी एम्. द. मुआरो यांना. मिरवणुकीच्या सबंध मार्गावरील एकमेव डबक्यात त्यांच्या घोड्याने त्यांना अलगद पाडले. त्यामुळे कुटाळकीला चांगलाच वाव मिळाला. कारण राजेसाहेबांच्या गाडीला वाट करण्यासाठी मुआरोंना बाजूला ओढून काढावे लागले होते.

नव्या छानदार चर्चसमोर राजेसाहेब खाली उतरले. ह्या प्रसंगानिमित्त लालभडक रंगाच्या झालरी लावून चर्च सुशोभित करण्यात आले होते. राजेसाहेब भोजनासाठी थांबणार होते व त्यानंतर लगेच ते सेंट क्लेमेंटच्या सुप्रसिद्ध अवशेषांच्या वंदनेसाठी पुन्हा मार्गस्थ होणार होते. ते चर्चच्या आत येतात न येतात तोच ज्युलिआँ घोडदौड करीत एम्. द. रेनॉल यांच्या घरी गेला. सुटकेचा निःश्वास टाकून त्याने तेथे त्याचा तो आकाशी रंगाचा छानदार कोट, गणवेषाची स्कंधभूषणे व तरवार काढून टाकली व आपला जुना झिरझिरीत झालेला काळा कोट घातला. लगेच तो घोड्यावर स्वार झाला आणि ब्रे-ले-हौत येथे काही क्षणांतच पोहोचला. ते स्थळ एका बऱ्याच उंचीच्या टेकडीच्या माथ्यावर वसलेले आहे.

ज्युलिआँला वाटले, "उत्साहामुळे ह्या शेतकऱ्यांची संख्या वाढतच चालली आहे. व्हेरिएरमध्ये गर्दीमुळे जागचे हालतासुद्धा येत नाही; आणि इथे ह्या पुराण्या चर्चभोवती दहा हजारांपेक्षा जास्तजण जमले आहेत." क्रांतीच्या वेळी मोडतोडीच्या दांडगाई वृत्तीने त्या सुंदर वास्तूचा अर्धा अधिक विध्वंस करण्यात आला होता. पण रेस्टोरेशननंतर त्याचा जीर्णोद्धार अत्यंत कौशल्याने व आकर्षकपणे केला गेला. तेथे चमत्कार घडतात असा प्रवाद अगोदरच कानी येऊ लागला होता. ज्युलिआँ अबे शॅलाँकडे येऊन दाखल झाला. शॅलाँने रागावून त्याची चांगलीच खरडपट्टी काढली, आणि मग त्याला पाद्र्याचा झगा व मोठा अंगरखा दिला. ज्युलिआँने घाईने ते कपडे परिधान केले व तो शॅलाँच्या मागोमाग निघाला. आग्देच्या तरुण बिशपच्या शोधार्थ शॅलाँ निघाले होते. तो बिशप म. द मोल यांचा पुतण्या होता. त्या विभागाचा अधिकारी बिशप म्हणून त्याची नेमणूक अलीकडेच झाली होती आणि राजेसाहेबांना सेंट क्लेमेंटचे अवशेष दाखविण्यासाठी त्याची निवड करण्यात आली होती. पण त्याचा पत्ताच नव्हता!

अनुक्रमणिका

पाद्री लोकांची चिंतायुक्त अधीरता त्यामुळे वाढत होती. त्या प्राचीन चर्चच्या उदास, गॉथिक बांधणीच्या दालनाच्या पडवीत ते आपल्या नेत्याची प्रतीक्षा करीत होते. ब्रे-ल-हौतच्या मूळच्या चर्चचे धर्मोपदेशक प्रतिनिधी (पॅरिश प्रीस्ट) म्हणून जिल्ह्यातून चोवीस पाद्री गोळा करण्यात आले होते. १७८९ पूर्वी त्या जागी चोवीस धर्मोपदेशक (कॅनन्स) असत. पाऊण तास पाद्री मंडळींनी “हे तरुण लोक असेच निष्काळजी असतात” अशी कुरकूर करण्यात घालविला. राजेसाहेब मार्गस्थ झाले असल्यामुळे सर्व पाद्री मंडळी चर्चमधील प्रार्थनास्थळी लगेच उपस्थित व्हावयास हवी होती. ही गोष्ट त्यांच्या डीनने स्वतः जाऊन प्रमुख बिशपना कळविल्यास चांगले होईल असे शेवटी पाद्री मंडळींनी ठरविले. म. शॅलाँ यांचे खूप ज्येष्ठ वय लक्षात घेऊन त्यांना डीन करण्यात आले होते. त्यांना जरी ज्युलिआँचा राग आला होता तरी तो बाजूस ठेवून, त्यांनी आपल्याबरोबर चलण्यासाठी ज्युलिआँला खूण केली. ज्युलिआँला त्यांचा पायघोळ आंगरखा मोठा ऐटबाज दिसत होता. चर्चमध्ये पाद्र्यांसाठी असलेल्या प्रसाधन-मेजावरील साधनाने ज्युलिआँने स्वतःच्या केसांवर काही गुप्त प्रक्रिया केली होती आणि तिच्यामुळे त्याचे छानदार कुरळे केस अगदी चापून बसले होते. काही नजरचूक होऊन तिच्यामुळे म. शॅलाँ यांचा राग वाढला होता. कारण ज्युलिआँच्या पाद्र्याच्या झग्याच्या लांब दुमडीखाली, गार्ड ऑफ ऑनरचे स्वार वापरीत असलेल्या बुटांच्या टाचांची टोके दिसून येत होती.

ते बिशपच्या दालनावर पोहोचले तेव्हा गणवेषाच्या सोन्याच्या फितींनी लहडलेल्या उंच हुजऱ्यांनी, “हिज लॉर्डशिप”ना भेटता येणार नाही असे वृद्ध शॅलाँना कसाबसा अनुग्रह केल्याप्रमाणे सांगितले! ब्रे-ले-हौतच्या ‘नोबल चॅप्टर’चे आपण डीन असून या नात्याने, त्या हंगामी बिशपला केव्हाही भेटण्याचा अधिकार आपल्याला आहे असे त्यांनी सांगण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते हुजरे त्यांना हसले.

त्या हुजऱ्यांच्या ह्या उद्धटपणाने ज्युलिआँचे स्वाभिमानी मन खवळले. समोर दिसणाऱ्या शयनगृहांच्या प्रत्येक दरवाजात जाऊन तो चौकशी करीत असता एका लहान्या दरवाजात त्याच्या प्रयत्नांना यश आले. जुन्या, मोठ्या चर्चच्या शेजघराकडील ती एक लहानी खोली होती. तिथे हिज लॉर्डशिपच्या अंगरक्षकाच्या पुढ्यातच तो येऊन पोहोचला. त्या सेवकांचा पोषाख काळा होता. पोषाखावर मानेभोवती साखळ्या दिसत होत्या. ज्युलिआँचा घाईचा आविर्भाव पाहून त्याला खुद्द बिशपनेच बोलाविलेले असावे असे त्यांना वाटले. म्हणून त्यांनी त्याला तेथून जाऊ दिले. ज्युलिआँ थोडा पुढे गेला तेव्हा आपण एका मोठ्या गॉथिक बांधणीच्या दिवाणखान्यात आलो असल्याचे त्याला आढळून आले. सभागृहासारख्या त्या दालनात फार अंधार होता. दालनाच्या भिंती काळ्या ओक लाकडी फळ्यांनी मढविलेल्या होत्या. एक अपवाद सोडता बाकीच्या सर्व निरुंद खिडक्या विटांनी बंद करून टाकलेल्या होत्या. त्या बांधकामाचा दर्शनी ओबडधोबडपणा झाकला जाऊ शकेल असे तेथे काहीच नव्हते. यामुळे तिथल्या प्रशंसनीय लाकूडकामाच्या शोभेशी ते बांधकाम फार विसंगत दिसत होते. बर्गंडीच्या प्राच्यविद्याविशारदांमध्ये ह्या दालनाची ख्याती होती. ड्यूक चार्लस् दी बोल्ड याने एका अपराधाचे प्रायश्चित्त म्हणून ते १४७० च्या सुमारास बांधले. त्याच्या दोहो बाजूंना ओळीने दर्जेदार कोरीव लाकूडकाम केलेले कोनाडे होते. त्यांत विविध रंगांच्या लाकडांचा उपयोग करून ॲपोकॅलित्सेची (सेंट जॉनच्या साक्षात्कारांची) सारी दृश्ये चित्रित करण्यात आली होती.

उघड्या पडलेल्या विटा व सफेद गिलावा यांच्यामुळे शान बिघडलेल्या त्या उदास वास्तुसौंदर्याने ज्युलिआँच्या मनावर खोल परिणाम केला. भारलेल्या मनःस्थितीत तो तेथे तसाच शांतपणे उभा राहिला. खोलीच्या दुसऱ्या टोकाला एक खिडकी होती. एकमेव खिडकीतून तेथे प्रकाश येत होता. त्या खिडकीजवळ महॉगनी लाकडाची चौकट असलेला, इकडून तिकडे नेता येण्याजोगा एक आरसा ज्युलिआँला तेथे दिसला. फीत लावलेला, जांभळ्या रंगाचा पाद्र्याचा मोठा झगा व नाजूक फितीचा अंगरखा घातलेला, पण डोके

उघडेच असलेला एक तरुण त्या आरशापुढे तीन पावलांच्या अंतरावर उभा होता. तशा त्या खोलीत तो आरसा अस्थानीच वाटत होता. तो तेथे शहरातून आणलेला होता यात शंकाच नव्हती. तो तरुण माणूस चिडलेला असावा असे ज्युलिआँला वाटले. आरशाच्या दिशेने तो स्वतःच्या उजव्या हाताने गंभीरपणे आशीर्वाद देत होता.

ते पाहून ज्युलिआँला आश्चर्य वाटले. त्याने स्वतःला विचारले, “ह्याचा अर्थ काय असू शकेल? हा तरुण पाद्री त्या समारंभाचा काही प्राथमिक भाग पार पाडीत आहे की काय?... कदाचित तो बिशपचा चिटणीस असेल... त्या हुजऱ्यांप्रमाणे हाही उद्धट असेल... पण त्यात काय? त्याला विचारायला कोणती हरकत आहे? “ज्युलिआँ पुढे सरकला आणि त्या एकमेव खिडकीकडे नजर ठेवून व त्या तरुणाकडे लक्ष देत मंद गतीने तो खोलीच्या दुसऱ्या टोकापर्यंत गेला. त्या तरुणाचे ते आशीर्वाद देणे आता कमी वेगाने पण अनंत वेळा क्षणाचीही उसंत न घेता चालू होते.

ज्युलिआँ जवळ गेला तेव्हा त्या माणसाचा त्रस्त चेहेरा त्याला नीट दिसला. कडांना फीत लावलेल्या त्याच्या त्या भारी किंमतीच्या अंगरख्याकडे पाहून ज्युलिआँ त्या भव्य आरशापासून थोड्या अंतरावर एकदम थकबला.

“त्याच्याशी बोलणे हे माझे कर्तव्य आहे” असे स्मरण अखेर त्याने स्वतःला दिले. पण त्या खोलीच्या सौंदर्याने त्याच्या भावना भारावल्या गेल्या होत्या आणि तो गृहस्थ कदाचित आपल्याशी कठोरपणे बोलेल या कल्पनेने नाऊमेद झाला होता.

त्या तरुणाला आरशातून ज्युलिआँ दिसला; तो वळला आणि स्वतःच्या चेहेऱ्यावरचा चिडखोर भाव एकदम बदलून, गोड आवाजात त्याने ज्युलिआँला विचारले,

“काय साहेब? आता तरी तयारी झाली आहे की नाही?”

ज्युलिआँ अवाक् झाला. तो तरुण त्याच्याकडे वळला तेव्हा त्याच्या छातीवरचा खास बिशपचा क्रॉस ज्युलिआँने पाहिला व तो आग्‌देचा बिशप असल्याचे त्याने ओळखले. ज्युलिआँ मनात म्हणाला, ‘किती तरुण आहे हा! फार तर सहा किंवा आठ वर्षांनी माझ्यापेक्षा मोठा असेल’ आणि त्याला स्वतःच्या त्या टोकदार बुटांची लाज वाटली. बुजरेपणे त्याने सांगितले, “मॉसेन्यूर, चॅप्टरचे डीन, मंस्यूर शॅलाँ यांनी मला पाठविलं आहे.”

“असं? मी त्याच्याबद्दला फार चांगल्या गोष्टी ऐकल्या आहेत. पण माफ करा साहेब, मला वाटलं की, माझा मुकुट माझ्याकडे परत आणणारे गृहस्थ आहात तुम्ही. “तो बिशप शालीनतेने बोलला आणि त्यामुळे ज्युलिआँ त्याच्याकडे जास्तच आकृष्ट झाला. खेदपूर्ण भावनेने बिशप पुढे म्हणाला, “पॅरिसहून पाठविताना मुकुट निष्काळजीपणे बांधण्यात आला होता, त्यामुळे त्याच्या वरच्या बाजूच्या कापडावरील चांदीची कलाकारी भारी खराब झाली. मुकुट तशा स्थितीत लोकांनी पाहिल्यास त्यांना धक्काच बसेल. त्या माणसांनी मला वाट पाहात तिष्ठत ठेवलं आहे इथे.”

“मॉसेनिओर, मी जातो आणि आपल्या परवानगीने मुकुट घेऊन येतो.” ज्युलिआँच्या तेजस्वी डोळ्यांचा परिणाम झाला. अतिशय शालीनतेने बिशपने त्याला उत्तर दिले, “जा साहेब, मला तो ताबडतोब

मिळालाच पाहिजे. चॅप्टरच्या सभ्यगृहस्थांना वाट पाहावी लागून खोळंबा झाला याबद्दल मला वाईट वाटते." अर्धी वाट चालून गेल्यावर ज्युलिआँने तेथून मागे वळून बिशपकडे पाहिले तेव्हा तो पूर्वीप्रमाणेच आशीर्वाद देत असल्याचे त्याला दिसून आले. त्याने स्वतःला विचारले, 'हा काय प्रकार असेल बरे? जो समारंभ आता व्हावयाचा आहे त्याच्यासाठी आवश्यक असलेली ही धार्मिक पूर्वतयारी असली पाहिजे यात शंका नाही." नोकरलोक वाट पाहात होते त्या खोलीत ज्यूलिआँ पोहोचला तेव्हा मुकुट त्यांच्या हाती दिसला. ज्युलिआँने त्यांच्याकडे एक हुकमी नजर टाकली, तेव्हा नमते घेऊन नाखुषीने त्यांनी तो मुकुट ज्युलिआँला दिला.

आपण मुकुट हातात घेऊन जात आहोत ह्या गोष्टीचा ज्युलिआँला अभिमान वाटला. खोलीमधून तो हळूहळू चालू लागला. त्याने मुकुट आदराने हाती धरलेला होता. बिशप त्याला आरशापुढे बसलेला दिसला. त्याचा उजवा हात थकला असावा; तरी अधूनमधून हात वर करून त्याचे ते आशीर्वाद देणे चालूच होते. मुकुट डोक्यावर घालण्यास ज्युलिआँने त्याला मदत केली. समाधानाच्या भावनेने डोके हलवून बिशप म्हणाला, "हां, राहील तो आता तसा नीट. तुम्ही जरा थोडे दूर होता का?" मग चलाखपणे पावले टाकीत बिशप खोलीच्या मध्यापर्यंत गेला आणि सावकाशपणे आरशाकडे परत येऊन त्याने त्रासिकपणे आशीर्वाद देण्याचे ते आपले कार्य गंभीरपणे पुन्हा सुरू केले.

ज्युलिआँ आश्चर्याने अगदी थक्क झाला होता. ह्या सगळ्याचा अर्थ काय आहे याबद्दल तर्क करण्याचा मोह त्याला झाला, पण त्याबद्दल तसे विचारण्याचे धारिष्ट मात्र त्याला झाले नाही. बिशप थांबला व त्याने ज्युलिआँकडे पाहिले तेव्हा त्याच्या नजरेतील आधीचे गांभीर्य एकदम लुप्त झाले होते.

"माझ्या मुकुटाबद्दल काय म्हणायचं आहे साहेब, तुम्हांला? ठीक दिसतो का तो?"

"अगदी छान, मॉन्सेयर."

"मुकुट फार मागे तर नाही ना बसवला गेला? तसं झालं तर ते खुळचटासारखे दिसेल. पण एखाद्या लष्करी अधिकाऱ्याच्या उंच टोपीप्रमाणे तो पुढे अगदी डोळ्यांवर ओढून घेतलेलाही चालायचं नाही."

"निःसंशयपणे अत्यंत गंभीर दिसणाऱ्या अशा आदरणीय पाद्री लोकांना पाहण्याची सवय राजेसाहेबांना आहे. तेव्हा मी फार छचोर दिसणे आणि विशेषतः माझं वय लक्षात घेता तसे दिसणे मला रुचणार नाही."

—आणि बिशप पुन्हा एकवार आशीर्वादांची खैरात करीत खोलीत इकडे तिकडे फिरू लागला.

अखेर त्या कृतीचा अर्थ समजण्याचे धारिष्ट करीत ज्युलिआँ म्हणाला, "आशीर्वाद देण्याचा सराव तो करीत आहे हे अगदी स्पष्ट आहे." काही क्षणांनंतर बिशप म्हणाला, "मी तयार आहे साहेब, तुम्ही जाऊन सांगा तसं डीनना व चॅप्टरच्या इतर सभ्यगृहस्थांना."

लवकरच म. शॅलाँ व त्यांच्यामागून दोन सर्वांत वृद्ध पाद्री तेथे आले. ज्युलिआँने तोवर न पाहिलेल्या, एक खूप सुंदर कोरीव काम असलेल्या प्रचंड दरवाजातून त्यांनी प्रवेश केला. पण या वेळी ज्युलिआँ अगदी मागे, त्याच्या नेमलेल्या जागी उभा राहिला. त्यामुळे दरवाजाकडे गर्दी करून जात असलेल्या त्या पाद्र्यांच्या खांद्यांवरूनच तो बिशपला पाहू शकत होता.

बिशप खोलीमधून सावकाश चालू लागला. तो उंबरठ्याजवळ आला तेव्हा ते पाद्री, धार्मिक मिरवणुकीत ज्या पद्धतीने उभे राहतात तसे उभे राहिले. क्षणमात्र जरा घोटाळा झाला. त्यानंतर सर्वजण बारीक लयबद्ध सुरात साम (बायबलातील स्तोत्र) म्हणत निघाले. म. शॅलाँ व दुसरा एक वयस्कर पाद्री यांच्यामध्ये असलेला मिरवणुकीचा बिशप शेवटी होता. ज्युलिआँने स्वतःसाठी बिशपच्या अगदी जवळची जागा मिळविली; कारण तो अबे शॅलाँ यांच्याशी कामानिमित्त संलग्न होता. ब्रे-ले-हौतच्या चर्चच्या लांबलचक अशा मधल्या जोडमार्गातून मंडळी पुढे गेली. बाहेर ऊन्ह स्वच्छ पडले होते. पण तेथे मात्र अंधार व दमटपणा होता. शेवटी मंडळी आतल्या दालनाच्या दरवाजात पोहोचली. इतक्या छानदार समारंभाबद्दलच्या कौतुकाने ज्युलिआँ अवाक झाला होता. एकीकडे त्या बिशपच्या तरुण वयाने निर्माण झालेली महत्त्वाकांक्षा आणि दुसरीकडे त्या वरिष्ठ धर्माधिकाऱ्याच्या वागणुकीच्या अत्युत्तम पद्धती व त्याचा समंजसपणा या दोहोंमध्ये ज्युलिआँचे अंतःकरण द्विधा झाले होते. बिशपची शिष्टाचारायुक्त वागणूक एम्. द रेनॉल यांच्या शिष्टाचारांपेक्षा वेगळ्या प्रकारची होती. महापौर अगदी प्रसन्न व खुषीत असत त्या दिवशीसुद्धा त्यांना बिशपच्या शिष्टाचारांची सर येत नसे. ज्युलिआँला वाटले, "समाजात मनुष्य जितका श्रेष्ठ पातळीवर पोहोचतो तितक्या अधिक आकर्षक पद्धती याच्या शिष्टाचाराच्या वागणुकीत दिसून येतात."

त्या मंडळींनी चर्चमध्ये बाजूच्या एका दाराने प्रवेश केला. एकदम घाबरवून सोडणारा एक मोठा आवाज त्याबरोबर झाला. त्याचा प्रतिध्वनी चर्चच्या पुराण्या घुमटात घुमला. भिंती कोसळत आहेत असेच ज्युलिआँला वाटले. पण आठ घोड्यांनी दौडत आणून तेथे नुकत्याच पोहोचविलेल्या लहान तोफेच्या गोळीबाराची लाइपजिकच्या गोलंदाजांनी चालू केलेली ती धडाडधूम होती. तिच्यासमोर जणू प्रशियन्स उभे आहेत असे समजून ती मिनिटाला पाच बार काढीत होती.

पण हादरून सोडणाऱ्या त्या आवाजाचा ज्युलिआँवर या वेळी काहीसुद्धा परिणाम झाला नाही. नेपोलिअन व त्याच्या लढाईतील शौर्याची कीर्ती यांच्याविषयीच्याही त्याच्या नेहमीच्या स्वप्नात तो गुंगून गेला नाही. त्याच्या डोक्यात विचार चालले होते, "इतका तरुण असूनही हा गृहस्थ आग्देच बिशप झाला आहे हं! पण हे आग्दे आहे तरी कोठे? आणि त्या स्थानाचे मोल आहे तरी किती? कदाचित दोन किंवा तीन लाख फ्रँक्स?"

बिशपमहाशयांचे सेवक एक भव्य व्यासपीठ घेऊन हजर झाले. त्यांच्या आधारस्तंभांपैकी एक मन्स्यूर शॅलाँ यांनी धरला. पण प्रत्यक्षात त्याचा सारा भार सांभाळला होता ज्युलिआँने. त्या व्यासपीठाच्या खालच्या बाजूस बिशपने आपली जागा घेतली. आपण खरोखरीचे वयस्क आहोत असे भासविण्यात बिशप पूर्णपणे यशस्वी झाला होता. आमच्या नायकाला त्याच्याबद्दल अमर्याद कौतुक वाटले. "माणूस हुषार असला म्हणजे तो काय करू शकणार नाही?" ज्युलिआँ स्वतःशी पुटपुटला.

राजेसाहेबांनी प्रवेश केला. त्यांना अगदी जवळून पाहण्याचे भाग्य ज्युलिआँला लाभले. राजेसाहेबांची प्रशंसा आदरयुक्त शब्दांत करणारे भाषण बिशपने केले. राजेराहेबांच्या मोठेपणाने आपण दिपून जाऊन जरा गोंधळल्यासारखे झालो आहोत अशी किंचित बतावणी करण्यास बिशप विसरले नाहीत. राजेसाहेबांच्या मोठेपणाचा गौरवच होता या बतावणीत. ब्रे-ले-हौत येथे त्या प्रसंगी जे समारंभ झाले त्यांची तपशीलवार माहिती आम्ही पुन्हा कथन करीत नाही. सुमारे पंधरवडाभर त्यांच्या वर्णनांच्या मजकुराने संबंधित खात्याच्या सर्व वृत्तपत्रांचे रकाने भरून गेले होते. राजेसाहेब चार्लस् दी बोल्डचे वंशज असल्याचे ज्युलिआँला बिशपच्या भाषणातून समजले.

अनुक्रमणिका

त्या समारंभानिमित्त एकूण जो खर्च आला त्याचे हिशेब तपासण्याची कामगिरी नंतर ज्युलिआँवर सोपविण्यात आली. स्वतःच्या पुतण्यासाठी ज्याने बिशपची जागा मिळविली होती त्या एम. द मोलने ह्या समारंभाचा सर्व खर्च करण्याचा मान त्या पुतण्याला देऊन त्याचा सन्मान केला होता. केवळ ब्रे-ले-हौत येथल्याच समारंभाला तीन हजार आठशे फ्रँक्स खर्च आला होता.

बिशपच्या भाषणानंतर राजेसाहेबांनी उत्तरादाखल भाषण केले. मग ते व्यासपीठाच्या खालच्या बाजूस स्थानापन्न झाले. वेदीच्या अगदी जवळ, एका गिर्दीवर अतिशय भक्तिभावाने आपले गुडघे टेकून ते खाली वाकले. चर्चच्या गायक मंडळींच्यासाठी असलेल्या जागेभोवती, दोन पायऱ्या उंचीवर कोनाडे होते. रोमच्या सिस्टिन चॅपेलमध्ये कार्डिनलच्या पायाशी झग्याचा मागचा घोळ धरणारा बसतो त्याप्रमाणे ज्युलिआँ त्यांपैकी दुसऱ्या पायरीवर म. शॅलाँ यांच्या पायाशी बसला. धार्मिक समारंभाच्या वेळी Te Deum या लॅटिन मंत्राचा घोष झाला. सुगंधी धूपाचे ढग फिरू लागले व तोफा-बंदुकांच्या फैरी चालू झाल्या. शेतकरी लोक धार्मिक निष्ठा व आनंद यांनी नुसते वेडे होऊन गेले. असा एखादा दिवस शेकडो जॅकोबिन पत्रकांच्या कार्यावर साफ बोळा फिरवून जातो.

राजेसाहेब अतिशय निष्ठेने प्रार्थना करीत होते. ज्युलिआँ त्यांच्यापासून सहा पावलांपेक्षाही कमी अंतरावर होता. त्याला तेथे प्रथमच एक ठेंगू मणूस दिसला. तो बुद्धिमान वाटत होता. त्याच्या कोटावर कोणत्याही प्रकारची कशिदा-वेलबुट्टी अशी नव्हतीच. पण त्याच्या त्या अत्यंत साध्या कोटावर आकाशी रंगाची फीत मात्र लावलेली होती. ज्यांच्या कोटावर सोनेरी फिती होत्या अशा अनेकांपेक्षा तो राजेसाहेबांच्या जास्त जवळ होता. ज्युलिआँच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे त्या सद्गृहस्थांच्या कोटावर सोनेरी फिती इतक्या विपुल प्रमाणात होत्या की त्यामुळे त्यांच्या कोटाचे कापडच दिसू शकत नव्हते! ती ठेंगणी व्यक्ती एम्. द ला मोल असल्याचे ज्युलिआँला लगेचच समजले. पण त्या व्यक्तीची मुद्रा ताठर, उर्मट आहे असा त्याचा ग्रह झाला.

ज्युलिआँ विचार करू लागला, “माझ्या प्रिय बिशपप्रमाणे हा मार्क्विस शालीन दिसत नाही; हो! धार्मिक पेशाचा जीवनक्रम माणसाला नम्र व शहाणा करतो... पण राजेसाहेब अवशेषांचे आदरपूर्वक दर्शन घेण्यास आले आहेत आणि मला तर इथे अवशेष दिसत नाहीत! सेंट क्लेमेंट कुठे असेल?”

पवित्र अवशेष त्या इमारतीच्या वरच्या भागात, चॅपेल आर्डेन्टमध्ये आहेत असे त्याला, त्याच्या पलीकडे बसलेल्या एका छोट्या कारकुनाने सांगितले.

“चॅपेल आर्डेन्ट हे काय आहे?” ज्युलिआँने स्वतःशीच प्रश्न केला. पण त्या शब्दाचा अर्थ इतर कोणाला त्याला विचारावासा वाटला नाही. तेथे चालू असलेला कार्यक्रम तो अधिक लक्षपूर्वक पाहू लागला.

सार्वभौम राजाच्या भेटीच्या प्रसंगी बिशपच्या बरोबर इतर पाद्री-धर्मोपदेशकांनी जायचे नसते असा रिवाज होता. पण आग्देचे बिशप चॅपेल आर्डेन्टकडे जावयास निघाले तेव्हा त्यांनी ॲबे शॅलाँना बोलाविले. त्याबरोबर धारिष्ट करून ज्युलिआँही त्यांच्या मागोमाग निघाला.

एका लांबलचक जिन्याने वर गेल्यावर मंडळी एका छोट्या दरवाजाजवळ आली. त्या दरवाजाच्या चौकटीला सोन्याचा भरपूर मुलामा चढविलेला होता, व ते काम नुकतेच पुरे झाल्याचे दिसून येत होते.

अनुक्रमणिका

व्हेरीएरच्या अतिशय प्रतिष्ठित कुटुंबांतील चोवीस मुली दरवाजाच्या बाहेरच्या बाजूस गुडघे टेकून बसल्या होत्या. दरवाजा उघडण्यापूर्वी, त्या सगळ्या सुंदर मुलींच्या मध्यभागी बिशप आपल्या गुडघ्यांवर टेकून बसले; ते मोठ्याने प्रार्थना म्हणत होते. त्यांची सुंदर फीत, त्यांचा मोहकपणा आणि त्यांचा गोड, यौवनोत्फुल्ल चेहेरा यांची तारीफ किती करावी आणि किती नाही असे त्या मुलींना झाले. तिथल्या त्या क्षणीच्या दृश्याने आमच्या बायकांची उरलीसुरली विचारशक्ती त्याला सोडून गेली. त्या क्षणी तो इन्क्विझिशनसाठी मनापासून झगडला असता. तितक्यात दरवाजा एकदम उघडला गेला. तेव्हा आतले छोटे चॅपेल प्रकाशाने जणू पेटलेले दिसले. वेदीवर हजारापेक्षा जास्त मेणबत्त्या आठ ओळींमध्ये लावलेल्या दिसत होत्या. प्रत्येक दोन ओळींमध्ये पुष्पगुच्छ ठेवलेले होते, व सँक्चुअरीच्या प्रवेशद्वाराकडून परम पवित्र धूपाच्या गोड सुगंधाचे लोट येत होते. सोन्याचा मुलामा अलीकडेच दिलेले ते चॅपेल अगदी लहान असले तरी खूप उंच होते. ज्युलिआँच्या लक्षात आले की वेदीवरील मेणबत्त्या पंधरा फुटांपेक्षा जास्त लांबीच्या होत्या. त्या मुली आपल्या कौतुकाचा उद्‌गार आवरू शकल्या नाहीत. दोन पाद्री, त्या चोवीस मुली व ज्युलिआँ यांच्याशिवाय त्या चॅपेलच्या पुढील भागात अन्य कोणालाही प्रवेश देण्यात आला नव्हता.

लगेच राजेसाहेबांचे आगमन झाले. एम्. द ला मोल व राजेसाहेबांचा मुख्य खासगी कारभारी एवढेच फक्त त्यांच्या पाठीमागे होते. गार्ड्ससुद्धा बाहेरच थांबले होते; आणि गुडघे टेकून तेथूनच शस्त्रसज्ज राहिले होते.

राजेसाहेब गुढघे टेकून बसले असे म्हणण्यापेक्षा त्यांनी स्वतःला, त्यांच्यासाठी ठेवलेल्या खुर्चीसारख्या बिनहाताच्या आसनावर झोकून दिले असेच म्हणणे योग्य होईल. त्यानंतर मगच ज्युलिआँला सेंट क्लेमेंटचा मोहक पुतळा, एका मुलीच्या उघड्या बाहूखालून पाहता आला; कारण सोनेरी मुलाम्याच्या दरवाजाकडे गर्दीत तो रेटला गेला होता. पुतळ्याच्या अंगावर तरुण रोमन शिपायाचा पोषाख होता व पुतळा वेदीच्या खाली छपविलेला होता. त्याच्या गळ्याला एक मोठी जखम झालेली होती. तिच्यातून रक्त वाहताना दिसत होते. कलाकाराने अगदी कमाल केली होती. डोळे मालवत आलेले असूनही कृपापूर्ण दिसत होते व अर्धे मिटलेले होते. नुकत्याच उगवलेल्या मिशांनी त्या मोहक चेहेऱ्याला शोभा आणली होती. त्याचे तोंड थोडेसे उघडेच होते; जणू काही अजूनही तो प्रार्थना करण्यात गुंतला होता. ज्युलिआँच्या शेजारी असलेल्या मुलीला तो पुतळा पाहून रडू कोसळले. तिचा एक अश्रू ज्युलिआँच्या हातावर पडला.

मध्यंतरी प्रार्थना झाली तेव्हा तेथे अतिशय गंभीर शांतता पसरली होती. तिचा भंग होत होता तो भोवतालच्या दहा लीग (तीस मैल) त्रिज्येच्या अंतरातील खेड्यांतल्या देवळांच्या घंटांच्या दुरून येणाऱ्या आवाजांमुळे. नंतर आग्‌देच्या बिशपने भाषण करण्याची परवानगी राजेसाहेबांच्याकडे मागितली. त्याने पुढील शब्दांत छोटेसेच भाषण केले. पण त्यात उच्च दर्जाचा नैतिक उपदेश भरलेला होता. भाषा साधीच पण त्यामुळेच निश्चितपणे जास्त परिणामकारी होती. बिशप म्हणाला, “तरुण ख्रिश्चन महिलांनो, ह्या सर्वशक्तिमान व भयंकर अशा परमेश्वराच्या सेवकाच्या समोर, पृथ्वीवरचा एक महान राजा गुडघे टेकलेला तुम्ही पाहिला आहे ही गोष्ट कधीही विसरू नका. परमेश्वराचे हे सेवक पृथ्वीवर दुबळे ठरले, त्यांचा छळ झाला, त्यांना हौतात्म्य पतकरावं लागलं हे सत्य, सेंट क्लेमेंटच्या अजून वाहात असलेल्या जखमेवरून तुम्हांला समोर दिसत आहे. पण स्वर्गात ते विजयी होतात. तरुण ख्रिश्चनांनो, मला वाटतं आजचा हा दिवस आयुष्यभर तुमच्या आठवणीत राहील. तुम्ही अधर्माचा तिरस्कार करा. हा परमेश्वर महान भयंकर पण चांगला

आहे. त्याच्याशी तुम्ही नित्य एकनिष्ठ राहा.” एवढे बोलून बिशप अधिकारीवृत्तीने उभा राहिला आणि आपला हात एक प्रकारच्या दैवी स्फूर्तीने पुढे करीत त्याने सर्वांना सवाल केला, “तुम्ही मला वचन देता?”

“आम्ही वचन देतो.” मुली म्हणाल्या व त्यांना रडू कोसळले.

“ह्या आपल्या भयंकर परमेश्वराच्या नावाने तुमच्या वचनाचा मी स्वीकार करतो.” मेघगर्जनेसारख्या आवाजात बिशप शेवटी म्हणाला आणि त्या समारंभाची सांगता झाली. रोजेसाहेबांचे स्वतःचे डोळे पाणावले. बर्गंडीचा ड्यूक, फिलिप दी बोल्ड याच्याकडे रोमहून पाठविलेल्या सेंट क्लेमेंटच्या अस्थी कोठे होत्या ह्याबद्दलची चौकशी ज्युलिआँने बऱ्याच वेळाने, भावना शांत झाल्यावर केली. तेव्हा मेणाच्या आकर्षक आकृतीतून त्यांना दृश्य स्वरूप देण्यात आले असल्याचे त्याला सांगण्यात आले.

राजेसाहेबांच्याबरोबर चॅपेलमध्ये आलेल्या त्या मुलींना पुढील लाल फीत वापरण्याची परवानगी देण्याचा अनुग्रह त्यांनी केला. फितीवर “अधर्माचा द्वेष, निरंतर भक्ती” हे शब्द कशिद्याने काढले होते.

एम्. द ला मोल यांनी दारूच्या दहा हजार बाटल्या शेतकऱ्यांमध्ये वाटण्याचा हुकूम दिला. त्या दिवशी सायंकाळी लिबरलांना आपल्या घरांवर व्हेरिएर येथे रॉयलिस्टांच्या (राजाचे अनुयायी) घरांपेक्षा शतपटीने जास्त रोषणाई करण्यास निमित्त मिळाले. गावाचा निरोप घेण्यापूर्वी राजेसाहेबांनी एम्. द मुआरो यांची भेट घेतली.

★ ★ ★

अनुक्रमणिका

## प्रकरण एकोणिसावे

# विचार हेच दुःखकारण

एम्. द. ला मोल यांना राहण्यास देण्यात आलेल्या खोलीत मूळचे साधे सामानसुमान परत जाग्यावर लावीत असता, एकावर एक मुडपून, दोन घड्या केलेला, जाड कागदाचा एक कपटा ज्युलिआँला सापडला. कागदाच्या पहिल्या घडीच्या पानाच्या तळाशी लिहिलेले, पुढील शब्द त्याने वाचले:—

"हिज एक्सलन्सी, म. ल मार्क्किस द ला मोल,

पीअर ऑफ फ्रान्स, नाइट ऑफ द रॉयल ऑर्डर्स इ. इ. यांसी—"

एका आचाऱ्याने त्याच्या गचाळ अक्षरांत लिहिलेला तो एक अर्ज होता.—

"मॉसिओर ल मार्क्किस,

आयुष्यभर मी धार्मिक तत्त्वांचे पालन करीत आलो आहे. ज्याची आठवण अतिघृणास्पद आहे अशा '९३ साली लिऑन्सवर बॉम्ब्स टाकण्यात येऊन त्याला वेढा घातला गेला तेव्हा मी तिथं होतो. मी चर्चचा एकनिष्ठ व नेहमी 'पवित्र संपर्क' (Holy Communion) ग्रहण करणारा सभासद आहे. पॅरिश चर्चमध्ये मी दर रविवारी प्रार्थनेस (Mass) जातो. माझ्या ईस्टरच्या कर्तव्यकर्मात मी कधीही, वाईट आठवणीच्या त्या '९३ सालीसुद्धा खंड पडू दिला नाही. क्रांतीच्या पूर्वी मी नोकर ठेवीत असे. माझा स्वयंपाकी पवित्र शुक्रवारचे व्रत पाळतो. व्हेरिएरमध्ये मला सर्वसाधारणपणे चांगला मान दिला जातो. मी असेही म्हणू शकेन की तो मान मला माझ्या गुणांमुळे प्राप्त झालेला आहे. धार्मिक मिरवणुकांत पाद्री व महापौर यांच्या बाजूने व्यासपीठाखाली चालण्याचा आणि काही गंभीर महत्त्वाच्या प्रसंगी, स्वतःच्या पैशाने घेतलेली मोठी मेणबत्ती घेऊन जाण्याचा मोठा अधिकार मला आहे. ह्या सर्व गोष्टींबद्दल मला देण्यात आलेली प्रशस्तिपत्रे पॅरिसला वित्त मंत्रालयाकडे सुपूर्द आहेत. मॉसिओर ल मार्क्किसपाशी व्हेरिएरच्या सोडत कचेरीच्या अधिकाऱ्याच्या जागेविषयी मी विनंती करीत आहे. कोणत्या ना कोणत्या मार्गाने ती जागा लवकरच रिकामी झाल्याशिवाय राहात नाही हे नक्की. कारण त्या जागेवर काम करणारी व्यक्ती सध्या खूप आजारी आहे आणि त्याशिवाय निवडणुकांच्या वेळी त्या व्यक्तीचे चुकीच्या पक्षाला मतदान झालेले आहे. इ. इ. ...

द चोलिन"

ह्या अर्जाच्या समासात द मुआरो यांनी शेरा लिहून त्या खाली आपली सही केली होती. त्यांनी लिहिले होते:

"ज्याने ह्या अर्जात विनंती केली आहे त्या सन्माननीय व्यक्तीचा उल्लेख मी काल केला होता." वगैरे वगैरे.

ते पाहून ज्युलिआँ स्वतःशी म्हणाला, "तर मग तो दुबळा, बावळट चोलिनही, मी कोणत्या मार्गाचा अवलंब करायला पाहिजे ते मला सांगत आहे!"

अनुक्रमणिका

राजेसाहेबांच्या व्हेरिएर भेटीनंतर एक आठवड्याने जी एक महत्त्वाची गोष्ट चर्चाविषय म्हणून प्रामुख्याने पुढे आली ती म्हणजे ज्युलिआँ सोरेल ह्या एका सुताराच्या मुलाला गार्ड ऑफ ऑनरमध्ये एक स्वार म्हणून घुसडण्यातील निखालस अशिष्टपणा. तिचा उगम, असंख्य असत्ये, मूर्खपणाची भाष्ये आणि असमंसज चर्चा इ. मध्ये झाला होता. खुद्द स्वतः राजेसाहेब, आग्देचा बिशप, मार्क्किस द ला मोल दारूच्या त्या दहा हजार बाटल्या आणि घोड्यावरून पडलेले मुआरो (त्यानंतर क्रॉसच्या आशेने त्यांनी स्वतःच्या दरवाजाबाहेर महिनाभर पाऊल टाकले नव्हते) या सर्वांवर आळीपाळीने टीका झाल्यानंतर ज्युलिआँवरच्या टीकेचे पिल्लू मागे उरले होते. कापडावर नक्षीदार छपाई करणारे जे पैसेवाले रोज सकाळी, दुपारी व रात्री घसाफोड करून समतेच्या उद्घोष करीत होते त्यांचे ह्या विषयावरील वक्तव्य तुम्ही ऐकावयास पाहिजे होते. ती अहंमन्य स्त्री, मादाम रेनॉल ह्या तिरस्करणीय प्रकाराची सूत्रधार होती; आणि तिने असे वागण्याचे कारण काय तर त्या तरुण पाद्री सोरेलचे चमकणारे डोळे व गुलाबी गाल! अनुग्रह करण्यास कारण म्हणून तेवढे पुरे होते; नव्हे वाजवीपेक्षा अधिकच होते.

वेर्जीला परत आल्यावर थोड्याच दिवसांत रेनॉल यांचा सर्वांत धाकटा मुलगा स्टॅनिस्लास झेविए तापाने आजारी पडला. त्याबरोबर मा. रेनॉल अतिशय भयप्रद पश्चात्तापाने ग्रासल्या गेल्या. प्रेमात पडल्याबद्दल प्रथमच त्यांनी स्वतःला सातत्याने व सुसंगतपणे दोष दिला. केवढे महाभयंकर पापाचरण करण्यास आपण स्वतःला प्रवृत्त होऊ दिले याची जाणीव, जणू काही एखादा चमत्कार होऊन, त्यांना झालेली दिसली. स्वभावतः त्या खूप धार्मिक होत्या; तरी परमेश्वराच्या नजरेत आपला गुन्हा किती मोठा आहे याचा विचार त्यांनी त्या क्षणापर्यंत कधी केलाच नव्हता.

खूप पूर्वी त्यांनी सेक्रेड हार्टच्या कॉन्व्हेन्टमध्ये ईश्वरावर अत्यंत उत्कटतेने प्रेम केले होते. विद्यमान बिकट परिस्थितीत त्यांना परमेश्वराचे भय तितक्याच मोठ्या प्रमाणात वाटू लागले. ज्या आंतरिक झगड्यांनी त्यांच्या हृदयाची शकले केली होती ते जास्तच भयंकर भासत होते; कारण त्यांच्या भयात किंचितही सयुक्तिकता नव्हती. ज्युलिआँला असे आढळून आले की मा. रेनॉल यांच्याशी काही युक्तिवाद करण्याचा कोणताही प्रयत्न केला तर शांत होण्याऐवजी त्या चिडत होत्या; त्यांना त्या युक्तिवादात नरकाची भाषा दिसत होती. तथापि ज्युलिआँला स्वतःलाच छोट्या स्टॅनिस्लासचा खूप लळा लागलेला होता. त्यामुळे त्याच्या आजाराबद्दलच तो मादामशी बोलल्यास ते स्वागतार्ह ठरेल असे त्याला वाटले. लवकरच त्या दुखण्याने गंभीर स्वरूप धारण केले. मा. रेनॉलना जो एकसारखा पश्चात्ताप होत होता त्याचा परिणाम असा झाला की, नंतर त्यांना झोप येईना. त्या कठोर स्तब्धतेतून मादाम बाहेर पडूच शकेनात. त्यांनी आपले तोंड उघडलेच असते तर त्या मुखाने त्यांचा गुन्हा त्यांनी परमेश्वराच्या व माणसांच्या जवळ कबूल केला असावा.

ते दोघेच एकत्र एकटे असताना ज्युलिआँ लगेच त्यांना म्हणाला, “तुम्ही कोणाजवळही काहीसुद्धा बोलू नका अशी मी तुमच्याकडे भीक मागतो. मला एकट्यालाच तुमचे काय असेल ते दुःख सांगत चला. माझ्यावर तुमचं प्रेम अजूनही असेल तर काहीच बोलू नका. तुमच्या बोलण्याने स्टॅनिस्लासचा ताप उतरेल असे तर नाही ना?”

पण मा. रेनॉल यांचे सांत्वन करण्याच्या त्याच्या ह्या प्रयत्नांचा काहीच परिणाम झाला नाही. पाप्यावर कटाक्ष असणाऱ्या परमेश्वराचा राग शांत करण्यासाठी एक तर ज्युलिआँचा द्वेष केला पाहिजे, नाही तर स्वतःच्या मुलाचा मृत्यू पाहण्याची तयारी असली पाहिजे असे खूळ मा. रेनॉल यांनी स्वतःच्या डोक्यात भरवून

घेतले आहे हे ज्युलिआँला ठाऊक नव्हते. स्वतःच्या प्रियकराचा द्वेष आपल्याला करता येणार नाही असे त्यांना वाटल्यामुळे त्या इतक्या दुःखी झाल्या होत्या.

एके दिवशी त्या ज्युलिआँला म्हणाल्या, "परमेश्वराची शपथ घालून सांगते माझा सहवास टाळा आणि हे घर सोडून जा. तुमची इथली उपस्थिती माझ्या मुलाचा प्राण घेत आहे." आणि नंतर त्या कुजबुजल्या, "परमेश्वर मला शिक्षा करीत आहे. तो न्यायी आहे. त्याच्या समतोलपणाबद्दल मला आदर आहे. माझा गुन्हा भयंकर आहे आणि त्याबद्दल मला पश्चात्तापही वाटत नव्हता. परमेश्वरापासून मी दूर गेल्याचे ते पहिले लक्षण होते. मला दुप्पट शिक्षा व्हायला हवी."

ज्युलिआँला त्यांचा फार कळवळा आला. मा. रेनॉल यांच्या त्या भूमिकेत त्याला ढोंगीपणा किंवा अतिशयोक्ती आढळली नाही. तो स्वतःशी विचार करू लागला, "माझ्यावर प्रेम करण्यामुळे आपण आपल्या मुलाचं मरण ओढवून आणीत आहोत असं त्यांना वाटतं आणि तरीही ही विचारी स्त्री आपल्या मुलापेक्षा माझ्यावर जास्त प्रेम करते! ह्याबद्दल त्यांना वाटत असलेला पश्चात्ताप त्यांच्या मरणांतिक मनःस्तापाचे कारण आहे याबद्दल मला शंका नाही. हे मादामच्या अंगीचे भावनेचे खरेखुरे औदार्य आहे. पण माझ्यासारख्या दरिद्री, असंस्कृत, अडाणी आणि वागणुकीने पुष्कळदा रांगडा असलेल्या मनुष्याबद्दल त्यांच्या ठिकाणी प्रेमभावना उद्भूत झाली हे कसं काय घडलं बुवा?"

एका रात्री स्टॅनिस्लासची प्रकृती एकदम जास्त विकोपास गेली. मध्यरात्र उलटून दोन वाजले होते. एम्. द रेनॉल त्याच्याजवळ गेले आणि त्यांनी त्याची तब्येत पाहिली. पोरगा तापाने चांगलाच फणफणला होता; अगदी लाल पडला होता. पित्याला त्याने ओळखले नाही; आणि त्या क्षणी मा. रेनॉल यांनी आपले अंग एकदम पतीच्या पायाशी झोकून दिले. आता त्या पतीला सर्व काही सांगणार आणि कायमचा आत्मनाश करून घेणार हे ज्युलिआँने ताडले.

पण त्यांच्या त्या चमत्कारिक भावदर्शनाने एम्. द रेनॉल रागावेल मात्र. त्यांना दुसरा काही संशय आला नाही हे सुदैवच म्हणायचे. "गुड नाईट, गुड नाईट" असे म्हणू ते खालीतून जाऊ लागले. पण त्यांच्यापुढे गुडघे टेकून आणि त्यांना अडविण्याचा प्रयत्न करून मा. रेनॉल आवेगाने म्हणाला, "जाऊ नका. मी काय सांगते तेवढं ऐका. पूर्ण सत्य जाणून घ्या. माझ्या स्टॉनिस्लासच्या मृत्यूला कारण होत आहे ती मी. त्याला जीवन दिलं मी; अन् मीच ते आता त्याच्यापासून हिसकावून घेत आहे. परमेश्वर मला शिक्षा करीत आहे. परमेश्वराच्या दृष्टीने मी खुनाचा गुन्हा केला आहे. मी मान वाकविली पाहिजे व स्वतःचा घात करण्यास तयार झालं पाहिजे. कदाचित अशा त्यागानेच परमेश्वरी कोपाचे शमन होऊ शकेल."

एम्. द रेनॉल यांची कल्पनाशक्ती जर तरल असती तर साऱ्या प्रकाराचा लख्ख प्रकाश त्यांच्या डोक्यात एकदम पडला असता. आपल्या गुडघ्यांना विळखा घालू पाहणाऱ्या पत्नीला दूर ढकलीत ते उद्गारले, "काय तरी अवास्तव बडबड ही! सगळेच कपोलकल्पित अन् विलक्षण! ज्युलिआँ, सकाळीच लवकर डॉक्टरांना घेऊन यायला सांग नोकरांना." आणि ते झोपण्यासाठी शयनगृहात परतले. अर्धवट बेशुद्धीत मा. रेनॉल गुडघ्यांवरच खाली खचल्यासरख्या बसल्या. ज्युलिआँ त्यांच्या मदतीला पुढे गेला. पण हिसडा देऊन त्यांनी त्याला दूर ढकलले.

ज्युलिआँ त्यांच्याकडे आश्चर्याने पाहात उभा राहिला. तो स्वतःशी बोलला, ‘म्हणजे एकूण हा व्यभिचार तर! अखेर ते पाजी पाद्री मानतात तेच बरोबर आहे. हे शक्य असेल का? अनेक पापे करणाऱ्या त्या पाद्र्यांना पापाचे खरे तत्त्वज्ञान जाणण्याचा अधिकार प्राप्त झाला असेल काय? किती तऱ्हेवाईक आहे हे सारे!’

एम्. द रेनॉल तेथून निघून गेल्यानंतर सुमारे वीस मिनिटे मा. रेनॉल अगदी निश्चल व जवळजवळ बेशुद्धीत, आपल्या मुलाच्या छोट्या बिछान्यावर डोके टेकून तशाच पडून राहिल्या. आपण जिच्यावर प्रेम करीत आहोत त्या व्यक्तीची ती स्थिती पाहून ज्युलिआँ स्वतःला म्हणाला, “श्रेष्ठ बुद्धिमत्ता असलेली अशी एक स्त्री इथं आहे की केवळ माझ्याशी परिचय झाल्यामुळे कमालीचे दुःखातिरेक भोगण्याची पाळी तिच्यावर आली आहे.”

तास भराभर संपत होते. त्या अवधीत ज्युलिआँचे विचारचक्रही फिरत राहिले.

“मा. रेनॉल यांच्यासाठी मी काय करू शकेन? मला निर्णय घेतलाच पाहिजे. इथलं माझं महत्त्व संपलेलं आहे. तेव्हा इथले लोक आणि त्यांची मूर्ख सोंगेढोंगे यांची पर्वा मी कशाला करू? मादामसाठी मी काय करू शकेन? त्यांच्यापासून दूर निघून जाऊ? पण मग त्या एकट्या राहतील व भयंकर दुःखापायी त्या विदीर्ण होतील. यंत्रवत् वागणारा त्यांचा तो भावनाहीन पती त्यांच्या भल्यासाठी काही एक करीत नाही; उलट जास्त दुःख मात्र देतो. आपल्या स्वाभाविक रांगडेपणाने तो त्यांना काही मनाला लागण्यासारखे बोलेल, मग त्यामुळे त्या वेड्या बनतील, खिडकीतून खाली उडी घेतील – “मी जर त्यांना सोडून गेलो, त्यांच्यावर लक्ष ठेवायचं मी बंद केलं, तर त्या सगळं काही एम्. द रेनॉलना सांगून टाकतील. मादामच्या मार्फत मोठ्या संपत्तीचा वारसा त्यांना मिळणार असला तरीही मग कुभांड रचून रेनॉल त्यांची नालस्ती करतील. आणि अरे देवा! – त्या... अबे मासलाँला प्रत्येक गोष्ट सांगतील. सहा वर्षच्या त्या मुलाच्या आजारीपणाचं निमित्त करून तो तर रेनॉल यांच्या घरातून मुळी हालतच नाही; त्यामागे त्याचा काही तरी उद्देश असावा नक्कीच. स्वतःच्या दुःखात व ईश्वराविषयीच्या भीतीने तो माणूस म्हणून काय लायकीचा आहे हे मादाम विसरून गेल्या आहेत; व केवळ एक पाद्री म्हणून त्याच्याकडे पाहात आहेत.”

मा. रेनॉलनी डोळे उघडले आणि त्याबरोबर त्या एकदम म्हणाल्या, “सोडून जा मला.” त्यावर ज्युलिआँने उत्तर दिले, “तुमच्या उपयोगी जास्तीत जास्त कसं पडता येईल हे मला कळेल तर त्यासाठी मी माझं आयुष्य हजारदा उधळून देईन. माझ्या प्रिय स्वर्गीय जीवा, एवढे प्रेम मी तुमच्यावर यापूर्वी कधीच केलं नसेल; किंबहुना याच क्षणापासून तुमच्या योग्यतेप्रमाणे मी अत्यादराने तुमची पूजा बांधीत जाईन. तुमच्यापासून दूर गेल्यावर माझी अवस्था काय होईल बरे? आणि तीही माझ्या अपराधामुळे तुम्ही दुःखी झालात ही जाणीव मनात असताना. पण माझ्या व्यथांबद्दल मी बोलता कामा नये. माझ्या प्रणयेश्वरी, मी निघून जाईन, होय; पण मी तुमच्यापासून दूर गेलो; आणि तुम्ही व तुमचे यजमान यांच्यामध्ये स्वतः सतत राहून तुमच्यावर लक्ष ठेवणं मी बंद केलं तर तुम्ही त्यांना प्रत्येक गोष्ट सांगून टाकाल आणि तुमचा घात करून घ्याल. तुमची किती बदनामी करून तुम्हाला ते घराबाहेर काढतील याचा विचार करा. सगळ्या व्हेरिएरमध्ये, साऱ्या बेझाँसामध्ये तुमच्या कुटाळकीचे नगारे वाजतील. सारा दोष तुमच्या माथी मारला जाईल आणि तुम्हांला तुमच्या उभ्या आयुष्यात पुन्हा डोकं वर काढायला जागा राहणार नाही.”

एकदम उठून उभ्या राहात मा. रेनॉल ओरडल्या,

अनुक्रमणिका

“तेच, तेच हवं आहे मला. तसं झालं म्हणजे माझ्या यातना वाढतील—”

“पण ह्या भयानक लोकापवादामुळे महापौरांच्या इभ्रतीलाही धक्का पोहोचेल.”

“पण मी अगदी नाक घासते; स्वतःला मी मातीमोल करून घेते. या मार्गाने मी कदाचित माझ्या मुलाला वाचवू शकेन. ही मानखंडना– सर्वांच्या अगदी समक्ष एक प्रकारचं सार्वजनिक प्रायश्चित्तच नाही का हे? माझ्या अल्प समजुतीप्रमाणे, परमेश्वराच्या पायाशी, मी करू शकेन असा हा सर्वांत मोठा त्याग नाही काय? माझी ही शरणागती स्वीकारून परमेश्वर माझ्यावर अनुग्रह म्हणून माझ्या मुलाला वाचवीलही. ह्यापेक्षा जास्त खडतर असा त्याग मला दाखवा, मी तो अगदी तत्परतने करीन.”

“मग मला स्वतःलाही शिक्षा करून घेऊ दे. कारण मीही गुन्हेगार आहे. मी ला ट्रॅप येथे निघून जाऊ का? तिथल्या जीवनक्रमातील तापसी कडकपणा, तुमच्या परमेश्वराचे समाधान करील. हे परमेश्वरा, स्टॅनिस्लासचा आजार मी माझ्यावरच का घेऊ शकत नाही?”

“ओहो! तुमचं त्याच्यावर खूप प्रेम आहे तर!” असे म्हणत मा. रेनॉल उठल्या आणि त्यांनी स्वतःला ज्युलिआँच्या बाहूंत झोकून दिले. पण लगेच त्यांनी अतिभयाने स्वतःपासून त्याला दूर ढकलून दिले व त्या म्हणाल्या,

“होय होय, माझा विश्वास आहे तुमच्यावर.” आणि मग गुडघे टेकून त्या पुढे म्हणाल्या, “अरे माझ्या एकमेव मित्रा, तू स्टॅनिस्लासचा पिता का नाही झालास? म्हणजे तुझ्या मुलापेक्षा तुझ्यावर जास्त प्रेम करणं हे भयंकर पाप ठरलं नसतं.”

“तुमच्यावर इथून पुढे भाऊ म्हणूनच प्रेम करण्याची व इथे राहण्याची परवानगी तुम्ही मला द्याल का? पापक्षालनाचा तेवढाच एक योग्यसा मार्ग आहे. महान परमेश्वरी क्रोध त्यामुळे कदाचित शांत होईल.”

उठून मा. रेनॉलनी ज्युलिआँचे मस्तक दोन्ही हातांनी धरले आणि ते आपल्या नजरेसमोर, हाताच्या अंतरावर धरून त्या म्हणाल्या, “आणि मी? तुमच्यावर भाऊ म्हणून प्रेम करू? तुमच्यावर माझ्याच्यानं भावासारखं प्रेम होणार आहे का?”

ज्युलिआँला एकदम रडू कोसळले. मा. रेनॉल यांच्या पायाशी पडत तो म्हणाला, “मी तुमची आज्ञा मानीन, तुम्ही जे सांगाल ते, तुमचा हुकूम म्हणून मी करीत जाईन. आता तेवढेच माझ्यापुढे उरले आहे. माझा मेंदू बथ्थड, बधिर झाला आहे. काय करावं ते मला कळेनासं झालं आहे. मी तुम्हांला सोडून गेलो तर तुम्ही आपल्या पतीला सगळं सांगाल. त्यात तुमचा स्वतःचा आणि त्यांचाही घात एकदमच कराल. अशी अप्रतिष्ठा झाली म्हणजे डेप्युटी म्हणून ते कदापि निवडले जाणार नाहीत. मी इथे राहिलो तर माझं राहणं तुमच्या मुलाच्या मृत्युला कारणीभूत ठरेल असं तुम्हांल वाटतं; आणि तुम्ही त्या दुःखापायी स्वतःचे मरण ओढवून घ्याल. माझ्या जाण्याच्या परिणामाची प्रचीती तुम्हांला घ्यायची आहे का? तुम्हांला रुचत असेल तर एक आठवडा तुम्हांला सोडून मी निघून जातो. आपल्या पापाबद्दलची शिक्षा म्हणून तो विरह मी सोशीन. तुम्ही सांगाल त्या ठिकाणी एकान्तवासात मी कालक्रमणा करीन. उदारहणार्थ, ब्रे-ले-हौतच्या चर्चमध्येही

अनुक्रमणिका

राहायला मी तयार आहे. पण माझ्या गैरहजेरीत तुम्ही आपल्या यजमानांजवळ गौप्यस्फोट करणार नाही अशी शपथ घ्या मजजवळ. लक्षात ठेवा की, तुम्ही तसं काही बोललात तर माझं इथं परत येणं अशक्यच होईल."

मा. रेनॉलनी ज्युलिआँला तसे वचन दिले. त्याप्रमाणे तो निघून गेला. पण दोन दिवसांनी त्याला परत बोलाविण्यात आले. मादाम त्याला म्हणाल्या, "तुम्ही नसताना मला माझी शपथ पाळणे अशक्य आहे. तुमच्या डोळ्यांनी मला गप्प बसण्यास फर्माविण्यासाठी तुम्ही सतत माझ्या सन्निध नसलात तर मी माझ्या पतीजवळ त्या गोष्टी निश्चित बोलून जाईन. ह्या दुःसह जीवनाला प्रत्येक तास एखाद्या सबंध दिवसाएवढा मला भासत आहे."

अखेर परमेश्वराला त्या दुःखी मातेची दया आली. आस्ते आस्ते स्टॅनिस्लासच्या प्रकृतीला उतार पडत गेला व काळजी संपली. पण मा. रेनॉल यांचे मनःस्वास्थ्य नाहीसे झाले ते झालेच. स्वतःच्या पापाचे गांभीर्य त्यांच्या विवेकशक्तीला कळून आले होते. त्यानंतर त्यांना मनाचा समतोलपणा राखता येईना. त्यांचे मन अजूनही पश्चात्तापदग्धच होते. एवढ्या प्रामाणिक अंतःकरणाच्या महिलेला ज्या स्वरूपात असा पश्चात्ताप छळील तसा तो त्यांना छळीत होता. त्यांच्या जीवनात स्वर्ग व नरक दोन्हीही होते. ज्युलिआँ नसला की जीवन त्यांना नरक वाटे आणि त्या त्याच्या समीप असल्या की त्यांना स्वर्गात असल्यासारखे वाटे.

ज्युलिआँला त्या म्हणाल्या, "आता माझ्या मनात वस्तुस्थितीबद्दलच्या भ्रामक कल्पना मुळीच राहिलेल्या नाहीत. माझा अधःपात झाला आहे, कधीही सुधारता न येण्याइतकं माझं हे पतन आहे. तुम्ही तरुण आहात. माझ्या प्रलोभनाला तुम्ही बळी पडलात. परमेश्वर तुम्हांला क्षमा करो! करीलही. पण मला? मला क्षमा नाही, मुक्ती नाही हे मी एका अचूक लक्षणाने ओळखते. मला भय वाटतं. नरक नजरेसमोर उभा असता कोणाला भय वाटणार नाही? पण खोल अंतःकरणात मला यत्किंचितही पश्चाताप वाटत नाही. करायचं असतं तर माझं हे पाप मी पुन्हा केलं असतं. पण परमेश्वराने मला ह्या जगात निदान शिक्षा करण्यापासून परावृत्त व्हावं आणि माझ्यावरचा राग माझ्या मुलांवर काढू नये एवढं झालं तर माझ्या वाट्याला खूपच काही जास्त आल्यासारखं होईल."

आपल्या प्रेमभावनेला पूर्ण, मोकळा वाव देण्याचे धारिष्ट करीत असतानासुद्धा ज्युलिआँशी मा. रेनॉल याप्रमाणे बोलत. अन्य काही क्षणी त्या त्याला विचारीत, "पण माझ्या ज्युलिआँ, निदान तू तरी सुखी आहेस का? मी तुझ्यावर पुरेसं प्रेम करते असं वाटतं ना तुला?"

ज्युलिआँच्या शंकेखोर व हळुवार स्वाभिमानी स्वभावाला सर्वांत जास्त गरज होती ती त्यागशील प्रेमाची. एवढ्या महान आणि प्रत्येक क्षणी नव्याने केल्या जाणाऱ्या संशयातीत त्यागापुढे त्याच्या शंका टिकत नसत व स्वाभिमान सुखावून जाई. त्याची मादामविषयीची प्रेमादरयुक्त भावना प्रत्यही बळावतच गेली. तो स्वतःला सांगू लागला, "भले मादाम उच्चकुलोत्पन्न असतील व मी असेन साधा कामगाराचा मुलगा; पण माझ्यावर खरंखुरं प्रेम आहे त्यांचं. प्रियकराची भूमिका करण्यासाठी नेमलेला हुजऱ्या अशी त्यांची. माझ्याशी वागणूक नाही." ज्युलिआँच्या मनातून एकदा हे भय नाहीसे झाल्याबरोबर प्रणयी जन करतात तो सारा वेडगळपणा तो करू लागला व प्रेमप्रकरणातील साऱ्या जीवघेण्या अनिश्चिततेला बळी पडू लागला.

आपल्या प्रेमाबद्दल ज्युलिआँला शंका आहे असे मा. रेनॉलना दिसून आले तेव्हा त्या आवेगाने बोलल्या,

"जे काही थोडे दिवस अजून आपणा दोघांना एकत्र घालवावयास मिळणार आहेत तेवढ्या अवधीत तरी मला तुम्हांला सुखी करू द्या. आपल्याला घाई केली पाहिजे. कारण उद्याही मी तुमची राहू शकणार नाही. परमेश्वराने जर माझ्यावर माझ्या मुलांच्या द्वारा आघात केला तर मग केवळ तुमच्या प्रेमासाठी जगत राहाणे, माझा गुन्हा त्यांना ठार करीत आहे हे लक्षात न घेणे, मी कितीही प्रयत्न केला तरी व्यर्थ ठरेल. तो आघात सहन करण्याची शक्ती माझ्याजवळ नाही; आणि तो सहन करायचा म्हटला तर ते मला शक्य होणार नाही, मला वेड लागेल."

"अरेरे! स्टॅनिस्लासचा आजार स्वतःवर घेण्याची इच्छा जशी उदारपणे तुम्ही बाळगलीत त्याप्रमाणे तुमचे पाप मी माझ्या सदसद्विवेकबुद्धीवर घेऊ शकलो तर!"

ज्या स्निग्ध भावनेने ज्युलिअन आपल्या प्रणयिनीशी निगडित झाला होता त्या भावनेचे स्वरूप या भावविश्वातील मोठ्या आणीबाणीच्या घटनेने पार बदलून टाकले. त्या वेळेपासून मादामविषयीचे ज्युलिआँचे प्रेम हे केवळ त्यांच्या सौंदर्याची पूजा व त्यांच्या हृदयावर स्वामित्व मिळविल्याचा अभिमान एवढ्यापुरतेच राहिले नाही.

त्यानंतरच्या काळातील त्यांचा आनंद फार उच्च स्वरूपाचा होता. ज्या ज्वालेने त्यांना ग्रासले होते ती नंतर फार तीव्र झाली. त्यांनी पूर्णपणे वेडावून टाकणाऱ्या अतिरेकी आनंदाची अनुभूती घेतली. इतर लोकांच्या दृष्टिकोणातून त्यांचे सुख मोठे दिसले असते. पण जेव्हा मा. रेनॉल यांची एकमेव शंका अशी होती की, ज्युलिआँकडून त्यांना पुरेसे प्रेम लाभत नाही आणि त्या दोघांतील प्रेमाच्या पहिल्या दिवसांची मधुर प्रसन्नता, निर्मळ सुख व स्वयंस्फूर्त आनंद पुन्हा त्यांना कधीच मिळविता आला नाही तेव्हा त्यांच्या सुखाला कधी कधी गुन्ह्याचे स्वरूप प्राप्त होई.

त्यांचे सर्वांत जास्त सुखाचे आणि बाह्यतः शांततापूर्ण असे जे कोणते क्षण असत तेव्हासुद्धा मा. रेनॉल ज्युलिआँचा हात खसकन घट्ट पकडीत व एकदम मोठ्याने उद्‌गारत,

"हे महान् परमेश्वरा, माझ्या भविष्यात मला पुढे नरक दिसत आहे." मग गारवेल भिंतीला चिकटते त्याप्रमाणे ज्युलिआँला घट्ट धरून व त्याला कवटाळीत त्या म्हणत, "किती भयानक यातना ह्या! पण त्या भोगायला मी पात्रच आहे."

ज्युलिआँने त्यांचा प्रक्षुब्ध आत्मा शांत करण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ. त्यांनी त्याचा हात आपल्या हाती घेतला आणि चुंबनांनी तो भरून टाकल्यावर उदास चिंतनाच्या आवर्तात गुंतत त्या स्वतःशी बोलल्या, "नरक, मरणोत्तर नरकवास ही मला परमेश्वरी देणगी वाटेल. कारण ज्युलिआँच्या सहवासाचे काही दिवस अजूनही मला ह्या जगात मिळतील ना? पण इथं हा पृथ्वीवरचा नरक! माझ्या मुलांचा मृत्यू!...... तरी पण एवढ्या किंमतीत कदाचित माझ्या गुन्ह्याची क्षमा केली जाईल...... हे महान परमेश्वरा, ती किंमत घेऊन मला क्षमा करू नकोस. ह्या बिचाऱ्या बालकांनी तुझा कोणताच गुन्ही केलेला नाही. त्या गुन्ह्याचं पाप माझं, माझ्या एकटीचं आहे. जो माझा पती नाही अशा पुरुषावर मी प्रेम करीत आहे."

अनुक्रमणिका

मा. रेनॉल यांनी बाह्यातः शांत वृत्ती धारण केली असल्याचे ज्युलिआँला नंतर दिसून आले. त्या प्रकाराचे सारे उत्तरदायित्व त्यांनी स्वतःवर घेण्याचा प्रयत्न केला. ज्याच्यावर त्यांचे प्रेम होते त्याच्या जीवनात विष कालविण्याची त्यांची इच्छा नव्हती.

प्रेम, पश्चात्ताप, सुख अशा भावनांच्या भोवऱ्यात उभयता आळीपाळीने फिरत असता दिवस दुत गतीने निघून गेले. त्या कालावधीत ज्युलिआँने आपली चिंतनाची सवय गमाविली.

कुमारी एलिसाची एक छोटी फिर्याद व्हेरिएरच्या न्यायालयात चालू होती. त्या खटल्याच्या तारखेला हजर राहण्यासाठी ती तेथे गेली तेव्हा म. वालनो यांना भेटली. ते ज्युलिआँवर फार रुष्ट झाले असल्याचे तिला तेथे दिसून आले. शिक्षक ज्युलिआँचा ती द्वेष करीत असे. म. वालनो यांच्याजवळ ती ज्युलिआँबद्दल पुष्कळदा बोलत असे.

एक दिवस ती त्यांना म्हणाली, "साहेब, मी जर तुम्हांला सत्य सांगितलं तर तुम्ही माझाच घात कराल. महत्त्वाच्या बाबतीत सगळ्या मालकवर्गाची एकी असते. काही गोष्टी उघड केल्या तर आम्हा गरीब नोकरलोकांना ते कधीच क्षमा करणार नाहीत...."

ठराविक स्वरूपात वाक्प्रचारातील एलिसाचे ते वक्तव्य म. वालनो यांनी त्यांच्या उतावीळ जिज्ञासेमुळे तिला थोडक्यात आखडते घ्यायला लावले; तेव्हा त्यांना त्यांच्या स्वाभिमानाच्या दृष्टीने जगातील काही अत्यंत मानहानिकारक अशा गोष्टी समजल्या.

ते विचार करू लागले; त्या परिसरातील सर्वांत श्रेष्ठ अशा त्या स्त्रीच्या, त्यांनी सहा वर्षे नाना प्रकारे मनधरण्या केल्या होत्या; आणि दुर्दैवाने साऱ्या जगाने हा प्रकार पाहिला होता. आणि ह्या अतिशय अहंमन्य स्त्रीने शिक्षकाच्या पेशातील एका क्षुल्लक कामगाराला आपला प्रियकर म्हणून निवडले होते! तिने दर्शविलेल्या तिटकाऱ्यामुळे त्यांना पुष्कळदा मान खाली घालावी लागली होती. एवढेच नव्हे तर मा. रेनॉल आपल्या त्या प्रियकराची, प्रीतीने जणू पूजा बांधीत होत्या. यात अनाथाश्रमाच्या अधिपतीचा संपूर्ण पराभव होता, नाही तर काय?

उसासा टाकून ती नोकराणी पुढे म्हणाली, "आणि हा विजय मिळवायला म. ज्युलिआँला कोणतेच कष्ट पडले नाहीत. स्वतःच्या स्वभावानुसार मा. रेनॉलशी त्याची थंड वागणूक त्याने कधीच सोडलेली नाही."

सांगितलेल्या हकीगतीच्या खरेपणाबद्दल एलिसाची खात्री वेर्जीला आल्यावर लगेचच झाली होती. पण त्या दोघांतील या भानगडीची सुरुवात बरीच पूर्वी झालेली असावी अशी तिची कल्पना होती. म्हणून ती कडवटपणे पुढे म्हणाली, "त्याने माझ्या लग्नाच्या विनंतीला तेव्हा नकार का दिला; याचं कारण निश्चितपणे हेच आहे आणि मी एखाद्या मूर्खाप्रमाणे मा. रेनॉल यांचाच सल्ला घ्यायला गेले अन् ज्युलिआँला गळ घालण्याची विनंती त्यांना केली."

त्याच दिवशी संध्याकाळी एम. द. रेनॉल यांना व्हेरिएरहून आलेल्या त्यांच्या वर्तमानपत्राबरोबर एक मोठे थोरले निनावी पत्र आले. खुद्द त्यांच्या स्वतःच्या घरात काय घडत होते याची इत्थंभूत व तपशीलवार

हकीगत त्या पत्रात दिलेली होती. त्या वाचीत असता त्यांची मुद्रा निस्तेज झाल्याचे, चेहेरा फिका पडल्याचे ज्युलिआँने पाहिले. पत्र निळ्या कागदावर लिहिले होते. एम्. द रेनॉल यांनी काही वेळा ज्युलिआँकडे रागाने पाहिले, तेही त्याला कळून आले. संध्याकाळ टळून गेली तरी बराच वेळ रेनॉलना मनःस्वास्थ्य लाभले नाही. बर्गंडीच्या सर्वोच्च कुळांच्या वंशवृक्षातील काही संदिग्ध गोष्टी स्पष्ट करून सांगण्याची विनंती करून ज्युलिआँने त्यांची खुशामत करण्याचा प्रयत्न केला; पण तो व्यर्थ ठरला.

★ ★ ★

अनुक्रमणिका

## प्रकरण विसावे

# निनावी पत्रे

ज्युलिआँ व त्याची प्रणयिनी मध्यरात्रीच्या सुमारास बैठकीच्य खोलीतून बाहेर पडले तेव्हा ज्युलिआँ मा. रेनॉलना म्हणाला, “आज रात्री आपण भेटता कामा नये. तुमच्या यजमानांना संशय आलेला आहे. मी शपथेवर सांगतो की एवढ्या नाराजीने ते वाचीत होते ते लांबलचक पत्र नक्की निनावी आहे.”

नशीब की नंतर ज्युलिआँने स्वतःची खोली आतून बंद केली. कारण रात्री पुन्हा न भेटण्याची त्याने केलेली सूचना म्हणजे त्याला स्वतःला मा. रेनॉलना भेटण्याची इच्छा नव्हती एवढ्यासाठीच केवळ एक निमित्त होते अशी खुळी कल्पना मा. रेनॉल यांनी करून घेतली. यामुळे त्यांचे डोके अजिबात ताळ्यावर न राहता, नेहमीच्य ठरलेल्या वेळी त्या ज्युलिआँच्या खोलीशी पोहोचल्या. त्यांच्या येण्याचा आवाज व्हरांड्यातून ज्युलिआँला ऐकू आला. त्याबरोबर त्याने आपल्या खोलीतला दिवा मालवला. नंतर कोणी तरी खोलीचे दार उघडण्याचा प्रयत्न करीत होते. पण त्या मा. रेनॉल होत्या की त्यांचे मत्सरी पती होते?

घरातल्या स्वयंपाकीणबाईला ज्युलिआँबद्दल जरा ओढ वाटत असे. दुसऱ्या दिवशी सकाळीच तिने ज्युलिआँला एक पुस्तक आणून दिले. त्या पुस्तकाच्या वेष्टनावर इटॅलिअनमध्ये लिहिलेले काही शब्द ज्युलिआँने वाचले. “पुस्तकातील पृष्ठ १३० पाहावे” असा त्या शब्दांचा अर्थ होता.

तो अविचारपणा पाहून ज्युलिआँचा थरकाप झाला. त्याने १३० वे पान काढले. तेव्हा त्या पानाला टाचणी लावून अडकविलेले पत्र दिसले. घाईने लिहिलेले ते शब्द अश्रूंनी भिजलेले होते. शब्दांची स्पेलिंगे वाटेल तशी चुकांची लिहिलेली होती. तसे एरवी मा. रेनॉल बरोबर स्पेलिंगे लिहीत असत. ही गोष्ट लक्षात आल्यावर मादामची मनोव्यथा ओळखून ज्युलिआँचे मन द्रवले व त्या लिहिण्यातील भयानक अविचारीपणा तो आस्ते आस्ते विसरू लागला— “म्हणजे तुम्ही आज रात्री मला तुमच्या खोलीत भेटायला येऊ देणार नाही तर. कित्येकदा असे क्षण येतात की तेव्हा मला वाटतं, तुमच्या हृदयात थेट आतपर्यंत मी कधीच पाहिलं नाही. तुमची मुद्रा मला घाबरवून सोडते. मला तुमचं भय वाटतं. तुम्ही माझ्यावर कधीच प्रेम केलं नाही असं असू शकेल का? परमेश्वरालाच ठाऊक! तसे जर असेल तर मग माझे पती आपल्या प्रेमाचा छडा खुशाल लावोत व मला आयुष्यभर इथे खेड्यात तुरुंगात डांबून ठेवोत! माझ्या मुलांपासून माझी ताटातूट होईल. कदाचित तसंच व्हावं अशी ईश्वराची इच्छा असेलही! मग मी लवकरच मरेन, पण तुम्ही अमानुष वृत्तीचे माणूस ठराल.”

“माझ्यावर तुमचं प्रेम नाही का? माझं वेडेपणाचं वागणं, माझा पश्चात्ताप, यांचा कंटाळा आला आहे का तुम्हाला? कारण देवधर्म, नीती यांवर तुमचा विश्वासच नाही. तुम्ही माझा घात करू इच्छिता का? तसं असल्यास मी तुम्हाला एक सोपा मार्ग सुचविते. जा आणि सगळ्या व्हेरिएर गावाला हे पत्र दाखवा. किंवा म. वालनो यांना एकट्यालाच ते दाखवा. सांगा त्यांना की, मी तुमच्यावर प्रेम करते. पण नको. असं माझ्या प्रेमाचं विडंबन करणारं काही बोलू नका. त्यांना सांगा की मी ज्युलिआँची पुजारीण आहे; की ज्या दिवशी मी प्रथम ज्युलिआँला पाहिलं त्याच दिवसापासून माझ्या जीवनाचा प्रारंभ झाला; की मला ज्युलिआँपासून जे सौख्य लाभलं आहे त्याचं स्वप्न मला माझ्या किशोरवयातील अगदी बेताल क्षणीही कधी पडलं नव्हतं; की माझं जीवन मी ज्युलिआँला समर्पण केलं आहे; त्याच्यासाठी माझ्या आत्म्याला मी धोक्यात टाकलं आहे. पण

ज्युलिआँ, खरं म्हणजे मी यापेक्षाही जास्त त्याग तुमच्यासाठी करीत आहे हे तुम्हाला माहीत आहे. "पण त्या माणसाला, त्या स्वार्थी प्राण्याला — त्यागाची काय कल्पना आहे? सांगा, त्याला राग येण्यासाठी जाऊन सांगा की कुटाळखोरपणे बोलणाऱ्या सर्वांना मी तुच्छ लेखते. ह्या जगात मला मोठं अरिष्ट वाटणारी एकट गोष्ट आहे व ती म्हणजे ज्याने मला जीवनोत्साह दिला आहे त्याच्यात बदल होत आहे हे पाहण्याची पाळी माझ्यावर येणं; ते जीवन गमावणं, त्याग म्हणून त्याचं दान करणं आणि मग माझ्या मुलांसाठी इथून पुढे काही भय न वाटणं ही केवढी परमेश्वरी कृपा होईल माझ्यावर!

"प्रिय मित्रा, एखादं निनावी पत्र आलं असल्यास ते त्या किळसवाण्या प्राण्याकडूनच आलेलं आहे याबद्दल शंकाच बाळगू नकोस. गेली सहा वर्षे त्याने आपल्या भसाड्या आवाजात माझा पिच्छा पुरवला आहे, त्याच्या घोड्याने केवढी मोठमोठी उड्डाणे घेतली याची यादी सांगून, स्वतःचा वेडगळपणा व्यक्त करून, त्याला उपलब्ध असलेल्या असंख्य सुखसोयींचा पाढा वाचून—

"खरंच एखादं निनावी पत्र आलं आहे का? अरे दुष्टा, त्याचीच तर चर्चा मला तुमच्याशी करावयाची आहे! पण नाही; तुमचंच म्हणणं बरोबर होतं. ह्या विषयाची चर्चा मी एकटी असताना जशी शांतपणे करते तशी माझ्या बाहुपाशात तुम्हाला आवळून (ती कदाचित शेवटचीच वेळ ठरायची!) मी कधीच करू शकले नसते. आता ह्या क्षणापासून आपल्याला आपलं सुख पूर्वीप्रमाणे सोप्या रीतीने मिळविता येणार नाही. पण त्यामुळे तुम्हाला मनस्ताप होईल काय? होय, म. फूकेकडून एखादं मजेदार पुस्तक तुम्हाला ज्या दिवशी मिळणार नाही तेव्हा मनस्ताप वाटेल हे खरं. पण जाऊ दे. मी त्याग करून चुकले आहे. त्यांना निनावी पत्र आलेलं असो वा नसो; मला एक निनावी पत्र आलेलं आहे, असं मी उद्या माझ्या पतीला सांगणार आहे. आणि तुम्हाला तुमच्या उत्कर्षासाठी एखादी सोनेरी संधी ताबडतोब द्यायला व एखादं चांगलं सुसंगत निमित्त शोधून तुम्हाला तुमच्या कुटुंबात विलंब न करता परत पाठवायलाही सांगणार आहे मी त्यांना.

"अरेरे! प्रिय मित्रा, आपण एकमेकांपासून पंधरवडाभर, कदाचित महिनाभरही वेगळे केले जाणार आहोत. पण हे बघ, मी तुला न्याय देत आहे. ह्या विरहामुळे तुला माझ्याइतकंच दुःख करावं लागणार आहे. पण ह्या निनावी पत्राचा परिणाम नामशेष करण्यास हा एवढाच मार्ग आहे. माझ्या पतीला मिळालेलं काही हे पहिलंच निनावी पत्र नाही, आणि माझ्याबद्दल आलेलंही हे पहिलं निनावी पत्र नाही. हाय! तेव्हा मी त्या पत्रांचा किती उपहास करीत असे :

"ते पत्र म. वालनोकडून आलेलं आहे असं माझ्या नवऱ्याला भासवणं हा माझ्या योजनेचा एकूण उद्देश आहे. पत्राचा लेखक तोच आहे याबद्दल मला शंका नाही. तुम्ही जर घर सोडून गेलातच तर व्हेरिएरला जा आणि तिथं आपलं चांगलं बस्तान बसवा. तिथं एक पंधरवडा घालविण्याची कल्पना माझ्या नवऱ्याच्या डोक्यात भरविण्याची तजवीज मी करीन; आणि आम्हा नवराबायकोंमध्ये वितुष्ट आलेलं नाही हे मी त्या मूर्खांना सिद्ध करून दाखवीन. एकदा तुम्ही व्हेरिएरला राहू लागलात की प्रत्येकाशी मैत्री करा, लिबरलांशीही स्नेह करा, सगळ्या स्त्रिया तुमच्यामागे धावत सुटतील हे मला ठाऊक आहे.

"म. वालनोकडे जाऊन त्यांच्याशी भांडू नका; किंवा एकदा तुम्ही धमकी दिली होती त्याप्रमाणे त्यांचे कान उपटू नका. उलट त्यांच्याशी भरपूर शिष्टाचाराने वागा. मुख्य गोष्ट व्हायला हवी ती ही की, तुम्ही वालनो यांच्याकडे अथवा दुसऱ्या एखाद्या घरी जाता ते तिथल्या मुलांच्या शिक्षणासाठी जाता असं साऱ्या व्हेरिएरला माहीत झालं पाहिजे.

अनुक्रमणिका

“आणि हेच नेमकं माझ्या नवऱ्याला कधीच सहन होणार नाही. तथापि त्याने जुळवून घ्यायचं ठरवलं तरी ठीकच. निदान तुमचं वास्तव्य व्हेरिएरमध्ये राहील आणि मी कधी कधी तुम्हाला भेटू शकेन. माझ्या मुलांना तुमचा खूप लळा आहे. तीही तुम्हाला भेटत जातील. प्रभो! परमेश्वरा! माझी मुलं तुमच्यावर प्रेम करतात म्हणून मी त्यांच्यावर जास्त प्रेम करते असं मला वाटतं. याला का पश्चात्ताप म्हणायचं? ह्या सर्वांचा शेवट कसा होणार आहे? पण मी विषयापासून भरकटत चालले आहे. ठीक, ठीक. तुम्ही काय करायला हवं ते लक्षात घ्या. त्या क्षुद्र महाभागांशी सभ्यपणे, मार्दवाने वागा, तुच्छतेने कधीच वागू नका. गुडघे टेकून मी तुम्हाला विनवणी करते. आपल्या दोघांच्या नशिबाचा न्यायनिवाडा त्यांच्या हातांत आहे. लोकमताची दिशा काय आहे ती पाहूनच माझा नवरा तुमच्याशी वागेल याबद्दल क्षणभरही शंका असू देऊ नका.

“हे माझे निनावी पत्र मला पुरविणार आहात तुम्ही. चिकाटी धारण करा; तशी हाती कात्रीही धरा. खाली लिहिलेले शब्द पाहा. ते एखाद्या पुस्तकातून कापून काढा. सोबत मी एक निळा कागद पाठवीत आहे. त्याच्यावर ते शब्द गोंदानं नीट चिकटवा. हा निळा कागद म. वालनोकडून मला आलेला आहे. तुमच्या खोलीची झडती घेतली जाईल. त्या दृष्टीने तयारीत असा. पुस्तकाची खराब झालेली पाने जाळून टाका. तुम्हाला काही तयार शब्द न मिळाल्यास निरनिराळ्या शब्दांतील सुटी अक्षरे कापून ती जुळविण्याचा प्रयत्न करा. ह्या कामात तुम्हाला पडणारा त्रास थोडासा वाचवावा म्हणून मी हे निनावी पत्र छोटे बनविले आहे. हाय! जर तुम्ही आता माझ्यावर प्रेम करीत नसाल (मला तरी भीती वाटते) तर मग हे पत्र केवढं तरी लांबलचक, कंटाळवाणं वाटेल तुम्हाला!!

## निनावी पत्र

“मादाम,

तुमच्या सगळ्या लहानसहान भानगडी उघडकीस आल्या आहेत. ह्या भानगडी बंद होणं हे ज्यांच्या हिताचं आहे त्यांच्या कानावर त्या घातल्या गेल्या आहेत. तुमच्याविषयी बराच काळ वाटत असलेल्या प्रेमामुळे, मी तुमच्याकडे याचना करतो की त्या छोट्या शेतकऱ्यापासून तुम्ही पूर्णपणे अलग व्हावं. याप्रमाणे वागण्याचं शहाणपण तुम्ही दाखविल्यास, तुमच्या पतीला देण्यात आलेली पूर्वसूचना दिशाभूल करणारी होती अशी त्यांची समजूत होईल व त्यांचा हा गैरसमज पुढेपर्यंत कायम राहील. मला तुमचं गुप्त रहस्य माहीत आहे हे लक्षात ठेवा. याद राख, दुर्दैवी स्त्रिये! मी दाखवून देईन त्या सरळ मार्गाने तू इथून पुढे चाललं पाहिजेस.”

“हे पत्र बनविणारे शब्द चिकटविण्याचे तुमचे काम झाल्याबरोबर (त्यातून तुम्हाला गव्हर्नरची शैली ओळखता येते का?) तुमच्या खोलीतून बाहेर पडा. मी तुम्हाला घराच्या आसपास भेटेन.

“मी जवळच्या खेड्यात जाणार आहे. तेथून मी परतेन तेव्हा माझा चेहेरा त्रस्त झालेला असेल. हे परमेश्वरा! केवढा मोठा धोका पतकरायचं धारिष्ट करीत आहे मी! आणि ह्या सगळ्याचं कारण म्हणजे तुम्हाला असं वाटलं की तुम्ही निनावी पत्र पाहिलं. अखेर, खिन्न–दुःखी चेहेऱ्याने हे पत्र मी माझ्या नवऱ्याला देईन. कोणा तरी तिऱ्हाईत माणसाने

माझ्या हातात ते दिलं असेल. तुमचं काम म्हणजे तुम्ही त्या वेळी मुलांना घेऊन अरण्याच्या दिशेने फिरायला जा आणि रात्रीच्या जेवणाच्या वेळेपूर्वी परतू नका.

"वरच्या खडकावरून तुम्हाला कबूतरखान्याचा मनोरा दिसेल. सगळं ठिक झालं तर मी तेथे सफेत हातरुमाल ठेवीन. अपेक्षेनुसार घडलेले नसल्यास तुम्हाला तिथं काही दिसणार नाही.

"कृतघ्न चांडाळा! फिरायला निघण्यापूर्वी, तुझ्या हृदयाला असा एखादा मार्ग शोधून काढावासा वाटणार नाही का की जेणेकरून तुझं माझ्यावर प्रेम आहे हे मला तू सांगशील? माझ्यावर कोणत्याही दुर्दैवी आपत्ती ओढवोत, एका गोष्टीबद्दल अगदी खात्री बाळग. आपली कायमची ताटातूट झाल्यास, त्यानंतर एक दिवसही मी जगू शकणार नाही. अहाहा! वाईट आई हे दोन अगदी निरर्थक शब्द, प्रिय ज्युलिआँ, मी इथं लिहिले आहेत बरं का ते माझ्या अंतःकरणापासून आलेले नाहीत. मी फक्त तुमचाच विचार करू शकत आहे. तुमच्याकडून दोष दिला जाऊ नये म्हणूनच केवळ मी ते शब्द लिहिले आहेत. तुम्हांला गमावून बसण्याच्या अवस्थेप्रत आता मी आलेली आहे असं मला दिसतं. तेव्हा आता लपवाछपवी करण्याचा उपयोग काय? हो, माझं अंतःकरण रात्रीसारखं काळं आहे असं वाटू द्या तुम्हाला; पण मी माझ्या अंतःकरणात ज्याची पूजा करते त्याच्याशी खोटं बोलणं मला नको आहे. आजवरच्या माझ्या सबंध आयुष्यात मी नको तितकी दगलबाज आधीच बनलेली आहे. जाऊ दे! तुम्ही माझ्यावर इथून पुढे प्रेम करणार नसलात तरी मी तुम्हाला क्षमा करते. हे सबंध पत्र पुन्हा एकदा वाचायला मला आता वेळ नाही. तुमच्या बाहुपाशात जे सुखाचे दिवस गेले त्यांच्या मोबदल्यात मी माझा प्राण देणं ही गोष्ट माझ्या दृष्टीने अगदी क्षुल्लक आहे. कारण त्या दिवसांची किंमत मला माझ्या प्राणापेक्षा जास्त पडेल हे तुम्हाला ठाऊक आहे.

★ ★ ★

अनुक्रमणिका

## प्रकरण एकविसावे

# पतिदेवांशी संवाद

कापून काढलेले शब्द एकत्र चिकटविण्यात ज्युलिआँने जवळजवळ एक तास बालिश आनंदाने खर्च केला. त्याच्या खोलीतून तो बाहेर पडला तेव्हा त्याचे विद्यार्थी व त्यांची आई त्याला समोरच भेटली. त्याच्या जवळून मा. रेनॉलनी ते पत्र इतक्या सहजपणे व अविचलितपणे घेतले की त्यांच्या वृत्तीतील त्या शांतपणाने तो हबकून गेला.

“गोंद चांगला वाळला आहे का?” मादामनी त्याला विचारले. तेव्हा ज्युलिआँच्या मनात काही विचारतरंग निर्माण झाले. तो म्हणाला, “पश्चात्तापाने अगदी वेडी होऊन गेलेली हीच का ती स्त्री? ह्या क्षणी ती कोणत्या योजना स्वतःच्या मनात आखीत असावी?” तथापि मादामना त्याबद्दल काही विचारू नये असे त्याला स्वाभिमानामुळे वाटले. पण पूर्वी कदाचित कधीच नसेल एवढ्या प्रकर्षाने त्या क्षणी त्याला मा. रेनॉल यांनी भारले होते.

त्याच शांतपणाने मादाम पुढे म्हणाल्या, “माझ्या योजना फिसकटल्यास मला येथील प्रत्येक वस्तूला मुकावे लागेल. डोंगरात जाऊन ही पेटी कुठे तरी पुरून ठेवा. शेवटचा आधार म्हणून केव्हा तरी ती मला उपयोगी पडेल” असे म्हणून त्यांनी एक पेटी ज्युलिआँच्या हाती दिली. पेटीत सोन्याचे दागिने व काही हिरे होते.

“जा आता.” मादाम त्याला म्हणाल्या. मग त्यांनी आपल्या मुलांना जवळ, मिठीत घेतले. सगळ्यांत धाकट्याला तर दोनदा कवटाळले. ते पाहून ज्युलिआँ मंत्रमुग्ध झाला. मा. रेनॉल मग तेथून भर्रकन निघून गेल्या. त्यांनी ज्युलिआँकडे मागे वळून पुन्हा पाहिलेही नाही.

ते निनावी पत्र उघडून वाचले त्या क्षणापासून एम्. द रेनॉल यांना स्वतःचे आयुष्य फार दुःसह वाटू लागले होते. १८१६ मध्ये त्यांच्यावर एकदा जवळजवळ द्वंद्वयुद्ध खेळण्याचा प्रसंग आला होता. तेव्हापासून आजतागायत त्यांचे मन कधीच एवढे प्रक्षुब्ध झाले नव्हते. पण त्या वेळी अंगात गोळी बुसण्याच्या शक्यतेनेही ते इतके क्षुब्ध झाले नसते, असे त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने म्हटले पाहिजे. त्यांनी स्वतःला विचारले, “हे हस्ताक्षर बाईचं नाही काय? तसं असल्यास हे पत्र लिहिणारी स्त्री कोण असावी? व्हेरिएर येथील त्यांच्या परिचयाच्या सर्व स्त्रियांबद्दल त्यांनी क्रमाने विचार करून पाहिला; पण कोणाबद्दल त्यांना तसा खास संशय घेता येईना. मग त्यांना वाटलं की एखाद्या पुरुषाने तर ते पत्र बाईकडून लिहून घेतलं नसेल? आणि तसं असल्यास मग हा पुरुष कोण? इथेही पुन्हा अनिश्चितता होती. त्यांच्या परिचयातील बऱ्याच पुरुषांचा मत्सर व द्वेष त्यांनी ओढवून घेतला होता यात शंका नव्हती. अगदी गळून गेल्यासारखे वाटल्यामुळे ते आरामखुर्चीत पडले. माझ्या पत्नीशी मला सल्लामसलत केली पाहिजे.” खुर्चीतून उठताना ते स्वतःशी नेहमीच्या सवयीनुसार पुटपुटले.

पण लगेच त्यांच्या मुखावाटे “अरे देवा!” असा उद्‌गार बाहेर पडला; आणि डोक्यावर हात मारून घेत ते म्हणाले, “माझी बायको तर अशी एकमेव व्यक्ती आहे की जिच्यावर मला या बाबतीत विश्वास ठेवता येत नाही. या क्षणापासून ती माझी शत्रू झाली आहे.” आणि त्यांच्या डोळ्यांत रागाचे अश्रू उभे राहिले.

अनुक्रमणिका

त्या वेळी रेनॉलना दोन व्यक्तींची आठवण झाली. ते दोघे त्यांचे जिवलग स्नेही होते. पण रेनॉलना त्यांचीच या क्षणी फार धास्ती वाटली. तिचे कारण असे की, त्या छोट्या प्रांतातील लोकांच्या अंतःकरणात निर्विकारपणाच्या मुळातून उद्‌भवलेला व्यावहारिक शहाणपणा! मित्राविषयीसुद्धा अशी धास्ती वाटणे हे त्या निर्विकारपणाचे योग्य असेच बक्षीस होते.

"त्या दोघांशिवाय मला जवळजवळ दहा मित्र आहेत." मग त्या प्रत्येकापासून आपल्याला निश्चित किती दिलासा प्राप्त होईल याचा हिशेब करीत रेनॉल आपल्या मनात एकेकाची उजळणी करू लागले आणि संतापाने ओरडले, "त्या सगळ्यांना; हो हो, त्या सगळ्यांना माझ्या ह्या भयावह दुर्दैवामुळे अत्यानंद होईल." रेनॉल यांच्या दृष्टीने समाधानाची गोष्ट अशी होती की इतरेजन आपला फार हेवा करतात असे त्यांना वाटत असे व ते वाटणे विनाकारण नव्हते. शहरात त्यांचे एक उत्तम घर होते. त्या घराला राजेसाहेबांच्या एका रात्रीच्या मुक्कामाचा चिरस्थायी बहुमान लाभलेला होता. शिवाय ग्रामीण भागातील वेर्जीचे घर म्हणजे एक आकर्षक बांधणीची वास्तू होता. त्या घराच्या दर्शनी भागाला सफेत रंग देण्यात आलेला होता व छानदार हिरव्या झडपांमुळे खिडक्या शोभिवंत दिसत होत्या. स्वतःच्या अशा भव्य ऐश्वर्यामुळे त्यांचा जीव क्षणभर सुखावला. ह्या गोष्टीतील सत्य असे होते की, रेनॉल यांचा हा प्रासाद तीन चार लीग (दहा-बारा मैल) अंतरावरून दिसत असे. याच्याउलट त्या भागातील आसपासची इतर सगळी घरे (फ्रेंच भाषेतील तथाकथित 'चॅटोज') अगदी साधीसुधी होती व कालांतराने फिका पडत चाललेला करडा रंग आपल्या अंगावर तसाच वागवीत आली होती. त्यामुळे दूरवरून दिसणाऱ्या त्या सफेत व हिरव्या रंगाने झळकणाऱ्या एम्. द. रेनॉल यांच्या घरापुढे ती अगदी बेंगरूळ वाटत होती. रेनॉल यांचा एक मित्र, विभागातील चर्चची व्यवस्था पाहणारा छोटासा अधिकारी होता. त्याचे अश्रू व त्याचा दयाभाव याची रेनॉलना खात्री बाळगता आली असती. पण तो असा दुर्बळ मनाचा होता की, प्रत्येक बाबतीतच तो अश्रू ढाळीत असे. तथापि तो रेनॉल यांचा एकमेव आधार होता.

ते रागाने उद्‌गारले, "माझ्या ह्या दुर्दैवाशी इतर कोणाच्याही कमनशिबाची तुलना होईल का? काय हे माझं एकाकीपण?" आणि खरोखरी दयनीय अवस्था प्राप्त झालेल्या ह्या माणसाने स्वतःला विचारले, "माझ्या विपत्तीत ज्याच्याकडून काही सल्लामसलत घ्यावी असा एकही मित्र मला नसावा हे शक्य आहे का? खरोखरी शक्य आहे का? कारण माझं मन सुसंगत विचारच करू शकत नाही. मला कळतंय ते. अरे फालकोज! अरे द्युको!" रेनॉल कडवटपणे ओरडले. फालकोज व द्‌युको हे त्यांचे शाळकरी दोस्त. स्वतःच्या आढ्यतेमुळे त्या दोघांचा स्नेह रेनॉलनी १८१४ मध्ये तोडला. ते दोघे उमरावकुळात जन्मलेले नव्हते. समानतेच्या ज्या पातळीवर ते आपल्या सबंध जीवनात परस्परांशी वागत आले होते ती रेनॉल यांनी बदलण्याचा प्रयत्न केला; साहजिकच मित्र दूर झाले.

त्या दोघांपैकी फालकोज हा हिमतीचा व धीराचा माणूस होता. व्हेरिएर येथे त्याचा कागदाचा व्यापार होता. त्याने खात्याच्या मुख्य शहरात एक छापखाना खरेदी केला होता. त्याने एक वृत्तपत्रही चालविले होते. पण कॉंग्रेगेशनने ते नष्ट करण्याचा निश्चय केला होता. त्या वृत्तपत्राला बदनाम करण्यात आले होते. मुद्रकाचा परवानाही काढून घेण्यात आला होता. अशा आपत्प्रसंगी फालकोजने रेनॉलना दहा वर्षांत प्रथमच पत्र लिहिण्याचे धारिष्ट केले. त्या पत्राला प्राचीन रोमन पद्धतीने उत्तर पाठविणे आवश्यक आहे असे व्हेरिएरच्या महापौरांना वाटले. "राजाच्या मंत्र्याने माझ्याशी सल्लामसलत करण्याचा बहुमान मला दिल्यास मी त्याला सांगेन, 'मुळीच दयामाया न दाखविता सगळ्या स्थानिक मुद्रकांची सद्दी संपवून टाका आणि तंबाखूच्या

विक्रीप्रमाणे मुद्रणाचा एकाधिकार करा." जिवलग मित्राला लिहिलेल्या ह्या पत्राने त्या वेळी सबंध व्हेरिएरला आश्चर्यचकित करून टाकले होते. सदर पत्रातील शब्दाशब्दाची आठवण एम्. द. रेनॉल यांना या वेळी भयग्रस्तपणे झाली. "माझा दर्जा, माझी संपत्ती, माझे क्रॉस (पदके) या सर्वांचा विचार करता मला एक दिवस त्या पत्राबद्दल खेद वाटेल असे कोणी म्हणू शकला असता का?" त्यांना एका क्षणी स्वतःचा तर दुसऱ्या क्षणी भोवतालच्या सगळ्यांचा भयंकर राग येत होता. रागाच्या अशा झटक्यातच मानसिक वेदना सहन करीत त्यांनी ती रात्र घालविली. पण आपल्या बायकोवर पाळत ठेवावी हे मात्र सुदैवाने त्यांना सुचले नाही. ते स्वतःला म्हणाले, "लुसीशी बोलण्या-सवरण्याची मला सवय झालेली आहे. तिला माझे सर्व व्यवहार माहीत आहेत. उद्या लग्न करायला मी जर मोकळा झालो तर तिची जागा घ्यायला मला इतर कोणी योग्य व्यक्ती आढळेल असे मला वाटत नाही." त्यानंतर आपली पत्नी निष्पाप आहे या विचाराने त्यांनी स्वतःच्या मनाला विरंगुळा देण्याचा प्रयत्न केला. ह्या दृष्टीने पाहता स्वतःच्या व्यक्तित्वाचे सामर्थ्य दाखविणे आवश्यक आहे असे त्यांना वाटले व ते अधिक सोयीस्कर होते. निष्कारण बदनाम झालेल्या किती तरी बायका आपण सर्वांनी पाहिल्या नाहीत काय?

कंपित पावलांनी खोलीत येरझारा घालीत ते एकदम उद्गारले, "पण म्हणजे काय? तिचं असं हे वागणं चालू द्यायचं? जसा काही मी गवताच्या कडब्याचा केलेला हलकासलका, कुचकामी पुरुष आहे! प्रियकराशी प्रणयचेष्टा करून तिने मला चिडवावं इतका का मी फुसका माणूस आहे? सगळं काही चालवून घेणाऱ्या माझ्या बुळेपणाला नाके मुरडायला व्हेरिएरला संधी द्यायची! चवचाल बायकोमुळे कुप्रसिद्ध झालेला इथला तो चार्मिअर; त्याच्याबद्दल बोलायचं काय बाकी ठेवले आहे लोकांनी? त्याचा उल्लेख निघाला की प्रत्येकाच्या तोंडावर हसू नाही का फुटत? तो एक चांगला वकील, उत्तम वक्ता आहे. पण त्याच्या वक्तृत्वाच्या कसबाबद्दल कोणी कधी काही बोललं आहे का? "हँ हँ! चार्मिअर ना? बर्नार्डचा चार्मिअर!" असं ते त्याला म्हणतात. म्हणजे ज्याने त्याची अपकीर्ती केली त्याचंच नाव लोक प्रत्यक्षात चार्मिअरच्या नावाला जोडतात."

इतर काही क्षणी रेनॉल म्हणत, "मला मुलगी नाही याबद्दल मी ईश्वराचा आभारी आहे; आणि ज्या प्रकारे मी माझ्या मुलांच्या आईला शिक्षा करणार आहे त्यामुळे त्यांच्या जीवनक्रमाला कोणताच अपाय होणार नाही. तो तरुण शेतकरी माझ्या बायकोबरोबर पापकर्म करीत असताना, अचानक मी त्यांना पकडीन आणि त्या दोघांना ठार करीन. तसं केल्यास माझ्या दुर्दैवाचा हा शोचनीय परिपाक, त्याची हास्यास्पदता कदाचित कमी करील" ही कल्पना रेनॉल यांच्या मनात बरीच ठसली. त्यांनी संपूर्ण तपशिलाने तिची आखणी केली. "पीनल कोड माझ्या बाजूने आहे आणि काहीही झाले तरी आमचे काँग्रेगेशन (फौजदारी कायदा) व पंच असलेले माझे मित्र माझा बचाव करतील." रेनॉलनी त्यांचा शिकारीचा सुरा तपासून पाहिला. त्याच्या पात्याला तीक्ष्ण धार होती. पण रक्तपाताच्या विचाराने ते भयभीत झाले.

"नाही तर त्या उर्मट शिक्षकाला काळानिळा पडेपर्यंत मी झोडपून काढीन आणि घरातून हाकून देईन. पण व्हेरिएरमध्ये आणि खरोखर खात्यामध्येसुद्धा केवढी खळबळ माजेल त्यामुळे! फालकोजच्या वर्तमानपत्रांच्या मुस्कटदाबीनंतर त्याचा संपादक तुरुंगातून सुटून आल्यावर, त्याला सहाशे फ्रँक पगाराची नोकरी गमवायला लावण्यास मी कारणीभूत झालो. काही तरी खरडणाऱ्या त्या क्षुद्र लेखकाने बेझाँसामध्ये पुन्हा तोंड दाखवण्याचे धारिष्ट केले असल्याचे ऐकिवात आहे. माझ्यावर तो सहज हल्ला चढवील; आणि तोही इतक्या धूर्तपणे की त्याच्यावर खटला भरून त्याला न्यायालयात खेचणे अशक्य व्हावे. आपण सत्य सांगत आहोत असं तो मगरूर माणूस हजार प्रकारे लोकांच्या मनांत युक्तीने भरवून देईल. माझ्याप्रमाणे जो कुटुंबवत्सल गृहस्थ आपल्या प्रतिष्ठेचा आब राखून वागतो त्याचा हे खालच्या वर्गाचे लोक नेहमीच द्वेष

करतात. पॅरिसच्या त्या भयानक वर्तमानपत्रात मग माझ्यावर झोड उठविण्यात आलेली मला पाहावी लागेल. बाप रे! देवा, काय ही अधोगती! रेनॉल कुळाचं प्राचीन नाव याप्रमाणे कुचेष्टेच्या चिखलात लिडबिडलेलं पाहायचं!... मी प्रवासाला जर कधी निघालोच तर मला माझं नाव बदलून वापरावं लागेल; काय? जे नाव म्हणजे माझा अभिमान व सामर्थ्य आहे ते टाकून द्यायचं? काय हा अपकीर्तीचा कळस!

"मी माझ्या बायकोला ठार न करता, कलंकित म्हणून तिची शोभा करून तिला घराबाहेर घालवून दिल्यास ती तिच्या बेझाँसाच्या आत्याकडे जाईल. तिची आत्या स्वतःची सगळी संपत्ती गुपचूप तिला देईल, मग माझी बायको पॅरिसला जाईल अन् तिथे ज्युलिआँबरोबर राहू लागेल. ते वृत्त लगेच व्हेरिएरला पोहोचेल आणि पुन्हा मी भोळा, फसवला गेलेला असं मला समजण्यात येईल."

दिव्याच्या कमी होऊ लागलेल्या प्रकाशावरू मग ह्या दुःखी माणसाच्या लक्षात आले की, उजाडायला आलेले आहे. जरा ताजी हवा खावी म्हणून मग ते बागेत गेले. त्या क्षणी त्यांनी स्वतःच्या मनात जवळजवळ असा निर्णय घेतला होते की ह्या प्रकरणावरून कोणत्याही प्रकारचा तमाशा होऊ द्यायचा नाही. तो तमाशा पाहून व्हेरिएर येथील त्यांच्या 'सच्चा' मित्रांना आनंद होईल हे त्या निर्णयाचे मुख्य कारण होते.

बागेतील फेरफटक्याने त्यांचे मन काहीसे शांत झाले. ते स्वतःशी चीत्कारले, "नाही, माझ्या बायकोपासून मी निश्चितपणे वेगळा होणार नाही. ती मला खूपच उपयोगी पडते." आपल्या बायकोशिवाय आपले घर कसे दिसेल याचे चित्र त्यांनी भयभीतपणे स्वतःच्या नजरेपुढे उभे केले. त्यांच्या नातेवाइकांत एकच महिला होती व ती म्हणजे मार्किज द आर...... पण दुष्ट मनाच्या त्या बाई वृद्ध अन् खुळचट होत्या.

फार शहाणपाणाची एक कल्पना त्यांना सुचली. पण ती कृतीत उतरविण्यासाठी त्या दुबळ्या माणसाजवळ जे थोडेफार मनोधैर्य होते त्यापेक्षा खूप मोठ्या मनोधैर्याची गरज होती. रेनॉल स्वतःशी बोलले, "मी माझ्या बायकोला ठेवून घेतलं आणि एखाद्या दिवशी तिने माझ्या सहनशक्तीला फारच ताण दिला तर मी माझ्या स्वभावानुसार– मी ओळखतो स्वतःचा स्वभावधर्म– तिच्या गुन्ह्याबद्दल तिची खरडपट्टी काढीन. ती स्वाभिमानी आहे, म्हणजे आमचं भांडण होणार हे नक्कीच; आणि तिच्या आत्याची संपत्ती वारस म्हणून तिच्याकडे येण्यापूर्वी हे सगळे घडून येणार; म्हणजे मग लोक माझा किती उपहास करतील! माझ्या बायकोचं मुलांवर प्रेम आहे त्यामुळे ती संपत्ती अखेर मुलांकडेच येईल; पण मी व्हेरिएरमध्ये चर्चा-चेष्टेचा एक विषय होऊन बसेन. ते म्हणतील की, काय? याला आपल्या बायकोला शिक्षासुद्धा करता आली नाही! तेव्हा मी माझ्या शंका–संशयांना चिकटून राहणे आणि कशाचीच शहानिशा न करणे हेच जास्त बरोबर होणार नाही का? पण मग माझे हात मी स्वतःच बांधून घेतल्यासारखे होईल आणि नंतर कशासाठीच मला तिची कानउघाडणी करता येणार नाही."

क्षणभराने रेनॉल यांच्या दुखावलेल्या आत्मप्रौढीने त्यांच्या मनाचा ताबा घेतला. व्हेरिएर येथील कॅसिनोच्या अथवा नोबल क्लबच्या बिलिअर्ड रूममध्ये सांगण्यात आलेल्या सर्व कथा-किश्श्यांची आठवण मग त्यांचे मन प्रयत्नपूर्वक काढू लागले. अस्खलितपणे बोलणाऱ्या एका गृहस्थाने, कोणा एका छिनाल बाइल्या नवऱ्याची टर उडवून मजा करण्यासाठी एकदा खेळ थांबविला होता; या क्षणी ती थट्ट-मस्करी रेनॉलना किती निष्ठुरपणाची वाटत होती.

"देवा माझी बायको मरत का नाही? म्हणजे अशा उपहासापासून मी मुक्त तरी झालो असतो. मी विधुर का नाही होत! पॅरिसला जाऊन उत्कृष्ट समाजात सहा महिने राहायला मग मला मिळेल." विधुरावस्थेच्या कल्पनेने लाभलेल्या ह्या क्षणैक सुखानंतर रेनॉल यांची कल्पनाशक्ती, सत्याची छाननी करून घेण्याच्या पद्धतीकडे परत वळली. घरातील सर्व मंडळी झोपल्यावर मध्यरात्री काही मुठी कोंडा ज्युलिआँच्या खोलीच्या दाराबाहेर आपण पसरून ठेवावा का? म्हणजे दुसऱ्या दिवशी प्रातःकाळीच आपल्याला त्याच्यावर पावलांच्या खुणा दिसतील!

पण हा विचार रागाने टाकून देऊन ते उद्गारले, "छे, ते नाही जमणार बरोबर. ती दळभद्री एलिसा ते पाहील; आणि मला त्या दोघांच्या प्रेमाचा संशय आला आहे याचा बभ्रा एकदम घरभर होईल."

कॅसिनोमध्ये प्रसृत झालेली आणखी एक कथा मग त्यांना आठवली. एका नवऱ्याने आपल्या बायकोच्या व तिच्या प्रियकराच्या प्रणयाची शंका फेडून घेण्याच्या प्रयत्नात त्यांच्या खोल्यांची दारे, त्यांच्यावर थोड्या मेणाने केस चिकटवून बंद केली होती!

याप्रमाणे कित्येक तास विचारांची धरसोड केल्यावर, माहिती काढण्यासाठी रेनॉलना ही पद्धत निखालसपणे सर्वोत्तम वाटली आणि ती अमलात आणण्याचे ते ठरवीत होते, तेवढ्यात जिला मेलेली पाहणे त्यांना आवडले असते ती त्यांची बायको, वाटेतल्या वळणा जवळ त्यांना अकस्मात दिसली.

मा. रेनॉल खेड्याहून परतत होत्या. वेर्जीच्या चर्चमधील सामुदायिक प्रार्थना (Mass) ऐकण्यासाठी त्या गेल्या होत्या. सध्या उपयोगात असलेले ते छोटे चर्च वेर्जीच्या लॉर्डच्या किल्ल्याचे चॅपेल होते असे परंपरेने मानले जात असे. मा. रेनॉल यांचा तिच्यावर विश्वास होता. पण रूक्ष तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने ती परंपरागत समजून अतिशय शंकास्पद होती. त्या चर्चमध्ये प्रार्थनेत त्यांनी जेवढा वेळ घालवावयाचे ठरविले होते तेवढ्या सबंध वेळात या विचाराने त्यांचा पाठपुरावा केला. आपला नवरा शिकारीमध्ये ज्यलिआँला, जणू काही अपघाताने ठार करीत आहे आणि नंतर त्या संध्याकाळी आपल्याला त्याचे काळीज चावून टाकण्याची सक्ती करीत आहे असे एक चित्र मा. रेनॉल स्वतःसमोर उभ्या करीत होत्या.

त्या स्वतःला म्हणाल्या, "माझं बोलणं ऐकून त्यांना काय वाटेल यावर माझं नशीब अवलंबून आहे. ह्या भयंकर क्षणानंतर त्यांच्याशी बोलण्याची दुसरी संधी कदाचित मला मिळणार नाही. ते काही विवेकबुद्धीने चालणारे शहाणे प्राणी नाहीत. जर ते तसे असते तर ते काय बोलू अथवा करू शकतील याचा अंदाज मी माझ्या स्वतःच्या थोड्याफार अक्कलहुषारीने करू शकले असते. पण माझं नशीब माझ्या धूर्तपणावर व ह्या तऱ्हेवाईक माणसाच्या विचारांना वळण लावण्याच्या कौशल्यावर अवलंबून आहे. पण ते रागाने आंधळे होतात आणि मग त्यांना साऱ्या गोष्टींचा नीटपणे विचार करता येत नाही. हे परमेश्वरा! मला बुद्धिमत्ता, थंडपणा यांची गरज आहे. कोठून आणू मी हे गुण?"

पण बागेत गेल्यावर व तेथे रेनॉल यांना दुरून पाहिल्यावर, जणू काही जादूनेच त्यांची शांत वृत्ती परत आली. रेनॉल यांचे अस्ताव्यस्त केस व त्यांचे कपडे सांगत होते की ते रात्री झोपलेले नव्हते.

मा. रेनॉलनी त्यांच्या हाती एक पत्र दिले. त्या पत्रावरील मोहोर फोडलेली होती तरी ते अजून उघडलेले दिसत नव्हते. पत्र न उघडताच एम्. द रेनॉल पत्नीकडे टक लावून पाहात राहिले. त्यांच्या नजरेत एक प्रकारचा उन्माद भरलेला होता.

मा. रेनॉल त्यांना म्हणाल्या. "जो तुम्हाला नीट ओळखतो आणि तुम्ही ज्याच्या कृतज्ञतेच्या ऋणात आहात असा दावा करणाऱ्या एका दुष्ट माणसाचे हे पाहा घृणास्पद कृत्य. वकिलाच्या बागेमागून मी पुढे चालले असता त्याने हे माझ्या हाती दिले. एक गोष्ट तुम्हाला करायलाच पाहिजे. त्या मॉसेओर ज्युलिआँला त्याच्या माणसाकडे परत पाठवून द्या अन् तेही ताबडतोब." ज्युलिआँचे नाव मा. रेनॉलनी इतक्या घाईने उच्चारले की जसे काही ते घ्यायची वेळ यायच्या आधीच ते उच्चारण्याच्या, त्यांच्यावर आलेल्या भयंकर पाळीतून स्वतःची सुटका त्यांना झटकन करून घ्यायची होती.

आपल्या पतीला आपल्या ह्या बोलण्यामुळे आनंद झाला हे पाहून त्यांना स्वतःलाच खूप आनंद झाला. रेनॉल यांनी त्याच्याकडे लावलेल्या एकटक नजरेवरून त्या उमजल्या की ज्युलिआँने केलेला अंदाज बरोबर होता. त्या क्षणी समोर उभ्या असलेल्या संकटाची चिंता न करता, त्या विचार करू लागल्या,

"केवढी ही ज्युलिआँची बुद्धिमत्ता! केवढा त्याचा निष्णात धोरणीपणा! आणि हे सर्व जीवनाचा फारसा अनुभव नसलेल्या तरुणाच्या अंगी! कालान्तराने तो मिळवू शकणार नाही असे एकही उच्च पद नसेल. पण अरेरे! त्याच्या यशामुळे तो मला विसरून जाईल!"

ज्या माणसाची पूजा त्या स्वतःच्या मनात बांधीत असत त्याच्या प्रशंसोद्गाराच्या ह्या छोट्याशा कृतीने मादामना परत पूर्ण मनःस्वास्थ्य लाभले.

त्यांनी जे योग्य पाऊल टाकले होते त्याबद्दल स्वतःचे अभिनंदन त्यांनी केले. गोड व मुग्ध खुषीच्या भावनेने त्या स्वतःशी उद्गारल्या, "मीही ज्युलिआँच्या योग्यतेची आहे हे मी सिद्ध करून दाखविले आहे."

आपण शब्दात अडकले जाऊ या भीतीने काहीही न बोलता एम्. द रेनॉल यांनी ते दुसरे निनावी पत्र तपासून पाहिले. छापील शब्द निळ्या कागदावर चिकटवून ते तयार केलेले होते. हे वाचताना आठवत असेलच. "हरेक मार्गाने कोणी तरी मला गाढव बनवू पाहात आहे." अगदी शिणून गेलेले एम्. द रेनॉल स्वतःशी म्हणाले,

"आणखी नवे अपमान! लक्ष घालणे भाग आले; आणि हे सर्व माझ्या बायकोपायी" अत्यंत चरबट शब्दात बायकोला भरपूर वाक्ताडन करण्याच्या बेतात ते होते. पण बेझाँसाहून तिला संपत्ती मिळणार आहे ह्या विचाराने केवळ त्यांना अडविले. पण कशावर तरी आपला राग काढलाच पाहिजे ह्या भावनेच्या भरात त्यांनी शब्द चिकटवून तयार केलेल्या त्या दुसऱ्या निनावी पत्राचा निळा कागद फाडून टाकला आणि पत्नीचा सहवास सहन करू शकत नाही असे वाटून ते लांब टांगा टाकीत तेथून निघून गेले. पण लवकरच जरा शांत होऊन ते क्षणभराने तिच्याकडे परत आले.

त्याबरोबर मा. रेनॉल त्यांना म्हणाल्या, "ताबडतोब कामाला लागून ज्युलिआँला आधी नोकरीवरून काढून टाकले पाहिजे. अखेर तो एका कामगाराचा तर पोरगा आहे. काही क्राऊन्स देऊन तुम्ही त्याची

नुकसानभरपाई करून द्या. शिवाय तो हुषार असल्यामुळे दुसरीकडे कोठेही नोकरी मिळवू शकेल. म. वालनो किंवा सब-प्रिफेक्ट मोजिराँ यांच्याकडेही त्याला नोकरी मिळू शकेल. ते दोघेही कुटुंबवत्सल आहेत; म्हणजे तुम्ही त्यांचं काही नुकसान केलं आहे असं होणार नाही."

मोठ्याने गर्जत एम्. द रेनॉल ओरडले, "तू मूर्ख आहेस आणि मूर्खासारखीच बोलत आहेस. बाकी स्त्रीकडून कोणाला व्यवहारज्ञानाची अपेक्षा करता येईल? योग्यायोग्य काय आहे याकडे तू लक्ष कधीच देत नाहीस; मग तुला अक्कल येणार तरी कशी? तुम्हा बायकांचा निष्काळजीपणा, तुमचा आळशीपणा यांच्यामुळे तुमच्या हातून कोणतं काम होऊ शकत असेल, तर ते फुलपाखरं पकडण्याचं. पण या असल्या दुबळ्या प्राण्यांना आमच्या घरात आम्हाला सामावून घ्यावं लागतं हे आमचं दुर्दैव!"

मा. रेनॉलनी त्यांना बोलू दिले आणि ते खूपसे बोलत राहिलेही. त्या प्रांतात म्हणण्याचा प्रघात आहे त्याप्रमाणे बोलायचे म्हणजे त्यांनी आपल्या रागाला वाट करून दिली.

अखेर उत्तर म्हणून मा. रेनॉल पतीला म्हणाल्या, "साहेब, जिच्या अब्रूवर गलिच्छ शिंतोडे उडविण्यात येत आहेत अशी स्त्री, या भूमिकेतून मी बोलत आहे; अब्रू हा आम्हा बायकांचा एक अमोल ठेवाच असतो."

ते अत्यंत बिकट संभाषण चालू असता मादामनी अविचलित शांतपणा सर्व काळ टिकविला होता. त्यावरच त्यांचे त्या वास्तूतील वास्तव्य, ज्युलिआँच्या संगतीत चालू राहण्याची शक्यता अवलंबून होती. त्यांच्या पतीच्या त्या अविचारी रागाला वाट काढून देण्यासाठी त्यांनी काही क्लृप्त्या काढल्या. त्या अगदी योग्य लागू पडतील असे त्यांना वाटले. रेनॉल यांनी त्यांना उद्देशून जे सगळे अपमानास्पद शेरे मारले होते ते ऐकून त्या अविचल राहिल्या होत्या; त्यांनी ते ऐकलेच नव्हते; सर्व वेळ त्या ज्युलिआँचा विचार करीत होत्या, 'या वर्तनाने ते माझ्यावर खूष होतील ना?' त्यांनी स्वतःला विचारले.

अखेर त्या बोलल्या, "ह्या छोट्या शेतकऱ्यावर आपण हर प्रकारे कृपेची खैरात केली. त्याला भेटवस्तूही दिल्या. कदाचित तो निरपराधीही असेल. तथापि आजवरच्या माझ्या जीवनात अपमानाचा पहिला प्रसंग आला तो त्याच्यामुळे. साहेब, मी तो तिरस्करणीय कागद वाचला तेव्हा प्रतिज्ञा केली की एक तर त्याने, नाही त मी तुमचे घर सोडून जावे."

"जेणेकरून माझी अप्रतिष्ठा होईल आणि तुझीही पण होईल असा एखादा लोकापवाद निर्माण करण्याची तुझी इच्छा आहे की काय? व्हेरिएरमध्ये किती तरी लोकांना तू त्यामुळे टीकेला चमचमीत खाद्य मात्र पुरवशील."

"खरं आहे ते; तुम्ही तुमच्या समजदार, चतुर कारभाराने तुम्हांला तुमच्या कुटुंबाला व तुमच्या गावाला प्राप्त करून दिलेल्या भरभराटीच्या स्थितीचा त्यांना मत्सर वाटतो.....बरंय, मी आता जाते आणि तुमच्यापाशी रजा मागण्यासाठी ज्युलिआँला सांगते. डोंगरातील त्या इमारती लाकडाच्या व्यापाऱ्याकडे महिनाभर राहायला जाण्यास त्याला सांगते. ह्या छोट्या कामकऱ्यासाठी तोच योग्य जोडीदार आहे."

जरा शांतपणाने एम्. द रेनॉल त्यावर म्हणाले, “जे काय करशील ते काळजीपूर्वक कर. एक गोष्ट मी तुला आग्रहाने सांगतो की तू त्याच्याशी मुळीच बोलू नकोस. तू तुझा राग त्याच्यावर काढशील आणि त्यामुळे तो माझ्याशी तुसडेपणे वागेल. तो छोटा सद्गृहस्थ किती चिडका आहे हे तूला माहीत आहेच.”

मा. रेनॉल पुढे बोलू लागल्या, “ह्या तरुण माणसाजवळ धोरणीपणा कसा तो नाहीच. असेल तो शिकलेला, तुम्हालाच ठाऊक काय ते! पण आतून तो एक निव्वळ शेतकरीच आहे झालं. माझ्यापुरतं सांगायचं म्हणजे त्याने एलिसाशी लग्न करायला नकार दिला तेव्हापासूनच त्याच्याबद्दलचं माझं मत अनुकूल असं कधीच राहिलं नाही. सुदैव अगदी हाताशी आलं होतं की हो त्याच्या! आणि नकाराला कारण काय तर म्हणे एलिसा वारंवार म. वालनोच्या गाठीभेटी चोरून घेत असते.”

“अस्सं काय!” आपल्या भुवया शक्य तितक्या उंचावीत रेनॉल उद्गारले व त्यांनी विचारले, “ज्युलिआँनं असं सांगितलं तुला?” असंच काही सरळसरळ बोलला नाही तो; उलट तो मला नेहमी सांगत आला आहे की, पवित्र धर्मोपदेशकाच्या व्यवसायाबद्दल एखाद्या व्रताप्रमाणे त्याला ओढ वाटते. पण मी सांगते, कनिष्ठ पातळीवरच्या अशा लोकांना पहिली ओढ कसली असेल तर ती स्वतःचे पोट भरण्याच्या सोयीची. एलिसाच्या त्या गुप्त गाठीभेटी त्याला माहीत नाहीत असं नाही हे त्याने मला अगदी उघडपणे सुचवलं.”

रेनॉल यांच्या रागाचा पारा पुन्हा वर गेला आणि प्रत्येक शब्दावर ठासून जोर देत ते ओरडले, “आणि मला—मला त्यांच्याबद्दल काहीही समजलेलं नाही! माझ्या घरात अशा गोष्टी चालत असतात की ज्यांची मला काहीच माहिती नसते! काय? एलिसा आणि वालनो यांच्यामध्ये काही भानगड आहे काय?”

मा. रेनॉल हसत म्हणाल्या, “अहो महाराज, ती एक अगदी जुनी गोष्ट आहे, आणि मला वाटतं त्यामुळे विशेष काही बिघडलेलंही नाही. जेव्हा तुमचे सन्मित्र वालनो यांना त्यांच्यात व माझ्यात एक पवित्र प्रेमाचा दुवा आहे असे व्हेरिएरमध्ये साऱ्यांच्या तोंडी सहज व्हावं असं वाटत होतं, तेव्हाची गोष्ट आहे ही. मात्र प्रेम म्हणजे अगदी वासनारहित, आध्यात्मिक पातळीवरचं हो!”

एका प्रकरणाच्या पाठोपाठ आणखी दुसरे प्रकरण उघडकीस आल्यामुळे आलेल्या संतापामुळे डोक्यावर मारून घेत रेनॉल ओरडून म्हणाले, “एका वेळी मला त्या गोष्टीची कल्पना आली होती; आणि तू त्याबद्दल माझ्याशी कधी एका चकार शब्दानेही बोलली नाहीस हे कसं काय?”

आपल्या प्रिय गव्हर्नरने त्याच्या वृथाभिमानाचं थोडंसं प्रदर्शन केलं तर तेवढ्यासाठी मी काय दोन मित्रांत कलागत लावून द्यायची? समाजात अशी कोणती स्त्री आहे की जिला त्याने अतिशय विनोदी अन् जराशी रंगेल अशी एक ना अनेक पत्रे लिहिली नाहीत?”

“त्याने तुलाही लिहिली आहेत काय?”

“नेहमी लिहितात ते.”

"तर मग ताबडतोब दाखव मला ती पत्रे; माझा हुकूम आहे." आणि तो हुकूम करताना एम. द रेनॉल यांनी जणू आपली उंची आणखी सहा फुटांनी वाढविली. पण त्यांच्या त्या हुकुमाला इतक्या सौम्य आवाजात की जवळजवळ बेपर्वाईचे वाटावे असे उत्तर मिळाले.

"मी तसं काही एक करणार नाही. नंतर केव्हा तरी दाखवीन मी ती तुम्हांला. तुमचं डोकं जरा जास्त ठिकाणावर असेल तेव्हा."

"ते काही नाही; आत्ताचे आत्ता दाखव मला ती पत्रे." शिवी देत, संतापाने बेभान झालेले रेनॉल ओरडले. तरीही त्या आधीच्या बारा तासांत ते जेवढे सुखी होते त्यापेक्षा त्या क्षणी जास्त सुखी होते.

मा. रेनॉल गंभीरपणे म्हणाल्या, "त्या पत्रांवरून अनाथाश्रमाच्या गव्हर्नरशी कधीही भांडण उकरून काढणार नाही अशी शपथ तुम्ही घेता माझ्याजवळ?"

"भांडेन, नाही तर भांडणार नाही. मी त्यांच्याकडून ती अनाथ मुलंच काढून घेईन. पण मला ती पत्रे ह्या क्षणी मिळाली पाहिजेत. कुठे आहेत ती?" रेनॉल त्वेषाने बोलत होते.

"माझ्या मेजाच्या खणात आहेत ती. पण तुम्ही नक्की समजून असा की त्याची किल्ली मी तुम्हांला देणार नाही."

"कुलूप मोडून मी तो खण उघडीन." असे ओरडून बोलत ते तेथून त्यांच्या पत्नीच्या खोलीकडे गेले.

आणि खरोखरीच त्यांनी लोखंडी सळई घालून त्या खणाचे कुलूप जोर करून उघडले. किंमती महॉगनी लाकडाचे ते लिहिण्याचे उतरते छोटे मेज पॅरिसहून आणलेले होते. त्याच्या पृष्ठभागावर एखादा डाग त्यांना दिसला की, रेनॉल स्वतःच्या कोटाच्या टोकाने तो पुसून टाकीत असत.

तेवढ्यात मा. रेनॉल कबुतरखान्याच्या एकशेवीस पायऱ्या चढून वर गेल्या. त्यांनी एका सफेद हातरुमालाचे टोक तिथल्या एका छोट्या खिडकीच्या गजाला बांधले. आपण एक अतिशय सुखी स्त्री आहोत असे त्या क्षणी त्यांना वाटले. साश्रू नयनांनी त्या डोंगरावरील झाडीने आच्छादलेल्या उतारांकडे त्यांनी टक लावली. त्या स्वतःशी पुटपुटल्या, 'शंकाच नाही, विस्तारलेल्या त्या बीच वृक्षांपैकी एखाद्याच्या खालून ज्युलिआँ ह्या आनंददायक इशाऱ्याची वाट पाहात आहे.' किती तरी वेळ त्यांनी आपल्या कानांना ताण दिला. टोळांच्या कंटाळवाण्या आणि पाखरांच्या चिवचिवाटाला त्यांनी गालिप्रदान केले. कंटाळा आणणारे ते आवाज नसते तर त्या खडकाजवळून निघालेली ज्युलिआँची आनंदी आरोळी त्यांच्या कानावर त्या मनोऱ्यात पडली असती. धुरकट हिरवळीच्या त्या खूप मोठ्या उतारावर त्यांनी आपली अधाशी, एकाग्र दृष्टी वखवखल्याप्रमाणे टाकली. झाडांच्या शेंड्यांनी त्या उताराला एखाद्या कुरणाच्या सलग पृष्ठभागाचे रूप दिले होते. मा. रेनॉल यांनी भावनिक व्याकुळतेने स्वतःला विचारले, "त्याचं सुख माझ्या सुखापेक्षा काही कमी नाही हे मला सांगण्यासाठी काही इशारा केला पाहिजे एवढं कसं ज्युलिआँला कळत नाही?" आपला नवरा आपला शोध करीत कदाचित येथवर येईल अशी भीती त्यांना वाटू लागली तेव्हाच त्या कबुतरखान्यावरून खाली आल्या.

अनुक्रमणिका

रागाने तोंडाला फेस आलेले एम्. द रेनॉल त्यांना दिसले. ते म. वालनोचे पत्र वाचीत होते. त्यातील काही गोड गोड वाक्यांवरून त्यांची नजर फिरत होती. ते गोड शब्द या अशा भावनेने (रागाच्या) पूर्वी कधी वाचले गेले नसतील!

रेनॉल यांच्या उद्‌गारांमध्ये क्षणभर, थोडा खंड पडल्याची संधी साधून मादामनी आपले म्हणणे पतीला ऐकविले.

“माझी मूळची कल्पना मला सोडून देता येत नाही; सुट्टी देऊन ज्युलिआँची रवानगी करायलाच हवी. लॅटिनमध्ये त्याची बुद्धी कितीही चालत असली तरी अखेर, एक साधा शेतकरी यापेक्षा तो मुळीच काही जास्त नाही. पुष्कळदा तो गावंढळासारखा वागतो, त्याच्याजवळ धोरणीपणा कमी आहे. आपण शिष्टाचार सांभाळीत आहोत असे समजून रोज रोज तो विनाकारण माझी फाजील प्रशंसा करीत असतो; ती फार हीन अभिरुचीची असते. ती त्याने कोणत्या तरी कादंबरीतून पाठ केलेली असते. ...”

त्यावर एम्. द रेनॉल ओरडले, “तो कधीच कुठलीही कादंबरी वाचीत नाही. मला निश्चितपणे माहीत आहे ते. तुला असं वाटतं काय की मी आंधळा मालक आहे अन् माझ्या घरात काय चालतं ते मला समजत नाही?”

“बरं बाई, ती खुळचट स्तुतिसुमने तो कुठल्याच कादंबरीत वाचीत नाही असं मानलं तर तो ती स्वतःच्या बुद्धीने तयार करतो असं म्हणावं लागेल व ते तर जास्तच वाईट! तो माझ्याविषयी व्हेरिएरमध्येही तसंच बोललेला असेल.” आणि मग आपण जणू काही एखादा नवा शोध लावला आहे अशा थाटात मादाम पुढे म्हणाल्या, “पण एवढं लांब कशाला जायला हवं? तो एलिसाजवळ तसं काही बोलला असेल; म्हणजे ते म. वालनोकडेच बोलल्यासारखं झालं.”

“हॉं.” असा उद्‌गार काढून एम्. द रेनॉल यांनी आपली मूठ, माणूस आपटू शकेल तेवढ्या कमाल जोराने मेजावर आपटली. त्याबरोबर केवळ ते मेजच नव्हे तर सबंध खोलीच हादरून गेली.

“ते छापील निनावी पत्र आणि वालनोची पत्रे ही सगळी एकाच प्रकारच्या कागदावर लिहिलेली आहेत.”

मा. रेनॉलना वाटले, “झालं अखेर एकदाचं... मला हवं होतं ते,” रेनॉल यांच्या त्या शोधाने मादाम अगदी अंगावर वीज पडल्यासारख्या चमकलेल्या दिसल्या. आणखी एखादाही शब्द बोलण्याचे धैर्य त्यांच्या अंगी जणू उरले नाही. खोलीत दुसऱ्या टोकाशी असलेल्या आसनावर त्या जाऊन बसल्या.

आता मादामनी लढाई जिंकली होती. त्या निनावी पत्राच्या तथाकथित लेखकाकडे जाऊन त्याच्याशी बोलणे करण्यास एम्. द रेनॉलना अडथळा करण्याचे काम तेवढे आता पार पाडावयाचे होते.

“हाती पुरेसा पुरावा नसताना म. वालनो यांच्याशी वादाचा प्रसंग आणून तमाशा करणं ही एक अत्यंत शोचनीय चूक होईल असं तुम्हाला कसं वाटत नाही? साहेब, तुमचा जर हेवा केला जात असेल तर त्याबद्दल दोष कोणाचा? तुमच्या गुणवत्तेचा! तुमचा दक्ष कारभार, तुम्ही उभ्या केलेल्या, उच्च अभिरुचीची साक्ष देणाऱ्या

अनुक्रमणिका

छानदार इमारती, मी आणलेला हुंडा आणि त्या सर्वांपेक्षा विशेष म्हणजे वारसा म्हणून आपल्याला अपेक्षित असलेली माझ्या सन्मान्य आत्याची संपत्ती— जी फार मोठी असल्याची अतिशयोक्ती झालीच आहे— ह्या सगळ्या गोष्टींनी तुम्हाला व्हेरिएरमधील व्यक्ती बनविलं आहे."

"आणि माझी उच्च जातकुळी विसरलीस?" मंद स्मित करीत रेनॉल म्हणाले. त्याबरोबर मादाम घाईने पुढे म्हणाल्या, "तुम्ही या प्रांतातले एक अतिशय सन्माननीय गृहस्थ आहात. राजेसाहेबांना जर तशी मोकळीक असती आणि उच्च जातकुळीला न्याय देता आला असता तर तुम्ही हाउस ऑफ पिअर्समध्ये (उमरावांच्या सभेत) जाऊन बसला असता यात मुळीच शंका नाही." (इ. इ.) "आणि समाजात असे अत्युच्च स्थान प्राप्त झालेले असताना, मत्सरी माणसांना टीका करण्याला तुम्ही खाद्य पुरवणार?"

"म. वालनोशी त्याने लिहिलेल्या निनावी पत्राबद्दल बोलणं म्हणजे कदाचित अविचाराने एका रेनॉल कुटुंबियाशी मैत्रीची संधी दिल्या गेलेल्या त्या क्षुल्लक व्यक्तीने त्या रेनॉलचा अपमान करण्याचा उपाय शोधून काढला असं साऱ्या व्हेरिएरला, किंबहुना बेझाँसाला, म्हणजे सबंध प्रांतातच जाहीर करण्यासारखं आहे. म. वालनोच्या लगटीच्या बोलण्या-चालण्याला मी प्रतिसाद दिला असे जर तुम्ही हुडकून काढलेल्या ह्या पत्रावरून सिद्ध झालं असतं तर तुम्ही मला खुशाल ठार करू शकला असता. ती शिक्षा शंभरदा भोगण्याच्या लायकीची मी ठरले असते. पण तुम्ही त्याला तुमचा राग उघडपणे दाखवणं मात्र कधीच उचित ठरणार नाही. तुमच्या श्रेष्ठतेमुळे तुमच्यावर सूड उगविण्यासाठी तुमचे सगळे शेजारी केवळ निमित्ताची वाट पहात आहेत ते समजून घ्या. १८१६ मध्ये काही लोकांना अटक करविण्यासाठी तुम्ही कारणीभूत झाला होता हे लक्षात घ्या. तुमच्या छपरावर आश्रय घेतलेला तो माणूस......"

या अशा स्मृती चाळवल्यामुळे उद्‌भवलेली सारी कटुता आपल्या आवाजात एकवटून एम्. द रेनॉल मोठ्याने ओरडले, "माझ्या लक्षात एवढंच आलंय की तुला माझ्याबद्दल आदन नाही अन् प्रेमही वाटत नाही; आणि मला अद्याप पिअर (उमराव) करण्यात आलेलं नाही!"

यावर स्मित करीत मा. रेनॉल म्हणाल्या, "मित्रवर्य, माझ्या पण हे लक्षात आलं आहे की एक दिवस मी तुमच्यापेक्षा अधिक श्रीमंत होईन; बारा वर्षे मी तुमची जोडीदारीण आहे, आणि अशा सर्व गोष्टींमुळे तुमच्या सल्लागार मंडळामध्ये माझ्या मताला पण काही अधिकार असला पाहिजे; विशेषतः आजच्या ह्या व्यवहारात तर अवश्यच" आणि मग कशाबशा लपविलेल्या तिरस्काराने त्या पुढे म्हणाल्या, "तुम्हाला मॉसिओर ज्युलिआँ माझ्यापेक्षा अधिक जवळचा वाटत असल्यास मी माझ्या आत्याकडे जाते. तिथं हिवाळा काढायला माझी तयारी आहे."

ही धमकी 'आनंदाने' देण्यात आली होती. स्वतःभोवती विनीत वागणुकीचे पांघरूण घेऊ पाहणारा निग्रह त्या धमकीत होता. त्या धमकीच्या सुरामुळे एम्. द रेनॉलनी आपल्या मनाशी काय करायचे याबद्दल ताबडतोब निर्णय घेतला. पण त्या प्रांतातल्या पद्धतीप्रमाणे ते बराच वेळ बोलतच राहिले; आपले पहिलेच मुद्दे पुन्हा क्रमाक्रमाने पुढे मांडीत गेले. पत्नीने त्यांना बोलू दिले. त्यांच्या आवाजातून अजून त्यांचा राग कळून येत होता. अखेर दोन तासांच्या निरर्थक संभाषणामुळे रेनॉल यांचे सामर्थ्य खर्ची झाले. आधीच क्रोधाने ते रात्रभर असहाय झाले होते. म. वालनो, ज्युलिआँ आणि एलिसाही यांच्या बाबतीत आपले वागण्याचे धोरण कोणते ठेवावयाचे ते त्यांनी निश्चित केले.

जो माणूस दहा वर्षे त्यांचा मित्र होता त्याची ही खरोखरीच दुरवस्था पाहून मा. रेनॉल एकदोनदा त्या अंत्यत नाट्यपूर्ण प्रसंगी त्यांच्याबद्दल काही सहानुभूती वाटण्याच्या अगदी नजीक पोहोचल्या होत्या. पण आपल्या अस्सल, उत्कट भावना नेहमी स्वार्थीच असतात. शिवाय रेनॉल यांना आदल्या रात्री मिळालेल्या निनावी पत्राबद्दलची उघड कबूली प्रत्येक क्षणी त्या अपेक्षित होत्या. पण ती कबूली कधीच आली नाही. ज्याच्यावर त्यांचे नशीब अवलंबून होते त्या माणसाला कोणत्या कल्पना सुचविण्यात आल्या असाव्यात हे मादामना, आत्मविश्वास बळकट करण्यासाठी जाणून घेणे आवश्यक होते. कारण त्या ग्रामीण परिसरात सार्वजनिक मतावर नवऱ्याचे नियत्रंण असते. जो नवरा आपल्या बायकोला उघडपणे बदनाम करतो तो स्वतःला हास्यास्पद बनवून घेतो; ही गोष्ट फ्रान्समध्ये दररोज कमी धोक्याची होत जात आहे. पण तो त्याच्या बायकोला पैसा पुरवीत नसल्यास, कामगार स्त्री म्हणून ती पंधरा सू रोजमुऱ्यावर काम करण्याच्या हीन स्थितिप्रत येऊन पोहोचते; आणि तरीही अशा स्त्रीला कामावर नेण्यास सदाचारी म्हणविणाऱ्यांना शंका वाटत असते.

एखाद्या सुलतानाने आपल्या जनानखान्यात ठेवलेली गुलाम दासी त्याच्यावर अगदी अंतःकरणापासून प्रेम करू शकते. तो सर्वसत्ताधीश असतो, हुषारीने अनेक युक्त्याक्लुप्त्या वापरून त्याचा अधिकार टाळता येण्याची आशा तिला नसते. मालकाची सूडबुद्धी भयंकर, क्रूर पण शौर्यपूर्ण व उमदी असते. कट्यारीचा एक वार सगळे संपवून टाकतो. समाजाच्या तिरस्काराचे तडाखे लगावून, एकोणिसाव्या शतकात नवरा आपल्या बायकोला ठार करतो; तिला सगळ्या खानदानी दिवाणखान्यांची दारे बंद होतात व ती जीवनातून उठते.

मा. रेनॉल त्यांच्या खोलीत परतल्या तेव्हा अशा तऱ्हेच्या संकटाची जाणीव त्यांच्या मनात तीव्रपणे निर्माण झाली. खोलीतील तो अस्ताव्यस्तपणा पाहून त्या घाबरून गेल्या. त्यांच्या सगळ्या छोट्या छानदार पेट्यांची कुलुपे तोडून टाकण्यात आली होती. खोलीतील लाकडी जमिनीच्या कित्येक फळ्या उखडून काढलेल्या दिसत होत्या. मादाम रेनॉल स्वतःशी म्हणाल्या, “त्यांच्या मनात माझ्याबद्दल दया मुळीच उरलेली नसावी. खोलीच्या रंगीत लाकडी जमिनीवरचे नक्षीकाम असे खराब करून टाकायचे म्हणजे काय? त्याचा केवढा अभिमान असतो त्यांना! चिखलाच्या पायताणांनी त्यांचे एखादे मूल खोलीत आल्यास रागाने ते नुसते लाल होतात आणि आता त्या नक्षीचा कायमचा सत्यानाश करून टाकला आहे त्यांनी.

नवऱ्यावर इतक्या झटकन् विजय मिळविल्याबद्दल मादाम स्वतःला एकसारखा दोष देत होत्या. पण रेनॉल यांनी त्यांच्या खोलीत दांडगाईने केलेल्या मोडतोडीच्या दृश्याने त्यांचे स्वतःवरले दोषारोप आणि वाद थांबले.

रात्रीच्या भोजनाची घंटा वाजण्यापूर्वी थोडा वेळ ज्युलिआँ मुलांसह परत आला. भोजनानंतर फलाहार घेताना, नोकरलोक खोलीतून गेलेले पाहून मादाम त्याला रूक्ष स्वरात म्हणाल्या, “व्हेरिएरला जाऊन तिथं एक पंधरवडा राहण्याची तुमची इच्छा तुम्ही मजजवळ व्यक्त केली होती. मंस्यूर द रेनॉल यांनी दयाळूपणे तुम्हाला रजा मंजूर केली आहे. वाटेल तेव्हा तुम्ही जाऊ शकता. पण मुलांचा वेळ वाया जाऊ नये म्हणून त्यांचे पाठ तुमच्याकडे तपासणीसाठी रोज पाठविण्यात येतील.”

एम्. द रेनॉल अतिशय कडवट स्वरात म्हणाले, “अलबत; पण मी तुम्हाला एक आठवड्यापेक्षा जास्त रजा देणार नाही.”

अनुक्रमणिका

अत्यंत व्यथित अशा माणसाची अस्वस्थता ज्युलिआँला रेनॉल यांच्या मुखावर दिसली. दिवाणखान्यात क्षणभर एकान्त लाभला तेवढ्यात ज्युलिआँ आपल्या प्रणयिनीला म्हणाला, “त्यांनी अजून निर्णय घेतलेला नाही.”

सकाळपासून आपण काय काय केले ते सगळे मादामनी त्याला झटकन सांगून टाकले, आणि हसत त्या म्हणाल्या, “तपशील आज रात्री.”

ज्युलिआँला वाटले, “काय ही स्त्रीजातीची विसंगत वागणूक! कोणतं सुख, कोणती अंतःप्रेरणा स्त्रियांना आमचा विश्वासघात करण्याच्या थरापर्यंत नेते?” जरा थंडपणेच तो मादामना म्हणाला, “तुमच्या प्रेमामुळे मला तुम्ही एकाच वेळी चतुराईने व गैरसावधपणेही वागताना दिसता. पण आपण दोघांनी एकमेकांना आज रात्री भेटण्याचा प्रयत्न करण्यात शहाणपणा आहे का? ह्या घरात जागजागी शत्रू पेरून ठेवण्यात आलेले आहेत, आणि एलिसाला माझ्याविषयी वाटणाऱ्या तीव्र द्वेषाचाही विचार करा!”

“तुम्हाला माझ्याविषयी निश्चितपणे वाटत असलेल्या तीव्र बेपर्वाईशी एलिसाच्या त्या द्वेषाचे पुष्कळसे साम्य आहे.”

“पर्वा किंवा बेपर्वा, ज्या संकटात मी तुम्हाला लोटले आहे त्याच्यातून तुमचं रक्षण करण्यास मी बांधलेला आहे. प्रसंगवशात् एम्. द रेनॉल एलिसाजवळ काही बोलले तर एका शब्दात ती त्यांना प्रत्येक गोष्ट उघड करून सांगेल शस्त्रासह माझ्या खोलीबाहेर दबा धरून बसण्यास त्यांना काय अडथळा येणार आहे?”

“काय? अंगी धैर्यसुद्धा नाही?” उच्च कुळात जन्मलेल्या स्त्रीच्या अंगी असणाऱ्या पूर्ण स्वाभिमानाने मादाम रेनॉल म्हणाल्या त्यावर ज्युलिआँ थंडपणे म्हणाला, “माझ्या धैर्याविषयी बोलण्याइतक्या खालच्या पातळीवर मी कधीच जाणार नाही. ते क्षुद्र ठरेल. जगाला माझ्या कृतीवरून काय ते ठरवू द्या. पण...” मा. रेनॉल यांचा हात स्वतःच्या हाती घेत तो पुढे बोलू लागला, “मी तुमच्यावर किती आसक्त आहे याची तुम्हाला कल्पना नाही आणि ह्या निष्ठूर वियोगापूर्वी तुमचा निरोप मला घेता येत आहे याबद्दल मला केवढा आनंद होत आहे!”

★ ★ ★

## प्रकरण बाविसावे

# १८३० मधील चालीरीती

व्हेरिएरला आल्यानंतर ज्युलिआँने केलेली पहिली गोष्ट म्हणजे मा. रेनॉल यांच्याशी अन्याय्यपणे वागल्याबद्दल केलेली स्वतःची कानउघाडणी. "मा. रेनॉल स्वतःच्या कमकुवतपणामुळे, एम्. द रेनॉल यांच्याबरोबर घडलेला प्रसंग यशस्वी रीतीने हाताळण्यात चुकल्या असत्या तर एक मूर्ख स्त्री म्हणून मी त्यांचा तिरस्कार केला असता. पण एखाद्या मुत्सद्द्याप्रमाणे मादामनी तो प्रसंग शेवटास नेला; आणि त्यात जो पराजित झाला तो माझा शत्रू असला तरी त्याच्याबद्दल मला सहानुभूती वाटते! माझ्या वृत्तीत मध्यमवर्गीय क्षुद्रपणाची एक झाक आहे. एम्. द रेनॉल हे पुरुष आहेत व त्यामुळे माझा पुरुषी अहंकार दुखावला गेला आहे. त्या अफाट व सुप्रसिद्ध मंडळाचा सभासद असल्याचा टेंभा मी मिरवतो ना! खरोखर मी एक निखालस मूर्ख माणूस आहे."

म. शॅलाँ यांचे अधिकार हिरावून घेऊन त्यांना चर्चमधून दूर करण्यात आले तेव्हा स्थानिक सन्माननीय लिबरलांनी त्यांना आश्रय देण्यासाठी एकमेकांशी स्पर्धा केली होती. पण शॅलाँनी त्या सर्वांनाच नकार दिला होता. नंतर त्यांनी ज्या दोन खोल्या घेतल्या त्या त्यांच्या अस्ताव्यस्त पडलेल्या पुस्तकांनी भरून गेल्या होत्या. पाद्री कसा असतो ते व्हेरिएरच्या लोकांना दाखविण्याच्या इच्छेने ज्युलिआँने, त्यांच्या वडिलांच्या वखारीत जाऊन तेथून जळाऊ लाकडाच्या दहाबारा फळ्या, स्वतःच्या डोक्यावरून, व्हेरिएरच्या मोठ्या रस्त्यातून वाहात आणल्या. एका जुन्या मित्राकडून त्याने काही हत्यारेही उसनवार आणिली आणि लगेच एक साधेसे फळताळ तयार करून त्यात त्याने शॅलाँ यांचे ग्रंथ नीट लावून ठेवले.

तेव्हा तो वृद्ध गृहस्थ, आनंदाश्रू गाळीत म्हणाला, "जगाचा मिथ्या डामडौल पाहून तू बिघडलास असं मला वाटलं होतं. गार्ड ऑफ ऑनरच्या झगमगणारा गणवेष अंगावर चढविल्यामुळे तुला किती तरी शत्रू निर्माण झाले. पण त्या गणवेषाच्या भुरळीचा कलंक तू आजच्या या तुझ्या कृतीने धुऊन काढलास."

व्हेरिएरला गेल्यावर ज्युलिआँने तेथे आपल्या घरी राहावे असे एम्. द रेनॉल यांनी त्याला सांगितले होते. मध्यंतरी जे काय घडून आले होते त्याबद्दल कोणालाही काही संशय आला नव्हता. व्हेरिएरला आल्यानंतरच्या तिसऱ्या दिवशी ज्युलिआँच्या खोलीवर एक बडी असामी आली. ती दुसरी–तिसरी कोणी नव्हती तर स्वतः सब–प्रिफेक्ट मंस्यूर द. मोजिराँ हेच होते. माणसांचा दुष्टपणा, सार्वजनिक निधीची व्यवस्था ज्या लोकांवर सोपविण्यात येते त्यांच्या ठिकाणचा प्रामाणिकपणाचा अभाव, गरीब फ्रान्सच्या नशिबातील संभाव्य धोके इ. इ. विषयांवर भरगच्च दोन तासपर्यंत बेचव गप्पाटप्पा व दीर्घ विलाप झाल्यानंतरच मोजिराँ अखेर आपल्या भेटीच्या उद्देशाकडे वळले. तेव्हा ते दोघे जिन्यांच्या तबकडीत आलेले होते. बदनामीच्या कडेवर उभा असलेला तो गरीब शिक्षक कोठल्या तरी नशीबवान खात्याच्या त्या भावी मुख्य प्रिफेक्टला योग्य त्या आदराने निरोप देत होता. तेवढ्यात ज्युलिआँच्या जीवनक्रमाची माहिती करून घेण्याची आणि जेथे हितसंबंध गुंतले होते तेथे त्याच्या नेमस्तपणाची प्रशंसा करण्याची मोजिराँ यांना लहर आली. शेवटी तर अतिशय पितृवत वात्सल्याने त्यांनी ज्युलिआँला आपल्या बाहूत घेतले आणि त्याने रेनॉल यांना सोडून देऊन, त्यांच्या मुलांना शिकवावयाचे आहे अशा एका अधिकाऱ्याच्या घरी जावे असे सुचविले. राजे फिलिप यांच्याप्रमाणे तो अधिकारी, आपल्याला मुले दिल्याबद्दल परमेश्वराचे आभार मानण्यापेक्षाही, मंन्स्यूर ज्युलिआँ यांच्या नजिकच्या परिसरात त्यांना जन्म लाभल्याबद्दल देवाचा अधिक ऋणी राहील असा होता.

त्याच्या मुलाच्या शिक्षकाला तो आठशे फ्रँक पगार देणार होता; तसेच महिन्याच्या महिन्याला दिला न जाता तिमाहीचा पगार आगाऊ दिला जाणार होता; कारण पगार महिन्याच्या महिन्याला देणे तेवढे मानाचे मानले जात नाही असे मोजिरॉंनी पुढे सांगितले.

आता ज्युलिआँची बोलण्याची पाळी होती. बोलण्यास मिळण्याच्या संधीची वाट अधीरतेने तो सुमारे दीड तास पाहात होता. त्याचे उत्तर अगदी आदर्श होते आणि विस्तारात एखाद्या पाद्र्याच्या प्रवचनासारखे होते. त्याच्या बोलण्यातून एका बाजूने सर्व आशय सुचवला जात होता तर दुसऱ्या बाजूने त्याच वेळी त्यातून निश्चित असेही काही सांगितले जात नव्हते. कोणाही श्रोत्याला त्याच्या बोलण्यात एकाच वेळी एम्. द रेनॉल यांच्याविषयी आदर, व्हेरिएरच्या लोकांविषयी अत्यादर आणि त्या सुविख्यात सब-प्रिफेक्टविषयी कृतज्ञता आढळली असती. स्वतःपेक्षाही जास्त कुशल असा जेझुइट (मोघम बोलून बुचकळ्यात टाकणारा) पाहून सब-प्रिफेक्ट चकित झाले. त्यांनी ज्युलिआँकडून निश्चित असे काही काढून घेण्याचा प्रयत्न केला. पण तो व्यर्थ ठरला. तथापि त्या प्रयत्नाने ज्युलिआँला अत्यानंद झाला होता. स्वतःचे कौशल्य पारखण्यासाठी त्याने त्या संधीचा उपयोग करून घेतला व आपले उत्तर तो वेगळ्या शब्दांत पुन्हा एकवार देऊ लागला. एखाद्या महामंडळाच्या बैठकीचे शेवटचे तास उरले असावेत; बैठक जरा सावरून बसून लक्ष देण्याच्या बेतात आली असावी; मग एखाद्या पदाधिकाऱ्याने त्या शेवटच्या तासात सभेचा कबजा घ्यावा; तेव्हा तो जसा आपल्या अत्यंत वक्तृत्वपूर्ण भाषणात शब्दांच्या जंजाळातून उगीच थोडा आशय व्यक्त करतो तसे या वेळी ज्युलिआँने केले व त्या वक्त्यावरही ताण केली.

मोजिरॉं तेथून जाताच ज्युलिआँला हसताहसता पुरेवाट झाली. आपल्या बुद्धीच्या जेझुइट कसबाचा शक्य तेवढा उपयोग करून घेण्यासाठी त्याने मग रेनॉल यांना नऊ पानांचे एक पत्र लिहिले. मोजिरॉं त्याच्याजवळ जे बोलले होते ते सगळे त्याने मग रेनॉल यांना कळवून त्यांचा सल्ला विनम्रपणे मागितला. त्याने स्वतःला म्हटले, "अरेच्या! जो मनुष्य मला नोकरी देऊ करीत आहे, त्याचे नावसुद्धा सांगितले नाही त्या बदमाषाने मला! पण म. वालनोच असणार ते. त्यांच्या निनावी पत्राचा परिणाम म्हणजे माझी व्हेरिएरमध्ये झालेली हकालपट्टी असे त्यांना वाटत असावे.

ते भले मोठे पत्र पाठवून दिल्यावर ज्युलिआँ म. शॅलॉं यांचा सल्ला घेण्यासाठी गेला. तेव्हा शरद ऋतूतल्या एखाद्या छानदार सकाळी सहा वाजता, भरपूर शिकार हाती लागणार असे वाटणाऱ्या शिकाऱ्याइतका तो आनंदित होता. पण त्या भल्या पाद्र्याच्या घरी पोहोचण्यापूर्वीच म. वालनो यांच्या पुढ्यात परमेश्वराने त्याला फेकले. जणू त्याच्यावर आपल्या कृपेचा वर्षाव करण्यास परमेश्वर उत्सुक होता. आपले अंतःकरण द्विधा झाले आहे हे सत्य ज्युलिआँने वालनोपासून लपवून ठेवले नाही. परमेश्वराने ज्या व्यवसायाची प्रेरणा त्याच्या अंतःकरणात रुजविली होती त्याच व्यवसायाला त्याच्यासारखा कफल्लक तरुण स्वतःला पूर्णपणे वाहून घेण्यास बांधलेला होता. पण ह्या अधम जगात पवित्र व्यवसाय म्हणजेच काही सर्वस्व नव्हते. परमेश्वराच्या द्राक्षाच्या मळ्यात एक लायक श्रमिक होण्यासाठी आणि आपल्या विद्वान अशा सर्व सहकारी कामगारांच्या तुलनेने आपण अगदीच काही कमी नाही हे दाखविण्यासाठी माणसाला शिक्षणाची गरज असते. त्यासाठी बेझॉंसाच्या उच्च धार्मिक पाठशाळेत, फार मोठ्या खर्चाची दोन वर्षे काढणे आवश्यक होते. ही एक अपरिहार्य गोष्ट होती; आणि म्हणून पैशाची बचत करणे हे एका अर्थाने एक कर्तव्यच ठरते असेही म्हणता येईल. दर तिमाहीला मिळणाऱ्या आठशे फ्रँक्स मासिक पगारातून, पूर्वीच्या झटकन उडून जाणाऱ्या दर महिन्याच्या सहाशे फ्रँक्सपेक्षा, बचत करणे खूपच सोपे होते. उलटपक्षी रेनॉल यांच्या मुलांच्या सहवासात त्याला पाठवून आणि त्याहीपेक्षा जास्त म्हणजे त्याच्या मनात त्याच्याविषयी एक विशेषच लागणी निर्माण

करून परमेश्वराने त्याला हेच सूचित केले नव्हते काय की या स्वरूपाचे शिक्षण सोडून दुसऱ्याच्या मागे धावणे हे चुकीचे ठरेल?

अशा प्रकारच्या वक्तृत्व-कौशल्यात ज्युलिआँ पूर्णत्वाच्या अशा सीमेवर येऊन पोहोचला की शेवटी स्वतःच्याच आवाजाला तो कंटाळला. आता अशा वक्तृत्वाने नेपोलियनच्या साम्राज्यातल्या तडफदार कृतीची जागा घेतली आहे.

घरी परतल्यावर त्याला वालनो यांचा नोकर आढळला. तो संपूर्ण गणवेषात होता. ज्युलिआँच्या शोधात तो साऱ्या शहरभर हिंडला होता आणि त्याच दिवशी ज्युलिआँला भोजनास बोलाविले असल्याचे निमंत्रणपत्र त्याच्याजवळ होते.

या माणसाच्या घरात ज्युलिआँने त्यापूर्वी कधी पाऊल टाकले नव्हते. ह्या माणसाला भरपूर चोप कसा देता येईल आणि नंतरची पोलिस कारवाई कशी टाळता येईल याचे विचार त्याच्या मनात प्रामुख्याने थोड्या दिवसांपूर्वीच घोळत होते. भोजनाला सुरुवात जरी एक वाजण्यापूर्वी होणार नव्हती तरी अनाथाश्रमाच्या गर्व्हनरांच्या अभ्यासिकेत साडेबारा वाजता आपण हजर व्हावे हे आदर दाखविण्याच्या दृष्टीने युक्त असे त्याला वाटले. तो पोहोचला तेव्हा वालनो कागदपत्रांच्या ढिगाऱ्यात गढून गेले होते. स्वतःचे महत्त्व दाखविण्याचा त्यांचा त्यात उद्देश असावा. त्यांचे मोठे थोरले काळे कल्ले, त्यांच्या डोक्यावरील भरघोस केस, डोक्याच्या अगदी वरती तिरपी ठेवलेली रात्रीची टोपी, तोंडातली ती भलीमोठी चिलीम, त्यांचे नक्षीदार चढाव, छातीवर लटकणाऱ्या जडशा, अनेक उभ्या-आडव्या सोनेरी साखळ्या आणि त्या प्रांतातील स्त्रियांना भुरळ घालणारा (निदान आपण तसे आहोत असे मानणारा) एक भांडवलदार या नात्याने आवश्यक असलेली सर्व साधनसामुग्री पाहूनसुद्धा ज्युलिआँवर त्याचा यत्किंचितही परिणाम झाला नाही. उलट त्याच्या मनात, आपण त्याला चोप देणे किती निकडीचे आहे याचा विचार जास्त जोर करू लागला.

मादाम वालनो यांच्याशी भेट होण्याचा मान आपल्याला मिळावा अशी उत्कट इच्छा ज्युलिआँच्या मनात होती. पण त्यांचे स्वतःचे प्रसाधन चालू होते व त्यामुळे त्या ज्युलिआँला भेटू शकल्या नाहीत. त्याऐवजी त्याला अनाथाश्रमाच्या गव्हर्नरचा जामानिमा पाहण्याचा खास हक्क प्राप्त झाला. मग ते दोघेजण मा. वालनो यांच्याकडे गेले. त्यांनी ज्युलिआँला त्यांच्या मुलांचा परिचय करून दिला; तेव्हा त्यांच्या डोळ्यात आश्रू होते. मा. वालनो ही व्हेरिएरमधील एक अतिशय महत्त्वाची व्यक्ती होती. त्यांचा फताडा चेहेरा पुरुषी होता. आताच्या मोठ्या समारंभासाठी त्यांनी त्यांच्या चेहेऱ्याला लाल पावडरीचा गिलावा केला होता. मातृत्वाच्या भावनांचे सर्व कारुण्य त्या व्यक्त करीत होत्या.

ज्युलिआँच्या मनात मा. रेनॉल यांच्याविषयीचे विचार आले. त्याचा संशयी स्वभाव त्याला कोणत्याही स्मृतीबाबत क्वचितच संवेदनक्षम करीत असे. ह्याला अपवाद फक्त विरोधाने जाणवणाऱ्या स्मृतींचा. पण तशा स्मृती मात्र त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे करीत. गव्हर्नरच्या घरात त्याने जे काय पाहिले त्यामुळे त्याची प्रवृत्ती एकदम प्रभावी झाली. हिंडवून त्याला घर दाखविण्यात आले. घरातील प्रत्येक चीजवस्तू नवी, भारी किंमतीची व थाटाची दिसली. प्रत्येक वस्तूची किंमत त्याला सांगण्यात आली. पण सगळीकडे काही तरी हीन मनोवृत्तीचे, चोरट्या पैशांनी कलंकित असे आहे असे ज्युलिआँला वाटले. प्रत्येकजण, घरातील नोकरसुद्धा एक प्रकारचा मुर्दाडपणा दाखवीत होते; जणू काही संभाव्य तिरस्काराविरुद्ध स्वतःसाठी ते संरक्षणार्थ कवच निर्माण करीत होते.

कर जमा करणारा अधिकारी, जकातीचा अधिकारी, मुख्य हवालदार आणि आणखी दोन तीन सरकारी अधिकारी आपल्या बायकांसह आले. त्यांच्यानंतर लिबरल पक्षाचे कित्येक श्रीमंत सभासद आले. भोजनाची घोषणा करण्यात आली. ज्युलिआँची मनःस्थिती आधीच अत्यंत अप्रसन्न झालेली होती. त्यातून त्याला एकदम असे वाटले की भोजनगृहाच्या भिंतींच्या पलीकडे असलेल्या हतभागी कैद्यांच्या रोजच्या जेवणात काटछाट करून, वाचलेल्या पैशातून यजमानांनी आता त्याला जो डोळे दिपविणारा, पण हीन अभिरुचीचा झगझगाट दाखविण्यात येत आहे त्याची खरेजी केली असावी.

"कदाचित या क्षणी ते भुकेलेले असतील!" ज्युलिआँ स्वतःशी बोलू लागला, त्याचा घसा आक्रसला; त्याला काही खाता येईना की बोलवेनासुद्धा. नंतरची पंधरा मिनिटे तर परिस्थिती जास्तच वाईट झाली. दुरून एका लोकप्रिय गाण्याचे काही तुटक भाग भोजनभाऊंच्या कानांवर पडले. आता हे कबूल केले पाहिजे की गाणे काही सदभिरुचीपूर्ण नव्हते. अनाथाश्रमाचाच कोणी एखादा रहिवासी ते गात होता. गणवेषातील आपल्या एका नोकराकडे म. वालनो यांनी कटाक्ष टाकका. त्यावर तो सेवक खोलीतून बाहेर गेला आणि लगेच गाण्याचा आवाज बंद झाला. त्याच क्षणी एका सेवकाने ज्युलिआँला ऱ्हाइन मद्याचा हिरवा चषक दिला. ह्या मद्याच्या एका बाटलीला, ती थेट उत्पादकाकडूनच आणल्यास नऊ फ्रॅन्क पडतात अशी माहिती वालनोंनी ज्युलिआँला काळजीपूर्वक पुरविली! हातात तो चषक तसाच धरीत ज्युलिआँ त्यांना म्हणाला, "ते भयंकर गाणे आता मला ऐकू येत नाही." यावर गव्हर्नर विजयी भावनेने उत्तरले, "तर! नाहीच ऐकू येणार! त्या बदमाशाचं तोंड मी बंद केलं आहे."

आता हे अगदी अती झाले, ज्युलिआँच्या सहनशक्तीच्या पलीकडे गेले. त्याने शिष्टाचार आत्मसात केले होते, पण त्याच्या त्या स्थानाला पाहिजे तसे अंतःकरण मात्र तो अजून तयार करू शकला नव्हता. ढोंगीपणाने वागण्याचा सराव तो नेहमी करीत आला होता; पण तरीही त्याच्या गालांवरून मोठा अश्रूचा थेंब ओघळल्याचे त्याला कळून आले.

मद्याच्या त्या हिरव्या चषकाआड त्याने अश्रू लपविण्याचा प्रयत्न केला. पण ऱ्हाईन मद्याचा सन्मान करणे त्याला अशक्य झाले. तो स्वतःशी पुटपुटला, "माणसाचं गाणं बंद करून टाकलं! हे परमेश्वरा, तू हे कसं चालू देतोस?"

त्याच्या सुदैवाने त्याची ती अशिष्ट भावना कोणाच्या लक्षात आली नव्हती. कर गोळा करणाऱ्या अधिकाऱ्याने एक राजसत्तावादी गाणे सुरू केले होते. सामुदायिकपणे त्याचे ध्रुपद गाण्याच्या गलक्यात ज्युलिआँच्या सदसद्विवेक बुद्धीने त्याला ताकीद दिली,— "तू कमाविणार आहेस ते वैभव असं घाणेरडं आहे. ते तू अशाच परिस्थितीत व अशाच मंडळींच्या संगतीत उपभोगू शकतील. तुला कदाचित वीस हजार फ्रॅंक्स मुशाहिऱ्याची जागा मिळेल. पण जेव्हा अधाशीपमे खाऊन तू संपूर्णतः तृप्त होशील तेव्हा तू गरीब कैद्याला गाणे बंद करायला लावशील. तू ज्या मेजवान्या देशील त्यांच्यासाठी लागणारा पैसा कैद्याला मिळणाऱ्या अल्पस्वल्प पैशातून थोडाथोडा चोरून गोळा केलेला असेल आणि तुझ्या भोजनप्रसंगी तो जास्तच दुःखी होईल. नेपोलिआँ! तुमच्या काळात लढाईच्या धोक्यातून नशीब काढणे, उत्कर्षाप्रत जाणे किती संतोषकारक होते! पण स्वतःची तुंबडी भरण्यासाठी दुर्दैवी जीवांच्या क्लेशयातना वाढविणे किती हलकटपणाचे आहे!"

ह्या स्वगतातून ज्युलिआँ स्वतःचा जो कमकुवतपणा व्यक्त करतो त्यामुळे त्याच्याविषयीचे माझे मत वाईट झाले आहे हे मी मान्य करतो. मोठ्या देशातील जीवनाच्या सर्व अवस्था सुधारण्यासाठी जे लोक फक्त बोलघेवडेपणा करतात आणि त्यासाठी स्वतः थोडीशीही घस, गैरसोय सोसण्याची पाळी येताच ज्यांना धडकी भरते अशा पिवळ्या हातमोजातील कटवाल्यांचा, ज्युलिआँ सन्माननीय सहकारी होऊ शकेल.

ज्युलिआँला त्याच्या योग्य भूमिकेचे स्मरण तडकाफडकी देण्यात आले. एवढ्या थोर लोकांच्या पंक्तीला त्याला भोजनासाठी बोलावण्यात आले होते ते काही त्याने स्वप्नरंजनात गुंग होऊन, तोंड मिटून बसावे म्हणून नव्हे.

पूर्वी कापडावर छपाई करणारा आणि बेझाँसाच्या व उझेसच्या अकादमीचा सभासद असलेला एक गृहस्थ जेवणाच्या मेजाच्या दुसऱ्या टोकाकडून, न्यू टेस्टॅमेंटच्या अभ्यासात ज्युलिआँने आश्चर्यकारक कौशल्य संपादन केले असल्याचे जे सर्वसाधारण बोलले जाते ते खरे आहे काय, याची चौकशी ज्युलिआँजवळ करीत होता.

त्या क्षणी एकदम गंभीर शांतता पसरली. दोन अकादम्यांचा सभासद असलेल्या त्या विद्वानाच्या हातांत, जणू काही जादूनेच म्हणा, नव्या कराराचे पुस्तक दिसले. ज्युलिआँने होकारार्थी उत्तर दिल्यावर, लॅटिनमधील काही शब्द त्या पुस्तकातून त्याला मधूनच वाचून दाखविण्यात आले. लगेच ज्युलिआँ त्यांचा संबंधित मजकूर पाठ म्हणून दाखवू लागला. त्याच्या स्मरणशक्तीने त्याला दगा दिला नाही आणि भोजनाच्या अखेरीस अंगी संचरणाऱ्या बडबड्या उत्साहाने ह्या अद्‌भुत, लोकविलक्षण विद्वानाच्या प्रशंसेमुळे एकच गडबड तेथे उडाली. उपस्थित महिलांचे आनंदाने उजळलेले चेहेरे ज्युलिआँने लक्षपूर्वक न्याहाळले. त्यांच्यापैकी कित्येक जणी दिसायला काही वाईट नव्हत्या. जिने एक गाणे उत्तम रीतीने म्हटले होते ती कलेक्टरची पत्नी ज्युलिआँने बरोबर ओळखली.

तिच्याकडे पाहात तो म्हणाला, "इतका वेळ ह्या महिलांच्या पुढे लॅटिनमध्ये बोलत राहण्याची मला खरोखरी लाज वाटते. जर म. रुबिग्नो (हेच गृहस्थ त्या दोन अकादम्यांचे सभासद होते.) ह्या नव्या करारातील एखादे लॅटिन वाक्य कृपया वाचतील तर मी त्याचे भाषांतर लगोलग करून सांगेन. नुसती लॅटिन संहिता पाठ म्हणून दाखविण्यापेक्षा ते जास्त मनोरंजक ठरेल."

ह्या दुसऱ्या परिक्षेत ज्युलिआँ एवढ्या उत्तम रीतीने उत्तीर्ण झाला की, त्याच्या कर्तृत्वावर गौरवाचा मुकुटच ठेवला गेला.

त्या खोलीत लिबरल पक्षाचे अनेक सधन गृहस्थ होते. पण शाळेत शिष्यवृत्ती मिळविण्यास लायक असलेल्या मुलांचे सुखी बाप या नात्याने अखेरच्या मिशननंतर त्यांच्यात अचानक मतपरिवर्तन झाले होते. पण धोरणीपणाच्या या चाणाक्ष डावानंतरही एम. द रेनॉल यांनी त्यांना आपल्या घरी बोलाविण्याची तयारी कधीच दर्शविली नव्हती. ह्या सन्माननीय लोकांना ज्युलिआँची माहिती फक्त त्याच्या नावलौकिकामुळे आणि त्या... राजाच्या भेटीच्या प्रसंगी त्यांनी त्याला घोडेस्वार म्हणून पाहिले होते म्हणून झालेली होती. आता सर्वांपेक्षा जास्त उच्च रवाने ते त्याची प्रशंसा करीत होते. 'जी त्यांना मुळीच कळत नाही अशी ही बायबलातली भाषा ऐकण्याचा कंटाळा ह्या मूर्खांना केव्हा येईल?' असे ज्युलिआँने स्वतःला विचारले. पण उलट त्या

अनुक्रमणिका

भाषेच्या अपरिचितपणामुळे त्यांची करमणूक होत होती. ते चमत्कारिक उच्चारांना हसत होते. पण ज्यलिआँला आता ह्याचा कंटाळा आला होता.

सहाचे ठोके पडले तसा तो गंभीरपणे उठला आणि लिगौरीच्या नव्या धर्मशास्त्राचे एक प्रकरण आपल्याला पाठ करावयास हवे आहे असा त्याने उल्लेख केला. ते त्याला दुसऱ्या दिवशी म. शॅलाँ यांना म्हणून दाखवावयाचे होते. तो मजेने पुढे म्हणाला, “ते पाठ दुसऱ्या लोकांच्याकडून म्हणवून घ्यायचे आणि आपणही पाठ म्हणायचे हेच तर आपले काम.”

त्याचे श्रोते मनापासून हसले आणि त्यांनी तारीफ केली. अशा स्वरूपाचा विनोद केला गेला, तर व्हेरिएरमध्ये त्याचे स्वागत होत असे. ज्युलिआँ आता उभा राहिला; सर्वही उठून उभे राहिले. शिष्टाचाराला त्यांनी मुरड घातली. बुद्धिमत्तेचा प्रभाव हा असा असतो. मा. वालनो यांनी ज्युलिआँला आणखी पंधरा-वीस मिनिटे थांबवून घेतले. त्यांच्या मुलांनी प्रश्नोत्तररूपाने पाठ केलेले धर्मविषयक ज्ञान ज्युलिआँला ऐकवावेसे त्यांना वाटले. पण मुलांनी ते म्हणताना त्यात अतिशय हास्यास्पद चुका केल्या. त्या फक्त ज्युलिआँलाच कळू शकल्या. तथापि त्या दुरुस्त करून सांगण्याच्या भानगडीत तो पडला नाही.” प्राथमिक धार्मिक तत्त्वांचं केवढं हे अज्ञान!” असे त्याला वाटले. अखेर त्याने निरोप घेतला. आता आपण त्यांच्यापासून निसटू शकू असे त्याला वाटले. पण ती मुले आता फॉन्टेनच्या नीतिकथांपैकी एक कथा त्याला सांगू लागली.

ज्युलिआँ मा. वालनोना म्हणाला, “तो लेखक अतिशय अनीतीचे लिहितो. जे सर्व फार आदरणीय आहे त्याची भरपेट कुचेष्टा करण्याचे धारिष्ट त्याने ‘मेसिर जीन चौआर्त’ ह्या शीर्षकाच्या त्याच्या एका कथेत केले आहे. नाणावलेल्या टीकाकारांनी त्याची त्याबद्दल जोरदार खरडपट्टी काढली आहे.”

तेथून निघण्यापूर्वी ज्युलिआँला भोजनाची चार-पाच निमंत्रणे मिळाली. “हा तरुण मनुष्य आपल्या धर्मशाखेला भूषण आहे.” असे तेथे जमलेले सर्वजण आनंदाने एकदम उद्गारले; एवढेच नव्हे तर ते इतके पुढे गेले की ज्युलिआँला पॅरिस येथे अभ्यास चालू ठेवता येण्यासाठी नगरपालिकेच्या निधीतून त्याला पेन्शन दिले जावे अशीही सूचना त्यांनी केली.

याप्रमाणे त्या उतावीळ विचाराचा गाजावाजा भोजनगृहात चालू असता ज्युलिआँ चूपचाप पडवीपर्यंत पोहोचला, होता. बाहेरच्या मोकळ्या हवेने छाती भरून घेण्याचे सुख अनुभवीत तो तीनचारदा पुटपुटला, “काय हे कनिष्ठ दर्जाचे कुचकामी लोक!”

रेनॉल यांच्या घरी त्याला जी स्तुतिसुमने वाहिली जात असत, त्यांच्यामागे तुच्छतापूर्ण स्मित व आत्मश्रेष्ठतेचा गर्व डोकावतो असे त्याला वाटे. कित्येक दिवस ह्या गोष्टीचा त्याच्या मनाला धक्का बसलेला होता. पण त्याला या क्षणी मात्र आपण एक अस्सल उमराव झालो आहो असे वाटले. या दोन्ही घरांत त्याला दिल्या गेलेल्या वागणुकीतील प्रचंड फरक जाणवल्याशिवाय राहिला नाही. तेथून निघून जाताना तो स्वतःशी म्हणाला, “गरीब कैद्यांना मिळणारा पैसा चोरला जात आहे आणि त्यांना साधे गाणे म्हणण्याची देखील मुभा नाही हे जरी आपण एक वेळ विसरलो तरी आपण आपल्या पाहुण्यांना जे मद्य देत आहोत त्याच्या प्रत्येक बाटलीची किंमत त्यांना सांगावी असा विचार रेनॉल यांच्या डोक्यात कधी तरी येईल का? आणि स्वतःच्या संपत्तीच्या यादीचा वारंवार उल्लेख करणारा हा म. वालनो स्वतःचे घर, स्वतःची पत्नी येथे असताना, ‘तुझे घर, तुझी जमीन’ असा करीत असतो!”

ती महिलाही मालकी हक्काच्या आनंदाची जाणीव बाळगून आहे असे दिसले. तिने नुकताच एक तिरस्करणीय प्रसंग निर्माण केला होता. भोजनाच्या वेळी एका नोकराच्या हातून मद्याचा एक प्याला फुटला. त्यामुळे तिच्या संचात बिघाड झाल्याबद्दल ती नोकराला रागे भरली. तेव्हा त्यानेही अतिशय उर्मटपणे जबाब दिला.

ज्युलिआँला वाटले, "काय पण घर आहे! चोरून जमा केलेल्या एकूण पैशाचा अर्धा वाटा जरी त्यांनी मला दिला तरी मी त्यांच्यात राहायला कधीच जाणार नाही. एखाद्या चांगल्या दिवशी नक्कीच माझा संयम सुटेल व माझे मूळ स्वरूप प्रकट होईल. त्यांनी माझ्या मनात निर्माण केलेला तिरस्कार मला आवरून धरता येणार नाही."

तथापि मा. रेनॉल यांचे हुकूम पाळणे त्याला भाग असल्यामुळे तशा स्वरूपाच्या कित्येक भोजन-प्रसंगांना त्याला हजर राहावे लागले. ज्युलिआँची उपस्थिती ही त्या वेळी एक टूमच होऊन बसली. त्याचा गणवेश व गार्ड ऑफ ऑनरमधील त्याचा समावेश याबद्दल लोकांनी त्याला माफी केली; किंबहुना त्याचे त्या वेळचे ते अविचारी प्रदर्शन हेच त्याच्या यशाचे खरे कारण ठरले. नंतर लवकरच व्हेरिएरमध्ये फक्त एका विशिष्ट प्रश्नाची चर्चा चालू राहिली. ह्या विद्वान तरुणाला नोकरीस ठेवण्याच्या स्पर्धेत यशस्वी कोण ठरेल? एम. द रेनॉल की, अनाथाश्रमाचे गव्हर्नर? ह्या दोन सभ्य गृहस्थांनी म. मासलाँ यांच्यासह एक सत्ताधारी त्रिकूटच बनविले होते. कित्येक वर्षे त्यांनी गावावर जुलमी सत्ता प्रस्थापित केली होती. लोक महापौरांचा सत्कार करू लागले होते. त्याच्याविरुद्ध तक्रार करण्यास लिबरलांना सबळ कारणे मिळाली होती. पण रेनॉल अखेर उच्च कुलीन होते. उच्च पद भूषविण्यासाठी त्यांचा जन्म झालेला होता. याच्या उलट वालनोच्या वडिलांनी स्वतःच्या मागे मुलासाठी सहाशे लिव्हर उत्पन्नाची काही व्यवस्था केलेली नव्हती. दयनीय अवस्थेत त्यांना प्रारंभी दिवस कंठावे लागत होते. त्यांच्या तरुणपणी त्यांना एक मळकट, हिरवट सफरचंदी रंगाचा कोट वापरण्याची शोचनीय पाळी आलेली होती; ही गोष्ट प्रत्येकाला आठवतही होती; आणि अशा अवस्थेपासून त्यांनी नॉर्मन घोडे ठेवण्यापर्यंत, सोन्याच्या साखळ्या वापरण्यापर्यंत, पॅरिसहून कपडे मागविण्यापर्यंत स्वतःची प्रगती केली होती. थोडक्यात, त्यांच्या ह्या अलिकडच्या भरभराटीबद्दल लोक त्यांचा हेवा करू लागले होते. लोकांकडून कीव करून घेण्यापासून आता लोकांच्या हेव्यापर्यंत त्यांनी मजल गाठली होती.

जगातला हा असा गडबड-घोटाळा ज्यलिआँला नवखा, अपरिचित होता. पण त्यातून आपण एक प्रामाणिक माणूस शोधून काढला आहे असे त्याला वाटले. हा माणूस भूमितितज्ज्ञ होता; त्याचे नाव ग्रॉस, तो एक जॅकोबिन असल्याचे समजले जात होते. एखादी गोष्ट खोटी आहे असे स्वतःला वाटल्यास, फक्त तेवढाच अपवाद करून, बाकी काहीच, कधीही बोलावयाचे नाही अशी शपथ ज्यलिआँने घेतली होती. त्यामुळे त्याला म. ग्रॉस यांच्याबद्दल संशय वाटतो असे दाखविणे भाग पडले होते. वेर्जीहून पाठविण्यात आलेली मुलांच्या पाठांच्या अभ्यासाची मोठीमोठी पुडकी त्याला मिळाली होती. त्याच्या वडिलांकडे वरचेवर जाण्याचा सल्ला त्याला देण्यात आला होता. त्याप्रमाणे त्याने ते आवश्यक दुःखद कर्तव्य पार पाडले होते. एका शब्दात, तो आपली प्रतिष्ठा परत मिळवीत होता आणि अशा वेळी, एका सकाळी , तो फार आश्चर्यचकित झाला. त्याला जाग आली ती त्याच्या डोळ्यांवर ठेवल्या गेलेल्या दोन हातांमुळे!

अनुक्रमणिका

ते हात मा. रेनॉल यांचे होते. त्या तेथे शहरात आल्या होत्या. जिन्यातील चारचार पायऱ्या एकदम ओलांडून, पळतच त्या वर गेल्या; मुलांना त्यांनी आपल्या बरोबर आणलेल्या आवडत्या सशाशी खेळत मागे ठेवून त्या ज्युलिआँच्या खोलीत मुद्दाम मुलांच्या आधी एक क्षण पोहोचल्या. तो क्षण मोठा मधूर, पण फारच अपुरा होता. ससा घेऊन मुले नंतर ज्युलिआँच्या खोलीत आली, त्यापूर्वीच तेथून त्या नाहीशा झाल्या होत्या. मुले तो ससा त्यांच्या मित्राला दाखविणार होती. ज्युलिआँने त्या सर्वांचे, त्या सशासह स्वागत केले. पुन्हा एकवार पूर्वीप्रमाणे ज्युलिआँ त्या कुटुंबाचा घटक बनल्याचे दृश्य दिसले. मुलांवर आपले प्रेम असून त्यांच्या वटवटीत सामील होण्याने आपली करमणूक होते असे त्याला प्रतीत झाले. मुलांच्या आवाजातील गोडवा आणि त्यांच्या वागण्यातील सरळपणा व खानदानीपणा यांनी त्याला विस्मयचकित केले. व्हेरिएर येथील वातावरणात त्याला ज्याचा संपर्क होत होता त्या सगळ्या ग्राम्य वागणुकीपासून व सर्व अप्रिय विचारांपासून त्याला त्याची कल्पनाशक्ती साफ धुऊन काढावयाची होती. तेथे दिवाळखोरीची धास्ती होती. कारण श्रीमंती आणि दारिद्र्य यांचा लढा, वर्चस्व मिळविण्यासाठी एकमेकांविरुद्ध सारखा चालू होता. ज्युलिआँला ज्या माणसांबरोबर भोजनाचे प्रसंग आले होते ती मंडळी, पानात वाढलेल्या मासखंडाबद्दल बोलताना स्वतःला कमीपणा व ऐकणाराला किळस आणणारी हितगुजे करीत असत.

ज्युलिआँ मा. रेनॉलना म्हणाला, “तुम्ही बडी अमीरउमराव मंडळी; तुम्हाला आपल्याबद्दल अभिमान वाटणं अगदी सकारण व योग्य आहे.” आणि जेवढ्या भोजनांना त्याला हजर राहावे लागले होते त्यांची सारी हकीगत त्याने मादामना सांगितली. तेव्हा त्यावर त्या म्हणाल्या, “असं का? म्हणजे तुमची उपस्थिती ही आता एक टूमच झालेली आहे म्हणायची.”

आणि जेव्हा जेव्हा ज्युलिआँ यावयाचा असे तेव्हा तेव्हा मा. वालनो यांना गालांवर लाल रंग लावण्याची गरज भासे ह्या गोष्टीला त्या मनापासून हसल्या व ज्युलिआँला म्हणाल्या, “मला वाटतं, तुमचं हृदय जिंकण्याचा त्यांचा मनसुबा दिसतोय!”

दुपारचे भोजन मोठे आनंदकारक ठरले. मुलांची उपस्थिती ही जरी बाह्यतः उपद्रवकारक होती तरी खरे म्हणजे त्यांच्यामुळे एकंदरीने मजा वाढली. ज्युलिआँची भेट पुन्हा झाल्याबद्दलचा आपला आनंद कसा व्यक्त करावा ते त्या बिचाऱ्या पोरांना समजेना. वालनो यांच्या मुलांना शिकवून पुढे आणण्यासाठी, ज्युलिआँला जादा दोनशे फ्रँक्स देऊ करण्यात आल्याची बातमी त्यांच्या कानावर घालण्यास तिथले नोकर चुकले नव्हते.

स्टॅनिस्लास त्याच्या त्या गंभीर आजारानंतर अजून अशक्त, निस्तेज दिसत होता. जेवणाच्या मध्येच त्याने त्याच्या हातातील चांदीचा चमचा, काटा व तो पाणी पीत होता ते भांडे यांची किंमत काय असेल असा प्रश्न एकदम आपल्या आईला विचारला. “कशासाठी तुला ती माहिती हवी आहे?”

“ते विकून येणारे पैसे मी मंस्यूर ज्युलिआँ यांना देणार आहे; म्हणजे ते आपल्याकडे राहण्याने मामा (‘ड्यूप’) होणार नाहीत.” हे ऐकून ज्युलिआँच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. त्याने त्याला आवेगाने कवटाळले. त्याच्या आईच्या डोळ्यांतून तर उघड उघड घळघळा अश्रुधारा वाहिल्या. तेवढ्यात ज्युलिआँने स्टॅनिस्लासला आपल्या मांडीवर घेतले, आणि त्याने केलेला तो शब्दप्रयोग करू नये, कारण त्या अर्थाने तो वापरल्यास ते नोकरासारखे बोलणे होते असे त्याला समजावून सांगितले. आपल्या बोलण्याने मा. रेनॉलना

फार बरे वाटत आहे असे पाहून ज्युलिआँने त्यांचे ते सांगणे गमतीदार उदाहरणे देऊन विशद केले. तेव्हा ‘ड्यूप’ (मामा) शब्दाचा अर्थ काय होतो ते ध्यानी आल्यामुळे मुलांची खूपच करमणूक झाली.

स्टॅनिस्लास म्हणाला, “मला समजलं आता. तो कावळा ‘मूर्ख’ असतो, त्याच्या चोचीतला खवा खाली पडतो अन् स्तुती करणारा कोल्हा तो उचलतो. म्हणजे कावळा ‘मामा’ झाला.

मा. रेनॉल आनंदाने नुसत्या बेहोष झाल्या होत्या. मुलांचे श्वास गुदमरतील एवढे त्यांचे मुके त्यांनी घेतले आणि ज्युलिआँच्या बाजूला थोडेसे कलल्याशिवाय ते करणे त्यांना सहसा शक्य झाले नाही.

तितक्यात दार एकदम उघडले गेले. दारात रेनॉल होते. त्यांचा रागीट, करारी चेहेरा तेथील निष्पाप आनंदाशी विरोधी होता. स्वतःच्या आगमनाने त्यांनी तो तेथून घालवून टाकला. मा. रेनॉल फिक्या पडल्या. कोणतीही गोष्ट नाकारण्यास आपण असमर्थ आहोत असे त्यांना वाटले. त्या संधीचा फायदा घेऊन ज्युलिआँने महापौरांना स्टॅनिस्लासचा, चांदीचे भांडे विकण्याचा किस्सा सांगण्यास मोठ्या आवाजात सुरुवात केली. ती कथी सांगण्याने कोणताही अनुकूल परिणाम होणार नाही अशी त्याची खात्री होती. पहिल्याच शब्दाबरोबर व चांदीचे नाव निघताच सवयीप्रमाणे रेनॉल यांची भृकुटी वक्र झाली. ते म्हणत असत,

“चांदीचा उल्लेख हे नेहमी माझ्या खिशावरील आक्रमणाचे सूतोवाच असते.”

पण येथे पैशापेक्षा जास्त काही तरी इरेस पडले होते. त्यांचे शंका—संशय वाढले होते. त्यांच्या गैरहजेरीत त्यांच्या कुटुंबियांना एक प्रकारच्या सुखी वातावरणाने आनंदोत्साही बनविले होते ही गोष्ट अत्यंत संवेदनक्षम अहंकाराच्या त्या माणसाला जास्तच बिथरून टाकणारी होती. ज्युलिआँने आपल्या विद्यार्थ्यांना ज्या खुबीदार व विनोदपूर्ण पद्धतीने नवे विचार सांगितले त्याची प्रशंसा त्यांच्या पत्नीने त्यांच्याजवळ केली तेव्हा रेनॉल म्हणाले, “होय होय, मला माहीत आहे की, तो माझ्याविषयी माझ्या मुलांच्या मनात तिटकारा निर्माण करीत आहे. कारण काही झालं तरी मी पडलो कुटुंबप्रमुख. माझ्यापेक्षा मुलांशी शंभरपट गोडीने वागणे त्याला सोपे जाते. अलीकडे प्रत्येक गोष्टीचा कल कायदेशीर अधिकाराबद्दल तिरस्कार उत्पन्न करण्याकडे झुकत आहे. दुर्दैव फ्रान्सचं!”

आपल्या पतीच्या अशा बोलण्या-वागण्यातून काय सूर निघतो याची चिकित्सा करण्यासाठी मा. रेनॉल थांबल्या नाहीत. ज्युलिआँच्या सहवासात बारा तास घालविणे शक्य आहे हे नुकतेच त्यांच्या लक्षात आले होते. गावात जाऊन त्यांना खूपशी खरेदी करावयाची होती. त्यामुळे जेवण एखाद्या उपाहारगृहातच घेतले पाहिजे असे त्यांनी जाहीर केले. त्याबद्दल त्यांच्या पतीची प्रतिक्रिया कोणतीही असली तरी त्या स्वतःच्या विचाराला चिकटून राहिल्या. ‘तॅव्हर्न’ (उपाहारगृह) हा शब्द नुसता ऐकल्याबरोबर मुलांना अत्यानंद झाला. तो तुच्छतेने उच्चरण्यात आधुनिक चोखंदळांना एक विशिष्ट सुख लाभत असते.

ज्या पहिल्या कपडेवाल्याच्या दुकानात मा. रेनॉल शिरल्या तेथेच त्यांना रेनॉल यांनी सोडले व ते निघून गेले. त्यांना काही लोकांना भेटायला जावयाचे होते. ते परतले तेव्हा सकाळपेक्षा जास्त दुर्मुखलेले होते. इतर कशाबद्दल नव्हे तर स्वतःबद्दल व ज्युलिआँबद्दलच सबंध गाव विचार करीत होते अशी त्यांची खात्री झाली. खरे म्हणजे लोकांत जी टीका केली जात होती तिच्यात अपमानास्पद, लागट असा काही भाग आहे असा संशय यावा असे अजून काहीच, रेनॉलना कोणी बोललेले नव्हते. त्या टीकात्मक शेऱ्यांपैकी महापौरांच्या

कानावर जी एकमेव गोष्ट पुन्हा पुन्हा येत होती ती म्हणजे ज्युलिआँ सहाशे फ्रँक पगारावर त्यांच्याकडे राहणार की आठशे फ्रँकची नोकरी अनाथाश्रमाच्या गव्हर्नरांकडे पतकरणार?

रेनॉलना हा गव्हर्नर जेव्हा बाहेर, चार लोकांत भेटला होता तेव्हा तो त्यांच्याशी अगदी थंडपणे वागला होता. त्याच्या वागणुकीत अर्थातच एक विशिष्ट खुबी होती. या लहान प्रांतातील लोकांचे वागणे बहुतेक विचारपूर्वक असते. भावनांचे प्रकोप होण्याचे प्रसंग इतके विरळ असतात की, आपल्या वागणुकीत लोक ते दाबून टाकतात.

पॅरिसहून शंभर लीग अंतरावर म. वालनो होते. अशा लोकांना 'फारो' या नावाने संबोधले जाते. ह्या विशिष्ट जातीची लक्षणे म्हणजे वृत्तीचा रांगडेपणा व अंगातला मूळचा निर्लज्ज उद्धटपणा. १८१५ पासूनच्या त्यांच्या यशस्वी जीवनाने ह्या सवयी आणखीच दृढ केल्या होत्या. एका दृष्टीने सांगायचे म्हणजे रेनॉल यांच्या हुकमतीखाली दे व्हेरिएरवर राज्य करीत होते. पण अंगी फार जास्त चापल्य असल्यामुळे, कशाची लाज वाटत नसल्यामुळे, प्रत्येक गोष्टीत आपले नाक खुपशीत, सदासर्वदा इकडे-तिकडे हिंडत-फिरत, लिहीत, बोलत, अपमान जिरवीत राहून आणि फारसा वैयक्तिक अहंपणा न बाळगता, धर्मखात्यातील अधिकाऱ्यांच्या दृष्टीत, महापौरांच्या बोरबरीची प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्यात ते यशस्वी ठरले होते. त्यांनी स्थानिक व्यापाऱ्यांना जवळजवळ असेच म्हटले होते की, 'तुमच्यापैकी सर्वांत जास्त मूर्ख असलेले दोघेजण मला द्या.' वकिलांना त्यांनी म्हटले होते, 'तुमच्यातली सगळ्यात जास्त दोन अडाणी माणसे मला दाखवा' आणि आरोग्याधिकाऱ्यांना म्हटले, 'तुमच्यातले दोन अट्टल बदमाष मला घेऊ द्या' आणि प्रत्येक व्यवसायक्षेत्रातून असे अतिशय निर्लज्ज प्रतिनिधी गोळा केल्यानंतर ते त्यांना म्हणाले होते, 'आपण सगळे मिळून राज्यकारभार हाकू या.'

या मंडळींच्या वागणुकीच्या चालीरीती रेनॉलना मुळीच आवडत नसत. वालनो यांच्या रांगड्या स्वभावाला कशाचेच काही वाटत नसे. तरुण अबे मासलाँ अगदी सार्वजनिक ठिकाणी "तुम्ही खोटे बोलत आहा" असे म्हणाले तरी त्यामुळेसुद्धा वालनो ओशाळे झाले नव्हते.

पण अशी उत्कर्षावस्था प्राप्त झाली असतानासुद्धा कित्येक कठोर सत्यांचा उल्लेख त्यांना उद्देशून करण्याचा अधिकार प्रत्येकाला होता याची चांगली जाणीव वालनोला होती व म्हणून काही तपशिलांत माफक चढेलपणाने स्वतःची बाजू पूर्णपणे मजबूत करून ठेवणे त्यांना भाग पडले. म. आपेअर यांच्या भेटीनंतर पुष्कळच भानगडी उजेडात आल्या होत्या. त्यांच्या निवारणार्थ वालनो यांचे कार्य खूपच वाढले होते. ते बेझांसाला तीनदा जाऊन आले होते; दर डाकेला ते अनेक पत्रे पाठवू लागले; त्याशिवाय त्यांच्या घरी रात्री येणाऱ्या अनोळखी जासुदांच्या द्वाराही ते इतर पत्रे रवाना करीत असत. वृद्ध क्युरे शॅलाँ यांची नागवणूक करविण्यात मात्र त्यांचे कदाचित चुकले होते; कारण त्यांच्या ह्या सूडबुद्धीच्या कृतीमुळे, उच्च कुलोत्पन्न व धर्मनिष्ठ प्रवृत्तीच्या अनेक महिलांकडून त्यांची गणना एक अतिशय दुष्ट व्यक्ती म्हणून केली जाऊ लागली. त्याशिवाय दुसरी गोष्ट अशी की, रुजू केलेल्या ह्या सेवेमुळे ते ग्रॅण्ड विकार द फ्रीलेअर यांच्या आहारी गेले होते व त्यांच्याकडून वालनोला विचित्र हुकूम येत. त्यांच्या व्यावसायिक जीवनात ते अशा अवस्थेप्रत आले असताना ते एक निनावी पत्र लिहिण्याच्या मोहाला बळी पडले होते. आणि त्याच वेळी, ज्यलिआँला घरी ठेवून घ्यावे असे त्यांना त्यांच्या पत्नीने सांगितले. ही गोष्ट त्यांच्या अडचणीत भर टाकणारी होती. पण त्यांच्या पत्नीच्या पोकळ अभिमानाला त्या विचाराने आकृष्ट केले होते.

अनुक्रमणिका

ह्या अशा परिस्थितीत, आपले पूर्वीचे सहकारी रेनॉल यांच्याशी असलेले आपले कायमचे संबंध बिघडून जातील ही कल्पना वालनोला आधीच आली. महापौर आपल्याशी तिखट शब्दांत बोलतील असेही त्यांना वाटले. त्याची त्यांना फारशी क्षिती नव्हती. पण ते बेझाँसाला किंवा पॅरिसलाही लिहून कळविणे शक्य होते. मग एखाद्या मंत्र्याचा चुलत भाऊ किंवा तसाच एखादा नातेवाईक व्हेरिएरहून अकस्मात हजर व्हायचा आणि अनाथाश्रमाच्या गव्हर्नरपदाची सूत्रे स्वतःच्या हाती घ्यायचा संभव होता. लिबरल पक्षाच्या मंडळींशी स्नेह संपादन करावा असा विचार वालनो यांनी केला; आणि त्यांच्यापैकी अनेकांना भोजनासाठी बोलाविण्यात आले. त्यामागे हाच उद्देश होता. ज्युलिआँने ते त्याच प्रसंगी ह्या लिबरल मंडळींच्याकडून वालनो यांना महापौरांच्या विरुद्ध जोरदार पाठिंबा मिळण्यासारखा होता. पण एखादे वेळेस निवडणूक घेतली जाऊ शकेल; आणि अनाथाश्रम व चुकीच्या पक्षाला मत यांची एकमेकांशी संगती जुळत नसते हे काही सांगायला नको. मोठ्या चाणाक्षपणे आधीच स्वतः हेरलेल्या ह्या डावपेचांचा इतिहास मा. रेनॉल यांनी ज्युलिआँला सांगितला. त्या वेळी तो मादामना एका दुकानातून दुसऱ्या दुकानात जाताना आपला हात आधारासाठी देत होता. आस्ते आस्ते ते कूर द ला फिदेलितेपर्यंत पोहोचले. तेथे त्यांनी काही तास घालविले— वेर्सी येथे ज्या शांततेने व्यतीत करीत असत त्याप्रमाणे.

आपल्या माजी प्रमुखाशी असलेले संबंध कायमचे तोडणे टाळण्याचे प्रयत्न ह्या सुमारास वालनो करीत होते व त्यासाठी त्यांनी स्वतःच त्यांच्याशी जरा मुर्दाडपणे वागायला सुरुवात केली. वागण्याची ही पद्धत तशी यशस्वी ठरली; पण महापौरांची अप्रसन्नता तिच्यामुळे वाढली.

ज्या दिवसाची हकीगत आम्ही सांगत आहोत त्या दिवशी कोणाही माणसाच्या पोकळ अभिमानाने आजवर त्याला पैशाच्या क्षुल्लक प्रेमाच्या अत्यंत ओंगळ व अनुचित प्रकारांशी झगडत असता इतके दुःखात लोटले नसेल. पण रेनॉल त्या उपाहारगृहात शिरताना त्याहूनही विषण्ण होते. याच्याउलट त्यांची मुले, पूर्वी कधी नव्हे इतकी त्यावेळी आनंदी व उत्साही दिसली. ह्या विरोधाने रेनॉल यांचा क्रोधाग्नी चेतविला.

"मला असं दिसतंय की माझ्याच कुटुंबात मी नकोसा झालो आहे." आत शिरताना ते म्हणाले. ऐकणारांच्या कानात आपले बोलणे चांगले भरावे म्हणून त्यांनी आपला स्वर चढविला होता.

त्यांना उत्तर देण्यासाठी त्यांच्या पत्नीने त्यांना जरा बाजूला घेतले आणि ज्युलिआँला कटविण्याची आवश्यकता स्पष्ट केली. एका योजनेचे चिंतन त्या गेला पंधरवडाभर करीत होत्या. नुकत्याच, काही तास भोगलेल्या सुखाने त्यांना, ती अमलात आणण्यासाठी आवश्यक असलेला निश्चय व स्वस्थता, परत प्राप्त झाली. व्हेरिएरच्या बिचाऱ्या महापौरांना खरोखर जर कशाने पूर्णपणे नाउमेद केले असेल तर त्यांच्या नगद नारायणाच्या आसक्तीबद्दल गावात लोक उघडपणे बोलून त्यांची टर उडवितात. ह्या गोष्टीने म. वालनो हे एखाद्या दरोडेखोराप्रमाणे उदार होते. कॅन फ्रॅटर्निटी ऑफ सेंट जोसेफ, दि काँग्रेगेशन ऑफ अवर लेडी, दि काँग्रेगेशन ऑफ दि ब्लेसेड सॅक्रॅमेंट व इतर अनेक संस्थांना द्यावयाच्या देणग्यांच्या अलिकडच्या याद्यांत महापौरांचा आकडा मात्र वाजवी पण डोळ्यांत भरण्याजोगा नव्हता. साध्या प्रसिद्धीपेक्षा त्यांचा त्यात शहाणपणाचा काही असावा.

देणग्या गोळा करणाऱ्या भाई लोकांनी व्हेरिएरमधील आणि शेजारपाजारच्या परिसरातील वतनदार सभ्य गृहस्थांच्या वर्गवार याद्या चतुरपणे बनविल्या होत्या त्या प्रत्येकाच्या देणग्यांच्या रकमांनुसार; आणि त्या याद्यांत रेनॉल यांचे नाव एकापेक्षा जास्त वेळा अगदी शेवटच्या ओळीत लिहिलेले होते. महापौर घसा फोडून

सांगत की, “बाबांनो, मला वरचेवर नवी मिळकत अशी काहीच नाही.” पण पाद्री लोकांना ती चेष्टा वाटे; व असल्या धर्माच्या कामात चेष्टा त्यांना अगदी खपत नसे.

★ ★ ★

## प्रकरण तेविसावे

# एका अधिकाऱ्याची दुःखे

पण आपण ह्या छोट्या माणसाला त्याच्या छोट्या, भेडसावणाऱ्या समस्यांच्या चिंतनात इथेच सोडू या. त्याला जर हांजी करणारा हुजऱ्यासारखा एखादा प्राणीच हवा होता तर त्याने भावना असणाऱ्या एका माणसाला स्वतःच्या घरात घेतलेच कशाला? आपले नोकर कसे निवडावेत हे त्याला का कळू नये? एकोणिसाव्या शतकाची सर्वसामान्य रीत अशी आहे की जेव्हा एखाद्या श्रेष्ठ, सामर्थ्यवान उमराव व्यक्तीचा मुकाबला भावनाशील माणसाशी पडतो तेव्हा तो त्याला ठार करतो, हद्दपार करतो, तुरुंगात डांबतो, किंवा त्याचा असा काही अपमान करतो की, तो माणूस, एखाद्या मूर्खाप्रमाणे, त्या अपमानाच्या दुःखापायी मरतो. चालू उदाहरणात असे घडत आहे की, भावनाशील माणूस अजून तरी दुःख भोगू लागलेला नाही. फ्रान्समधील छोटी गावे व निवडून आलेली सरकारे यांचे न्यू यॉर्कच्या सरकारप्रमाणे मोठे दुर्दैव म्हणजे जगात एम्. द रेनॉल यांच्यासारख्या व्यक्ती अस्तित्वात असतात हे विसरण्याबाबतची त्यांची असमर्थता. वीस-एक हजार लोकवस्तीच्या गावात ही माणसे सार्वजनिक मतास वळण देऊ शकतात आणि ज्या देशात लोकांना सनदेने अधिकार बहाल केलेले असतात तेथे सार्वजनिक मत ही एक भयंकर शक्ती असते. जन्मजात उदात्त हृदयाचा व उदार, सहज प्रवृत्तीचा माणूस तुमच्यापासून जर शंभर लीग अंतरावर राहात नसता तर तुमचा मित्र झाला असता; पण तो तुमच्या गावातील सार्वजनिक मत कसे आहे यावरून तुम्हाला जोखतो; आणि केवळ योगायोगाने जे उच्चकुलीन, श्रीमंत व नेमस्त झालेले असतात अशा गावातल्या मूर्खांकडून ते स्थानिक मत बनविले गेलेले असते. प्रसिद्धीस चढलेल्या व्यक्तीचे मग दुर्दैवच ओढवायाचे!

भोजन झाल्यावर लगेच मंडळींनी वेर्जीला कूच केले, पण नंतर दोन दिवसांनी सगळे कुटुंब व्हेरिएरला परतल्याचे ज्युलिआँला दिसून आले.

त्यानंतर एखादा तास गेला असेल नसेल; ज्युलिआँला एका गोष्टीचा शोध लागला व त्यामुळे तो फार आश्चर्यचकित झाला. मादाम रेनॉल यांची वागणूक त्याला रहस्यमय वाटली. काही तरी गोष्टीबद्दल त्या लपवाछपव करीत होत्या. ज्युलिआँ आल्याबरोबर त्यांनी त्यांच्या पतीबरोबर चाललेले संभाषण एकदम थांबविले. आणि त्याने तेथून निघून जावे अशीच जवळजवळ इच्छा असल्याचे त्याला दिसून आले. त्याला पुन्हा तसे सुचवले जाण्यापर्यंत तो तेथे थांबलाच नाही. त्याची वागणूक एकदम रूक्ष बनली. तो तोलून-मापून बोलू लागला. मा. रेनॉल यांच्या ते लक्षात आले. तथापि त्याचे कारण जाणून घेण्याच्या भरीस त्या पडल्या नाहीत. ज्युलिआँचे विचारचक्र सुरू झाले. "माझ्या जागी त्या दुसरा कोणी आणणार आहेत काय? पण अगदी परवाच्या दिवशी त्या माझ्याशी किती सलगीने वागल्या! पण म्हणतात ना, मोठ्या घरच्या बायका ह्या अशाच वागत असतात! त्या राजासारख्या असतात! राजेसाहेब प्रत्यक्ष भेटीत एखाद्या मंत्र्याशी जिव्हाळ्याने वागतात. पण आपण बडतर्फ झालो आहोत असं त्याला सांगणारं राजेसाहेबांचं पत्र घरी जाताच त्याच्या हाती पडतं!

ज्युलिआँच्या असे लक्षात आले की, तो येताच एकाएकी बंद झालेल्या त्या संभाषणात एका मोठ्या घराचा उल्लेख सारखा केला जात होता. चर्चसमोरचे ते जुने पण खूप मोठे, प्रशस्त व ऐसपैस घर व्हेरिएरच्या नगरपालिकेच्या मालकीचे होते. शहराच्या अत्यंत सोयीस्कर भागात ते होते. ज्युलिआँने स्वतःला विचारले, "ते घर आणि नवा प्रियकर यांच्यात अर्थाअर्थी काय संबंध असू शकेल?" मनाच्या त्या त्रस्त अवस्थेत तो

पहिल्या फ्रान्सिसच्या त्या विशिष्ट मनोहर काव्यपंक्ती स्वतःशी पुनःपुन्हा गुणगुणू लागला. त्या आता त्याला नव्याच वाटत होत्या. कारण मादामनी त्याला त्या शिकविल्याला पुरा महिनाही झाला नव्हता. त्या वेळी किती शपथांनी, किती लडिवाळ कोडकौतुकांनी त्यापैकी प्रत्येक ओळ खोटी असल्याचे सिद्ध केले गेले नव्हते काय?

त्या ओळी अशा होत्या—

"स्त्रीजात असे चंचल,
करी भरवसा तिच्यावर, तो एक मूर्ख."

एम्. द रेनॉल टपालगाडीने बेझाँसाला निघून गेले. त्यांचा हा प्रवास, प्रत्यक्षात निघण्यापूर्वी दोन तासच आधी ठरला. ते फारच अस्वस्थ दिसले. परत आल्यावर त्यांनी करड्या रंगाच्या कागदात गुंडाळलेला एक भला मोठा गठ्ठा मेजावर टाकला. ते पत्नीला म्हणाले, "त्या खुळचट व्यवहारासाठी हे एवढं करावं लागलं." भिंतींवर जाहिराती चिकटविणारा माणूस तो मोठा गठ्ठा घेऊन जात असलेला ज्युलिआँने त्यानंतर तासाभराने पाहिला. त्याच्यामागून तो घाईघाईने निघाला. "रस्त्याच्या पहिल्याच वळणावर आता मला ते रहस्य समजेल." तो स्वतःशी पुटपुटला.

ज्यलिआँ अधीरतेने त्या माणसाच्या पाठीमागे थांबला. त्या माणसाने आपल्या जाडजूड कुंचल्याने त्या भित्तीपत्रकाच्या मागच्या बाजूस खळीचे पट्टे फराफरा ओढले. भिंतीवर ते पत्रक चिकटविले जाताच ज्युलिआँची जिज्ञासा त्यावरील मजकून वाचू लागली. पत्नीशी संभाषण करताना रेनॉल यांच्या बोलण्यात वारंवार ज्याचा उल्लेख होत होता त्या मोठ्या जुन्या घराचा ताबा काही मुदतीसाठी जाहीर लिलावाने विकावयाची घोषणा पूर्ण तपशिलासह त्या भित्तिपत्रकात करण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी दुपारची दोनची वेळ व टाउन हॉल ही जागा लिलावासाठी निश्चित करण्यात आल्याचे त्यात दिले होते. तिसरी मेणबत्ती विझली की लिवाव पक्क होणार होता. ज्युलिआँची फार निराशा झाली. मधला केवळ एक दिवसाचा अवधी त्याला अल्प वाटला. ज्यांना ज्यांना लिलावात भाग घ्यायचा असेल त्या सर्वांपर्यंत इतक्या थोड्या अवधीत ही बातमी कशी पोहोचू शकेल? त्या भित्तिपत्रकावर लिहिलेली तारीख पंधरवड्यापूर्वीची होती! त्याच्यावरील मजकूर त्याने अथपासून इतिपर्यंत तीन निरनिराळ्या ठिकाणी वाचला. पण त्याला वरील तपशिलाखेरीज अधिक काही कळू शकले नाही.

ते रिकामे घर बारकाईने पाहण्यासाठी तो गेला. तेथे एक दरवान होता. पण ज्युलिआँ येत असल्याचे त्याने पाहिलेच नव्हते. कारण तो आपल्या एका मित्राशी गूढपणे बोलत होता.

"छेः, वेळेचा अपव्यय आहे तो. तीनशे फ्रँक्सला घर देण्याबद्दल म. मासलाँ यांनी त्यांना वचन दिले होते. आणि महापौरांनी ते झिडकारताच त्यांना ग्रॅण्ड विकार द फ्रिलेअर यांच्याकडून बिशपच्या पॅलेसला पाठविण्यात आले."

ज्युलिआँ तेथे उपस्थित झालेला पाहून ते दोघे जिवलग मित्र फारच बावरले. त्यानंतर त्यांनी एकही शब्द काढला नाही.

लिलावाला हजर राहण्यास ज्यलिआँ चुकला नाही. पुरेसा प्रकाश नसलेल्या त्या खोलीत लोकांची गर्दी झालेली होती. पण प्रत्येकजण दुसऱ्याकडे चमत्कारिकपणे टवकारून पाहात होता. एका मेजावर धातूची एक तबकडी ठेवण्यात आलेली होती व तिच्यात तीन मेणबत्त्यांचे तुकडे लावण्यात आलेले होते. प्रत्येकाची नजर त्यांच्याकडे लागलेली होती हे जुलिआँने पाहिले. लिलाववाला पुकार करीत होता ––

"सभ्य गृहस्थ हो, तीनशे फ्रँक—"

एकजण दुसऱ्याजवळ पुटपुटला. "तीनशे फ्रँक! अगदीच वाईट!" ज्युलिआँ त्या दोघांच्यामध्ये उभा होता. तो पहिला माणूस पुढे म्हणाला, "त्याची किंमत आठशे फ्रँकपेक्षा जास्त आहे. मी लिलावात जास्त रक्कम बोलणार आहे."

"म्हणजे तू तुझं नाक आततायीपणानं कापून स्वतःचा चेहेरा विद्रूप करून घेणार आहेस वाटतं? म. मासलाँ, म. वालनो, बिशप, त्याचा तो भयंकर ग्रॅण्ड विकार द फ्रिलेअर आणि त्यांच्या त्या सगळ्या टोळीचा राग स्वतःवर ओढवून घेऊन तू आपलं कोणतं हित साधणार आहेस?

"तीनशे वीस," दुसरा माणूस ओरडला.

"मूर्ख, वेडपट!" त्याच्या शेजाऱ्याने त्याची संभावना केली आणि ज्युलिआँकडे अंगुलीनिर्देश करून तो म्हणाला, "अन् हा बघ इथं, महापौरांचा एक गुप्त हेर."

असे बोलल्याबद्दल, त्याला दटावण्यासाठी ज्युलिआँ एकदम त्याच्याकडे वळला. पण त्या दोघा फ्रॉकान्त्वांनी त्याच्याकडे लक्षच दिले नाही. त्यांच्या थंडपणामुळे ज्युलिआँही पूर्ववत शांत झाला. त्या क्षणी त्या तीन मेणबत्त्यांपैकी शेवटची विझून गेली; आणि त्याबरोबर लिलाववाल्याने ते घर नऊ वर्षांच्या कराराने तीनशे तीस फ्रँक्सवर... च्या प्रिफेक्चरमधील चीफ सेक्रेटरी म. द. सँ जीरो यांना दिल्याने, हेल काढणाऱ्या आवाजात जाहीर केले.

महापौर त्या खोलीतून बाहेर पडताच चर्चेला तोंड फुटले. एकजण म्हणाला, "म्हणजे ग्रॅजोच्या अविचारीपणाने गावासाठी तीस फ्रँक कमावून दिले आहेत." त्यावर दुसरा उत्तरला, "पण म. सँ जीरो आपला सूड ग्रोजोवर उगवतील आणि तो आणखी कुणावर काढील."

ज्युलिआँच्या डाव्या बाजूचा एक भक्कम माणूस म्हणाला, "काय निंद्य प्रकार! ह्या घरासाठी मी स्वतः कारखाना म्हणून आठशे फ्रँक दिले असते आणि तरीही उत्तम सौदा झाला असे मी मानले असते."

त्यावर लिबरल पक्षाचा एक तरुण कारखानदार उद्गारला, "छीः! म. द सँ जीरो हा काँग्रेगेशन पक्षापैकी एक नाही का? त्याच्या चारही मुलांना शाळेत शिष्यवृत्त्या मिळालेल्या नाहीत का? गरीब बिचारा! पाचशे फ्रँकचा भत्ता देऊन व्हेरिएर गाव त्याची प्राप्ती वाढविणार हे अगदी नक्की ठरलेलं आहे. दुसरं काय?" मग तिसऱ्या माणसाने शेरा मारला, "आणि हे थांबवायला महापौर समर्थ नसावेत अं! ते नेमस्त पक्षाचे नाहीत हे खरे; पण ते काही चोर नाहीत."

एकजण मध्येच तोंड घालून त्यावर म्हणाला, “काय? ते चोर नाहीत? अरे तो चोरांचा चक्क एक अड्डा आहे. प्रत्येक गोष्ट त्यांच्या सामायिक निधीत जमा होत जाते. आणि मग वर्षाच्या अखेरीस वाटण्या केल्या जातात. पण तिथं तो तरुण सोरेल आहे; तेव्हा चला आपण दूर जाऊ या.”

ज्युलिआँ घरी गेला तो अत्यंत चिडलेल्या मनःस्थितीत. त्याला मा. रेनॉल फार खिन्न असलेल्या आढळल्या. त्यांनी त्याला विचारले, “तुम्ही त्या लिलावाच्या तेथून आलात काय?”

“होय बाईसाहेब, तिथं महापौरांचा गुप्तहेर म्हणून माझी संभावना करण्यात आली.”

“त्यांनी माझा सल्ला घेतला असता तर ते दुसरीकडे कुठे तरी गेले असते.”

आणि त्या क्षणी एम्. द रेनॉल तेथे उपस्थित झाले. ते फार उदास, गंभीर दिसत होते. जेवताना मंडळी गप्पच होती. रेनॉल यांनी ज्युलिआँला मुलांच्याबरोबर वेर्जीला चलण्यास सांगितले. साऱ्या प्रवासात ते अखंडपणे विषण्ण होते. पतीला दिलासा देण्याच्या उद्देशाने मा. रेनॉल म्हणाल्या, “गडे, हे तर तुमच्या नेहमीच्या परिपाठातलंच आहे.”

घरच्या शेकोटीच्या भोवती त्या संध्याकाळी ती सर्व मंडळी बसली असता कोणीच काही बोलत नव्हते, सगळे शांत होते. बीच झाडाचे लाकडी ओंडके शेकोटीत जळताना होणारा तडतड आवाजच काय तो त्यांचे लक्ष वेधून घेत होता. गुण्यागोविंदाने एकत्र नांदणाऱ्या बहुतेक कुटुंबात उदासीनतेचे जे क्षण कधी कधी आढळतात तसाच तो एक होता.

त्यांचा एक मुलगा आनंदाने ओरडला, “घंटी वाजली, कोणी तरी आलंय.”

देवा देवा! म. द सँ जीरो माझे आभार मानण्याच्या निमित्ताने माझा कबजा घ्यायला आलेले असल्यास मी त्यांना चांगलाच हात दाखवीन; त्यांनी चांगलीच खरडपट्टी काढीन. हं, फार फार वाईट! त्यांनी आभार मानायचे ते वालनोचे; आणि या प्रकरणाची झळ लागली आहे ती मला. ती आगलावी जॅकोबिन वृत्तपत्रे या बातमीचे भांडवल करून मी मन्स्यूर नोनाँत सँक [मार्सेचे मॅजिस्टेट मेरिंडॉल यांना उद्देशून बार्थेलेमी यांनी केलेल्या उपहासाची सदर उल्लेखाचा संबंध आहे असा खुलासा म मार्सन करतात. एका खटल्यात त्यांना दंडाची शिक्षा फर्मावितांना त्या मॅजिस्ट्रेटने “क्वॉर्ट–व्हिन्ट क्विन्झ” साठी “नोनाँत सँक” ह्या दक्षिण प्रांतातील सर्वसाधारण शब्दांचा उपयोग केला होता.] आहे असा प्रचार करू लागली तर मी काय उत्तर देणार आहे त्यांना?”

झुपकेदार काळे कल्ले असलेला एक देखणा माणूस, नोकरांच्या मागून त्या क्षणी खोलीत शिरला.

“महापौरसाहेब, माझं नाव सिनॉर जेरोनिमो. नेपल्प येथील वकिलातीमधील अधिकारी म. ल. कॅव्हेलिअर शेवालिए द बोवेझी यांनी, मी इकडे येताना तुमच्यासाठी मजजवळ दिलेले हे पत्र. ते दिल्याला फक्त नऊ दिवस झालेत.” मा. रेनॉल यांच्याकडे पाहात, उत्साही स्वरात सिनॉर जेरोनिमो पुढे म्हणाला, “बाईसाहेब, आपल्या दूरच्या नात्याचे बंधू, सिनॉर द बोवेझी हे माझे चांगले मित्र आहेत. ते सांगतात की आपल्याला इटॅलियन येते.”

अनुक्रमणिका

नेपोलिअनच्या तत्त्वांच्या त्या अनुयायाच्या आनंदी, खेळकर स्वभावामुळे त्या कंटाळवाण्या संध्याकाळचे स्वरूप जाऊन तेथे एक मोठे आनंदी वातावरण निर्माण झाले.

सिनॉरने रात्रीचे भोजन तेथेच घ्यावे असा आग्रह मा. रेनॉल यांनी केला. त्यांनी सारे घर उलथेपालथे केले. महापौरांचे गुप्तहेर असल्याचे आपले वर्णन दोनदा एका दिवसांत कानांत ठणाणा करून शिरल्यापासून. ज्युलिआँला जे विचार एकसारखे भंडावू लागले होते त्यापासून त्याचे चित्त वाटेल ते करून दुसरीकडे वळविण्याची त्यांची इच्छा होती. सिनॉर जेरोनिमो एक प्रसिद्ध गायक होता. तो उच्च पातळीच्या समाजात वावरायला सरावलेला होता. तसेच त्याचे स्वतःचे बोलणे चालणेही उत्तम अभिरुचीचे व मनोरंजक असे. फ्रान्समध्ये हे सद्‌गुण एकाच व्यक्तीच्या ठिकाणी असणे जवळजवळ दुर्मिळ झाले होते. भोजनानंतर त्याने मा. रेनॉल यांच्यासह एक छोटे द्वंद्वगीत गाइले. त्याने मजेदार गोष्टीही सांगितल्या. मध्यरात्री एक वाजून गेला; तेव्हा मुलांनी झोपण्यास जावे असे सुचविले. पण मुलांनी त्याविरुद्ध तक्रार केली.

"आता ही एवढी गोष्ट ऐकू द्या." सर्वांत थोरला मुलगा म्हणाला. त्यावर सिनॉर जेरोनिमो म्हणाला, "सिनॉरिनो, ही माझी स्वतःचीच कथा आहे. आठ वर्षांपूर्वी मी तुमच्यासारखाच, नेपल्सच्या काँझर्व्हेटेरिओमध्ये शिकणारा, कुमारवयाचा एक विद्यार्थी होतो. तुमच्यासारखा म्हणजे तुमच्या एवढा असंच फक्त मला म्हणायचं आहे. कारण व्हेरिएरसारख्या सुंदर गावाच्या विख्यात महापौरांचा पुत्र असण्याइतकं माझं भाग्य नव्हतं."

ह्या उल्लेखाबरोबर एम्. द रेनॉल यांनी एक दीर्घ श्वास टाकला व आपल्या पत्नीकडे पाहिले.

तो तरुण गायक कथाकथन करू लागला. "सिनॉर झिंगॅरेली" थोडा जास्त आघात देऊन त्याने तो नामोच्चार लांबवल्याबरोबर मुलांमध्ये एकदम हास्याची उकळी फुटली. "सिनॉर झिंगॅरेली हा एक अतिभयंकर कडक शिक्षक आहे. कॉन्झरव्हेटोरियोमधील विद्यार्थ्यांना तो मुळीच आवडत नाही. पण तो त्यांना नेहमी असं वागायला लावतो की जणू त्यांचा तो फार आवडता आहे. मी मात्र शक्य तेव्हा त्याच्या तडाख्यातून निसटत असे. सान कार्लिनोच्या छोट्या रंगमंदिरात मी जात असे. अहाहा! काय स्वर्गीय संगीत ऐकायला मिळायचं तिथं! पण, अरे देवा! पिटात बसायला आवश्यक इतक्या आठ सोल्डी मी कुठून जमा करणार? केवढी मोठी ही रक्कम!" मुलांकडे पाहून तो म्हणाला व त्याबरोबर मुले पुन्हा हसली. "त्या रंगमंदिराचे संचालक लिनॉर जीओवान्नोने यांनी माझे गाणे ऐकले होते. मी तेव्हा सोळा वर्षांचा होतो. तो म्हणाला, 'हा पोरगा म्हणजे एक रत्न आहे.'"

"एके दिवशी त्याने मला विचारले, माझ्या मित्रा, मी तुला नोकरी दिली तर तुला आवडेल का?"

"तुम्ही मला पगार किती द्याल?"

"महिन्याला चाळीस डकॅट." म्हणजे सद्‌गृहस्थांनो, एकशे साठ फ्रँक. मला स्वर्ग हाती आल्यासारखं वाटलं. मी त्याला म्हणालो, "पण त्या खाष्ट झिंगॅरेलीचं मन मी कसं वळवू शकेन? त्याने मला जाऊ दिलं पाहिजे ना?"

"लासकिया फेअर अ मी."

“ते माझ्यावर सोपव” सर्वांत थोरल्या मुलाने लगेच भाषांतर करून सांगितले.

“अगदी बरोबर. छोट्या साहेबा, मग सिनॉर जीओवान्नोने मला म्हणाला, ‘प्रथम तुला एका साध्याशा करारावर सही केली पाहिजे.’ मी त्याप्रमाणे कागदावर सही केली. त्याने मला तीन डकॅन दिले. तेवढे पैसे मी कधी पाहिलेसुद्धा नव्हते. मी काय करायला पाहिजे ते मग त्याने मला सांगितले. दुसऱ्या दिवशी मी त्या भयंकर सिनॉर झिंगरेलीची भेट घेण्यास गेलो. त्याच्या म्हाताऱ्या नोकराने मला त्याच्या खोलीत नेलं. झिंगरेलींनी विचारले, “काय रे उनाडटप्पू कार्ट्या! काय काम आहे तुझं माझ्याकडे?” मी त्यांना म्हणालो, “आचार्य, माझ्या दुष्कृत्यांबद्दल मला फार पश्चात्ताप होत आहे. लोखंडी कठड्यावर चढून मी पुन्हा कधीच कॉन्झरव्हेटोरिओम्च्या बाहेर पळून जाणार नाही. आता मी दुप्पट जोराने अभ्यास करणार आहे.”

“मी यापूर्वी कधीही ऐकला नाही इतका एक उत्तम खर्जातला आवाज बिघडून जाण्याचे भय जर माझ्या मनाला वाटले नसते तर हरामखोरा, मी तुला नुसत्या पावपाण्यावर पंधरा दिवस कुलुपात डांबून टाकलं असतं, समजलास?” त्यावर मी पुन्हा म्हणालो, “आचार्य, सबंध शाळेला आदर्श असा एक माणूस मी बनणार आहे. माझ्यावर विश्वास ठेवा. पण माझं एक अगदी साधं मागणं आहे, तेवढी कृपा माझ्यावर करा. मला बाहेर गाण्याची परवानगी मागण्यासाठी जर तुमच्याकडे कोणी आला तर त्याला सरळ नकार द्या. तशी परवानगी देता येत नाही. म्हणून कृपा करून त्याला स्पष्ट सांगा.”

“अरे, तुझ्यासारख्या कुचकामी पोरासाठी कोणी विचारायला येईल असं वाटतंय काया तुला? मी कधीकाळी तुला कॉन्झरव्हेटोरिओम् सोडून जाऊ देईन असं तुला वाटतंय काय? मला बनवू पाहतोस, होय? चल जा, नीघ; निघून जा म्हणून सांगतोय ना मी?” असं म्हणत त्यांनी माझ्या पार्श्वभागावर मारण्यासाठी लाथ उगारली आणि ते उद्‌गारले, “नाही तर पाव-पाण्यावर राहावं लागेल तुला, समजलास?”

एक तासाभराने सिनॉर जिओवान्नोने त्यांना भेटायला आले व सांगू लागले, “माझं नशीब उजळावं म्हणून मी तुमच्याकडे विचारणा करायला आलो आहे. मला जेरोनिमो हवा आहे. येत्या हिवाळ्यात तो जर माझ्या रंदमंदिरात गायला तर मला माझ्या मुलीचं लग्न करणं शक्य होईल”

त्यावर झिंगरेलींनी त्याला विचारलं, “त्या बदमाष पोराला घेऊन जाऊन काय करायचं ठरवलंय तुम्ही? मी परवानगी देणार नाही. तुम्हाला तो मिळणार नाही. दुसरं असं की, मी जरी होकार दिला तरीही शाळा सोडून कधीच कुठे जाण्याची त्याची इच्छा नाही. त्याने स्वतःच मला तसं थोड्या वेळापूर्वीच सांगून ठेवलं आहे.”

“त्याच्या संमतीचाच जर प्रश्न असेल तर मग हा पहा करार. त्याच्यावर त्याने सही केलेली आहे.” असे गंभीरपणाने सांगून जीवोवान्नोने यांनी खिशातून माझे करारपत्र काढून ते आचार्यांना दाखविले.

“तत्क्षणी झिंगॅरेलींचा क्रोध अनावर झाला. घंटीची दोरी ओढण्यासाठी ते एकदम धावले आणि प्रक्षुब्ध होऊन मोठ्याने ओरडले, ‘जेरोनिमोला शाळेतून हाकलून द्या’ आणि त्याप्रमाणे त्यांनी मला शाळेतून काढून टाकलं, तेव्हा मी पोट फुटेपर्यंत बेफाम हसलो. त्याच दिवशी संध्याकाळी माझं गाणं झालं मी प्रसिद्ध गीत गायलो. पाल्सिनेला याला लग्न करण्याची इच्छा आहे, आणि घरासाठी कोणकोणत्या गोष्टी लागतील त्या मोजण्याकरता तो बोटे घालतो; पण प्रत्येक क्षणी मोजलेले विसरतो.”

“सर, ते गाणं कृपा करून तुम्ही आम्हांला नाही का गाऊन दाखविणार?” मा. रेनॉल म्हणाल्या.

जेरोनिमोने गाणे म्हटले. त्याचे सगळे श्रोते डोळ्यांत पाणी येईपर्यंत हसले. सिनॉर जेरोनिमो पहाटे दोनवाजेपर्यंत झोपायला गेले नाहीत. त्यांच्या वागण्यातील चांगल्या चालीरीती, इतरांच्या उपयोगी पडण्याचा स्वभाव व आनंदी वृत्ती यांच्यामुळे त्यांनी रेनॉल कुटुंबाला भारले होते.

त्यांना फ्रेंच दरबारासाठी पाहिजे असलेली पत्रे दुसऱ्या दिवशी महापौर व मा. रेनॉल यांनी दिली.

ज्युलिआँ म्हणाला, “म्हणजे सगळीकडे खोटेपणा. सिनॉर जेरोनिमो साठ हजार फ्रँक्स पगाराच्या नोकरीसाठी लंडनच्या मार्गावर आहेत. सँ कार्लिनोच्या संचालकांनी समयज्ञता दाखविली नसती तर त्यांच्या स्वर्गीय आवाज कदाचित आणखी दहा वर्षे ख्यातनाम झाला नसता आणि त्याची प्रशंसाही केली गेली नसती. ...हृदयावर हात ठेवून सांगतो, रेनॉलपेक्षा जेरोनिमो म्हणून जगात नांदणं मी जास्त पसंत करीन. समाजात त्यांना काही फार मोठा मान मिळत नाही; पण आज जसा एक मुदतीचा घराचा भाडेपट्टा मान खाली घालून, करून द्यावा लागला तशी लाचारी तरी पतकरावी लागत नाही; आणि जिरोनिमो राहतो तर अगदी मजेत.”

ज्युलिआँला एका गोष्टीचा फार विस्मय वाटला. व्हेरिएरला एम्. द. रेनॉल यांच्या घरात घालविलेले एकान्ताचे काही आठवडे हा त्याच्या दृष्टीने सुखाचा कालावधी होता. उदास विचार व जीवनाचा वीट यांच्याशी त्याने मुकाबला केला होता तो त्याला निमंत्रणे आलेल्या भोजनांच्या वेळी. त्या रिकाम्या घरात तो निर्वेधपणे वाचन, लेखन व चिंतन करायला स्वतंत्र नव्हता का? एका हीन जीवाच्या हालचालींचा अभ्यास करण्याच्या आणि त्याला फसविण्यासाठी ढोंगी शब्दांच्या वा कृतींच्या निष्ठुर गरजेने त्याला त्याच्या भव्य दिव्य स्वप्नातून क्षणाक्षणाला जागे करण्यात येत नव्हते.

“तर मग सुख माझ्या आवाक्यात असू शकेल काय?... अशा जीवनासाठी किंमत ही काहीच द्यावी लागत नाही. मला पसंत वाटल्यास मी एलिसाशी लग्न करू शकतो किंवा फूकेचा भागीदार होऊ शकतो. पण एखाद्या अवघड डोंगराची चढण नुकताच चढून आलेला प्रवासी शिखरावर बसतो तेव्हा त्याला विश्रांतीत संपूर्ण सुख लागते. पण कायमचीच अशी विश्रांती घेण्याची सक्ती त्याच्यावर केल्यास तो सुखी राहू शकेल का?”

मा. रेनॉल यांचे मन चिंताग्रस्त विचारांना बळी पडले होते. ज्युलिआँला काही सांगावयाचे नाही असा निश्चय त्यांनी केला होता; तरीही त्या घराच्या भाडेपट्ट्याच्या व्यवहाराबद्दलची सगळी माहिती त्यांनी त्याच्याजवळ उघड केली. त्यांना वाटलं, “म्हणजे तो मला माझ्या सर्व प्रतिज्ञा विसरायला लावील.”

आपला नवरा संकटात आहे असे मादामना दिसून आले असते तर त्याच्या जीवनाच्या रक्षणासाठी त्यांनी एवढीशीही कांकू न करता स्वतःचे जीवन दिले असते. त्यांच्या वृत्ती उदार व अद्‌भुताची आवड असलेल्या होत्या. एखादे औदार्यपूर्ण कृत्य करता येण्याची शक्यता दिसावी, पण ते करू मात्र नये असे झाले म्हणजे त्या माणसाला होणारा पश्चात्ताप, हातून पूर्वी एखादा गुन्हा घडला असता जसा वाटावा, तितका असतो. तथापि काही असे भयंकर दिवस येऊन गेले की जेव्हा त्यांच्या मनातून पुढील विचार त्या हद्दपार

अनुक्रमणिका

करू शकल्या नाहीत. जर अकस्मात त्यांना वैधव्य आले आणि त्यामुळे त्या ज्युलिआँशी विवाह करण्यास मोकळ्या झाल्या तर जे परमसुख त्यांना भोगायला मिळेल त्याबद्दल ते विचार होते.

त्यांच्या मुलांवर ज्युलिआँ, मुलांच्या पित्यापेक्षा फार जास्त प्रेम करीत होता. तो त्यांना कडक शिस्तीने वागवीत असे; तरी मुले त्याला चाहत असत. जिथल्या वृक्षांच्या पर्णभाराची छाया मा. रेनॉलना फार प्यार होती ती वेर्जी, आपण ज्युलिआँशी विवाहबद्ध झाल्यास आपणास सोडावी लागेल ह्याची चांगली जाणीव त्यांना होती. आपण पॅरिसमध्ये राहात आहोत, आपल्या मुलांचे शिक्षण असे छान चालू आहे की त्याबद्दल प्रत्येकाला आश्चर्य वाटत आहे. आणि आपण स्वतः, आपली मुले व ज्युलिआँ तेथे पूर्णपणे सुखाने राहात आहोत असे एक क्षणचित्र त्यांनी स्वतःच्या मनश्चक्षूंपुढे उभे केले.

एकोणिसाव्या शतकात रूढ झालेल्या विवाहांचा हा एक मोठा विचित्र परिणाम आहे. लग्नाआधी उभयतांचे परस्पर प्रेम असल्यास, वैवाहिक जीवनाचा कंटाळवाणेपणा, निश्चितच ते प्रेम नष्ट करून टाकतो. एका तत्त्वज्ञान्याने असे म्हटले आहे की, ज्यांना काम करण्याची गरज नसते अशा श्रीमंत लोकांमध्ये वैवाहिक जीवनाच्या कंटाळवाणेपणाची कमालच होते. सुख भोगण्याच्या सौम्य प्रकारांचा वीट येऊन जातो त्यांना अशा स्थितीत ज्या स्त्रियांची हृदये शुष्क होऊन गेलेली असतात त्यांच्या हृदयातच तेवढा नवीन प्रेमाचा उदय होण्याचा संभव नसतो.

ह्या तत्त्वज्ञान्याचे मत लक्षात घेता, मला मा. रेनॉलना क्षमा करणे भाग पडते. पण त्यांना तशी क्षमा व्हेरिएरमध्ये मात्र केली जात नाही. मादामना काही सुगावा नसला तरी त्यांच्या प्रेमाच्या भानगडीची चमचमीत चर्चा सबंध व्हेरिएरमध्ये चोहीकडे चालू होती. नेहमीपेक्षा लोक यंदाच्या शरद ऋतूत ह्या मोठ्या प्रेमप्रकरणामुळे जरा कमी कंटाळले होते. हा विषय त्यांचा वेळ छान भरून काढीत होता.

शरद ऋतू व नंतरचे हिवाळ्याच्या सुरुवातीचे आठवडे लवकरच आले आणि तसेच निघूनही गेले. वेर्जीच्या त्या वनविभागातून स्थलांतर करण्याचा समय आला. एम्. द रेनॉल यांच्यावर आपल्या शिव्याशापांचा फारच कमी परिणाम होत आहे हे पाहून व्हेरिएरच्या उच्चभ्रू समाजाला राग येऊ लागला होता. तेथे अशी काही मोठी भारदस्त माणसे होती की जी आपल्या नित्याच्या गांभीर्याची भरपाई अशा प्रकारच्या गोष्टी तडीस नेण्याच्या करमणुकीने करून घेत असत. त्यांनी एक आठवड्याच्या आत रेनॉल यांच्या मनात अतिशय यातनामय असे संशय रुजविले; पण ते अगदी मोजक्या शब्दांपलीकडे मात्र गेले नाहीत.

म. वालनो एक गुप्त डाव खेळत होते. त्यांनी एलिसाला एका मोठ्या नावाजलेल्या व उच्च कुलीन कुटुंबात नोकरी लावून दिली होती. त्या कुटुंबात पाच स्त्रिया होत्या. आपल्याला ह्या हिवाळ्यात अन्यत्र नोकरी मिळू शकेल किंवा नाही ह्या भीतीने, एलिसाने तिला महापौरांकडे मिळणाऱ्या तनख्याच्या फक्त दोन-तृतीयांश पगार त्या कुटुंबाकडे मागितला होता; निदान ती तसे म्हणत होती. सेवानिवृत्त पाद्री चेलन आणि त्यांच्या जागी आलेला नवा पाद्री ह्या दोघांकडे एलिसा पापाचा कबुलीजबाब देण्यासाठी जात असे. उद्देश अर्थात हा की ज्युलिआँच्या प्रेमाप्रकरणाची इत्थंभूत हकीगत त्या दोघांना सांगण्याची संधी मिळाली.

अबे शॅलाँ यांनी ते सकाळी सहाला परत आल्यावर ज्युलिआँला बोलावणे पाठविले त्याला म्हणाले, “मी तुला काहीही विचारीत नाही. मी तुझ्याकडे याचना करतो आणि तशी गरज असल्यास तुला हुकूम करतो की मला काही एक सांगू नकोस. माझा असा आग्रह आहे की तीन दिवसांच्या आत तू एक तर बेझाँसाच्या

पाठशाळेत निघून जा; नाही तर तुझा मित्र फूके याच्याकडे जा. तुझ्या जीवनाला उत्तम रीतीने उपयोगी पडणारा कामधंदा तुला उपलब्ध करून देण्याची अजूनही फूकेची इच्छा आहे. मी पुढल्यामागल्या सर्व गोष्टींचा विचार केला आहे व सर्व व्यवस्थाही केली आहे. पण तू गेलेच पाहिजेस आणि व्हेरिएरला एक वर्षभर परत येता कामा नये."

ज्युलिआँने काहीच उत्तर दिले नाही. म. शॅलाँ हे काही त्याचे वडील नव्हते आणि तरी त्याची व्यवस्था केली असल्याचे ते म्हणाले. तेव्हा आपल्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने त्यांचे हे करणे आपण अपमानास्पद समजले पाहिजे की काय याबद्दल तो विचार करू लागला. शेवटी तो त्यांना म्हणाला, "उद्या याच वेळी आपणांस पुन्हा भेटण्याचा मान मला मिळावा."

जबरदस्तीने तरुण ज्युलिआँला वळवायचे जमेल अशा हिशोबाने म. शॅलाँ भराभर बोलतच राहिले. ज्युलिआँच्या वागणुकीचा रोख व त्याची मुद्रा यांच्यावर अतिशय लीनता दिसत होती. त्याने आपले तोंड मुळीच उघडले नाही.

अखेर तेथून त्याने आपली मुक्तता करून घेतली व मा. रेनॉल यांना ती गोष्ट सांगण्यासाठी तो घाईने गेला. पण त्या त्याला नैराश्यमग्न आढळल्या. त्यांचे पती नुकतेच त्यांच्याशी थोड्या मोकळेपणाने काही गोष्टी बोलून गेले होते. त्यांच्या स्वभावातील नैसर्गिक कमकुवतपणा बेझाँसाहून वारसा म्हणून मिळणाऱ्या संपत्तीमुळे प्रोत्साहित होऊन आपली पत्नी पूर्णपणे निष्पाप आहे असा निर्णय घेण्यास त्यांना भाग पाडीत होता. व्हेरिएर येथे सार्वजनिक मताला कोणते चमत्कारिक स्वरूप प्राप्त झाले होते ते त्यांनी पत्नीला प्रांजलपणे सांगितले. समाज चुकत होता; मत्सर करणाऱ्या व वाईट चिंतणाऱ्या लोकांमुळे समाज भलतीकडेच वाहवत गेला होता. पण आता काय करायचे?

मा. रेनॉल यांची पूर्वी क्षणभर अशी चुकीची कल्पना झाली होती की, ज्युलिआँ म. वालनो यांच्याकडील नोकरी पतकरील आणि व्हेरिएरला राहील. पण आता त्या गत वर्षीची साधी भित्री स्त्री उरल्या नव्हत्या. त्यांचे ते प्राणघातक उत्कट प्रेम, अधूनमधून त्यांना येणारे पश्चात्तापाचे झटके त्यांनी त्यांना योग्य बोध दिला होता. वाटेल ते झाले तरी कांही काळ वियोग आता अपरिहार्य आहे असे स्वतःशीच सिद्ध करण्याचे दुःख, पतीचे बोलणे ऐकत असता त्यांना सहन करावे लागले.

"माझ्यापासून दूर गेल्यावर ज्युलिआँ त्याच्या त्या महत्त्वाकांक्षी योजनांमध्ये परत मग्न होऊन जाईल; दुसरं काहीच नसलं म्हणजे तसं होणं साहजिकच आहे. आणि मी, हे परमेश्वरा! मी एवढा श्रीमंत आहे; पण माझं स्वतःचं सुख हस्तगत करण्यास असमर्थ आहे; तो मला विसरून जाईल. तो मोहक आहे. त्याच्यावर कोणीही प्रेम करील; तोही कोणावर प्रेम करील. अरेरे, मी एक दुःखी स्त्री आहे! मी कशाबद्दल तक्रार करू! आकाशातील देव न्यायी आहे; माझ्या पापाला पूर्णविराम देऊन मी पदरी पुण्य बांधून घेतले नाही. त्यामुळे माझी निर्णयशक्ती अंध बनली आहे. लाच देऊन एलिसाला मी सहज वश करून घेऊ शकले असते. त्यापेक्षा अधिक सोपं दुसरं काहीच नव्हतं. पण नीट विचार करण्याचे मी एक क्षणभरही कष्ट घेतले नाहीत आणि सदा सर्वकाळ प्रेमाच्या बेफाट कल्पनातच गुंगून गेले अन् आता माझा सत्यानाश होऊ घातला आहे."

अनुक्रमणिका

ज्युलिआँने त्याच्या गमनाचे भयंकर वृत्त मादामना सांगितले तेव्हा स्वार्थबुद्धीने त्यांच्याकडून त्याला विरोध करण्यात आला नाही ही गोष्ट त्याला विशेष जाणवली. रडू न देण्याचा त्या प्रयत्न करीत होत्या हे स्पष्ट होते.

"माझ्या मित्रा, आपल्याला खंबीरपणाची गरज आहे."

ज्युलिआँच्या केसांची बट मा. रेनॉलनी कापून घेतली व त्या म्हणाल्या, "माझं काय होणार आहे ते मला कळत नाही. पण मी मेले तर तुम्ही माझ्या मुलांना विसरणार नाही असं मला वचन द्या. तुम्ही त्यांच्याजवळ असा की दूर असा; सच्छील, सदाचारी व्यक्ती म्हणून त्यांचा विकास होईल असे प्रयत्न करा. पुन्हा एखादी क्रांती झाल्यास सगळे अमीर-उमराव ठार केले जातील, मुलांचे वडील कदाचित देशांतर करतील. छपरावर तो एक शेतकरी मारला गेला. त्याचा मृत्यू हेही त्याचे कारण ठरू शकेल. कुटुंबावर लक्ष असू द्या... तुमचा हात मला द्या," 'बरंय, ये माझ्या मित्रा. हेच आपले एकत्र सहवासाचे शेवटचे क्षण. हा एवढा स्वार्थत्याग केल्याने, समाजात मला प्रतिष्ठेने वावरण्यास धैर्य प्राप्त होईल अशी आशा मला वाटते."

निरोप देताना मा. रेनॉल अगदी हताश होतील अशी ज्युलिआँची अपेक्षा होती. पण त्यांनी ज्या साधेपणाने त्याला निरोप दिला; त्यामुळे तो भावनावश झाला. तो म्हणाला, "नाही; मी तुमचा निरोप याप्रमाणे घेणार नाही. मी तर जातोच. ह्या लोकांची तशी इच्छा आहे; तुमची स्वतःचीही इच्छा तशीच आहे. पण तीन दिवसांनी तुम्हांला भेटण्यासाठी मी रात्री परत येईन."

तेवढ्यात रेनॉल परतले. त्यांचे डोके ताळ्यावर नव्हते. दोन महिन्यांपूर्वी त्यांना मिळालेल्या निनावी पत्राचा उल्लेख त्यांनी प्रथमच पत्नीजवळ केला.

"ते पत्र कॅसिनोत घेऊन जाण्याचा माझा विचार आहे आणि त्या दळभद्र्या वालनोकडून आलेले पत्र म्हणून मी ते सर्वांना दाखविणार आहे. गटारातून वर काढून मी त्याचा उद्धार केला अन् त्याला व्हेरिएरचा एक खूप श्रीमंत माणूस बनविला. पण आता त्याला मी जाहीरपणे बदनाम करीन आणि मग त्याच्याशी द्वंद्वयुद्ध लढेन. आता हे फारच पुढे चाललंय."

मा. रेनॉल यांच्या डोक्यात विचार आला, "मी कदाचित विधवा होईन, हे परमेश्वरा" पण जवळजवळ त्याच क्षणी त्या स्वतःला म्हणाला, "हे द्वंद्वयुद्ध मी जर थांबवलं नाही तर मी माझ्या पतीची खुनी ठरेन. मी ते नक्की थांबवू शकेन."

याच्यापूर्वी मा. रेनॉल यांनी त्यांच्या पतीचा अहंकार इतक्या कौशल्याने कधीच हाताळला नव्हाता. दोन तासांच्या आत मादामनी त्यांना पटवून दिले की म. वालनो यांना त्यांनी पूर्वीपेक्षा अधिक स्नेहभाव दाखविला पाहिजे आणि एलिसालाही घरी परत कामावर घेतले पाहिजे. हे करताना मादामनी, रेनॉल जे जे मुद्दे पुढे आणीत त्यांचाच युक्तीने उपयोग करून घेतला होता. आपल्या सगळ्या कटकटींच्या बुडाशी असलेल्या एलिसाला पुन्हा नजरेसमोर आणायला मन तयार करण्यासाठी मादामना धैर्याची गरज लागली. पण त्याबद्दलचा विचार त्यांना ज्युलिआँनेच सुचविला होता.

अखेर तीन-चार वेळा रेनॉल यांना विचारांच्या बरोबर दिशेला वळविल्यानंतर ते आपणहूनच अशा कल्पनेप्रत पोहोचले की (आर्थिक दृष्टिकोणातून त्यांना ती कल्पना फारच ग्रस्त करणारी होती.) अवघ्या व्हेरिएरमध्ये खलबळ माजून व वावड्या उठून शहर प्रक्षुब्ध झाले असता ज्युलिआँने एम्. वालनो यांच्या मुलांचे शिक्षक म्हणून तेथे राहावे ही, त्यांच्या स्वतःच्या दृष्टीने घडून येणारी अतिशय अप्रिय गोष्ट होती.

अनाथाश्रमाच्या गव्हर्नरांनी देऊ केलेली नोकरी स्वीकारणे हे अगदी उघडपणे ज्युलिआँच्या हिताचे होते. तथापि एम्. द. रेनॉल यांच्या मोठ्या नावलौकिकाच्या दृष्टीने त्याने बेझाँसाच्या किंवा दिझाँच्या पाठशाळेत प्रवेश करण्यासाठी व्हेरियर सोडणे आवश्यक होते. पण हे त्याला कसे कबूल करायला लावायचे? आणि त्यानंतर दुसरे म्हणजे त्याने तेथील खर्च कसा चालवायचा?

सोसाव्या लागणाऱ्या आर्थिक त्यागाचे नजीक येणारे अरिष्ट लक्षात घेऊन स्वतः रेनॉल, त्यांच्या पत्नीपेक्षा जास्त हताश झाले होते. त्या संभाषणानंतर मा. रेनॉल यांची स्थिती, जीवनास कंटाळलेल्या भावनाशील माणसासारखी झाली. अशा माणसाने मादक द्रवाचा डोस घ्यावा आणि त्यामुळे त्याला कशातच रस वाटू नये; शिवाय त्याची कार्यशक्तीही पुष्कळशी नष्ट व्हावी (अपवाद फक्त स्वयंप्रेरित चलनवलनाचा) तशा स्थितिप्रत मा. रेनॉल पोहोचल्या होत्या. असेच चौदाव्या लुईला त्याच्या मृत्युशैयेवरून म्हणावे लागले होते. 'मी राजा होतो तेव्हा' मोठे प्रशंसनीय भाषण!

दुसऱ्या दिवशी सूर्योदयाच्या सुमारास एम्. द. रेनॉल यांना एक निनावी पत्र मिळाले. ते अतिशय अपमानास्पद पद्धतीने लिहिलेले होते. रेनॉल यांच्या प्रस्तुत परिस्थितीला लागू पडतील असे अतिग्राम्य शब्द पत्राच्या प्रत्येक ओळीतून त्यांच्याकडे वटारून पाहात होते. हाताखालच्या कोणा तरी मत्सरी इसमाचे ते काम होते. एम्. वालनो यांच्याशी द्वंद्वयुद्ध खेळण्याचा विचार ह्या पत्राने रेनॉल यांच्या मनात पुन्हा घोळू लागला. हा बेत ताबडतोब कृतीत उतरविण्याच्या कल्पनेपर्यंत त्यांच्या धैर्याची कमान लवकरच चढली स्वतःबरोबर कोणालाही न घेता ते घरातून बाहेर पडले आणि बंदूकवाल्याच्या दुकानी गेले. तेथून त्यांना पिस्तुलाची जोडी घ्यावयाची होती. ती भरून देण्यास त्यांनी दुकानदाराला सांगितले.

ते स्वतःशी म्हणाले, अखेर सम्राट नेपोलिअनचा करडा अंमल पुन्हा सुरू झाल्यास अर्ध्या पेनीचीसुद्धा अफरातफर केल्याचा आरोप माझ्यावर केला जाऊ शकणार नाही. फार तर मी डोळेझाक केलेली आहे. पण तसे करण्याचा अधिकार मला देण्यात आल्याची किती तरी पत्रे माझ्या मेजाच्या खणात आहेत.

मा. रेनॉल त्यांच्या पतीच्या निःशब्द पण तीव्र रागाने भयभीत झाल्या; त्याने त्यांच्या मनात वैधव्याचे घातक विचार पुन्हा जागृत केले व ते डोक्यातून घालवून देणे त्यांना फार कठीण झाले. बाहेरचा इतर संपर्क तोडून त्या पतीजवळ बसून राहिल्या. तासन् तास त्यांनी त्यांच्याशी चर्चा करीत राहून द्वंद्वयुद्धाचा विचार सोडून देण्याची कळकळीची विनंती केली; पण व्यर्थ; त्या ताज्या निनावी पत्रामुळे त्यांचा निर्धार दृढ झाला होता. पण मा. रेनॉलनी अखेरीस, वालनोला मारण्यासाठी आवश्यक असलेल्या रेनॉल यांच्या धैर्याचे रूपांतर ज्युलिआँला पाठशाळेतील निर्वाहासाठी एक वर्षपर्यंत सहाशे फ्रँक्स देण्याच्या कबुलीमध्ये करून घेण्यात यश मिळविले. मुलांसाठी शिक्षक घरी ठेवावयाचा घातक विचार त्यांच्या मनात ज्या दिवशी आला त्याला हजार शिव्याशाप देत रेनॉल ते निनावी पत्र विसरून गेले.

त्यांना एक कल्पना सुचली आणि तिने त्यांना अल्पसे समाधान दिले. ती कल्पना त्यांनी आपल्या पत्नीस सांगितली नाही. त्या तरुण मनुष्याच्या अवास्तव विचारांचा फायदा घेऊन आणि त्याला कौशल्याने हाताळून एका छोट्या रकमेवर, वालनोकडील नोकरी नाकारण्यास आपण त्याला बांधून घेऊ अशी आशा रेनॉलना वाटली.

अनाथाश्रमाच्या गव्हर्नरने जाहीर रीतीने ज्युलिआँला देऊ केलेल्या आठशे फ्रँकच्या नोकरीचा त्याने जर त्यांच्या पतीच्या सोयीसाठी त्याग केला तर संकोच न बाळगता त्याला काही नुकसान भरपाई स्वीकारता येईल हे ज्युलिआँला पटवून देणे मादामना खूपच जास्त कठीण गेले.

पण ह्या गोष्टीला ज्यलिआँचा विरोध चालू राहिला. तो म्हणाला, "पण ती नोकरी स्वीकारण्याचा थोडासासुद्धा विचार, माझ्या मनात कधीही, एक क्षणभरही आलेला नाही. सुसंस्कृत जीवन तुम्ही मला इतके परिचित करून ठेवले आहे की त्या लोकांची ग्राम्यता मला ठारच करून टाकील."

निष्ठुर गरजेने तिच्या पोलादी हाताने ज्यलिआँची इच्छा वाकविली. पण व्हेरिएरच्या महापौरांनी देऊ केलेली रक्कम केवळ कर्ज म्हणून स्वीकारून, आणि पाच वर्षांनी व्याजासह ती परत करण्याचे वचन चिठ्ठीवर लिहून देऊन त्याने आपला स्वाभिमान राखला. अर्थात ही स्वतःची एक प्रकारची फसवणूकच होती.

डोंगरातील छोट्या गुहेमध्ये छपवून ठेवलेले काही हजार फ्रँक अद्याप मा. रेनॉल यांच्याकडे होते. ते त्यांनी जरा भीतभीतच ज्यलिआँला देऊ केले; कारण रागाने तो ते नाकारील याची खात्री त्यांच्या मनाला वाटत होती.

ज्युलिआँने मॅडमना विचारले, "आपल्या प्रेमाची स्मृती तिरस्करणीय व्हावी अशी तुमची इच्छा आहे काय?"

अखेर ज्यलिआँने व्हेरिएर सोडले. रेनॉलना अत्यानंद झाला. त्यांच्याकडून पैसे स्वीकारण्याच्या निर्णायक क्षणी, ज्युलिआँला त्यांचा तो त्याग फारच मोठा वाटला. त्याने पैसे घेण्याचे स्पष्टपणे नाकारले. रेनॉल कृतज्ञतेने ज्युलिआँच्या अगदी गळ्यातच पडले. त्यांच्या डोळ्यांत अश्रू आले. आपल्या सद्वर्तनाबद्दलचे एक प्रशस्तिपत्र आपणास द्यावे अशी मागणी ज्युलिआँने रेनॉल यांच्याकडे केली. तेव्हा त्या तरुणाच्या योग्य वर्तनाची योग्य वाखाणणी करण्याइतपत प्रशंसेचे शब्द रेनॉल यांना त्यांच्या उत्साहाच्या भरता जणू सापडेनात. आमच्या नायकाने बचत करून पाच लुई वाचविले होते आणि आणखी तितकेच पैसे फूकेकडे मागण्याचा त्याचा विचार होता.

जाताना त्याचे मन बरेच विचलित झाले होते. पण जेथे प्रेमाचा एक अमोल ठेवा सोडून तो निघून जात होता त्या व्हेरिएरपासून तो एक लीग अंतर काटून गेला तेव्हा बेझाँसासारखे एक मोठे लष्करी केंद्र व राजधानी पाहण्याच्या आनंदाचाच फक्त विचार त्याच्या मनात चालू होता.

अल्पकालीन वियोगाच्या त्या तीन दिवसांत मा. रेनॉल यांना प्रेमाच्या एका अतिशय निष्ठुर अशा भ्रामक कल्पनेने खुळे करून सोडले होते. एकीकडे त्या स्वतः आणि दुसरीकडे त्यांच्या दुःखाची अंतिम परमावधी यांच्यामध्ये त्यांची, ज्युलिआँशी अद्याप व्हावयाची शेवटची भेट ही त्यांचे जीवन सुसह्य करणारी

गोष्ट होती. त्या आणि ती भेट यांच्यामध्ये येणारे ते तास, ते क्षण त्या मोजीत होत्या. अखेर तिसऱ्या दिवशी रात्री, त्या उभयतांनी ठरविलेल्या संकेताच्या खुणेचा आवाज दुरून त्यांना ऐकू आला. हजार धोके-संकटे उल्लंघून ज्युलिआँ त्यांच्यापुढे येऊन उभा ठाकला.

त्या क्षणापासून त्यांच्या डोक्यात जो एकमेव विचार सुरू झाला तो म्हणजे, 'मी आता तुमच्याकडे पाहत आहे ते अखेरचेच.' आपल्या प्रियकारच्या उत्कंठेला प्रतिसाद देण्याऐवजी त्या जवळजवळ एखाद्या सचेतन प्रेतासारख्या वागल्या. आपण ज्युलिआँवर प्रेम करीत असल्याचे त्याला सांगणे त्यांनी स्वतःला बळजबरीने भाग पाडले ते अशा हेंगाड्या आविर्भाने की त्यामुळे नेमके उलट भावनेचे प्रत्यंतर यावे. निरंतरच्या वियोगाचा निर्दय विचार त्यांच्या मनातून कोणतीही शक्ती हटवू शकत नव्हती. मा. रेनॉल आपल्याला यापूर्वीच विसरून गेल्या आहेत अशी कल्पना, संशयी ज्युलिआँने क्षणभर करून घेतली. ह्या शक्यतेबद्दलच्या त्याच्या सूचक उद्गारांना उत्तर मिळाले ते निशब्दपणे सतत गाळले जाणाऱ्या अश्रुपुराचे व त्याच्या हातावरील कंपित दाबाचे.

त्याच्या प्रणयिनीच्या थंडगार प्रेमसंपादणीला उत्तर देताना ज्युलिआँ म्हणाला, "पण, अरे देवा, मी तुमच्यावर भरवसा ठेवावा अशी अपेक्षा तुम्ही कशी बाळगता? तुम्ही यापेक्षा शंभरपट जास्त खरंखुरं प्रेम मा. डेरविलाना किंवा एखाद्या साध्या परिचिताला दाखवाल."

हे ऐकून तर मा. रेनॉल दगडासारख्या निश्चेष्ट झाल्या. त्यावर उत्तर कसे द्यावे हेच त्यांना कळेना. त्या म्हणाल्या, "माझ्यापेक्षा अधिक हातभागी अशी स्त्री सापडणे अशक्य आहे...... मी मेले तर किती छान होईल! माझं हृदय गोठून जात आहे असं मला भासत आहे."

मा. रेनॉल यांच्याकडून ज्युलिआँ काढून घेऊ शकला ती सर्वांत लांब उत्तरे ही अशी एवढीच होती.

दिवस उजेडायची वेळ झाल्याने ज्युलिआँने निघून जाणे आवश्यक झाले तेव्हा मादामचे अश्रू एकदम आटून गेले. एकही शब्द न बोलता व त्यांची चुंबने परत न करता, ज्युलिआँने खिडकीला एक दोरी घट्ट गाठ मारून बांधल्याचे मादामनी पाहिले. ज्युलिआँ आपल्याकडून खूप म्हणत होता,

"तुम्ही जिची खूप इच्छा केली होती त्या स्थितिप्रत आपण अखेर पोहोचलो आहोत ना. इथून पुढे तुम्ही पश्चात्तापाशिवाय जगाल. तुमच्या मुलांपैकी एखाद्याला अगदी किरकोळ असा आजार झाल्यास, आता ती तुम्हाला तत्पूर्वीच थडग्यात पोहोचली आहेत असे यानंतर वाटणार नाही." पण मा. रेनॉल त्याला अगदी थंडपणे म्हणाल्या, "तुम्ही स्टॅनिस्लासला निरोप देऊ शकला नाहीत याचं मला फार वाईट वाटतं."

अखेरीस मा. रेनॉल यांच्या आलिंगनांचा खोलवर परिणाम ज्युलिआँवर झाला; त्यांच्यात ऊब नव्हती; जिवंत प्रेताचीच ती आलिंगने होती. काही लीग चालून जाईपर्यंत तो दुसऱ्या कशाचाच विचार करू शकत नाही. तो अगदी नाउमेद होऊन गेला होता; आणि खिंड ओलांडून जाण्यापूर्वी, जोवर त्याला व्हेरिएरच्या चर्चचा अत्युच्च भाग दिसत होता तोवर तो पुन्हा पुन्हा मागे वळून पाहात होता.

★ ★ ★

अनुक्रमणिका

**प्रकरण चोविसावे**

## राजधानी

अखेर दूर पर्वतावर काळसर भिंतीची एक रेघ ज्युलिआँला दिसून आली. तो बेझाँसाचा बोलेकिल्ला होता. उसासा टाकून ज्युलिआँ स्वतःशी बोलला, "एखाद्या लष्करी तुकडीतील सब-लेफ्टनंट म्हणून ह्या भव्य किल्ल्याच्या रक्षणासाठी, माझं आगमन इथं होऊ शकलं असतं तर ते माझ्या दृष्टीनं किती चांगलं ठरलं असतं!"

बेझाँसा हे काही फ्रान्समधील एक केवळ अत्यंत सुंदर शहर नाही; तर तेथे भावनाशील व हिंमतवान स्त्रीपुरुषांचीही विफलता आहे. पण ज्युलिआँ केवळ एक तरुण शेतकरी होता; व त्या प्रतिष्ठित लोकांशी संपर्क साधण्याचा मार्ग त्याला उपलब्ध नव्हता.

एखादा सर्वसाधारण नागरिक वापरील असा एक साधा कोट त्याने फूकेकडून उसना आणला होता आणि तशा पोषाखातच त्याने तिथले झुलते पूल पार केले होते. त्याच्या मनात प्रकर्षाने विचार चालू होते ते १६७४ मध्ये वेढा घातला जाऊन बेझाँसा हस्तगत करण्यात आले होते त्याबद्दलचे. पाठशाळेत जाऊन एकदाचे स्वतःला अडकवून घेण्यापूर्वी तो किल्ला व त्याचे ते तट पाहण्याचा निश्चय त्याने केला. एकापेक्षा अधिक वेळा तो तेथील पहारेकऱ्याकडून पकडला जाण्याच्या बेतात होता. कारण किल्ल्यातील इंजिनिअरांनी आमजनतेला जो भाग प्रवेशबंद केलेला होता तेथे तो प्रवेश करीत होता. किल्ल्याच्या त्या भागात वाढणारे गवत विकून दरसाल बारा-पंधरा फ्रँक्सचा फायदा ते लोक काढीत असत.

किल्ल्याच्या तटांची उंची, खंदकाची खोली आणि पाहणाऱ्याच्या मनात जरब निर्माण करणाऱ्या तोफा यांच्याविषयीच्या विचारांनी ज्युलिआँचे मन कित्येक तास व्यापून टाकले. नंतर तिथल्या दुतर्फा झाडीच्या रस्त्यावरील मुख्य उपाहारगृहाजवळून तो जात असता कौतुकाने भारला जाऊन तो स्तब्ध उभा राहिला. दोन प्रशस्त दरवाजांवर असलेली मोठ्या अक्षरांतील उपाहारगृहाची पाटी तो वाचू शकत होता; तरी त्याचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसेना. स्वतःचा भित्रेपणा झटकून टाकण्याचा प्रयत्न त्याने केला आणि आत जाण्याची धिटाई केली; तेव्हा तीस-चाळीस फूट लांबीच्या आणि ज्याचे छत निदान वीस फूट उंच होते अशा एका मोठ्या दिवाणखान्यात आपण आलो असल्याचे त्याच्या लक्षात आले. अत्यंत महत्त्वाच्या या दिवशी प्रत्येकच गोष्टीला त्याच्या दृष्टीत एक आकर्षक, भारलेले स्वरूप प्राप्त झाले होते.

बिलिअर्डचा खेळ तेथे दोन ठिकाणी चालू होता. खेळाडूने मिळविलेल्या गुणांची संख्या अनुचर मोठ्याने ओरडून सांगत होते. खूप प्रेक्षक होते. त्यांच्या गर्दीतून खेळाडू टेबलाभोवती द्रुत गतीने फिरत होते. प्रत्येकाच्या मुखातून तंबाखूच्या धुराचे लोटचे लोट बाहेर पडत होते. त्या सर्व मंडळींना तेथे जणू धूराच्या निळ्या धुक्याने वेढून टाकले होते. उणीपुरी देहयष्टी, गरगरीत पुष्ट स्कंद, भरदार चाल, झुपकेबाज कल्ले, अंगावरील लांब कोट ह्या त्यांच्या सर्व गोष्टींनी ज्युलिआँचे लक्ष वेधून घेतले. प्राचीन काळाच्या बिझाँटिअमचे ते उमदे सुपुत्र एकमेकांशी मोठ्याने ओरडूनच बोलत होते. आपण जसे काही कोणी मोठ्ठे लढवय्ये आहोत अशी ऐट ते आणित होते. त्यांच्याबद्दलच्या कौतुकाने ज्यलिआँ मंत्रमुग्ध झाल्याप्रमाणे निःशब्द होऊन उभा राहिला. बेझाँसासारख्या महान राजधानीच्या विस्तीर्णतेचे व वैभवाचे विचार त्याच्या मनात चालू होते.

बिलिअर्डच्या खेळातील गुण लिहिणाऱ्या, त्या अहंमन्य नजरेच्या सद्‌गृहस्थांपैकी एखाद्याकडे कपभर कॉफी मागण्याइतकेही धैर्य आपल्याला स्वतःच्या अंगी बहुधा आणता येणार नाही असे त्याला वाटले.

पण पैसे घेण्याच्या कठड्यामागील तरुणीने ह्या तरुण ग्रामीण बांधवाचा मोहक चेहेरा हेरला होता. ज्युलिआँ शेगडीपासून तीन पावलांवर येऊन थबकला होता. त्याने आपल्या बगलेत त्याचे गाठोडे घट्ट धरलेले होते. चमकणाऱ्या सफेत प्लॅस्टरमधील राजाचा पुतळा तो नीट न्याहाळून पाहात होता. ती फ्रॉंकॉंत्वाइ तरुण स्त्री मोठी उफाड्याच्या तब्येतीची होती. तिचा बांधा अतिशय प्रमाणशीर होता. ते उपाहारगृह उच्च दर्जाचे वाटावे अशा पद्धतीचा पोषाख तिने मुद्दाम केलेला होता. फक्त ज्युलिआँला तिचे बोलणे ऐकू जाऊ शकेल इतक्या बारीक व खालच्या स्वरात ती आधीच दोनदा "साहेब, साहेब," असे म्हणाली होती. तिच्या अत्यंत मार्दवयुक्त, निळ्या डोळ्यांशी ज्युलिआँची नजर भिडली आणि त्याला कळून आले की ती त्यालाचा हाक मारीत होती.

चपळपणे पावले टाकीत तो तिच्या कठड्याजवळ गेला. शत्रू समोर ठाकला असता एखाद्यने धैर्याने पुढे सरावे त्याप्रमाणे तो त्या सुंदर मुलीजवळ गेला. पण याप्रमाणे "चाल" करीत असता त्याचे ते गाठोडे मात्र जमिनीवर खाली पडले.

एखद्या उपाहारगृहात कसा भारदस्तपणे प्रवेश करावा याबाबततचे शिक्षण पॅरिसच्या ज्या तरुण, हुषार विद्यार्थ्यांना वयाच्या पंधरा वर्षांपूर्वीच प्राप्त झालेले असते, त्यांच्या मनात आमच्या ह्या गावठी माणसाने दया निर्माण केली नसेल काय? पण पंधराव्या वर्षी एवढी ऐटबाज असणारी ही मुले अठराव्या वर्षी "बेंगरूळ" बनायला सुरुवात होते. ग्रामीण भागात वरचेवर दृष्टोत्पत्तीस येणारा कमालीचा बुजरेपणा कधीकधी स्वतःवर मात करतो आणि मग त्या बुजरेपणाचा बळी झालेल्या त्या व्यक्तीला आसक्तीची दीक्षा देतो. ज्युलिआँशी बोलण्याचा अनुग्रह करणाऱ्या त्या सुंदर मुलीजवळ जेव्हा तो आला तेव्हा स्वतःशी म्हणाला, "मला तिला सत्य सांगितलं पाहिजे." स्वतःच्या बुजरेपणावर मिळविलेल्या विजयाच्या बळामुळे आता त्याचा धीटपणा वाढू लागला होता.

"बाईसाहेब, मी माझ्या आयुष्यात प्रथमच बेझाँसाला आलेलो आहे. मला एक कपभर कॉफी आणि थोडा पाव, पेसे देऊन घ्यायला आवडेल." त्या मुलीने स्मित केले व नंतर ती लाजली. बिलिअर्ड खेळणारांचे लक्ष त्या देखण्या तरुणाकडे गेल्यास ते कदाचित त्याचा उपहास करतील व त्याला खर्ची टाकून चेष्टा करतील अशी भीती तिला वाटली. तसे झाल्यास तो भयभीत होईल आणि तेथे आपले तोंड पुन्हा कधी दाखविणार नाही असेही तिला वाटले.

ती त्याला म्हणाली, "बसा इथं, माझ्याजवळ." आणि तिने एका संगमरवरी मेजाकडे बोट दाखविले. खोलीत खूपच पुढे आलेल्या, पैसे घेण्याच्या त्या मोठ्या महॉगनी कठड्याच्या आड ते मेज जवळ जवळ लपून गेलेले होते.

ती मुलगी कठड्यावर वाकली. तेव्हा तिच्या कमनीय आकृतीचे दर्शन घडविण्यास तिला संधी मिळाली. ज्युलिआँने निरखून पाहिले आणि त्याच्या सगळ्या कल्पना बदलल्या. त्या सुरेख मुलीने त्याच्यापुढे एक कप, थोडी साखर व पाव ठेविला होता. कॉफी आणण्यासाठी तिने अनुचराला बोलाविण्यास जरा

काचकूच केली. अनुचर तेथे आल्यास ज्युलिआँशी तिचे चालणारे खासगी संभाषण संपुष्टात येईल हे तिने जाणले.

ज्युलिआँ विचारात मग्न झाला होता. ज्या काही स्मृती त्याला पुष्कळदा चेतवीत असत त्यांच्याशी त्या मुलीच्या आकर्षक व चुणचुणीत सौंदर्याची तुलना तो करीत होता. ज्या उत्कट भीतीचे तो लक्ष्य बनला होता त्या प्रीतीच्या विचाराने त्याच्यातील भित्रेपणा जवळजवळ घालवून टाकला. त्या मुलीला केवळ एक क्षण मिळाला होता. ज्युलिआँच्या डोळ्यांतील भाव तिने ओळखले. ती त्याला म्हणाली, “ह्या चिलमीच्या धुराने तुम्हांला खोकला येतोय. उद्या सकाळी आठच्या आधी न्याहारीला या. सकाळची बहुधा मी एकटीच असते इथं.” सुखद बुजरेपणाचे लडिवाळ स्मित करीत ज्युलिआँने विचारले,

“तुमचे नाव काय?”

“आमॉन्दा बिने.”

“याच्यापेक्षा मोठी नसलेली एक बंगी तासाभराच्या अवधीत तुमच्याकडे पाठवायला मला तुमची परवानगी मिळेल का?” सुरेख आमॉन्दा क्षणभर विचारात पडली. “माझ्यावर पाळत असते. तुम्ही जे विचारीत आहात त्याने मी कजाचित गोत्यात येईन. तथापि मी आता एक चिठ्ठिवर माझा पत्ता लिहिते. ती चिठ्ठी तुम्ही तुमच्या बंगीला जोडून ती मला पाठवा. काही भिऊ नका.”

“माझं नाव ज्युलिआँ सोरेल. माझ्या नात्याचं इथं कुणी नाही आणि मित्रही कुणी नाहीत इथं बेझाँसामध्ये.” तरुण ज्युलिआँ बोलला.

“अस्सं, आता माझ्या लक्षात आलं.” ती आनंदाने उद्गारली. “तुम्ही कायद्याच्या शाळेसाठी आला आहात वाटतं?” त्यावर ज्युलिआं उत्तरला,

“अरेरे, तसं नाही हो, मला धर्मशास्त्र पाठशाळेत पाठविण्यात येत आहे.” हे ऐकून संपूर्णपणे नाऊमेद झालेल्या आमॉन्दाच्या चेहेऱ्यावरील तजेला मावळला. तिने उपाहारगृहाच्या अनुचराला बोलाविले. आता तिला जरूर ते धैर्य प्राप्त झाले होते. अनुचराने ज्युलिआँसाठी कॉफी ओतली; त्याच्याकडे पाहिलेसुद्धा नाही.

आमॉन्दा कठड्याजवळ पैसे घेत होती. तिच्याशी बोलण्यास धजल्याबद्दल ज्युलिआँला स्वतःचा अभिमान वाटला. एका बिलिअर्ड टेबलाजवळ कसले तरी भांडण जुंपले होते. खेळाडूंचे ओरडणे आणि एकमेकांना खोटे पाडणारा वादविवाद यांच्या प्रतिध्वनींनी तो प्रशस्त दिवाणखाना दुमदुमून गेला होता. त्या मोठ्या थोरल्या गलक्यामुळे ज्युलिआँ आश्चर्यचकित झाला. आमॉन्दा विचाराधीन झाली होती. तिने डोळे वर करून पाहिलेही नाही.

ज्युलिआँ एकदम खात्रीपूर्वक म्हणाला, “मादाम, तुम्हांला योग्य वाटत असल्यास, मी तुमचा दूरचा एखादा भाऊ आहे असे सांगू शकेन.”

अनुक्रमणिका

ज्युलिआँच्या ह्या अधिकारयुक्त शब्दांच्या ढबीने आमॉन्दाला आनंद झाला. तिला वाटले, "हा काही अगदीच कोणी असातसा क्षुल्लक माणूस दिसत नाही." त्याच्याकडे न पाहता आणि कठड्याकडे कोणी येत आहे किंवा काय याकडे आपली शोधक नजर ठेवीत ती अगदी चटकन् म्हणाली,

"दीसाँजवळच्या जाँलीची मी राहणारी आहे; तुम्हीही तेथलेच राहणारे आहात आणि माझ्या आईचे एक दूरचे भाऊ लागतात असं सांगा."

"मी लक्षात ठेवतो."

"सेमिनरीमधील तरुण लोक उन्हाळ्यात गुरुवारी संध्याकाळी पाच वाजता ह्या उपाहारगृहावरून जातात."

"असा मी जात असताना, जर तुमच्या मनात माझ्याबद्दलचे विचार असतील तर तुमच्या हातात व्हायोलेट फुलांचा एक गुच्छ ठेवा."

आमॉन्दाने त्याच्याकडे आश्चर्ययुक्त नजरेने पाहिले. ह्या नजरेने ज्युलिआँच्या धैर्याचे रूपांतर अविचारी साहसात केले. बोलताना तो अतिशय लाजला; तरी पण आमॉन्दाला उद्देशून म्हणाला, "मला वाटतं की मी तुमच्यावर अगदी जबरदस्त प्रेम करीत आहे."

"तर मग एवढ्या मोठ्याने बोलू नका." तिने बावरून त्याला धोक्याची सूचना दिली.

वेर्जीला आढळलेल्या एका जुन्या कादंबरीतील भाषा आठवण्याचा प्रयत्न करून पाहावा असे ज्युलिआँला वाटले. त्याच्या स्मरणशक्तीने इमान राखले. नंतर दहा मिनिटेपर्यंत तो आमॉन्दाला त्या "नौव्हेल हिलाइसे" कादंबरीतील काही भाग पाठ म्हणून दाखवीत होता. तो ऐकून तिला हर्षाच्या उकळ्या फुटल्या होत्या. ज्युलिआँलाही स्वतःच्या धैर्याबद्दल आनंद झाला. अगदी तेवढ्यातच त्या सुंदर फ्राँ कॉन्त्वाइ मुलीचा चेहरा बर्फासारखा थिजलेला दिसला.

तिचा एक चाहता उपाहारगृहाच्या प्रवेशद्वारात उभा होता. शीळ घालीत व खांदे उडवीत तो कठड्याजवळ आला. ज्युलिआँकडे त्याने डोळे वटारून पाहिले. ज्युलिआँचे विचार नेहमीच आत्यंतिक असत. क्षणभर त्याच्या मनात द्वंद्वयुद्धाचे भरमसाट विचार आले. तो भयंकर फिका पडला, त्याने कॉफीचा कप बाजूला सारला, चेहेऱ्यावर निर्धाराचा आव आणला आणि अतिशय बारकाईने त्याने त्याच्या त्या प्रतिस्पर्ध्याचे निरीक्षण केले. ज्युलिआँच्या प्रतिस्पर्ध्याने कठड्यावर सरावाप्रमाणे स्वहस्तेच चषकात मद्य ओतले. तेव्हा त्याचे डोके खाली लवलेले होते. तितक्यात आमॉन्दाने ज्युलिआँला त्याची रोखलेली नजर खाली करण्यास फर्मावले. त्याने तिचा हुकूम मानला; आणि क्षण, दोन क्षण तो आपल्या जागी निश्चेष्टपणे बसून राहिला. त्या वेळी तो निस्तेज पण करारी दिसत होता. आता काय घडणार आहे ह्याचाच फक्त विचार त्याच्या डोक्यात चालू होता. त्या क्षणी तो खरोखरी फारच उमदा दिसत होता. त्याची नजर पाहून त्याचा प्रतिस्पर्धी चकित झाला होता. त्याने त्याच्या चषकातील मद्याचा एकच घोट घेऊन तो एकदम रिकामा केला. आमॉन्दाशी तो काही थोडा बोलला. त्याच्या मोठ्या डघळ कोटाच्या दोन्ही बाजूंच्या खिशांत त्याने आपले हात खुपसले आणि तो एका बिलिअर्ड टेबलाकडे निघून गेला. जाताना त्याने ज्युलिआँकडे डोळे वटारून

पाहिले; व मोठा श्वास घेऊ “हूः” असे केले. ज्युलिआँने अतिशय संतापाने उसळी घेतली. तो उभा राहिला. पण त्याचा अपमान करण्यासाठी आपण निश्चितपणे काय करावे याचे त्याला नीट आकलन झाले नाही. त्याने आपले ते छोटे गाठोडे बाजूला ठेवले आणि शक्य तेवढ्या आढ्यतापूर्ण गतीने तो टांगा टाकीत बिलिअर्ड टेबलाकडे गेला.

आतून येणारा शहाणपणाचा इषारा व्यर्थ ठरत होता. बेझाँसाला आलास त्याच दिवशी द्वंद्वयुद्ध म्हणजे तुझ्या धर्मशाखेतील जीवनक्रमाची इतिश्रीच म्हणावयाची!’

“तसं झालं म्हणून काय बिघडलं? पण मी अपमानापुढे नमलो, कचरलो असं तरी निदान कधीच म्हटलं जाणार नाही.” त्या इषाऱ्याला ज्युलिआँचे उत्तर.

आमॉन्दाला ज्युलिआँची धैर्याची वागणूक पाहिली. त्याच्या वागण्यातील साधेपणाशी विरोधाने खुलून दिसत होते. एका क्षणात तिने त्या लांब कोटवाल्या मोठाड तरुणापेक्षा ज्युलिआँला जास्त गुण दिले. ती जागेवरून उठली. आणि रस्त्याने जाणाऱ्या कोणी तरी माणसाच्या हालचालींवर आपण नजर ठेवीत आहोत असा बहाणा करीत ती ज्युलिआँ आणि बिलिअर्ड टेबल यांच्यामध्ये चपळाईने जाऊन उभी राहिली.

“त्या गृहस्थांच्याकडे तुम्ही असं तिरकसपणे, संशयाने बघायचं नाही; ते माझे मेव्हणे आहेत.”

“असतील. मला काय त्याचे! त्यानेच माझ्याकडे तसं पाहिलं.”

“मला भानगडीत गोवावं असं तुम्हांला वाटतं का? त्यांनी तुमच्याकडे पाहिलं हे खरं आहे; कदाचित ते तुमच्याकडे येतील अन् तुमच्याशी बोलतीलसुद्धा. तुम्ही माझ्या आईकडून नात्याने आहात असं मी त्यांना सांगितलं आहे. ते फ्राँ काँत्वा आहेत आणि बर्गंडीला जाणाऱ्या रस्त्यावरील डोलच्या पलीकडे कधीही गेलेले नाहीत. तेव्हा तुम्हाला वाटेल तसं तुम्ही त्यांच्याशी बोला; भीती बाळगू नका.”

तथापि बोलावे, न बोलावे असा संदेह ज्युलिआँच्या मनात चालू राहिला. उपाहरगृहातील मद्य पुरविणाऱ्या नोकराणीजवळ असलेल्या कल्पनाशक्तीने आमॉन्दाला खोट्यानाट्या गोष्टींचा भरपूर पुरवठा होत असे. घाईने ती पुढे आणखी म्हणाली, “हो; असं म्हणायला हरकत नाही की त्यांनी तुमच्याकडे जरूर पाहिलं. पण तुम्ही कोण आहात हे मला विचारीत असताना त्यांनी पाहिलं होतं. ते प्रत्येकाशीच असे उर्मटपणे वागतात; तुमचा अपमान करण्याचा त्यांचा उद्देश नव्हता.”

त्या तथाकथित मेव्हण्याच्या मागे ज्युलिआँची नजर फिरत होती. दोन्ही बिलिअर्ड टेबलांच्या पलिकडे एक विशिष्ट खेळ (Pool) सुरू झाला होता. तेथे पैसे देऊन त्या मेव्हण्याने एका क्रमांकाची चिठ्ठी विकत घेतल्याचे ज्युलिआँने पाहिले. “मी तयार आहे असे तो मोठ्याने बोलला तेही ज्युलिआँने ऐकले. आमॉन्दाच्या पाठीमागून चपळाईने निघाला आणि बिलिअर्डच्या टेबलाकडे त्याने एक पाऊस टाकले.

आमॉन्दाने त्याचा दंड धरला ती त्याला म्हणाली, “चला, इकडे या अन् आधी मला पैसे द्या.”
ज्युलिआँला वाटले, “अगदी बरोबर. मी पैसे न देताच निघून जाईन अशी भीती तिला वाटत आहे.”

अनुक्रमणिका

आमॉन्दा ज्युलिआँइतकीच प्रक्षुब्ध झाली होती, लाल पडली होती. ज्युलिआँला द्यावयाची मोड शक्य तितक्या सावकाशीने मोजीत ती त्याला उद्देशून ओठातल्या ओठात पुटपुटली, “अगदी या क्षणी इथून निघून जा. तुम्ही मला खूप आवडता, तरी पण इथून तुम्ही न गेल्यास यानंतर मात्र तुम्ही मला आवडणारा नाहीत.”

ज्युलिआँ खरोखरीच तेथून निघून गेला. पण संथपणे तो स्वतःला म्हणाला, “आता ह्या उर्मट माणसाजवळ जाऊन त्याच्याकडे डोळे वटारून पाहणे आणि त्याच्या तोंडावर मोठा श्वास सोडून ‘हूः’ करणे हे माझे कर्तव्यच ठरत नाही काय?”

उपहारगृहाच्या बाहेरील दुतर्फा झाडीच्या मार्गावर ह्या विचाराच्या अनिश्चित अवस्थेने त्याला सुमारे तासभर उभे केले. मघाचा तो मनुष्य बाहेर येतो की काय यावर त्याने लक्ष ठेविले. पण तो आला नाही आणि ज्युलिआँ मग निघून गेला.

बेझाँसामध्ये ज्युलिआँ आल्याला फक्त काही तासच झाले होते. पण तेवढ्यात पश्चात्ताप वाटण्यासारखा अनुभव त्याच्या वाट्याला आला. म्हाताऱ्या सर्जन जनरलने संधिवाताचा त्रास त्याला होत असूनही, बऱ्याच वर्षांपूर्वी त्याला दांडपट्ट्याचे, तलवारीचे हात करण्याचे काही पाठ दिले होते. स्वतःच्या रागाच्या उपयोगासाठी त्याच्याजवळ जी शास्त्रीय ज्ञानाची पुंजी उपलब्ध होती ती इतकीच. पण कोणाला एखादा तडाखा लगाविल्याशिवाय भांडण कसे उकरून काढावे याची माहिती त्याला असती तर या क्षणी उडालेल्या त्याच्या गोंधळाचे त्याला काहीच वाटले नसते; आणि ते दोघे जर गुद्दागुद्दीवर आले असते तर राक्षसी माणूस असलेल्या त्याच्या त्या प्रतिस्पर्ध्याने त्याला चांगलाच चोप देऊन त्याची दाणादाण उडवून टाकली असती.

ज्युलिआँ विचार करू लागला, “माझ्यासारख्या गरीब भणंगाजवळ पैसा नसेल किंवा त्याला कोणी त्राते, रक्षक नसतील तर पाठशाळा आणि तुरुंग या दोहोंमध्ये माझ्या दृष्टीने काही मोठासा फरक नाही. जिथे मी माझ्या अंगात काळा कोट घालू शकेन अशा एखाद्या पथिकाश्रमात मला माझे हे सामान्य नागरिकाचे साधेसुधे कपडे ठेवले पाहिजेत. कधी काळी मी जर तास, दोन तास पाठशाळेतून बाहेर सटकू शकलो तर मी त्या साध्या कपड्यांत मिस आमॉन्दाला पुन्हा सहज भेटू शकेन.” ज्युलिआँची ही विचारसरणी अगदी तर्कशुद्ध होती; पण तेथून जाताना वाटेत त्याला जे सर्व पथिकाश्रम क्रमाने दिसले त्यांपैकी एकाही ठिकाणी शिरण्याचे धाडस त्याला झाले नाही.

अखेर तो पुन्हा हॉटेल ॲम्बेसड्यूरजवळ आला असता त्याच्या भिरभिरणाऱ्या नजरेची भेट झाली ती एका धट्ट्याकट्ट्या स्त्रीच्या नजरेशी. ती स्त्री अजून बरीचशी तरुण दिसत होती. तिचा गौर वर्ण लाल रंगावर होता. तिची मुद्राही आनंदी, समाधानी दिसत होती. ज्युलिआँ तिच्याजवळ गेला आणि त्याने स्वतःची हकीगत तिला निवेदन केली. ॲम्बेसड्यूर हॉटेलची ती मालकीण ज्युलिआँला त्यावर म्हाणाली, “अलबत, माझ्या छानदार तरुण पाद्रीसाहेबा, तुमचे ते साधे नागरी कपडे मी ठेवून घेईन तुमच्यासाठी; फार काय, मी नियमितपणे त्यांची साफसफाईही करीत जाईन. आता पडली आहे तशा हवेत जाड कापडाचा कोट तसाच ठेवून देणे चुकीचे ठरते.” तिने एक किल्ली घेतली आणि स्वतःच पुढे होऊन ज्युलिआँला झोपण्याची खोली दाखविली. तेथे तो ठेवणार असलेल्या कपड्यांची यादीही करण्यास तिने त्याला सांगितले.

नंतर ज्युलिआँ खाली स्वयंपाकघरात आला तेव्हा ती जाडजूड स्त्री त्याला म्हणाली, “मन्स्यूर ल अबे सोरेल साहेब, या कपड्यात तुम्ही किती छान दिसता! तुमच्यासाठी मी चांगल्या जेवणाची व्यवस्था करणार आहे.” आणि खालच्या आवाजात ती पुढे म्हणाली, “त्याबद्दल तुम्हाला फक्त वीस सू द्यावे लागतील. लोक साधारणपणे त्याबद्दल पन्नास सू देतात. तुमच्या छोटेखानी पैशाच्या पिशवीतून तुम्ही काळजीपूर्वक खर्च केला पाहिजे.”

“माझ्याजवळ दहा लुई आहेत की.” ज्युलिआँने थोड्याशा अभिमानानेच उलट प्रत्युत्तर दिले.

त्यावर ती भली हॉटेल मालकीण धोक्याची सूचना देत म्हणाली, “ओहो! देवा रे देवा! पण असं मोठ्याने बोलू नका. इथं बेझाँसामध्ये खूप वाईट लोक आहेत. अगदी पाहता पाहता तुमच्याकडून ते पैसे काढून घेतील. काहीही झालं तरी तुम्ही इथल्या उपाहारगृहात जाऊ नका. लुच्च्या लोकांनी भरलेली आहेत ती.”

“खरं म्हणता?” ज्युलिआँ बोलला. त्या बाईच्या शेवटच्या वाक्याने त्याच्या विचारांना खाद्य पुरविले होते.

“इथं माझ्याकडे येत जा; इतर कुठेही जात जाऊ नका. मी तुम्हाला तुमची कॉफी देत जाईन. हे लक्षात ठेवा की, इथं तुम्हाला वीस सूमध्ये नेहमी एक मित्र व चांगलं जेवण मिळत जाईल. हे एवढं तुमच्यासाठी अगदी पुरेसं आहे असं मला वाटतं. भोजनाच्या त्या मेजाशी जाऊन बसा. मी स्वतःच तुम्हाला वाढणार आहे.”

ज्युलिआँ तिला म्हणाला, “मला अन्नसेवन करायला जमणार नाही. माझं मन फार प्रक्षुब्ध झालेलं आहे. इथून निघाल्याबरोबर मी लगेच पाठशाळेत प्रवेश घेणार आहे.”

त्या भल्या स्त्रीने ज्युलिआँचे खिसे खाद्यपदार्थांनी भरून होईपर्यंत त्याला जाऊ दिले नाही. अखेर ज्युलिआँ त्या भीतिदायक स्थळाकडे मार्गस्थ झाला. ती मालकीण आपल्या दरवाजातून त्याला मार्ग दाखवीत होती.

★ ★ ★

अनुक्रमणिका

## प्रकरण पंचविसावे

# धर्मशास्त्राची पाठशाळा

दरवाजावरचा, सोनेरी मुलामा केलेला लोखंडी क्रॉस ज्युलिआँला दुरूनच दिसला. आस्ते आस्ते तो त्याच्या दिशेने चालत गेला. आपले पाय खचले आहेत, फार गळून गेले आहेत असे त्याला वाटले. तो पुटपुटला, "हूं; जिथून माझी सुटका कधीच होऊ शकणार नाही तो पृथ्वीवरचा नरक इथे आहे तर." शेवटी दारावरची घंटी वाजविण्याचे त्याने ठरविले. घंटी वाजली; पण जणू काही एखाद्या निर्जन जागी तिच्या आवाजाच्या प्रतिध्वनी उमटत होता. काळा पोषाख केलेला एक निस्तेज माणूस दहा मिनिटांनी आला आणि त्याने दार उघडले. ज्युलिआँने त्याच्याकडे पाहिले आणि लगेच स्वतःची नजर खाली वळविली. आलेल्या द्वारपालाची चेहेरेपट्टी मोठी तऱ्हेवाईक होती. त्याच्या डोळ्यांतील ठळक, हिरवी बुबुळे, मांजराच्या बुबुळांप्रमाणे बहिर्गोल होती. डोळ्यांची उघडझाप न करणाऱ्या त्याच्या अंतःकरणात कोणत्याही मानवी भावना वसणे अशक्य असल्याचे जाहीर करीत होती. त्याचे पातळ ओठ तोंडाच्या दोन्ही बाजूंना जास्त पसरट होत गेले होते आणि पुढे आलेल्या त्याच्या दातांवर त्याच्या ओठांना बाक आलेला होता. पण तरीही तशा ठेवणीचा त्याचा तो चेहेरा गुन्हेगारीची छटा विशेष प्रमाणात सूचित करीत नव्हता, त्या मानाने अधिक प्रमाणात जास्त मोठे भय निर्माण करणारी, संवेदनांची संपूर्ण अक्षमता त्याच्यावर अधिक सूचित केली जात होती. त्या माणसाच्या लांबट, स्वसंतुष्ट चेहेऱ्यावर ज्युलिआँने क्षणैक नजर टाकली तेव्हा केवळ एकच भावना त्याला त्या चेहेऱ्यावर दिसली; ती म्हणजे ज्या विषयाचा संबंध दुसऱ्या व चांगल्या जगताशी नाही अशा, त्याच्यासमोर काढलेल्या कुठल्याही विषयाबद्दल अत्यंत तीव्र तिरस्कार.

ज्युलिआँने आपली नजर प्रयत्नपूर्वक वर केली आणि स्वतःच्या हृदयाच्या धडधडण्यामुळे झालेल्या कापऱ्या आवाजात त्याने, पाठशाळेचे संचालक मंस्यूर पीरार यांना भेटण्याची आपली इच्छा व्यक्त केली. एकही शब्द न बोलता, काळ्या पेहेरावाच्या त्या माणसाने, त्याच्या मागून चालण्याची खूण ज्युलिआँला केली. लाकडी कठडा असलेले दोन रुंद जिने चढून ते दोघे वर गेले. त्या जिन्यांच्या वाकड्या तिकड्या झालेल्या पायऱ्या भिंतीपासून खाली कलल्या होत्या आणि त्या खचण्याच्या बेतात आहेत असे दिसत होते. नंतर एक लहान दरवाजा दिसला. पांढऱ्या लाकडाला काळा रंग दिलेला, स्मशानभूमीवर शोभेल असा एक मोठा क्रूस त्या दरवाजाच्या माथ्यावर होता. ढकलल्याबरोबर दरवाजा उघडला. त्या द्वारपालाने ज्युलिआँला एका अंधाऱ्या, ठेंगण्या खोलीत नेले. खोलीच्या भिंतींना सफेती दिलेली होती. भिंतीवर शोभा म्हणून दोन मोठी चित्रे होती. काळाच्या ओघात ती काळवंडून गेली होती. ज्युलिआँला तेथे एकटे सोडून तो द्वारपाल निघून गेला. ज्युलिआँ खूपच घाबरून गेला. त्याच्या हृदयात जोराने धडधड सुरू झाली. आपल्याला रडण्याचे धैर्य झाले तर बरे असेही त्याला वाटून गेले. त्या सबंध इमारतीमध्ये स्मशानशांतता वावरत होती.

पंधरा मिनिटे गेली. ज्युलिआँला ती एका दिवसाएवढी वाटली. तो अमंगळ चेहेऱ्याचा द्वारपाल नंतर खोलीच्या दुसऱ्या टोकास असलेल्या दाराच्या उंबऱ्यात पुन्हा दिसला. जणू काही शब्दाने बोलणे कमीपणाचे वाटल्यामुळे त्याने ज्युलिआँला नुसत्या खुणेनेच पुढे येण्याची सूचना केली. मग ज्युलिआँने दुसऱ्या एका अधिक मोठ्या खोलीत प्रवेश केला. पण तिच्यातही पुरेसा प्रकाश नव्हता. याही खोलीच्या भिंतींना सफेती दिलेली होती. पण त्यांच्यावर शोभेच्या कोणत्याच वस्तू टांगलेल्या नव्हत्या. पण जाताजाता दाराजवळच्या कोपऱ्यात ज्युलिआँला पांढऱ्या लाकडाचा एक पलंग, दोन गवती खुर्च्या आणि एक छोटीशी आरामखुर्ची एवढ्याच वस्तू आढळल्या. आरामखुर्ची जळाऊ लाकडाच्या फळ्यांची होती. व तिच्यावर गादी नव्हती.

खोलीच्या दुसऱ्या टोकाला कळकट तावदानांच्या एका लहान्या खिडकीजवळ, मेजाशी बसलेला एक माणूस त्याला दिसला. खिडकीत शोभेसाठी कुंड्या ठेवलेल्या होत्या. पण त्यांच्यातील झाडांनी माना टाकलेल्या होत्या. त्या माणसाच्या अंगात पाद्र्याचा मळकट झगा होता. तो संतापलेला दिसत होता. लहान आकाराच्या कागदांच्या ढिगातून तो एकामागून एकेक ताव काढीत होता; प्रत्येकावर थोडेसे लिहीत होता आणि मग ते कागद आपल्या मेजावर पसरून ठेवीत होता. ज्युलिआँ तेथे आला ते त्याने पाहिले नाही. ज्युलिआँ खोलीच्या मध्यभागी तसाच निश्चल उभा राहिला. त्या द्वारपालाने त्याला जिथे आणून सोडले होते तिथेच. दार लावून घेऊन द्वारपाल निघून गेला होता.

तशा स्थितीत दहा मिनिटे निघून गेली. मळकट पोषाखातील त्या गृहस्थाचे लिहिण्याचे काम तसेच सर्व वेळ चालू होते. ज्युलिआँच्या भावना व भय यांनी त्याला असे कमकुवत केले होते की, आपण खाली कोसळण्याच्या बेतात आहोत असे त्याला वाटले. “जे सुदंर आहे त्याच्यावर प्रेम करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या आत्म्यावर कुरूपतेमुळे उत्पन्न झालेली जोरदार प्रतिक्रिया” असे एखादा तत्त्वज्ञानी अशा वेळी म्हणाला असता; पण ते कदाचित चुकीचे ठरले असते.

लिहीत असलेल्या माणसाने आपले डोके वर केले. पण क्षणभर त्याच्याकडे ज्युलिआँचे लक्ष गेले नव्हते. तथापि नंतर त्याने पाहिले तरीही तो तसाच निश्चल उभा होता. जणू काही त्याच्यावर रोखल्या गेलेल्या त्या भयंकर नजरेमुळे तो दगडच बनला होता. त्या माणसाच्या लांबट चेहेऱ्यावर फक्त कपाळाखेरीज सगळीकडे लाल डाग होते. कपाळावर मृत्यूसमान फिक्कटपणा पसरला होता. त्याचे लाल डागांचे गाल आणि पांढरे कपाळ यांच्यामध्ये जे दोन लहान काळे डोळे चमकत होते त्यांनी अत्यंत शूर माणसाच्याही अंतःकरणात धडकी भरली असती. त्याच्या लांबरुंद व ऐसपैस कपाळाभोवती भरपूर, सरळ केस होते. त्याचे ते केस काळ्या दगडासारखे काळे होते. पण ज्युलिआँच्या पाणावलेल्या डोळ्यांना त्याचे हे सारे रूप धड दिसलेही नाही.

अखेर तो मनुष्य अधीरतेने म्हणाला,

“तू जवळ येणार आहेस की नाही?” अनिश्चितपणे एक एक पाऊल टाकीत ज्युलिआँ पुढे सरकू लागला. जमिनीवर खाली पडेन की काय असे त्याला वाटत होते. आपल्या आजवरच्या आयुष्यात कधी नव्हे इतका तो त्या क्षणी म्लान, निस्तेज झाला होता. कागदांच्या कपट्यांनी आच्छादून गेलेल्या, सफेद लाकडाच्या छोट्या मेजापासून काही फूट अंतरावर येऊन ज्युलिआँ अखेर थांबला. त्यावर तो माणूस म्हणाला, “आणखी जवळ ये.” ज्युलिआँ आणखी पुढे सरकला. जणू काही कशावर तरी आधारासाठी टेकता यावे याच्या शोधात त्याने आपला हात लांब केला.

“नाव काय तुझं?”

“ज्युलिआँ सोरेल.”

“तुला फार उशीर झालेला आहे.” आपली भयंकर नजर पुन्हा ज्युलिआँवर रोखीत तो दुसरा मनुष्य म्हणाला.

ती नजर ज्युलिआँ सहन करू शकला नाही. जणू काही स्वतःला आधार देण्यासाठी आपला हात पुढे करीत असता तो खाली जमिनीवर संपूर्णपणे आडवा कोसळला. त्या माणसाने घंटी वाजविली. ज्युलिआँला हालता येणे केवळ अशक्य झाले होते. त्याच्या दृष्टीची जाणीव नष्ट झाली होती. पण कोणाच्या तरी पावलांचा आवाज जवळ येताना त्याने ऐकला.

त्याला उठविण्यात येऊन सफेत लाकडाच्या छोट्या आरामखुर्चीत बसविण्यात आले होते. तो भयंकर माणूस त्या द्वारपालाला म्हणाल्याचे ज्युलिआँने ऐकले,

“अपस्माराचा प्रकार आहे हा उघड उघड. मला अंदाज यायला हवा होता या गोष्टीचा.”

ज्युलिआँ जेव्हा डोळे उघडू शकला तेव्हा तो लाल चेहेऱ्याचा माणूस पुन्हा लिहीत असल्याचे त्याला दिसले. द्वारपाल तेथून अदृश्य झाला होता. आमच्या नायकाने स्वतःला सांगितले,

“मला अंगी धैर्य बाणवलं पाहिजे. शिवाय स्वतःच्या भावना लपविणे तर सर्वांत जास्त आवश्यक आहे.” त्याच्या हृदयात त्याला एक तीव्र कळ जाणवली, “मी जर आजारी पडलो तर ते माझ्याबद्दल कोणता ग्रह करून घेतील ते परमेश्वर जाणे!”

अखेर त्या माणसाने आपले लिहिणे थांबविले आणि ज्युलिआँकडे एक तिरपी नजर टाकीत त्याने विचारले,

“माझ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आता तू योग्य स्थितीत आहेस काय?”

“होय साहेब.” ज्युलिआँ मंद आवाजात उत्तरला.

“ठीक, सुदैव म्हणायचे.” काळ्या पोषाखातला तो गृहस्थ आपल्या खुर्चीतून अर्धवट उठला आणि मेजाच्या खणात एक पत्र अधीरपणे शोधू लागला. जळाऊ लाकडाच्या त्या मेजाचा खण करकर आवाज करीत उघडला. त्याला ते पत्र सापडले; सावकाशपणे तो परत आपल्या खुर्चीत बसला आणि त्याने पुन्हा एकवार ज्युलिआँकडे अशा तऱ्हेने टक लावून पाहिले की ज्युलिआँच्या ठिकाणी जे थोडेफार चैतन्य उरले होते तेही जणू काही त्याच्यापासून तो बळजबरीने हिसकावून घेऊ पाहात होता.

“मंस्यूर शॅलाँ यांनी माझ्याकडे तुझी शिफारस केली आहे. बिशपच्या अधिकारक्षेत्रामधील ते एक सर्वांत उत्तम पाद्री होते. आजवर तेथे जर एखादा भला माणूस झाला असेल तर तो म्हणजेच शॅलाँ. गेली तीस वर्षे ते माझे स्नेही आहेत.”

“ओहो! म्हणजे ज्यांच्याशी बोलण्याचा मान मला मिळत आहे ते म. पीरार होत तर!” ज्युलिआँ खालच्या आवाजात बोलला.

“असं दिसतंय खर.” ज्युलिआँकडे तुसडेपणाने पाहात पाठशाळेचे संचालक बोलले. त्यांच्या बारीक डोळ्यांतील चमक जास्त तजेलदार झाली. त्याच्या मुखाभोवतीच्या स्नायूंना त्याच्या नकळतच एक हिसका

बसला. आपल्या भक्ष्याचा आता आपणास चविष्टपणे फराळ करायला मिळणार या सुखाच्या अपेक्षेत असणाऱ्या वाघासारखा त्यांचा चेहेरा तेव्हा दिसत होता.

जसे काही स्वतःशीच बोलल्याप्रमाणे ते म्हणाले,

“शेलाँचे पत्र लहानसेच आहे, इंटेलिजेंटी पॉका, आजकालच्या ह्या दिवसांत जेवढे संक्षिप्तपणे लिहावे तेवढे थोडेच!” आणि ते मोठ्याने वाचू लागले, “आमच्या पाद्री परगण्यातील ज्युलिआँ सोरेलला मी तुमच्याकडे पाठवीत आहे. सुमारे वीस वर्षांपूर्वी मी त्याला बाप्तिस्मा दिला. त्याचा बाप एक श्रीमंत सुतार आहे, पण त्याला काही देत नाही. परमेश्वराच्या द्राक्षमळ्यात ज्युलिआँ एक उत्तम, उल्लेखनीय श्रमिक ठरेल. स्मरणशक्ती व बुद्धिमत्ता यांच्या बाबतीत त्याच्यामध्ये काहीच कमी नाही. त्याच्या ठिकाणी उत्तम चिंतनशीलताही आहे. त्याची ही धर्माप्रत ओढ पुढे चालू राहील का? ती अगदी मनापासूनची आहे का?”

अबे पीरार यांनी “मनापासूनची” हा शब्द आश्चर्यभावनेने ज्युलिआँकडे नजर टाकीत पुन्हा वाचला. पण या वेळी त्यांच्या नजरेत माणुसकीच्या सर्व खुणांचा रितेपणा पुष्कळच कमी होता. खालच्या आवाजात ते पुन्हा म्हणाले, “मनापासूनची.” आणि ते परत पत्र पुढे वाचू लागले.

“ज्युलिआँला एखादी शिष्यवृत्ती द्यावी अशी माझी तुमच्याकडे मागणी आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या परीक्षा देऊन तो स्वतःची पात्रता-सिद्ध करील. त्याला मी थोडेसे धर्मशास्त्रविषयक शिक्षण— बोस्सुए, अर्नोल्ट व फ्लेउरी या प्राचीन व विश्वसनीय धर्मशास्त्रज्ञांच्या ग्रंथांतून दिले आहे. हा तरुण तुम्हांला पसंत नसल्यास त्याला माझ्याकडे परत पाठवा. आपल्या अनाथाश्रमाच्या नव्हर्नराला तुम्ही चांगले ओळखता. त्यांनी त्याला त्यांच्या मुलांचा शिक्षक म्हणून आठशे फ्रँकवर नोकरी देऊ केलेली आहे. अंतरंगात मी शांत आहे, परमेश्वराची कृपा! तो भयंकर आघात सहन करण्याची सवय मला होत चालली आहे. Vale et me ama.”

पत्राखालच्या सहीकडे येत असताना अबे पीरार आपल्या वाचनाचा वेग कमी करीत गेले आणि “शॅलाँ” हा शब्द वाचून त्यांनी उसासा टाकला. ते म्हणाले,

“शॅलाँ शांत आहेत. खरोखरी त्यांच्या अंगच्या सद्‌गुणांमुळे ते ह्या पारितोषिकास पात्र आहेत. माझी वेळ येईल तेव्हा परमेश्वराने कृपावंत होऊन ते मलाही द्यावेत.”

त्यांनी वर पाहिले व क्रूसाच्या खुणेने ईश्वरस्मरण केले. त्या इमारतीत प्रवेश केल्यापासून ज्या गाढ भयाने ज्युलिआँला थिजवून टाकले होते त्याचा भार, पीरार यांनी केलेली ती पवित्र प्रतीकात्मक खूण पाहून हलका झाल्यासारखे त्याला वाटले.

शेवटी अबे पीरार कडक, पण प्रतिकूल नसलेल्या अशा स्वरांत बोलले, “ह्या अत्यंत पवित्र व्यवसायाची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या तीनशे एकवीस इच्छुकांचे अर्ज इथे माझ्याकडे आलेले आहेत. त्यांपैकी फक्त सात किंवा आठ जणांची शिफारस अबे शॅलाँ यांच्यासारख्या माणसांनी माझ्याकडे केली आहे. म्हणजे त्या तीनशे एकविसांत तुझा क्रमांक नववा लागेल. पण माझे संरक्षण म्हणजे मेहेरबानी नव्हे की कमकुवतपणा नव्हे; अधिक सावधगिरी आणि दुर्गुणांविरुद्ध कडकपणा असे त्याचे स्वरूप आहे. जा, आणि त्या दरवाजाला कुलूप घाल.”

ज्युलिआँने चालण्याचा प्रयत्न केला आणि स्वतःला त्याने पडूही दिले नाही. दारातून तो आत आला होता. जवळच एक लहान खिडकी होती. तिच्यातून भोवतालच्या प्रदेशाचे दर्शन घडू शकते असे त्याला आढळले. त्याने वृक्षराजीकडे पाहिले. त्या दृश्याने त्याला प्रसन्नता वाटली; जणू काही त्याला त्याचे जुने मित्रच दिसले होते.

तो परत आला तेव्हा त्याला अबे पीरार यांनी लॅटिनमध्ये विचारले, “तू लॅटिन बोलतोस काय?”

“होय, सर्वश्रेष्ठ फादर.” ज्युलिआँ उत्तरला. तो आता बराच सावरला होता. त्या गेल्या अर्ध्या तासात जगातील कोणीही त्याला म. पीरारपेक्षा निश्चितपणे कमी श्रेष्ठ भासला नव्हता.

त्यांचे संभाषण लॅटिनमध्ये पुढे चालू राहिले. पीरार यांच्या नजरेतील भाव अधिक सौम्य होऊ लागले होते. ज्युलिआँने स्वतःच्या अंगात थोडा, पूर्वीचा थंडपणा आणला. तो विचार करू लागला, “सद्‌गुणांच्या ह्या दिखाऊपणाने भुलून जाणे हा माझा केवढा कमकुवतपणा आहे! हा मनुष्य म. मासलाँ यांच्यासारखाच नुसता लुच्चा असणार!” आणि आपल्याजवळचे बहुतेक सगळे पैसे स्वतःच्या बुटात लपवून ठेवल्याबद्दल ज्युलिआँने स्वतःचे अभिनंदन केले.

अबे पीरार यांनी धर्मशास्त्राच्या विषयात ज्युलिआँची परीक्षा घेतली आणि त्याच्या ज्ञानाची व्याप्ती पाहून ते आश्चर्यचकित झाले. त्यांनी ज्युलिआँला पवित्र बायबल व इतर धर्मग्रंथांविषयी जास्त खोदून प्रश्न विचारले तेव्हा तर त्यांचे आश्चर्य अधिकच वाढले. पण त्यांनी जेव्हा ज्यलिआँला ख्रिश्चन संतांच्या तत्त्वप्रणालीबद्दल काही प्रश्न विचारले तेव्हा त्याला सेंट जेरोम, सेंट ऑगस्टाइन, सेंट बोनाव्हेंचर, सेंट बसिल इ. इ. ची जेमतेम फार तर नावेच माहीत होती; त्यापलीकडे त्याला त्यांच्याबद्दल काही माहीत नव्हते असे आढळून आले.

अबे पीरारना वाटले, “खरं म्हणजे प्रॉटेस्टँटिझमबद्दल ओढ वाटणाऱ्या घातक प्रवृत्तीचे हे आणखी एक उदाहरण आहे. शेलाँमध्ये ती प्रवृत्ती असल्याने मला त्याला नेहमी रागाने बोलावे लागत असे. बायबल वगैरे ग्रंथांशी याचा वाजवीपेक्षा जास्तच खूप परिचय आहे.”

(पीरार यांनी विचारले नसतानाही ज्युलिआँ जेनेसिस, दि पेन्टॅटूच इत्यादी लेखकांच्या खऱ्या, निश्चित लेखनकालाबद्दल त्यांच्याशी बोलला होता.)

पीरार यांचे विचारचक्र पुढे चालू झाले, “अंत नसलेली पवित्र धर्मग्रंथांची ही सगळी चर्चा स्वयंनिर्णयाकडे म्हणजे अतिशय भयप्रद अशा प्रॉटेस्टँटिझमकडे जाऊन पोहोचणार नाही तर अन्य कोठे पोहोचणार? आणि अशा अविचारी, उतावीळ ज्ञानाच्या जोडीला ख्रिश्चन संतांविषयी अज्ञान! ते ज्ञान असतं तर ही “खजागी मतप्रदर्शनाची” प्रवृत्ती जरा तरी दबली असती.

पण पीरार यांनी पोपच्या अधिकाराबद्दल विचारल्यावर, प्राचीन गॅलिकन चर्चच्या नीतिवचनांची अपेक्षा उत्तरादाखल केली असता, तरुण ज्यलिआँने जेव्हा म. द. मेत्र यांचे सबंध पुस्तकच पाठ म्हणून दाखविले तेव्हा पाठशाळेच्या त्या संचालकाच्या आश्चर्याला सीमा उरली नाही.

“शॅलॉं म्हणजे एक विचित्रच माणूस आहे. त्यांनी ते पूस्तक ज्युलिआँला, त्याचा उपहास करायला शिकण्यासाठी दिले की काय!” अबे पीरारना वाटले.

म. द. मेत्र यांच्या तत्त्वप्रणालीवर ज्युलिआँ गंभीरपणे विश्वास ठेवीत होता की काय हे शोधण्याच्या निमित्ताने त्याला पीरारनी अनेक प्रश्न विचारले; पण त्याचा उपयोग झाला नाही. कारण हा तरुण जे काही उत्तर देई ते फक्त पुस्तकातील पाठ केलेल्या शब्दांत. ह्या क्षणापासून ज्युलिआँची स्थिती खरोखरी वाहवा करण्यासारखी झाली; आपण आपल्यावर संपूर्ण ताबा ठेवीत आहोत असे त्याला वाटू लागले. पीरार यांनी त्याची परीक्षा बराज वेळ घेतली. त्यानंतर ज्युलिआँला असे वाटले की, त्याच्या बाबतीतील त्यांचा कडकपणा म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून तो एक देखावाच होता. ज्युलिआँने दिलेल्या उत्तरांतील मुद्देसूदपणा, स्वच्छ स्पष्टपणा व अचूकपणा लक्षात घेता, तर्कशास्त्राच्या नावाने, त्याला आलिंगन द्यावे असे पाठशाळेच्या संचालकांना वाटले; पण धर्मविद्येचा अभ्यास करणाऱ्या त्यांच्या विद्यार्थ्यांशी वागताना त्यांनी गेली पंधरा वर्षे स्वतःवर कडक गांभीर्याचा जो नियम लादून घेतला होता त्यामुळे त्यांना तसे करता आले नाही.

ते स्वतःला सांगू लागले, “ह्याचं मन धीट व निरामय आहे. पण शरीर मात्र अशक्त व दुबळं दिसतंय.” आपल्या बोटाने जमिनीकडे खुणावीत त्यांनी ज्युलिआँला विचारले,

“तू वारंवार असा पडतोस काय?”

“असे पडण्याची माझी आयुष्यातली ती पहिलीच वेळ होती. द्वारपालाचा चेहेरा पाहून माझे अंग लटके पडले होते.”

एखाद्या मुलाप्रमाणे शरमून लाल होत ज्युलिआँने उत्तर दिले.

अबे पीरार यांनी जवळजवळ स्मित केले, पण ते म्हणाले, “ह्या जगातल्या व्यर्थ डामडौलाचा परिणार हा असा असतो; तुला नेहमीच हसरे चेहेरे पाहण्याची सवय आहे हे उघड आहे; पण ते चेहेरे म्हणजे खोट्या गोष्टींचे प्रदर्शन करणारी नाटकगृहे असतात बरं. बाबारे, सत्य हे खडतर, कडक असते. पण आपले इथले, इहलोकीकर्तव्यही खडतर नाही काय? बाहेरच्या पोकळ सौंदर्याची प्रमाणाबाहेर भुरळ पडणे या कमकुवतपणाला तू बळी पडू नये म्हणून तुझ्या सारासार बुद्धीने दक्ष राहिले पाहिजे. तशी खबरदारी तू घेतली पाहिजेस.”

फ्रेंचपेक्षा लॅटिनमध्ये बोलणे अबे पीरारना जास्त रुचत होते. तेव्हा खुषीने परत वळत ते पुढे म्हणाले,

“तुझी शिफारस जर माझ्याकडे अबे शॅलॉंसारख्या व्यक्तीकडून करण्यात आली नसती तर मी तुझ्याशी ह्या जगाच्या बढाईखोर भाषेत बोललो असतो. तुला त्या भाषेचा खूपच चांगला सराव आहे असं दिसतंय. ज्या शिष्यवृत्तीसाठी तू अर्ज केलेला आहेस तिची संपूर्ण रक्कम मिळणे म्हणजे जगातील एक महान् दुष्प्राप्य गोष्ट आहे हे मी तूला सांगतो. पण अबे शॅलॉं यांनी धर्मप्रचारकार्यासाठी छप्पन वर्षे श्रम केले असूनही, पाठशाळेतील एका शिष्यवृत्तीची वितरण-व्यवस्था जर त्यांना करता येत नसेल तर मग इतक्या वर्षांनंतर त्यांच्या पदरात फारच थोडे पडले असं म्हणावं लागेल.”

एवढे बोलून झाल्यावर अबे पीरार यांनी ज्युलिआँला उपदेशाची एक गोष्ट सांगितली. त्यांचा सल्ला घेतल्याशिवाय ज्युलिआँने कोणत्याही गुप्त संघटनेत किंवा मंडलात सामील होऊ नये असे ते म्हणाले.

प्रामाणिक माणसाच्या मनःपूर्वक कळवळीने ज्युलिआँ म्हणाला, "मी तुम्हाला अब्रूदार माणसाप्रमाणे शब्द देतो."

पाठशाळेच्या संचालकांनी आपले पहिलेवहिले स्मित केले. ते त्याला म्हणाले, "तुझा हा वाक्प्रचार इथे योग्य नाही. तो जास्तकरून व्यवहारकुशल माणसांची पोकळ प्रतिष्ठा सूचित करतो. ही प्रतिष्ठेची पोकळ कल्पनाच लोकांच्या हातून अनेक चुका घडवते; अनेकदा गुन्हेही; सेंट पाचवा पायसा यांच्या "बुल उनम एक्लेसिॲम" - च्या सतराव्या परिच्छेदातील धार्मिक आज्ञेप्रमाणे तू माझे आज्ञापालन करण्यास बद्ध आहेस. धार्मिक बाबतीत मी तुझा वरिष्ठ आहे. ह्या घरात, माझ्या प्रिय लाडक्या मुला, ऐकणे म्हणजेच आज्ञापालन करणे होय. तुझ्याजवळ किती पैसे आहेत?"

(ज्यलिआँला वाटले, "आता गोष्ट मूळ मुद्द्यावर आली." प्रिय लाडक्या मुला" ह्या शब्दांचे प्रयोजन असे आहे.)

"पस्तीस फ्रँक, फादर."

"तू तुझे पैसे कसे खर्च करतोस याबद्दल खबरदार राहा. त्या खर्चाचा खुलासा माझ्याजवळ करावा लागेल."

दमछाक करणारी ही मुलाखत तीन तास चालू होती. द्वारपालाला बोलावून आणण्याची आज्ञा ज्युलिआँला करण्यात आली. तो आल्यावर अबे पीरार त्याला म्हणाले,

"ज्युलिआँ सोरेलला १०३ क्रमांकाच्या खोलीत घेऊन जा." खास मेहेरबानी म्हणून ते ज्युलिआँला त्याच्यासाठी स्वतंत्र खोली देत होते. ते पुढे म्हणाले,

"त्यांची ट्रंक घेऊन जा."

ज्युलिआँने आपली नजर खाली वळविली. ती ट्रंक त्याच्याकडे डोळे वटारून पाहात आहे असे त्याला दिसले. तो तिच्याकडे तीन तास पाहात होता. पण आपण काय पाहात आहोत याचे त्याला भानच नव्हते.

तो १०३ क्रमांकाच्या खोलीत पोहोचला. ती छोटी खोली त्या इमारतीच्या सगळ्यात वरच्या मजल्यावर होती. ती आठ फूट लांबरुंद होती. तिच्यातून किल्ल्याचे तट दिसतात हे ज्युलिआँच्या लक्षात आले व त्यांच्या पलीकडे, दू नदीने शहरापासून विभागलेले हसरे मैदान दिसत होते. "किती सुंदर दृश्य आहे हे!" ज्युलिआँ उद्‌गारला. पण स्वतःशी असे बोलताना त्याच्या त्या शब्दांत ग्रथित झालेल्या भावनेची त्याला जाणीव नव्हती. बेझाँसामध्ये त्याने घालविलेल्या थोड्याशा वेळेमध्ये त्याला ज्या खळबळजनक संवेदनांचा अनुभव आला होता त्यांनी त्याचे सामर्थ्य पूर्णपणे संपुष्टात आणले होते. खोलीतील एकमेव लाकडी खुर्चीवर

तो त्या खिडकीजवळ बसला आणि त्याला एकदम गाढ झोप लागली. नंतर त्याला रात्रीच्या भोजनाची अथवा प्रार्थनेची घंटाही ऐकू आली नाही; आणि त्याची कोणाला आठवणही झाली नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा सूर्याच्या कोवळ्या किरणांनी त्याला जाग आणली तेव्हा आपण जमिनीवर पडलेले आहोत असे त्याच्या लक्षात आले.

★ ★ ★

अनुक्रमणिका

## प्रकरण सव्विसावे

# हे जग किंवा श्रीमंतांमधील उणिवा

ज्युलिआँने त्याचा कोट घाईघाईने साफसूफ केला. तशा घाईतच तो खाली गेला; पण त्याला उशीर झालेला होता. त्याबद्दल एका दुय्यम शिक्षकाने त्याची चांगलीच खरडपट्टी काढली. तथापि काही तरी सबब सांगण्याचा प्रयत्न करण्याऐवजी त्याने आपले हात छातीवर क्रूसाप्रमाणे ठेवले आणि तो पश्चात्तापदग्ध भावनेने म्हणाला,

"सर्वश्रेष्ठ फादर, माझ्या हातून पाप घडले आहे."

हा एक अतिशय यशस्वी प्रारंभ होता. पाठशाळेत आलेल्या विद्यार्थ्यांमधील तीक्ष्ण बुद्धीच्या विद्यार्थ्यांना दिसून आले की, ज्याच्याशी त्यांचा सबंध यावयाचा आहे तो मनुष्य ह्या प्रकाराला काही नवखा नव्हता. मनोरंजनाचा तास आला. तेव्हा आपल्याबद्दल सर्वसाधारणपणे इतरांच्या मनात औत्सुक्य निर्माण झाले असल्याचे ज्युलिआँला कळून आले. पण त्यांना तो केवळ गप्प राहणारा व भिडस्त असा वाटला. ज्युलिआँने स्वतःच्या वर्तनासाठी काही नियम आखून घेतले होते. त्या अनुसार त्याला त्याचे तेथील तीनशे एकवीस सवंगडी म्हणजे तितके शत्रू वाटले; आणि त्यांच्यामध्ये सगळ्यात जास्त धोकेबाज असा त्याला कोणी वाटला असेल तर तो म्हणजे अबे पीरार.

काही दिवसांनंतर ज्युलिआँला एक यादी देण्यात आली. ज्याच्याजवळ पापांची कबूली द्यावयाची असते असा एक पाद्री तिच्यातून त्याला निवडावयाचा होता.

तो स्वतःशी म्हणाला, "हे परमेश्वरा, ते मला समजतात कोण? त्यांना असं वाटतं का की ह्याच्यातली मेख मला कळत नाही?" आणि त्याने अबे पीरार यांची निवड केली.

त्याला जरी काहीच अंदेशा आला नाही तरी ते एक निर्णायक पाऊल होते. व्हेरिएरचा एक पोरगेला छोटा रहिवासी पाठशाळेत दाखल झालेला होता. पहिल्याच दिवशी त्याने आपण ज्युलिआँचे मित्र असल्याचे जाहीर केले होते. त्याने ज्युलिआँला सांगितले की, पाठशाळेचे उपप्राचार्य मन्स्यूर कॉस्तानॅद यांची निवड ज्युलिआँने केली असती तर ते कदाचित अधिक शहाणपणाचे ठरले असते. आणि तेथील तो छोटा विद्यार्थी, माहिती देण्याच्या दृष्टीने ज्युलिआँच्या कानांत कुजबुजला.

"अबे कास्तानॅद हे म. पीरारचे शत्रू आहेत आणि पीरार यांचा जॅनसेन [जॅनसेनिझम (Jansenism) Doctrine of the herversity and inability for good and the natural human will. माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती सदाचरणास असमर्थ असते, इतकेच नव्हे त्याच्या अगदी विरुद्ध असते – ही तत्त्वप्रणाली.] पंथाकडे ओढा आहे अशी वंदता आहे."

आपण फार शहाणे आहोत अशा कल्पनाविश्वात वावरणाऱ्या आमच्या नायकाने टाकलेली सर्व पावले, पापाच्या कबुलीसाठी त्याने केलेल्या पाद्र्याच्या निवडीप्रमाणे, अतिशय मूर्खपणाची होती. कल्पक माणसाने गृहीत धराव्यात अशा सर्व संभाव्य गोष्टींपायी तो चुकीच्या मार्गाला लागला व स्वतःच्या उद्दिष्टांनाच तो चुकीने वस्तुस्थिती समजली. आपण बनवाबनवी करण्यात कुशल आहोत असे त्याने मानले. दुबळ्याचा

अनुक्रमणिका

आधार अशा ह्या कलेतील यशाबद्दल त्याने स्वतःची कानउघाडणी करण्यापर्यंत त्याच्या मूर्खपणाची मजल गेली होती.

“अरेरे! हे माझे एकमेव हत्यार आहे! अन्य एखाद्या युगात शत्रूच्या समोर बोलक्या कृतींच्या आधारे मी माझ्या पोटासाठी भाकरी कमाविली असती.”

ज्युलिआँला स्वतःच्या वागणुकीचे समाधान वाटत होते. त्याने अवतीभवती पाहिले. त्याला प्रत्येक ठिकाणी अतिशुद्ध सद्‌गुणांचा केवळ देखावा होत असल्याचे दिसले.

सेमिनरीच्या विद्यार्थ्यांपैकी नऊ-दहा जण पावित्र्याच्या वातावरणात विहरत होते. त्यांना सेंट टेरेसा व सेंट फ्रॅन्सिस यांचे साक्षात्कार होत होते. अपेनाईनमध्ये माउंट वेर्नावर सेंट फ्रॅन्सिसला पवित्र ‘रक्तलांच्छन’ प्राप्त झाल्याचे त्यांना दिसले होते. पण त्यांच्या मित्रांनी हे मोठे गुप्त रहस्य स्वतःजवळच ठेविले होते. हे बिचारे साक्षात्कारी तरुण बहुधा नेहमीच रुग्णालयात असत. इतर शेकडो जणांनी त्यांच्या निकोप धर्मश्रद्धेची सांगड दुर्दम्य कृतिशीलतेनी घातली होती. आजारी पडेपर्यंत ते मेहनत करीत असत; पण त्यातून ज्ञान मात्र अल्पसेच पदरी पडे. दोघे, तिघे जण त्यांच्या खऱ्याखुऱ्या तरल बुद्धिमत्तेमुळे इतरांमध्ये उठून दिसत. त्यांच्यापैकी एकाचे नाव शॅझेल होते. पण ते आपला तिटकारा करतात असे ज्युलिआँला वाटे; तर ज्युलिआँ आपला तिटकारा करतो असे त्यांना वाटे.

पाठशाळेत असलेल्या तीनशे एकविसांपैकी बाकीचे सगळे पूर्णपणे गावंढळ प्राणी होते. दिवसभर ते लॅटिन शब्द घोकीत असत त्यांच्या अर्थाबद्दल ते साशंकच असत. ते बहुतेक सगळे जण शेतकऱ्यांचे मुलगे होते. जमीन नांगरून स्वतःचे पोट भरण्यापेक्षा, थोड्याशा लॅटिन शब्दांच्या पोपटपंचीने पोट भरणे त्यांना अधिक पसंत होते. हा शोध ज्युलिआँने पहिल्याच काही दिवसांत लावला; तेव्हा आपल्याला त्वरितच यश मिळणार अशी खूणगाठ त्याने मनाशी बांधली. तो स्वतःला म्हणाला, प्रत्येक रोजगारात बुद्धिमान लोकांची गरज असते. कारण अखेर काही काम करायचे तर असतेच ना? नेपोलिअनच्या हाताखाली मी सार्जंट झालो असतो; ह्या भावी पाद्र्यांच्यामध्ये मी ग्रॅण्ड विकार होईन.

“ही सगळी दरिद्री भुते, जन्मल्यापासून शेवटी मजूर होणार हे ठरलेले आहे. इथे येईपर्यंत, मलई काढून घेतलेल्या पातळ दुधावर व काळ्या रोटीवर ते वाढलेले आहेत. त्यांच्या झोपड्यांत त्यांना वर्षातून फक्त पाच-सहा वेळा मांसाची चव चाखायला मिळाली आहे. रोमन शिपायांना ज्याप्रमाणे प्रत्यक्ष लढाई म्हणजे चैनीचे दिवस वाटत असत त्याप्रमाणे पाठशाळेतील ऐषारामाने हे खेडवळ शेतकरी हुरळून गेले आहेत.”

चमक नसलेल्या त्यांच्या डोळ्यात ज्युलिआँला, भोजनाच्या आधी खाण्याच्या शारीरिक सुखाची अपेक्षा व भोजनानंतर शारीरिक गरज भागल्याचे समाधान यांच्या पलीकडे कधी काहीच आढळले नाही; आणि ह्या लोकांत स्वतःचे वैशिष्ट्य ज्युलिआँला प्रस्थापित करायचे होते. पण त्याला जी माहीत नव्हती आणि त्याला त्यांनी जी बुध्याच सांगितली नव्हती ती गोष्ट अशी होती की, पाठशाळेत अभ्यासविषय म्हणून असलेल्या सिद्धान्त चर्चचा इतिहास इ. इ. च्या वेगवेगळ्या वर्गांत अग्रभागी राहणे ह्यात त्याच्या दृष्टीने व्यर्थ मोठेपणाच्या आसक्तीच्या पापापेक्षा अधिक काही नव्हते. व्हॉल्टेअरच्या वेळेपासून, बुडाशी केवळ अविश्वास व खासगी वैयक्तिक निर्णय असणाऱ्या व लोकांच्या अंतःकरणात विश्वासाच्या उणीवेची घातक सवय निर्माण

करणाऱ्या दोन चेंबर गव्हर्मेंटच्या वेळेपासून पुस्तके ही आपली खरी शत्रू होत असे फ्रान्सच्या चर्चने ओळखलेले दिसते. अंतःकरणापासून आज्ञापालन करणे ही गोष्ट त्या चर्चच्या दृष्टीने सर्वस्व होती. अभ्यासातीलही यश, पवित्र धार्मिक अभ्यासातीलही यश गर्हणीय ठरण्याची शक्यता; आणि त्याला कारणही तसेच सबळ, हा असा जास्त बुद्धिमान माणूस, सीयॅस किंवा ग्रोवारसारख्या प्रतिपक्षाच्या बाजूला जाण्याचा संभव नाही का? चर्च आपल्या उद्धाराचा एकमेव मार्ग म्हणून पोपला चिकटून राहाते. फक्त पोपच खासगी वैयक्तिक निर्णय लंगडे पाडण्याचा प्रयत्न करू शकतो. आणि आपल्या दरबारातील समारंभाच्या धर्मनिष्ठ डामडौलाने, व्यावहारिक स्त्रीपुरुषांच्या रोगी व उदासीन मनांवर परिणाम करू शकतो.

अशी कित्येक सत्ये ज्युलिआँने अर्धी अधिक अवगत करून पचविली. तथापि पाठशाळेत उच्चारले जाणारे सगळे शब्द मात्र ती नाकारण्याकडे झुकलेले असतात. त्यामुळे त्याला अतिशय विषाद वाटला. खूप मेहनतीने त्याने, पाद्र्याच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या असलेल्या गोष्टी शीघ्रतेने शिकून घेण्यात यश मिळविले. पण त्याच्या दृष्टीने त्या पूर्णपणे झूट होत्या व त्याला त्यांच्यात विशेष रसही वाटत नव्हता. पण यापेक्षा दुसऱ्या काही रीतीने कसे वागावे याची कल्पना त्याला येत नव्हती.

“सगळं जग मला विसरलं आहे काय?” आश्चर्य वाटून त्याने स्वतःला विचारले. ज्यांच्यावर दिजोनचा टपाली शिक्का होता अशी कित्येक पत्रे म. पीरार यांनी घेतली होती व आगीत भिरकावून दिली होती हे त्याला माहीत नव्हते आणि त्या पत्रांत अतिशय ठराविक लेखनपद्धती व भाषा वापरलेली असूनही प्रीतीच्या फार तीव्र भावना दिसून येत होत्या. त्याचप्रमाणे प्रखर पश्चात्तापाचा संघर्ष त्या प्रेमाशी चालू असल्याचे कळून येत होते. अबे पीरारना वाटले, “तेवढंच बरं; जिच्यावर ह्या तरुणाने प्रेम केले आहे ती स्त्री निदान धर्मलंड तरी नाही.”

एके दिवशी अबे पीरारनी एक पत्र उघडले. त्याच्यातील अर्धा मजकूर अश्रूंमुळे धुऊन गेला होता. या पत्रात कायमच्या निरोपाचा मजकूर होता. पत्रलेखिकेने ज्युलिआँला कळविले होते, “माझ्या अपराधाच्या मूळ कारणाचा द्वेष न करता स्वतःच्या अपराधाचाच तिटकारा करण्याची बुद्धी परमेश्वरी कृपेने अखेरीस मला झाली आहे. तो मला जगातल्या इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा नेहमी जास्त प्रिय असेल. माझ्या मित्रा, त्याग करण्यात आलेला आहे आणि ज्यांच्यावर तुम्ही एवढ्या उत्कटपणे प्रेम केलं आहे त्यांना मुक्ती लाभणार आहे. परमेश्वर भयंकर, पण न्यायी आहे. त्या जिवांच्या मातेच्या गुन्ह्याचा सूड आता तो त्यांच्यावर उगवणार नाही. ज्युलिआँ, निरोप देते मी तुम्हांला. मनुष्यमात्राशी न्यायाने वागा.”

पत्राचा हा शेवट जवळजवळ वाचता येण्यासारखा राहिलेला नव्हता. पत्रलेखिकेने स्वतःचा दिनोजचा पत्ता दिला होता आणि त्याच वेळी, ज्युलिआँ पत्राचे उत्तर कधीच देणार नाही अशी आशा व्यक्त केली होती; निदान त्याने उत्तर पाठविलेच तर ते, सदगुणाच्या मार्गावर परत पोहोचलेल्या स्त्रीला किमानपक्षी न शरमता वाचता यावे अशा भाषेत लिहिण्याची मर्यादा सांभाळावी अशी तिची अपेक्षा होती.

ज्युलिआँला यावर इतकी विषण्णता प्राप्त झाली की ती त्याच्या प्रकृतीवर परिणाम करू लागली. त्यातच भर टाकली गेली ती पाठशाळेत भोजनाचा ठेका घेतलेल्या माणसाकडून पुरविण्यात येत असलेल्या दर डोई ८३ सेंटाइम किमतीच्या निकृष्ट अन्नाची. अशा वेळी एका सकाळी फूके त्याच्या खोलीत एकदम अवतीर्ण झाला.

“अखेर मी कसाबसा एकदाचा आत येऊ शकलो तर! शपथेवर सांगतो, तुला भेटण्यासाठी बेझाँसाला मी पाच वेळा येऊन गेलो. पण नेहमी पाहावा लागला तो अडसर घातलेला दरवाजा. पाठशाळेच्या फाटकाशी मी कोणाला तरी उभं केलं. पण काय रे लेका, तू बाहेर कसा पडत नाहीस कधीच?”

“ती एक कसोटी आहे, मी स्वतःला लावलेली.”

“तुझ्यात मला फार फरक पडलेला दिसतोय. अखेर मी तुला पुन्हा भेटतोय एवढं खरं. पाच फ्रँकच्या दोन अस्सल नाण्यांनी मला नुकताच असा एक धडा दिला आहे की, मी पहिल्यांदा आलो तेव्हाच ती नाणी दिली नाहीत हा माझाच मूर्खपणा होता.”

त्या दोन मित्रांतील संभाषणाला अंत नव्हता. पण फूकेने त्याला सांगितलेल्या एका गोष्टीबरोबर ज्युलिआँची मुद्रा एकदम पालटली. तो म्हणाला, “आणखी एक सहज सांगायचं म्हणजे तुझ्या कानांवर आलं का की, तुझ्या विद्यार्थ्यांची आई आता फार धार्मिक बनली आहे!” आणि फूके अशा तिऱ्हाइतपणाच्या आविर्भावाने हे बोलला की, त्या उत्कट विकारशील जिवावर त्याचा विलक्षण परिणाम झाला व बोलणाराकडून त्यामुळे त्याचे जिवाभावाचे हितसंबंध अभावितपणे नष्ट केले गेले.

“होय माझ्या मित्रा, धार्मिकतेचा तो एक अतिशय उन्नत असा नमुना म्हटला पाहिजे. असं म्हणतात की ती आता यात्रेलाही जात असते. पण गरीब बिचाऱ्या शॅलाँवर दीर्घकाळ हेरगिरी करीत असलेल्या अबे मासलाँला कायमची लाज आणणारी गोष्ट अशी की मा. रेनॉल काडीचाही संबंध त्याच्याशी ठेवीत नाहीत. त्या दिजोन किंवा बेझाँसा येथे आपल्या पापाच्या कबूलीसाठी जात असतात.”

“काय? त्या बेझाँसाला येत असतात?” ज्युलिआँने विचारले तेव्हा त्याचे कपाळ लाल झाले होते.

“अगदी वरचेवर.” फूकेने उत्तर दिले. त्याच्या मुखावर प्रश्नार्थक भाव होता....

“तुझ्याकडे काही कॉन्स्टिट्यूशनेल्स आहेत का?”

“काय विचारतोस ते कळलं नाही.” फूकेचे प्रत्युत्तर.

“मी तुला विचारतो की, तुझ्याजवळ कॉन्स्टिट्यूशनेलच्या काही प्रती आहेत काय? प्रतीला तीस सू या दराने त्या इथं विकल्या जात आहेत.” जरा जास्त शांत स्वरात ज्युलिआँने आपली पहिली पृच्छा पुन्हा केली.

“काय?” फूके ओरडला, “इथं पाठशाळेतसुद्धा लिबरल्स? बिचारा, दुर्दैवी फ्रान्स.” अबे मासलाँ यांचा दांभिक स्वर आणि शब्दांवरील लीन आघात यांचे अनुकरण करीत फूके बोलला.

फूकेच्या ह्या भेटीच्या खोलवर परिणाम आमच्या नायकावर झाला असता. पण दुसऱ्याच दिवशी घडलेल्या एका घटनेमुळे तो तसा झाला नाही. एखादा पोरगाच असा भासणारा जो एक छोटा विद्यार्थी व्हेरिएरहून पाठशाळेत आला होता त्याने ज्युलिआँला उद्देशून एक विधान केले आणि परिणामी ज्युलिआँला

एक महत्त्वाचा शोध लागला. तो पाठशाळेत राहायला आल्यापासून त्याची वागणूक म्हणजे दुसरे तिसरे काही नव्हे तर चुकीने टाकलेल्या पावलांची एक मालिकाच झालेली होती. तो कटुतेने स्वतःचाच उपहास करू लागला.

खरे म्हणजे त्याच्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाच्या गोष्टी तो मोठ्या शहाणपणाने पार पाडीत असे. पण तपशिलाकडे, कृतीतील बारकाव्याकडे तो लक्ष देत नसे; आणि तेही पाठशाळेत हुषार लोक अशा तपशिलाच्या टेहेळणीवर असतात तेव्हा! ह्याचा परिणाम असा झाला होता की त्याच्या बरोबरच्या इतर विद्यार्थ्यांत तो कधीचाच "एक अश्रद्ध, स्वतंत्र विचाराचा मनुष्य" म्हणून ओळखला जाऊ लागला होता. अनेक क्षुल्लक व बारीकसारीक गोष्टींमुळे त्याचे पितळ उघडे पडत होते.

त्याच्या वर्गबंधूंच्या दृष्टीने त्याच्यावर एक भयप्रद दुर्गुणाचा आरोप होता. अधिकाऱ्यांचे हुकूम डोळे मिटून पाळण्याऐवजी व त्यांचा कित्ता गिरविण्याऐवजी तो विचार करतो, स्वतः स्वतःसाठी निर्णय घेतो हा त्याचा गुन्हा होता. अबे पीरार यांच्याकडून त्याला सहाय्य मिळत नव्हते. तो त्यांच्याशी कधी काळी एखादाही शब्द बोलला नव्हता. ह्याला अपवाद होता तो फक्त पश्चात्तापाच्या न्यायपीठाचा; आणि त्या वेळीही बोलण्यापेक्षा ऐकण्याचेच काम त्याने जास्त केले होते. ज्युलिआँने अबे कास्तानॅद यांची निवड केली असती तर घटनांना एक निराळे वळण मिळाले असते.

आपल्या हातून घडलेल्या मूर्खपणाची जाणीव त्याला ज्या क्षणी झाली त्याच वेळी त्या बाबतीतील त्याचे कुतूहल पुनर्जागृत झाले. हानीची संपूर्ण व्याप्ती जाणण्याची इच्छा त्याला झाली; आणि त्या उद्देशाने आपल्या अहंकारी व हटवादी अलिप्तपणाच्या कोशातून तो जरासा बाहेर पडला. त्या अलिप्तपणामुळे बाकीचे विद्यार्थी त्याच्यापासून दूरच राहत. पण आता मात्र त्यांनी त्याच्यावर सूड उगवला. त्याच्या पुढाकाराबद्दल ते तिरस्कार दाखवू लागले आणि त्यांची मजल उपहासापर्यंत पोहोचली. ज्युलिआँला स्पष्टपणे कळून आले की, तो पाठशाळेत आल्यापासून एकही तास, विशेषतः मनोरंजनाच्या वेळी, असा गेला नव्हता की ज्याच्यात त्याला अनुकूल वा प्रतिकूल परिणाम घडेल असे काही झाले नव्हते. त्याच्या शत्रूंची संख्या तरी वाढली होती किंवा पाठशाळेत जो खराखुरा सद्‌गुणी होता अथवा इतरांपेक्षा थोडा कमी खेडवळ होता अशा एखाद्या सहकाऱ्याचे अनुकूल मत तरी त्याला मिळाले होते. ज्या नुकसानीची भरपाई करावयाची होती ती फार मोठी होती आणि ते कामही पुष्कळसे अवघड होते. तेव्हापासून ज्युलिआँ प्रत्येक गोष्टीत आपले लक्ष सतत जागरूकतेने, घालू लागला. स्वतःचे अगदी नवे स्वभावचित्र रंगविण्याचा त्याचा तो एक प्रयत्न होता.

उदाहरणार्थ, त्याला स्वतःचे डोळे ताब्यात ठेवण्याच्या बाबतीत खूपच त्रास झाला अशा ठिकाणी नजर खाली करावयाची असते ती काही कारणाशिवाय नसते. ज्युलिआँ स्वतः बोलू लागला, "व्हेरिएरला असताना किती चुकीची कल्पना गृहीत धरली होती मी! मी जीवन जगत आहे असं मला वाटत होतं; पण मी फक्त माझ्या आयूष्याची तयारी तिथे करीत होतो; इथं अखेर मी जगात येऊन दाखल झालो आहे. खऱ्याखुऱ्या शत्रूंनी गराडा घातलेला असताना मी माझी भूमिका समर्थपणे पार पाडीपर्यंत ज्या जगात मला वावरावयाचे आहे ते हे जग. हा सारखा दांभिकपणा चालू राखणं ही किती अवघड गोष्ट आहे! हर्क्युलसच्या वीरकृत्यांनाही तो लाज आणवील. पाचवा सिक्स्टस हा आधुनिक काळातील हर्क्युलस आहे. त्याने सतत पंधरा वर्षे आपल्या विनम्रतेने चाळीस कार्डिनल्सना फसविले. त्यांनी त्याला तारुण्यात अहंकारी व जबरदस्त असा पाहिलेला होता."

अनुक्रमणिका

ज्युलिआँ तिरस्काराने स्वतःशी पुढे म्हणाला, "म्हणजे इथे खरोखरी ज्ञानाला कसलेच महत्त्व नाही! पवित्र इतिहास, धार्मिक तत्त्वज्ञानातील प्रगती व अशाच इतर गोष्टी यांना जे थोडेफार महत्त्व आहे ते केवळ देखाव्यापुरते, वरवरचे आहे. या विषयावर जे सर्व बोलले जाते त्याचा उद्देश माझ्यासारख्या मूर्खांना सापळ्यात अडकविण्याचा असतो अरेरे! माझी एकमेव गुणवत्ता कशात होती तर जे सर्व काही मूर्खपणाचे आहे ते आकलन करण्यात व त्याच्यात उत्तम गती दाखविण्यात! त्यांच्या अंतरंगात ते त्या ज्ञानाची खरीखुरी किंमत ओळखीत असतील काय? मी करतो तशी त्याची पारख तेही करतात असं असूं शकेल का? आणि स्वतःबद्दल अभिमान बाळगण्याइतका मी मूर्ख होतो! वर्गात माझा नंबर नेहमी पहिल्या काहींत असायचा. पण त्याचा मला काय उपयोग झाला आहे तर पाठशाळेतून बाहेर पडल्यावर आम्ही जिथं पोट भरायचे त्या खऱ्याखुऱ्या स्थानी मात्र आम्हांला नापासाइतेक तुटपुंजे गुण पडतात एवढाच! शॅझेलला माझ्यापेक्षा किती तरी अधिक ज्ञान आहे. पण तो त्याच्या प्रबंधलेखनात थोडाफार मूर्खपणा नेहमी घालीत असतो. त्यामुळे त्याचा नंबर पन्नासावा इतका खाली जातो; व ज्याला पहिला क्रमांक मिळतो तो केव्हा तर अजिबात विचार करीत नाही तेव्हा. अरेरे! एक शब्द, म. पीरार यांचा अवघा एक सूचक शब्द मला किती उपयुक्त ठरला असता!"

आठवड्यातून पाच वेळा जप करणे, "सेक्रेड हार्ट"ची स्तोत्रे—भजने म्हणणे इ. इ. तापसी धार्मिकतेची दीर्घ तंत्रे ज्युलिआँला कमालीची कंटाळवाणी वाटत. पण त्याचे डोळे उघडले त्या क्षणापासून त्याला त्याच गोष्टी जीवनातील सर्वांत जास्त मनोरंजक अशा वाटू लागल्या. स्वतःच्या वागणुकीकडे कडक टीका-दृष्टीने पाहताना आणि विशेषतः स्वतःच्या वागणुकीच्या पद्धतींची अतिशयोक्ती न करता, इतरांना आदर्श वाटणाऱ्या पाठशाळेच्या विद्यार्थ्यांप्रमाणे, ज्यांच्यामुळे कोणत्याही एखाद्या स्वरूपात आदर्श ख्रिश्चन वागणूक व्यक्त केली जाईल अशी अर्थपूर्ण कृती प्रत्येक क्षणी आचरण्याची ज्युलिआँला पहिल्यापासून महत्त्वाकांक्षा नव्हती. उकडलेले अंडे कसे खावे याचीही पाठशाळेत एक विशिष्ट पद्धती आहे आणि स्नातकाने पवित्र जीवनक्रमात किती प्रगती केली आहे याचे गमक मानले जाते.

हे वाचून वाचक कदाचित हसेल; पण सोळाव्या लुईच्या दरबारातल्या एका थोर महिलेन भोजनास बोलाविलेल्या अबे दलील यांनी अंडे खाण्यात केलेल्या सर्व चुकांची आठवण कृपया अशा वाचकाने करावी.

ज्युलिआँने "नॉन कल्पा" (बिनचूक) ह्या अवस्थेप्रत पोहोचण्याचा प्रयत्न प्रथम केला; म्हणजे असे की पाठशाळेच्या तरुण स्नातकांची चालण्याची ढब, हातवारे करण्याची त्यांची पद्धत, नजर फिरविण्याचे त्यांचे प्रकार इ. मधून खरे तर, काहीही ऐहिक भाव व्यक्त वा सूचित केले जात नाहीत; पण ऐहिक जीवनाची संपूर्ण व्यर्थता व पारलौकिक जीवनाचा ध्यास, यांच्यामध्ये अद्यापपावेतो तो तल्लीन झालेला नसावा. जायच्या यायच्या वाटांच्या भिंतीवर सगळीकडे कोळशाने कोरून लिहिलेली पुढील काही वाक्ये ज्युलिआँला दिसली.

"चिरंतन, शाश्वत सुखाशी किंवा नरकातील उकळत्या चिरकाली तेलाशी तुलना करता खडतर तपस्येच्या जीवनाची साठ वर्षे म्हणजे काहीच नव्हे." अशा लिखाणाचा तिरस्कार आता त्याला वाटेनासा झाला. उलट त्याला हे कळून चुकले की असे लिखाण त्याने स्वतःच्या नजरेपुढे नित्य ठेवले पाहिजे. तो स्वतःशी बोलला, "मी आयुष्यभर काय करीत राहणार आहे? श्रद्धाशील माणसांना स्वर्गात स्थान प्राप्त होईल अशी खात्री पटवून देणे हे माझे काम. पण ते स्थान त्या माणसांना कसे गोचर करावे? माझे बाह्यरूप व कोणाही नागरी सामान्य माणसाचे बाह्यरूप यांच्यातील फरकाने."

हरेक क्षणी चालू ठेविलेल्या, कित्येक महिन्यांच्या प्रयत्नानंतरही ज्युलिआँच्या मुद्रेवरचा विचारवंत माणसाचा नूर काही बदलला नाही. नजर फिरविण्याच्या आणि ओठ उघडण्याच्या त्याच्या पद्धतीतून प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवायला व प्रत्येक गोष्ट, हौतात्म्य पतकरूनही उचलून धरायला तो तयार आहे हे दाखविणारी त्याची निर्विवाद श्रद्धा काही व्यक्त होत नव्हती. ह्या बाबतीत इतर बहुतेक सगळ्या गावंढळ शेतकऱ्यांनी त्याला मागे टाकले होते हे पाहून ज्युलिआँला स्वतःचा राग येई. विचारवंत माणसाचा झोक त्याच्याजवळ नव्हता याच्यामागे अर्थातच सबळ कारणे होती.

इटालीच्या कॉन्व्हेंटमध्ये नेहमी आढळणारा अंध व अत्युत्कट धर्मश्रद्धेचा भाव स्वसंतुष्ट, लांबट चेहेऱ्यावर आणता यावा म्हणूनच ज्युलिआँने कोणते श्रम घ्यायचे बाकी ठेविले होते? आणि आपल्यासारख्या अनभिज्ञ माणसांसाठी ग्वेरचीनो या चित्रकाराने प्रार्थनामंदिरांमध्ये त्याच्या चित्रांचा जो वारसा ठेविला आहे त्यात वरील गोष्टीची अगदी चपखल उदाहरणे सापडतील. [उदा. "लुव्र"मधील क्र. ११३० चे चित्र; "ॲक्विटेनचा ड्यूक फ्रॅन्सिस आपला मुकुट बाजूला ठेवून धर्मोपदेशकाचे कपडे चढवीत आहे."]

मोठ्यातल्या मोठ्या सणांच्या प्रसंगी पाठशाळेच्या विद्यार्थ्यांना मांसाचे वडे व त्यांच्याबरोबर कोबीचे लोणचे देण्यात येत असे. असे नशीब फळफळले तरी त्याचा ज्युलिआँवर काहीच अनुकूल परिणाम होत नसे ही गोष्ट, जेवणाच्या मेजाशी त्याच्या शेजारी बसविलेल्या विद्यार्थ्यांनी पाहिली होती. हा ज्युलिआँचा सुरुवीतीचा एक गुन्हा होता. त्याच्या सवंगड्यांना त्यात अतिशय खुळ्या ढोंगाचे किळसवाणे चिन्ह दिसून आले. दुसऱ्या कशामुळे त्याला इतके शत्रू निर्माण झाले नसतील. ते म्हणत, "तो बघा, सद्‌गृहस्थ, तो गर्विष्ठ प्राणी– आपल्या वाट्यास आलेल्या सर्वोत्कृष्ट पदार्थांचा तिरस्कार करण्याचे सोंग आणीत आहे. अरे, मांसाचे वडे व कोबीचे लोणचे म्हणजे काय गोष्ट आहे! पण या शिंच्याची भिकारडी अहंमन्यता पाहा कशी आहे." देहदंड म्हणून ज्युलिआँने त्यांच्यापुढील त्याचे सगळे अन्न खाण्यापासून स्वतःला आवरायला हवे होते व कोबीच्या लोणच्याच्या बाबतीत त्याने स्वार्थत्यागी वृत्तीने एखाद्या मित्राला म्हणायला हवे होते, "त्या सर्वशक्तीमान ईश्वराला मनुष्य स्वखुषीने क्लेश सहन करण्याच्या स्वतःच्या सिद्धतेचे फक्त समर्पण करू शकेल. दुसरे, अर्पण करण्यायोगे माणसाजवळ काय आहे?

अशा स्वरूपाच्या गोष्टी पाहणे अगदी सोपे करणारा जो अनुभव आपल्याजवळ असतो त्याची वाण ज्युलिआँच्या ठिकाणी होती.

नाउमेदीच्या क्षणी ज्युलिआँ उद्‌गार काढी, "हाय! माझ्या साथीदारांचे ह्या तरुण शेतकऱ्यांचे अज्ञान त्यांच्या फार पथ्यावर पडतं. ते जेव्हा पाठशाळेत येतात तेव्हा धक्का बसेल एवढ्या विपुल ऐहिक गोष्टींच्या विचारांपासून त्यांना मुक्त करण्याची कामगिरी शिक्षकाला करावी लागत नाही; मी मात्र असे पुष्कळसे विचार माझ्याबरोबर आणले आहेत, आणि मी कसाही प्रयत्न केला तरी ते त्यांना माझ्या मुखावर दिसून येतातच."

पाठशाळेत दाखल झालेल्या तरुण शेतकऱ्यांपैकी जास्त खेडवळांचा अभ्यास ज्युलिआँने लक्षपूर्वक, जवळजवळ असूयेनेच केला. त्यांच्या अंगातील रॅटिनचे कोट काढून घेण्यात येऊन त्यांच्या अंगांवर पाद्र्यांचे लांब अंगरखे जेव्हा चढविण्यात येत त्या क्षणी त्यांचे शिक्षण फ्राँ– कान्त्वामधील एका म्हणीप्रमाणे फक्त कोरड्या व ओल्या पैशाच्या अमर्याद व भरपूर आदरापुरते मर्यादित होते.

रोकड पैशाबद्दलची उदात्त कल्पना व्यक्त करण्याची ती एक पावित्र्यपूर्ण व वीरश्रीयुक्त पद्धत आहे.

व्हॉल्टेअरच्या कथांतील नायकांप्रमाणे ह्या पाठशाळेतील विद्यार्थांना सर्वप्रथम जर कशात सुख वाटत असेल तर ते उत्कृष्ट भोजनावर भरपेट ताव मारण्यात. जो मनुष्य भारी व तलम कापडाचा कोट वापरतो त्याच्याबद्दल पाठशाळेत बहुतेक सगळ्यांना नैसर्गिकपणे आदर वाटतो असे ज्युलिआँला आढळले. "आपल्या न्यायालयात जो तथाकथित "सर्वांना सारखा" न्याय आपणाला दिला जातो, त्याची खरी किंमत– म्हणजे वाटते त्यापेक्षा पुष्कळच कमी किंमत– ही भावना अजमावते. पाठशाळेतील विद्यार्थी वारंवार एकमेकांत बोलत, "मोठ्यांच्या विरुद्ध न्यायालयाची पायरी चढून काय फायदा व्हायचाय?"

जूराच्या खोऱ्यात 'मोठा' हा शब्द श्रीमंत माणसाला उद्देशून वापरला जातो. ह्या मंडळींना सर्वांत श्रीमंत असामीबद्दल सरकारबद्दल वाटणाऱ्या आदराची कल्पना ह्यावरून एखाद्याला येऊ शकेल.

प्रिफेक्टचे नुसते नाव उच्चारले जाताच आदरपूर्वक स्मित न करणे हा या फ्राँ कान्त्वामधील शेतकरीवर्गात उद्धटपणा मानला जातो. आणि गरीब माणसांच्या बाबतीत अशा उद्धटपणाला तत्काळ शिक्षा भोगावी लागते. पोटाच्या भाकरीवरच पाय येतो.

तिरस्काराच्या भावनेमुळे सुरुवातीस जवळजवळ गुदमरून गेल्यावर ज्युलिआँने शेवटी तिच्या जागी अनुकंपेची भावना प्रस्थापित केली. त्याच्या बहुसंख्या साथीदारांचे वडील, हिवाळ्यात सायंकाळी आपापल्या खोपटांत परतत तेव्हा घरात पाव नाही, बटाटे नाहीत, चेस्टनट फळे नाहीत हे पाहण्याचे वारंवार त्यांच्या नशिबी येत असे. ज्युलिआँने स्वतःला विचारले, "म्हणजे मग ही नवलाची गोष्ट आहे काय की त्यांच्या दृष्टीने सगळ्यांत जास्त सुखी माणूस तो की ज्याने नुकतेच छान जेवण केले आहे आणि त्यानंतर दुसऱ्या क्रमांकाचा सुखी म्हणजे ज्याच्याजवळ एखादा छानसा कोट आहे! धर्मोपदेशकाच्या व्यवसायाबद्दलची माझी सवंग ओढ अगदी वाजवी आहे, म्हणजे असे की, धर्मोपदेशकाच्या व्यवसायात त्यांना या सुखभावनेची दीर्घकालीन पूर्तता दिसून येते. उत्तम जेवणखाण आणि हिवाळ्यात एक गरम कोट."

तरल कल्पनाशक्ती असलेला ज्युलिआँचा तिथला एक सहाध्यायी एकदा त्याच्या जोडीदाराजवळ बोलताना ज्युलिआँने ऐकले, "पाचवा सिंक्स्टस डुकरांचा कळप हाकीत असे; मी त्याच्यासारखा पोप का होऊ नये?" त्यावर त्याचा मित्र म्हणाला, "ते फक्त इटॅलिअनांनाचा पोप करतात. पण ग्रॅण्ड विकार्स, कॅनन्स आणि कदाचित बिशप्स अशा जागा भरण्यासाठी ते खात्रीने आपल्यांमधून चिठ्ठ्या टाकून निवड करतील. मंस्यूर पी. चलान्सचा बिशप हा एका पिपे तयार करणाराचा मुलगा आहे; माझ्या वडिलांचाही धंदा तोच आहे."

धार्मिक तत्त्वविषयक पाठ चालू असता मध्येच एके दिवशी अबे पीरार यांनी ज्युलिआँला बोलावून घेतले. ज्या भौतिक व नैतिक वातावरणात ज्युलिआँला बुडी मारावी लागली होती त्यातून बाहेर पडण्यास तेवढीच संधी मिळाली याचा आनंद त्या गरीब बिचाऱ्या तरुण प्राण्याला झाला.

ज्युलिआँ पाठशाळेत प्रथम दाखल झाला त्या दिवशी संचालकांनी त्याचे स्वागत अशा पद्धतीने केले होते की तो भयभीत होऊन गेला होता. आताही त्याच प्रकारे केले गेले होते.

अनुक्रमणिका

“खेळण्याच्या ह्या पत्त्यावर काही लिहिलेले आहे. ते काय आहे ते मला समजावून सांग बघू.” ते म्हणाले व अशा रीतीने बघू लागले की पृथ्वी दुभंगून आपल्याला गिळंकृत करील तर बरे असेच ज्युलिआँला वाटले.

ज्युलिआँ वाचू लागला,—

“आमॉन्दा बिने, जिराफ कॅफेजवळ, आठ वाजण्यापूर्वी तुम्ही जॉलीहून आलेले आहात अन् माझ्या आईचे दूरचे भाऊ लागता असे सांगा.” आपण केवढ्या मोठ्या संकटात सापडलो आहोत याची कल्पना ज्युलिआँला आली. अबे कास्तानॅदच्या पाळत ठेवणारांनी त्याच्याजवळचा पत्ता चोरून घेतला होता.

अबे पीरार यांच्या कपाळाकडे पाहात (कारण त्यांच्या भयंकर नजरेशी नजर भिडविणे त्याला शक्यच नव्हते. ज्युलिआँने उत्तर दिले, “मी इथं आलो त्या दिवशी भीतीने माझी गाळण उडाली होती. हे स्थळ असे आहे की जिथे सर्व प्रकारची चुगलखोरी, कंड्या व खुनशीपणे हेवेदावे केले जातात. तसेच आपल्या सवंगड्यांवर हेरगिरी करणे आणि त्यांच्या अंगी खोटे आरोप चिकटविणे अशा गोष्टींना इथे उत्तेजन मिळतं असं मला मंस्यूर शॅलाँ यांनी सांगितलं होतं. जीवन खरोखरी कसं असतं ते तरुण पाद्र्यांना दाखवून हे जग व त्यातील डामडौल, भपके यांच्याविषयी त्यांच्या मनात तिटकारा निर्माण करावा अशी परमेश्वराची इच्छा आहे.”

“अन् ही असली छानदार भाषणं तू कोणापुढे करतो आहेस, तर माझ्यापुढे! अरे पोरट्या, पाजी माणसा, काय समजलास?” अबे पीरार संतापाने बेफाम झाले होते.

ज्युलिआँ शांतपणे पुढे बोलला, “व्हेरिएरला जेव्हा जेव्हा माझ्या भावांना कोणत्याही कारणाने माझा मत्सर वाटे तेव्हा तेव्हा ते मला मारीत असत.”

“मुद्द्याचं बोल; चालू गोष्टीबद्दल सांग.” रागाने म. पीरार जवळजवळ बेभान झाले होते.

यत्किंचितही न घाबरता, दबून न जाता, आपले निवेदन पुढे चालू ठेविले, “मी बेझाँसाला एका दुपारी पोहोचलो. मला फार भूक लागलेली होती. मी एका उपाहारगृहात गेलो. ते अपवित्र स्थळ पाहून माझ्या मनात अतिशय तिटकारा निर्माण झाला. पण मला असं वाटलं की मला माझ्या दुपारच्या जेवणासाठी एखाद्या खानावळीपेक्षा किंवा पथिकाश्रमापेक्षा तेथे कमी पैसे पडतील. त्या उपाहारगृहाची बहुतेक मालकीणच असावी अशा एका तिथल्या बाईला माझ्या नवशिकेपणाची दया दाटली. ती मला म्हणाली, “बेझाँसा दुष्ट माणसांनी भरलेलं आहे, मला तुमच्याबद्दल फार काळजी वाटते, साहेब. तुम्हांला जर कुठे काही त्रास झाला तर माझ्याकडे या. आठ वाजण्यापूर्वी मला तसा निरोप पाठवा. पाठशाळेतील दरवानांनी तुमच्या निरोपाचं काम करण्यास नकार दिल्यास तुम्ही माझे दूरचे भाऊ लागता आणि जॉलीहून आलेले आहात असं सांगा...”

“कशाशी काही संबंध नसलेल्या गोष्टीच्या ह्या सगळ्या चऱ्हाटाची चौकशी करावी लागेल.” अबे पीरार उद्‌गारले. एका जागी स्थीर राहणे त्यांना अशक्य झाल्याने ते खोलीत लांब टांगा टाकीत इकडेतिकडे येरझारा घालीत राहिले. “जा, तुझ्या खोलीत परत जा.” पण मग ते स्वतः ज्युलिआँबरोबर आले आणि त्यांनी

त्याला त्याच्या खोलीत कोंडून घातले. नंतर ज्युलिआँने स्वतःच आपली ट्रंक तपासण्याचे काम हाती घेतले. त्या ट्रंकेच्या तळाशी त्याने ते घातकी कार्ड काळजीपूर्वक लपवून ठेवले होते. ट्रंकेतील कोणतीही वस्तू गहाळ झालेली नव्हती. पण अनेक वस्तू अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या; आणि तरीही किल्ली त्याच्याच ताब्यात होती. तिचे हस्तांतर कधीच झालेले नव्हते. ज्युलिआँ स्वतःला सांगू लागला, "मी अंधळेपणाने वागत होतो, त्या अवधीत ह्या इमारतीतून बाहेर जाण्याची परवानगी मला म. कास्तानॅद यांनी वरचेवर एवढ्या उदारपणे देऊ केली असता मी तिचा उपयोग कधीच केला नाही, ही केवढी सुदैवाची गोष्ट! त्यांच्या त्या उदारपणाचे कारण मला आता समजत आहे. कदाचित साधे कपडे घालून आमॉन्दाला भेटण्याचा मूर्खपणा माझ्या हातून झाला असता तर मग माझी गच्छन्तीच ठरलेली होती. त्यांच्याजवळ असलेल्या माहितीचा उपयोग त्या मार्गाने करून घेण्याच्या बाबतीत ते हताश झाल्यावर, ती वाया जाऊ नये म्हणून त्यांनी मला बदनाम करण्यासाठी आता ती वापरली आहे."

दोन तासांनी संचालकांकडून त्याला बोलावणे आले. तो गेला तेव्हा, पूर्वीइतके कडक नजरेने त्याच्याकडे न पाहता ते त्याला म्हणाले,

"तू खोटे बोललेला नाहीस. पण स्वतःजवळ असा एखादा पत्ता बाळगणे हा अविचारीपणा आहे. त्याच्या गंभीरपणाची कल्पना तुला येणार नाही. दुर्दैवी पोरा! दहा वर्षांच्या अवधीत ती गोष्ट तुझ्या नुकसानीस कदाचित कारणीभूत होईल."

★ ★ ★

## प्रकरण सत्ताविसावे

# जीवनाचा पहिला अनुभव

ज्युलिआँच्या जीवनातील ह्या कालखंडाचा फक्त थोडाच स्पष्ट व असंदिग्ध तपशील येथे देत असल्याबद्दल वाचकांनी कृपया आम्हांला क्षमा करावी. आमच्याजवळ अशा तपशिलाची कमतरता नाही; वस्तुस्थिती तर त्यापासून अगदी भिन्न आहे. पण ज्युलिआँला पाठशाळेत जे जीवन कंठाचे लागले ते फारच गडद काळ्या रंगात रंगवावे लागेल असे होते. आणि आम्ही तर या पुस्तकात एकंदरच वर्णनात अगदी सौम्य रंग वापरण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या लोकांना काही कारणांमुळे हालअपेष्टा भोगाव्या लागतात त्यांच्या अंतःकरणाचा त्याच्या स्मृतीने थरकाप होतो; आणि अशी भीती त्यांचे इतर प्रत्येक सुख लंगडे पाडते; ही कथा वाचताना वाचकांना जे सुख अनुभवास येत आहे तेसुद्धा.

ढोंगीपणाने वागण्याच्या प्रयत्नात ज्युलिआँला फारसे यश लाभले नाही. कित्येकदा अतिशय तिटकाऱ्याचे क्षण त्याला कंठाचे लागले. कधीमधी तर तो पूर्णपणे नाउमेद झाला. तो पूर्णपणे अपयशी ठरला; विशेषतः अशा या अधम जीवनक्रमात. बाहेरून त्याला थोडेसेही साहाय्य मिळाले असते तर स्वतःचा निर्धार टिकविण्यास त्याला ते पुरेसे ठरले असते. ज्या अडचणीवर त्याला मात करावयाची होती ती तशी काही फार मोठी नव्हती. पण तो एकाकी होता, समुद्राच्या मध्यभागी सोडून दिलेल्या जहाजाइतका तो एकटा एकाकी होता. तो स्वतःला म्हणाला, “आणि मला माझं सबंध आयुष्य अशा हलकट संगतीत व्यतीत करावं लागणार! समजा, मला यश आलं; तर, तर काय! या खादाडखाऊंच्या मनात फक्त कोणते विचार चालू असतील तर ते भोजनाच्या वेळी अधाशीपणे चापणार असलेल्या डुकरांच्या मांसाच्या धिरड्याचे! नाही तर कास्तानॅदसारख्या काही माणसांबद्दलचे; की ज्याला कोणताही गुन्हा हे फार मोठेसे कृष्णकृत्य वाटत नाही. अशी माणसे अधिकारपदावर येतील, पण केवढी किंमत देऊन? अरे देवा!

“मानवी इच्छाशक्ती सामर्थ्यशाली आहे असं सगळीकडे लिहिलेलं मी पाहतो; पण अशा तिरस्कारार्ह भावनेवर मात करण्याइतकी ती प्रभावी असते काय? मोठ्या माणसांपुढील काम त्यांना नेहमीच सोपे वाटत आलेले आहे; त्यांच्यापुढील संकट कितीही भयंकर असो, त्यांच्या दृष्टीने ते सुंदरच असते. आणि माझ्याभोवती जे काय सगळे घडत आहे त्याची घाणेरडी कुरूपता माझ्याशिवाय इतर कोणाला जाणवणार आहे?”

ज्युलिआँच्या आयुष्यातील हा एक अतिशय खडतर असा क्षण होता. बेझाँसाला तळ पडलेल्यांपैकी एखाद्या छानशा पलटणीत भरती होणे त्याला फार सोपे होते. तो लॅटिनचा शिक्षकही होऊ शकत होता. स्वतःला जगण्यासाठी त्याला अगदी किमान साधनांची गरज होती! पण मग निश्चित असा व्यवसाय पुढे नाही— कल्पनेच्या उड्डाणाला भावी विश्वच उरणार नाही. खरोखरी ते एक जिवंतपणीचे मरण होते.

ही पाहा ज्युलिआँच्या एका भिकारड्या दिवसाची सविस्तर हकीगत :—

“ह्या इतर तरुण शेतकऱ्यांपेक्षा मी वेगळा आहे अशा आढ्यतेने कितीदा तरी मी माझी पाठ थोपटून घेतली आहे. ठीक, मी आयुष्याचा बराचसा काळ व्यतीत केल्यावर आता मला कळून येत आहे की, वेगळेपणा द्वेष निर्माण करतो.” ज्युलिआँ एका सकाळी स्वतःशी म्हणाला, हे महान सत्य एका अतिशय त्रस्त करणाऱ्या

त्याच्या एका अपयशाने त्याला नुकतेच उघड करून दाखविले होते. पवित्रतेच्या सुगंधात रममाण होऊन राहणाऱ्या एका विद्यार्थ्याशी जुळवून घेण्याचे प्रयत्न त्याने एक आठवडाभर कष्टपूर्वक केले होते. तो त्यांच्याबरोबर तेथल्या आवारात हिंडत फिरत होता, त्याचे खुळचटपणाचे बोलणे लीनपणे ऐकून घेत होता. त्यामुळे चालतानाच त्याला झोप येऊ पाहात होती. अशा वेळी एकदम वादळ सुटले. ढगांचा गडगडाट झाला आणि तो साधू वृत्तीचा विद्यार्थी त्याला जोराने दूर ढकलीत म्हणाला,

"ऐक, ह्या जगात जो तो आपापला असतो. माझ्या डोक्यावर वीज पडावी अशी माझी इच्छा नाही; नास्तिक, दुसरा व्हॉल्टेअरच म्हणून परमेश्वर कदाचित तुझा चक्काचूर करील!"

ज्युलिआँने रागाने दात-ओठ खाल्ले आणि डोळे उघडून त्याने आभाळाकडे पाहिले. चमकणाऱ्या विजांच्या रेघांनी आभाळ जणू नांगरून निघाले होते. तो ओरडला, "वादळ उठलं असता मी जर स्वतःला झोप येऊ दिली तर माझ्यासारख्याची लायकी हीच की त्याने गारद होऊन मरावे. आता आपण दुसऱ्या एखाद्या दळभद्र्या खर्डेघाशावर विजय संपादन करण्याचा प्रयत्न करू या."

अबे कास्तानॅदच्या धार्मिक इतिहासाच्या तासाची घंटा वाजली.

आपल्या वडिलांना कंठाव्या लागणाऱ्या कष्टप्रद व दारिद्र्यमय जीवनाच्या भयाच्या दडपणाखाली राहणाऱ्या त्या तरुण शेतकऱ्यांना त्या दिवशी अबे कास्तानॅद यांनी आपल्या तासाला असे शिकविले की त्यांच्या दृष्टीने जर ती घटना भयंकर असेल तर त्यांनी पुढील विचार लक्षात घ्यावा. ह्या पृथ्वीतलावरील परमेश्वराच्या प्रतिनिधीकडून म्हणजेच पाद्र्याकडून दिल्या गेलेल्या अधिकारांव्यतिरिक्त सरकारला कोणतेच खरेखुरे व कायदेशीर अधिकार नव्हते. ते सांगू लागले, "तुमच्या जीवनाच्या पावित्र्याने, तुमच्या आज्ञाधारकपणाने तुम्ही पोपच्या हातातील दंडासारखे व्हा, आणि पोपकडून मिळणाऱ्या उदार देणग्यांसाठी आपण सत्पात्र आहोत हे कृतीने दाखवून द्या. मग तुम्ही एका अशा अत्युत्तम अधिकाराप्रत पोहोचाल की जिथे तुम्ही एकमेव सर्वाधिकारी असाल. कोणाही माणसाचे नियंत्रण मग तुमच्यावर असणार नाही. तुम्ही त्या महत्पदावर कायमचे आरूढ व्हाल. त्या पदासाठी देण्यात येणाऱ्या वेतनभत्त्यापैकी सरकार तिसरा हिस्सा देते व बाकीचा दोन-तृतीयांश भाग, तुमच्या शिकवणुकीने उत्तेजित झालेल्या निष्ठावान लोकांकडून देण्यात येतो."

आपल्या वर्गातून बाहेर पडल्यावर म. कास्तानॅद आवारात त्यांच्या विद्यार्थ्यांच्या घोळक्यात थांबले. त्यांचा पाठ त्या दिवशी विद्यार्थ्यांनी फार लक्षपूर्वक ऐकला होता.

भोवती जमलेल्या विद्यार्थ्यांना उद्देशून मग ते म्हणाले, "तुम्ही पाद्र्यांबद्दल असे म्हणू शकता की, प्रत्येक माणसाला त्याची लायकी असेल त्याप्रमाणे मिळतं. मला स्वतःला पहाडी भागातले असे विभाग माहीत आहेत की जेथे शहरातल्या अनेक पाद्र्यांकडे गोळा होणाऱ्या दक्षिणेपेक्षा अधिक रक्कम जमा होते. पैसे तर खूप जास्त मिळतातच; शिवाय गुबगुबीत कोंबडे, अंडी, ताजे लोणी आणि असंख्य चवदार छोटे मोठे पदार्थ यांच्याबद्दल सांगायलाच नको; आणि तिथे सर्वांत पहिली मानाची जागा निर्विवादपणे पाद्र्याच्या वाट्याला येत असते. नावाजण्याजोगी अशी एकही चांगली मेजवानी तेथे नसते की जिचे निमंत्रण त्याला दिले जात नाही. त्याचा खूप मानसन्मान करण्यात येतो – वगैरे."

म. कास्तानॅद वरती आपल्या खोलीकडे जातात न जातात तोच विद्यार्थ्यांनी आपली विभागणी अनेक गटांत केली. ज्युलिआँ मात्र त्यांपैकी कोणत्याच गटात नव्हता. रोगी, खच्ची केलेल्या मेंढ्यापासून दूर व्हावे त्याप्रमाणे ते त्याच्यापासून दूर झाले. प्रत्येक गटात एकेका विद्यार्थ्याने तांब्याचे नाणे वर हवेत फेकलेले ज्युलिआँने पाहिले; आणि त्याने जर छाप किंवा काटा बरोबर ओळखला तर त्याच्या जोडीदारांनी असा निष्कर्ष काढावयाचा की भरपूर दक्षिणा जमा करणाऱ्या विभागांपैकी एकावर त्याची नेमणूक लवकरच होणार आहे.

त्यानंतर अनेक गोष्टी सांगण्यास सुरुवात झाली. धर्मोपदेशकाच्या व्यवसायात प्रवेश केल्याला ज्याला जेमतेम वर्षच झाले असेल अशा एका तरुणाने, एका वृद्ध पाद्र्याच्या नोकराला, खच्ची केलेला एक ससा भेट दिला; आणि परिणामी स्वतःसाठी पाद्र्याकडून त्याच्या साहाय्यकाच्या जागेची मागणी करवून घेतली. त्यानंतर काही महिन्यांनी, लगेचच पाद्र्याचा मृत्यू झाल्याने, त्याच्या विभागाच्या छानदार अधिकारपदावर तो स्वतः आरूढ झाला होता. दुसऱ्या एकाने, अर्धांगवायूचा झटका येऊन गेलेल्या म्हाताऱ्या पाद्र्याकडील सर्व भोजनांना उपस्थित राहून आणि त्याच्यासाठी त्याची कोंबड्याची पिले काढून व वाढण्यासाठी उत्तम रीतीने त्यांचे तुकडे करून, एका भरभराटलेल्या गावी, तेथील पाद्र्यानंतर नेमावयाच्या अनुक्रम यादीत स्वतःचे नाव समाविष्ट करून घेण्याची व्यवस्था केली होती.

सर्वसाधारण गोष्टींपेक्षा अगदी निराळ्या असलेल्या या युक्त्याप्रयुक्त्या जेव्हा कल्पनाशक्तीला खाद्य पुरवीत तेव्हा पाठशाळेतील विद्यार्थी, प्रत्येक व्यवसायक्षेत्रातील तरुणाप्रमाणे, वरील लहानसहान क्लृप्त्यांच्या परिणामाची अतिशयोक्ती करीत. ज्युलिआँ त्याबद्दल विचार करू लागला तेव्हा स्वतःला म्हणाला, “त्यांच्या अशा संभाषणात मी आता भाग घेतला पाहिजे.”

विद्यार्थी जेव्हा मांसाहारी पक्वान्नाबद्दल आणि फायदेशील नोकऱ्यांबद्दल चर्चा करीत नसत तेव्हा धर्मोपदेशकाच्या शिकवणुकीची ऐहिक बाजू, बिशप्स व प्रिफेक्टस, महापौर व पाद्री (क्युरेज) यांच्यामधील अनेक फरक, अशा गोष्टींवर त्यांची बोलणी चालत. ज्युलिआँला दिसून आले की त्यांच्या मनता दुसऱ्या एका ईश्वराविषयी काही कल्पना दबून राहिलेल्या असत. पण हा दुसरा ईश्वर असा होता की, ते त्याला जास्त भिऊन राहात व पहिल्यापेक्षा तो अधिक सामर्थ्यवान आहे असेही त्यांना वाटे. त्यांचा हा दुसरा ईश्वर म्हणजे पोप होता. आपले बोलणे म. पीरार यांच्या कानी पडणार नाही याची खात्री केल्यावर तेथे खालच्या आवाजात असे बोलले जात असे की फ्रान्समध्ये सर्व प्रिफेक्टांच्या आणि महापौरांच्या नेमणुका करण्याच्या कामाची तसदी पोप स्वतः घेत नाही ह्याचे कारण हे होते की ते काम करण्याचे अधिकार पोपने फ्रान्सच्या राजाकडे सुपूर्द केले आहेत आणि त्याला “एल्डेस्ट सन ऑफ दी चर्च” (धर्माचा सर्वांत मोठा मुलागा) ह्या नावाची उपाधीही दिलेली आहे.

म. द. मेत्र यांनी पोपवर एक पुस्तक लिहिले होते. त्या पुस्तकाबद्दल ज्युलिआँला कौतूक वाटत असे. त्या कौतुकाच्या पोटी, आणखी काही फायदा उठवू शकू असा विचार त्याच्या डोक्यात ह्या सुमारास आला आणि वास्तविक त्याने त्याच्या सहकाऱ्यांना त्या दृष्टीने आश्चर्यचकित केलेही. पण त्यामुळे त्याने स्वतःवर एक नवे दुर्दैव ओढवून घेतले. पाठशाळेचे इतर विद्यार्थी त्यांची मते ज्या तऱ्हेने बोलून दाखवीत असत त्यापेक्षा जास्त चांगल्या तऱ्हेने स्वतः ती व्यक्त करून ज्युलिआँने त्यांना नाराज केले. म. शॅलाँ हे जसे स्वतःचे अविवेकी सल्लागार होते तसेच ज्युलिआँचेही होते. ते घाईने काही तरी करून ठेवीत असत. माणसाने आपली तर्कबुद्धी बिनचूक ठेवण्याची सवय अंगी कशी बाणवावी आणि निरर्थक शब्दांचा परिणाम स्वतःवर कसा होऊ

नये याचे प्रशिक्षण त्यांनी ज्युलिआँला दिले होते. पण त्यानंतर त्यांनी त्याला एक गोष्ट सांगण्याचे गाळले होत; ती ही की अगदी माफक प्रतिष्ठा असलेल्या माणसाला अशी सवय असणे हा गुन्हा ठरतो. आणि भक्कम पायावर आधारलेली निरोगी विचारसरणीही पुष्कळदा दुसऱ्यांना नाराज करण्यास कारणीभूत ठरते.

म्हणून ज्युलिआँचे ते छानदार भाषण, त्याच्या नावावर चढलेला आणखी एक गुन्हा ठरला. त्याच्या जोडीदारांना, त्याच्याविषयी विचार करणे भाग पडल्यामुळे, त्याने त्यांच्या मनात जी सगळी घृणा निर्माण केली होती ती दर्शविण्यासाठी त्यांनी दोन शब्द शोधून काढले. "मार्टिन ल्यूथर" असे टोपणनाव त्यांनी ज्युलिआँला बहाल केले. ते म्हणाले, "ज्युलिआँला प्रामुख्याने ज्याचा अभिमान वाटतो त्या त्याच्या धर्मलंड, तार्किक युक्तिवादाबद्दल ते नाव त्याला देण्यात आलेले आहे."

पाठशाळेतील कित्येक तरुण विद्यार्थ्यांचे चेहेरे ज्युलिआँच्या चेहेऱ्यापेक्षा अधिक तजेलदार होते; जास्त देखणे म्हणूनही ते मानले गेले असते. पण ज्युलिआँचे हात छान, गोरे होते; आणि वैयक्तिक स्वच्छतेच्या त्याच्या काही सवयी तो छपवू शकत नव्हता. पण नशिबाने त्याला ज्या कठोर वसतिस्थानात ढकलले होते तेथे ह्या वैशिष्ट्याला एवढीशीही किंमत वा महत्त्व नसते. ज्या अस्वच्छ शेतकऱ्यांमध्ये तो राहात होता त्यांनी ज्युलिआँ हा एक अतिशय ढिल्या नीतीचा माणूस आहे असा डांगोरा पिटला होता. आमच्या नायकावर ज्या असंख्य आपत्ती आल्या त्यांचा तपशील देऊन वाचकांना कंटाळा आणण्याचे आम्हाला भय वाटते. एकच उदाहरण द्यावयाचे म्हणजे पाठशाळेतील त्याच्या जोडीदारांमध्ये जे जास्त ताकदवान होते त्यांनी ज्युलिआँला झोडपून काढण्याचा पायंडा पाडण्याचा प्रयत्न केला. ज्युलिआँलाही स्वसंरक्षणाची सिद्धता करणे भाग पडले. त्याने धातूचा कंपास स्वतःच्या हाती घेतला व आपण त्याचा वापर करू असे त्याने त्याच्या विरोधकांना खुणावून सांगितले. हेराच्या प्रतिवृत्तांत शब्दांचे भडक वर्णन करून बोलणाऱ्याच्या माथी दोष चिकटविता येतो; पण खुणांचा वृत्तान्त काही तसा उतरणे शक्य नसते.

★ ★ ★

अनुक्रमणिका

## प्रकरण अठ्ठाविसावे

# मिरवणूक

ज्युलिआँ स्वतःला क्षुद्र व मूर्ख भासविण्याचा प्रयत्न करीत होता. पण व्यर्थ. तो त्याच्या अध्यापकांना समाधान देऊ शकला नाही; तो एक फार वेगळा माणूस होता. तो स्वतःला म्हणाला, "आणि तरीही हे सगळे अध्यापक म्हणजे फार मोठ्या सूक्ष्म दृष्टीची व हजारातून एक अशी निवडलेली माणसे आहेत; मग त्यांना माझी विनयशीलता आवडत नाही हे कसे?" कोणत्याही गोष्टीवर ज्युलिआँ चटकन विश्वास ठेवीत असे; व प्रत्येक गोष्टीचा परिणाम त्याच्यावर लगेच झालेला दिसून येत असे. त्याच्या ह्या प्रवृत्तीचा फायदा घेणारी फक्त एकच व्यक्ती ज्युलिआँला आढळली व ती म्हणजे अबे शा बेरनार. कॅथीड्रलमध्ये ते "मास्टर ऑफ सेरेमनीज" (सर्व तांत्रिक समारंभाचे व्यवस्थापक) होते. तेथे गेली पंधरा वर्षे त्यांना वरच्या जागेच्या, म्हणजे कॅनन होण्याच्या आशेवर झुलवीत ठेवण्यात आले होते. आणि ह्या प्रतीक्षेच्या कालावधीत ते पाठशाळेत "धार्मिक वक्तृत्व" हा विषय शिकवीत असत. आपल्या पहिल्या, अंधळेपणाने वागण्याच्या काळात इतर वर्गांप्रमाणे, ज्युलिआँ त्यांच्या वर्गात, अगदी नियमितपणे, सगळ्यात वरती असे. यामुळे अबे शा ज्युलिआँच्या बाजूने पक्षपातीपणा दाखवू लागले होते. आपला तास संपला की, आनंदाने त्याचा दंड धरून ते बागेत फेरफटका मारीत असत.

ज्युलिआँने स्वतःला विचारले, "यात त्यांचा कोणता उद्देश असावा?" त्याला साश्चर्य असे आढळून आले की, अबे शा त्याच्याशी तासन् तास बोलत असताना कॅथीड्रलच्या मालकीच्या विविध, मौल्यवान वस्तू हा त्यांच्या बोलण्याचा विषय असे. वेगवेगळ्या धार्मिक समारंभांच्या वेळी पाद्र्यांनी वापरावयाचे सतरा भरतकाम केलेले, बिनबाह्यांचे झगे, व शिवाय मृतात्म्यांना शांती लाभावी म्हणून करावयाच्या प्रार्थनांच्या वेळचे असेही पवित्र पोषाख कॅथीड्रलच्या मालकीचे होते. कॅथीड्रलची चालक मंडळी, प्रेसिडेंट द रूबॉम्प्रे यांच्या विधवेकडून फार मोठ्या अपेक्षा बाळगीत होती. ह्या बाई नव्वद वर्षांच्या होत्या आणि स्वतःच्या विवाहप्रसंगीचे जे भारी कपडे त्यांनी गेली निदान सत्तर वर्षे जपून ठेविले होते त्या लिऑनमधील प्रसिद्ध जरीच्या धाग्यांनी त्यांच्यावर आकृती भरलेल्या होत्या. चालण्याचे थांबवून आणि स्वतःचे डोळे पूर्णपणे उघडीत अबेशा ज्युलिआँला म्हणाले, "माझ्या मित्रा, तू जरा कल्पना कर, त्या भारी वस्तूंना इतर कशाची तुलनाच नाही. त्यांच्यात खूपसं सोनं आहे. बेझाँसाच्या भल्या लोकांत असा सर्वसाधारण समज आहे की प्रेसिडेंटच्या मृत्युपत्रामुळे कॅथीड्रलच्या खजिन्यात दहापेक्षा जास्त भारी अंगरख्यांची भर पडेल; त्याशिवाय मोठ्या मेजवान्यांच्या प्रसंगी वापरावयाचे, धर्मोपदेशकांचे चार-पाच लांब झगेही मिळतील ते वेगळेच." आणि मग आपला आवाज थोडा खाली आणून अबेशा पुढे बोलू लागले, "मी तर यापुढेही जाऊन म्हणेन की प्रेसिडेंटच्या मृत्युपत्रानुसार आपल्याला चांदीच्या मुलाम्याच्या आठ भव्य मेणबत्त्याही मिळणार आहेत असं मानण्यास सबळ कारण आहे. पूर्वी ड्यूक ऑफ बर्गंडी, चार्ल्स दि बोल्ड यांनी इटलीमध्ये त्या खरेदी केल्या होत्या असे म्हणतात. त्या बाईंचा एक पूर्वज ड्यूकचा आवडता मंत्री होता."

ज्युलिआँ स्वतःशीच अंदाज बांधू लागला. तो स्वतःशी म्हणाला, "ह्या माणसाने या साऱ्या डामडौलाचे एवढे वर्णन चालवले आहे ते कशासाठी? त्यामागे त्यांचा कोणता हेतू असावा? अशी काळजीकाट्याची तयारी किती काळ चाललेली असली तरी तिच्या द्वारा काहीच निष्पन्न झालेले नाही! माझ्यावर त्यांचा फारच थोडा विश्वास असावा. त्यांच्या बरोबरीच्या इतर कोणापेक्षाही ते जास्त हुषार आहेत.

अनुक्रमणिका

इतरांचे सुप्त हेतू पंधरवड्यानंतर लगेच उघड होऊन कळून येतात. मला वाटतं, गेली पंधरा वर्षे ह्या माणसाच्या महत्त्वाकांक्षेचा छळवाद होत आलेला आहे."

पाठशाळेतील विद्यार्थ्यांची सशस्त्र कवाईत चालू असता एका संध्याकाळी मध्येच ज्युलिआँला अबे पीरार यांच्याकडून बोलावणे आले. तो त्यांच्याकडे गेला तेव्हा ते म्हणाले, "उद्या कॉर्पस डॉमिनीचा (ईश्वरी देह) उत्सव आहे. म. ल अबेशा बरनार यांना कॅथीड्रल सुशोभित करण्यासाठी तुझी मदत हवी आहे. जा आणि ते सांगतील ते काम आज्ञाधारकपणे कर."

अबे पिरारनी त्याला माघारी बोलाविले आणि दयाभावाने ते त्याला पुढे म्हणाले, "गावातून एखादा फेरफटका मारण्यासाठी ह्या संधीचा फायदा करून घ्यायचा की नाही हे तुझं तू ठरवायचं आहेस."

"इन्सेदो पर इग्नेस" ज्युलिआँने उत्तर दिले. मी धोकेबाज जमिनीवरून चालत आहे असा त्याच्या म्हणण्याचा मथितार्थ होता.

दुसऱ्या दिवशी प्रातःकाळीच ज्युलिआँने कॅथीड्रलकडे कूच केले. तो खाली पाहून चालत होता. तेथल्या रस्त्यांच्या दर्शनाने व साऱ्या शहरभर पसरत चाललेल्या धांदलगडबडीने तो उल्हसित झाला. मिरवणूक यावयाची होती म्हणून, रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी लोक आपापल्या घरांचे दर्शनी भाग रंगीत पताका वगैरे लावून सुशोभित करीत होते. पाठशाळेत त्याने घालविलेला सगळा काळ त्याला एखाद्या क्षणासारखा वाटला. त्याचे विचार वेर्जीत भ्रमण करीत होते. तसेच त्या मोहक आमॉन्दा बिनेभोवती घोटाळत होते. तिला आपण भेटू शकू असे त्याला वाटले. कारण तिचे उपाहारगृह त्याच्या वाटेपासून अगदी थोडेसेच दूर होते. त्याला अबेशा बरनार दुरून दिसले. आपल्या आवडत्या कॅथीड्रलच्या दरवाजातच ते उभे होते. अंगापिंडाने ते धिप्पाड होते, त्यांचा चेहेरा आनंदी होता, तसेच ते खुल्या दिलाचे होते. त्या सकाळी त्यांची मुद्रा विजयी दिसत होती. ज्युलिआँकडे नजर जाताच ते त्याला उद्देशून मोठ्याने म्हणाले, "माझ्या लाडक्या पोरा, मी केव्हापासून तुझी वाट पाहात आहे. स्वागत करतो मी तुझं. आज आपल्याला बराच वेळ काम करावं लागणार आहे आणि ते कष्टाचंही आहे. जरा लवकरच न्याहारी करून आपण ताजेतवाने होऊ या. नंतर पुन्हा आपण दहा वाजता माठ्या प्रार्थनेच्या सुमारास उपाहार करू."

गांभीर्याच्या आविर्भावात ज्युलिआँ त्यांना म्हणाला, "माझी अशी इच्छा आहे की, क्षणभरही मला एकट्याला सोडलं जाऊ नये" आणि मग ते उभे होते तेथे डोक्यावरच असलेल्या घड्याळाकडे बोट दाखवून तो पुढे म्हणाला, "हे लक्षात घ्या की पाच वाजायला एक मिनिट कमी असता मी इथं पोहोचलो आहे." त्यावर अबेशा म्हणाले, "अस्सं, म्हणजे तुला पाठशाळेतल्या त्या पाजी तरुणांची भीती वाटत आहे तर एकूण! त्यांच्याबद्दल तू विचार करणे हेसुद्धा वाजवीपेक्षा जास्त चांगुलपणाचे आहे. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या कुंपणात काटे असतात म्हणून तो रस्ता वाईट ठरतो का? वाटसरू आपला मार्ग आक्रमण करतो आणि त्या दुष्ट काट्याकुट्यांना, ते असतात तेथेच वाळत पडू देतो. ते असो; पण मित्रा, आपण कामाला लागलं पाहिजे. काम पहिलं."

ते काम कष्टाचे असल्याचा, अबेशा यांनी केलेला उल्लेख बरोबर होता. कॅथीड्रलमध्ये आदल्या दिवशी मोठ्या प्रमाणावर एका उत्तरक्रियेशाठी प्रार्थना झालेली होती. साहजिकच सजावटीची कोणतीही तयारी करणे बरेच अवघड झाले होते. त्यामुळे सकाळच्या वेळात प्रत्येक गॉथिक घडणीच्या खांबाला रंगीत, लाल

तलम कापड गुंडाळण्याचेच काम उरकणे भाग पडले. ते खांब तेथील खुर्च्यांच्या रांगांपासून चर्चचा गाभारा अलग करीत होते. तीस फूट उंचीच्या त्या खांबांना लाल रेशमी कापड एका कोटासारखे गुंडाळावयाचे होते. बैठक, सजावट व पडदे, गाद्यागिरद्या आदींची कामे करणारे चार कर्मचारी पॅरिसहून टपालगाडीने आणण्याचा हुकूम बिशपने दिला होता. पण ती माणसे स्वतः काही प्रत्येक गोष्ट करू शकत नव्हती; आणि बेझाँसाच्या त्यांच्या सहकाऱ्यांच्या अडाणी प्रयत्नांना उत्तेजन देऊन काम करवून घेण्याऐवजी ती माणसे त्यांचा उपहास करून त्यांच्या वेंधळेपणात भरच टाकीत होती!

आपल्याला स्वतःच शिडीवर चढून गेले पाहिजे हे ज्युलिआँच्या लक्षात आले. त्याच्या अंगचे चापल्य ह्या वेळी चांगले उपयोगी पडले. काम करण्यासाठी आलेल्या स्थानिक लोकांना आवश्यक सूचना देण्याची कामगिरी त्याने स्वतःकडे घेतली. ज्युलिआँला एका शिडीवरून दुसरीवर उडी घेताना पाहून अबे शा यांना अत्यानंद होत होता. सर्व खांबांना लाल जायदानी कापड लावून झाल्यावर उंच वेदीवर असलेल्या मोठ्या मेघडंबरीवर पिसांचे भलेमोठे गुच्छ लावण्याचे काम त्यांना हाती घ्यावयाचे होते. इटॅलिअन संगमर्मराच्या आठ मोठ्या, पिळाच्या खांबांवर भारी सोनेरी मुलाम्याचा एक लाकडी मुकुट आधारलेला होता. पण मेघडंबरीच्या मध्यभागी पोहोचता येण्यासाठी पूजास्थानावरून एका जुन्या लाकडी कार्निसाच्या पलीकडून जाणे भाग होते. कार्निस जमिनीपासून चाळीस फूट उंचीवर होते आणि ते बहुतेक वाळवीने खाल्लेले होते.

त्या धोकादायक चढणीकडे लक्ष जाताच पॅरिसहून आलेल्या कामकऱ्यांचा, आतापर्यंतचा अमाप उत्साह व हर्ष पार मावळून गेला. त्यांनी खालून, आपल्या जागेवरूनच वर पाहिले, तोंड भरून चर्चा केली; पण कामासाठी ते वर जाण्यास धजले नाहीत. वरती लावावयाचे ते पिसांचे गुच्छ ज्युलिआँने स्वतःजवळ घेतले आणि तो शिडीवरून चढून गेला. मेघडंबरीच्या मध्यभागाच्या नकशीवर त्याने मुकुटाच्या आकारात गुच्छांची आकर्षक रचना करून तेथे ते बसविले आणि शिडीवरून तो खाली आला; त्याबरोबर अबे शा बेरनार यांनी त्याला आनंदाने कवटाळले; तेव्हा तो सत्पात्र पाद्री उद्‌गारला, “छान, अगदी परीक्षेला उतरलास; ह्याबद्दल मी माँसेनिऑरना सांगने.”

त्यांचा दहा वाजताचा उपाहार म्हणजे एक मजेदार मेजवानी होती. आपले देऊळ अबे शा यांना त्यापूर्वी एवढे छानदार कधीच दिसले नव्हते. ते ज्युलिआँला म्हणाले, “माझ्या लाडक्या शिष्या, ह्या आदरणीय मंदिरात, खुर्च्या भाड्याने देण्याचे काम माझी आई करीत असे. त्यामुळे मी ह्या भव्य प्रासादात वाढलो म्हणेनास. रोबस्पिरेच्या भयानक हल्ल्याने आमचा नाश केला. पण मी तेव्हा आठ वर्षांचा होतो. तेव्हापासूनच खासगी घरांतून मी विधिपूर्वक प्रार्थना चालवीत असे. प्रार्थनेच्या दिवशी ते घरमालक मला जेवायला देत असत. माझ्यापेक्षा जास्त चांगल्या रीतीने इतर कोणालाही पाद्र्याच्या झग्याची घडी करता येत नसे; त्यांच्यावरील सोनेरी गोफ माझ्या हातून कधीही तुटला नाही. नेपोलिअनने धर्मश्रद्धा पुनरुज्जीवित केल्यापासून ह्या मातृसमान आदरणीय चर्चमधील प्रत्येक कामाची जबाबदारी उचलणे माझ्याकडेच आलेले आहे व ते मी आनंदाने करीत आलो आहे. वर्षातून पाच दिवस हे चर्च अशा सुंदर अलंकारांनी, वस्त्राभरणांनी सजवले–नटवलेले मी पाहात आलो आहे; पण इतकं झगमगीत, एवढं तेजस्वी ते यापूर्वी कधीच दिसलं नाही; लाल कापडांच्या जामदानी पट्ट्या खांबांना आज गुंडाळल्या गेल्या आहेत तितक्या चांगल्या कधीच वेढल्या गेल्या नव्हत्या; आणि इतक्या चापूनचोपून त्या खांबांवर कधीच बसल्या नव्हत्या.”

ज्युलिआँच्या मनात विचार आले, “अखेर ते मला त्यांचं रहस्य सांगणार आहेत; ते आता स्वतःबद्दल माझ्याशी बोलणार आहेत; मन अगदी मोकळं करून, दिलखुलासपणे– असं दिसतंय.” अबे शा यांची

मनःस्थिती उद्दीपित झाली होती; तरी ते अविचारीपणे काहीच बोलले नाहीत. ज्युलिआँने स्वतःला सांगितले, "आणि तरीही त्यांनी खूप कष्ट घेतले आहेत; ते आनंदात आहेत. चांगले मद्य मंडळींना भरपूर देण्यात त्यांनी बिलकूल कुचराई केलेली नाही. काय छान आहे हा मनुष्य? माझ्यासाठी केवढा छानदार आरर्श आहे हा! अगदी पहिलं पारितोषिक मिळवणारा पहिल्या दर्जाचा." (ज्युलिआँने त्याचे हे जरा असंस्कृत शब्द म्हाताऱ्या सर्जनकडून उचललेले होते.)

मोठी प्रार्थना चालू असता जेव्हा पवित्र घंटा वाजली तेव्हा पाद्र्याचा रुंद बाह्यांचा सफेत डगला आपल्या अंगावर चढविण्याची इच्छा ज्युलिआँला झाली; म्हणजे आपल्याला त्या भव्य मिरवणुकीतून बिशपच्या मागून जाता येईल असे त्याला वाटले.

तितक्यात अबे शा ओरडून म्हणाले, "आणि ते चोर, माझ्या मित्रा, अरे ते चोर, तू विसरतोस त्यांना. मिरवणूक बाहेर पडत आहे; चर्च रिकामे होऊन जाणार आहे; तेव्हा अशा वेळी आपण राखणदारी करायला हवी; तू नि मी. खांबाच्या तळाशी गुंडाळलेल्या त्या छानदार गोफातून, सात—आठ फूटच गोफ चोरीस जाऊन तेवढ्यावरच भागले तर आपण आपल्याला नशीबवान समजू. मादाम द. रूबॉम्प्रे यांनी दिलेली ती आणखी एक देणगी आहे. पूर्वी प्रसिद्धी पावलेल्या त्यांच्या काउंट पणजोबाकडून ती आलेली आहे. ते अगदी शुद्ध सोने आहे, माझ्या मित्रा." अबे बोलतच गेले, ज्युलिआँच्या कानात कुजबुजत चालली होती; आणि त्यात अभिमानयुक्त आनंदाची स्पष्ट भावना होती. "त्यात काही कम अस्सल नाही बरं का? खुर्च्यांच्या रांगा विभागणाऱ्या मधल्या रस्त्याच्या उत्तरेकडील भागाची देखरेख मी तुझ्यावर सोपवितो. तेथून तू हालू नकोस. दक्षिणेच्या बाजूची व गाभाऱ्याची देखरेख करण्याचे काम मी माझ्याकडे घेतो. पापाची कबूली देण्यासाठी माणसे ज्या जागी येत असतात तिथे पण नजर ठेव. आपल्या पाठी वळताच चोरांच्या महिला हेर क्षणभर त्यांचं लक्ष तिकडेच लावीत असतात."

अबे शा यांनी त्यांचे बोलणे संपविले तेव्हा पावणेबारा वाजले होते आणि मोठ्या घंटेचे टोल एकदम पडू लागले. घंटा वाजविणारे कर्मचारी त्यांचे सगळे बळ लावून ती ओढीत होते. त्या गंभीर, पवित्र आवाजाने ज्युलिआँला अतिशय पुलकित केले. त्याची कल्पनाशक्ती जमिनीवरून उडून वरच्या पातळीवर विहार करू लागली.

छोट्या सेंट जोन्ससारखा पोषाख केलेल्या बायकांनी "ब्लेसेड सॅक्रॅमेंट"च्या पुढे विखरून टाकलेल्या गुलाबाच्या पाकळ्यांच्या व धूपाच्या सुगंधाने ज्युलिआँच्या भावना तीव्रतेने उद्दीपित केल्या गेल्या.

घंटेच्या शांत-गंभीर स्वराने ज्युलिआँला पन्नास सेंटाईम्स कमाविणाऱ्या आणि कदाचित आणखी पंधरा-वीस सेंटाईम्स धार्मिक माणसांकडून मिळविणाऱ्या वीस लोकांच्या कामाचाच फक्त विचार सूचित करावयास हवा होता. दोर व इमारती लाकूड यांची, वापरामुळे होणारी झीज आणि दर दोनशे वर्षांतून एकदा खाली कोसळणाऱ्या खुद्द घंटेपासून संभवणारा धोका यांचा त्याने विचार करून, घंटा वाजविणाऱ्यांची मजुरी कमी करण्यासाठी एखादा उपाय योजावयास हवा होता; किंवा चर्चच्या पैशाच्या पिशवीवर ताण पडू न देता त्याच्या आध्यात्मिक खजिन्यातून त्या कामकऱ्यांना काही अनुग्रह देऊन वा अन्य एखादी तत्सम कृपा त्यांच्यावर करून त्यांना मोबदला पोहोचवावयास हवा होता.

घंटेच्या अशा अत्यंत सुरेल व जोरदार आवाजांनी उद्दीपित झालेल्या ज्युलिआँचा आत्मा वरीव सुज्ञ विचार करण्याऐवजी काल्पनिक वातावरणातून भटकत होता. तो कधीकाळी एखादा चांगला पाद्री किंवा मोठा प्रशासक बनेल असे दिसत नव्हते. अशा तऱ्हेने विचलित होणारे जीव फार तर कलाकार होऊ शकतात. आता येथे सूर्याच्या ढळढळीत प्रकाशात ज्युलिआँची मूळ कल्पनाशक्ती मोकळी सुटली होती. सार्वत्रिक द्वेषामुळे व कुंपणाच्या प्रत्येक झुडुपामागून जॅकोबिनीझम डोकावीत आहे असे सांगण्यात आल्यामुळे ज्यांना वास्तव जीवनाची जाणीव करून देण्यात आली होती अशा, ज्युलिआँच्या सुमारे पन्नास सेमिनॅरिस्टांनी कॅथीड्रलच्या मोठ्या घंटेचा आवाज ऐकल्यावर, घंटा वाजविणाऱ्यांना दिलेल्या मजुरीचाच फक्त विचार केला असता. घंटेच्या आवाजाच्या प्रतिक्रियेने लोकांच्या मनात निर्माण केल्या जाणाऱ्या भावनांचे प्रमाण, घंटा वाजविणारांना मोबदला दिला जातो त्या प्रमाणात पुरेसे आहे किंवा नाही ह्या प्रश्नाबाबत निश्चित मत बनविण्यासाठी त्या सेमिनरिस्टांनी बॉरमची बुद्धी वापरली असती.

कॅथीड्रलच्या व्यावहारिक हितसंबंधाकडे ज्युलिआँने लक्ष पुरविले असते तर स्वतःच्या मूळच्या ध्येयाच्या पलीकडे उड्डाण करून त्याच्या कल्पनाशक्तीचे चॅप्टरसाठी चाळीस फ्रँकची बचत करण्याचा विचार केला असता आणि पंचविस सेंटाईमचा खर्च टाळण्याची संधी त्याने हातची जाऊ दिली असती.

पूर्वी कधी नव्हे इतकी छानदार हवा पडली होती. अशा वातावरणातून मिरवणूक बेझाँसामधून आस्ते आस्ते तिचा मार्ग आक्रमीत होती. सर्व स्थानिक अधिकाऱ्यांनी एकमेकांशी स्पर्धा करून अहमहमिकेने जागोजागी चमकदार सजावट केली होती; तिथे थोडे थांबून ती पुढे जाई. चर्चमध्ये निःस्तब्ध शांतता भरून राहिली होती, चोहीकडे प्रकाश पसरला होता, सुसंवेद्य शीतलता नांदत होती. धूप व फुले यांच्या सुगांधामुळे चर्चमधील वातावरण अजूनही सुखकर असल्याचे जाणवत होते.

आसनांच्या लांब रांगांतील शीतलता, गंभीर एकान्त व शांतता यांनी ज्युलिआँचे चिंतन अधिकच मधुर बनले. आता अबे शा यांच्याकडून व्यत्यय होण्याची भीती त्याला वाटत नव्हती. कारण ते इमारतीच्या दुसऱ्या भागात काही कामात गुंतलेले होते. ज्युलिआँच्या आत्म्याने त्याच्या मर्त्य देहाच्या बाह्यावरणाचा जवळजवळ त्याग केला होता. त्याला नेमून देण्यात आलेले काम पार पाडण्यासाठी बैठकीच्या उत्तरभागात त्याच्या आत्म्याचे ते बाह्यावरण संथ गतीने येरझारा घालीत होते, त्याला अधिकच स्वस्थता वाटत होती. त्याला दिसत होते की, पापाची कबूली देण्याच्या दालनात, काही अगदी थोड्या निष्ठावान महिलांशिवाय अन्य कोणीच नव्हते. त्याची नजर तिकडे होती पण तो काही खास लक्ष देऊ पाहात नव्हता. पण तरीही त्याचे दुर्लक्ष उडून, त्याचे लक्ष अर्धवटपणे आकृष्ट झाले ते दोन महिला पाहून. त्या दोघींनी अतिशय नीटनेटके पोषाख केलेले होते. दोघींनी गुडघे टेकलेले होते. पैकी एकजण खुद्द पापविमोचनात मग्न होती, तर दुसरी अगदी जवळच खुर्चीवर होती. विशेष निरखून न पाहताच त्या त्याला दिसत होत्या; आणि आता तेथे कोणी पाद्री नव्हता असेही त्याच वेळी त्याच्या लक्षात आले. त्याचे कारण स्वतःच्या कर्तव्याची संदिग्ध कल्पना हे असावे; किंवा त्या दोन महिलांचा अगदी साधाच पण उमरावी थाटाचा पोषाख असावा. त्याने विचार केला, "ह्या सुंदर महिला खरोखरीच धार्मिक असल्या तर त्या मिरवणुकीच्या वाटेवरील स्थानापुढे गुडघे टेकीत नाहीत किंवा त्या फॅशनेबल असल्या तर त्यांना एखाद्या सज्जाच्या अग्रभागी चांगल्या जागा देण्यात आलेल्या नाहीत हे फार आश्चर्यकारक आहे! तो झगा किती छान बेतलेला आहे! केवढं लालित्य आहे त्यात!!" त्यांचे चेहेरे पाहण्यासाठी त्याने आपल्या चालण्याची गती मंद केली. पापविमोचनाच्या स्थळी गुडघे टेकून जी स्त्री बसलेली होती तिने, तिथे पसरलेल्या शांततेत, ज्युलिआँच्या पावलांचा आवाज ऐकून आपले डोके थोडेसे

कळविले आणि त्याबरोबर ती एकदम ओरडली व तिला मूर्च्छा आली. तिच्या अंगातली शक्ती जणू नष्ट झाली व ती मागे कोसळली.

तिच्या जवळच असलेली तिची मैत्रीण लगेच तिला सावरण्यासाठी घाईने पुढे सरसावली. त्याच क्षणी ज्युलिआँला त्या पडलेल्या स्त्रीचे खांदे दिसले. त्याच्या दृष्टीला पूर्वपरिचित असलेल्या, मोठ्या मोत्यांच्या माळेने त्याचे लक्ष वेधले. त्या व्यक्तीचे केस पाहताच ते मादाम रेनॉल यांचेच असल्याचे कळून त्याची मनःस्थिती कशी झाली असेल? होय; त्या मा. रेनॉलच होत्या; आणि त्यांचे डोके अलगद, वरच्यावर धरण्याचा व त्यांना पडून देण्याचा प्रयत्न करणाऱ्या मा. डेरविल होत्या. ज्युलिआँ भावनेने भारावला गेला होता, त्याने एकदम पुढे उडी घेतली व त्या दोघींना आधार दिला; नाही तर मा. रेनॉलना सावरून धरणारी त्यांची मैत्रीणसुद्धा मा. रेनॉलबरोबरच खाली पडली असती. मा. रेनॉल यांचे डोके त्यांच्या खांद्यावर कलले होते; त्या पार फिक्या पडल्या होत्या आणि त्यांना अजिबात शुद्ध उरली नव्हती. गवती खुर्चीच्या पाठीवर त्यांचे सुंदर शिर अलगद टेकविण्यात त्याने मा. डेरविलना मदत केली. त्याने गुडघे टेकले होते.

मा. डेरविलनी त्याच्याकडे वळून पाहिले आणि त्याला ओळखले. भयंकर पेटलेल्या रागाच्या स्वरात त्या त्याला म्हणाल्या, "निघून जा, महाशय; इथून पळून जा. कोणत्याही परिस्थितीत त्यांनी तुम्हाला पाहाता कामा नये. तुम्हाला पाहून त्या निश्चितपणे भयंकर भयभीत होतील. तुम्ही आलात त्यापूर्वी त्या किती आनंदात होत्या! तुमची वागणूक निर्घृणपणाची आहे. तुमच्याजवळ जर अजून काही लाजलज्जा उरली असेल तर काळं करा इथून एकदम."

मा. डेरविल एवढ्या अधिकारवाणीने हे बोलल्या आणि त्या क्षणी ज्युलिआँ इतका गलितगात्र झाला होता की, तो तेथून एकदम निघून गेला. "त्या नेहमीच माझा द्वेष करीत आल्या आहेत" जाताना त्याने स्वतःशीच मा. डेरविलबद्दल उद्गार काढले.

त्याच क्षणी, मिरवणुकीच्या अग्रभागी असलेल्या पाद्र्यांच्या अनुनासिक स्वरांतील प्रार्थनागीत म्हणण्याचा आवाज चर्चमध्ये चोहीकडे दुमदुमू लागला. मिरवणूक परतत होती. अबे शा बेरनार यांनी ज्युलिआँला पुन्हा पुन्हा हाका मारल्या. त्याला प्रथम त्या ऐकू आल्याच नव्हत्या. अखेर ते स्वतःच आले. ज्युलिआँने एका खांबाच्या मागे आसरा घेतला होता. तो जिवंत म्हणण्यापेक्षा मृतप्रायच झालेला होता. अबेशा त्याचा हात धरून त्याला घेऊन जाऊ लागले. ज्युलिआँला बिशपशी भेटविण्याची त्यांची इच्छा होती.

इतक्या निस्तेज पडलेल्या आणि चालण्याचीही कुवत न उरलेल्या ज्युलिआँला पाहून अबे शा त्याला म्हणाले,

"माझ्या पोरा, तुला बरं वाटत नाही असं दिसतंय. वाजवीपेक्षा जास्त कष्ट घेऊन तू एकसारखं काम करीत राहिलास." अबे शा यांनी त्याला आपला हात दिला. ते म्हणाले, "ये. बैस इथं, ह्या छोट्या तिवईवर (चर्चमधल्या एका कर्मचाऱ्याचे ते आसन होते.) माझ्यामागे असल्यामुळे तू कोणाला दिसणार नाहीस."

मुख्य दरवाजाच्या बाजूला ते दोघे आता आलेले होते. "शांत हो, मॉसेन्यूर. इथं पोहोचायला अजून चांगला वीस मिनिटांचा अवधी आहे. तोवर स्वतःला सावरण्याचा प्रयत्न कर. इथून ते जातील तेव्हा मी तुला आधार देऊन धरीन. मी जरी वयस्कर असलो तरी अजून बळकट अन् ताकदवान आहे."

अनुक्रमणिका

पण जेव्हा बिशप तेथून गेले तेव्हा ज्युलिआँ भीतीने इतका कापत होता की त्याची भेट बिशपशी करून देण्याचा विचार अबे शा यांना सोडून द्यावा लागला. ते त्याला म्हणाले "एवढं मनाला काही लावून घेऊ नोकोस. मी आणखी एखाद्या प्रसंगी त्यांच्याशी तुझी भेट घडवून आणीन."

त्या दिवशी संध्याकाळी त्यांनी पाठशाळेच्या मंदिरात दहा पौंड मेणबत्या पाठविल्या. लवकर लवकर विझवून ज्युलिआँने त्या प्रयत्नपूर्वक वाचविल्या होत्या असं ते म्हणाले. सत्यापासून एवढी दूर दुसरी कोणतीही गोष्ट जाऊ शक्त नव्हती. गरीब बिचारा जुलिआँ स्वतःच विझला होता. मा. रेनॉल यांना पहिल्यापासून त्याचे डोके एवढे सुन्न होऊन गेले होत की त्याला दुसरा कसलाच विचार सुचत नव्हता.

★ ★ ★

**प्रकरण एकोणतिसावे**

## पहिले पाऊल

कॅथीड्रलमधील त्या प्रसंगामुळे आलेल्या गंभीर विमनस्कतेतून ज्युलिआँ अद्याप बाहेर पडला नव्हता; तेवढ्यात एका सकाळी त्याला उग्र मुद्रेच्या अबे पीरारनी बोलावून घेतले. ते त्याला म्हणाले,

“हे बघ, अबे शा बेरनार यांनी मला पत्र लिहून तुला शाबासकी देण्यास कळविलं आहे. तुझ्या वर्तनाविषयी माझं एकंदरीने पूर्ण समाधान झालं आहे. पण बाहेरून तू तसा दिसत नसलास तरी आतून तू कमालीचा अविचारी व खरोखरी मूर्ख आहेस. तथापि चालू क्षणापर्यंत मात्र तुझं हृदय निकोप आणि उदारही राहिलेलं आहे; तुझी बुद्धिमत्ता सर्वसामान्यापेक्षा वरच्या दर्जाची आहे. हे सगळं लक्षात घेता तुझ्यात मला एक प्रकारची चमक दिसते व तिच्याकडे दुर्लक्ष होता कामा नये.

“पंधरा वर्षांच्या कष्टानंतर मी आता लवकरच ही संस्था सोडणार आहे. माझा गुन्हा हा आहे की, पाठशाळेच्या विद्यार्थ्यांची स्वतःची निर्णयशक्ती वापरण्यास मी मुभा दिली आणि प्रायश्चित्त घेण्याच्या धार्मिक स्थळी आपण असताना ज्या गुप्त मंडळाबद्दल तू माझ्याशी बोललास त्याला मी रक्षण दिलं नाही की त्याचा मुखवटा काढून टाकून त्याचं खरं स्वरूप उघड केलं नाही; पण इथून जाण्यापूर्वी तुझ्यासाठी काही करावं अशी माझी इच्छा आहे; खरं तर मी दोन महिन्यांपूर्वीच तसं करायला हवं होतं; कारण तू त्यासाठी पात्र आहेस. पण तुझ्याकडे सापडलेला अमॉन्दा बिनेचा तो पत्ता व त्याच्या आधारे तुझ्यावर आलेला आरोप मध्ये आडवा आला. नव्या व जुन्या कराराचा शिक्षक म्हणून मी तुझी नेमणूक करतो.”

ज्युलिआँच्या अंतःकरणात कृतज्ञतेची तीव्र भावना इतकी प्रभावी झाली की, एकदम गुडघे टेकून परमेश्वराचे आभार मानावेत असे त्याला वाटले. पण त्यापेक्षा एका जास्त सच्च्या प्रेरणेने त्याचा कबजा घेतला. तो अबे पीरार यांच्याजवळ गेला आणि त्यांचा हात आपल्या हाती घेऊन त्याने तो स्वतःच्या ओठांजवळ नेला.

“अरे, हे काय?” नाराजीच्या स्वरात संचालक ओरडले; पण प्रत्यक्ष कृतीपेक्षाही ज्युलिआँचे डोळे जास्त सूचक व बोलके होते. नाजूक भावना समोरासमोर पाहण्याची सवय दीर्घकाळानंतर नष्ट झालेल्या माणसाप्रमाणे अबे पीरार ज्युलिआँकडे आश्चर्याने पाहातच राहिले. ज्युलिआँने दाखविलेली ती भावुक निष्ठा त्यांच्या संचालकांच्या कठीण कवचाला छेदून अंतःकरणाला भिडली. त्यांचा आवाज बदलला. ते म्हणाले, “हं, ठीक! माझ्या पोरा, माझा जीव तुझ्यावर जडला आहे. परमेश्वर जाणतो की ही गोष्ट सर्वस्वी माझ्या इच्छेविरुद्ध आहे. मी अत्यंत न्यायी असायला हवं. आणि कोणाही बद्दल मला मत्सर वा प्रेम वाटता कामा नये. तुझं भावी जीवन खडतर दिसतंय. सर्वसाधारण माणूस जेणेकरून नाराज होतो असे काही तरी तुझ्या स्वभावात मला आढळतं. मत्सर आणि खोटी बदनामी तुझा पाठलाग करतील. परमेश्वर तुला कोणत्याही क्षेत्रात टाको, तिथं तुझे जोडीदार तुझ्यावर द्वेषाच्या नजरा रोखल्याशिवाय कधीही राहणार नाहीत; आणि तुझ्यावर प्रेम करीत आहोत असं त्यांनी भासविलं तर ते निश्चितपणे तुझा विश्वासघात जास्त कसोशीने करण्यासाठीच ह्याच्याशी मुकाबला करायला मार्ग फक्त एकच आहे व तो म्हणजे परमेश्वराला शरण जाणे. तुझा द्वेष केला जाण्याची ही स्थिती, अपरिहार्य म्हणून त्याने तुझ्या वाट्याला टाकली आहे ती तुझ्या आढ्यतेपायी तुला शिक्षा करण्यासाठी, तुझं वर्तन अतिशय विशुद्ध राहू दे. तेवढंच एक साधन तुझ्या

तरणोपायासाठी आहे असं तुला वाटतं; तू जर सत्याला घट्ट चिकटून राहिलास, त्याच्यापासून तुला विचलित करू पाहणाऱ्यांना तू नामोहरम केलंस तर आज ना उद्या तुझे शत्रू गारद होऊन जातील."

किती तरी दिवसांनी ज्युलिआँ असे हे स्नेहार्द्र स्वर ऐकत होता; म्हणून त्याला आपण त्याच्या स्वभावातील कमकुवत अंगाबद्दल क्षमा केली पाहिजे. त्याला रडू कोसळले. त्याला आलिंगन देण्यासाठी अबे पीरारनी आपले दोन्ही बाहू पसरले. दोघांनाही तो एक फार मूल्यवान क्षण वाटला.

अत्यानंदाने ज्युलिआँ नुसता बेभान होऊन गेला होता. त्याने मिळविलेली ती पहिलीच बढती होती. तिचे खूपच फायदे होते. ते नीट कळून येण्यासाठी एखाद्याला थोडासाही एकान्त न लाभता महिनेच्या महिने काढायचे नशिबी यायला पाहिजे आणि चांगले असले तरी कंटाळवाण्या व बहुतांशी असह्य अशा जोडीदारांच्या सहवासात त्याला ते महिने कंठावयास लागावेत. संवेदनाशील अंतःकरणात गोंधळ माजविण्यास त्यांचा नुसता आरडाओरडा पुरा होतो. खायला, प्यायला व ल्यायला नीट मिळालेले ते शेतकरी जेव्हा बेंबीच्या देठापासून शक्य तेवढ्या जोराने आरडाओरड करीत असत तेव्हाच त्यांच्या अनावर मुखर आनंदाला संपूर्णपणे वाट मोकळी झाल्यासारखे होऊन त्यांच्या आनंदाची पूर्तता होई.

पण आता ज्युलिआँ त्याचे जेवण बहुतेक एकटाच व इतर विद्यार्थ्यांच्या नंतर तासाभराने घेत असे. बागेत जाण्यासाठी त्याच्याजवळ किल्ली होती. आणि तेथे जेव्हा फेरफटका मारणे त्याला आता सुलभ झाले होते. विद्यार्थी आता आपला कमी द्वेष करतात हे पाहून ज्युलिआँला खूप आश्चर्य वाटले. उलट त्यांचा द्वेष जास्त तीव्र होणार असे त्याला वाटले होते. आपल्याशी कोणी बोलू नये अशी त्याची सुप्त इच्छा असे पण इतरांना ती, नको तेवढी उघड दिसून येत असे आणि त्यामुळे त्याला किती तरी शत्रू निर्माण झाले होते. पण अता ती इच्छा त्याच्या खुळचट अहंकाराची द्योतक मानली जात नव्हती. ज्या रांगड्या माणसांच्या संगतीत त्याला राहावे लागत होते त्यांच्या दृष्टीने ज्युलिआँच्या प्रतिष्ठेबद्दलची ती योग्य जाणीव होती. त्यांचा द्वेष त्यातही विशेषतः अगदी लहान वयाच्या विद्यार्थ्यांचा द्वेष लक्षात येण्याइतका कमी झाला होता. आता ते त्याचे विद्यार्थी झाले होते. ज्युलिआँही त्यांना आता अतिशय सभ्यपणे वागवीत असे. काही दिवसांनी त्याला पाठिंबा देणारेही लाभले. त्याला मार्टिन ल्यूथर म्हणणे हे आता अशिष्ट मानले जाऊ लागले होते.

पण ज्युलिआँचे मित्र किंवा त्याचे शत्रू यांच्याबद्दल बोलण्याचे काय कारण? ते सगळे जितके वास्तविक जीवनावर आधारलेले तितके जास्तच हिडीस आहे. तथापि लोकांना नैतिक सदाचाराचे धडे देणारे हेच काय ते शिक्षक सध्या समाजात उपलब्ध आहेत; ते नसले तर आमची काय अवस्था होईल बरे? जिल्ह्यातल्या ह्या धर्मोपदेशकांची जागा घेण्यास वृत्तपत्रे कधीकाळी समर्थ होतील का?

ज्युलिआँच्या बढतीपासून पाठशाळेच्या संचालकांनी एक गोष्ट ठरवून टाकली की साक्षीदारांच्या उपस्थितीशिवाय त्याच्याशी कधीच बोलावयाचे नाही; आणि ही गोष्ट शिक्षकाच्या दृष्टीने व त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्याही दृष्टीने शहाणपणाचीच होती. पण ह्या सर्वांपेक्षा खरे म्हणजे ती एक कसोटी होती. करारी जॅन्सेनिस्ट पीरार यांचे या संबंधातील अपरिवर्तनीयतत्त्व असे होते : "तुमच्या दृष्टीने या माणसाजवळ काही गुणवत्ता आहे का? तर मग त्याला अपेक्षित असलेल्या प्रत्येक गोष्टीच्या मार्गात, तो हाती घेईल त्या प्रत्येक कार्यात अडथळे आणा. त्याची गुणवत्ता अस्सल असेल तर तो निश्चितपणे अडचणी उल्लंघून पार जाईल, अडथळे बाजूला सारून पुढे जाईल."

अनुक्रमणिका

तो शिकारीचा मोसम होता. पाठशाळेत "ज्युलिआँच्या कुटुंबियांकडून" म्हणून एक काळवीट व एक डुक्कर पाठविण्याचे फूकेच्या मनाने घेतले. ते मेलेले प्राणी तेथे स्वयंपाकघरात व जेवणघर यांच्यामधील वाटेत तसेच पडू देण्यात आले होते. भोजनाला जाताना सर्व विद्यार्थ्यांनी तेथे ते पाहिले. त्याच्या मनात त्यामुळे बरेच औसुक्य निर्माण झाले. डुक्कर अगदी पुरा ठार झालेला होता. तरी तो मेलेला प्राणी तेथे, त्यातल्या त्यात कमी वयाच्या विद्यार्थ्यांना भेडसावीत होता. ते त्याच्या सुळ्यांना हात लावून पाहात. एक आठवडाभर गप्पांना तेथे दुसरा विषयच नव्हता.

ह्या भेटीमुळे असे सिद्ध झाले की, समाजातील जो विभाग मानसन्मानास पात्र आहे त्यात ज्युलिआँचे घराणे दाखल झाले आहे व या समाजामुळे त्याच्याविषयीच्या पूर्वीच्या मत्सराला जबरदस्त तडाखा दिला. श्रीमंतीमुळे या तऱ्हेच्या श्रेष्ठत्वाला एक प्रकारचे पावित्र्य प्राप्त झाले होते. शॅझेल आणि विद्यार्थ्यांपैकी बरीच मान्यता पावलेले किती तरी इतर ज्युलिआँच्या पुढे पुढे करू लागले व त्यांनी जवळजवळ अशीही तक्रार केली की, ज्युलिआँने त्यांना त्याच्या वडीलांच्या संपत्तीची कल्पना दिली नव्हती आणि त्यायोगे पैशाबद्दलच्या आदराची उणीव दाखविण्यास त्यांना भाग पाडले होते व त्यात त्यांची फसगत झाली होती.

सक्तीची सैन्यभरती चालू झाली होती. पण पाठशाळेचा एक विद्यार्थी म्हणून ज्युलिआँला भरती होण्यापासून माफी होती. त्याचे त्याला फार वाईट वाटले. तो स्वतःशी उद्‌गारला, "म्हणजे आता तो क्षण कायमचा निघून गेला आहे की जेव्हा वीस वर्षांपूर्वी एक शूरपणाचे जीवन सुरू झाले असते!"

पाठशाळेच्या बागेतून तो एकदा एकटाच फिरत असता एक संभाषण सहज त्याच्या कानांवर आले. बागेच्या आवाराच्या भिंतीचे बांधकाम करणारे दोन गवंडी आपापसांत बोलत होते :

"हं ठीकच की; आता सक्तीची भरती पुन्हा सुरू झाली आहे; म्हणजे आपल्याला जावं लागेल."

"त्या 'दुसऱ्या माणसाच्या' काळात तर ते फारच चांगलं असे! एक पाथरवट, अधिकारी अन् सेनापतीही झाला, हे तर सगळ्यांना माहीतच आहे."

"आता काय स्थिती आहे बघ. फक्त भिकारी सैन्यात जातात अन् ज्याच्याजवळ पैशाची साधने आहेत असा माणूस घरीच बसतो."

"गरीब म्हणून जो जन्मला आहे तो गरीबच राहतो. हे सगळं असं आहे बाबा त्याचं."

तिसऱ्या गवंड्याने विचारले, "आता मला सांग की तो 'दुसरा मनुष्य' मेला असं लोक बोलतात ते खरं आहे का?"

"मोठे लोक तसे बोलत आहेत; तुला माहीत नाही? त्यांना त्याची भीती वाटत होती."

"केवढी ही तफावत! 'त्याच्या काळात' प्रत्येक गोष्ट कशी सुरळित होत होती! त्याच्या सेनापतीकडून त्याचा विश्वासघात व्हावा ना? कुठे तरी नेहमीच, एखादा तरी विश्वासघातकी असतोच!"

हे संभाषण ज्युलिआँला थोडे सुखावून गेले. तेथून तो दूर चालत गेल्यावर, उसासा टाकून स्वतःशी पुनः पुन्हा म्हणाला, “ज्याची स्मृती लोक अजून बाळगून आहेत असा तो एकमेव राजा होय.”

परीक्षा जवळ आल्या. ज्युलिआँने, त्याला विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे अतिशय उत्तम रीतीने दिली. त्याला असे आढळून आले की, शॅझेल त्याला स्वतःला असलेल्या सगळ्या ज्ञानाचे प्रदर्शण करण्याचा प्रयत्न करीत होता.

परीक्षकांची नेमणूक सुप्रसिद्ध ग्रॅण्ड विकार द फ्रिरेअर यांनी केली होती. ज्युलिआँ सोरेल हा अबे पीरार यांचा ‘बेंजामिन’ (लाडका) म्हणून त्यांना दाखविण्यात आला होता. त्याचे नाव त्यांच्या यादीत नेहमीच पहिले, फार तर दुसरे घालावे लागत आल्याबद्दल परीक्षकांनी पहिल्या दिवशीच त्यांची नाराजी व्यक्त केली. यशस्वी उमेदवारांच्या संपूर्ण यादीत सर्वांत जास्त गुण मिळवून ज्युलिआँ पहिला येईल आणि त्या प्राविण्यामुळे त्याला बिशपबरोबर भोजन घेण्याचा सन्मान लाभेल याबद्दल पाठशाळेत पैजा मारण्यात आल्या होत्या.

पण एका बैठकीच्या शेवटी, जेव्हा “फादर्स ऑफ दी चर्च” (चर्चमधील संत) हा परीक्षेचा विषय होता तेव्हा एका चतुर परीक्षकाने ज्युलिआँला “सेंट जेरोम व त्याचे सिसेरोबद्दलचे प्रेम” ह्याबद्दल प्रश्न विचारल्यानंतर होरेस, व्हर्जिल आणि निधर्मी लेखकांबद्दल बोलण्यास सुरुवात केली. ज्युलिआँने ह्या लेखाकांच्या लिखाणातील किती तरी उतारे पाठ केलेले होते. ही गोष्ट ज्युलिआँच्या जोडीदारांना ठाऊक नव्हती. प्रारंभी प्राप्त झालेल्या यशामुळे वाहवत जाऊन आपण कोठे उभे आहोत याचे भान ज्युलिआँ विसरून गेला व परीक्षकाने पुनः पुन्हा विनंती केल्यामुळे त्याने होरेसच्या किती तरी कविता उत्साहाने पाठ म्हणून व त्यांचे अनुवादही करून दाखविले. याप्रमाणे सुमारे वीस मिनिटेपर्यंत त्या गर्तेत त्याला खोल, खोलवर बुडू दिल्यानंतर परीक्षकाचा चेहेरा एकदम बदलला आणि ज्युलिआँने त्याचा वेळ अशा निधर्मी लेखाकांच्या लिखाणाचा अभ्यासात गमाविल्याबद्दल आणि केवळ गुन्हेगारीस प्रवृत्त करणारे म्हणता येत नसले तरी निश्चित निरुपयोगी असे विचार आपल्या मेंदूत कोंबून ठेवल्याबल परीक्षकाने तिखट शब्दांत त्याची हजेरी घेतली.

चतुर क्लप्तीने आपल्याला फशी पाडण्यात आल्याचे पाहून ज्युलिआँ नम्रभावाने म्हणाला,

“महाशय, मी मूर्ख आहे, आपण म्हणता ते बरोबर आहे.”

परीक्षकांचा हा डाव म्हणजे त्यांची एक घाणेरडी क्लप्ती होय असे पाठशाळेतसुद्धा मानण्यात आले. तथापि ज्युलिआँच्या नावापुढे १९८ ही संख्या आपल्या सामर्थ्याशाली हाताने मांडण्यात, हुषार, म. ल अबे द फ्रिलेअर यांना त्यामुळे कोणतीच आडकाठी आली नाही. त्यांनी अतिशय समर्थपणे “बिसोन्टीन कॉंग्रेगेशन” च्या मांडणीची व्यवस्था केली होती; आणि त्यांनी पॅरिसला पाठविलेल्या त्यांच्या अहवालामुळे न्यायाधीश, प्रिफेक्ट व संरक्षण दलाचे सर्वसाधारण अधिकारीसुद्धा थरथर कापत असत. तेव्हा येणेप्रणाणे आपला शत्रू जॅन्सेनिस्ट पीरार यांचे नाक खाली केल्याचा आनंद त्यांना झाला.

—पाठशाळेच्या नियंत्रकांच्या अधिकारापासून पीरारना दूर करणे ही गेली दहा वर्षे त्यांची मोठी महत्त्वाकांक्षा होती.

स्वतःच्या वागणुकीत पीरार ज्या तत्त्वाचे अनुसरण करीत असत त्यांची रूपरेषा त्यांनी ज्युलिआँला एकदा आखून दिली होती. ते सच्चा दिलाचे, निष्ठावान, कर्तव्यतत्पर व कोणत्याही कारस्थान-कुलंगड्यांपासून अलिप्त होते. पण विधात्याने स्वतःच्या रागाच्या भरात त्यांच्या वाट्याला चिडखोर स्वभाव दिल्यामुळे अपमान व द्वेष त्यांच्या जिवाला फार लागत. उघड अपमान सहन कराव्या लागलेल्या प्रसंगापैकी एकही त्यांच्या उत्कट वृत्तीवर परिणाम केल्याशिवाय राहिला नव्हता. त्यांनी त्यांचा राजीनामा शंभरदा देऊ केला असता; पण ज्या जागेवर काम करण्यासाठी परमेश्वराने त्यांची योजना केली होती. तेथे त्यांचा उपयोग होता असे त्यांना वाटे. ते स्वतःला सांगत, "जेझुइट्री व धर्मलंडपणा यांच्या प्रसाराला मी पायबंद घालतो.

परीक्षा झाल्या; ज्युलिआँशी ते बोलल्याला तेव्हा सुमारे दोन महिने होत आले होते. पण नंतर आठवडाभर ते आजारी पडले; कारण त्या वेळी त्यांना एक पत्र मिळाले. त्यात परीक्षेच्या निकालाची माहिती अधिकृतपणे दिलेली होती. संस्थेची प्रतिष्ठा म्हणून ज्या विद्यार्थ्याला ते मानीत होते त्याच्या नावापुढे दिलेला १९८ हा आकडा त्यांनी पाहिला. करारी स्वभावाच्या त्या गृहस्थाने स्वतःचा दुःखपरिहार एवढ्यावरच केला की, स्वतःजवळ असलेल्या सर्व शक्ती एकवटून ज्युलिआँवर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली. ज्युलिआँला त्या घटनेचा राग आलेला नाही, त्याच्या मनात सुडाचे विचार निर्माण झालेले नाहीत किंवा तो नाऊमेदही झाला नाही हे पाहून त्यांना मनस्वी आनंद झाला.

काही आठवड्यांनी ज्युलिआँला एक पत्र आले. ते पाहून त्याचा थरकाप झाला. पत्रावर पॅरिसच्या टपालाचा शिक्का होता. त्याला वाटले, "अखेर मा. रेनॉलनी स्वतःच्या वचनांची आठवण ठेवली आहे म्हणायची." पत्राच्या खाली पॉल सोरेल या नावाच्या एका गृहस्थांनी स्वतःची सही केलेली होती व ज्युलिआँशी आपले नाते असल्याचेही स्पष्टपणे जाहीर केले होते. पत्रातून ज्युलिआँला त्याने पाचशे फ्रँकची एक हुंडी पाठविली होती. ज्युलिआँने उत्तम लॅटिन लेखकांचा अभ्यास यशस्वीपणे करणे चालू ठेवल्यास, तेवढी रक्कम त्याला दरवर्षी पाठविण्याची तरतूद केली जाईल असेही त्या पत्रात लिहिले होते.

ज्युलिआँ भावविवशतेने स्वतःला म्हणाला, "होय, नक्कीच हे काम मा. रेनॉल यांचं आहे. त्यांनी पाठविलेली ही एक उदार देणगी आहे. मला दिलासा देण्याची त्यांची इच्छा आहे; पण मग पत्रात प्रेमाचा एखादा साधा शब्दही का बरे नसावा?"

पण त्या पत्राबाबत त्याची गफलत झाली होती. आपली मैत्रीण मा. डेरविल यांच्या प्रभावाखाली दडपल्या गेलेल्या मा. रेनॉल स्वतःच्या तीव्र मनस्तापात चूर होऊन गेल्या होत्या. ज्युलिआँचा विचार करावयाचा नाही असा निग्रह त्यांनी केला होता तरीही त्या चमत्कारिक प्राण्याचे त्यांच्या आयुष्यात येणे व त्याने त्यांचे जीवन उलथेपालथे करून टाकणे, याबद्दलचे विचार त्याच्या मनात वारंवार येतच. मात्र त्याला पत्र लिहिण्याचा विचार त्यांना कधी स्वप्नातही शिवला नव्हता.

पाठशाळेतल्या परिभाषेत सांगावयाचे झाल्यास आम्ही असे म्हणू की पाचशे फ्रँक्सचे हे जे घबाड लाभल्याचा चमत्कार घडून आला होता त्याच्या मुळाशी स्वतः म. द फ्रिलेअर हेच होते; आणि परमेश्वराने त्यांच्या हस्ते ज्युलिआँला ती देणगी देण्याचा घाट घडवून आणला होता.

बारा वर्षांपूर्वी म. ल अबे द फ्रिलेअर बेझाँसाला आले तेव्हा त्यांच्या हातातील एका अगदी हलक्या पेटीत काय ती त्यांनी स्वतःची सारी संपत्ती ठेविलेली होती असे सांगितले जाते. आता ते खात्यातील एक

अत्यंत श्रीमंत जमीनदार झाले होते. स्वतःच्या वाढत्या भरभराटीच्या काळात त्यांनी एक अशी मालमत्ता खरेदी केली होती की तिचा एक भाग त्यांच्या ताब्यात येऊन बाकीचा अर्धा वारसा हक्काने म. द ल मोले यांच्याकडे गेला होता आणि त्यामुळे ह्या दोन सन्मान्य व्यक्तींमध्ये एक भले मोठे न्यायालयीन लफडे उद्‌भवून राहिले होते.

मार्किस द ल मोले यांचे पॅरिसमधील जीवन यशस्वी व नजरेत भरण्यासारखे होते. दरबारात त्यांनी अनेक महत्त्वाची उच्च पदे आजवर भूषविलेली होती. पण असे असूनही, अशा ग्रॅण्ड विकारविरुद्ध बेझाँसामध्ये झुंज देणे ही गोष्ट धोक्याची आहे असे त्यांना वाटले. कारण प्रिफेक्टच्या नेमणुका करणे अथवा त्या रद्द करणे याबद्दल ग्रॅण्ड विकार प्रसिद्ध होते. पन्नास हजार फ्रँक्स देणगीदाखल मागून, यांना त्या खर्चाच्या नावाखाली ती रक्कम अंदाजपत्रकामध्ये घालण्याऐवजी आणि म द फ्रिलेअर यांना पन्नास हजार फ्रँक्सचा तो क्षुद्र खटला जिंकू देण्याऐवजी मार्किसनी राग धरावयाचे ठरविले; म्हणजे खटला लढविण्याचे ठरविले. त्यांच्यामते त्यांची बाजू लढण्याजोगी होती. वा! छानच कारण!!

कारण त्याबाबत जरी धीटपणे बोलावयाचे तर आम्ही असे म्हणू की, जगात असा कोणता न्यायाधीश असेल की ज्याला स्वतःचा मुलगा अथवा निदान दूरचा भाऊ नाही व त्याला पुढे आणण्यासाठी मदतीची गरज लागणार नाही? तरी ज्याची दृष्टी तितकीशी सूक्ष्म नाही त्याच्या माहितीसाठी आता हे सारे पुढचे स्पष्ट लिहितो की खटल्याचा पहिला निकाल झाल्यानंतर एक आठवड्याने म. द अबेल फ्रिरेअर यांनी बिशपची गाडी घेतली आणि लीजन ऑफ ऑनरचा क्रूस आपल्या वकिलाच्या हवाली करण्यास ते स्वतः गेले. दुसऱ्या बाजूने धिटाईने उघडलेली ती आघाडी पाहून म. द मोले यांची हिंमत जरा खचली आणि आपला वकील कमकुवत होत आहे असे वाटून ते अबे शॅलाँ याच्याकडे त्यांचा सल्ला घेण्यासाठी गेले आणि त्यांनी मग त्यांची म. पीरार यांच्याशी गाठ घालून दिली.

आमचे हे कथानक ज्या वेळी चालू झाले तेव्हा त्या दोघांचा पत्रव्यवहार आधीच काही वर्षे सुरू झालेला होता. स्वतःच्या उत्कट स्वभावाला अनुसरून पीरार यांनी आपल्या सर्व शक्ती एकवटून ह्या भानगडीत आपणास झोकून दिले. मार्किस यांच्या वकिलाशी पत्रव्यवहार एकसारखा चालू ठेवून त्यांनी खटल्याचा अभ्यास केला आणि मार्किसची बाजू बरोबर आहे असे त्यांना आढळून आले तेव्हा आपण त्यांच्या बाजूने व पूर्ण सामर्थ्यवान ग्रॅण्ड विकार यांच्या विरुद्ध असल्याचे त्यांनी उघडपणे जाहीर केले. त्यांच्या अशा चढेलपणाचा ग्रॅण्ड विकारना भयंकर राग आला. त्यातही पीरारसारख्या एका क्षुद्र जॅन्सेनिस्टाकडून तो दाखवला जावा म्हणून तर ते रागाने जास्तच पेटले.

आपल्या दाट परिचयाच्या माणसांजवळ अबे फ्रिलेअर म्हणत, "आपल्या हाती प्रचंड अधिकार आहे असे मानणाऱ्या ह्या दरबारातील बड्या उमरावांची, खरे म्हणजे काय किंमत आहे? म. द मोले यांनी बेझाँसाच्या त्यांच्या मुखत्याराला एखाद्या क्षुद्र क्रूसाइतकंसुद्धा काही दिलेलं नाही; आणि शिवाय एखादाही शब्ददेखील न बोलता ते त्याला आपल्या नोकरीवरून कमी झालेला खुशाल पाहणार आहेत; आणि तरीही हा उमदा सरदार सील्सच्या कीपरच्या दिवाणखान्यात आपली निळी फीत दिमाखाने फडकवीत दाखविल्याशिवाय एक आठवडाही जाऊ देत नाहीत असं मला माझे मित्र पत्रातून कळवीत असतात. त्या फितीची किंमत ती काय?"

म. पीरार यांनी सर्व तऱ्हेच्या हालचाली केल्या तरीसुद्धा; आणि न्यायमंत्र्यांशी व त्यातही विशेषतः त्यांच्या अधिकाऱ्यांशी म. द मोले यांचे संबंध अतिशय चांगले असूनही, सहा वर्षांच्या सततच्या प्रयत्नांनी ते जे काय मिळवू शकले ते इतकेच की प्रत्यक्षात खटला गमविणे ते टाळू शकले.

त्या अवधीत मार्क्विस व पीरार यांचा पत्रव्यवहार अखंडपणे चालू होता व त्या दोघांनीही आपले सगळे मन घालून त्या खटल्याच्या कामाचा पिच्छा पुरविला होता. त्यामुळे आलेल्या संपर्कातून मार्क्विसना अबे पीरार यांच्या मनाचे पैलू त्या कालावधीत नीट कळून आले व त्यांच्याबद्दल त्यांचे चांगले मतही झाले. त्या दोघांच्या सामाजिक प्रतिष्ठेत खूपच विषमता होती तरीही आस्ते आस्ते त्यांच्या पत्रव्यवहाराला स्नेहाचे स्वरूप प्राप्त झाले. आपला अनेकदा अपमान करून आपले शत्रू आपणास आपल्या पदाचा राजीनामा देण्यास भाग पाडीत आहेत ही गोष्ट अबे पीरार यांनी मार्क्विसना सांगितली. ज्युलिआँच्या बाबतीत वापरण्यात आलेल्या (त्यांच्या मते) गर्हणीय क्लृप्तीचा त्यांना इतका राग आला होता की, त्यांनी ती हकीगत सगळी मार्क्विसना निवेदन केली.

मार्क्विस एक मोठे उमराव व अतिशय श्रीमंतही होते; तथापि ते यत्किंचितही कृपण मात्र नव्हते. अबे पीरार यांना फिर्यादीच्या कामाच्या निमित्ताने कराव्या लागलेल्या पत्रव्यवहाराच्या टपाल हशीलाची रक्कमसुद्धा अबेला देण्यात त्यांना यश आले नव्हते. तेव्हा अबे पीरारच्या आवडत्या विद्यार्थ्याला पाचशे फ्रँक्स पाठविण्याची संधी त्यांनी या वेळी घेतली.

म. द ल मोले यांनी पैशाबरोबरच पाठविलेले पत्र स्वहस्ते लिहिण्याची तसदी घेतली. हे करताना त्यांच्या मनात अबेविषयी विचार सुरू झाले.

एके दिवशी अबे पीरारना त्यांच्याकडून एक छोटीशी चिठ्ठी आली. एका महत्त्वाच्या कामासाठी त्यांनी ताबडतोब बेझाँसाच्या शिवेजवळच्या एका पथिकाश्रमात यावे अशी विनंती त्या चिठ्ठीत करण्यात आली होती. तेथे गेल्यावर त्यांनी मोले यांचा कारभारी दिसला. तो सांगू लागला, “तुमच्यासाठी गाडी घेऊन येण्याची आज्ञा मला मार्क्विससाहेबांनी केली. हे पत्र वाचल्यावर तुम्ही चारपाच दिवसांत पॅरिसला जायचं तुमच्या सोयीप्रमाणे ठरवाल अशी उमेद त्यांना आहे. आपण कृपा करून नक्की दिवस व वेळ मला सांगा. तोवर मी मार्क्विससाहेबांच्या फ्राँ काँते येथील जमीनजुमल्याकडे जाऊन येईन. त्यानंतर तुमच्या सोयीप्रमाणे कोणत्याही दिवशी आपण पॅरिसला प्रयाण करू.”

ते छोटेसे पत्र असे होते —

“प्रिय महाशय, ह्या सर्व आकुंचित, प्रांतीय तंट्याबखेड्यापासून तुम्ही स्वतःला मुक्त करा व पॅरिसला तिथल्या अधिक शांत वातावरणात राहायला या. मी तुमच्यासाठी माझी गाडी पाठवीत आहे. तुमच्या निर्णयाची प्रतीक्षा करण्यासाठी गाडी चार दिवस थांबण्याची सूचना देण्यात आलेली आहे. मी स्वतः मंगळवारपर्यंत पॅरिसला तुमच्यासाठी थांबेन. महाशय, फक्त तुमच्या होकारार्थी शब्दाची गरज आहे; म्हणजे मी पॅरिसच्या परिसरात एखादे उत्कृष्ट धर्माधिकारपद तुमच्या नावे मुक्रर करून ठेवीन. सर्वांत श्रीमंत असलेल्या व इथून पुढे तुमच्या परगण्यात तुमच्या धर्माधिकाराखाली राहणाऱ्या व्यक्तीने

तुम्हांला आजवर पाहिलेले नाही. पण तुम्ही समजता त्यापेक्षा तो तुमचा जास्त उत्कट चाहता आहे; व तो म्हणजेच मार्किस द ल मोले."

त्या पाठशाळेवर करारी अबे पिरार प्रेम करीत होते— ते स्वतःच्या नकळतच; त्यांच्या शत्रूंमध्येच ते राहिले आणि पंधरा वर्षे त्यांनी स्वतःचे सगळे विचार पाठशाळेलाच वाहिले होते. एखादी दुःखदायक पण आवश्यक असलेली शस्त्रक्रिया पार पाडण्यासाठी एखादा शस्त्रवैद्य एकदम यावा तसे म. द ल मोले यांचे पत्र पीरारना वाटले. त्यांची बडतर्फी तर निश्चितच होती. तीन दिवसांनी येतो असे त्यांनी मोले यांच्या कारभाऱ्याला सांगितले.

त्यानंतरच्या अठ्ठेचाळीस तासांत ते अनिश्चित मानसिक अवस्थेमुळे फार बेचैन झाले होते. अखेर त्यांनी म. द ल मोले यांना लिहिले आणि बिशपला पाठविण्यासाठी एक पत्र तयार केले. ते जरी थोडेसे लांबलचक होते तरी त्याची भाषा म्हणजे धर्मोपदेशकाच्या विशिष्ट भाषेचा एक उत्कृष्ट नमुना होता. तिच्यापेक्षा अधिक निर्दोष किंवा प्रामाणिक आदर दाखविणारी भाषा सापडणे अवघड होते. तरीही फ्रिलेअर यांना त्यांच्या आश्रयदात्याबरोबर कसोटीचा असा एक तास घालवायला लावील असे त्यांचे प्रयोजन होते. त्याच्यात तक्रारीच्या सगळ्या गंभीर कारणांची यादी देण्यात आली होती; सहा वर्षे त्यांना सहन कराव्या लागलेल्या हलक्या-सलक्या, घाणेरड्या गोष्टी व खुसपटे नमूद करण्यापर्यंत पत्राची मजल गेली होती. अशाच गोष्टींनी त्यांना त्यांचे धर्मोपदेशकाचे क्षेत्रीय अधिकारपद सोडायला अखेर भाग पाडले होते. तेथील लोकांनी त्यांच्या पडवीतील लाकडे चोरली, त्यांच्या कुत्र्याला विष घातले इ. इ. गोष्टीही त्यांनी नमूद केल्या होत्या; व आपण त्या सोशिकपणे सहा वर्षे कशा चालवून घेतल्या ते सांगितले होते.

हे पत्र लिहून झाल्यावर त्यांनी ज्युलिआँला उठवून, बोलावून आणण्यासाठी माणूस पाठविला. तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते. पाठशाळेच्या इतर सर्व विद्यार्थ्यांप्रमाणे ज्युलिआँ त्यापूर्वीच झोपी गेला होता.

उत्तम लॅटिनमध्ये त्यांनी ज्युलिआँला विचारले, "बिशपचा राजवाडा कुठे आहे ते तुला माहीत आहे का? मॉसेनिओरला हे पत्र नेऊन दे. तुला मी लांडग्यांच्या कळपात पाठवीत आहे हे तुझ्यापासून मी लपवू इच्छीत नाही. तुझे डोळे उघडे व कान शाबूत ठेव. तुला विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांच्या उत्तरांत धरसोडपणा दिसता कामा नये. पण लक्षात ठेव की जो माणूस तुला प्रश्न विचारीत राहील त्याला तुझे नुकसान करण्याचा प्रयत्न करण्यात कदाचित खराखुरा आनंद वाटेल. माझ्या पोरा, मी तुला सोडून जाण्यापूर्वी असा अनुभव आणून देत आहे ह्याचा मला संतोष वाटतो. कारण तुला सांगायला मला हरकत नाही की तू जे पत्र घेऊन जात आहेस त्यात माझा राजीनामा आहे."

ज्युलिआँ तेथून हालला नाही; अबे पीरार यांचा त्याला फार लळा होता. त्याच्यातील दूरदर्शित्व त्याला व्यर्थ इशारा देत होते.

"हा थोर माणूस इथून गेल्यावर 'सेक्रेड हार्ट' पक्ष माझी मानहानी करील आणि इथून कदाचित मला घालवूनही देईल."

पण तो स्वतःबद्दल विचार करू शकला नाही. तो अवघडल्यासारखा झाला तो याच गोष्टीमुळे की जे एक वाक्य त्याला त्यांच्यापुढे बोलावयाचे होते ते शिष्टसंमत शैलीत कसे उच्चारावे याचा विचार करण्याकडेसुद्धा त्याचे मन लागत नव्हते.

“बरं मग, माझ्या मित्रा; तू जातोस ना आता?” ज्युलिआँ भीतभीत बोलू लागला, “त्याचं असं आहे, सर, की तुमच्या दीर्घ काळाच्या प्रशासनाच्या अवधीत तुम्ही कधीच बाजूला, शिलकीत ठेवलं नाहीत असं लोक म्हणतात. माझ्याजवळ सहाशे फ्रँक आहेत...” आणि अश्रूंनी त्याचे बोलणे थांबविले.

पाठशाळेचे माजी संचालक थंडपणे म्हणाले, “त्या गोष्टीवरही टेहेळणी राहील. बिशपच्या राजवाड्यावर जा; उशीर होत आहे.”

नशीब असे की, त्या दिवशी संध्याकाळी बिशपच्या बैठकीच्या खोलीत म. ल अबे द फ्रिलेअर यांची कामासाठी नेमणूक होती. माँसेनिओर प्रिफेक्टच्या घरी भोजनास गेले होते. त्यामुळे ज्युलिआँकडून पत्र दिले गेले ते स्वतः फ्रिलेअर यांनाच. पण पत्र घेणारा कोण आहे हे मात्र त्याला ठाऊक झाले नव्हते.

बिशपला लिहिलेले पत्र त्या पाद्रीने धिटाईने उघडलेले ज्युलिआँने साश्चर्य पाहिले. ग्रॅण्ड विकारच्या रेखीव चेहेऱ्यावर लगेच आनंदाचे व आश्चर्याचे भाव प्रकटले. मग ते अधिक गंभीर झाले. ते पत्र वाचीत होते तेव्हा त्यांच्या देखणेपणाचा प्रभाव ज्युलिआँवर पडून तो त्यांचा चेहेरा बारकाईने न्याहाळू लागला. त्यांचा चेहेरा असा होता की तो अधिक गंभीर दिसू शकला असता; पण त्यांचे काही मुद्राविशेष अतिशय कावेबाजपणा व्यक्त करीत होते; आणि त्या देखण्या चेहेऱ्याच्या मालकाने त्यावरील आपले नियंत्रण क्षणभर सोडले असते तर प्रत्यक्षात त्या चेहेऱ्याच्या द्वारा अप्रामाणिकपणा सूचित केला गेला असता. त्यांचे नाक अतिशय उठावदार व अगदी सरळ, अखंड रेषेत होते. दुर्दैवाने ते कोल्ह्याच्या मुखवट्याशी अटळ साम्य दाखवीत होते; नाही तर त्यांची चेहेरेपट्टी तशी अगदी उठावदार होती. त्याशिवाय म. पीरार यांच्या राजीनाम्याबद्दल अतीव उत्कंठा दाखविणाऱ्या ह्या अबेच्या ऐटदार पोषाखाने ज्युलिआँला अत्यंत खूष केले. तशा पेहेरावातला पाद्री आतापावेतो त्याने पाहिलाच नव्हता.

अबे द फ्रिरेअर यांची खास गुणवत्ता कोणत्या कोणत्या स्वरूपाची होती ते ज्युलिआँला त्यानंतर कळून आले. आपल्या बिशपचे मनोरंजन कसे करावयाचे होते चांगले जाणत होते. बिशप एक गोड स्वभावाचा वृद्ध होता. त्याला पॅरिसमध्ये राहणे रुचत होते व बेझाँसा हे हद्दपारीचे स्थळ आहे असे तो मानीत होता. त्याला दूरचे मुळीच काही दिसत नसे. त्याला मासे फार आवडत. माँसेनिऑरच्या पुढे ठेवण्यात येणाऱ्या मासळीतील काटे फ्रिलेअर काढून टाकीत असत.

राजीनाम्याचे पत्र अबे वाचू लागले तेव्हा ज्युलिआँ त्यांना निःस्तब्धपणे न्याहाळीत होता. तेवढ्यात दार एकदम सताड उघडले गेले. भारी गणवेषातील एक हुजऱ्या झटकन खोलीतून पुढे गेला. दाराकडे वळून पाहायलाही ज्युलिआँला पुरेसा वेळ मिळाला नाही. त्याने एक ठेंगणासा म्हातारा माणूस पाहिला. त्या माणसाने छातीवर बिशपचा खास क्रॉस लावलेला होता. त्याने एकदम गुडघे टेकले. बिशपने खोलीतून जाताना आपल्या कृपेचे निदर्शक असे एक स्मित ज्युलिआँकडे पाहून केले. देखणा रुबाबदार अबे त्याच्या मागून गेला त्यामुळे ज्युलिआँ तेथे बैठकीत एकटाच राहिला. त्या स्थानाचे पवित्र वैभव कौतुकाने न्याहाळण्यास त्याला आता फुरसत सापडली.

अनुक्रमणिका

बेझाँसाचा बिशप खंबीर चारित्र्याचा होता. “एमिग्रेशन”च्या दीर्घकालीन हालअपेष्टांनी त्यांची कसोटी पाहिली होती; पण त्या त्याला चिरडून टाकू शकल्या नाहीत. त्यांचे वय पंचाहत्तरपेक्षा जास्त होते. पण आगामी दहा वर्षांत काय काम घडेल याबद्दल तो यत्किंचितही चिंता करीत नव्हता.

बिशपने विचारले, “कोण आहे तो चलाख दिसणारा सेमिनरिस्ट, आता इथून जाताना मला दिसला तो? माझ्या हुकमाप्रमाणे सेमिनरिस्ट ह्या वेळी झोपून जायला नको का?

“हा बेटा चांगलाच पूर्णपणे जागा आहे; मॉंसेनिओर, खात्रीने सांगतो मी. त्याने एक फार मोठी बातमी आणली आहे. तुमच्या अधिकारक्षेत्रातल्या प्रदेशात उरलेल्या एकमेव जन्सेनिस्टाने राजीनामा दिला आहे. गर्मित सूचनेचा अर्थ त्या भयंकर अबे पीरारला अखेरील समजलेला दिसतो!”

कावेबाजपणे स्मित करीत बिशप म्हणाले, “अस्सं; त्याच्या तोडीच्या गुणांच्या माणसांकडून त्याची जागा भरून काढण्यास मी तुम्हाला आव्हान देतो आणि त्या माणसाची किंमत तुम्हाला दाखवून देण्यासाठी मी त्याला उद्या माझ्याकडे जेवायला बोलावतो.”

पीरारच्या जागी नेमणूक करावयाच्या माणसाची निवड करण्याबाबत काही शब्दांनी गर्‌भित सूचना देण्याची ग्रॅण्ड विकारची इच्छा होती. तथापि कामाधामाची चर्चा करण्याकडे त्या श्रेष्ठ धर्माधिकाऱ्याचा फारसा कल नव्हता. ते म्हणाले, “ह्या जागेवर पुढील माणसांची नेमणूक करण्यापूर्वी ह्या चालू माणसाने ती जागा का सोडली हे शोधण्याचा प्रयत्न आपण करू या. त्या सेमिनरिस्टाला आत बोलाव पाहू. लहानांच्या तोंडूनच पुष्कळदा सत्य समजून येत असतं.”

ज्युलिआँला आत बोलाविण्यात आले. त्याच्या मनात विचार आला, “गुन्ह्याची चौकशी करणाऱ्या दोन अधिकाऱ्यांमध्ये मी आता पकडला जाणार आहे.” इतके धैर्य आपल्या अंगी यापूर्वी कधीच आलेले नव्हते असे त्याला वाटले.

ज्युलिआँने त्या खोलीत प्रवेश केला तेव्हा दोन उंच, व खुद्द म. वालनोपेक्षा चांगला पोषाख केलेले नोकर मॉंसेनिऑरच्या अंगावरून त्यांचे धर्माधिकाऱ्याचे कपडे उतरवीत होते. म. पीरार यांच्यासंबंधीच्या विषयावर बोलण्याच्या आधी, ज्युलिआँला त्याच्या अभ्यासाविषयी काही प्रश्न विचारणे त्या धर्माधिकाऱ्याला युक्त वाटले. त्यांनी प्रथम धार्मिक तत्त्वे, काही विशिष्ट मतप्रणाली वगैरे विषयांना हात घातला आणि ते आश्चर्यचकित झाले. लवकरच ते ग्रीक–लॅटिन भाषा, त्यांच्यातील लौकिक अभिजात साहित्य, व्हर्जिल, होरेस, सिसोरे वगैरेकडे वळले. ज्युलिआँने विचार केला, “ह्या नावांनी मला माझा तो १९८ क्रमांक मिळवून दिला! आता माझं आणखी कोणतं नुकसान व्हायचं राहिलं आहे? मग इथे उत्तरे देऊन, चमकून तरी घ्यावं.” आणि त्यात तो यशस्वी ठरला. स्वतः मानवतावादी असलेल्या त्या धर्माधिकाऱ्यांना मनस्वी आल्हाद वाटला.

ते प्रिफेक्चरमध्ये भोजनास गेले होते तेव्हा एका मुलीने डेल्फिन गे यांची “ला मॉडेलिन” ही कविता म्हणून दाखविली होती. आपल्या अंगच्या गुणाने ती मुलगी प्रसिद्धी पावली होती. साहित्यविषयक चर्चा करण्याची लहर या वेळी बिशपना आलेली होती. होरेस श्रीमंत होता की दरिद्री अशा महत्त्वाच्या गोष्टीची चर्चा त्यांनी सेमिनरिस्ट ज्युलिआँबरोबर सुरू केली आणि त्यामुळे ते अबे पीरार व इतर सगळ्या संबंधित गोष्टी

एकदम विसरून गेले. त्यांनी अनेक संदर्भ देऊन त्यांचे काही भाग पाठ म्हटले. तथापि पुष्कळदा त्यांना नीट आठवेनासे झाले की ज्युलिआँ ती सबंध कविता नम्र भावाने पाठ म्हणून दाखवी. ज्युलिआँने संभाषणात जो विशिष्ट सूर लावला होता त्याच्यापासून तो ढळला नाही ही गोष्ट विशेषेकरून बिशपच्या मनात भरली होती. त्याने त्या कवीच्या पंचवीस तीस लॅटिन कविता ज्या रीतीने म्हणून दाखविल्या त्याच रीतीने पाठशाळेत काय चालले आहे हेही त्याने सांगितले असते. व्हर्जिल व सिसेरो यांच्याविषयीची दीर्घ चर्चा मग त्यांच्यात झाली. शेवटी तरुण सेमिनरिस्ट ज्युलिआँला शाबासकी दिल्याशिवाय त्यांना राहवले नाही. ते म्हणाले,

"यापेक्षा अधिक चांगला अभ्यास करणे जवळजवळ अशक्यच म्हणायचं." त्यावर ज्युलिआँ म्हणाला,

"मॉंसेनिओर, आपल्या अमोलिक पसंतीला उतरतील असे माझ्यापेक्षा अधिक योग्य १९७ इसम तुमची पाठशाळा तुम्हांला पुरवू शकेल."

"ते कसे काय?" आकडा ऐकून आश्चर्य वाटल्यामुळे बिशपनी विचारले.

"आपल्या समोर जे बोलण्याचा मान मला मिळाला आहे त्या माझ्या व्यक्तव्याच्या आधारासाठी मी अधिकृत पुरावा देऊ शकेन. ज्या विषयावरील प्रश्नांच्या उत्तरांनी मला त्या क्षणी आपला संतोष लाभला त्यांनीच पाठशाळेच्या वार्षिक परीक्षेत मला १९८ हा क्रमांक दिला."

"ओ हो! म्हणजे तू तर पीरारचा बेंजामिन! (लाडका)!" बिशप हसत आश्चर्याने उद्गारले व फ्रिलेअर यांच्याकडे नेत्रकटाक्ष टाकीत ते पुढे म्हणाले, "हे असे होणार याची कल्पना आपल्याला असायला हवी होती; पण हे सगळं रास्त व वाजवीच आहे." मग ज्युलिआँकडे वळून त्यांनी विचारले, "इथं पाठविण्यासाठी त्यांनी तुला तुझ्या झोपेतून उठविलं नाही काय, माझ्या मित्रा?"

"होय मॉंसेनिओर; मी माझ्या आयुष्यात पाठशाळेतून एकटा कधीच बाहेर पडलो नाही. त्याला अपवाद फक्त एकच व तो म्हणजे कॉर्पस् डोमिनीच्या समारंभाच्या वेळी कॅथीड्रल सुशोभित करण्यासाठी म. ल अबेशा बेरनार यांना मदत करायला गेलो होतो तेव्हा."

त्यावर बिशप म्हणाले, "एकदम उत्तीर्ण! काय! मेघडंबरीवर पिसे-तुऱ्यांचे गुच्छ लावण्याचे मोठे धैर्य दाखविणारा तो माणूस तूच तर? दरवर्षी मला त्या कामाचे फार भय वाटत असते. त्यापायी एखाद्याचा जीव जाईल की काय अशी भीती सारखी वाटत असते मला मनात; माझ्या मित्रा, तुझ्या जीवनात तू खूप पुढे जाशील; पण ते यशस्वी, तेजस्वी जीवन, तुला भुकेपायी मरू देऊन खंडित करण्याची माझी मुळीच इच्छा नाही."

बिशपच्या हुकमानुसार मग नोकरांनी बिस्किटे व मालमा मद्य आणले. ज्युलिआँने त्यांचा चांगला समाचार घेतला; अबे फ्रिलेअरपेक्षाही त्याने जास्त हात मारला. आनंदाने व चवीने खावे-प्यावे असे बिशपला वाटत असे ही गोष्ट अबे फ्रिलेअरनी जाणली होती.

संध्याकाळ पडत चालली तशी बिशपची खुषी वाढत गेली. थोडा वेळ ते धर्मोपदेशकांच्या इतिहासाविषयी बोलले. ज्युलिआँला त्यातले काही कळत नाही असे त्यांना आढळून आले.

कॉन्स्टन्टाइनच्या युगातील सम्राटांच्या राजवटीत रोमन साम्राज्याची जी नैतिक परिस्थिती होती त्या विषयाकडे ते वळले. मूर्तिपूजेच्या त्या अखेरच्या दिवसांत समाजात अस्वास्थ्य वावरत होते. शंकाकुलतेचे वातावरण पसरले होते; एकोणिसाव्या शतकात हीच स्थिती लोकांच्या दुःखी व थकलेल्या मनात त्रस्त करीत आहे. ज्युलिआँला तर टॅसिटसचे नावही माहीत नसावे असे दिसते असा शेरा मॉसेनी ऑरनी मारला.

पण पाठशाळेच्या ग्रंथालयात ह्या लेखकाची पुस्तकेच नव्हती असे ज्युलिआँने मोकळेपणे सांगितले तेव्हा बिशपना आश्चर्य वाटले.

त्यावर बिशप गमतीने म्हणाले, "हे ऐकून मला खरोखरी आनंद झाला आहे. माझी एक अडचण तू दूर केली आहेस. तुझ्या सहवासात माझी ही संध्याकाळ मोठ्या मजेत गेली आणि तीही अगदी अनपेक्षित अशा रीतीने. म्हणून तुझे आभार कशा प्रकारे मानावेत याचा विचार मी गेली दहा मिनिटे करीत आहे. मी तुला त्याबद्दल एक भेट देतो. ती सामान्यतः धार्मिक स्वरूपाची ठरणार नाही; तरी पण मी तुला टॅसिटसच्या ग्रंथांचा एक संच देतो."

बिशपनी माणूस पाठविला व टॅसिटसचे आठ ग्रंथ आणविले. त्या पुस्तकांची बांधणी आकर्षक होती. त्यांपैकी पहिल्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर त्यांनी स्वहस्ते ज्युलिआँ सोरेलला उद्देशून आग्रहाने लॅटिनमध्ये काही लिहिले. स्वतःच्या लॅटिन भाषेतील प्राविण्या बद्दल बिशपना अभिमान वाटत असे. हा वेळपावेतो जे एकूण संभाषण चालू होते त्याच्याशी पूर्णतः विरोधी असलेल्या सुरात शेवटी ज्युलिआँला ते गंभीरपणे म्हणाले, "तरुण माणसा, तू जर शहाणपणाने वागशील तर माझ्या अधिकारक्षेत्रातील प्रदेशात तुला एक दिवस सर्वोत्तम दर्जाची जागा प्राप्त होईल; आणि तीही माझ्या बिशपच्या राजवाड्यापासून शंभर लीग (तीनशे मैल) अंतराच्या आत असेल; पण तू खरोखरी फार शहाणपणाने वागायला हवं."

ज्युलिआँ तेथून बाहेर पडला तेव्हा मध्यरात्र झाली होती. त्याच्याजवळ पुस्तकांचे ते ओझे होते; आणि त्याची मनःस्थिती फार बावचळल्यासारखी झाली होती.

मॉसेनिओर त्याच्याशी अबे पीरार यांच्याबद्दल एक शब्दही बोलले नव्हते. त्यांनी त्याला ज्या अतिशय सभ्यतेने वागविले होते त्याचे ज्युलिआँला सगळ्यात जास्त आश्चर्य वाटले. अंगी मुरलेला नैसर्गिक असा भारदस्तपणा व चालण्या–बोलण्यातला असा प्रसन्न मनमोकळेपणा एका ठिकाणी बसू शकतो अशी कल्पनाही ज्युलिआँला कधी आली नव्हती. आणि वाढत्या उतावीळपणे त्याची वाट पाहात असलेल्या उदास गंभीर पीरारकडे त्याची नजर जाताच त्याला दोहोंतला फरक खूपच प्रकर्षाने जाणवला.

ज्युलिआँ दृष्टीच्या टप्प्यात येताच शक्य तेवढ्या मोठ्या आवाजात ओरडून अबे पीरारनी त्यांला विचारले, "काय म्हणाले ते तुला?" तेव्हा बिशपचे संभाषण लॅटिनमध्ये भाषांतर करून सांगण्यास ज्युलिआँला अडचण पडत होती ते पाहून पाठशाळेचे ते माजी संचालक आपल्या कर्कश आवाजात आणि अगदीच रांगड्या पद्धतीने त्याला म्हणाले, "फ्रेंचमध्ये बोल आणि मॉसेनिओरचे स्वतःचे शब्द मला ऐकव; त्यात पदरचा एखादाही घालू नकोस की त्यांचा एखादा शब्द गाळू नकोस."

ज्युलिआँने बरोबर आणलेल्या टॅसिटसच्या त्या बहुमोल पुस्तकांची पाने त्यांनी भराभरा उलटून पाहिली व पानांच्या सोनेरी कडांनी त्यांचे मन घृणेने भरून गेले. अबे परिरा म्हणाले,

"बिशपसारख्याने एका तरुण सेमिनरिस्टाला अशी चमत्कारिक भेट द्यावी म्हणजे काय?"

ज्युलिआँने प्रत्येक गोष्टीचा अगदी तपशीलवार अहवार दिला, तेव्हा रात्रीचे दोनाचे ठोके पडले. त्यानंतर त्यांनी त्यांच्या आवडत्या विद्यार्थ्याला त्याच्या खोलीत निजावयास जाऊ दिले. तो जाताना पीरार त्याला म्हणाले, "ज्याच्यावर बिशपने तुला उद्देशून लिहिलेला मजकूर आहे ते, टॅसिटसच्या पुस्तकांपैकी पहिले पुस्तक मजजवळ ठेवून जा. बिशपने त्याच्यावर लिहिलेली लॅटिन ओळ, मी गेल्यावर तुला ह्या स्थळी विद्युतवाहकासारखी उपयुक्त ठरणार आहे. माझ्या पोरा, माझ्यानंतर माझ्या जागी येणारा माणूस 'कोणता प्राणी खाऊन फस्त करू' अशासारखा विचार करणाऱ्या सिंहाप्रमाणे तुझ्याशी वागेल."

ज्युलिआँचे जोडीदार त्याच्याशी एका निराळ्याच पद्धतीने बोलू लागले आहेत असे दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच्या अनुभवास आले. ते बघून ज्युलिआँ फारच संभाळून वागू लागला. त्याला वाटले, "हा पाहा, म. पीरार यांच्या राजीनाम्याचा परिणाम लगेच दिसून येऊ लागला आणि मी त्याचा आवडता विद्यार्थी असे समजले जाते. राजीनाम्याची बातमी इथे सगळीकडे पसरली आहे. माझे जे जोडीदार माझ्याशी याप्रमाणे बोलू-वागू लागले आहेत त्यामागे माझा अपमान करण्याचाच त्यांचा उद्देश असला पाहिजे." पण त्याला त्या अपमानाचा छडा लावता आला नाही. उलट, सेमिनरिस्टांच्या झोपण्याच्या खोल्यांत आकस्मिकपणे ज्यांच्या ज्यांच्याशी त्याची भेट झाली त्या सर्वांच्या डोळ्यांत त्याला द्वेषभावनेचा अभावच आढळला. "ह्याचा अर्थ काय असावा? एक सापळा टाकण्यात आला आहे यात शंकाच नाही. आम्ही अगदी डावपेच टाकून खेळत आहोत." अखेर व्हेरिएरचा तो तरुण सेमिनरिस्ट त्याला उद्देशून म्हणाला,

"कॉर्नेली टॅसिटी ऑपेरा ओमनिआ." (टॅसिटसचे कर्तृत्व आहे हे सगळे!)

त्याचे हे बोलणे इतरांच्या कानांवर पडले. त्याबरोबर इतर सर्व सेमिनरिस्ट ज्युलिआँचे अभिनंदन करण्यात एकमेकांशी स्पर्धा करू लागले. ज्युलिआँला मॉंसेनिओरकडून एक उत्कृष्ट भेट मिळाली एवढेच त्याचे कारण नव्हते; तर त्याच्याशी तब्बल दोन तासपर्यंत संभाषण करीत राहण्याचा मान मॉंसेनिओरने ज्युलिआँला दिला होता हेही जास्त प्रमाणात त्याचे कारण होते. ह्या सर्व हकीगतीची माहिती तिच्या अगदी क्षुल्लक तपशिलासह तेथे सगळ्यांना समजली व त्या क्षणापासून त्याचे द्वेष-मत्सर मावळून गेले; प्रत्येकजण ज्युलिआँला अतिशय नम्रपणाने मानसन्मान देऊ लागला; ज्या अबे कास्तानॅदने त्याला आदल्याच दिवशी अतिशय उर्मटपणे वागविले होते त्याने जवळ येऊन, स्वतःच्या बाहूत त्याला घेऊन, भोजनास निमंत्रणही दिले.

स्वतःच्या स्वभावातील एका कमकुवतपणामुळे त्या गावंढळ प्राण्यांच्या औद्धत्यापायी त्याला पूर्वी फार मनस्ताप झाला होता. आता त्यांच्या त्या आर्जवी खुषामतीमुळेही त्याला कोणत्याच प्रकारचा आनंद न होता उलट घृणाच वाटली.

दुपारी अबे पीरार यांनी आपल्या विद्यार्थ्यांचा निरोप घेतला; पण त्यापूर्वी कडक भाषणचा काढा सेमिनरिस्टांना पाजल्याशिवाय ते राहिले नव्हते. ते त्यांना म्हणाले, "ह्या जगातील मानसन्मान तुम्हाला मिळवायचा आहे का? सामाजिक प्रतिष्ठेचे फायदे, हुकुमत गाजविण्याची हौस, कायदे झुगारण्याचा आनंद आणि सगळ्यांशी बेफिकिरीने वागण्याचाही कैफ तुम्हाला पाहिजे आहे का? की तुम्हाला खरोखरी तुमच्या

अनुक्रमणिका

आत्म्याला कायमची मुक्ती मिळायला हवी आहे? शाश्वत मोक्षप्राप्ती पाहिजे? तुमच्यापैकी जे अगदी अज्ञानी असतील त्यांनीसुद्धा ह्या दोन मार्गांपैकी चांगला वाईट तो फरक ओळखण्यासाठी केवळ डोळे उघडे ठेवायला हवेत."

अबे पीरार गेल्याबरोबर लगेच 'सेक्रेड हार्ट ऑफ जीझस'मधील भक्तगण चॅपेलमध्ये प्रार्थना (Te–Deum) म्हणण्यास गेले. माजी संचालकांच्या भाषणाची पाठशाळेतील कोणीच गंभीरपणे दखल घेतली नाही. चोहीकडून जी प्रक्रिया ऐकू येऊ शकत होती ती म्हणजे, "बडतर्फ केले गेल्यामुळे ते फार चिडले आहेत" अशी. मोठमोठ्या कंत्राटदारांशी व्यवहार करण्याच्या अनेक सुसंधी उपलब्ध करून देणाऱ्या त्या अधिकारपदावरून अबे पीरार यांनी स्वखुषीने राजीनामा दिला असेल यावर विश्वास ठेवण्याइतपत तेथला कोणताच विद्यार्थी साधाभोळा नव्हता.

अबे, पीरार बेझाँसामधील एका चांगल्यापैकी पथिकाश्रमात उतरले आणि काही काल्पनिक खाजगी कामाच्या सबबीखाली तेथे त्यांनी दोन दीवस मुक्काम करायचे ठरविले.

बिशपनी अबेना भोजनाचे निमंत्रण दिले; आणि त्यांच्या ग्रॅण्ड विकार फ्रिलेअर चिडविण्याच्या उद्देशाने त्यांना प्रसिद्धीच्या प्रकाशात आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. भोजनाच्या अखेरीचा फलाहार ते करीत असतानाच तेथे पॅरिसहून एक अकल्पित बातमी आली. राजधानीपासूनच्या चार लीग (बारा मैल) अंतराच्या आत असलेल्या एका ठिकाणी एका उत्तम परगण्याच्या धर्माधिकाऱ्यांच्या पदावर अबे पीरार यांची नेमणूक करण्यात आली होती. मान्यवर बिशपनी त्याबद्दल अबे पीरार यांचे अभिनंदन मनापासून केले. ह्या सगळ्या व्यवहारात एक उत्तम रीतीने खेळलेला डाव त्यांना दिसून आला व त्यामुळे त्यांची कळी खुलली आणि अबे पीरार यांच्या बुद्धिमत्तेबद्दल त्यांचा उत्कृष्ट ग्रह झाला. त्यांनी अबेना लॅटिनमध्ये एक छानदार प्रशस्तिपत्रक बहाल केले आणि मध्ये मध्ये मोडता घालण्यात धजावणाऱ्या द फ्रिलेअरना गप्प केले.

त्या दिवशी संध्याकाळी मॉंसेनिओरनी अबेबद्दलचे आपले उत्कृष्ट मत मार्क्विस द रूबॉम्प्रे यांच्या दिवाणखान्यात व्यक्त केले. बेझाँसाच्या निवडक प्रतिष्ठितांच्या वर्तुळात ती एक खूप मोठी थोरली बातमी ठरली. अबे यांच्यावर करण्यात आलेल्या या खास कृपेचा अर्थ काय असावा ह्याबद्दलचा तर्क लढविण्यात लोक मग्न झाले. अबे पीरार जणू बिशप झालेतच असे त्यांना दिसू लागले. त्यापेक्षा जास्त चाणाक्ष लोकांच्या मते म. द ल मोले मंत्री झाल्याचे गृहीत धरण्यात आले. त्या संध्याकाळी तेथील समाजात म. ल द फ्रिलेअर यांनी जी आढ्यतेखोर प्रवृत्ती प्रकट केली ती पाहून ती मंडळी मोकळेपणे स्मित करू लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी अबे पीरार मार्क्विस यांच्या न्यायाधीशांच्या भेटीची याचना करण्यासाठी गेले तेव्हा रस्त्यातून लोक जवळजवळ त्यांच्यामागूनच चालू लागले आणि व्यापारी आपल्या दुकानांच्या दाराशी येऊन उभे राहिले. न्यायाधीश मंडळींच्याकडून सौजन्यपूर्ण वागणूक मिळण्याचा त्यांचा तो पहिलाच प्रसंग होता. त्या करारी जॅन्सेनिस्टाला त्याच्याभोवती दिसलेल्या प्रत्येक गोष्टीचा संताप आलेला होता. मार्क्विस द ल मोले यांच्यासाठी त्यांनी निवडलेल्या वकिलाबरोबर तेथे त्यांनी बराच वेळ खर्च केला आणि त्यानंतर ते पॅरिसला निघून गेले. त्यांना त्यांच्या गाडीशी पोचविण्यास त्यांचे जीवश्च कठंश्च दोन-तीन मित्र आले होते. मार्क्विसने पाठविलेल्या गाडीवरच्या, रंगवलेल्या त्याच्या उच्च कुलनिदर्शक चिन्हांची तारीफ करीत होते. पाठशाळेच्या संचालनाची सूत्रे पंधरा वर्षे स्वतःच्या हाती होती त्या कालावधीत आपण फक्त ५२० फ्रँक साठवू शकलो व तेवढ्याच बचतीनिशी आपण बेझाँसा सोडीत आहोत असे त्या मित्रांना सांगण्याचा भोळेपणा अबे

पीरारनी केली. त्या मित्रांनी आसवे आणून त्यांना आलिंगने दिली आणि मग ते एकमेकांत म्हणाले, “भल्या पाद्र्याने असं खोटं बोलायचं टाळलं असतं तर बरं झालं असतं. कोणालाही खरं न वाटण्याइतकं ते विधान हास्यास्पद आहे.”

मारी अल्कॉक, दि सेक्रेड हार्ट ऑफ जीझस, जेजुइटस, आणि त्याचे स्वतःचे बिशप यांच्याविरुद्ध सहा वर्षेपर्यंत एकट्याने लढत राहण्याचे सामर्थ्य अबे पीरार यांच्या जवळ होते. ते त्यांच्या प्रामाणिकपणामुळे लाभले होते हे धनलोभाने अंध झालेल्या सामान्यजनांना समजण्याची कुवतच नव्हती.

★ ★ ★

अनुक्रमणिका

## प्रकरण तिसावे

## महत्त्वाकांक्षा

मार्क्विस यांची उमदी चर्या व बोलण्याची जवळजवळ खुशालचंदी ढब पाहून अबे आश्चर्यचकित झाले. तथापि त्या भावी मंत्र्याने अबेचे स्वागत केले ते थोर सद्‌गृहस्थांच्या वागणुकीत आढळणाऱ्या छोट्याछोट्या चमत्कारिक रीतिभातींशिवाय या छोट्या रीतिभाती बाहेरून शिष्टाचारयुक्त दिसतात; पण जाणत्या चाणाक्ष माणसाला त्या उर्मटपणाच्या वाटतात. वेळेचा तो अपव्यय ठरला असता आणि मार्क्विस, त्यांच्यापुढील सार्वजनिक कामात इतके व्यग्र होते की गमाविण्यासाठी त्यांच्याजवळ वेळच नव्हता.

राजेसाहेब व देश ह्या दोहोंनीही एक विवक्षित मंत्रिमंडळ स्वीकारावे यासाठी त्यांची कारस्थाने सहा महिने चालू होती. तसे झाल्यास ते मंत्रिमंडळ कृतज्ञतेच्या पोटी त्यांना ड्यूक करणार होते.

फ्राँ काँते येथील न्यायालयात त्यांच्या फिर्यादी चालू होत्या त्यांच्याबाबत एक स्पष्ट व निश्चित अहवाल सादर करण्यासाठी त्यांच्या बेझाँसाच्या वकिलाला मार्क्विस सालोसाल आग्रहाची विनंती करीत आले होते; पण ती फुकट गेली होती; कारण त्या नामवंत वकिलालाच मुळात त्या फिर्यादींचे नीट आकलन झालेले नव्हते; तेव्हा तो त्यांना त्या कशा समजावून सांगणार होता? अबेनी त्यांना एक छोटीशी चिठ्ठी दिली. तिच्यात सारे काही स्पष्ट केलेले होते.

पाच मिनिटांच्या आत शिष्टाचाराचे सर्व सोपस्कार व वैयक्तिक विचारपूस सफाईने संपवून मार्क्विस म्हणाले,

"माय डिअर अबे, माझ्या तथाकथित भरभराटीच्या काळात दोन छोट्या गोष्टींकडे गंभीरपणे लक्ष पुरवायला मला वेळच मिळत नाही; त्या दोन तशा छोट्या पण बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे माझे कुटुंब आणि माझ्या कामधंद्याचा व्याप. माझ्या घराण्याच्या भरभराटीकडे माझं सर्वांत जास्त लक्ष असतं; घराणं खूप पुढे नेण्यात मी यशस्वीही होईन कदाचित. मी माझ्या ऐषारामाचीही काळजी वाहतो. इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा माणसाने स्वतःच्या ऐषारामाकडे आधी पाहिलं पाहिजे; निदान माझा दृष्टिकोण तरी तसा आहे." अबे पीरार यांच्या नजरेतील आश्चर्यभाव पाहून ते असेच आणखी बोलत राहिले. अबे जरी समजदार होते तरी मार्क्विससारख्या वृद्ध गृहस्थाने स्वतःच्या ऐषारामाबद्दल एवढ्या मुक्तपणे बोलावे याचा अबेना फार विस्मय वाटला.

तो थोर सरदार पुढे म्हणाला, "पॅरिसमध्ये कामकाज होते यात शंका नाही; पण तो वरच्या माळ्यावर असते. आणि माझा व एखाद्या माणसाचा संपर्क येतो न येतो तेवढ्यात तो दुसऱ्या मजल्यावरची एखादी टुमदार जागा घेतो. मग त्याची बायको आपला आमोदप्रमोदाचा दिवस सुरू करते. परिणामी काम असे होतच नाही. फॅशनबेल राहायचं किंवा तसा दिसायचा प्रयत्न करायचा याशिवाय दुसरा उद्योगच नसतो त्यांना. एकदा आपल्या दोन वेळच्या पोटापाण्याची समस्या सोडविली की थाटात कसं राहायचं हेच त्यांचं लक्ष पुरविण्याजोगं काम ठरतं.

"अगदी काटेकोरपणे, बिनचूक सांगायचं म्हणजे, न्यायालयातल्या माझ्या सगळ्या फिर्यादींसाठी आणि प्रत्येक फिर्यादीसाठी वेगवेगळे वकील मी देतो. वकील अगदी मरेपर्यंत काम करतात. त्यांच्यापैकी

एकजण परवाच्या दिवशी क्षयाने वारला. पण महाशय, माझ्या एकंदर सर्वसाधारण व्यवहारात, पत्रव्यवहार करताना, आपण काय करीत आहोत याचा योग्या विचार जरा गंभीरपणे जो माझ्यासाठी करण्याची कृपा करील असा एखादा माणूस माझ्या कामधंद्यासाठी शोधून काढण्याची आशा गेल्या तीन वर्षांपासून मी सोडून दिलेली आहे, हे तुम्हांला खरं वाटेल का? तथापि ही सगळी केवळ प्रस्तावना झाली.

"तुमच्याबद्दल मला आदर आहे; आणि आपली ही पहिलीच भेट असली तरी तुम्ही मला आवडलात असं सांगण्याचं धारिष्ट मला करावंसं वाटतं. तुम्ही माझे चिटणीस व्हाल का? मी तुम्हाला आठ हजार फ्रँक पगार देईन; किंवा खरोखर त्याच्या दुप्पटही देईन. तुम्हांला मी खात्रीपूर्वक सांगतो की त्याहीपेक्षा जास्त फायदा तुमच्यामुळे मला होईल; आणि ज्या दिवशी आपलं जमणार नाही त्याच दिवशी, तुम्हांला आता मिळालेले धर्माधिकाऱ्याचे छानदार स्थान तुमच्यासाठी तयार असेल याची हमी घेणे हे माझे काम राहील."

अबेनी नकार दिला. पण मार्क्विस यांची खरीखुरी अडचण लक्षात येऊन, संभाषणाच्या अखेरीस त्यांना एक कल्पना सुचली व ते त्यांना म्हणाले, "माझ्या पाठशाळेत मी माझ्यामागे एक गरीब तरुण ठेवून आलो आहे आणि तिथे त्याचा पाशवी छळ केला जाईल त्याबद्दल मला शंका वाटत नाही. तो जर केवळ एक साधासुधा धार्मिक वृत्तीचा माणूस असता तर त्याच्या वाटेला कोणी गेले नसते.

"सध्या त्या तरुणाला फक्त लॅटिन येते. धार्मिक वाङ्मयाचाही त्याचा अभ्यास आहे. पण एक दिवस तो त्याच्या बुद्धिसामर्थ्यावर आत्म्यांचे मार्गदर्शन किंवा प्रवचने करणे यासाठी स्वतःची पात्रता दाखवून पुढे येईल ही गोष्ट मुळीच अशक्य नाही. तो नक्की काय करील हे मला माहीत नाही; पण त्याच्या ठिकाणी पवित्र स्फुलिंग, अस्मिता आहे व त्यामुळे तो खूप पुढे जाईल. माणसे आणि व्यवहार यांच्याकडे पाहण्याच्या तुमच्या दृष्टिकोणासारखा काहीसा दृष्टिकोण ज्याच्याजवळ आहे, असा माणूस आपला बिशप म्हणून कधीकाळी नेमण्यात आला तर ज्युलिआँला त्याच्या हवाली करण्याचा माझा विचार होता."

"कुठल्या जातकुळीतला आहे तुमचा हा तरुण?" मार्क्विसनी विचारले.

"आपल्या पहाडी मुलखातील एका सुताराचा तो मुलागा आहे असं म्हणतात; पण तो एखाद्या श्रीमंत माणसाचा अनौरस पुत्र असावा असं मला वाटतं. एक निनावी किंवा टोपणनावाचं पत्र त्याला आलेलं मी पाहिलं आहे. त्या पत्रात त्याला पाचशे फ्रँकची एक हुंडी पाठविण्यात आली होती.

"ओहो! म्हणजे तो ज्युलिआँ सोरेल की!" मार्क्विस उद्गारले.

"तुम्हांला कसं ठाऊक त्याचं नाव?" आश्चर्यचकित झालेल्या अबेंनी विचारले. हे विचारताना ते स्वतःच्या प्रश्नामुळे लज्जित झालेले दिसले.

"तेवढं मी तुम्हांला सांगणार नाही." असे उत्तर त्यावर ताबडतोब मार्क्विसनी दिले. तेव्हा अबे म्हणाले, "बरं, तसं का होईना; पण तुम्ही एकवार त्याला तुमचा चिटणीस करून पाहायला हरकत नाही. त्याचा कामाचा उरक दांडगा आहे अन् त्याच्या अंगी चांगली निर्णयशक्तीही आहे. थोडक्यात मी असं म्हणेन की एकदा प्रयत्न करूण पाहण्यासारखा हा प्रयोग आहे."

“का नाही? जरूर प्रयत्न करून पाहू की. पण पोलिसच्या प्रिफेक्टकडून अथवा इतर कोणांकडूनही स्वतःचा हात ओला होऊ देऊन माझ्यावर हेरगिरी करणारा माणूस तर तो ठरणार नाही ना? माझा विरोध आहे तो एवढ्या एकाच गोष्टीला.” मार्क्विस बोलले.

अबे पीरार यांच्याकडून अनुकूल आश्वासने मिळाल्यावर मार्क्विसनी एक हजार फ्रँक्सची नोट काढली व ते म्हणाले, “ज्युलिआँ सोरेलला हे पैसे प्रवासखर्चासाठी पाठवा आणि त्याला माझ्याकडे यायला सांगा.”

“म. ल मार्क्विस, पॅरिसमधील जीवनाने तुमच्या मनात इथल्या स्थितीबद्दल निश्चितपणे एक भ्रामक कल्पना निर्माण केली असेल. पण नाही; तुम्ही एका मोठ्या सन्माननीय महापदावर आरूढ झालेले असल्यामुळे आम्हा गरीब ग्रामवासीयांवर किती मोठी जुलूम—जबरदस्ती होत आहे याची तुम्हाला कल्पना नाही. त्यातही ज्या पाद्र्यांचे जेझुइटांशी सूत नाही ते तर जास्तच भरडले जात आहेत. ते ज्युलिआँ सोरेलला कदापि पाठशाळा सोडून देणार नाहीत. त्यासाठी ते नाना प्रकारच्या सबबी धूर्तपणे उकरून काढतील. ज्युलिआँ आजारी आहे असं पत्र ते पाठवतील किंवा पत्रे टपालात गहाळही होतील.” इ. इ.

“लवकरच एक दिवस मी मंत्रिमहाशयांकडून बिशपसाठी एक पत्र मिळवीन.” मार्क्विस म्हणाले. त्यावर अबे पुन्हा बोलले, “एक गोष्ट सांगायची मी विसरूनच जात होतो. हा तरुण मनुष्य जन्माने अगदी सामान्य जातकुळीतला असला तरी अभिमानी वृत्तीचा ओहे. त्याच्या स्वाभिमानाला धक्का पोहोचला तर तुमच्या उद्योगधंद्यात तुम्हाला त्याचा काही एक उपयोग होणार नाही. तो उलट खुळ्यासारखा मात्र वागू लागेल.”

“मला आवडतात अशी स्वाभिमानी माणसं. मी त्याला माझ्या मुलाचा जोडीदार करीन; मग तर झालं?” मार्क्विस म्हणाले.

ह्या प्रसंगानंतर काही दिवसांनी ज्युलिआँला एक पत्र आले. पत्रातले अक्षर ओळखीचे होते. पत्रावर शॅलाँच्या टपाल कचेरीचा शिक्का होता. पत्राच्या लिफाफ्यात बेझाँसाच्या एका व्यापाऱ्याच्या पेढीवरील एक हुंडी होती; आणि पॅरिसला ताबडतोब निघून येण्याची सूचना त्याला पत्रातून करण्यात आलेली होती. एक मुद्दाम धारण केलेल्या टोपणनावाने पत्राखाली सही केलेली होती. पत्र उघडताना ज्युलिआँ थरथर कापत होता. पत्रातल्या तेराव्या शब्दावर शाईचा एक मोठा थोरला डाग पडला होता. ज्युलिआँ व अबे पीरार यांच्यामध्ये तसा संकेत ठरला होता.

तासाभराच्या आत बिशपच्या राजवाड्यातून ज्युलिआँला बोलावणे आले. तेथे संपूर्णतः पितृवत् प्रेमाने त्याचे स्वागत केले गेले. पॅरिसला जे उज्ज्वल भाग्य त्याची प्रतीक्षा करीत होते त्याच्या संदर्भात मॉंसेनिओरनी अनेक छानदार शब्दांनी त्याची स्तुती केली. त्यात अधूनमधून होरेसची अवतरणे त्यांनी समाविष्ट केली होती आणि ज्युलिआँला जर त्याबद्दल आभार मानावेसे वाटले असते तर प्रथम त्या स्तुतिसुमनांचे स्पष्टीकरण करून घेणे भाग पडले असते. पण ज्युलिआँ काहीच बोलू शकला नाही. त्याचे कारण प्रामुख्याने असे होते की त्यातले त्याला काहीच माहीत नव्हते; आणि मॉंसेनिओरनी त्याच्याबद्दल फारच उच्च प्रकारचा आदर व्यक्त केला होता. राजवाड्यातील दुय्यम पाद्र्यांपैकी एकाने महापौरांना लिहिले; त्याबरोबर महापौर घाईघाईने स्वतःच आले त्यांनी स्वतःबरोबर एक प्रवास—परवाना सही करूनच आणला. तथापि प्रवास करणाऱ्या व्यक्तीचे नाव भरण्याची जागा मात्र त्यात तशीच कोरी ठेवण्यात आली होती.

मध्यरात्रीपूर्वीच ज्युलिआँ फूकेकडे येऊन पोहोचला. आपल्या मित्राच्या पुढ्यात भविष्यकाळाने आणून ठेवलेले भाग्य कळल्यावर गंभीर वृत्तीच्या फूकेला आनंदापेक्षा अधिक आश्चर्यच वाटले.

तो लिबरल मतदार ज्युलिआँला म्हणाला, "ह्याचं पर्यवसान सरकारी नोकरीत होईल. त्या नोकरीत तुला अशी काही कारवाई करणे भाग पडले की जेणेकरून वर्तमानपत्रांतून तुझा फजितवाडा केला जाईल. तुझ्याबद्दलचे जे काही वृत्त मला वर्तमानपत्रातून कळेल ते तुझ्या अपकिर्तीचे असेल. लक्षात ठेव, आर्थिक दृष्टीने विचार केला तरी सरकारी नोकरीतून, मग ते सरकार खुद्द किंग सॉलोमनचे असले तरी, त्याच्याकडून चार हजार फ्रँक मिळण्यापेक्षा, इमारती लाकडाच्या प्रामाणिक व्यापारात शंभर लुई कमविणे जास्त चांगले असते; कारण तिथे तुम्ही स्वतःच तुमचे मालक असता."

ह्या बोलण्यात एका खेडवळ मनाच्या क्षुद्रतेपलीकडे जास्त काही नाही असे ज्युलिआँला वाटले. गंभीर घटनांच्या रंगमंचावर तो एक नट म्हणून अखेर दाखल झाला होता. त्याला कमी निश्चितपणा व जास्त प्रमाणात संधी आवडत असत. आता निदान भूकेपायी मरण्याचे भय तरी त्याच्या मनात मुळीच उरले नव्हते. बुद्धिमान व्यक्ती मोठे कारस्थानी, तसेच मोठमोठे दांभिक लोक वगैरेंचे वास्तव्य पॅरिसमध्ये असते; पण ते बेझाँसाच्या किंवा आगदेच्या बिशप्ससारखे सभ्य व शिष्टाचाराने वागणारे लोक असतात असे पॅरिसबद्दलचे एक कल्पनाचित्र त्याने त्याच्या मनश्चक्षूंपुढे रंगविले होते. तथापि सुदैवाने आपल्याला अशा पॅरिसला जायला मिळत आहे ह्या घटनेने बाकीच्या साऱ्या गोष्टी त्याच्या नजरेत झाकळून गेल्या होत्या. मात्र अबे पीरार यांच्या पत्रामुळे आपण आपल्या स्वतंत्र इच्छेप्रमाणे वागण्यास मोकळे नसल्याचे त्याने त्याच्या मित्राला नम्रपणे दर्शविले.

दुसऱ्या दिवशी दुपारी तो व्हेरिएरला पोहोचला तेव्हा तो एक अतिशय सुखी जीव होता. मा. रेनॉल यांना पुन्हा भेटता येईल असा त्याचा हिशेब होता. प्रथम तो त्याचे मूळ रक्षक, भले अबे शॅलाँ यांच्याकडे गेला पण तेथे त्याच्या वाट्याला कठोर स्वागत आले! त्याच्या आदरयुक्त अभिवादनाला प्रतिसाद न देता, शॅलाँ त्याला म्हणाले, "तुला असे वाटते काय की, तू माझ्या एखाद्या उपकाराच्या ओझ्याखाली आहेस? तर मग दुपारचं जेवण तू माझ्याबरोबर करशील; तोवर दुसरा घोडा भाड्याने आणण्यात येईल आणि 'कोणाचीही गाठभेट न घेता' तू व्हेरिएर सोडून जाशील, समजलास?"

"ऐकणे हेच आज्ञा पाळणे होय?" सेमिनरिस्टासारखा स्वतःचा चेहरा ताठ ठेवीत ज्युलिआँ उत्तरला. मग त्यांच्यामध्ये धर्मशास्त्र व लॅटिन पांडित्य या विषयाशिवाय अन्य कशावरच चर्चा झाली नाही.

त्याच्यासाठी आणलेल्या घोड्यावर ज्युलिआँ बसला. तीन मैल अंतर काटल्यावर तो एका दाट झाडीच्या ठिकाणी पोहोचला. आत शिरताना तेथे त्याला कोणी पाहू शकत नव्हते. तो झाडीत शिरला व लपून बसला. सूर्यास्ताच्या सुमारास त्याने एका शेतकऱ्याबरोबर घोडा परत पाठविला. गावाच्या सगळ्यात जवळच्या वेशीजवळ तो पोहोचविण्यास त्याने त्याला सांगितले. त्यानंतर ज्युलिआँ द्राक्षमळ्यातील एका कामगाराच्या घरी गेला; त्याच्याकडून त्याने एक छोटी शिडी विकत घेतली व ती व्हेरिएरमधील क्रूर द ला फायडेलिटेवर वाकलेल्या झाडीपर्यंत त्याच्याबरोबर घेऊन चलण्याचे त्याने त्याच्याकडून कबूल करून घेतले.

अनुक्रमणिका

ज्युलिआँचा निरोप घेताना तो शेतकरी म्हणाला, “सक्तीने भरती केल्यावर सैन्यातून पळून जाणारे गरीब लोक किंवा तस्कर लोक (स्मगलर्स) यांपैकी असणार आपण. पण मी कशाला काळजी करू? माझ्या शिडीला चांगली किंमत आलेली आहे आणि मला स्वतःला माझ्या आयुष्यात असे काही चमत्कारिक क्षण अनुभवावे लागलेले आहेतच की.”

ती रात्र गडद अंधारी होती. मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास त्याच्या शिडीसह ज्युलिआँने व्हेरिएरमध्ये प्रवेश केला. एम्. द रेनॉल यांच्या भव्य, छानदार बगीच्यामधून दहा फूट खोल, दोन भिंतींच्या मधून वाहणाऱ्या जलप्रवाहात, जमले तितक्या लवकर तो उतरला. नंतर त्याने ती शिडी लावली व तो सहज वर चढून गेला. तो स्वतःशी अंदाज करू लागला,

“घराच्या राखणदारीसाठी ठेवलेले कुत्रे माझं स्वागत कोणत्या प्रकारे करतील हाच खरा महत्त्वाचा प्रश्न आहे.” कुत्रे भुंकू लागले, त्याच्यावर धावून आले; पण त्याने हलक्या आवाजात शीळ घातली; त्याबरोबर ते त्याच्याभोवती जमा झाले आणि लडिवाळपणे शेपट्या हालवून गोंडा घोळू लागले.

मग तो एका सज्जावरून दुसऱ्यावर चढत गेला. जरी सगळी फाटके लावलेली होती तरी मा. रेनॉल यांच्या झोपण्याच्या खोलीच्या खिडकीच्या अगदी नजीक खालच्या बाजूला पोहोचण्यास त्याला कोणतीच अडचण पडली नाही. ती खिडकी बागेच्या बाजूने जमिनीपासून नऊ-दहा फुटांपेक्षा जास्त उंच नव्हती.

खिडकीच्या झडपांमध्ये एक छोटे छिद्र होते. हृदयाच्या आकारचे ते छिद्र ज्युलिआँच्या चांगल्याच ओळखीचे होते. तथापि खोलीत रात्रीचा जो छोटासा दिवा जळायला हवा त्याचा मिणमिणता प्रकाशही त्या छिद्रावर पडला नसल्याचे पाहून ज्युलिआँची हिंमत खचली. तो स्वतःशी म्हणाला, “हे परमेश्वरा, एवढ्या सगळ्या रात्रींतून आजच्याच रात्री मा. रेनॉल त्यांच्या खोलीत नसाव्यात ना? मग त्या दुसरीकडे कोठे झोपल्या असतील बरे? रेनॉल कुटुंब तर येथे व्हेरिएरलाच आहे; कारण त्यांची कुत्री मला येथेच आढळली. प्रकाश नसलेल्या ह्या खोलीत कदाचित स्वतः एम्. द रेनॉलच मला आढळून येतील; किंवा एखादा परका माणूसही दिसेल; काय सांगावे? म्हणजे मग कंबक्तीच! केवढी बलामत ठरेल ती!”

तेथून परत फिरणे हा सर्वांत शहाणपणाचा मार्ग होता. पण त्या कल्पनेने ज्युलिआँच्या अंगावर शहारे आले. तो स्वतःशी पुटपुटला, “तेथे जर कोणी परका माणूस आढळला तर माझे पाय मला नेतील तितक्या वेगाने मी धूम ठोकीन; माझी शिडी मग मला तशीच सोडावी लागेल! पण खुद्द मा. रेनॉलच आढळल्या तर माझं स्वागत कोणत्या रीतीने केले जाणार आहे? पश्चात्तापात आणि पराकोटीच्या धार्मिक आचरणात त्या निमग्न होऊन गेल्या आहेत असं मला खात्रीपूर्वक वाटतं. पण अखेर त्यांना अजूनही माझ्या आठवणी येत असतीलच; कारण त्यांनी अलीकडेच मला पत्र लिहिलं होतं.” आणि ह्या युक्तिवादाबरोबरच त्याच्या मनाने निश्चय केला.

त्याचे अंतःकरण धडधडत होते. पण मा. रेनॉलना भेटण्याचा पक्का निर्णय त्याने घेतला होता. एक तर त्यांची भेट घ्यायची, नाही तर नष्ट व्हायचं. त्याने खिडकीच्या झडपेवर मूठभर वाळू फेकून पाहिली. पण अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्याने आपली शिडी खिडकीच्या बाजूने भिंतीला टेकवून ठेवली आणि तावदानावर स्वतःच टकटक केले; प्रथम हलकेच; व नंतर मोठ्याने, जोराने. त्याला वाटले, “इथं आता सगळाच अंधार असल्यामुळे ते माझ्यावर कदाचित गोळीही चालवतील.” ह्या विचाराने त्याचे ते वेडे साहस, अंगीच्या धैर्याचा प्रश्न होऊन बसला.

त्याला वाटले, “आज रात्री ह्या खोलीत कोणीच नसावे. ती रिकामीच दिसते. नाही तर दुसरे कोणीही झोपलेले असते तर ह्या वेळेपर्यंत नक्कीच जागे झाले असते. म्हणजे आता इथं आणखी खबरदारी घेण्याचे काही कारण दिसत नही. मला आता विचार केला पाहिजे तो इतकाच की, इतर खोल्यांत झोपलेल्या लोकांच्या कानी माझ्या हालचालीचा कसलाही आवाज जाता कामा नये.”

तो खाली उतराला; त्याने खिडकीच्या एका झडपेला शिडी लावली; पुन्हा चढला. हृदयाच्या आकाराच्या त्या छिद्रातून आत हात घालीत असता, सुदैवाने तितक्यात त्याच्या हाताला एक तार लागली. झडप बंद करून ठेवण्यासाठी ती तार खिडकीच्या खिटीला घट्ट बांधण्यात आली होती. त्याने ती तार ओढली; त्याबरोबर खिडकी उघडण्याच्या प्रयत्नाला यश येऊ लागल्याचे पाहून त्याला अनिर्वचनीय आनंद झाला. “मी झडप आस्ते आस्ते उघडली पाहिजे; मा. रेनॉलना माझा आवाज ओळखता आला पाहिजे.” स्वतःचे डोके आत जाण्याइतपत त्याने झडप पुरेशी उघडली; आणि तो हलक्या आवाजात पुन्हा पुन्हा म्हणाला, “मित्रच आहे आलेला.”

त्याने कानोसा घेतला. खोलीतील गंभीर शांततेचा भंग मुळीच झालेला नसल्याची खात्री त्याने करून घेतली. पण तेथे रात्रीचा दिवा नव्हता. शेकोटीजवळ बारीक करून ठेवलेल्या दिव्याचाही प्रकाश नव्हता. त्याला दुश्चिन्ह वाटले.

त्याने स्वतःला क्षणभर इशारा दिला, “बंदुकीच्या गोळीपासून सावध रहा.” मग त्याने बोटाने तावदानावर टकटक केले, नंतर मोठ्यानेही टकटक करण्याचे धारिष्ट केले. “आता काच फुटली तरी हरकत नाही; हे हातचे काम मला आता एकदाचे पूर्ण केलेच पाहिजे.” तो जोराने ठोठावीत असता त्या गडद अंधारातून पांढऱ्या रंगाचे काही तरी भुतासारखे खोलीच्या पलीकडून येत असल्याचा भास त्याला झाला. दुसऱ्याच क्षणी त्याची त्याबद्दल खात्री झाली. ती छाया अत्यंत आस्ते आस्ते पुढे सरकत असल्याचे नक्कीच त्याला दिसले; आणि ज्या तावदानावर त्याने आपला डोळा लावला होता त्याच्यावर आतल्या बाजूने गाल टेकला गेलेला दिसला.

तो थरारला अन् दचकून जरा मागे सरला. पण रात्रीचा काळोख एवढा दाट होता की त्या मा. रेनॉल आहेत किंवा काय हे त्याला इतक्या जवळूनही ओळखता आले नाही. कोणी तरी धोक्याची सहजस्फूर्त आरोळी मारील अशी त्याला भीती वाटली. त्याच्या शिडीच्या पायाशी कुत्र्यांनी आतापावेतो त्याच्या मागावर घोटाळण्यास व हळूहळू गुरगुरण्यास सुरुवात केली होती. तो पुन्हा मोठ्याने बोलला, “मी आहे, मित्र.” पण उत्तर आले नाही. पांढरी छाया नाहीशी झाली होती. दया करा अन् खिडकी उघडा; मला तुमच्याशी बोललंच पाहिजे; मी फार दुःखी आहे.” आणि ती खिडकी जवळजवळ मोडकळीस येईपर्यंत तो ती ठोठावीत राहिला.

आतून एक लहानसा तीक्ष्ण आवाज त्याला ऐकू आला. खिडकीची कडी अखेर निघाली, त्याबरोबर त्याने खिडकी लोटून ती उघडली आणि अलगद आत उडी घेतली.

ती पांढरी छाया दूर गेली. पण ज्युलिआँने तिला दंड धरून पकडली. ती एक स्त्री होती. त्याच्या धैर्याच्या कल्पनांचे पाणी पाणी झाले. “ती स्त्री मा. रेनॉल असल्यास मला काय म्हणतील?” अत्यंत बारीक आवाजातील उद्‌गार ऐकताच त्याला कळून आले की त्या मा. रेनॉलच होत्या. तेव्हाची त्याची अवस्था काय सांगावी?

त्याने मादामना आपल्या बाहूंत कवटाळले. त्या थरथर कापत होत्या आणि ज्युलिआँला प्रतिकार करण्याइतकेसुद्धा बळ त्यांच्या अंगी नव्हते.

“दुर्दैवी प्राण्या, काय चालवलं आहेस तू हे?” त्यांचा आवाज एवढा कापत होता की तेवढे शब्दही त्या नीट स्पष्टपणे उच्चारू शकल्या नाहीत. त्या खरोखर खूप रागावल्या आहेत हे ज्युलिआँला कळून आले.

“अतिशय दुर्धर अशा चौदा महिन्यांच्या विरहानंतर मी तुम्हाला भेटायला आलेलो आहे.”

“जा, निघून जा ह्या क्षणी; सोडा मला; अरेरे मंस्यूर शॅलाँ! त्याला पत्र लिहायला तुम्ही मला मनाई का केलीत? मी ही आपत्ती टाळू शकले नसते का?” मादामनी त्याला जोराने स्वतःपासून दूर ढकलले. त्यांच्या अंगात खरोखरी असाधारण बळ आले होते. गुदमरलेल्या आवाजात त्या पुन्हा म्हणाल्या,

“माझ्या गुन्ह्याचा मला पश्चात्ताप होत आहे. माझ्या डोक्यात प्रकाश पाडून परमेश्वराने माझ्यावर कृपा केली आहे. जा, पळून जा; जा म्हणते ना?”

“चौदा महिन्यांच्या दारुण दुःखानंतर, तुमच्याशी बोलल्याशिवाय मी मुळीच जाणार नाही. ह्या कालावधीत तुम्ही काय काय करीत होतात ते जाणून घेण्याची माझी इच्छा आहे. होय, तेवढ्या विश्वासाला पात्र ठरण्याइतकं प्रेम मी तुमच्यावर खात्रीने केलं आहे. सगळं जाणण्याची माझी इच्छा आहे.”

स्वतःच्या मनाविरुद्ध, ज्युलिआँच्या त्या बोलण्यातील अधिकारपूर्ण सूर मा. रेनॉलना इतका जाणवला की त्याने त्यांच्या अंतःकरणावर परिणाम केला.

ज्युलिआँने आवेगाने त्यांना बाहूपाशात धरले होते; आणि त्यातून निसटण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा प्रतिकार तो करीत होता. पण मग मादामना तसे कवटाळून धरणे त्याने थांबविले. ती मोकळीक मिळताच त्यांना जरा धीर आला.

ज्युलिआँ म्हणाला, “मी शिडी वर ओढून घेणार आहे; म्हणजे आवाजाने जाग येऊन एखादा नोकर या बाजूने गस्त घालण्यास आलाच तर त्यामुळे आपल्या अब्रूला बट्टा लागण्याचा कठीण प्रसंग आपल्यावर ओढवणार नाही.” त्यावर खऱ्याखुऱ्या रागाने मा. रेनॉल उत्तरल्या, “सोडा मला; त्यापेक्षा सोडून जा मला; माणसांची कसली तमा आहे मला? तुम्ही माझ्याशी किती भयंकर चुकीचं वागता आहात हे तो परमेश्वर पाहात आहे; आणि त्याबद्दल तो मला शिक्षा करील. मला तुमच्याबद्दल पूर्वी एकदा जो स्नेहभाव वाटत होता त्याचा गैरफायदा तुम्ही भ्याडपणे घेत आहात. पण आता तो स्नेहभाव मला वाटत नाही. तुम्ही ऐकत आहात ना, ज्युलिआँसाहेब?”

कसलाही आवाज होणार नाही इतक्या हळुवारपणे ज्युलिआँने शिडी वर ओढून घेतली. “तुमचे यजमान गावातच आहेत काय?” त्याने विचारले. त्यात त्यांची अवज्ञा करण्याचा त्याचा उद्देश नव्हता; तर नेहमीच्या सवयीनुसार त्याने तसे विचारले होते.

“माझ्याशी असं काही एक बोलू नका, दया करा तेवढी; नाही तर मी माझ्या पतीला बोलावतेच कशी. वाटेल ते करून तुम्हांला यापूर्वीच घालवून दिलं नाही हा अपराध माझ्या हातून व्हायला नको असता झालाच आहे. मला कीव येते तुमची.” त्याच्या स्वाभिमानाला धक्का देण्याचा प्रयत्न करीत मादाम बोलल्या. त्याचा स्वाभिमान फार लवकर दुखावला जातो हे त्यांना ठाऊक होते.

मा. रेनॉल यांनी केलेला बहुवचनी नामोल्लेख, एवढे नाजूक बंध तटकन तोडून टाकण्याची त्यांची ती तुटक पद्धती आणि ते बंध त्या क्षणालाही तसेच अस्तित्वात असल्याची त्याची जाणीव ह्या गोष्टींनी ज्युलिआँच्या मनातील उत्कट प्रणयभावना उन्मादाच्या स्वरूपात खवळून उठल्या.

“काय? तुमचं माझ्यावर इतःपर प्रेम नाही हे शक्य तरी आहे काय?” आपल्या अंतःकरणापासून ज्युलिआँने हे उद्‌गार अशा रीतीने काढले की ते ऐकणाराला अविचलित राहणे अगदी मुष्किल व्हावे.

मा. रेनॉलनी त्यावर उत्तर दिले नाही. ज्युलिआँच्या डोळ्यांवाटे मात्र दुःखदायक अश्रुपात चालू होता. खरोखर आता त्याच्या अंगी बोलण्यासाठी बळच आतापर्यंत नव्हते. तरी तो कसेबसे म्हणाला,

“ज्या एका व्यक्तीने आतापर्यंत माझ्यावर एवढं प्रेम केलं ती आता मला पूर्णपणे विसरली आहे असाच ना याचा अर्थ? आता मग इतःपर जगून तरी काय उपयोग?” कोणा एका पुरुषाशी आपल्याला मुकाबला करावा लागणार याबद्दलचे त्याचे भय नष्ट झाल्याबरोबर त्याचे सगळे धैर्य गळून गेले; त्याच्या हृदयातून प्रेमाव्यतिरिक्त प्रत्येक गोष्ट नाहीशी झाली होती.

बराच वेळ त्याने निःशब्द रुदन केले. त्याच्या हुंदक्यांचा आवाज मादामना ऐकू येत होता. त्याने त्यांचा हात आपल्या हाती घेतला. तो काढून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला; आणि तरीही अधूनमधून हिसकाहिसक केल्यानंतर अखेर त्यांनी तो तसा राहू दिला. काळोख खूपच होता. ते दोघेही मादामच्या बिछान्यावर बसले असल्याचे त्यांना आढळून आले.

“केवढा फरक पडला आहे, चौदा महिन्यांपूर्वीच्या व आताच्या परिस्थितीत?” ज्युलिआँच्या डोक्यात विचार आला आणि त्याचे अश्रू वाढले. म्हणजे अनुपस्थिती सगळ्या मानवी भावना अचूकपणे नष्ट करून टाकते. आता माझ्यासाठी उत्तम मार्ग म्हणजे येथून निघून जाणे हा दिसतो.” भावनेने गुदमरलेल्या आवाजात अखेर तो म्हणाला,

“तुम्हाला काय झालं आहे ते मला सांगण्याची कृपा कराल का?”

ज्युलिआँची कडक खरडपट्टी काढणाऱ्या कठोर आवाजात मा. रेनॉल उत्तरल्या, “तुम्ही गेलात तेव्हा माझ्या दुष्कृत्यांची माहिती गावभर फैलावली होती याबद्दल शंकाच नाही. तुमची वागणूक एवढी अविचारी होती. त्यानंतर केव्हा तरी मी नैराश्यमय मनःस्थितीत असताना आदरणीय म. शॅलाँ मला भेटायला आले होते. त्यांनी माझ्याकडून ती गोष्ट कबूल करून घेण्याचा व्यर्थ प्रयत्न खूप वेळ केला. दिजॉनच्या त्या चर्चमध्ये मला घेऊन जाण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात एक दिवस आली. त्या चर्चमध्ये मी प्रथम प्रसादग्रहण केले होते. आणि त्या विषयाला त्यांनी तेथे तोंड फोडण्याचे धारिष्ट केले...” मा. रेनॉल यांचे बोलणे अश्रूंमुळे अडले; त्या पुढे म्हणाल्या, “केवढा लाजिरवाणा क्षण होता तो! मी सगळं कबूल करून टाकलं. त्या सत्पात्र माणसाने

कृपा केली. माझ्यावर राग न काढता ते माझ्या आपत्तीत सहभागी झाले. त्या वेळी मी तुम्हाला दर काही दिवसांनी नियमितपणे पत्र लिहीत असे. पण ती तुमच्याकडे पाठविण्याचं धैर्य मला होत नव्हतं. ती पत्रे मी काळजीपूर्वक जपून ठेवली होती. जेव्हा मी अगदीच दुःखी असे तेव्हा स्वतःच्या खोलीत स्वतःला मी कोंडून घेत असे. आणि मग मी स्वतःच लिहिलेली ती पत्रे पुन्हा पुन्हा वाचीत बसे.

"अखेर शॅलॉंनी माझं मन वळविलं. ती पत्रे त्यांच्या हवाली करण्याची विनंती त्यांनी मला केली. जरा जास्त विवेकाने लिहिलेली त्यातली काही पत्रे तुम्हांला पाठविण्यात आली होती. पण तुम्ही एकाही पत्राचं उत्तर कधी पाठवलं नाही."

"पाठशाळेत मला तुमचं एकही पत्र मिळालेलं नाही. शपथेवर सांगतो मी तुम्हाला."

"हाय रे परमेश्वरा! मग मध्येच ती कोणी अडवली असतील?"

"मग आता माझ्या दुःखाची कल्पनाच करा तुम्ही. त्या दिवशी मी तुम्हांला त्या कॅथीड्रलमध्ये पाहिले तोवर तुम्ही जिवंत होता की नाही एवढीसुद्धा माहिती मला नव्हती..."

उत्तरादाखल मा. रेनॉल म्हणाल्या, "परमेश्वराने त्याच्या कृपेनेच माझ्या लक्षात आणून दिलं की, त्याच्याविरुद्ध, माझ्या मुलांच्याविरुद्ध, आणि माझ्या पतींविरुद्ध मी केवढ्या मोठ्या पापाची धनी होत होते! त्या वेळी माझ्या समजुतीप्रमाणे तुम्ही जसं माझ्यावर प्रेम केलंत तसं त्यांनी कधीच केलं नव्हतं..."

ज्युलिआँने स्वतःला मा. रेनॉल यांच्या बाहूंत झोकून दिले. तसे करण्यात त्याचा काही विशिष्ट हेतू होता असे नव्हे; पण त्याचा स्वतःवरचा ताबाच पूर्णपणे सुटला होता. पण मा. रेनॉलनी त्याला त्यांच्यापासून दूर ढकलले आणि अगदी खंबीर मनाने त्या पुढे बोलू लागल्या, "माझे आदरणीय मित्र म. शॅलॉं यांनी मला जाणीव करून दिली की एम्. द रेनॉल यांच्याशी विवाह केल्याने मी माझं प्रेमसर्वस्व त्यांना अर्पण करण्यास ज्या विशिष्ट प्रेमाबद्दल मी तोवर अनभिज्ञ होते आणि जे त्या घातक जवळिकीपर्यंत माझ्या कधी अनुभवास आले नव्हते – ते सगळं रेनॉल यांनाच द्यायला मी वचनबद्ध झालेले होते... मला मौल्यवान वाटत असलेल्या त्या पत्रांच्या महान् त्यागानंतर माझे जीवन, सुखाने जरी नाही, तरी पुरेसे संथपणे चालले आहे; ते आता आणखी बिघडवू नका. माझे मित्र राहा... उत्तमपैकी मित्र असा. "ज्युलिआँने त्यांच्या हातांची चुंबने घेतली. तो अजूनही रडत असावा असे मादामना जाणवले. त्या म्हणाल्या. "रडू नका; त्यामुळे माला फार मनस्ताप होतो... आता तुमची पाळी आहे; तेव्हा तुम्ही इतके दिवस काय करीत होता ते सगळं सांगा मला." बोलता येणे ज्युलिआँला अवघड झाले होते. मादाम त्याला पुन्हा म्हणाल्या, "तुम्ही पाठशाळेत कोणत्या प्रकारचे जीवन जगलात ते जाणून घेण्याची माझी इच्छा आहे; तेव्हा त्याबद्दल मला सांगा; मग तुम्ही जाऊ शकाल."

आपण मादामना काय सांगत आहोत याचा विचार न करता ज्युलिआँने त्यांना पाठशाळेत प्रथम ज्या असंख्य कारस्थानांना, भानगडींना तोंड द्यावे लागले, द्वेष-मत्सर सहन करावे लागले त्यांची हकीगत सांगितली. आणि नंतर शिक्षक म्हणून नेमणूक झाल्यावर त्याला जो शांततापूर्ण जीवनक्रम व्यतीत करता आला त्याबद्दल त्याने निवेदन केले, मग शेवटी तो म्हणाला, "आपल्यामधील त्या दीर्घ मौनानंतर, आता अगदी स्पष्टपणे दिसत आहे की माझ्यावर तुमचे प्रेम आता राहिलेले नाही. तसेच ती गोष्ट मला समजून यावी

असा तुमचा उद्देश त्या मौनात होता यात शंका नाही." मादाम रेनॉलनी त्याचे हात घट्ट धरले. ज्युलिआँ पुढे म्हणाला, "त्यानंतरच तुम्ही मला पाचशे फ्रँक पाठविलेत."

"छे! मी कधीच काही पाठविलं नाही तुम्हांला." मादाम म्हणाल्या, "पत्रावर पॅरिसच्या टपाल कचेरीचा शिक्का होता आणि सर्व प्रकारचे संशय टाळण्यासाठी, पत्राखाली पॉल सोरेल अशी सही केलेली होती."

त्या पत्राचे संभाव्य मूळ कोठे असावे यावर मग त्या दोघांत थोडी चर्चा झाली. वातावरण बदलू लागले. नकळत दोघांनीही आपापल्या बोलण्यातला आधीचा गंभीर सूर सोडला; प्रेमळ जवळिकीच्या भावना पुन्हा निर्माण झाल्या. काळोख इतका दाट होता की, ते एकमेकांना पाहू शकत नव्हते. पण त्यांच्या आवाजांचे बदललेले सूर सर्व काही सांगून जात होते. ज्युलिआँने त्याचा हात त्याच्या मालकिणीच्या कमरेभोवती वेढला. त्याची ही हालचाल फारच धोकादायक होती. मादामनी त्याचा हात दूर सारण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याने काहीशा चतुराईने, त्याच्या कहाणीतील एका मजेदार हकीगतीकडे त्यांचे लक्ष वळविले. साहजिकच त्याच्या हाताचा विळखा त्या विसरून गेल्या व त्यामुळे त्याचा हात त्यांच्या कमरेभोवती तसाच राहू लागला.

पाचशे फ्रँक्सच्या रकमेबरोबरचे ते पत्र कोणी पाठविले असेल याबद्दल नानाविध तर्क करून झाल्यावर ज्युलिआँने त्याचे निवेदन परत चालू केले. त्याच्या जीवनक्रमातील त्या भूतपूर्व घडामोडी सांगताना त्याला आता अधिक आत्मविश्वास वाटत होता व तो खुल्या दिलाने सांगतही होता. तथापि त्या क्षणी तेथे प्रत्यक्षात जे घडत होते त्या मानाने त्याचे लक्ष पूर्वकालीन गोष्टींत आता तितकेसे गुंतलेले वा रमलेले नव्हते. आता आपल्या ह्या भेटीचा शेवट कोणत्या प्रकारे होणार आहे याकडे त्याचे लक्ष पूर्णपणे केंद्रित झाले होते. "तुम्ही आता गेले पाहिजे" असे मा. रेनॉल त्याला तुटकपणे एकसारख्या सांगत होत्या.

ज्युलिआँ स्वतःशी म्हणाला, "आता जर मला असा दरवाजा दाखविण्यात आला तर ती केवढी लाजिरवाणी गोष्ट ठरेल! त्यामुळे निर्माण होणाऱ्या पश्चात्तापदग्ध भावना माझं सारं जीवन विषमय करून टाकतील. मादाम पुन्हा कधीही मला लिहिणार नाहीत. मी इथं पुन्हा कधी काळी परतू शकेन की नाही हे परमेश्वरालाच ठाऊक!" त्या क्षणापासून ज्युलिआँचा वर्तमान परिस्थितीतील स्वर्गीय आनंद त्याच्या अंतःकरणातून झटकन पूर्णपणे मावळून गेला. ज्या स्त्रीला तो खूप चाहत होता. तिच्या शेजारीच तो चिकटून बसलेला होता; स्वतःच्या बाहूंत त्याने तिला जवळजवळ कवटाळून धरलेले होते; आणि ज्या खोलीत त्या क्षणी दाट अंधार होता तेथेच त्याने तिच्या सहवासात सुखाचे अनेक क्षण व्यतीत केले होते. तथापि त्याला आता जाणवले की गेले काही क्षण ती स्त्री रडत होती, ती मधूनमधून हुंदकेही देत होती, हे तिच्या वक्षाच्या हादरण्यावरून त्याला कळत होते. पण दुर्दैवाने तो फार थंड, एखाद्या राजकारणी पुरुषासारखा भावनाहीन व हिशेबी झाला; इतका की त्याला पाठशाळेच्या आवारात एकदा त्याच्यापेक्षा एका बळकट जोडीदाराकडून एका कुचाळखोर मस्करीचे लक्ष्य बनविले गेले होते त्या वेळच्या त्याच्या मनःस्थितीची आठवण यावी. ज्युलिआँने पाठशाळेतील कथाभागाचे सूत्र चालू केले आणि व्हेरिएर सोडल्यापासून त्याला जे दुःखी दुर्दैवी जीवन कंठाने लागले त्याबद्दल तो बोलू लागला. तेव्हा मा. रेनॉल स्वतःच्या मनात म्हणाल्या,

"म्हणजे जवळजवळ वर्षभराच्या गैरहजेरीनंतर, पूर्वस्मृतीची एखादीही खूण उरलेली नसताना, जेव्हा मी त्यांना विसरून जाण्याचा प्रयत्न करीत होते तेव्हा त्यांचे मन वेर्जीच्या सुखमय पूर्वस्मृतींनी संपूर्णपणे व्यापले होते." मादामच्या हुंदक्यांचा जोर वाढला. आपले कथानिवेदन यशस्वी झाले आहे ही गोष्ट

ज्युलिआँच्या ध्यानी आली. आता आपले अखेरचे शस्त्र काढले पाहिजे हे तो उमजला. त्याला पॅरिसहून नुकत्याच आलेल्या पत्राचा उल्लेख त्याने एकदम केला.

"मॉन्सेनिओर बिशप यांचा कायमचा निरोप घेऊन मी निघून आलो आहे."

"काय? तुम्ही बेझाँसाला परतणार नाही? तुम्ही आम्हाला कायमचे सोडून जाणार?" त्यावर निश्चयी स्वरात ज्युलिआँ म्हणाला,

"होय, तिच्यावर मी माझ्या उभ्या आयुष्यात सर्वात जास्त, घनिष्ठ प्रेम केलं तिच्याकडूनही मी जिथे विसरलो जात आहे त्या स्थळाचा मी त्याग करणार आहे आणि तेथे परत कधी पाऊल न ठेवण्याचा निश्चय करूनच मी पॅरिसला जात आहे."

"तुम्ही पॅरिसला जात आहात?" मादाम अगदी मोठ्यानेच ओरडल्या.

त्यांच्या अश्रूमुळे त्यांचा आवाज अगदी जवळजवळ कोंडला गेला होता. त्याच्यातून त्यांच्या दुःखाची तीव्रता कळून येत होती. ज्युलिआँला अशा उत्तेजनाची गरज होती. तो आता असे काही वागण्याचा प्रयत्न करू पाहात होता की त्यामुळे प्रत्येक गोष्टीचा निकाल कदाचित त्याच्याविरुद्ध गेला असता आणि मादामच्या त्या उद्‌गारांपूर्वी आपल्या वागण्याचा परिणाम काय होत आहे हे त्याला मुळीच कळत नव्हते. त्याबाबतीत तो संपूर्ण अंधारातच होता. पण आता तो अधिक वेळ मागेपुढे पाहणार नव्हता. पश्चात्तापाच्या भयाने त्याला स्वतःवर संपूर्ण ताबा मिळवून दिला. उभा राहात तो थंडपणे म्हणाला, "होय मादाम, मी तुम्हांला कायमचं सोडून जात आहे. सुखी असा. अच्छा, येतो मी."

खिडकीच्या दिशेने तो काही पावले टाकीत गेला. तो खिडकी उघडीतच होता. मादाम त्याच्यामागून धावल्या. त्याच्या खांद्यावर त्यांनी स्वतःचे डोके ठेविले. आपल्या हातांनी त्याला कवटाळून स्वतःचा गाल त्याच्या गालावर त्या दाबीत होत्या असे ज्युलिआँला स्पर्शज्ञानाने जाणवले.

ज्युलिआँने ज्या गोष्टीची अपेक्षा पहिल्या दोन तासांत अत्यंत आसक्तीने केली होती. ती त्याने येणेप्रमाणे तीन तासांच्या संभाषणानंतर मिळविली. हे क्षण जर यापेक्षा जरा आधी आले असते, मादामचा पश्चात्ताप पूर्णपणे मावळून, पूर्ववत् कोमल भावनाप्रत त्या जर जरा आधी पोचल्या असत्या तर ज्युलिआँला स्वर्गीय सुखाची प्राप्ती झाली असती. पण ती सुखी अवस्था त्याने युक्तीयुक्तीने मिळविल्यामुळे केवळ एक औपचारिक विजय यापेक्षा त्यात जास्त स्वारस्य उरले नव्हते. मादाम रेनॉल यांच्या विनवण्या मान्य न करता, ज्युलिआँने तेथे रात्रीचा छोटा दिवा लावण्याचा आग्रह धरला. त्याने मादमना विचारले.

"मग मी तुम्हाला येऊन भेटलो याची स्मृति मजजवळ अजिबात राहू नये अशी तुमची इच्छा आहे का? ह्या सुंदर डोळ्यांत जे सुंदर प्रेम निःसंशयपणे चमकत आहे ते मी गमावून बसावं का? ह्या मोहक हातांचे गोरेपण मला अदृश्यच राहावे का? कदाचित मी तुमच्यापासून खूपच दीर्घकाळ दूर राहणार आहे याचा जरा विचार करा."

त्यावर मा. रेनॉल स्वतःला म्हणाल्या, “हे भयंकरच आहे.” पण आयुष्यभराच्या विरहाच्या कल्पनेने स्वतःच्या अश्रूंत त्या इतक्या विरघळून गेल्या की त्यापुढे त्या कशालाच नकार देऊ शकत नव्हत्या. व्हेरिएरच्या पूर्वेकडील डोंगरावरच्या देवदार वृक्षांच्या रेखाकृती स्पष्ट छटांनी रंगविण्यास पहाट प्रारंभ करू लागली होती, सुखाचे मद्य पिऊन ज्युलिआँला अशी बेहोषी आली होती की तेथून निघून जाण्याऐवजी सबंध दिवसभर मादामच्या खोलीतच लपून राहण्यास व दुसऱ्या रात्रीपर्यंत त्यांना सोडून न जाण्यास परवानगी देण्याबद्दल त्याने त्यांना विनंती केली.

त्यावर मादाम उतरल्या, “हो, का नाही? पण मी माझ्या या घातक पूर्वभूमिकेवर आल्यामुळे मला माझ्याबद्दल घृणा वाटू लागली आहे व आता यानंतर माझ्या नशिबी जन्मभर दुःखच दुःख येणार आहे.” त्यांनी हर्षभराने ज्युलिआँला स्वतःच्या हृदयाशी घट्ट धरले. त्या पुढे म्हणाल्या, “माझे पती आता पूर्वीचे मुळीच राहिलेले नाहीत; त्यांना संशय आलेले आहेत. ह्या विशिष्ट बाबतीत मी त्यांना एकसारखं बनवीत आले आहे असं त्यांना वाटतं. माझ्याशी त्यांचं वागणं आताशा अतिशय रागाचं, चिडचिडीचं असतं. त्यांना एखादा बारीकसादेखील आवाज ऐकू गेला तर माझी धडगत नाही. ते मला घरातून हाकलून लावतील. मी आहेच तशी हतभागी, दुर्दैवी.”

“हं; ह्यात मला शॅलाँचा आवाज ऐकू येत आहे बरं का! पाठशाळेत माझी पाठवणी कठोरपणे केली जाण्यापूर्वी तुम्ही माझ्याशी असं बोलला नसता. तेव्हा माझ्यावर तुमचं प्रेम होतं ना.” ज्या थंडपणे हे शब्द ज्युलिआँने उच्चारले त्याबद्दलची बक्षिसी त्याला लगेच मिळाली. आपले पती जवळच कोठे तरी असावेत व ते आपणास पकडतील असे भय मादामना वाटत होते. पण त्या संकटाचे भय त्या लगेच विसरून गेल्या आणि ज्युलिआँवर त्यांचे प्रेम नाही याबद्दल त्याला आलेल्या शंकेमुळे कोसळणाऱ्या त्याहीपेक्षा मोठ्या संकटाचा विचार त्यांच्या डोक्यात घोळू लागल्याचे ज्युलिआँला आढळून आले. आता भराभर उजाडू लागले होते; आणि प्रकाश खोलीभर पसरला होता. फक्त ज्या एकाच स्त्रीवर ज्युलिआँने त्याच्या उभ्या आयुष्यात प्रेम केले होते आणि काही तासांपूर्वी जी स्त्री भयंकर परमेश्वराच्या भीतीत व स्वतःच्या कर्तव्यनिष्ठेच्या भावनेत पूर्णपणे गुरफटून गेली होती ती सुंदर स्त्री आता त्याच्या बाहूंत होती; नव्हे जवळजवळ त्याच्या पायाशी होती हे पाहून त्याच्या स्वाभिमानाच्या सर्व सुखद भावना जागृत झाल्या. एक वर्षाच्या सतत प्रयत्नांनी बळकट झालेले मा. रेनॉलचे निश्चय त्याच्या धिटाईसमोर टिकू शकत नव्हते.

तितक्यात त्यांना घरातून कसला तरी आवाज ऐकू आला. आतापर्यंत मादामनी ज्या गोष्टीचा विचार केला नव्हता त्या गोष्टीने त्यांचे मन आता गडबडून गेले. त्या त्यांच्या प्रियकराला म्हणाल्या,

“ती दुष्ट एलिसा आता खोलीत येईल. आपण त्या मोठ्या थोरल्या शिडीचं काय करायचं? ती कुठे लपविता येईल? मी ती आता माळ्यावर घेऊन जाते.” एक प्रकारच्या उल्हासाने मादाम एकदम उद्‌गारल्या.

ज्युलिआँचे अंतःकरण एकदम आनंदाने उचंबळून आले. तो उद्‌गारला, “हीच– हीच उल्हसित आनंदी मुद्रा माझ्या पूर्वपरिचयाची आहे. माझ्या स्मृतीत कोरलेली आहे. पण तुम्हाला नोकरांच्या खोलीतून जावं लागेल?”

“मी तिथं पायऱ्या यायच्या वाटेवरच आधी शिडी ठेवीन, नोकराला बोलावून घेऊन त्याला एखादं काम सांगेन व बाहेर पाठवून देईन.”

अनुक्रमणिका

“पण त्या वाटेवरून जाताना नोकराने शिडी पाहिल्यास, चटकन् सांगण्यासारखी एखादी सबब तुमच्याजवळ तयार असली पाहिजे एवढं लक्षात ठेवा.”

मा. रेनॉलनी ज्युलिआँला एक चुंबन दिले व त्या म्हाणाल्या, “होय, माझ्या देवतुल्य प्रियकरा; आणि मी बाहेर गेल्यावर एलिसा खोलीत आल्यास माझ्या बिछान्याखाली चटकन् लपायचं तुम्हीही लक्षात ठेवा बरं का?”

मा. रेनॉल यांच्या वृत्तीत एकाएकी आलेला तो आनंदी खेळकरपणा पाहून ज्युलिआँ थक्क झाला; त्याच्या डोक्यात विचार आले,— “म्हणजे आगामी शारीरिक संकटाच्या भयामुळे त्यांचे मनःस्वास्थ्य बिघडण्याऐवजी त्यांच्या ठिकाणी मूळची आनंदी वृत्ती प्रकट झाली याचे कारण त्या त्यांचा पश्चात्ताप विसरल्या आहेत हेच होय. खरोखर ही एक श्रेष्ठ दर्जाची महिला आहे. अहा! त्यांचे हृदय असे आहे की ज्याच्यावर स्वामित्व गाजवायला मिळणे ही एक आत्यंतिक गौरवाची गोष्ट आहे.” ज्युलिआँला पराकोटीचा आनंद झाला होता.

मा. रेनॉलनी शिडी घेतली. म्हणजे त्यांच्या दृष्टीने ती बरीच जड होती. ज्युलिआँ त्यांना मदत करण्यासाठी पुढे झाला. त्यांच्या कमनीय आकृतीचे त्याला कौतुक वाटत होते. त्या आकृतीत, खरे म्हणजे, बळकटपणाव्यतिरिक्त इतर काहीही संभवू शकत होते. पण मादामनी मदतीशिवाय शिडी एकदम उचलली; आणि तीही इतक्या सहज तेने की जणू त्या एखादी खुर्चीच उचलीत होत्या! त्यांनी ती शिडी तिसऱ्या मजल्यावरच्या पायऱ्या यायच्या वाटेवर त्वरित नेली व तिथे भिंतीला टेकून ठेवली. मग त्यांनी नोकराला बोलाविले आणि त्याला त्याचे कपडे चढविण्यासाठी वेळ द्यायचा म्हणून त्या कबुतरांच्या खुराड्याकडे वरती गेल्या. पाच मिनिटांनी त्या परत आल्या तेव्हा त्यांना शिडी तेथे दिसली नाही! मग शिडी गेली कुठे? ज्युलिआँ जर त्या वेळी घरात नसता तर मग कसलाच धोका नव्हता. पण त्या क्षणी त्यांच्या पतीने शिडी पाहिली असती तर? तर त्याचे परिणाम फार भयप्रद ठरणार होते. मादामनी घरात खालती, वरती अशी धावपळ केली. अखेर त्यांना शिडी छपराखाली आढळली. तेथे ती त्या नोकराने नेली होती व स्वतःच लपवून ठेवली होती. ही गोष्ट तशी चमत्कारिक होती; आणि अन्य कोणत्याही त्या या धोक्याच्या सूचनेने घाबरून गेल्या असत्या.

त्यांनी विचार केला, “आतापासून चोवीस तासांच्या नंतर, की जेव्हा ज्युलिआँ गेलेला असेल तेव्हा जे काय घडेल त्याचा मला विधिनिषेध काय? तेव्हा तर प्रत्येकच गोष्ट मला भीतीची व पश्चात्तापाची ठरणार नाही का?

आपण प्राणत्याग केला पाहिजे अशा तऱ्हेचा काहीसा संदिग्ध विचार मा. रेनॉल यांच्या मनात वावरत होता. पण त्याचे काय एवढे महत्त्व होते? जो विरह त्यांना कायमचा वाटला होता तो अल्पसा ठरून ज्युलिआँ त्यांच्याकडे परत आला होता, त्यांना परत भेटला होता; आणि त्यांच्याकडे त्याला जे दिव्य करावे लागले होते तेच त्याच्या संपन्न अतीव प्रेमाचा पुरावा देत होते.

शिडीचा तो प्रकार ज्युलिआँला सांगताना त्यांनी विचारले, “त्या नोकराने, त्याला शिडी कशी गवसली ते माझ्या पतीला सांगितले तर मी त्यांना काय सांगू?” क्षणभर त्या विचारात गढून गेल्या आणि मग म्हणाल्या, “ज्या शेतकऱ्याने ती शिडी तुम्हाला विकली तो शोधून काढायला त्यांना चोवीस तास लागतील.” आणि असे बोलत त्यांनी स्वतःला ज्युलिआँच्या बाहूंत झोकून दिले व त्याला कंपित कायेने कडकडून

आलिंगून घेत त्या उद्‌गारल्या, "अहाहा! मृत्यू यावा तर तो अशाच स्थितीत." त्यांनी ज्युलिआँची अनेक चुंबने घेतली व हसत त्या पुढे म्हणाल्या, "पण भुकेपायी मी तुम्हाला मरू देता कामा नये. या तुम्ही; — पहिल्या प्रथम मी तुम्हाला मा. डेरविलच्या खोलीत लपवणार आहे. त्या खोलीला नेहमी कुलूपच लावलेले असते." त्यांनी स्वतः जाय-यायच्या वाटेच्या टोकाशी पहारा ठेवला आणि ज्युलिआँ एका दारापासून दुसऱ्या दारात हळूहळू सरकत गेला. कुलुपाला बाहेरून किल्ली लावीत मादामनी त्याला बजावले, दरवाजा कोणीही खटखटावला तरी उत्तर म्हणून द्यायचं नाही हे लक्षात ठेवा हं. फार तर मुलंच येतील म्हणा खेळत खेळत."

"त्यांना बागेत, खिडकीच्या खाली पाठवा; म्हणजे त्यांना पाहण्याचं सुख मला उपभोगता येईल. त्यांना बोलतेही करा." ज्युलिआँ म्हणाला.

"होय होय." त्याला तेथे सोडून जाताना मादाम उतरल्या.

पण थोड्याच वेळात त्या परतल्या. त्यांनी संत्री, बिस्किटे आणि मालगा मद्याची एक बाटली आणली. पाव चोरून आणणे त्यांना शक्य झाले नव्हते.

"तुमचे यजमान काय करीत आहेत?" ज्युलिआँने विचारले.

"काही शेतकऱ्यांशी त्यांना जे व्यवहार करावयाचे आहेत त्याची टिपणे लिहून ते तयार करीत आहेत."

पण आता आठ वाजले होते. घरात सगळीकडे गडबड सुरू झाली होती. कामाचे आवाज येऊ लागले होते. मादाम रेनॉल जर कुठे दिसल्या नाहीत तर घरची माणसे प्रत्येक ठिकाणी त्यांची शोधाशोध करू लागली असती व म्हणून ज्युलिआँला सोडून जाणे आता त्यांना भागच होते. पण विवेकी वर्तनाचे सगळे नियम झुगारून त्या पुन्हा परत आल्या. त्यांनी ज्युलिआँसाठी पेलाभर कॉफी आणली होती; कारण तो भुकेने व्याकुळ होईल याची भीती त्यांना वाटत होती. दुपारच्या जेवणानंतर त्यांनी मा. डेरविल यांच्या खोलीच्या, खिडकीच्या खाली मुलांना गोळा करून आणण्याची व्यवस्था केली. मुले चांगलीच वाढली आहेत, मोठी झाली आहेत असे ज्युलिआँला दिसून आले. पण त्यांचा पूर्वीचा खानदानी रुबाब जाऊन ती आता चारचौघांसारखी अगदी सामान्य दिसत आहेत असे त्याला वाटले; किंवा त्याचे स्वतःचे विचार व दृष्टिकोणही बदलला असावा. मा. रेनॉल मुलांशी ज्युलिआँबद्दल बोलल्या. सर्वांत थोरल्या मुलाने आपल्या माजी शिक्षकाबद्दल प्रेमादर, आणि तो गेल्याबद्दल खेद व्यक्त केला. पण धाकटी दोन्ही मुले मात्र त्यांच्या शिक्षकाला जवळजवळ विसरून गेली होती असे दिसून आले.

त्या सकाळी एम. द रेनॉल घरातून बाहेर पडले नाहीत. ते एकसारखे वर-खाली जात येत होते. त्यांच्या शेतातील बटाट्याचे पीक काही शेतकऱ्यांना ते विकीत होते आणि त्याबाबतचे व्यवहार त्यांच्याशी ठरविण्यात ते गुंतले होते. भोजनाच्या वेळेपर्यंत मा. रेनॉलना, त्यांनी कोंडलेल्या त्या कैद्याकडे पाहायला फुरसत झाली नाही. जेव्हा भोजनाचे पदार्थ मेजावर आले तेव्हा बशीभर गरम सूप चोरून ज्युलिआँला द्यावे असा विचार त्यांच्या डोक्यात आला. सूपची बशी काळजीपूर्वक घेऊन त्या ज्युलिआँच्या खोलीच्या दाराशी गुपचूप आल्या तेव्हा सकाळी ज्याने शिडी लपवून बाजूस ठेवली होती तो नोकर त्यांच्या अगदी समोरच आला. त्या क्षणी तोही दुसऱ्या बाजूने चूपचाप त्या वाटेवर आला होता व जणू काही तो कशाचा तरी कानोसा घेत

होता. खोलीत अगदी हलक्या पायांनी चालावे ही गोष्ट ज्युलिआँ कदाचित विसरला असावा. तथापि मालकिणीला पाहून नोकर गोंधळून गेला व तेथून गडबडीने निघून गेला. मा. रेनॉल मग धीटपणे त्या खोलीत शिरल्या. त्यांनी सांगितलेल्या त्या प्रसंगाच्या वृत्तान्ताने ज्युलिआँच्या अंगावर काटा उभा राहिला.

त्या त्याला म्हणाल्या, “तुम्ही भीत आहात; आणि मी? मी जगातल्या साऱ्या संकटांना, सर्व धोक्याचा, न भिता धीटपणे सामना देणार आहे. मला फक्त एकाच गोष्टीची भीती वाटत आहे व ती म्हणजे तुम्ही इथून गेल्यानंतर मी मागे एकटी उरेन त्या क्षणाची.” एवढे बोलून मा. रेनॉल भावविवश होऊन तेथून जवळजवळ पळतच निघून गेल्या.

ज्युलिआँ फारच प्रक्षुब्ध झाला होता. तो स्वतःला म्हणाला, “हं! या उदात्त जीवाला जर कशाचे एकमेव भय असेल तर ते पश्चात्तापाचे.”

अखेर रात्र झाली. एम्. द. रेनॉल कॅसिनोत— सार्वजनिक नाट्यगृहात— गेले.

आपले डोके फार दुखत आहे असे त्यांच्या पत्नीने जाहीर केले. त्या स्वतःच्या शयनगृहात गेल्या. घाईने त्यांनी एलिसाला रजा दिली आणि मग ज्युलिआँ होता त्या खोलीचा दरवाजा उघडण्यासाठी ताबडतोब त्यांच्या बिछान्यावरून उठल्या.

पण ती गोष्ट अशी घडली होती की भुकेने ज्युलिआँ गळून गेला होता. पाव आहे काय ते पाहण्यासाठी मा. रेनॉल कोठीखोलीत गेल्या. कोणी तरी ओरडल्याचा आवाज ज्युलिआँला ऐकू आला. मादाम परतल्या व त्यांनी ज्युलिआँला सांगितले की अंधाऱ्या कोठीखोलीत पाव ठेवलेल्या कपाटाजवळ जाऊन पाव काढण्यासाठी त्यांनी आपला हाता पुढे केला असता एका स्त्रीच्या दंडाचा स्पर्श त्यांना झाला होता. ज्युलिआँला ऐकू आलेला आवाज एलिसाच्या ओरडण्याचा होता.

“ती तिथं काय करीत होती?”

ती तिथून बहुधा मिठाई चोरीत असावी किंवा कदाचित आपल्यावर पाळत ठेवीत असावी.” मादाम पूर्ण बेपर्वाईने बोलल्या, “पण सुदैवाने मला थोडासा “पाय” (मासाचे सांधण्यासारखे एक पक्वान्न) आणि पावाचा मोठा तुकडा मिळाला आहे.”

मा. रेनॉल यांनी कमरेभोवती गुंडाळलेल्या मलवस्त्राच्या खिशाकडे निर्देश ज्युलिआँने विचारले, “अन् त्यात काय आहे?”

त्या खिशात पावाचे तुकडे भोजनाच्या वेळेपासूनच भरकेले होते ही गोष्ट मादाम विसरूनच गेल्या होत्या.

ज्युलिआँने अत्यंत प्रेमावेगाने त्यांना आपल्या कवेत घेतले. त्या इतक्या सुंदर त्याला यापूर्वी कधीच दिसल्या नव्हत्या. तो स्वतःशी संदिग्धपणे बोलला, “यांच्यापेक्षा अधिक उदार, उमद्या वृत्तीची व्यक्ती मला पॅरिसमध्येसुद्धा आढळणार नाही.” पुरुषांकडून अशा प्रकारचे अल्पस्वल्प प्रेमोपहार स्वीकारण्याची सवय

नसलेल्या स्त्रीप्रमाणे मा. रेनॉल यांच्या अंगी पुष्कळच बुजरेपणा होता. पण त्यांच्या अंगी अव्वल दर्जाचे धैर्यही होते. त्यांना भीती वाटे ती निराळ्याच प्रकारच्या वर्तमान संकटापेक्षा जास्त भयाण अशा संकटांचीच.

खूप भूक लागल्यामुळे ज्युलिआँ त्या खाद्यपदार्थांवर सपासप ताव मारीत होता आणि त्याची प्रियकरीण इतक्या साध्या जेवणाबद्दल खेळकरपणे दिलगिरी व्यक्त करीत होती. (कारण तिला गंभीर भाषणाचे फार भय वाटत असे) तेवढ्यात खोलीचा दरवाजा एकदम जोराने बाहेरून ठोठावण्यात आला. बाहेर रेनॉल होते.

"तू स्वतःला असं आत, कडीकुलुपात काय कोंडून घेतलं आहेस?" मोठ्याने ओरडून त्यांनी मादामना बाहेरून विचारले.

ज्युलिआँ सोफ्याखाली जाऊन लपला न लपला तोच रेनॉल आत आले.

आत येतायेताच त्यांनी विचारले, "हे काय? तू तर पूर्ण पोषाख केलेला आहेस? तू जेवण घेत आहेस आणि दरवाजा आतून लावून घेतला आहेस?"

इतर कोणत्याही सर्वसाधारण दिवशी, पतीने शक्य तितक्या क्रूरतेने विचारलेल्या अशा प्रश्नाने मा. रेनॉलना मनस्ताप दिला असता. पण त्यांच्या मनात विचार येत होता की पतीने स्वतःची नजर जरा खालच्या बाजूस वळवायचा अवकाश होता की लगेच त्यांना ज्युलिआँ दिसला असता; कारण सोफ्यासमोरच्या ज्या खुर्चीत ज्युलिआँ क्षणापूर्वी पर्यंत बसलेला होता तिच्यात रेनॉलनी आल्याआल्याच आपले अंग झोकून दिले होते.

डोके दुखणे ही सबब मादामना सर्वच गोष्टीच्या स्पष्टीकरणाला उपयोगी पडली. सायंकाळी कॅसिनोमध्ये बिलिअर्ड खेळताना 'पूल' जिंकून एकोणीस फ्रँक्स मिळविल्याची संपूर्ण तपशीलवार हकीगत त्यांचे पती आपल्या परीने त्यांना देत होते. "थोड्या थोडक्याचा डाव नव्हे! तब्बल एकोणीस फ्रँकचा, देवाच्यान्." त्यांनी पुस्ती जोडली. पण त्याच वेळी मादामनी त्या दोघांच्या डोळ्यांसमोरच, एका खुर्चीवर, थोड्या फुटांच्या अंतरावर असलेली ज्युलिआँची हॅट पाहिली. एरवीपेक्षा जास्तच थंड राहून मादामनी आपले कपडे उतरविण्यास सुरुवात केली. एका सोईस्कर क्षणी त्या झटकन् आपल्या पतीच्या पाठीमागच्या बाजूस वळल्या व ती हॅट असलेल्या खुर्चीवर त्यांनी आपला एक कपडा फेकला.

अखेर रेनॉल तेथून गेले. पाठशाळेतील त्याच्या जीवनक्रमाची कथा पुढे सांगण्याची विनंती मादामनी ज्युलिआँला केली. त्या म्हणाल्या, "काल तुमच्या निवेदनाकडे माझं लक्षच नव्हतं. तुम्ही बोलत होता तेव्हा तुम्हाला करण्यासाठी अंगी धैर्य कसं आणावं फक्त याचाच मी विचार करीत होते."

मा. रेनॉल म्हणजे अविवेकाची एक मूर्तीच होत्या. ते दोघेजण एकमेकांशी बोलत होते ते बरेच मोठ्याने. मध्यरात्र उलटून दोन वाजले असावेत तेव्हा त्यांच्या सहवास–संभाषणात पुन्हा अडथळा आला. दाराला जोराने धक्का दिला गेला. रेनॉल पुन्हा आले होते.

“मला चटकन आत घे, घरात चोर शिरलेत. सेंट जीनला सकाळी चोरांची शिडी सापडली.” ते म्हणाले.

ज्युलिआँच्या बाहूत स्वतःला झोकून देत. मा. रेनॉल म्हणाल्या, “आता हा सर्व गोष्टींचा शेवट आहे. माझे पती आपल्या दोघांनाही ठार करणार आहेत. चोरांबिरावर त्यांचा मुळीच विश्वास नाही. मी तुमच्या बाहूत मृत्यू पतकरणार आहे; माझ्या जीवनात आजवर मी जेवढी नशीबवान होते त्यापेक्षा ह्या अशा मरणात मी अधिक नशिबवान ठरेन.” त्यांनी त्यांच्या पतीला जबाबच दिला नाही. रेनॉल रागाने बाहेर वाट पाहात थांबले होते आणि मा. रेनॉल त्या क्षणी ज्युलिआँला आपल्या बाहूत घट्ट आवळून आवेगाने आलिंगन देत होत्या.

ज्युलिआँ मादामना अधिकारवाणीने म्हणाला, “स्टॅनिस्लासची माता म्हणून स्वतःचे रक्षण करा. भिंतीतील छोट्या खिडकीतून मी खाली अंगणात उडी मारून बागेतून सटकणार आहे. इथली कुत्री मला ओळखतात. माझे कपडे एका गाठोड्यात बांधा व ते खाली बागेत, जमेल तितक्या लवकर टाका. तोवर खुशाल फोडू द्या त्यांना दार आत येण्यासाठी. तुम्ही जे काय कराल, बोलला त्यात कसलीही कबूली मात्र देऊ नका; त्या गोष्टीला माझी मनाई आहे. निश्चित काही कळण्यापेक्षा कोणत्याही गोष्टीबद्दलची शंकास्पद स्थिती बरी.”

“खाली उडी टाकून तुम्ही जिवाला मुकाल ना.” मादामना काळजी एवढ्याच गोष्टीची होती व त्यांचा जबाबही तेवढाच होता.

मग त्या त्याच्याबरोबर छोट्या खोलीच्या खिडकीपर्यंत गेल्या. त्याचे कपडे लपविण्यासाठी त्यांनी आवश्यक तेवढा वेळ घेतला व अखेर त्यांनी त्यांच्या यजमानांना खोलीचे दार उघडले. ते रागाने नुसते उसळले होते. मा. रेनॉल यांची तो झोपण्याची खोली, तिच्यातली ती छोटी खोली वगैरे वगैरे सारे त्यांनी तपासले आणि एकही शब्द न बोलता ते निघून गेले. ज्युलिआँचे कपडे खाली त्याच्याकडे फेकण्यात आले होते. त्याने ते झेलले आणि तो बागेतून दू नदीच्या दिशेने झटकन पसार झाला.

तो पळत असता बंदुकीची गोळी मागून सुटल्याचा व पाठोपाठ ती गोळी त्याच्या अगदी जवळून सू करीत पुढे गेल्याचा आवाज त्याने ऐकला.

तो स्वतःशी म्हणाला, “ही गोळी रेनॉल यांची नक्की नाही कारण त्यांची नेमबाजी काही इतकी चांगली नाही.” त्याच्याबरोबर कुत्री मुकाटपणे धावत होती. आणखी एक गोळी आली आणि तिने एका कुत्र्याचा पंजा तोडला असावा. कारण ते ते कुत्रे दीनवाणे केकाटू लागले. एका ओट्याच्या भिंतीवरून ज्युलिआँने उडी मारली. लपत छपत तो सुमारे पन्नास यार्ड पुढे पळाला आणि मग दिशा बदलून दुसऱ्या मार्गाने निघाला. त्याच्या नावाने मारण्यात आलेल्या हाका त्याला ऐकू आल्या. त्याचा शत्रू असलेल्या त्या नोकराने गोळी झाडल्याचे त्याने स्पष्टपणे पाहिले. एक शेतकरीही तेथे आला आणि त्यानेही बागेच्या दुसऱ्या बाजूने त्याच्यावर गोळी झाडली; पण हा वेळपावेतो ज्युलिआँ दू नदीच्या किनाऱ्यापर्यंत पोहोचला होता. मग त्याने तेथे कपडे चढविले.

अनुक्रमणिका

एक तासानंतर तो व्हेरिएरपासून एक लीग (तीन मैल) अंतरावर आल्यावर जिनेव्हाच्या मार्गाला लागला. त्याला वाटले, “त्यांना माझ्याविषयी काही संशय आल्यास ते माझा तपास पॅरिसला जाणाऱ्या मार्गावर करतील.”

[**खंड पहिला समाप्त**]

अनुक्रमणिका

**महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ**

**भाषांतर मालिकेतील प्रकाशने**

**आर्थिक सिद्धांत व अर्धविकसित प्रदेश**

— श्रीमती सरला कारखानीस

**तुरुंगातील पत्रे**

— श्री. द्वा. भ. कर्णिक

**पिता—पुत्र —**

— प्रा. व वि. बडवे

**वैज्ञानिक तत्वज्ञानाचा उदय**

— प्रा. ग वि. कुंभोजकर

**धर्म आणि विज्ञान**

— श्री. वि. वा. कुवाडेकर

**समाजवाद विरुद्ध भांडवलशाही**

— प्रा. जी. लु. गांधी

**गणिती तत्त्वज्ञानाचा परिचय**

— प्रा. म रा. राईलकर

A History of Maratha Navy & Merchantships

— ले. डॉ. भा. कृ. आपटे

**अभिनय साधना**

— कै के. नारायण काळे

**संगीत व कल्पकता**

श्री. श्री. ह. देशपांडे

**मुद्राराक्षस**

— डॉ. गो. के. भट

**कालिदास**

— ले. म. म. डॉ. वा. वि. मिराशी

अनुक्रमणिका

**मी इझाडोरा**

— श्रीमती रोहिणी भाटे

**भारतीय वाद्ये**

— ले. डॉ. बी. सी. देव